''मराठी सत्तेचा शेवट आणि ब्रिटिश सत्तेची पायाभरणी'' 1795 -1885

श्री. जगदिशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठ, विद्यानगरी, झुंझुनू, राजस्थान - 333001

इतिहास विषयांतर्गत

पीएच्. डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी

येथे सादर केलेला पीएच्. डी. प्रबंध

सादरकर्ता

श्री. प्रमोद कोंडाजी चव्हाण

नोंदणी क्रमांक – 15712446

मार्गदर्शक

डॉ. शशि मरोलिया

जे. जे. टी. विद्यापिठ, राजस्थान

सह - मार्गदर्शक

डॉ. चंद्रकांत अभंग

इतिहास विभाग, के.जे. सौमय्या कॉलेज, कोपरगांव.

श्री. जगदिशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठ, विद्यानगरी,

झुंझुनू, राजस्थान – 333001

सन – 2015

अनुक्रमणिका

	2.6.5. शिंदेचे कारस्थान व चिमणाजी पेशवेपद 2.6.6. नाना फडणवीसाचे कारस्थान व पेशवे पद बाजीरावाकडे	
	2.7. मराठयांचा झालेला भ्रमनिराश	
	2.8. शिंदे व होळकर नवीनच कलहात	
	2.9. नाना यांना अटक व सुटका	
	2.10 टिपू व इंग्रज यांच्या युध्दात मराठयांची भूमिका	
	2.11. नानाचा मृत्यु व शिंदेचे उत्तरहिंदूस्थानाच प्रस्तान	
	2.12. मुत्सुदी नानाची कामगीरी	
प्रकरण तिसरे	**मराठे इंग्रज युध्द (दुसरे)**	
	3.1. प्रस्तावना	
	3.2. मराठे बंडाच्या विळख्यात 3.2.1. साम्राज्याचे दोन स्तंभ एकमेका विरूध्द 3.2.2. पुण्यात पेशवाई भोवती गोधळ 3.2.3. विठोजी होळकर यांचे महाराष्ट्रात बंड व मृत्युवदंड 3.2.4. अमृतरावाचे कारस्थान	
	3.3. अमृतराव व होळकर एक पेशवईवर मोठे संकट	
	3.4. होळकरानी पेशव्याला घातलेल्या अटी	
	3.5. होळकराचे पुण्यात आगमन व पेशव्याचे पलायन	
	3.6. पेशवे पद अमृतरावाकडे	
	3.7. ब्रिटिशांनी मराठयांची केलेली चाचपणी व पसरवलेले जाळे 3.7.1. बाजीरावाचे इंग्रजाच्या जाळयात 3.7.2. इंग्रजांशी करार व मराठयांची सार्वभौम सत्ता धोक्यात 3.7.3. अमृतराव व होळकर यांनी पुण्याचे केलेले नुकसान	
	3.8. ब्रिटिशांनी फोडा आणि राज्य करा नितीचा योग्य वापर व युध्दाचे रणफुकले 3.8.1. इंग्रजांच्या मध्यस्थीने अमृतरावची शांती 3.8.2. होळकर विरुध्द इंग्रजाचा सापळा 3.8.3. इंग्रजाचा विरुध्द शिंदेना व भोसल्ये यांची एकजुट ने युध्दाचा भडका 3.8.3.1. दोन्हीचे लष्करी सामर्थ 3.8.3.2. इंग्रजांच्या फितूरीच्या जाळयात शिंदेचे फ्रेंच सैन्य	
	3.9. मराठयाचे दोन अधार स्तंभ यांना इंग्रजानी युध्दत नमवुन करारात अडकवले 3.9.1. शिंदे व भोसले यांचा महाराष्ट्रात झालेला तारून पराभव	

	3.9.2. शिंदेचा उत्तरहिंदूस्थान इंग्रजांच्या ताब्यात गेला येथे इंग्रजाची फंदफितुरी कामाला आली 3.9.3. मराठी राज्यचे दोन स्तंभ इंग्रजाशी तहात अडकले (शिंदे व भोसले) 3.9.3.1. भोसले याच्याशी इंग्रजाशी तह - देवगांवचा तह ता. 17 डिसेंबर 1803 3.9.3.2. सुर्जी अंजनगांवचा तह ता. 30 डिसेंबर 1803 / दौलतराव शिंदे तहात अडकले	
	3.10. इंग्रजाचे होळकरा विषीय असलेला देखावा फुटला व होळकर तहात अडकले 3.10.1. इंग्रजाचा होळकरांशी निकराची लढाई 3.10.2. सर्जेराव घाटगेच्या मध्यस्थीचे प्रयत्न 3.10.3. माल्कमने शिंदे, होळकर यांच्यात पाडलेली फूट 3.10.4. होळकर यांच्याशी इंग्रजांचा मैत्रीच्या नात्याने तह 3.10.5. शिंदे याच्यात इंग्रजांचा पुन्हा तह	
	3.11. दुसया युध्दात नंतर इंग्रजाची परिस्थिती	
प्रकरण चौथे	**तिसरे इंग्रज मराठा युध्द व मराठी साम्राज्य शेवट**	
	4.1. प्रस्तावना	
	4.2. बाजीराव पेशवे पदावर आल्यानंतर केलेला कारभार व प्रांतातील बंडाचा मोड 4.2.1. जहागीरदानी मराठी साम्राज्यात चालवले कारस्थाने 4.2.1.1. दक्षिणेतील बंड 4.2.2. माऊंट स्टूअर्ट एल्फिन्स्टन याची बाजीराव जबर व पंढरपुर तह 4.2.3. पंढरपूर कराराचे परिणाम	
	4.3. इंग्रजांच्या व पेशवा मध्ये वादाला सुरवात व मराठी साम्राज्यास खिंडार पाडण्यास इंग्रजांनी केलेली सूरवात 4.3.1. दक्षिणेत इंग्रजांनी आपला जम बसवण्यास केलेली सुरवात, कोल्हापूरकर यांच्याशी करार 4.3.2. मराठी साम्राज्याला इंग्रजानी सळो की पळो करून सोडले	
	4.4. त्र्यंबकजी डेंगळे हा पेशव्या व मराठेशाहीचा हस्तक	
	4.5 गुजरात प्रांतात इंग्रजांनी केलेला हस्तक्षेप व पेशवा भोवती जाळे 4.5.1. इंग्रजाचे गायकवाड घराण्यावर वर्चस्व प्रस्तापित 4.5.2. अहमदाबाद प्रांताची धकीत बाकी व गंगाधर शास्त्री याचे पुण्यात आगमन 4.5.3. गंगाधरशास्त्री यांच्या खुनाचे राजकारण	

	4.5.4. त्रिंबकजीचे इंग्रजांच्या ताब्यातुन पलायन	
	4.6. हिंदूस्थानवर इंग्रजांचे वर्चस्व वाढले	
	4.7. पेंढारी युध्दास आरंभ केले व शिंदे, होळकर, भोसले बसलेला शह	
	4.8. बाजीराव व एलफिन्स्टनचे राजकीय शह प्रतिशह	
	4.9. तिसरे इंग्रज मराठा युध्दास आरंभ 4.9.1. प्रथम इंग्रज मराठया मध्ये खडकी येथे युध्द	
	4.10. येरवाड्याची लढाई आणि पुण्यावर इंग्रजांचा अंमल	
	4.11. येरवाडया लढाई नंतर बाजीराव	
	4.12. पेशव्या बरोबर इंग्रजानी खेळलेली मोठी चाल	
	4.13. पेशव्याने गमावलेल्या मराठी साम्राज्याचा स्वतंत्र्याची निर्णायक लढाई 4.13.1. गोपाळअष्टीची लढाई व छत्रपती इग्रजांना मिळाले 4.13.2. पेशव्याचा योग्य सेनापती बापू गोखले मातीशी	
	4.14. पेशव्याची शरणागती व पेशवाईचा अस्त	
	4.15. इंग्राजनी सातायाच्या छत्रपतीची केलेली स्थापना 4.15.1. प्रतापसिंह इंग्रजांच्या आश्रयाने छत्रतपीच्या गादीवर बसवेल 4.15.2. छत्रपती प्रतापसिंहाची उचल बांगडी व मराठी राज्य खालसा 4.15.3. सातारा राज्य खालसा करण्यासाठी इंग्रजचे प्रयत्न	
	4.16 मराठयांच्या पराभवाची कारण मिमाक्षा	
प्रकरण पाचवे	**महाराष्ट्रात ईस्ट इंडिया कंपनीचे दृढिकरण (पायाभरणी)**	
	5.1 प्रस्तावना	
	5.2. महाराष्ट्रात कंपनीच्या विस्ताराचे यश	
	5.3 इंग्रज वकीलांचे पुण्यातील कार्य 5.3.1 प्रथम वकिल मॅलेटचे पुण्यात आगमन 5.3.2 पुण्यात पामर याने केलेली वकिली 5.3.3 वकिल म्हणुन पुण्यात क्लोज याचे श्रेय 5.3.4 महाराष्ट्रात एलफिन्स्टनने कंपनीची सांभाळलेली धुरा	
	5.4 एलफिन्स्टन याचा कारभार	
	5.5 1818 नंतर कंपनीचे महाराष्ट्रातील धोरण	
	5.6. एलफिन्स्टनने जाहीकेलेले प्रशासन पध्दतीचे धोरण	
	5.7 महाराष्ट्रात मुंबई गव्हर्नर चे कार्य 5.7.1 शैक्षणिक धोरण	


MARATHA KINGDOM
1795-1800
N
Indus
Jhelum
Chenab
Ravi
Beas
Sutlej
Multan
SINDH
Panipat
Delhi
Yamuna
Panipat
RAJPUTANA
Jodhpur
Chambal
Banas
Gwalior
Ganges
Hajipur
Gaur
Son
Rchtasagam
Saranpur
Ujjain
Narmada
Tapi
Mahanadi
Nagpur
MARATHA
Godavari
Yarlung (Brahmaputra)
Brahmaputra
Ganges
Arabian Sea
Bay of Bengal
Krishna
Bijapur
Krishna
Godavari
Masulipatnam
Tungabhadra
Sira
Vellore
Cauvery
Calicut
Madurai
Quilon
Maratha Kingdom
Current Country Boundaries
Map not to Scale
Copyright © 2012 www.mapsofindia.com
(Updated on 2nd April 2012)
INDIAN OCEAN

प्रकरण पहिले

संशोधन पध्दती

1.1. प्रस्तावना (Introduction)

सन 1795 मध्ये झालेली खडर्या येथील मराठे व निजाम यांच्यातील लढाई ही निजामच्या वाईटाचा काळ ठरली या लढई नंतर हिंदूस्थानच्या इतिहासात मोठा प्रमाणात उलथापालथ होऊन मराठी साम्राज्याला उतरतील कळा लागली. एकजुटीने लढलेली खडर्याची लढाई ही जास्त काळ मराठयाच्या आनंदाला उरली नाही कारण यानंतर लगेच सावाई माधवराव पेशवा यांचे अल्पक्षा आजाराने निधन झाले हा पेशवाईला मोठा धक्का होता. असा धक्का जो पाणिपता पेक्षाही भयंकर होता. यानंतर खया अर्थाने मराठी साम्राज्य लयास गेले व परकिय सत्तंनी आपले साम्राज्य पसरविण्यास सुरवात केली. त्यामुळे या सत्तांतरणाच्या काळातील विविध बाबींचा बारकाईने अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली.

खडर्याच्या लढाईत सर्व मराठी सरदार आपल्या साम्राज्यासाठी एकवटून एकत्र आले आणि निजामा विरुध्द एक संघाने लढले. या लढाईत अत्यंत कमी प्रयत्नात निजाम शरण आला. पण या लढाई नंतर मराठी साम्राज्यत मोठा आघात झाला. खडर्याच्या लढाईवरून परत आल्यावर सावाई माधवरव यांचा मृत्यु झाला, आणि मराठयांच्या गृहकलहाला सुरवात झाली. मराठी साम्राज्यात नाना फडणीस सोडून कोणीच शहाना, मुत्सूदी असा राहिला नाही. उत्तरेत असलेले मराठी साम्राज्य सरदार शिंदे व नाना फडणीस यांचे संबंध कर्तबगार माधवराव शिंदे यांच्या मृत्यु नंतरही काही सुधारले नाही. पुण्यात वर्चस्व निर्माण करण्यासाठी माधवराव शिंदे यांचा मुलगा दौलतराव शिंदेनी पुण्यात शिरकाव केला. यामुळे नाना फडणीसांची वाढलेली पेशवाई दरबारातील हुकूमतीला तढा गेला. पेशवे पदासाठी दूसया बाजीरावाने आपला हक्क सांगून पेशवे पदावर बसण्याची तयारी सुरू केली. पण नानांची बाजीराव यास पसंती नव्हती. त्यांनी दूसरा बाजीराव याचा लहान भाऊ चिमणाजी याला मृत

सवाई माधवराव यांचा दत्तक वारस म्हणून गादीवर बसवण्याची तयारी केली. यावेळी दूसरा बाजीराव याने उत्तरेतील दौलतराव शिंदेशी संपर्क साधुन, त्यांची पुण्यात पेशवाई बसवण्यासाठी मदत घेतली.

नाना फडणीस यांच्या चिमणाजी यांना पेशवा बनवण्यासाठी चालु असलेल्या प्रयत्नाला मराठी साम्राज्य मधुन अनेक सरदार, जहागीरदार, नानाचे असलेले विरोधक ह्या सर्वनी विरोध करण्यास सुरवात केली. त्यातच दौलतराव शिंदे पुण्यात येताच नानाला शिंदेच्या धास्तीने पुण्यातून महाड येथे जावे लागले. यानंतर शिंदेनी बाजीरावास पेशवे पदावर बसवण्याची तयारी केली, दौलतराव शिंदे यांना आपली आर्थिक अडचण सोडवण्यासाठी पैसाची गरज होती ती बाजीराव पूर्ण करू शकनार नव्हता. त्यातच बाजीराव नानाला अनुकूल अशा पध्दतीने वागत होता. यावेळी पुणे दरबारातील सर्व आर्थिक व्यवहार नाना फडणीस यांच्या कडे होते. त्यामुळे दौलतराव शिंदेनी बाजीराव याला पेशवाईवर न बसवता त्याचा धाकटा भाऊ चिमणाजीला पेशवा पदावर बसवले. यामुळे पुण्यात आता नाना फडणीस यांच्या वर्चस्वा ऐवजी दौलतराव शिंदे यांचे वर्चस्व वाढणार होते. शेवटी सवाई माधवर यांच्या मृत्य नंतर मराठी साम्राज्याला सात महिण्याने पेशवा लाभला. पुण्यातील सर्व अधिकार शिंदेकडे गेले पण बाजीराव कसे गप्प बसणार त्यांनी महाड येथे नाना फडणीस यांच्याशी संधान साधुन पेशवेपदासाठी कारस्थान करण्यास सुरवात केली. बाजीरावाला गादीवर बसवण्यासाठी नानानी ब्रिटिश, निजाम, दक्षिणेतील सरदार यांची मदत घेऊन शिंदेना गार केले ऐवढी एकजूट पाहून शिंदेनी नमते घेतले, नानानी शिंदेसी दडजोड करून काही अटीवर बाजीरावाला पेशवा करण्यास तयार झाले. बाजीराव पेशव बनला पण या वेळी मराठी साम्राज्यात मोठा गृहकल निर्माण झाला होता. त्यात मराठयांचे आधारस्तंभ असणारे भोसले, होळकर, कोल्हापरूकर, यांच्या घराण्यातील गृहकलह तसेच शिंदेच्या उत्तर हिंदूस्थानातील गृहकलह उफाळून आला त्यांला नाना फडणीस यांनी चांगलीच मदत केली. मराठयाच्या अंतर्गत गृहकलहात नानानी तर ब्रिटिशांची मतद घेतली व पुढे चालून बाजीराव यांने पण ब्रिटिशांची मदत घेवून मराठयानी

आपल्या शेवटाचा फास तयार करुन घेतला. पुण्यात यावेळी ब्रिटिश शांत बसले होते तरी त्याचे सर्व मराठी साम्राज्यावर बारीक लक्ष होते.

दूसरा बाजीराव पेशवा झाला. पण बाजीरावाचा स्वभाव फार बेजाबदार पणाचा होता. बाजीरावाच्या अंगात युध्दाचे कोणतेही कौशल्य नसल्या कारणाने तसेच राजकारणाशी त्याचा संबंध नसल्याने त्याच्यात आणि या आगोदर होऊन गेलेले पेशव्यायांच्या व्यक्तिचरित्रात फार मोठा फरक होता. व त्यामुळे मराठा साम्राज्यवर संकट येणार हे नक्की होते. बाजीरावाचा स्वभाव ब्रिटिशांनी चांगलाच ओळखला होता. अशातच बाजीरावासाठी मराठी साम्राज्यात कोणत्याच गोष्टी अनुकूल राहिली नव्हती. त्याने स्वतःवर आपल्या सरदारांची नाराजी ओढून घेतली होती. दरबारात फंदफितूरी चालू झाली यामुळे त्याला कोण आपले व कोण परके यातील फरक शेवट पर्यंत कळाला नाही. मराठा साम्राज्याचे सर्व सरदार आपआपले वैभव, सत्ता टिकवण्यासाठी धडपडू लागल्याने पुढे पेशव्याबद्दल असणारा सर्व आदरभाव सरदारांच्या मनातून निघुन गेला होता त्यांच्याकडे फक्त स्वतःहाचा स्वार्थ राहिला आणि मराठयांच्या या स्वार्थी परिस्थिथीतीचा फायदा ब्रिटिशांनी घेतला.

दूसरा बाजीरावर गादीवर बसल्यावर दौलतराव शिंदे उत्तरेत निघुन गेले. याच सुमारास नाना फडणीस यांचा समर्थक व मराठी साम्राज्यचे इंदोरचे जहागिरदार यशवंतरव होळकर सन 1802 मध्ये पुण्यात आले त्याला साथ दिली ती पेशव्याचे दत्तक मोठे बंधू अमृतराव यांनी या मुळे बाजीराव फार घाबरा आणि त्याने होळकर आपल्याला आता जिवंत ठेवत नाही, आपले पेशवे पद जाणार, पुन्हा कैद होणार म्हणून त्याने पुण्यातून काढता पाय घेतला. होळकराच्या या स्वारीने पुण्यात मोठे नरसंहार झाला. होळकराणे अमृतराव याचां मुलगा विनायकराव यास पेशव्याच्या गादीवर बसवून अमृतराव यांच्या हाती कारभार दिला. बाजीरावास यावेळी झालेली बुध्दी म्हणजे विनाश काले विपरीत बुध्दी आणि तेच झाले बाजीरावाला ब्रिटिशांनी आपल्या गोड गोड बोलण्यात फसवले बाजीराव यांनी मागचा पुढचा विचार न करता आपल्या वडीलाच्या पायावर पाय देऊन म्हणजेच, ज्यापध्दतीने रघुनाथराव

यांनी ब्रिटिशांचा आश्रय घेतला होता. त्याच पध्दतीने दूसरा बाजीराव ब्रिटिशांच्या आश्रयाला गेले. ब्रिटिशांनी या संधीचे सोने केले, दूसरा बाजीरावा यांनी 31 डिसेंबर 1802 वसई येथे ब्रिटिशांशी एक तह केला हाच ‘वसईचा तह’ होय. या तहाने दू. बाजीरावचे सार्वभौमत्व पुर्ण पणे धोक्यात येणार होते कारण, ह्या तहानुसार तैनाती फौज आपल्या राज्यात बाळगावी व त्या फौजेच्या खर्चासाठी 26 लक्षांचा मुखूल ब्रिटिशांना देणे होते. मराठी साम्राज्याच्या संरक्षणासाठी आता परकियांच्या फौज असणार हे नक्की झाले. ब्रिटिशांना पण हेच हवे होते ते त्यानी साध्य केले. गर्व्हनर जनरल वेलस्ली हा यावेळी हिंदूस्थानात आला होता त्याचे धोरण म्हणजे विस्तारवादी होते. त्याच्या धोरणाचा तडाखा पुण्यात आसाणारा रेसिंडेंट क्लोज याच्यावर बसला त्याने बाजीरावाची कोणतीच मदत केली नाही. दूसरा बाजीरावाला आपल्या तालाने नाचण्यास भाग पाडून मराठयाचे मोठया प्रमाणात नुकसान करण्याचे काम वेलस्ली यांच्या धोरणाने केले. ब्रिटिश लोक फार स्वार्थी होते त्यानी येथील राजे महाराजे, सरदार याची आपआपसात भांडणे लावून दिली व त्यांच्या आत्मरक्षणाची हमी घेवू लागले. जसे की - “ तुम बिलकूल चिन्ता मत करो। हम तम्हारी और तुम्हारी रियासत की रक्षा करेंगे। हमारी फौज का खर्च बस तुम्हारी रियासत से मिलना चाहिए।” [1]

ब्रिटिशांनी दूसरा बाजीरावाला आपल्या अधिकाराखाली गादीवर बसवले. बाजीराव चैनी, विलासी, ऐस आराम, वडीलांच्या विरुध्द झालेल्या कारस्थाने निस्थारण्यात त्याने केलेली कारस्थाने यामुळे त्याच्या वर अनेक सरदार, जहागीरदार यांची नाराजी ओढून घेतली. दू. बाजीरावाने राज्य बुडवले यासाठी याता मराठी दौलतीचे सर्व सरदार एकत्र येऊन या ब्रिटिश विरुध्द लढा देण्याण्यासाठी प्रयत्न चालु केले. ब्रिटिशांनी दूसरा बाजीरावाना पुण्यात पेशवाईवर स्थापण्यासाठी आपल्या हालजाली सुरु केल्या. त्यासाठी त्यांनी मराठयांची एकजुट होऊन दिला नाही, फितूरी, लाच, इ. मार्गाने मराठी सरदारांत फुट पाडण्यास सुरवात केली, त्याचे बळी शिंदे व होळकर यांच्या सारखे बलाढय मराठी सरदार देखील ठरले. मात्र शिंदे ब्रिटिशांचा प्रतिशोध घेण्यासाठी पुढे सरसावले त्यांच्या जोडीला नागपूरचे भोसले आले.

ब्रिटिशांनी यासुमारास हैद्रबाद, निजाम, कलकत्ता येथील आपल्या फौजा पुण्यात आणल्या. शिंदेची भिती ब्रिटिशांना जास्त होती कारण, शिंदेकडे असणारी युरोपियन फौज होय. परंतु ब्रिटिशांनी फितुरी करून शिंदेचा पराभर केला व त्यांच्यावर अपमाणकारक तह लादून यांना गप्पा बसवले. ब्रिटिशांनी यानंतर आपला मोर्चा होळकर यांच्याकडे वळून त्यांचा पराभव करण्याचे प्रयत्न चालू केले, पण होळकराची लढण्याची पध्दत गनीमी काव्याची होती. मराठी साम्राज्यात छत्रपति शिंवाजी महारांजांनंतर गनीमी काव्याचा वापर करणारा पहिलाच सरदार म्हणजे यशवंतराव होळकर होय. इग्रजांनी सन 1804 मध्ये भरतपूर येथील युध्दात होळकर यांचा पराभव करून मराठीशाहीचे बलाढ असे साम्राज्य वसईच्या तहानंतर तीन ते चार वर्षात आपल्या ताब्यात घेतले.

पुण्यात दूसरा बाजीरावाने आपल्या विरुध्द होत असलेले दक्षिणेतील बंड मोडण्यात गुंतले होते. यावेळी पुण्यात ब्रिटिशांचा वकिल म्हणून सन 1811 मध्ये एलफिन्स्टन दाखल झाला. एलफिन्स्टन याचे धोरण हे गव्हर्नर जनरल वेलस्ली यांच्या सारखेच विस्तारवादी होते. दूसरा बाजीराव याला आपल्यावर कोणाचे वर्चस्व सहन होईना याकरणाने त्याने ब्रिटिश विरुध्द अनेक प्रकारे कारस्थान चालु केले. ब्रिटिशांनी बाजीरावाला चारही बाजूनी घेरण्यास सुरवात केली व त्याच्यावर सन 1812 मध्ये पंढरपूर येथे तह लादून ब्रिटिशांनी पेशवे व जहागिरदार पद यांच्यात आपले हात घातले. दरम्यान बडोदयाचे गायकवाड यांच्याकडे असलेली धकीत बाकी बाजीरावाने मागण्यास सुरवात केली. गायकवाड ब्रिटिशांचे मित्र हाते त्यासाठी ब्रिटिशांनी बाजीरावाशी मध्यस्थी म्हणून बोलणीसाठी गंगाधरशास्त्री यांना पुण्यात पाठवले ते पुण्यात आल्यावर त्याचा खुन झाला. खुनाची जबाबदारी बाजीरावावर टाकून ब्रिटिशांनी त्याला कचाटयात सापडुन 13 जुन 1817 रोजी पुण्यात बाजीरावा बरोबर तह केला. हातातील सर्व सत्ता निघुन गेल्याने युध्दा शिवाय कोणताही पर्याय पेशवा दूसरा बाजीरावाकडे नव्हता. यावेळी दुसरा बाजीरावाला एकटयालाच ब्रिटिशांशी लढण्याची तयारी करावी लागली.

5 नोव्हेंरला 1817 बाजीराव व ब्रिटिश यांच्यात युध्दाची पहिली सुरवात खडकी येथून झाली. पुणे शहराजवळ खडकी या ठिकाणावरून दूसरा बाजीराव व ब्रिटिश यांच्यात युध्दाचा भडका उडाला. यात बाजीराव याचे ब्रिटिशांच्या गनीमी व फंद फितूरी पुढे काहीच चाले नाही. तसेच पुढे येरवाडा येथील युध्दात पण त्याच पध्दतीने बाजीरावाचे हाल झाले. येरवाडा येथे ब्रिटिशांनी मराठी सैन्याचा पराभव केला, बाजीराव पुणे सोडून पळला. योवळी ब्रिटिशांनी लगेच मराठयांच्या सत्तेचे केंद्रस्थान असलेल्या पुण्याचा ताबा घेतला. ‘शनिवारवाडयावर एका शतका पासून डौलाने फडकणारा जरीपटका खाली ओढून त्याऐवजी युनियन जॅक चढवला.’[2]

बाजीरवाला ब्रिटिशांनी सहा सात महीने सारखे पळवत ठेवले आज येथे तर उदया तेथे असे करत असताना 20 फेबुवारी 1818 रोजी गोपाळ आष्टीच्या लढाईत बाजीरावाने आपला कर्तबगार सरदार ‘बापू गोखले’ यास गमावावे लागले. बाजीराव येथून पळून तो शिंदे, होळकर यांच्याकडे मदती साठी गेला पण त्याला कोणाकडून मदत मिळाली नाही. बाजीरावाने मराठी साम्राज्याचे श्रध्दास्थान असलेले साताराचे छत्रपती प्रतापसिंह यांना आपल्या बरोबर घेऊन गेला होता कारण, जोपर्यंत छत्रपती आपल्या ताब्यात राहिल तोपर्यंत आपली पेशवाई वरील अस्तित्व मजबूत राहिल हे बाजीरावास महित होते पण तसे झाले नाही. पेशव्याच्या त्रासाला कंटाळलेले छत्रपती बाजीरावाला सोडून इंग्रजांच्या आश्रयाला गेले, इंग्रजानी छत्रपतीला सातारच्या गादीवर बसवून त्याला मांडलिक बनवले व मराठी सत्ता आपल्या हातात घेतली. ब्रिटिशांनी छत्रपतीच्या आदेशाने बाजीराव यांच्या विरुध्द जाहिरनामा काढला बाजीरावाचे सर्व हस्तक त्याच्या पासून तोडले गेले. बाजीराव एकटा पडला तो चांगल्याच प्रमाणात थकला होता. 3 जून 1818 रोजी त्याने आशिरगड येथे ब्रिटिश लष्करी सेनापती माल्कम यांच्याशी करार करून बाजीराव स्वस्थ झाला. बाजीरावाला ब्रम्हावर्त येथे आठ लक्षाची वसुली देऊन कायमचे उत्तर हिंदूस्थानात पाठवून देण्यात आले.

नव्या परिस्थितीत मराठयांच्या प्रदेशात प्रशासकीय, राजकीय व सामाजिक दृष्टीने पोकळी निर्माण झाली होती. पेशवाईत कितीही बेबंदशाही असली तरी ते स्वकीयांचे राज्य होतं. ते नष्ट झाल्याचे तीव्र दुःख समाजाला अस्वस्थ करणारे होते. ‘ब्रिटिशांनी आमचे राज्य नष्ट केले’ ही बोच मराठयांमध्ये दीर्घ काळपर्यंत राहून लोकांना ब्रिटिशांच्या सर्वच बाबीविषयी तिरस्कार वाटण्याचा संभव होता. अशा या मानसिकतेमधून या संक्रमणकाळात निर्माण होऊ पाहणाया समस्या व अस्थिरता योग्य पध्दतीने निपटून काढणे हे ‘डेक्कन कमिशनर’ या नात्याने एल्फिन्स्टनचे प्रमुख काम होते. जून 1818 पासून पुण्यात नवी राजवट सुरु झाली. पुणे नगर, नाशिक, सातारा आणि खानदेश या जिल्हातील नव्याने जिंकलेला प्रदेशाचे त्याने चार भागात विभाजन करून त्यावर आपल्या मर्जीतील कमीशनर नेमले त्यात हेन्री रॉबर्टसन, ब्रिग्ज, पॅटिंजर, गँट डफ ते डेक्कन कमिशनरच्या कार्यकक्षेत आणले.[3] एल्फिन्स्टन याने आपला मर्जीतील अधिकारी घेऊन या प्रांतावर कलेक्टर म्हणनु नेमले त्यात एल्फिन्स्टन परिवाराने तिसया इंग्रज मराठे युध्द समाप्तीनंतर महाराष्ट्रात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करुन ब्रिटिशांच्या बद्दल जनमानसात आदर आणि विश्वास संपादन केला. पेशव्याने काय करावयाचे, छत्रपतीचे स्थान कसे निश्चित करावायचे, जहागीरदार, जमीनदार, वतनदार, हक्कदार सैनिक, वर्षासनधारक, परागंदा झालेले शेतकरी, कुणबी, कुलकर्णी, पाटील व हिंदू मुस्लीम देवस्थानांची इनामे, देशमुख, देशपांडे या सर्वाचे प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडविले आणि ब्रिटिश सत्ता महाराष्ट्रात दृढ करण्यासाठी लोकाश्रय देखील मिळविला की पुढे लोक ब्रिटिश राज्य इे ईश्वरी वरदान आहे असे म्हणू लागले. एल्फिन्स्टन हा उदारमतवादी असला तरी साम्राज्यवादी प्रवृत्तीचा असल्याने मराठयांच्या इतिहासाची चांगली जाण असल्याने त्याने महाराष्ट्रातील किल्ले ताब्यात घेतले. तसेच सैनिकांचे वतने तसीच ठेवली, सरंजाम, इनाम हक्क कंपनीच्या राजवटीत तसेच ठेवले. गांवांचे संरक्षण, सुव्यवस्था व प्रशासकीय पुनर्रचना या सर्वच बाबतीत मराठयांच्या परंपरांचा पूर्ण अभ्यास करून एल्फिन्स्टनने आपले नवे धोरण आखले आणि जुन्या संस्थाना व जुन्या पध्दतीला नवे रुप दिले. जुन्या संस्थाच्या पारंपारिक

अवास्तव अधिकारांवर नियंत्रण आणले. लोक समजुती दुखावणार नाहीत अशा बेताने प्रशासनात आवश्यक ते बदल धीमेपणाने पण निर्धारयुक्त करून महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेचे दृढिकरण केले व ते करीत असतानाच महारष्ट्रात परिवर्तन घडवून आणले. आदेश व हुकूम अंमलात आणताना जाणीव पूर्वक दाखविलेली सहिष्णुता हे त्याचे वेगळेपण होते. अंमलबजावणीची त्यांची पध्दत इतरांपेक्षा वेगळी होती. जाचक वाटणार नाहीत अशा प्रकारे धोरणे राबविल्यामुळे प्रारंभिक कारभार सुसह्य झाला व महाराष्ट्रात सत्तांतर घडून आले.

ब्रिटिशां विरोधात महाराष्ट्रात उठलेला असंतोष मोडण्यात ब्रिटिशांनी चांगले यश संपादन केले याचे श्रेय एलफिन्स्टन यालाच जाते. कारण त्याने केलेल्या कामाची पावती त्याला महारष्ट्रात मिळाली होती. कंपनीने बंड च्या नावा खाली अखेर होते नव्हते ते मराठी राज्य 1839 मध्ये खालसा करून घेतले. 1857 च्या उठात महाराष्ट्रात उत्तरे पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला होता या उठावाने हिंदूस्थानातील कंपनी सरकाचे राज संपले आणि ब्रिटिश सरकारचा अमल चालु झाला. इंग्रजानी हळूहळू कोणाला संतान नाही, कोणी राज्य कारण्यास लायक नाही. म्हणुन संस्थाने खालसा केली त्यामुळे बरेच प्रांत ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली गेले. राजकारणाची दररोज नविन-नविन पध्दत वापरुन हिंदूस्थानातील प्रत्येक संस्थान एकामागुन ऐक आपल्या ताब्यात घेत राहिले. भारतात अनेक परिवर्तन घडवून आणत शिक्षण, वृत्तपत्र, दळणवळण यांसाख्या गोष्टी मोठया झपाटयाने वाढत गेल्या लोकाना आपल्या अस्तिवाची जाणीव होण्यास सूरवात ब्रिटिश साम्राज्यात झाली.

1.2. संशोधनाची उपयुक्तता/संधी Utility/Scope

‘‘मराठी साम्राज्याचा शेवट आणि ब्रिटिशांची पायाभरण’’ (1795-1885) मराठे व निजाम यांच्यात झालेली खडर्याची लढाई म्हणजे ही सर्व मराठयांच्या अस्तित्व सिध्द करणारी ठरली. पाणिपताच्या युध्दा नंतर मराठयांचा दबदबा ओसरत चालला होते पण खडर्याच्या युध्दानंतर हिंदूस्थानात मोठा प्रमाणता मराठी साम्राज्याचा काही काळ का होईना दबदबा वाढला होता. खडर्याच्या युध्दाचा निकाल एक दिवसातच लागला तरी पण ही लढाईने

मराठयांना एका छत्राखाली आणण्याचे काम केले. मराठी साम्राज्यात ब्रिटिशांनी आपला हात घालण्याची कायम संधी पहात होते, पण त्यांना ती संधी लवकर मिळाली नाही.

मराठी साम्राज्यात खडर्याच्या लढाई नंतर मोठया वाईट घटना घटत गेल्या मराठी साम्राज्याचा अधिपती पेशवा सवाई माधवराव यांचा सहाच महिण्यात मृत्यु झाला, त्यांच्या मृत्युने मराठी साम्राज्यात जे घडायला नको होते त्या घटना घडण्यास सुरवात झाली. मराठी साम्राज्यात दत्तक वारसाचा प्रश्न उदभवला. नाना फडणीस यांनी पेशवे पदावर स. माधवरा यांच्या पत्नीच्या मांडीवर कोणाला तरी दत्तक देऊन त्याला पेशवा करायचे असे सुचवले, पण नानाच्या या गोष्टी मुळे तेच अडचणीत आले. कारण पेशव्यांच्या घराण्याचे रघुनाथराव यांचे पुत्र जिवंत होते. नानानी त्याना पेशवे पदावर बसवण्यास लायक समजले नाही. नाना यानां बाजीरावा यांच्या बद्दल त्यांच्या मनात कायम संशयाचे घर असे त्याच बरोबर आपल्या पदाला धोका निर्माण होऊ शकतो ही शंका नानाच्या मनात कायम घर करून राहील होती. बाजीरावा यावेळी नानाच्या कैदेत होता त्याने यवेळी शिंदेसी संधान साधुन पेशवे पदार आपला दावा सांगीतला व तो मिळवण्यासाठी शिंदे यांच्यासी हात मिळवाणी केली. पेशवे पदावर बसण्यास बाजीरावा याचे स्वप्न पुर्ण झाले पेशवे पदासाठी बाजीराव किती योग्य होता हा मोठा प्रश्न मराठी साम्राज्या पुढे येऊन उभा होता. एकीकडे शिंदे व होळकर यांचे आपआपसातील भांडणे त्यात पेशवे दरबात त्याची चढाओठ पुण्यात नानाने घातलेला घाट या सर्व गाष्टी मराठी साम्राज्याच्या उतरणीचा काळ ठरण्यास सूरवात झाली होती.

नाना फडणीस यांचा मृत्यु सन 1818 मध्ये झाला आणि मराठी साम्राज्याचे सर्व शहाणपणच हरपले. मराठी साम्राज्यात आता विचार, बुध्दीला चालना देणारा, मुत्सूदी कोणी उरला नव्हता. मराठी मंडळाचा सर्व भार आता नवीन त्यातल्या त्यात तरूण मंडळीवर येऊन पडला होता. या मंडळी कडे वंशपरंपरेने ताकत, सत्ता होती पण ती संभाळण्यासाठीच्या बुध्दीची कमतरता होती.

पेशवा दूसरा बाजीराव बारभाई कारस्थाना मुळे नानाच्या कैदेत होते त्यामुळे बाजीरावाचे कौशल्य, त्यांची योग्यता कोणाच्याच लक्षात आली नाही. वंशपरंपरा व वंशज या धरतीवर चाललेला हा खेळ मराठी साम्राजाला घातक ठरला. पेशव्यांचा बुध्दीचा उपयोग मराठी साम्राज्याच्या कोणत्याच गोष्टीत झाला नाही. बाजीराव पेशवे पदावर आले व त्यांच्या स्वभावाचा व अवगुणांचा फायदा मराठी साम्राज्याच्या शत्रुंनी घेतला. दौलतराव शिंदे पुण्यात असताना आपल्या उत्तरेकडील घराण्याचा अंतर्गत कलह मिटविण्यासाठी पुण्यातून उत्तरहिंदूस्थान निघुन जात होते आणि तेव्हाच यशवंतराव होळकर पुण्यात, आपला भाऊ विठ्ठोजी होळकर याच्या खुनाचा प्रतिशोध घेण्यासाठी पुण्यावर चालुन आला. पुण्यात शिंदेचे लष्कर व होळकर यांच्यात युध्द झाली होळकर यांच्या सैन्याचा पराभव झाला तेंव्हा बाजीरावर पुण्यातून पळुन गेला. बाजीराव पुण्यातून ब्रिटिशांच्या आश्रयाला जाऊन वसई येथे थांबला तो पुण्यात येत नाही हे पहाता पुण्यात होळकर यांनी दूसरा बाजीराव यांचा बंधू अमृतराव यांचा पूत्र विनायकराव याला गादीवर बसविले आणि मराठी साम्राज्यात मोठीच उलथा पालथ होण्यास सुरवात झाली. हैदराबतच्या निजामा प्रमाणे बाजीरावाने तैनाती फौजेचा स्विकार करून पेशवे पद पुन्हा आपल्याकडे घेता यावे या हेतून वसईचा तह केला. बाजीरावाने पुढचे पुढे पाहू या हेतूने सध्याचे काम धकवून घेत वसईच्या तहावर सही केली. यावेळी बाजीरावाने पेशवे पदासाठी आपले व त्याच बरोबर मराठी दौलतीच्या सर्व रक्षणकर्त्यांचे हक्क इंग्रजांकडे गहान ठेवले. व त्याच्या पेशवे पदाचे स्वप्न पुर्ण केले.

मराठी साम्राज्य प्रबळ व योग्य सैनिक नैतृत्व असलेला जाहगिरदार दौलतराव शिंदे होता. शिंदे याला जर आपण नमवले तर आपल्या मार्गतील मोठा अडसर निघून जाईल म्हणून ब्रिटिशांनी शिंदेशी युध्द आरंभले. बाजीरावाने केलेला तह हा शिंदे व भोसले यांना मुळीच आवडला नव्हता. दौलतराव शिंदे, नागपूरचे रघुजी भोसले यांच्यशी ब्रिटिशांचे चांगलेच युध्द झाले. ब्रिटिशांनी फंद फितूरीने हे युध्द जिंकून घेतले व नंतर होळकर यांच्याशी युध्द करून त्यांना हरविले. काटा काढला, मराठी दौलतीचे सर्व खांब आता गळून पडले होते.

अशीच वेळ बाजीराव यावर येणार होती हे पंढरपूर व पुणे येथील कराराने नक्की केले. युध्दाची कला नसलेला, इच्छा शक्तीची कमतरता असल्या कारणाने, तसेच बाजीराव वसईचा तह केला. सन 1817 मध्ये तो पुण्यातून पळाला तो पुण्यात परत न येण्यासाठी त्याने ब्रिटिशां करार करून आठ लक्षाची वसूली घेवून ब्रम्हावर्त आताचे बिठ्ठूर येथे जाऊन कायमचा राहिला तो परत पुण्यात मृत्य होवूपर्यंत आला नाही.

दूसरा बाजीराव पुण्यातून पळाल्या नंतर अराजकता, प्रदेशचे झालेले नुकासान या सर्व गोष्टीची घडी बसवण्याचे काम हे ब्रिटिशांना करावे लागले होते. ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली यांचे विस्तारवादी धोरण तसेच गव्हर्नर एलफिन्स्टन या पुण्यातील वकिलाचे मराठी प्रजा व मुलखा बदल असलेले प्रेम यामुळे मराठी जनतेने इंग्रजी राज्य ईश्वराचा अवतार मानला होता. एलफिन्स्टन याने नवीन घडवण्याच्या मागे न लागता त्याने जुन्याच पध्तीतील वाईट गोष्टी काढून, त्यांना नवीन स्वरूप देवून तेच जनते समोर आणले यामुळे त्यांच्या बद्दल जनतेच्या मनात प्रेम निर्माण होण्यास मदत झाली. महाराष्ट्रात इंग्रजांना चांगल्या प्रकारे वातावरण निर्माण झाले होते. या काळात छोटे मोठे बंड झाले पण इंग्रजानी ते फार वाढू दिले नाही. आपल्या डोळया देखत आपले राज्य परकियांच्या ताब्यात गेले ही गोष्ट येथील जनतेला सहन झाली नव्हती पण ब्रिटिशांनी महाराष्ट्रात निर्माण केलेल्या सुविधा, संस्था, संघटना, शिक्षण पध्दती. कायदे, न्यायपध्दती या सर्व सुविधा मुळे जनतेत परकियांबद्दल आपलेपणा निर्माण झाला. अशा प्रकारे या सर्व गोष्टीचा अभ्यास झाल्यास मराठा इतिहासामध्ये मोलीची भर पडेल व इतिहास संशोधन कार्यासाठी माझे संशोधन उपयुक्त ठरेल असे वाटते.

प्रस्तुत विषयात संशोधन होऊ शकते त्यासाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. मराठयांच्या इतिहासावर अनेक संशोधन झालेली आहे. ब्रिटिशांनी हिंदूस्थानात आपला पाय रोवला त्याच पध्दतीने त्यानी मराठी सत्तेत कशा पध्दतीने पाय घटट् केले?. मराठयांचा आआपसातील वाद? इत्यादी असे अनेक विषयातुन मराठयाच्या इतिहासातील अनेक बाबींना चालना मिळण्यास व भाविष्यात निर्माण होणाया संशोधक पिढीला त्याचा उपयोग होईल.

1.3. संशोधनाची उद्दीष्टे Objective -

1) खडर्याच्या लढाईत निजामा विरुध्द सर्व मराठी साम्राज्याचे कारभारी एकत्र येऊन लढले त्यांच्या एकत्रीकरणामागील कारणांचा अभ्यास करणे.

2) मराठी साम्राज्यात सवाई माधवराव यांच्या मृत्यु नंतर निर्माण झालेला गृहकलह व मराठी साम्राज्यात पुढे घडलेल्या अनेक घटनांचा अभ्यास करणे.

3) दुसरे व तिसरे, मराठे ब्रिटिश युध्दाची कारणमिमांशा अभ्यासणे.

4) इ. स. 1795 ते इ. स. 1885 या कालावधीतील मराठी साम्राज्यातील सत्तांतर व ब्रिटिश सरकारची मराठी मुलुखातील पायाभरणीच्या कारणांचा अभ्यास करणे.

1.4. संशोधनाच्या समस्या Problem -

भूतकाळात घडून गेलेल्या घटनांचा सध्याच्या स्थितीत उपयोग नसला तरी त्या गोष्टी मनुष्याला बरेच काही शिकवत असतात. भूतकाळ हा मानवाला जीवनाचे पाऊल योग्य पध्दतीने टाकण्यास शिकवत असतो. जसे, भुतकाळाच्या पायावर वर्तमानकाळाचे मंदिर उभारले जाते. आणि त्यावर भविष्यकाळाचा नेत्रदिपक सुवर्णकलश झळकू लागतो. पुर्वी घडून गेलेल्या घटनापासून भविष्यात योग्य तो बोध घेऊनच मनुष्याला नविन चेतना निर्माण होत असते. इतिहासाचा मनुष्याला आपल्या भविष्याचा अचूक निरीक्षण करून त्याचा मर्म समजण्यास उपयोग होते. इतिहासातूनच मानवाला नवीन प्रेरणा व उर्जा मिळते.

इतिहासात अनेक गोष्टीवर संशोधन झाले व होत आहे परंतु महत्वाच्या काळात झालेला बदल हा कशा पध्दतीने होत गेला महाराष्ट्रात परिवर्तन / सत्तांतर कशा पध्दतीने झाले ही गोष्ट महत्वाची आहे. आज पर्यंत मराठा इतिहास यावर अनेक शोधनिबंध लिहले गेले आहे. पण याविषयावर व या कालखंडावर परीवर्तन कसे घडले यावर संशोधन उपेक्षित राहिले हाते ते मी हाती घेतले आहे. 1795 मध्ये खर्डा येथील लढाईत निजामाच्या विरोधात मराठा मंडळातील सर्व सरदार मराठी राज्यासाठी एकत्रित होऊन निजामचा पाडाव केला, व त्याला शरणागती स्विकारण्यास भाग पाडले. मराठा कालखंडातील जिंकलेली हि

शेवटची लढाई होय. म्हणून इतिहासात या लढाईला विशेष महत्व आहे.

खडर्याच्या युध्दानंतर सवाई माधवरावाचे निधन झाले होते. त्या नंतर आलेला दुसरा बाजीराव हा आगोदरच्या पेशव्याप्रमाणे मुसूद्दी जबाबदारीने कार्य न करणारा, माणसे न जोडणारा, राजकारण निपूण नसणारा व संशयी स्वभावाचा असल्याने मराठयांच्या राज्यकारभारात अनाचार, गोधंळ, संशयी वातावरण निर्माण झाले. त्यामुळे मराठा मंडळातील सरदार आपली-आपली दौलत टिकविण्यापुरताच विचार करू लागले. अशा विचारात असलेल्या मराठयांना अडचणीत आणून ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकायांनी त्यांना मैत्रीच्या तहात अडकवून आपले वर्चस्व प्रस्तापित करावयास सुरवात केली.

सन 1802 मध्ये होळकर याने पुण्यावर स्वारी केली, यशवंतराव होळकर यांस तोंड देण्याऐवजी दुसरा बाजीराव पेशव्याने पुण्यातून पलायन करून इंग्रजांची वसई गाठली आणि त्या ठिकाणी 31 डिसेंबर 1802 मध्ये ब्रिटिश अधिकायांशी वसईचा तह स्विकारला. यानंतर ब्रिटिशांनी मराठा दौलतीतील मंडळीना आपल्या वर्चस्वात घेण्यासाठी सुरवात केली. ग्वाल्हेरचे दौलतराव शिंदे, इंदोरचे यशवंतराव होळकर, नागपूरचे भोसले यांना कंपनीने तैनाती फौजेच्या जखडात अडकवले. तैनाती फौजेचा तह म्हणजे हा गळाला अडकवलेला फासच होता. सन 1806 पर्यंत सर्वच मराठी सरदारांनी शरणागती स्विकारल्याने ईस्ट इंडिया कंपनीने राज्य विस्तारण्यास सुरवात झाली. ब्रिटिशांच्या साम्राज्य विस्तार हा स्वाभिमानी मराठी सरदारांना न रूचणारा होता. त्यामुळे त्यांनी ब्रिटिशांना कडाडून विरोध केला व त्यातुनच ब्रिटिश मराठे दुसरे युध्द झाले.

फ्रान्सचा सम्राट नेपोलियन टिपूच्या मदतीसाठी इजिप्त च्या स्वारी नंतर भारतात येत आहे अशी बातमी दख्खनमध्ये पसरल्याने ईस्ट इंडिया कंपनीचे सर्वच अधिका-यांनी मराठयांशी मैत्रीने वागू लागले. नेपोलियन बरोबर युध्द उद्‌भवल्यास सर्व मराठी सरदार आपले मित्र बनून घेण्याची इंग्रजानी सुरवात केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या सुदैवाने 1815 मध्ये नेपोलियनचा धोका टळल्यावर ब्रिटिशांनी मराठयांबरोबर तिसरे युध्द छेडले आणि या युध्दात

दुसया बाजीरावाने त्रस्त केलेला मराठयांचा छत्रपती प्रतापसिंह याला आपल्या ताब्यात घेतले. आणि आष्टी आणि सालापूर येथे पेशव्याच्या सैन्याचा पराभव केला. आणि त्यानंतर बाजीरावाने पलायन करून खान्देशात पोहचला. आणि धुळकोट (खान्देश) या ठिकाणी पेशवा दुसरा बाजीराव यांने जनरल माल्कम पुढे शरणागती पत्कारली अशा प्रकारे मराठी राज्याचा शेवट तिसरा मराठा ब्रिटिश युध्दाने झाला.

इ. स. 1818 मध्ये मराठयांची मने न दुखविता ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकारी एलफिन्स्टन याने आपले सरकारी रॉबर्टसन, प्रॉटिब्जर, जॉन बिग्ज, कॅप्टन ग्रॅट डफ यांच्या मदतीने मराठयांच्या साम्राज्याचे चार भाग करून डेक्कन कमिशन स्थापून याना चार भागाचे कलेक्टर नेमुन कारभार सोपवण्यात आला. महाराष्ट्रात ईस्ट इंडिया कंपनीची म्हणजेच ब्रिटिशांच्या सत्तेची मुहुर्तमेढ रोवली. हि मुर्हुतमेढ रोवत असताना ब्रिटिशांचा हस्तक असलेला ‘बाळाजीपंत नातू’ याने शनिवार वाडयावरील पेशव्यांचा जरी पटका (निशान) खाली उतरवून त्याठिकाणी ब्रिटिशांच्या युनियन जॅक फडकवला. हे सर्व सत्तांतर शांततेत पार पाडले हे सर्व ब्रिटिश ग्रंथातून दाखवले जात असले तरी, खरोखरच तत्कालीन ब्रिटिश वर्चस्वाला मराठी जनतेने प्रतिकार केला किंवा नाही याचा अभ्यास या शोध प्रबंधात केला आहे. तसेच ब्रिटिशांनी सन 1818 ते 1857 ईस्ट इंडिया कंपनीने ब्रिटिश राज्याच्या केलेल्या स्थापनेचा अप्रकाशित, प्रकाशित साधनांच्या मदतीने अभ्यास केला आहे.

उत्तर भारतात जसे 1857 घडले तसे या उठावाला महाराष्ट्रात प्रतिसाद का लाभला नाही? याचाही अभ्यास या ठिकाणी केला आहे. राणीच्या जाहिरनाम्याने 1 एप्रिल 1858 भारतीय जनतेला दिलेली अश्वासने पाळली जावून किंवा न पाळनी जावून ब्रिटिश राज्याच्या दृढीकरणाचा अभ्यास या शोध प्रबंधात केला आहे. एकंदरीत इ. स. 1795 ते इ. स. 1885 या कालावधीतील मराठी साम्राज्यातील सत्तांतर व ब्रिटिश सरकारची मराठी मुलुखातील पायाभरणीच्या दरम्यानच्या सर्व घटनांचा अभ्यास या शोध प्रबंधात आहे.

1.5. संशोधनाच्या मर्यादा Limitation -

प्रस्तुत संशोधनामध्ये अनेक लिखीत अलिखीत साधनांचा संदर्भ घेण्यात आला आहे. या विविध संदर्भाच्या आधारे तत्कालीन घटनांचा व अघामोडीचा अन्वयार्थ शोधण्याचा प्रत्यत्न करताना काही अडचणी निर्माण झाल्या होत्या त्या अडचनीना विषयाच्या मर्यादा ठेऊन ठरविलेले उदिष्टये साध्य होतात किंवा काय या अनुसंधाने विषयाची मांडणी केली आहे.

संशोधनाच्या मर्यादा पुढील प्रमाणे -

1) संशोधनासाठी वापरलेले संदर्भ काही अंशी मोडी भाषेत होते. त्यांचे भाषांतर करून घेतले आहे. यामध्ये व्यक्तीसापेक्षता असू शकते.

2) विषयाच्या मांडणीमध्ये फक्त ब्रिटिश व मराठे यांच्या संबंधावर लक्ष केंद्रित केल्याने, तत्कालीन इतर घटकांच्या संबंधाकडे कमी लक्ष देण्यात आले आहे.

त्याच पध्दतीने कालावधीनुसार यात घेतलेल्या अभ्यासासाठी ठराविक काळ निवडला आहे. त्यानुसार यातील मर्यादा दर्शवण्यात आल्या आहे.

''मराठयांच्या शेवट व ब्रिटिशांची पायाभरणी'' (1795-1885) या विषयाच्या मर्यादा ठरल्या आहे. प्रस्तुत विषयात मराठयांचा शेवट होण्यास कारणीभूत असणाया घटना या पेशव्याच्या स्वतंत्र राजकारभार सूरू झाला तेव्हा पासून म्हणजे पानिपतच्या युध्दा नंतर मराठयांची परिस्थिती मोठया प्रमाणत खालवत चालेली होती. मराठयांचा शेवट होण्यास सुरवात पानिपतच्या युध्दा नंतर झपाटयाने होऊ लागला होता परंतु खया अर्थाने मराठयांच्या शेवटचा काळा म्हणजे खडर्याच्या युध्दा नंतर सन 1795 पासून निर्माण झालेली परिस्थिती होय.

खडर्याच्या युध्दात दाखवलेली एकता मराठी मंडळाला पुढे टिकवून ठेवता आली नाही. मराठी राज्याच्या वारसाचा प्रश्न खडर्याच्या युध्दानंतर पुढे सहाच महिण्यात उपस्थित झाला. सन 1795 पासून महत्वाच्या घटना मराठी साम्राज्यात घडत गेल्या त्या घटना मराठी साम्राज्याचा शेवट होण्यासाठी त्याच पध्दतीने ब्रिटिशांनी आपला पाय मराठी राज्यात

रोवण्यासाठी तसेच महाराष्ट्रात परिवर्तन घडुन येण्यासाठी या घटनाना सुरवात झाली हया गोष्टी येथे महत्वाच्या आहेत.

सन 1795 पासुन ब्रिटिशांनी दुर्लळ झालेला निजाम व त्यांनतर टिपू सुलतान यांचे राज्य आपल्या अमला खाली आनले आता त्यांनी आपला मोर्चा मराठी राज्याकडे वळवला तेव्हा मराठयांची परिस्थिती आपल्याच गृहकलहात पुर्ण पणे फसलेली होती याचाच फायदा घेऊन त्यांनी मराठी राज्यात प्रवेश केला. हिंदूस्थामध्ये ब्रिटिशानी आपले पाय रोवले हाते तरी येथील ऐतद्वेशीया यांच्यावर आपला हुकूम गाजवण्यासाठी त्याना 200 वर्षे जाऊ दयावे लागले होती. प्रस्तुत विषयात मराठयांचा निजामा याच्या बरोबर युध्दाचा प्रसंग म्हणजेच सन 1795 पर्यंत मराठयांची दाकत मोठया प्रमाणात होती पण यानंतर मात्र पुढे सहा महिण्याने पेशवा सवाई माधवरा यांच्या मृत्युमुळे मराठयांची ताकद कमी-कमी होत चाली होती. मराठे व निजाम यांच्या मदतीने ब्रिटिशांनी टिपूचा काटा काढला तसेच निजामाच्या पडत्या काळात त्यांच्या कडून तह करून त्याला आपले मांडलीक केले. मराठी साम्राज्या पोखरण्यास सुरवात याच कालखंडात मोठया प्रमाणात होऊ लागली होती. ब्रिटिशाना मराठी राज्यात सन 1800 पर्यंत कोणचीत हालचाल केली नाही. पेशवा दुसरा बाजीराव याच्या कृपेने ब्रिटिशांना आपली सत्ता मराठी राज्यावर गाजवण्यास संधी मिळाला. पण याचे वाईट परिणाम झाले ते म्हणजे ऐतद्वेशिय सत्ता डळमळीत होण्यास सुरवात झाली. शेवटी सन 1818 मध्ये मराठी राज्य ब्रिटिशांनी परास्त करून जिंकुन घेतले.

सन 1795 पासुन मराठयांची सत्ता लयास जाण्यास सुरवात झाली वारस प्रश्न, गृहकलह, अंतर्गत हेवे दावे, दुर्बल पेशवा, ब्रिटिश सत्ता यामुळे मराठयांचा शेवट झाला तो सन 1818 मध्ये पण येथुन पुढे ब्रिटिशांनीची आपली सत्ता टिकवण्यासाठी कशापध्दतीने आपली पायाभरणी केली हे महत्वाची आहे. त्यांनी आपल्या सत्तेचा प्रत्यक्ष अंमल चालु केला तो याच काळात छत्रपतीला आपल्या ताब्यात घेऊन पुढे त्याला नामधारी केले व सर्व आधिकारी स्वतः वापरून एलफिन्स्टन सरख्या हुशार, चाणाक्स अशा अधिकारी वर्गाने लावली त्यात त्यांनी

प्रत्येक बारीक गोष्टीत लक्ष देवुन येथील व्यवस्था निट नेटकी केली. जुने ते तसेच ठेवुन त्यातील वाईट गोष्टी काढुन जनतेच्या भावना न दुःखवता महाराष्ट्रात कायदे, न्यायव्यवस्था, समानता, चाली रीती या सर्व गोष्टी लक्ष देऊन योग्य पध्दतीने हाताळल्या होत्या यामुळे सत्तेत परिवर्तन होत गेले सत्ता बदलासाठी हाच कालखंड माझ्या अभ्यासासाठी मला उपयोगी ठरला आहे. .

नवीन धोरण नअवलबता त्यानी जुने ठेवून त्यातील त्रूटी काढून त्यांच्यात जनतेला रूजेल व पेलवेल असे धोरण ठेवले जेणे करून ब्रिटिशांची सत्ता येथे टिकेल यासाठी महाराष्ट्रात म्हणजे मराठी राज्यात चांगल्या प्रकारे धोरण राबविले या धोरणाचा फायदा ब्रिटिशांना सन 1857 च्या उठावात झाला. महाराष्ट्रात या उठावाला कमी प्रतिसाद मिळाला त्याचे कारण म्हणजे एलफिन्स्टन व माल्कम या गव्हर्नर यांची लोकप्रियता होय तसेच ब्रिटिशानी केले कार्य होय. कंपनीची सत्ता गेली तरी पण येथे ब्रिटिश सरकारणे आपल्या हाती सत्ता घेऊन नवीन योजना त्यांच्या आधुनिकीरणचा सर्वतो परी वापर हिंदूस्थानात केला. ब्रिटिशांच्या नवीन धोरणाने तसेच त्यांच्या कायदे पध्दतीने हिंदूस्थानात स्वातंत्र्य, राष्ट्रप्रेम, देशभक्ति, देशाविषयी आत्मीयता, तळमळ, यांची चेतना निर्माण झाली आपले हक्क, जबाबदारी यांची जानीव निर्माण झाली. ब्रिटिश सरकारने 1885 पर्यंत केलेले कार्य याचा अभ्यास करणे या विषयात अपेक्षित आहे. याच कालखंडात एक परिवर्तन घडले, कशा पध्दतीने बलाढ सत्ता (मराठे) झापाडयाने लयास जाऊन नवीन सत्ता उदयाला आली (ब्रिटिश) व त्यांनी आपली सत्ता टिकवण्यासाठी प्रयत्न केले आणि या प्रयत्नात झालेला बदल हा एक परिवर्तनच आहे हे या कालखंडात म्हणजेच 1795 ते 1885 मध्ये दिसुन येते.

यानुसार मी निवडलेला विषय ‘‘मराठयांचा शेवट व ब्रिटिशांची पायाभरणी’’ 1795 ते 1885 या शोध प्रबंधाच्या मर्यातेतुन मराठी सत्तेचा शेवट झाला व ब्रिटिशांनी येथे सत्तेचा पाया रोवला यांतील माझ्या अभ्यासाची मर्यादा ठरली आहे.

1.6. संशोधन पध्दती (Resarch Methodology)

संशोधन पध्दती ही आपल्याला नवीन अशा निर्माण करते, संशोधन पध्दतीत एक प्रकारे प्रकाश निर्माण करणारी व मानवी जिज्ञासु वृत्ती व बुध्दीला चालना देवून आपल्या विषयात मोठया प्रमाणात बदल घडवून आणणारी पध्दती आहे. खरा खुरा शोध घेवून त्या मागील हेतु हा खया अर्थाने चांगला असेल तर संशोधनाला चालना मिळत असते. संशोधन करताना संशोधकाच्या मनात हेतु चांगला असायल हवा, त्यामुळे विषयातील गोडी निर्माण होते. त्यातील संशोधकाला काय मांडायचे आहे हे संशोधनात येते. संशोधना मुळे नवीन गोष्टी प्रकाशात येतात भविष्यात बदल घडविण्यासाठी संशोधन मानवी जीवनाला चालना देत असते.

मानवी जीवन हे नवीन गोष्टीचा वेध घेऊन त्यात उपयुक्त व सत्य गोष्टी पुढे ठेवून चालत असतो. मराठयांचा शेवट व ब्रिटिशांची दृढीकरण या विषयात भारत स्वातंत्र्य झाल्या नंतर साधारण चाळीस वर्षात ब्रिटिश, पोर्तूगीज, फार्सी, फ्रेंच, मोडी, संस्कृत या भाषेतील ऐतिहासिक कागदपत्रे पुन्हा नव्याने प्रकाशित झाले. त्यानंतर भारतीय ऐतद्देशिय संस्थानचे विलीकरण होऊन भारत सरकारने या घरण्यातील कागदपत्रे इतिहास संशोधन व अभ्यासू, जिज्ञासू, सर्वांना खूली करून दिली व अनेक भाषेतील कागदपत्रांच्या सूची तयार झाल्या यानंतर या साधनांनमुळे इतिहासतील नवीन माहिती प्रकाशात आली. इतिहास संशोधनासाठी मोठया प्रमाणात उपयोग होऊन खरा खूरा इतिहास सामोर येण्यास सूरवात झाली.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करत असताना ऐतिहासिक संशोधन पध्दती, सर्वेक्षण पध्दती, कागदपत्रे, प्रवास वर्णने, विशिष्ट व्यक्तिची संशोधन पुस्तके यातुन उपयुक्त विषयाला अनुसरुन मिळालेली माहिती व त्यावरुन प्रतेक गोष्टीचा बारकाईने केलेला अभ्यास हा संशोधकला करावाच लागतो तेव्हा संशोधनाच्या प्रत्येक पायरीवर तो पोचतो. यासाठी मी प्रस्तुत विषयाचा अभ्यास करत असताना प्रत्येक गोष्ट अंतर्गत व बहिर्गत परिक्षण करुन त्याची पूर्ण पणे सत्यता तपासून मगच संशोधना करिता त्याचा वापर केला आहे. विषयाची

मांडणी करत असताना प्रामुख्याने प्राथमिक साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे. उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनाच्या आधारे प्रकरणांची मांडणी करण्यात आली आहे.

सदर संशोधना मध्ये खालील प्रमाणे प्रकरण रचना केली आहे.

प्रकरण रचना :

प्रकरण एक – संशोधन पध्दती

प्रस्तुत विषयाला अनुसरून मला संशोधनासाठी मराठयाचा शेवट व ब्रिटीशांची पायाभरणी या विषयावर संशोधन करायचे आहे. प्रस्तुत विषयात समाविष्ट गोष्टी पैकी प्रस्तावाना, संधी, अभ्यासाचे उद्देश, अभ्यासाच्या मर्यादा, अभ्यासाची उपयुक्तता, संशोधन पध्दती, साहित्य समिक्षा, उपलब्ध संदर्भ साधने, यांचा संशोधना साठी महत्व असल्या कारणाने या गोष्टी चा अभ्यासच पुढे संशोधनासाठी उपयोगी होणार आहे.

प्रकरण दोन - खडर्याची लढाई आणि गृहकलह

खडर्याची लढाई ही मराठे व निजाम यांच्यात झालेली महत्वाची व दोघांचे अस्तित्व टिकवण्यासाठी दोन्हीच्या इतिहासात महत्वाची आहे. या लढाईने मराठयाची एकता व ताकद हिंदूस्थानात पुन्हा प्रस्तुत झाली. खडर्याच्या लढाईसाठी मराठा साम्राज्यातील सर्व सरदार, नेते एक जुटीने एकत्र येऊन निमाजचा केलेला पराभव, यामुळे मराठयांची वाढलेली ताकद सर्व हिंदूस्थानला दिसली. या लढाईत जरी ऐवढा संहार झाला नाही, तरी पण सर्व मराठा सरदार एकत्र येऊन लढनारे हीच ती शेवटी लढाई या लढाई नंतर मराठी राज्यात अनेक लढाया झाल्या पण कोणत्याच लढाईत मराठे एकत्र आले नाही. खडर्याच्या युध्दा नंतर मराठी साम्राज्याचा पालन करता पेशवा सवाई माधवराव यांचा मुत्यू झाला आणि मराठी साम्राज्याला याच सुमारास ग्रहण लागले, हे ग्रहण मराठयांचा शेवट करण्यासाठीच लागले होते. या मुळे साम्राज्यात व सरदार, जहागिरदार, सरंमजामदार यांच्यात अंतर्गत कलह निर्माण झाले व या अंतर्गत कलहा मुळे मराठी साम्राज्यातील नेत्यांनी आपआपल्या पध्दतीने वगण्यास सुरवात केली. पेशवे पदासाठी चालु झालेले दुसरा बाजीरावाचे प्रयत्न खटपट, नाना फडणीस यांचा

विरोध या गोष्टीचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.

प्रकरण तिन - मराठे इंग्रज युध्द (दूसरे)

प्रस्तुत विषयात मराठी साम्राज्यात नाना फडणीस यांच्या मृत्यु नंतरची मराठी साम्राज्याचा स्थितीचे वर्णन आहे. दौलतराव शिंदे व यशवंतराव होळकर या मराठयांच्या आधार स्तंभाची आपआपसातील भांडणा मुळे मराठी साम्राज्य खिळखिळे झाले. होळकर यांच्या भाऊ विठोजी होळकर यांला पेशव्यांनी त्याच्या बंडामुळे दिलेल्या मृत्युदंडामुळे यशवंतराव होळकर याने पुण्यात गोंधळ घालण्यास सुरवात केली. पेशवा दुसरा बाजीराव पुण्यातून पळून ब्रिटिशांच्या आश्रयाला गेला त्यानंतर त्याला आपल्या जाळयात ओढून त्याच्याकडून वसई सारखा अपमानकारक तह करून घेतला. मराठी साम्राज्यावर ब्रिटिशांची असलेली बारीक नजर यामुळे मराठी साम्राज्याचे सावज त्यांनी हळूच हेरले व त्यालाच गळ घालून आपल्या सत्तेची स्वप्ने पुर्ण करण्याच्या दुष्टीने प्रयत्न चालु केले. ब्रिटिशांचा विस्तारवादी धोरण मराठी साम्राज्याला मोठया प्रमाणात घातक ठरले. बाजीराव बरोबर वसईचा तह केल्यावर ब्रिटिशांनी होळकरांशी मैत्री करून शिंदेचा काटा काढण्याचे ठरवले व शिंदे यांना भोसलेनी ब्रिटिश विरोधी साथ दिली यामुळे ब्रिटिशांनी या मराठी साम्राज्याच्या दोन बलाढ नेत्यांना आपल्या पध्दतीने नामोहरण केले. यानंतर ब्रिटिशांनी होळकरांना युध्दात ओढून आपला हेतु साध्य केला. मराठी साम्राज्य फंदफितूरीने पुर्ण पणे पोखरून ठेवले होते त्यामुळे ऐवढा मोठा विजय त्यांना शक्य झाला. होळकर, शिंदे, भोसले या मराठी साम्राज्याचे असलेले आधारस्तंभ ब्रिटिशानी पुर्ण पणे निकामी करून टाकले. विविध अपमानकारक तह लादून त्यांना गप्प बसवले यामुळे मराठयांची ताकद आपल्याच राष्ट्रात पुर्ण पणे संपली त्यांचा दरारा संपला. दुसरे इंग्रज मराठा युध्द झाले व काही प्रमाणात मराठी साम्राज्याचा शेवट जवळ आला. प्रस्तुत प्रकरणात या घटनांचा अभ्यास केला आहे.

प्रकरण चार - तीसरे ब्रिटिश मराठा युध्द व मराठी साम्राज्याचा शेवट

ब्रिटिशांनी मराठी साम्राज्याचा करता-धरता पेशवा दुसरा बाजीराव याला आपल्या जाळयात ओढून त्याच्या मार्फत हिंदूस्थानात पोषक असे वातावरण निर्माण करण्याचे काम सुरू केले. या सर्वा मुळे पेशवा विरुध्द वातावरण निर्माण होते गेले. पेशवा स्वभावाने जैनी, विलासी, व सत्तेची लालसा, त्याने आपल्या वडिलांच्या विरोधकांना जेरीस आणले होते. दरबारी कट कारस्थाने यातच सर्व वेळ जात असे. ब्रिटिशानी प्रथम पेशवा दुसरा बाजीरावाला वाटेल तसे वागू दिले पण नंतर बाजीराला अनेक अपमानकारक तह लादून, त्याला हालचाल करण्यासाठी जागा ठेवली नाही. ब्रिटिश वकिल एलफिन्स्टन याने आपल्या विस्तारवादी धोरणाने मराठी साम्राज्याला नवीन वळणार आणून ठेवले होते. पेशव्यास यातुन बाहेर पडण्यासाठी कोणताच मार्ग ठेवला नाही पंढरपूर करार, पुण्याचा करार, आपल्या सरदारना बसलेला चाप, दक्षिणेत ब्रिटिशानी खेळलेला डाव, गायकवाड प्रकरण त्यात गंगाधर शास्त्रीचा खून या मुळे पेशवा पुर्णपणे ब्रिटिशांच्या कचाटयात असा सापाडला की त्यातून बाहेर पडणे आता शक्य नव्हते. पुणे दरबारात आपले काहीच चालेना, आपल्या हातात काहीच राहिले नाही नामधारी राहण्यापेक्षा युध्द करावे. बाहेर पडायचेच असेल तर आता युध्दा शिवाय पर्याय नव्हता. पेशवा दुसरा बाजीरावाच्या अंगात युध्दाचे कोणतेच गुण नव्हते, त्याचा आणि युध्दाचा दूरदूरचा संबंध नव्हता. ब्रिटिशांशी युध्द करायचे पण कसे व कोठे याचा त्याने काहीच अंदाच घेतला नाही. ब्रिटिशांच्या अंगात असलेला मुसूद्दीपणा तसेच एलफिन्स्टन यांचे धोरण या सर्वाचा एक विचार होता. याच कारणाने पेशवा दुसरा बाजीरावाचा पराभव होऊन मराठी साम्राज्य ब्रिटिशाच्या हातचे बाहूले बनले. सन 1818 मध्ये मराठयांची पेशवाई संपली छत्रपती ब्रिटिशांचा अंकीत झाला होता पुढे पंचवीस तीस वर्षातच ब्रिटिशानी मराठयांचे श्रध्दास्थान म्हणुन मानले जाणारे छत्रपती यांचे सातारा राज्य खालसा केले. प्रस्तुत प्रकरणात या सर्व गोष्टींचा अभ्यास केला आहे.

प्रकरण पाच - महाराष्ट्रातील ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे दृढीकरण (पायाभरणी)

प्रस्तुत प्रकरणा मध्ये ब्रिटिशानी आपला पाय मराठी मातीत घट रोवला पेशवाला पुण्यातून पळून शेवटी मराठी साम्राज्यातुन हद्दपार करून मराठी राज्याची धुरा संभाळली होती. सन 1818 मध्ये छत्रपतीच्या हातात कारभार देऊन ब्रिटिशांनी त्यास फक्त नामधारी ठेवले व कायदा, प्रशासन, सामाजिक, आर्थिक, राजकीय या सर्व गोष्टीमध्ये लक्ष घालण्यास सुरवात केली. ब्रिटिशांनी आपल्या विस्ताराच्या धोरणामुळे सत्ता स्थापली. तीच्या दृढीकरणासाठी महाराष्ट्रात एलफिन्स्टन व माल्कम या दोन आधिकायाची भूमिका महत्वाची ठरली. प्रशासकीय, सामाजीक, आर्थिक, राजकीय या पध्दतीत बदल न करता, आहे त्याच ठेवल्या गांवांचे संरक्षण, सुव्यवस्था व प्रशासकीय पुनर्रचना या सर्वच बाबतीत मराठयांच्या परंपरांचा पूर्ण अभ्यास करून एल्फिन्स्टनने आपले नवे धोरण आखले आणि जुन्या संस्था व जुन्या पध्दतीला नवे रुप दिले. जुन्या संस्थाच्या पारंपारिक अवास्तव अधिकारांवर नियंत्रण आणले. मराठी प्रजेला दुखावणार नाहीत अशा बेताने प्रशासनात आवश्यक ते बदल हळुहळु पण निर्धारयुक्त करून महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेने पायाभरणी (दृढिकरण) केले व ते करीत असतानाच महारष्ट्रात परिवर्तन घडवून आणले. त्याच पध्दतीने ब्रिटिशांना होणारा विरोध मोडून काढला, एलफिन्स्टन याच्या कामाचे त्याला महाराष्ट्रात तरी चांगले फळ मिळले. सन 1857 चा उठावतील महाराष्ट्राची भूमिका कशा पध्दतीने होती त्यानंतर सत्ता परीवर्तनाचा कोणता फायदा महराष्ट्राला झाला होता. महाराष्ट्रात झालेले परिवर्तन / सत्तांतर कशा पध्दतीने होत गेले याचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.

प्रकरण सहा - मराठा व ब्रिटीश यांच्यातील संभाषण पत्रे

ब्रिटिशांची सत्ता महाराष्ट्रात स्थापन झाली यानंतर महाराष्ट्रात ब्रिटिशांनी कोण-कोणत्या प्रकारे छत्रपतीच्या नावे जाहिरनामे काढून सत्ता चालवली. जाहिरनामे हे छत्रपतीच्या नावे ब्रिटिशांनी काढली त्यांचे काही ऐतिहासीक कागदपत्रे मोडी लिपीत प्रकाशित आहेत.

त्यावरून ब्रिटिशाचे महाराष्ट्रात पायाभरणीसाठी कशा पध्दतीचे धोरण होते हे स्पष्ट दिसुन येते. या संदर्भातील चर्चा या प्रकरणात केली आहे.

प्रकरण सात - समारोप : निष्कर्ष

या प्रकरणात खडर्याच्या लढाई ते मराठी सत्तेचा शेवट तसेच ब्रिटिशांची सत्ता दृढ करण्यासाठी केलाल्या प्रयत्नातून संत्तातर घडले. खडर्या लढाईतील मराठी राज्याची स्थिती व मराठा व ब्रिटिश यांच्यात झालेल्या दोन युध्दे यातील मराठा राज्याची स्थिती व त्यात होत गेलेला बदल यामुळे सन 1795 ते 1885 या काळात झालेले सत्तांतर याची योग्यता येथे स्पष्ट होते. अभ्यासासाठी घेतलेल्या उदिष्टांनां उनुसरून वरील काळात घडलेल्या घटनांमधून निष्कर्ष शोधले गेले.

संदर्भ सूची

मि या विषयासाठी जी पुस्तके अभ्यासले त्यांचा माझ्या संशोधनासाठी उपयुक्त कागदपत्रे मला लागली त्याची सर्व माहिती यात दिलेली आहे.

1.7. साहित्य समिक्षा / साहित्याचा आढावा (Literature Review)

1.7.1. शोध निबंध -

1) डॉ. वि. गो. खोबरेकर - 1988 – ‘मराठा कालखंड’ या मराठयांवरील लेखनात इ. स. 1707 ते 1818 पर्यंत चा इतिहास देण्यात आला आहे. औरंगजेबाच्या मृत्यु नंतर मराठ्यांना झालेली राज्य प्राप्ती याचे योग्य विलेषण करून पुढे मराठे शाहीचा अंत कशा प्रकारे झाला या सर्व गोष्टीची इतंभूत माहिती यात देण्यात आली आहे. सदर लेखनात मराठयांच्या इतिहासा पैकी थोरले शाहु महाराजां पासून पेशवाई अखेरच्या कालखंडाचा इतिहास लिहिण्याचे काम या लेखनात झाले आहे. माझ्या संशोधनासाठी ह्या पुस्तकाचा कालखंडातील पेशवे व शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले, पटवर्धन आदि मातब्बर सरदार या एकेकटयांचा साद्यंत इतिहास अभ्यासण्यात आला आहे. दूसरा बाजीराव, दौलतराव शिंदे, उत्तर कालातील

मराठे सरदारांना एकएकटे गाठून ब्रिटिशांनी त्यांचा केलेला पराभव हे माझ्या संशोधनासाठी महत्वाचे ठरणार आहे.

2) सदशिव आठवले - 1990 - 'सरदार बापू गोखले' मराठी साम्राज्यात शेवटच्या शनाला मराठयांच्या पेशवा दुसरा बाजीराव यांना धिर, हिंमत्त देण्याचे काम केले ते सरदार बापू गोखले यांनी त्यांच्या कार्याचा आढावा या पुस्तका देण्यात आला आहे. बाजीरावर पेशव्यासाठी जीवाचे रान करून ब्रिटिश विरूध्द शस्त्र उगारून आपल्या धन्याला वाचवण्यासाठी प्राण प्रतिष्ठा पणाला लावण्याचे काम बापू गोखले यांनी केले. बापू गोखले यांनी केले कार्य मराठी शाहीच्या इतिहासात मोठे आजरामर राहिले आहे. त्यामुळे सदर लेखनाचा माझ्या शोध कार्यासाठी मोठा उपयोग होणार आहे.

3) प्रमोद ओक - 1991 - 'पेशवे घराण्याचा इतिहास' महाराष्ट्राच्या इतिहासात महत्वाच्या अस्थित्व असलेल्या राजघराण्याची प्रतिष्ठा उपभोगणारी घराणी म्हणजे मराठेशाहीत होऊ घातलेली पेशवाई तिचा कालखंड जो शिवशाहीचा उत्तरार्ध आहे. राजकीय इतिहासाच्या दृष्टीने उपयोगी पडेल अशी सर्व उपयुक्त माहिती या पेशवे घराण्याचा इतिहास यात मांडली आहे. सामाजिक दृष्टिकोनातून तसेच पेशवा घराण्याची सलग कुटूंब किवा घटक या दृष्टीने त्यात दखल घेतलेली आहे. पेशव्याच्या उदया पासुन ते 1857 च्या सशस्त्र उठावापर्यंतची पेशवा घराण्यासंबंधी माहिती सलगपणे मिळत नाही. सदर ग्रंथातून पेशवा कुटुंबियांची व त्यांच्या अस्ताची माहिती इतिहासाच्या ग्रंथामधून मिळत नाही. यामुळे सदर लेखकाने हा तपशील सामाजिक इतिहासासाठी समाजाची तत्कालीन जडणघडण, सामज मनावरील विविध प्रभाव आणि एकंदर मानसिकता समजून घेण्यासाठी तसेच माझ्या संशोधनासाठी पेशव्याच्या इतिहासातील व्यक्ति यांच्या चरित्राचा उलगडा होण्यासाठी महत्वाची ठरली आहे.

4) स्टीवर्ट गॉर्डन - 1993 - 'द मराठा' 1600 - 1818 प्रस्तुत लेखात मराठा राज्याच्या धोरणाचा, सतराव्या शतकात एक महत्वाचे प्रादेशिक राज्य म्हणून तसेच अठराव्या शतकातील भारतातील सर्वात मोठे राजकीय अस्तित्व असलेली एक सर्वात व्यापक सत्ता

हिंदूस्थानच्या नकशावर असलेले मराठयांचे साम्राज्य होय. पुढे पुढे या साम्राज्यात ऐतद्देशिय कुटूंबे आणि लष्करी, आर्थिक, आणि प्रशसकीय बदल होत गेला व एक परकिय सत्तेने या बदललाला आपला हातभारत लावला, आप-आपसातील निष्ठा राखण्यासाठी मराठे शेवट कमी पडले. भारतातील एक महत्वाचा रंगीन व समजून येणारा व्यापक इतिहास या पुस्तकरूपी लेखात नमुत केला आहे. छ. शिवाजीनी स्थापन केलेल्या सोळाव्या शताकातील महान साम्राज्याला पुढे एकोणीसाव्या शतकात ब्रिटिशानी जिंकून घेतले. यात मराठा साम्राज्याचे कागदपत्र व साम्राज्य इतिहासाच्या प्रशासकीय दस्ताऐवज यांचा उपयोग करून स्टीवर्ड गार्डन यांनी मराठा कालीन परिवाराचा उदय, निष्ठा, कायदे पध्दती, प्रशासन इ. गोष्टीचा सुसंगटीत इतिहास समोर आला आहे. या पुस्तकाच्या माध्यमातुन मला संशोधनासाठी महत्वाचा उपयोग होणार आहे.

5) डॉ. समुन वैद्य - 1994 - 'अखेरचा पेशवा' म्हणजे दुसरा बाजीराव यांच्या आयुष्यातील सर्व महत्वाच्या घटनांवर लेखिकेने यथार्थ विलेशन केले आहे. मराठयांच्या इतिहासाच्या क्षेत्रात हे एक अत्यंत स्वागतार्ह व प्रशंसनीय संशोधन केलेले आहे. अखेरच्या पेशव्याच्या सर्व महत्वाच्या मुद्यांची त्यांनी केलेली मीमांसा या सर्वाचे भेदक विश्लेषण केले आहे. अखेरचा पेशवा या विषयावर अभ्यास करताना सुमन वैद्य यांनी चिकित्सक व दृष्टीकोनातून खोलवर अभ्यास केला आहे. त्या विषयावर उपलब्ध सर्व प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे व ग्रंथ बारकाईने तपासले. त्याच्या धरतीवर ग्रॅट डफ काळापासून ब्रिटिश इतिहासकारांनी या पेशव्याबाबत मांडलेल्या मतांना लेखिकेने जबरदस्त आव्हान दिले आहे. त्यांनी काढलेल्या निष्कर्षामुळे माझ्या या संशोधनासाठी मोलाची भर पडली आहे. या नुसार पेशवा दुसरा बाजीरावाच्या सर्व घटना क्रमांची योग्य माहिती मिळाली आहे.

6) डॉ. वि. गो. खोबरेकर, 1994 - 'महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे'- 1818 ते 1884, सन 1818 पासून महाराष्ट्रात मराठी राज्य संपले व ब्रिटिश राजवट सुरवात झाली. ब्रिटिश गव्हर्नर एलफिन्स्टन यांचे कार्य, मुंबई प्रांत, इंग्रजी शिक्षण, शाळा, नवीन आधुनिक

ज्ञानाला चालना देण्याचे काम केले. महाराष्ट्रात विचारवंत घडवण्याचे काम केले. त्याच प्रमाणे बंडखोर वर्गाला योग्य शासन करण्याचे काम योग्यरित्या केले. सन 1857 च्या उठावात महाराष्ट्रा अधुनिकी करणा मुळे ब्रिटिशांना त्यांच्या मर्जितील एक वर्ग महाराष्ट्रात निर्माण झाला. ब्रिटिश विरुध्द असंतूष्ट वर्ग महाराष्ट्रत कशा पध्दतीने होता. व एलफिन्स्टन यांच्या कार्याचा आढावा या पुस्तकात माझ्या संशोधनासाठी योग्य होणार आहे.

7) एन. जी. राठोड, 1994 - 'The Great Maratha Mahadji Scindia'. मराठी साम्राज्याच्या उत्तरनीच्या काळातील महत्वाची व्यक्ती म्हणजे 'महादजी शिंदे' यांच्या कार्याची माहिती या लेखात मिळते. मराठी साम्राज्य वाढवण्यासाठी संपुर्ण जिवनाची पराकष्टा करून साम्राज्या वाढवले. महाजदी शिंदे यांनी मराठी साम्राज्य वाढण्यासाठी रजपुत यांच्याशी अलेले संबंध, मराठी दरबार बद्दलचा आदर पेशवाईवर असणारी निष्ठा, सन 1792 मध्ये महादजीचे पुण्यात पुन्हा आगमन झाले त्यानंतर महादजी, नाना फडणिस यांच्या तील संबंधना गेलेला तडा यासर्व घटनाचा लेखकाने अस्सल माहितीच्या आधारे समावेश केला आहे. महादजी यांच्या मृत्युने मराठी साम्राज्याची मोठी ताकद संपली. माझ्या शोध कार्यासाठी महादजी शिंदे यांच्या साम्राज्याच्या पुर्व अभ्यास महत्वाचा ठरणार आहे.

8) प्रमोद ओक - 1999 - 'एलफिन्स्टन' प्रमोद ओक यांनी एलफिन्स्टन यांच्या पुण्यातील राज्य कारभारात तसेच मुंबईचा गव्हर्नर झाल्यानंतर केलेला कारभार यांची सर्व व अस्सल माहिती यात मिळते. त्यांनी गोडीगुलाबीने प्रजेची मने ब्रिटिश सत्तेसाठी राजी केली. त्यांच्या पुढे आलेल्या मोठ-मोठया प्रश्नांचा उदार अंतःकरणाने निकाल लाऊन त्यांना मुंबई राज्यातील लोकांस खुष ठेविले. अत्यंत सुधारलेल्या प्रभूने अर्धवट सुधारलेल्या प्रजेचे संगोपन कसे करावे हे पूर्णपणे जाणून मुंबई इलाख्याचे राज्य चालविले इ. गोष्टी लोकांना आठवतील तो पर्यंत एलफिन्स्टन याचे नाव हिंदुस्थानच्या इतिहासात राहिल. इंग्लंड मधील सर्वोच्च सत्तेचे धोरण भारतात राबवणारे अधिकारी तसेच भारतीय ब्रिटिश गव्हर्नर जनरल आणि कनिष्ठ अधिकारी यांच्या मधील असलेला दुवा नविन सरकार जहागिरदार व रयत यांच्या वरिष्ठ अशा

विविध भुमिका पार पडणाया सत्ताधायाचे चरित्र या प्रमाणे एलफिन्स्टन याने केलेल्या कार्याचा आवाढा यात महत्वाचा आहे.

9) डॉ. अ. रा. कुलकर्णी - 2000 - 'कंपनी सरकार' म्हणजेच ईस्ट इंडिया कंपनी च्या महाराष्ट्रातील प्रवेशाचा, राजकीय सत्ता काबीज करण्याचा आणि महाराष्ट्राच्या अस्मितेला हादरे देण्याच्या कारवायांचा इतिहास ब्रिटिशांनी कंपनीच्या रुपाने, महाराष्ट्राच्या पश्चिम किना-यावर आपले प्रथम पाय ठेकले, त्यांना यावेळी महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी यांचे कडवे अहवान दिले आणि त्यांचे पाय त्याच किनायावर रोखले. नंतरच्या काळात, प्रथम आलेले व त्यांनी आपले स्थान उत्तर भारतात बळकट करून महराष्ट्रात सत्ता वाढवण्यास प्रारंभ केला. मराठयांचे शत्रू हेरून त्यांना आपले मित्र बनविले. मराठी मुलखात सुरु झालेले गृहकलह, सरदारांच्या प्रभावामुळे दुभंगत चाललेली मराठी सत्ता, विकलांग झोलेली दिल्लीची पातशाही, या सर्व राजकीय अस्थिरतेचा फायदा उठवून, कंपनीने हिंदुस्थानच्या राजकारणाची सुत्रे हातात घेतली. सन 1818 ते 1857 या सुमारे चाळीस वर्षाच्या काळात महाराष्ट्रात कंपनीचा अंमल होता. उठावा नंतर ब्रिटिशांनी महाराष्ट्र आपल्या ताब्यात घेतला आणि या उपखंडात वसाहतीचे राज्य निर्माण झाले. कंपनी सरकार मध्ये माझ्या संशोधनासाठी उपयोगी ईस्ट इंडिया कंपनीची दृढिकरणासाठी तसेच आपला पाया पक्का करण्यासाठी कशा प्रकारे प्रयत्न केले याचा महत्वाचा उपयोग होणार आहे.

10) डॉ. ह. म. घोडके - 2000 - 'महाराष्ट्रगाधा' हा महाराष्ट्राच्या इतिहासात आठराव्या शतकाचा शेवट व एकोनाविसाव्या शतकातील राजकारण धर्म संस्कृती, शिक्षण आणि पत्रकारिता या सर्व क्षेत्रांचा हा छोटेखानी आलेख या पुस्तकात दर्शवन्यात आलेला आहे. महाराष्ट्रातील सशस्त्र क्रांतिकारिता ह्या विषयावर पी एच. डी. साठी प्रबंध लेखन करून त्यांना त्याच विषयावर इंग्रजी मधुन पुस्तकही प्रकाशित केले आहे. एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध म्हणजे अर्वाचीन महारष्ट्राचे चैतन्यपर्व, या काळात महाराष्ट्रामध्ये अनेक रथी - महारथी अवतरले. प्रचंड वैचारिक रणधुमाळी निर्माण झाली. मराठी सत्तेच्या समाप्ती नंतर अनेक

प्रयोग झाले. त्यापैकी काही यशस्वी झाले, काही अपयशी ठरले. ब्रिटिश राजवटीत राजकारण, सामज व संस्कृतिच्या क्षेत्रात झपाटयाने अध:पतन चालू असताना महाराष्ट्राने धीमेपणाने व काहीशा उशीराने का होईना स्वत:ला सावरले. एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या जडण घडणीचा इतिहास रोमहर्षक आहे. युरोपातील उदारमतवादाचा वारसा महाराष्ट्रामध्ये चालूवन हिंदूस्थानच्या राजकानात केलेला बदल येथे सांगण्यात आला आहे. दीडशे वर्षांपूर्वीच्या त्या चळवळी आज एकोविसाव्या शतकाच्या प्रारंभीही आपल्या जीवनाला स्पर्श करीत आहेत. त्यांचा अन्वयार्थ लावण्याचे काम तसेच सोपे करण्याचे काम या लेखकांने या लेखनात केले आहे.

11) आर. एस. चौरसिया - 2004 - 'History of the Marathas,' मराठयांच्या इतिहासात चौरसिया यांनी दौलतराव शिंदे यांचा कारभाव व ईस्ट इंडिया कंपनी याच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. त्यानुसार त्यानी 1794 पासुन ते 1827 पर्यत म्हणजेच महादजी शिंदे यांच्या मृत्यु नंतर शिंदेच्या घराण्यातील सर्व हकीकत यात सांगण्यात आली आहे. त्यानुसार माझ्या संशोधनासाठी दौलतराव व ब्रिटिश यांच्या दुसया ब्रिटिश मराठा युध्दात आलेल्या संबंधचे वर्णन करण्यासाठी मला मोलाचे ठरणार आहे.

12) य. न. केळकर, 2004 - 'भूतावर भ्रमण' - एतिहासीक लेखसंग्रह, इतिहास संशोधक य. न. केळकर यांचे लेखन म्हणजे अस्सल सोने आहे. गेली अनेक वर्षे हा दुर्मीळ खजिना त्यांनी नवीन पिढीला त्याचे दर्शन घडवून दिले. अनेक वस्तु, व्यक्ति आणि घटनां बद्दल अस्सल माहिती पुरण्याचे काम केळकर यांनी केले आहे. साहित्य लिखानात लेखकाने पेशव्याच्या काळातील अनेक अस्सल कागदपत्राचा अभ्यास करून पेशवे काळातील गणेशपूजन, विधी पुजन, शिक्षण, इ. घटनांचा अभ्यास करून जनते समोर आणण्याचे काम लेखकाने या भूतावर भ्रमण एतिहासीक लेखसंग्रहातुन केले आहे. यातुन माझ्या शोधासाठी पेशवा सवाई माधवर यांच्या कार्याची, पेशव्याची शिक्षण, दरबारी माहितीचा उलगडा होतो.

14) डॉ. अ. रा. कुलकर्णी -2007 - सदर शोधन निबंध 'मराठे व महाराष्ट्र' यामध्ये मराठयांच्या इतिहासाच्या साधनांचा अल्पसा परिचय लेखकांने करूद दिलेला आहे. लेखकाने अस्सल साधनांच्या वापर करून लेखन कटाक्षाने केले आहे. सदर पुस्ताकात अस्सल साधने (संदर्भ) दिलेली आहे. महाराष्ट्रातील ग्रामव्यवस्था कशा पध्दतीने होती. तसेच महाराष्ट्रातील भिन्न राजवट होती तरी संस्कृतीचा संशेप येथे कसा टिकला याचे यधासांग अकलन या लेखनात पाहवयास मिळते. तसेच अधुनिक महाराष्ट्रात मराठयांचा शेवट झाल्यावर म्हणजेच पेशवे पदा वरून उतरले तेव्हा महाराष्ट्राची परिस्थितीची येथील व्यवस्थेची धुरा संभाळण्याचे काम केले ते एलफिन्स्टन यांच्या योगदानाने त्याचा अल्पसा परिचय एका लेखात करुन दिला आहे. माझ्या शोध कार्यासाठी सदर लेखनात एलफिन्स्टनचे कार्य व महाराष्ट्रातील परिस्थिचा कशा बदल झाला याचा योग्य प्रमाणे परिचय येथे मिळतो.

14) य. ना. केळकर - 2008 - 'ऐतिहासिक पवाडा' मराठयांचा काव्यमय इतिहास, सामाजिक आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक यांची या दृष्टीतून सामाजाच्या ऐतिहासिक घटकांचा अभ्यास यात काव्याच्या रूपाने केला आहे. तसेच मराठी इतिहासात साहित्याच्या दृष्टिने जागृतकता पसरवण्याचे काम यातुन पुरवी केले जात होते. याच काव्याच्या माध्यमातून मराठाशाहीच्या सामाजिक घटनाचा, त्यांच्या जीवनाचे वर्णन यात केले आहे. मराठयांच्या इतिहासात या साहित्याचा फार महत्वाचा वाटा आहे. खडर्याच्या लढाईचे वर्णन बरेचसे पवाडा मार्फत केले आहे. मराठयांच्या ऐतिहासिक जीवणाचे वर्णन यातुन स्पष्ट दिसून येते.

15) डॉ. अ. रा. कुलकर्णी, ग.ह. खरे - 2010 - **'मराठयांच्या इतिहास'** खंड 3 सदर लेखनात कथन करणाया कुलकर्णी यांच्या मराठयांचा इतिहास हे पुस्तक तीन खंडात मांडणी केली आहे. मराठयांच्या इतिहासाच्या तिसया खंडात सन 1761 ते 1848 हा कालखंड घेण्यात आले आहे. अनेक तज्ञाच्या मदतीने याची विस्तृतपणे मांडणी केली आहे. मराठी सत्तेचा शेवट सन 1818 मध्ये जरी झाली तरी वास्तवीक (नामधारी सत्ता) ती संपुष्टात आली सन 1849 मध्ये छत्रपतीनी सोळाव्या शतकाच्या शेवटी मराठी सम्राज्याची गादी स्थापन केली

व तिचा शेवट हा साताराची गादी खालसा करून कसा केला ही हकीगद या खंडात देण्यात आली आहे. त्याच पध्दतीने मराठयांना ब्रिटिशानी कशा पध्दतीने नमविण्याचे काम केले. मराठे ब्रिटिश यांच्यातील मुसूद्दी व युध्द नेतृत्व याच्या भूमिकेचे वर्णन यात केले आहे. ब्रिटिशाची सत्ता महाराष्ट्रात रूजवण्याचे कार्य एलफिन्स्टन या महान ब्रिटिश गव्हर्नरने केले त्याचा यात स्वतंत्र उल्लेख केला आहे. तसेच मराठयांच्या इतिहासाची साधने हे तीन खंडातील पुस्तक लेखकने बखरी, ऐतिहासिक वाङःमय, पत्रव्यवहार, मराठी दप्तर, साधन चिकित्सा, माडी दप्तरखाने या संबंधाची माहिती या दोन खंडात मिळते. तसेच मराठयांना नमविण्याच्या कामी मुसूद्देगिरी आणि युध्द नेतृत्व या दोन्ही दृष्टींनी जास्त महत्वाची भूमिका वठविली आणि ब्रिटिश सत्ता महाराष्ट्रात रूजविण्याचे महान कार्य केले ते माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनच्या कार्याचा एका स्वतंत्र प्रस्तुत खंडात परिचय मिळतो. त्यानुसर माझ्या सदर संशोधनासाठी मराठयांचा शेवट व एलफिन्स्टन यांनी मराठयांच्या शेवट होण्यासाठी केलेल्या कामगीरचा मोठया प्रमाणत उपयोग होते.

16) गोविंद तळवळकर, 2005 - ‘मंथन’ या मध्ये एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात वैचारिक परिवर्तन होऊ लागले होते. महाराष्ट्र टाईम्स चे संपादक गोविंदराव तळवलकर यांनी या परिवर्तनाविषयी केलेले हे विचार मंथन आहे. या वैचारिक परिवर्तनाची काही मुळे महाराष्ट्राच्या परंपरेत होती, तर त्याची प्रेरणा पाश्चात्य संस्कृती व विद्या यात होती तसेच या वैचारिक चळवळीच्या काळात अनेक प्रवृत्ती पुढे आल्या. काही बाबतीत त्या परस्पर विरोधी असलेल्या दिसतात पण त्याचबरोबर त्यांना साधणारे काही बंधही होते. या सर्व वैचारिक परिवर्तनाचा परामर्श अभिनिवेशाने नव्हे, तर संशोधकाच्या वृत्ती लेखकाने घेतला आहे.

17) डॉ. माधुरी मंडलिक - **2002** - ’19 व्या शतकातील महाराष्टातील हिंदुधर्म सुधारणा चळवळ’ या लेखत प्राचीन भारतातील समाज, धर्म सुसंस्कृत व सभ्य मानले जात होते, परंतु काळाच्या ओघात हे सर्व मागे पडून 19 व्या शतकापर्यंत त्यात विघातक बदल

घडून आले. परिणामी पारतंत्र्य आलेच परंतु स्त्री व शूद्रांचे साधारण मानवी अधिकारही तत्कालीन धार्मिक व्यवस्थेने नाकारल्याने समाजाची सर्वांगीण प्रगती खुंटली. अशा परिस्थितीत व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक व धार्मिक बंधनाची मर्यादा, मानवतावाद, बुध्दिप्रामाण्यवाद या पाश्चात्य विचारांची इंग्रजी शिक्षणाद्वारे ओळख झाल्याने भारतीय व विशेषतः महाराष्ट्रातील समाज व धर्म सुधारकांनी जवळ-जवळ शतकभर यासाठी कार्य केले व त्यातूनच पुढे राष्ट्रवादाचा उदय झाला. प्रस्तुत पुस्तकाद्वारे आपल्याला या शतकातील महाराष्ट्रातील समाजाचे स्वरूप व सुधारकांचे कार्य यांचे आकलन होण्यास निश्चितच मदत होईल.

18) डॉ. अनिल कठारे - 2001 - 'आधुनिक भारताचा इतिहास' सोळाव्या शतकात भारतात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना व्यापारासाठी झाली. कंपनीने आपला पाया भारतात अल्पावधीतच रोवला याच काळात भारतात अनेक घडामोडी कंपनीने आपल्या बुध्दीच्या जोरावर घडवून आनल्या. व्यापारासाठी आलेली कंपनी पुढे कशा पध्दतीने भारतात राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन कंपनीने सन 1775 मध्ये सत्ता स्थापन केली यानंतर सन 1858 पर्यंत कंपनीने भारतावर राज्य केले. याच वर्षी कंपनीची भारतातील सत्ता संपुष्टात येऊन ती ब्रिटिश राजसत्तेच्या ताब्यात गेली. सदर लेकखकाने आपल्या पुस्तकात कंपनीच्या राजवटीच्या काळातील भारताचा राजकीय, सामाजिक, धार्मिक व प्रशासकीय इतिहास अस्लल स्वरुपात व योग्य मंथनाच्या आधारे मांडला आहे. माझ्या शोध प्रबंधासाठी कंपनीने सत्ता स्थापन्यासाठी केलेले कार्य तसेच कंपनीचे राज्य जाऊन ब्रिटिश सरकार कशा पध्दतीने स्थापन झाले याचा अभ्यास यात करण्यास मिळणार आहे.

1.7.2. शोध प्रबंध

19) कु. टी. ऊ. पाटील - 1992 - 'मराठयांच्या इतिहासात तुकोजी होळकरांची कामगिरी आणि त्यांचा काळ' - 1766 ते 1797 सदर शोध प्रबंधा मध्ये मराठी साम्राज्याच्या आधार स्तंभ असेले 'तुकोजी होळकर' यांनी मराठी साम्राज्य वाढवण्यासाठी आपले सर्व अयुष्य पान पनाला लावली होते. त्याच्या कार्याचा आढावा येथे घेण्यात आलेला आहे. त्याचे

मराठी दरबार (पुणे) येथील त्यांची असलेली निष्ठा त्यांच्या कार्यामुळे मराठी साम्राज्य एकनिष्ठ ठेवण्याचे काम केले मराठयी साम्राज्याचा शेवट होण्यास त्याच्या मृत्यु नंतर म्हणजेज सन 1797 पासून पुढे सुरवात झाली. ज्या पध्दतीने महादजी शिंदे, तुकोजी होळकर हायात होते तो पर्यंत मराठा दरबाराकडे कोणाची वर तोंड करून पाहण्याची इच्छा नव्हती. पण तुकोजी होळकर मृत्यु नंतर मराठयांची झालेली वाताहात राजकीय दुष्टया महत्याची ठरली आहे. माझा शोध कार्यासाठी सदर प्रबंधाचे प्रकरण सहा मध्ये पेशवा सवाई माधवराव यांचा मृत्यु सन 1795 मध्ये झाला यावेळी मराठी सत्तेची असणारी नाळ व एकत्रित असलेली सत्ता यांचा अभ्यास करण्यासाठी उपयोग होणार आहे.

20) Enid M. Fuhr, - 1994 - 'Strategy and Diplomcty in British India Under Marquis Wellesley: The Second Maratha War, 1802-1806', सदर प्रबंधात दूसरे मराठा ब्रिटिश युध्द हिंदूस्थानच्या इतिहासात महत्वाचे व सर्वात मोठे युध्द झाले या युध्दाच्या आधीच वसईचा तह होऊन मराठयानी आपेल सर्व स्वातंत्र्य गमावले होते. या युध्दात मराठयाचे असलेले शिंदे व होळकर हे मोठे आधार संस्थ नष्ट झाले. सन 1803 मध्ये शिंदे पराभूत झाले व होळकर सन 1805 मध्ये पराभव झाले यांचा पराभव कशा पध्दतीने झाला या युध्दा नंतर झालेली मराठा साम्राज्याची परिस्थिती यांचा अभ्यास या प्रबंधात केलेला आहे. ब्रिटिशाचा या युध्दात आसलेला सहभाग हा कशा पध्दतीने कुटनितीचा होता त्याच्या कार्याचा येथे आढावा घेतलेला आहे. यासाठी माझ्या शोधकार्यास हा प्रबंध मोठा अनमोल ठरणार आहे. मराठयांशी ब्रिटिशांचे असलेल संबंध व त्यावर मराठयांनी केलेले कार्य या सर्वचा येथे उपयोग होणार आहे.

21) रवि रंजन प्रसाद - 2003 - 'Maratha Sate Formation with Reference to Shinde and Holkar' ' सदर शोध प्रबंध हा मराठी साम्राज्याचे वाढते प्रभाव हे शिंदे व होळकर यांचा मराठी साम्राज्याच्या विस्तारत असलेला मोठा सहभाग, मराठी राज्याला जाट, शीख तसेच अफगाणिस्थान मध्ये मराठयाची भूमिका या सर्व गोष्टी पारपाडण्याचे काम शिंदे व होळकर, भोसले या मराठी साम्राज्याच्या महान घरण्यानी केली आहे. मराठी साम्राज्य

विस्तारासाठी केलेल्या प्रयत्न, वाढवत गेलेले मराठी साम्राज्य यासाठी मोठा हातभार जहागिरदार, सरमजाम, सरदार इ. लावला आहे. शिंदेचे उत्तरेकडे वाढत चाललेले मुलूख, त्याच पध्दतीने त्याचे सैन्य, आर्थिक परिस्थिती तसेच होळकर व भोसले याचीही अशीच स्थिती होती यामुळे मराठी साम्राज्यात परिवर्तन होत गेले. पुण्यातील पेशव्याच्या अधिपत्या खाली वाढवलेले मराठी राज्य, होळकराचे मध्य भारतात असलेले प्रभूत्व त्यासाठी त्यांचे स्थानिक संबंध तसेच शिदे व होळकर या दोघाच्या परिसीमांचा उपयोग माझ्या प्रबंधासाठी होत आहे.

22) मंजुशा मुसमाडे - 2009 - Development of Entrepreneurship in Western India (Maharashtra) in British Rule (1850- 1947), ब्रिटिश काळातील अर्थिक क्षेत्रात झालेली प्रगती कंपनी व कंपनी नंतर ब्रिटिश सरकार यांनी महाराष्ट्रातील व्यापार, उदयोग यांनी कशा प्रकारे प्रभावित केले यांचा अभ्यास केला आहे. सदर संशोधनात आर्थिक इतिहास कशा पध्दतीने ब्रिटिशाच्या काळात झाला यावर लक्ष केंद्रीत केले आहे. भारतीय विकास करण्यासाठी आर्थिक भावणा जागृत करण्याचे काम केले. भारतीय लोकामध्ये एक नविन दृष्टिकोण निर्माण करण्याचे काम या प्रबंधातून केले आहे. त्याच दृष्टीने या प्रबंधा मुळे मला ब्रिटिश व मराठे यांच्यातील आर्थिक संबंधाचा व मराठयां मध्ये झालेला बदल होय तसेच महत्वाचे म्हणजे ब्रिटिश काळात सन 1850 नंतर ची परिस्थिती खास करून आर्थिक निर्माण झाली याचा अभ्यास करण्यासाठी होणार आहे.

23) हवालदार तानाजी - 2010 - 'महादजी शिंदे आणि मराठी सत्ताः एक नवीन दृष्टिक्षेप', महादजी शिंदे यानी उत्तरेत मराठयाचे वाढवलेली सत्ता त्याच बरोबर दक्षिणेत पुणे दरबारात असलेला त्यांचा दरादा, नाना व महादजी यांचे कडू, गोड संबंध तसेच शिंदेनी ब्रिटिशांना आपल्या राजकात कधिच हस्तक्षेप करून दिला नाही. महादजी यांचे माधवराव पेशवे यांच्याशी संबंध हे नाना फडणीस यांच्या पेक्षा अतिशय प्रेमाचे होते. मराठी साम्राज्याच्या पानिपत नंतर ढासळत चाललेला पाया नवीन उम्मीदेने उभारण्याचे काम शिंदेनी केले. महादजी शिंदे यांचा जिवनपट या शोधातुन दाखवण्याचे कार्य केले आहे. त्या नुसार पुण्याचा व शिंदे

घराण्याचा असलेला संबंध हा महादजी हायात असे पर्यंत चांगले होते हे दर्शवण्याचे काम या शोधात दिसून येते. माझ्या शोधा साठी शिंदे हे पहिल्या पासून ब्रिटिश विरोधी होते त्यानी ब्रिटिशाना कधीच भिक घातली नाही. त्याच प्रमाणे पेशवा सवाई माधवराव यांच्या कार्यात महादजीचा मोलाचा वाटा आहे. शिंदे शेवट पर्यंत पुणे दरबारी एक निष्टच राहिले. नानाच्या स्वभामुळे शिंदे आपले स्थान पुण्यात निर्माण करण्याचा प्रयत्नात होते त्यामुळे मोठे अनिष्ट पुढे ओढवले होते. या संशोधना मुळे पुढली काळात ब्रिटिशानी काशा प्रकारे बलाढ सत्तेचा छळ केला दिसून येते. त्याच पध्दतीने करवीरकर यांच्यातील व महादजी शिंदे याच्या संबंधात येथे उल्लेक आहे यामुळे शिंदे घराण्याचा अढावा येथे मिळतो.

24) अविनाश सोवनी - 2011 - 'Maratha Town and City Planning with reference to The Systems of Village Development During 17th and 18th Centuries', सतराव्या व आठराव्या शतकातील म्हणजेच पेशवे काळातील पुण्याचे महत्व व सातारा शहरांची असलेली व्यवस्था यात झालेला बदल यानंतर आठराव्या शतकात पुणे शहराला महत्व प्राप्त झाले याचे कारण पेशवा स. माधवराव व नानासाहेब पेशवेनी केलेल बदल म्हणताचा मानला जातो. सातारा शहराचे महत्व कमी होत गेले. पेशव्यानी विस्तार केलेल्या पुण्याचा विकास ज्या पध्दतीने केला आहे, गाव विकास व प्रशासन यांच्यातील असणारा योग्य ताळमेळ या पध्दतीने विकासाचे नियोजन केले आहे. हा सर्व बदल एकोनिसाव्या शतकात ब्रिटिश राजवटीत झाला आहे. जुन्या पध्दती बदलून नवीन पध्दती वापरात आल्या त्या आजही अस्तित्वात आहे. मराठा राज्य खालसा झाल्यावर मराठा प्रांतात आपली व्यवस्था लागु केरण्यात आली. माझ्या संशोधनासाठी मराठी प्रांतात झालेला राजकीय दुष्टया, पुणे व सातार यांच्या वैभवात, कशा पध्दतीने बदलत गेले याचा अभ्यास करण्यास मिळणार आहे.

25) कल्पना शाहु - 2012 - 'Maratha-Rajput Relations During The Eighteenth Century' उत्तर भारतातील मराठी साम्राज्य ब्रिटिशांना विरोध करण्यासाठी सर्वात पुढे होते. त्यात शिंदे, होळकर ह्या सरदारानी उत्तरेत असलेली पकट महत्वाची होती. मराठी राज्य कशा

प्रकारे विस्तार करत गेले त्यात उत्तरेत रजपुत यांच्याशी जास्त संबंध प्रस्तपिक झाले आहे. राजस्थान मध्ये मराठयानी आपली प्रशासन पध्दती, व सैनिक व्यवस्था, शत्रुत्व कमी करण्यासाठी मराठयानी केलेला प्रयत्न, मराठयानी आपले साम्राज्य कशा पध्दतीने वाढवले तसेच पानिपतच्या युध्दाच्या पराभवा नंतर कशा पध्दतीने टिकवले, मराठयांचे वाढलेले वर्चस्व नंतर यात झोला बदल यामुळे विरोध होण्यास स्थानिक घटक कारणीभूत ठरले. त्यात रजपुत यांचा सहभाग होता. माझ्या शोध कार्यासाठी विशाल मराठी साम्राज्याचा दरादार मोठा होता शेवट होण्यासाठी त्यानी आपले संबंध ऐतद्वेशीयांशी पुढे कशा पध्दतीने ठेवले यासाठी हा प्रबंध महत्वाचा आहे.

26) अशोक ज्ञा. पाटील, - 2013 – 'पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाची साधने आणि सांस्कृतिक जीवन प्रवाह' - 1720 - 1818, पेशव्याच्या इतिहासात महत्वाचे म्हणजे त्याच्या काळात झालेला विकास त्याच पध्दतीने पेशव्याचे सत्ता तसेच मराठी सत्ता लयास जाऊ पर्यंत मराठयाचा सामजिक जीवनात कशा पध्दतीने अस्थित्व होते हे सर्व सदर प्रबंधात पाहवयास मिळते. ज्या पध्दतीने राजकारणात बदलत असते तसीच परिस्थिती बदलते आणि त्याच पध्दतीने समाज्याची विचार करण्याची शमता बदलत असते. परिवर्तनाच्या अधिची परिस्थिती कशा पध्दतीने बदलत आली होती. हे माझ्या संशोधनात मला उपयोग पडणारी गोष्ट आहे. त्यानुसार पेशव्याच्या काळात सन 1818 पर्यंत ही परिस्थिती अशीच होती पण बदल झाला तो नंतर यामुळे बदल झाला हे नक्की आहे.

1.7.3. शोध पत्रिका -

27) एस. एम. दहिवासम - 1995 - 'Consolidation of Maratha Dominance in Maharashtra' मराठा साम्राज्यच्या सिमा तसेच एकोनाविसाव्या शतकातील मराठी साम्राज्य सिमा, त्यात असलेले प्रभूत्व व मराठा राज्यात असणारे ब्रम्हाण वर्गचे वर्चस्व, कोल्हापुर संस्थानच्या वर्चस्वासाठी सूरू असलेले प्रयत्न यामुळे मराठी साम्राज्य विसाव्या शतकात सामाजिक बदल घडून मराठी साम्राज्यात झालेले परिवर्तन या मध्ये एक नवीन ओळख निर्माण

झाली आहे. परिवर्तनाची एक लाट या लेखातून दिसून येते यात सामाजिक, धार्मिक, राजकीय इ. परितर्वनातुन बदल दिसुन अला आहे.

28) मिचेल मनन - 2005 - Turbulent Delhi : Religious Strife, Social Tension and Political Conflicts, 1803 - 1857, दौलतराव शिंदे यांच्या मार्फत मराठयांच्या अंमल दिल्लीच्या तखत्तावर चालु होता. मोगल बादशहा हा पुर्ण पणे मराठयांच्या नियंत्रणाखाली होती. 1803 मध्ये मराठा व ब्रिटिश यांच्या युध्दात दौलतराव शिंदेचा पराभव करून ब्रिटिशांनी दिल्लीत मराठयांचा संबंध संपूष्टात अनला. त्यानंतर ब्रिटिशांनी दिल्लीच्या मुगल बादशहाला आपल्या नियंत्रणा खाली घेऊन त्यामार्फत आपला अमल सूरु केला. यानंतर उत्तरेकडील शिंदेचा व उत्तरेतील राजकारणाचा ब्रिटिशांनी केलेला बदल हे बदल तत्कालीन महाराष्ट्र व उत्तर हिंदुस्थान यातील फरकातून दिसुन येते.

29**) पटेर रोब - 2007 -** 'On the Rebellion of 1857: A Brief History of an Idea', सन 1857 च्या उठावात हिंदूस्थान मधील जनतेच्या राष्ट्रीय भावना जागृत होण्यास सुरवात झाली होती. या उठावाचे मोठे नरसहार कानपूर येथे झाले यावेळी हिंदूस्थानाची सत्ता विखुरलेली होती यामुळे पुढे सत्ता केंद्र बिंदू निर्माण झला. सन 1857 नंतर खाया अर्थाने एक छत्राखाली अमल येण्यास सुरवात झाली. आणि आपले राजनेतीक, सामाजिक, हक्काजी जानीव होण्यास सुरवात झालेली दिसते. यामुळे पुढे स्वातंत्र्य लढयासाठी पोषक वातावरण निर्माण झाले.

30**) अरविंद गनाचारि - 2008 -** 'Imperialist Appropriation and Disciplining the Indian Mind (1857- 1917): Whose History?' , हिंदूस्थान मध्ये ब्रिटिश साम्राज्य जास्त दिवस टिकनार नाही एक दिवस आपल्याला येथून जावे लागणार या निर्णया मुळे ब्रिटिशानी हिंदूस्थानचा राज्यकारभार सुरू केला. ब्रिटिशानी एकोणाविसाव्या शतकात हिंदूस्थान मध्ये इंग्रजी शिक्षणाची सुरवात केली. आपली श्रेष्ठता व प्रभाव वाढवण्यासाठी त्यांनी हे सर्व करण्याचे ठरविले हाते. ब्रिटिशांच्या या विचाराने हिंदूस्थानात राजकीय स्वातंत्र्याची भावना

जागृत होण्यास सुरवात झाली. यामुळे बाहेरील राष्ट्रवादाची सर्व माहिती प्रकाशनात येण्यास सुरवात झाली. त्याचाच फायदा पुढे हिंदूस्थानच्या जनतेच्या राष्ट्रभावना जागृत झाल्या.

31) मनिस डी. फारूकि - 2009 - 'At Empire's End: The Nizam, Hyderabad and Eighteenth-Century India', निजाम साम्राज्याचा म्हणजे दक्षिणेत निजामाच्या मृत्यु नंतर त्याचा उत्तराअधिकारी यांनी निजाम साम्राज्य टिकवण्या ऐवजी त्याचा नाश केला. मोगल साम्राज्याचे फैसले झटकून टाकनारा निजाम आपले निर्णय स्वतंत्र घेण्यास मोकळा झाला. त्याच्या स्वतंत्र निर्णया मुळे त्याच्या मृत्यु नंतर राज्यावर मोठे गंडांतर आले. निजाम याचे निर्णय, त्याने केलेला राज्य कारभार, तसेच त्याच्या मृत्यु नंतर त्याच्या उत्तराधिकारी यानी निजामशाही संपवली यात निजामाच्या धोरणाचा मोठा सहभाग होता हे या लेखातून सांगण्यात आले आहे.

32) तिर्थंकर रॉय - 2010 - 'Rethinking the Origins of British India: State Formation and Military - Fiscal Undertakings in Eighteenth Century world Region', ब्रिटिशांनी भारतावर आपली हुकूमत गाजवण्यासाठी सुरूवात केली ती आठराव्या शतकात कारण, त्यानंतर येथील परिस्थितीचा घेतलेला फायदा, विशाल अशा हिंदूस्थानाचा ताबा घेण्यासाठी त्यांनी आपल्या तैनाती फौजेच्या जोराव सुरवात केली. यावेळी ईस्ट इंडिया कंपनीचे जाळे मोठया प्रमाणत वाढलेले होते. येथील संस्थानिकाशी केलेले करार यांना फार महत्व आहे हे करार करताना संस्थान महत्वाचे मानले होते. सैन्याजवळ असलेली आधुनिक पध्दती दुसया व तिसया मराठा ब्रिटिश युध्दात दिसून आली आहे. यामध्ये कंपनीची भूमिकाच महत्वाची दिसून येते हिंदूस्थान आपल्या ताब्यात घेतल्या नंतर सन 1818 नंतर जवळ-जवळ संपूर्ण हिंदूस्थान कंपनीच्या ताब्यात गेला होता. तेथे ब्रिटिशांनी केलेले नियोजन, त्यानंतर राज्याचे गठण या सर्व गोष्टीचा माझ्या संशोधनासाठी उपयोग होणार आहे.

1.8. संदर्भ सूचि

1) डॉ. वि. गो. खोबरेकर, 1988, महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड भाग - 2, 1707 - 1818, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

2) सदशिव आठवले - 1990 - 'सरदार बापू गोखले' श्री. विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे - 30

3) प्रमोद ओक, 1991, पेशवे घराण्याचा इतिहास, अनिरुध्द अनंत कुलकणी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

4) Stewart Gordon, 1993, 'The Marathas' 1600-1818 (The New Cambridge History of India) II. 4, Press syndicate of the Cambridge university press 1993, New York, First Published 1993

5) डॉ. समुन वैद्य, 1994, अखेरचा पेशवा, प्रगती पकाशन, 87 अ, धंतोली, नागपूर - 12

6) डॉ. वि. गो. खोबरेकर, 1994, **'महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे'**- 1818 ते 1884, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

7) राठोड एन. जी. 1994, "The Great Maratha Mahadji Scindia'. Sarup and sons, 4740/23, Ansari Road, Darya Ganji, New Delhi-02

8) प्रमोद ओक, 1999, एलफिन्स्टन, राजहंस प्रकाशन 1025, सदाशिव पेठ, पुणे - 30

9) ह. म. घोडके, 2000, महाराष्ट्रगाथा, राजहंस प्रकाशान 1025, सदाशिव पेठ, पुणे - 30

10) डॉ. अ. रा. कुलकर्णी - 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन,1025, सदाशिव पेठ, पुणे - 30

11) आर. एस. चौरसिया - 2004 - "History of the Marathas,' Atlantic Publishers & Distributors, B-2, Vishal Enclave, Opp. Rajouri Garden, Delhi - 110027

12) य. ना. केळकर, 2004, 'भूतावर भ्रमण' - एतिहासीक लेखसंग्रह, डायमंड पब्लिकेशन्स, 1255, सदाशिव पेठ, लेले संकुल, निंबळकर तालीम चौक, पुणे - 30,

13) डॉ. अ. रा. कुलकर्णी - 2007, 'मराठा आणि महाराष्ट्र' डायमंड पब्लिकेशन्स, 1691 सदाशिव पेठ, पुणे

14) य. ना. केळकर - 2008 - 'ऐतिहासिक पवाडा' मराठयांचा काव्यमय इतिहास, डायमंड पब्लिकेशन्स, 1691 सदाशिव पेठ, पुणे - 30

15) ग. ह. खरे, अ. रा. कुलकर्णी, 2010, मराठयांचा इतिहास खंड-3, महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे- 30

16) गोविंद तळवळकर.2005, 'मंथन'. मौजे प्रकारशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई - 04

17) डॉ. माधुरी मंडलिक - 2002 , 19 व्या शतकातील महाराष्ट्रातील हिंदू धर्म सुधारणा चळवळ, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

18) डॉ. अनिल कठारे - 2001, आधुनिक भारताचा इतिहास 1857 ते 1950, प्रशांत पब्लिकेशन, पुणे.

19) कु. पाटील टी. ऊ.- 1992 - 'मराठयांच्या इतिहासात तुकोजी होळकरांची कामगिरी आणि त्यांचा काळ' - 1766-1797 पी-एच. डी. शोध प्रबंध, सदर, समाज विज्ञान शाखा, अमरावती विद्यापीठ, अमरावती.

20) Enid M. Fuhr, - 1994 - 'Strategy and Diplomcty in British India Under Marquis Wellesley: The Second Maratha War, 1802-1806', Thesis Submitted in Doctor of Philosophy in The Departmen of History, M.A.,King's College, University of London.

21) रवि रंजन प्रसाद - 2003 - 'Maratha Sate Formation with Reference to Shinde and Holkar', Doctor of Pholosophy, Thesis Submitted to Centre for Historical Studies School of Social Sciences Jawaharlal Nehru University, New Delhi.

22) मंजुशा मुसमाडे - 2009 - 'Development of Entrepreneurship in Western India (Maharashtra) in British Rule' (1850- 1947), Doctor of Pholosophy, Thesis Submitted to Department of Economics, Pune University, pune

23) हवालदार तानाजी - 2010 - 'महादजी शिंदे आणि मराठी सत्ताः एक नवीन दृष्टिक्षेप, पी-एच. डी. पदवीसाठी सादर प्रबंध, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

24) अविनाश सोवनी - 2011 - "Maratha Town and City Planning with reference to The Systems of Village Development During 17th and 18th Centuries", Doctor of Pholosophy, Thesis Submitted To Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.

25) कल्पना शाहु - 2012 - 'Maratha-Rajput Relations During The Eighteenth Century', Doctor of Pholosophy, Thesis Submitted to Department of History, University of Delhi.

26) अशोक ज्ञा. पाटील, - 2013 - ‘पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाची साधने आणि सांस्कृतिक जीवन प्रवाह - 1720 - 1818, पी-एच. डी. पदवीसाठी सादर प्रबंध, इतिहास विभाग, टिकळ महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

27) एस. एम. दहिवासम - 1995 - 'Consolidation of Maratha Dominance in Maharashtra', Economlc and political wekly, Vol. 30, No. 6, pp. 336-342

28) मिचेल मनन - 2005 - Turbulent Delhi : Religious Strife, Social Tension and Political Conflicts, South Asia: Journal of South Asian Studies, n.s. Vol.XXVIII, no. 1, April, 2005


29) पटेर रोब - 2007 - 'On the Rebellion of 1857: A Brief History of an Idea', Economic and Political Weekly, Vol. 42, No. 19, pp. 1696 - 1702.

30) अरविंद गनाचारि - 2008 - 'Imperialist Appropriation and Disciplining the Indian Mind (1857- 1917): Whose History?' , Economic and Political Wekly, Vol.43, No. 5 , pp. 77-87.

31) मनिस डी. फारूकि - 2009 - 'At Empire's End: The Nizam, Hyderabad and Eighteenth-Century India', Modern Asian Studies, Vol. 43, No. 1, Expanding Frontiers in South Asian And World, pp. 5-43

32) तिर्थंकर रॉय - 2010 - 'Rethinking the Origins of British India: State Formation and Military - Fiscal Undertakings in Eighteenth Century world Region', Department Of Economic History London School of Economics Houghton Street London, UK, WC2A 2AE Working Paper No 140/10.

मराठा साम्राज्य
(इ.स. १७९५)



प्रकरण दुसरे

खडर्याची लढाई आणि गृहकलह

2.1. प्रस्तावना

पानिपतच्या लढाई नंतर मराठयाच्या सत्तेला मोठया प्रमाणात शह बसला गेला याच वेळी मराठी राज्याचा पंतप्रधान नानासाहेब पेशवा यांचा मृत्यु झाला नंतर त्यांचा मुलगा पेशवा थोरला माधवराव पेशवाईच्या गादीवर आले त्याने पुढे हळूहळू सर्व कारभार आपले काका रघुनाथराव (राघोबादादा) यांच्या हातातुन आपल्या हाता घेतला. पुढे थोरले माधवराव पेशवे यांच्या मृत्यु नंतर त्यांचा मुलगा नारायणराव पेशवा झाला पण पेशवा नारायणरावाच्या खुन रघुनाथराव यांच्या सांगण्यावरुन झाला या कारणाने रघुनाथराव यांची कारकीर्द संपली होती. रघुनाथराव यांनी पेशवा पदासाठी ब्रिटिशांची वारंवार मदत घेत आले होते. पेशवा नारायणराव यांच्या मृत्युनंतर त्यांचा मुलगा सवाई माधवराव मराठीराज्याच्या बारा मुसूद्दीच्या कारभारा मुळे पेशवे बनले. सवाई माधवर पेशवाईच्या गादीवर आले पण अल्पवयीन असल्या कारणाने मराठी साम्राज्याचे धुरंदर, मुसूद्दी, तसेच बाराभाई मधील श्रेष्ठ कारभारी मराठी राज्याचे दिवान नाना फडणीस कारभार पाहत असे. नानानी पेशवा सवाई माधवर यांना पेशव्याची वस्त्रे ही अवघी 40 दिवसाचे असताना देऊन सर्व कारभार बाराभाई मंडळी संभाळत असे अर्थात हा कारभार नाना फडणीस संभाळत असे.

मराठयांच्या साम्राज्यात सन 1795 हा काळ अतिशय महत्वाचा मानला जातो. याच काळात मराठी साम्राज्य दोन धारेवर उभे होते. सन 1795 वर्ष मराठी साम्राज्यासाठी प्रथम चांगले गेले व नंतर मराठी साम्राज्याच्या राजकारणात वाईट दिवसाला सुवात झाली. हैद्राबादचा निजाम आपले स्वातंत्र्य व सत्ता वाढवण्यासाठी हातपाय हलवण्यास सुरवात केली त्याचाच परिणाम म्हणजे पुढे सन 1795 मध्ये निजाम व मराठे यांच्यात खडर्याची लढाईत झाली यांच्यातील संबंध चांगलेच विकोपाला गेले व त्यातुन पुढे खडर्या सारखे युध्दाचे प्रसंग निर्माण झाले. खर्डा येथील लढाई मध्ये मराठे व निजाम यांच्यातील संबंध पुर्ण पणे विकोपाला गेले या लढाईत मराठयाकडून आपल्या मालकाच्या

मदतीला सर्व मराठा साम्राज्यातील सर्व सरदार एक होऊन एका उम्मीदीने आपल्या राज्यासाठी लढाई केली यात मराठयांना पुर्ण पणे यश मिळाले.[1] निजामाचे यावेळी पुर्ण पणे पानिपत झाले. खर्डा येथील लढाईला मराठयांच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे कारण म्हणजे, मराठयानी या लढाईनंतर एक पण लढाई पुढील काळात जिंकली नाही. उलट आपले सर्वस्व दूसयाच्या ताब्यात देऊन मात्र मराठी राज्याचा शेवट केला.

खडर्याच्या मोहिमेस अभूतपूर्व म्हणावे लागेल इतिहासात ही पहिली आणि शेवटी लढाई आहे की, या लढाईत सर्व मारठी सरदार एक दिलाने व एक उम्मीदीने मराठी साम्राज्यसाठी एकवटले आणि या लढाई नंतर कधीच मराठी साम्राज्याचे हे सर्व जहागीरदार, सरदार, सरमजाम वर्ग एकत्र आला नाही असा योग आला नाही किंवा तो येऊ दिला नही. खर्डाची लढाई पेशवा सवाई माधवराव यांनी प्रत्यक्ष भाग घेतलेली पहिली आणि अखेरची स्वारी आहे. या लढाई नंतर पुढे काही महिण्यात पेशवा सवाई माधवरा यांचे अल्पक्षा आजाराणे निधन झाले. पेशवा सवाई माधवराव यांना मुले नसल्या कारणाने पुढे पेशवच्या वारसाचा प्रश्न निर्माण झाला हे एक कारण मराठी साम्राज्याचा शेवट होण्यासाठी महत्वाचे मानले जाते. पेशवाई मुळे मराठी साम्राज्य लयास जाण्यासाठी पुढे जो गृहकलह निर्माण झाला यांचा कोणी विचार सुध्दा नसेल केला.

सावई माधवर यांचा मृत्यु मुळे मराठी साम्राज्य पोरके झाले. ज्या पध्दतीने बलाढ अशा मोगल साम्राज्यात शेवटच्या काळात सुध्दा वारसा प्रश्न निर्माण झाला होता तो आता मराठयाच्या साम्राज्यत निर्माण झाला. मराठी दौलतीची जबाबदारी नाना फडणीस यांच्यावर आली पण पुढे ‘नानाच्या वैराचा गड्डा जो दुसरा बाजीराव तोच गादीवर बसण्याचा प्रसंग आल्याने सर्वच उलटे सुलटे होणार हे कळून चुकले हाते.’ नानाच्या मते दु. बाजीरावार हा आपल्या वैराजा मुलका हा आपल्याला त्रास दिल्यावाचून राहणार नाही हे नानानी ओळखले होते. त्यासाठी पुढे मराठा इतिहासात नाना व दु. बाजीराव यांना दोघानाही लवकरच इंग्रजांची हात मिळवण्याची वेळ आली होती.[2] या सुमारास बाजीराव याच्या मुळे पुणे दरबारात गृहकलह वाढत गेला पेशव्याच्या गादीवर वारसाचा प्रश्न

ऐरणीवर आला. त्यासाठी पुन्हा मराठी साम्राज्याचे सरदार दौलतराव शिंदेनी पेशवा दरबारत आपला हात घालण्यास सुरवात केली आणि तेच नाना फडणीस यांना सहन झाले नाही. गृहकलहाच्या ज्वाला उसंबळून वाहू लागल्या.

प्रथम तर नानानी बाजीरावास पेशवा बनवण्यास विरोध केला कारण रघुनाथराव या आपल्या वडीलांनवानीच मुलगला असणार हे नानाच्या मनात चांगलेच घर करून राहिले होते. बाजीराव व नाना यांच्यात बाहेरील वारस नको यामुद्यावर दोघामध्ये चांगले वाद झाले हा वाद मोडण्या साठी शिंदेना उत्तरहिंदूस्थान पुण्यात यावे लागले तेव्हा पुन्हा नानानी विषय बदलून पेशवा घराण्याचा वारस म्हणजेच दुसरा बाजीराव यांना नाना पेशवा बनवण्यास तयार झाले. मराठी सत्तेच्या उमीदीच्या काळात तिला खाली खेचण्याचे काम मराठयांच्या बलाढया अशा साम्राज्याचे धुरंधर सरदारानीच केले. त्यात महत्वाचे काम केले ते म्हणजे नाना, दौ. शिंदे, यशवंतराव होळकर यांच्या मधील आप-आपसातील भांडन यामुळे मराठी साम्राज्याला मोठे तडे गेले.

2.2 पेशवे व निजाम यांच्यात संघर्षाची थिनगी -

मराठी राज्याचे बलाढ सरदार महादजी शिंदे व पुणे दरबारातील नाना फडणीस यांचे संबंधात थोडे बहूत बिगाड झाला होता पण ते पुन्हा पुर्व पदावर येण्यास सुरूवात झाली होती. नाना व महादजी यांच्यात सख्य झाल्याने पुणे दरबारने आता आपले साम्राज्य वाढवण्यासाठी सुरवात केली. त्यासाठी त्यांनी मराठयाचा शेजारी असलेल्या निजाम दक्षिणेतील हैद्राबाद येथील मोगलांचा सुभेदार होता. मराठयांना दक्षिणेतील सहा सुभ्यांचे चौथाई व सरदेशमुखी वसुलीचे अधिकार छत्रपती शाहु यांच्या काळा पासून होते. निजाम आपल्या ताब्यातील प्रदेशाची चौथाई आणि सरदेशमुखी मराठयांना सुखासुखी देत नव्हाता, यामुळे मराठयांनी निजाम यांना अनेक वेळा युध्दांत पराभव करून त्याच्यावर थकित रक्कम वसूली करण्याची बाकी राहिली होती. निजामाला प्रत्येक वेळा ती देण्यासाठी मराठी मंडळी तगादा लावत असत पण निजाम ते देण्याची टाळाटाळ करत यात पुढे ती रक्कम वाढतच चालली होती. चौथाईची बाकी तीन कोटी रुपये झाल्याने निजाम यास कळवले असता त्याने हिशेबात गोळ झाला असल्याचे सांगुन त्याने ती धुडकावून

लावली. मराठे जसी जसी संधी मिळेल तसी त्याच्याकडून थोडी-थोडी बाकी वसुल करत असे, म्हणून मराठे व निजाम यांचा हिशेबाचा वाद नेहमी चाले. सन 1794 त नानाने निजामाकडे किती येणे बाकी आहे याची यादी करुन ती त्याकडे पाठविली होती. याच दरम्यान मराठयांचे दोन सरदार महादजी शिंदे व हरिपंत फडके यांच्या मृत्यु झाला. यानंतर मात्र निजाम आपले मराठी साम्राज्या विषयी असलेले विरोध अनखिनच प्रखर केले तो मन मानील त्या पध्दतीने वागु लागला. निमाजाने मनात मराठया मध्ये पहिल्या सरखा जोर राहिला नाही असे ठाम धोरण करून घेतले होते. निजाम व मराठे यांची सत्ता व सामर्थ्य यांची तुलना मनात आणली असता दोन्ही बाबतीत मराठेच वचरढ आहेत हे दिसत होते. कोणताही अंदाज न घेता निजामने नाना फडणीस यांनी पाठवलेली थकित रक्कमेच्या यादीस बेपर्वाईचे उत्तर दिले. त्यातच निजामाचा दिवाण मुशीर उल्मुल्क यांने तर ''पेशव्यास आम्ही लंगोटी नेसून लोटा घेऊन काशीस जावयास लावूं'' अशी धमकी दिली. यामुळे प्रकरण चिरडीस गेले व युध्द स्थिती उपस्थित झाली.[3]

निजाम दिवान मुशीर उल्मुल्कच्या या बेताल वक्तव्यामुळे मराठयाना चांगलाच राग आला. मराठयानी निजामकडे आपली थकलेली चौथाईची केलेली मागणी हे एक निमित झाले. मराठयांची मागणी पुरी करणे हे निजामच्या दृष्टीने काही अवघड गोष्ट नव्हते. परंतु निजामाला देखील चौथाईच्या प्रश्नाचा एकदा सोक्षमोक्ष लागावा असे वाटत होते. मराठे व निजाम संघर्षाचा जवळ जवळ 75 वर्षाच्या कालखंडात मराठयांच्या दरबारात निजामाचा कायमचा बंदोबस्थ करावा असा एक गट तयार झाला होता. मुशीर उल्मुल्क हा निजामाच्या दरबारातील वजीर यावेळी निजामाच्या दरबारी मुशीरचे वजन चांगल्या प्रकारे होते. मुशीर दिवाण हा निजामशाहीचा प्रखर अभिमानी होता. त्याला मराठयांना नेस्थनाबूद करावे असे वटू लागले हाते. मुशीर यांच्या अंगी नाना फडणीस यांच्या सारखी मुसूद्दी व प्रखर कर्तव्याची कमी होती. तो फक्त बडबड करत असे महत्वकांक्षेची व कर्तत्वची मोठी आवश्यकता लागते ती निजाव व मुशीर या दोन्ही व्यक्ति मध्ये नव्हती. भांडणात निजामाचा काही तरी हेतु, स्वार्थ असल्याचे स्पष्ट होत होते. सन 1794 मध्ये निजाम यांच्या मुलाचे लग्न होते तेव्हा 'निजामाने पेशव्याला लग्न समारंभात

आपण स्वःत यावे असे अमंत्रण पाठविले होते आपण यावे म्हणजे सर्व वादावर चर्चा करू असे कळवले होते.' पण ही गोष्ट पेशव्याने मुंजूर केली नाही. म्हणजेच नाना फडणीस यांनी या गोष्टीला मंजूरी दिली नाही. नानानी निजामासी थकित रक्कमे संदर्भात बोलणी करण्यासाठी पाठवलेला वकिल 'गोविंदराव काळे' यांनी सर्वतोपरी दोघाच्या वादाचे हे प्रकरण मिटवण्यासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न चालवले होते. पेशव्यानी हिंशेबाजी यादी पाठवल्यावर मुशीर हा गोविंदराव काळे याला उधाड पणे म्हणला की, पेशव्यानी आम्हास येथे येऊन हिसेब समजाऊन सांगावा, यात आम्हाला काहीच समजत नाही, नाही तर नानानी स्वःत येऊन समाजाऊन सांगावे. गोविंदरावने नाना येणे शक्य नाही असे सांगितल्यावर मुशीर मोठया खोडसळ पणाने म्हणला नानास येथे आणून दाखवतो. मुशीरची भाषा म्हणजे युध्दाची तयारी आसल्याचे मराठयाच्या मनात नक्की झाले होते.[4] मराठे निजामशाही आपल्या ताब्यात ठेवण्याचे प्रयत्न करत होती. मुशिर याने मराठा साम्राज्य नष्ट करण्याची लालसा मनात धरली होती. एकीकडे मराठयां मध्ये नाना फडणीस यांनी निजामशाही मराठयाच्या ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न चालवले होते. हे दोन आपआपले स्वराज्य हिताचे समकालीन पुरुष एकमेकांचे पक्के वैरी बनले होते. मराठाचे उत्तरेत चांगल्या प्रकारे बस्तान बसल्या मुळे मराठयांची साम्राज्य विस्ताराच्या सिमा वाढत होत्या, व बादशहाकडून पेशवा सवाई माधवराव यांना 'वकील-इ-मुल्मक', 'मुतालिक' व 'मीरबक्षी' हे सन्मान मिळाल्यामुळे निजाम मोठया प्रमाणे मराठयाचा राग-राग करु लागला होता.[5]

पुण्यात नाना फडणीस व उत्तरहिंदूस्थानात मराठ्यांचा सरदार महादजी शिंदे या दोन नेत्यानी मराठयांच्या सत्तेची ताकद मोठया प्रमाणात वाढवण्याचे काम केले त्यांनी सत्ता गगनाला नेऊन पोचवली होती. पण '12 फेब्रुवारी 1794 मध्ये महादजी शिंदे यांचा मृत्यु झाला'.[6] महादजीच्या मुत्युने मराठी साम्राज्यावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. मराठ्यांचे उत्तर हिंदूस्थानात असलेले सर्व धोरण संपुष्टांत येऊन दिल्लीतील मराठयांच्या वर्चस्वाला चांगल्याच प्रमाणे धक्का बसनार होता. महादजी शिंदे मरण पावल्यावर निजामास मराठयांवर युध्दकरण्याची हीच संधी आहे असे वाटत होते. महादजी शिंदे यांच्या

मृत्यु मुळे निजाम पेशवे वादाला वेगळें वळण लागले. मुशीरला महादजीबद्दलची वाटणारी भिती पुर्ण पणे संपली हाती. त्याचा वारस दत्तक पुत्र ''दौलतराव शिंदे अगदीच पोरसवदा होता या कारणा मुळे निजाम एकदम सुस्थ झाला होता. त्यातच त्याचा कारभारी 'आबा चिटणीस' यांच्या मार्फत दौलतराव शिंदे यांच्यावर व त्याच्या विचारांवर ताबा मिळविणे नाना यांना शक्य झाले. याचे दुसरे एक अंतस्थ कारण म्हणजे आबा चिटणीस व शिंदेचे अरब सेनानी व शिंदे दरबारी असणारे मुत्सद्दी यांच्यात असलेली चुरस हे होते. त्यामुळे आबा चिटणीस यांना नानाचा पाठिंबा आपल्या स्वतःच्या शिंदे दरबारात स्थिरतेसाठी मिळविणे गरजेचे होते. या गोष्टीमुळे नाना, पेशवा दरबारातील व शिंदे यांच्या चुरशीचा फायदा आपल्याला मिळेल अशी निजामाची जी चुकीची समजूत होती तीही आपोआपच मावळली.''[7] निजाम व पेशवे यांच्यातील तंटा विकोपाला जाण्यासाठी महत्वाची गोष्ट घडली ति म्हणजे, नाना व मुशीर या दोघांचा परस्पर असलेला व्यक्तिद्वेष तो द्वेष नसता तर प्रत्यक्ष वादाचे सर्व मुद्दे तडजोडीने मिटण्याजोगे होते. मुख्य मागणी चौथाईच्या रकमेची सर्वच्या सर्व रक्कम निजामाने लगेच दयावी अशी होती. ही मागणी पूर्ण करण्यास लढाईचीच जरूरी नव्हती. परंतु निजाम दरबारी असणारा दिवाण मुशीर यास कारभारावारून काढून त्याच्या जागी आपल्यास अनूकूल असा कोणीतरी गृहस्थ आणावा असे नानाचे म्हणने होते म्हणजेच निजामाच्या दरबारातील सर्व कारभार पुण्याच्या तालावर चालले असाच प्रयत्न होता. पुण्यात बोलणी करण्यास आलेला निजाम दरबारी वकिल 'मिर आलम' यास दिवानाने सांगितले कि 'नानाचे व माझे सख्य करून देण्याच्या प्रयत्नात तुम्ही पडू नये. जर नानाने सख्य करण्याचे ठरवले तर तुम्ही माघार घेऊ नये. यावेळी मिर आलम याने मुशीर यास कळवले कि, नाना तुमच्याशी सख्या जोडू इच्छित नाही. तसेच तुमचे नाव पण घेत नाही.[8]

निजाम आपल्या स्वर्थासाठीच ह्या गोष्टीचा विचार करत होता. चौथाईच्या वाटाघाटीत आपयश आले आणि लढाईचे सावट पुढे दिसु लागले होते. नानाने आपल्या मागण्या अगदी निःसंदिग्ध शब्दांत निजामाकडे कळविल्या होत्या आणि त्यापैकी मुशीर

उल्मुल्क याच्या बडतर्फीची मागणी निजामाकडून मान्य होणे अशक्यप्राय होती. मराठयाच्या निजामकडे मागण्या हया न्यायी स्वरुपाच्या व आग्रहाची होती तर निजामाची हटवादीपणाची होती. या परिस्थितीत वाटाघाटी चालु असताना दोन्ही पक्षाकडून युध्दाची तयारी सुरु केली होती.[9] निजाम व मराठे या दोन्ही सत्ता दक्षिणेत आपले-आपले आसन संभाळत होत्या निजाम केवळ दक्षिणेत आणि मराठे उत्तरेत व दक्षिणेत आपले राज्य वाढवू पाहत होते. त्यामुळे समान ध्येयाने प्रेरित झालेल्या या दोन सत्तांमधील अनिवार्य संघर्ष युध्दा शिवाय मिटणारा नव्हता युध्द हाच यातील शेवटा टप्पा होता.

हैदराबादचा प्रधान (दिवान) मुशीर मन मानेल तशा बोलत होता. मराठयांचा पेशवा, व कारभारी नाना फडणीस त्यांचा वेळोवेळी वाटेल ते बोलून आपमान करत असे. त्याच वेळी पुण्याचा कारभारी नाना शांत डोक्यांने आपल्या सैन्याची जुळवा-जुळव करीत होता आणि पुढच्या युध्दाचे बेत रचीत होता. मराठयांचे सर्वात बलिष्ठ सैनापती आणि सरदार महादजी शिंदे यांचा मृत्यु झाला तरीही मराठयांनी निजाम सारख्य प्रसंगाला तोंड देण्याची तयारी केली. हया प्रसंगी नानांची अद्वितीय बुध्दिमता आजपर्यंत कधीही नसेल इतक्या प्रखरतेने समोर आली. नानाचे मराठी साम्राज्यावर वर्चस्व आजपर्यंत केव्हाही नसेल ते इतक्या पूर्णपणे निदर्शनास आले. चारही दिसेला पसलेल्या विर्स्थिन मराठी साम्राज्याच्या दूरदूरच्या जहागिदारीतील हे सर्व सैन्य त्यांच्या शब्दाने एकत्र येऊ लागली. एकमेकांशी नेहमी तेढीने वागणारे मराठी मंडळाचे जहागिरदार वर्ग नानाच्या चातुर्याने एकरूप बनले.[10]

निजामाने दिलेल्या वसुलीच्या नकाराला पुढे युध्दात रुपांतर होणार हे नक्की झाले. निजाम आपला हेका सोडत नाही मराठे नमते घेत नव्हते आता युध्द होणार. यातुनच पुढे मराठे व निजाम यांच्यात अहमदनगर येथील खर्डा या ठिकाणी दोन्ही पक्षात संघर्ष निर्माण झाला. प्रत्यक्ष लढाई कशा पध्दतीने झाली या गोष्टीला येथे फारसे महत्व नसले तरी दोघांसाठी लढाई महत्वाची होती.


INDIA IN 1798
N
Kabul
Peshawar
AFGANS
R. Jhelum
R. Chenab
SIKHS
Lahore
R. Ravi
R. Sutlej
Multan
R. Indus
Delhi
Rampur
ROHILKHAND
NEPAL
UPPER DOAB
SINDHIA
R. Jumna
RAJPUTS
SIND
Ajmer
Jodhpur
R. Chambal
OUDH
R. Ganges
R. Gumti
R. Gogra
LOWER DOAB
Allahabad
R. Brahmaputra
R. Brahmaputra
Benares
BIHAR
MARATHA
HOLKAR
CONFEDERACY
GUJRAT
GAIKWAR
BENGAL
KATHIAWAR
R. Nerbudda
R. Tapti
RAGHUJI BHONSLA
OF
BERAR
Nagpur
Surat
Daman
Diu Is.
Salsette Is.
Bassein
Bombay
Kharda
R. Godavari
Poona
PESHWA
NIZAM'S
Hydrabad
TERRITORIES
NORTHERN SARKARS
R. Krishna
GOA
(Portuguese)
TIPU SULTAN
OF
MYSORE
Mangalore
R. Kaveri
COORG
BARAMAHAL
MADRAS
Cannanore
Calicut
SALEM
COCHIN
DINDIGUL
TANJORE
TRAVANCORE
CEYLON
Approximate Boundaries
British Territory
Approximate area surrenderd to the Marathas by the Nizam after Kharda

2.3. खडर्याच्या लढाईत मराठयांची कामगिरी -

खडर्याच्या लढाई सन 11 मार्च 1795 रोजी मराठे व निजाम यांच्या इतिहासात महत्वाची ठरली आहे. निजामाने या लढाई नंतर आपले डोके परत वर काढले नाही तो जे शांत बसला ते परत त्याने मराठयांचे कधीच नाव घेतले नाही. प्रत्यक्ष युध्द मैदानावर ही लढाई फाळकाळ झाली नाही महत्वाचे म्हणजे एकच दिवसात लढाईचा निकालात लागला. मैदानी दुष्टया जरी महत्वाची नसली तरी ही लढाई राजकीय दुष्टया फार महत्वाची मानले जाते. मराठी सत्तेत झालेले महत्व पूर्ण बदल हे खडर्याच्या संग्रमाना नंतरच उद्दभवले होते. निजामाचा कारभारी मशीर उल्मुल्क हा नाना फडणवीस यांचा कट्टर शत्रु असल्या कारणाने त्याने परकिय सत्तेसी हात मिळवणी केली. ब्रिटिश आपल्याला युध्दाच्या वेळेस मदत करतील अशी अपेक्षा निजामाला वाटत होती. मुशीर व निजाम यांच्या डोक्यांत ब्रिटिशांशी मैत्री करून मराठयांचे संपुर्ण साम्राज्य नष्ट करावे या विचाराचा तो होता. तसेच निजामाने मराठ्यांना असाह्य परिस्थितीत नमवून त्याचे वर्चस्व नष्ट करावे हेही त्याच्या डोक्यात सारखे घोळत होते. निजामाने ब्रिटिशाची मद्दत आपल्याला मिळावी म्हणून पूर्ण प्रयत्न चालु केले हाते. त्यात ब्रिटिशांचा आधिकारी गव्हर्नर जनरल जॉन शोअर याने आपल्या सर्व आधिकायाना मराठे व निजाम यांच्यात उदभलेल्या युध्दाच्या परिस्थितीत कोणत्याच पक्षात भाग घेनार नाही असे कळवले होते. ‘मराठयांकडून चालू असलेले प्रयत्नाने अंतिम टप्पा गाठला होता निजामाकडे बोलणी साठी गेलेले पेशव्याचे वकिल ‘गोविंद कृष्ण काळे’ व ‘गोविंदराव पिंगळे’ यांच्यातर्फे मराठे व निजाम यांच्यातील दुरावा दूर करण्याचे प्रयत्न केले पण त्या प्रयत्नाचा शेवट लढाईत झाला.’[11]

पुण्यात मराठा साम्राज्याचा करताधर्ता कारभारी नाना फडणवीस यांनी या लढाईत मोठया प्रमाणात निजामाला शह देण्याची तयारी केली होती. नानाने दौलतराव शिंदे, तुकोजी होळकर, बडोद्याचे गायकवाड व नागपूरचे भोसले ह्या सर्व वेगवेगळया प्रांतातील जाहगिरदार, सरदार वर्ग यांना निरोप धाडुन बोलवणे लावले होते. नानाच्या निरोपाने ही सर्व मंडळी हजर झाले नानाचे खास हस्तक ‘परशुरामभाऊ पटवर्धन’ यांना निजामा बरोबर युध्दाच्या तयारीची सर्व सुत्र दिलेली होती. स्वारीचे सर्व अधिकार सेनापती

म्हणून पटवर्धन यांच्या डोक्यावर भार दिला. त्यांच्यात मराठी साम्राज्याची महत्वाची मंडळी शिंदे, होळकर, भोसले ही स्वःत जातीने हजर होती. निजामा बरोबर लढाईत नाना फडणीस यांनी जातीने लक्ष घातले हाते. या संग्रमाच्या तयारीचे वाटप नानानी आपल्या बुध्दी कौशल्याने केले त्यात स्वःत पेशवा कडून पटर्वधन भाऊ व बाबा फडके असे दोन सरदार युध्दाचे नेतृत्वसाठी नेमले, दौलतराव शिंदे यांच्याकडून जिवबादादा व लखोबा हे दोन सरदार नेमले, त्यांच्याकडे मोठा फौज फाडा होता. या वेळी शिंदे यांनी काही पेंढारी यांच्या नेतृत्वाखाली फौज उत्तरेतुन पाठवली होते. नागपूनचे भोसले आपल्या बरोबर पंधरा हजार फौजेसह लष्कारात येऊन दाखल झाले. नाना यांची आज्ञा येताच दक्षिणेकडून पटवर्धन भाऊ आपले सैन्य घेऊन हजर झाले. त्याचबरोबर चिंतामणराव सांगलीकर, रघुनाथराव कुरुंदवाडकर, जनोबा गायकवाडकर, विठ्ठलराव मिरजकर, सदाशिवराव मंगळवेढेकर तसेच खंडेराव विठ्ठल विंचूरकर, रंगराव त्रिंबक राजेबहाद्दर, गोपाळराव पागे ही सर्व मराठी साम्राज्याचे छोटे मोठे सरदार आपले-आपले सैन्य छावण्याकरुन युध्दास तयार झाले. तसेच तुकोजी होळकर यांनी आपली मोठी फौज पाठवली होती युध्दाचा भडका उडताच प्रथम उभ्या सैन्यानी समोरून लढाई करावी असे ठरले. यावेळी मराठया जवळ अनेक मोठे-मोठे कर्तबगार मोहरे होते त्यात दौलतराव शिंदे, तुकोजी होळकर, रघुजी भोसले, स्वःत पेशवा सवाई माधवराव, नाना फडणीस ही आणि इतर दक्षिणेकडील सरदार, जाहगिरदार वर्ग ही सर्व मंडळी युध्दाच्या वेळी हजर होती. आपल्या राज्याच्या व मालकाच्या रक्षणासाठी एकत्र आलेली मंडळी मोठया आनंदात काही राग रोश नधरता युध्दासाठी तयार झाली होती.

दौलतराव शिंदे यांच्या बद्दल सुरवातीस कोणालाच खात्री नव्हती. पण तो एक दम घेऊन हजर झाला. शिंदेच्या आगमना मुळे निजामाकडील रेमूच्या गाडद्यांच्या सैन्याची भिती मराठी सैन्याला राहिली नव्हती. जर शिंदे नसते तर लढाईचे स्वरुप काय झाले असते याबद्दल सर्वाच्या मनात मोठी शंकाच निर्माण झाली असती.[12] नाना फडणीस मराठयांच्या राजकारणात एक प्रबळ व मुसूद्दी होता. म्हणून नानाला खुश ठेवण्यासाठी रघुजी भोसले यांनी आपले सैन्य घेवून अहमदनगर जवळ पेशव्याच्या सैन्यास येऊन दाखल झाला. निजाम विरूध्द युध्दात ‘विठ्ठल बल्लाळ’ कर्तबगार व युध्दात निपून असे सैनापति

यांनी या लढाईत मोठया शैर्याची कामगिरी दाखवली. योवळी पेशवे, नाना फडणीस, ब्रिटिशांचा पुणे दरबारी वकिल मॅलेट व निजामाचा आठ महिन्यापूर्वी बोलाचालीस आलेला वकिल मीर आलम याचे तंबू विचलनेच्या ठिकाणी होते. त्यांच्या रक्षणासाठी दहा हाजारावर फौज दैनात केलेली होती.[13]

'श्रीराम सदाशिव' हे जानेवरी 1795 च्या शेवटी लिहतात कीं, ''अष्टी, जामखेड, खर्डे व खेरीज ही लहान गांवे उजाड झाली. डाक बसवावयास वस्ती नाही. येथील मोगलाचे गांव जसी उजाड झाली. आणखी उजाड होत जातील. येथील कडेवळितांत, देवजी, गवळी या लोकांचे पेंढारी याणी मोठया प्रमाणात उपद्रव केला. माणसे मेली, ब्राम्हण बाटले, गावचे बाजार लुटले. त्यात शांका काडीमात्र नाही. या प्रसंगात राघोजी भोसले यांनी मानवतास या प्रांतात येऊन लाख रुपये खंडणी घेऊन पाथर्डीस वेढा घातला.'' यावरुन या लढाईच्या भागाची काय अवस्था झाली याची कल्पना येते.[14] आता युध्द अडळ होते निजाम पुण्याच्या पत्राची वाट पहात होता, पण गोविंदरावा काळे यांनी स्पष्ट सांगितले की, कूच करणे किंवा मुक्काम या विषयी आम्ही काहीच म्हणत नाही. आणि म्हणणारही नाही जशी तुमची इच्छा असेल तसे तुम्ही करावे. आमची कोणतीही अडकाटी तुम्हाला राहणार नाही. काळे पुढे म्हणतात पत्राचा जबाब तुमच्या पर्यंत येईपर्यंत नाबाबाचा (निजाम) मुक्काम तेथेच असावा अशी कोणतीच आज्ञा सरकारातून आम्हास आली नाही. आमचे निर्णयाची प्रतिक्षा तुम्ही करु नका.[15]

निजामा याचवेळी बिदर या ठिकाणी आपला दळ देऊन बसला होता. नाना फडणिसाने सर्व मराठा सेनापतीना बिदरच्या मार्ग आप-आपल्या फौजा कूच करुन नेण्याचे आदेश दिले. निजामाने याच वेळी आपला तळ पुढे नेला आणि मराठयांना याची बातमी लागलताच त्यांनी निजामाच्या रोखाने आपले सैन्य मांडवगण, मिरजगाव सध्याचे अहमदनगर जिल्हयातील ही ठिकाण या ठिकानावरुन सीना नदीपर्यंत येऊन थांबले. तिकडून निजामा यांचे सैन्य खार नदी पासून थोडी दूर खर्डा गावाच्या पश्चिमेस आली होती. एक आठवडा दोन्ही सैना एक मेकासमोर तळ ठोकून कोणतीच हालचाल नकरता नुसत्याच उभ्या होत्या. 11 मार्च 1795 रोजी प्रत्यक्ष लढाईला सुरवात झाली या लढाईत

पेशवा यांचा सेनापती परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या कपाळावर व हातावर जखम झाली, त्यांच्या जवळ उभे असलेले चिंतामणभट खाडिलकर व विठ्ठलराव पटवर्धन हे ठार झाले व सैन्य सैर-वेर पळत सुटले. पण यावेळी पेशव्यांच्या तोफाची ताकद दाखवण्याचे काम तोफखानागार 'सखारामबापु पानशे' यांनी योग्य रित्या केले त्यांनी ती ताकद निजामास दाखवून दिली आणि निजामाचा धुव्वा पाडला. या लढाईत शिंदेच्या तोफा व गारदी, नागपुरकर भोसल्याचे बाण यांनी मोठी करामत केली. खडर्या येथील झालेल्या या लढाईत त्याच दिवसी रात्री निजाम तेथे असलेल्या खडर्याच्या किल्यात जाऊन बसला. निजाम यांने येथे पुर्ण पणे हार खाली पुढे 12 मार्च ते 27 मार्च पर्यंत सलग पंधरा दिवस दोन्ही पक्षानी वाटाघाटींत दिवस घालवे.[16]

अशा पध्दतीने मराठयांनी आपल्या तोफखाण्याच्या जोरावर थकलेल्या निजामास व त्याच्या दिवान मुशीर यास पुर्ण पणे नमवले येथे निजामाने आपली हार मान्य केली. या युध्दात तो ज्याच्या जोरावर युध्दाची चेतावनी दिली ते म्हणजे ब्रिटिश यांनीच ऐन वेळी त्याला साथ दिली नाही. निजाम तसाही फार वृध्द झालेला होता. त्याच्याकडे शैर्याची व मराठे यांच्या सारखी ताकद उरली नव्हती यामुळेच एकाच दिवसात त्याला आपली शरनागती घेणे भाग पडले.

2.4. खडर्याच्या लढाईत ब्रिटिशांची भूमिका -

हिंदूस्थानच्या इतिहासात ब्रिटिशानी आपले पावले रवण्यास चांगल्या प्रकारे सुर्वात केली. पण खया अर्थाने ब्रिटिशानी ज्यापध्दतीने म्हैसुरच्या टिपू सूलतान यांच्या बरोबर अपला हेतु म्हणजेच मराठे व निजाम यांना बरोबरीला घेऊन टिपूचा पाडाव केला हे ब्रिटिशानी साध्य करुन घेतले होते. त्याच पध्दतीने खडर्याच्या युध्दात निजामाचा झालेला पुर्ण पराभवानंतर निजामाशी दोस्तीचा करार कारुन त्यांनी निजाम यास आपल्या जाळयात घेरुन त्याच्या राज्याला पुर्ण पणे आपल्या अधिन करुन घेतले. निजामाचे स्वंतत्र्य राखणे व त्याला मराठयांच्या वर्चस्वाखाली सर्वस्वी जावू न देणे तसेच त्याला पुर्ण पणे न संपवने या गोष्टी ब्रिटिशांना होऊ दयायच्या नव्हत्या हा प्रमुख हेतु यावेळी निश्चित दिसत होता. हिंदूस्थानच्या राजकारणात आपल्या सत्तेचा समतोलपणा राहण्यासाठी त्यांना ही गोष्टी

करणे महत्वाची वाटत होती. मुशीर याचा हेतु केवळ निजामाचे राज्य तसेच रहावे एवढाच नसून ते ब्रिटिशांच्या मदतीने त्याचा विस्तार व्हावा असे मत होते आणि त्यात आनखिन विस्तार वाढवून भर घालावि असाहि हेतु होता. पण ब्रिटिशांना निजामाच्या व मराठयांच्या परस्पर ताकदिची चांगलीच जाणीव होती व माहित होते की दोघाचे युध्द झाल्यास निजामाचा पराभव निक्कीच होणार. मुशीर हा नुसताच बडबडया व तसेच गर्वाचा पुतळा आहे पण त्याच्या महत्वाकांक्षेस यश येण्याचा कोणताच अंदाज दिसेना हे ओळखल्यामुळे ब्रिटिशांना पण तो निजामाच्या कारभारात नकोच होता. त्याला काढून टाकणे त्यांच्या हातांत नव्हते. नाना फडणीस यांच्या मुशीर चांगलाच डोईजड झाला होता त्याला काढून टाकल्या शिवाय पर्याय नव्हता कारण, निजाम मुशीर यास सोडून कोणतेच निर्णय घेत नसे हे मराठयांनी व ब्रिटिशानी चांगलेच हेरले होते. पण ज्यावेळी निजाम याने ब्रिटिश वकिल 'कर्क पॅट्रिक' यांच्या मदतीची मागणी केल्या नंतर कर्क पॅट्रिक याने दिलेले उत्तर निजामासाठी मोठे गमतीचे व टाळाटाळीचे होते. या वेळी तो निजामाला म्हणतो की, '' तुम्ही जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याबाबत माझ्या वरिष्ठांकडून आज्ञा आल्याशिवाय मी काहीही करू शकत नाही.''[17]

ब्रिटिश आधिकारी 'मॅलेट' याने हैद्राबादच्या आपल्या वकिलाला कर्क पॅट्रिकला लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो. ''निजामाचे राज्य म्हणजे पत्यांचा बंगला आहे. दक्षिणच्या सुभेदारीच्या जागेवर त्यांचा आनुवंशिक हक्क नाही. त्यांच्या राज्यावर हक्क असणारे त्याचे गाजी उद्दीनासारखे भाऊबंद पेशव्याच्या राज्यात राहात आहेत, अशा स्थितीत त्यांच्या मृत्युनंतर काय होईल हे निश्चित नसताना ब्रिटिशांनी त्यांच्या राज्याचें रक्षण करण्याची हमी व जबाबदारी कशाच्या आधाराव घ्यावयाची? मॅलेटच्या धोक्याच्या सूचनेचा एवढाच चांगला परिणाम झाला की ब्रिटिश खडर्याच्या युध्द बाहेर राहिले. असे असूनहि या युध्दात ब्रिटिशांची निजामाच्या बाजूने स्वतःवर जबाबदारी घेण्यास छाती झाली नाही. युध्दांची तयारी झाली असता या वेळी 'गव्हर्नर जनरल क्लाईव्ह' यांनी निजामाच्या दरबारातील आपला वकील अर्काट याच्या बचाव करण्यासाठी त्याला चांगलाच सल्ला

दिला होता तो म्हणजे, युध्दात मराठयांच्या घोडदळा समोर निजामाचे (मोगलांचे) घोडदळ ठेवायचे व किल्ले, शहरे यांच्या रक्षणार्थ ब्रिटिशांची कावायती फौज पाठवून यापध्दतीने उपयोग करायचा असे या लढाईत ठरले. हा हेतु समोर ठेवून ब्रिटिशानी आपले रक्षण योग्य पध्दतीने केले. या सर्व घटनावरून धोक्याच्या सूचना समचून ते या युध्दातुन बाहेर राहिले.[18] निजामास ब्रिटिश आपल्याला मदत करतील असा भ्रमाचा भोपळा होता आणि ब्रिटिशाच्या मदतीच्या जोरावरच तो मराठयांना एक प्रकारे चेतावणी देत होता. पण गव्हर्नर जनरल सर जॉन शोअरने सर्व मराठे सरदारांची एकी पाहून दूरदर्शीपणाने आयत्या वेळी निजामास मदत करण्यांचे नाकारले ब्रिटिशानी यावेळी निजामाला फक्त झुलत ठेवले होते.

निजामाचा उद्देश हा सामोपचाराने घेण्याचा नव्हताच त्याने ब्रिटिशांचा मराठयांविरुध्द मदत घेण्यासाठी सरखा पाठपुरावा केला होता. ब्रिटिशांची भूमिका या संघर्षात उघड होती. त्यांना हा संघर्ष नको होता असे नव्हते पण त्यांना या युध्दात पडायचे नव्हते. ब्रिटिशांनी मराठे आणि निजाम यांच्यामधील असणारा वाद हा सामोपचाराने मिटविण्यासाठी मध्यस्थाची घेतलेली भूमिका होती ती फसवेगिरीची होती. पुणे दरबाराने ब्रिटिशांची मध्यस्थी कधीच मान्य केली नाही किंवा त्यांना मध्यस्थीची हमी पण दिली नव्हती. ब्रिटिशानी मात्र कोणत्याही परिस्थितीत निजामाने आपल्याकडून मदतीची अपेक्षा करु नये असे स्पष्ट शब्दांत कळविले होत. आणि आपली ही भूमिका शेवट पर्यंत कायम ठेवली. अर्थात या निर्णया मागे मराठयांबद्दल फार अपुलकी होती असे कोणतेच कारण नव्हते. हिंदूस्थानांत सर्व सत्तांधीशांचा समतोल कायम राखयचा असेल तर, त्यासाठी निजामाचा ब्रिटिशांना भविष्यात कोणताच उपयोग होणार नव्हता. ब्रिटिशानी आपली दृष्टी पुढील भविष्य काळावर ठेवली होती. कारण, मराठे आणि निजाम यांच्या संघर्षात दोघांची शक्ती थोडया फार प्रमाणोत कमी झाली असती तर याचा फायदा ब्रिटिश उठवण्याच्या प्रयत्नात हाते. खडर्याच्या युध्दाच्या सुरवातीला नाना फडणीस यांनी ‘पुण्यात सगळीकडील राजे सत्तधारी येथील सर्व वकिल उपस्थित राहवे असे हुकूम केला होता. या अनुसंगाने पुण्यात ब्रिटिशांचा वकील मॅलेट हा उपस्थित होता. मराठयांनी सर्वाना आपल्या पक्षात वळून घेतले होते. नानानी सरवांना युध्दाच्या ठिकाणी येऊन राहवे, पुण्यात कोणी राहू नये

असे फरमान काढले होते. ब्रिटिश यांनी यावेळी आपली युध्दात भाग न घेण्याची भूमिका घेतली होती. पण मराठे यांचा गारपीठावर युध्दाच्या तळ होता तेथे ब्रिटिश हजर होते'.[19] ब्रिटिशानी यावेळी हळूहळू सर्व एतद्वेशियाची शक्ती कशा प्रकारे कमी होते यावर चांगलेच लक्ष होते.

2.5. खडर्याच्या लढाईचे परिणाम व तह -

खडर्याचा विजय हा मराठी साम्राज्याच्या अस्थित्वासाठी व सर्व मराठा सरदार एकत्र येऊन निजामा विरोध्द मिळविलेला विजय होय. या विजया मुळे पेशवाईची प्रतिष्ठा वाढली संपूर्ण हिंदूस्थानांत एकच ध्वनि उमटला की मराठे अजूनहि प्रबळ आहेत. मनांत आले तर परकियांचे वाढते वर्चस्व यास सुध्दा न जुमानतां ते आपणांस हवी ती गोष्ट हिंदूस्थानाच्या इतिहासांत घडवू शकतील. नाना फडणीस यांच्या कारस्थानाचा तर हा काळ म्हणजे सर्वोच्च बिंदू होता. शांतपणा आणि सामोपचार, तसेच पेशवाई बद्दल आत्यांतिक अभिमान आणि मराठेशाहीच्या स्वातंत्र्याबद्दल परमदक्षता या गुणांच्या जोरावर नाना हे निजाम व पेशवा यांच्या अखेरच्या पर्वात मोठा विजय मिळवू शकले. या युध्दानंतर अनेक जन पेशवा सवाई माधवराव यांच्या भाग्याचे वर्णन करण्यात गुंतले होते. खडर्याच्या लढाईवर यावेळी अनेक पोवाडे रचले जात होते. मराठयाच्या दृष्टीने पाहिले असता खडर्या लढाईत निजामा कडून तहात योग्य तसे महत्व मिळाले नाही. तरी पण या लढईने निजाम याने आपला पुर्ण आधारच गमवून बसला होता.[20]

मराठा व निजाम यांच्यात खडर्याच्या युध्दाच्या वेळी स्वतः निजाम खडर्याच्या किल्यात जाऊन बसला असता सन 13 मार्च 1795 रोजी निजामाने सकाळी-सकाळी पटवर्धन भाऊ यांच्याकडे निरोप पाठवून युध्द थांबवण्याची विनंती करून तहाची बोलणी सुरु केली. यानंतर दोन्ही पक्षात युध्द थांबवून शांततेची, सलोख्याची जी चर्चा सुरु झाली ती पुढे तारिख 10 एप्रिल 1795 रोजी तीचा शेवट झाला. तहाच्या बोलणी सुरू झाली तेव्हा निजामाने पेशवा स. माधवराव यांची प्रत्यक्ष भेट व्हावी अशी मागणी केली. पेशव्याची भेट घेवून त्यांच्याकडून सौम्य अटींवर तह घडवून अणण्याचा निजामाचा हेतु होता. पण याच वेळी निजाम यांचा सैन्याचा आधिकारी फ्रेंच सरदार रेमंड यास मात्र तहा

पेक्षा युध्दाची अधिक इच्छा होती. त्याने निजामाकडे लढाईची परवानगी मागितली पण, निजामाने त्यास परवानगी दिली नाही. त्यामुळे पेशव्याने गनिमी काव्याने ज्या पध्दतीने निजामाला खडर्याच्या किल्यात कोंडून त्याचे अन्नपाणी बंद केले त्यामुळे निजाम अत्यंत हैराण झाला. आणि तहाचेच बोलणे पुढे चालू केले. यावेळी खडर्यावर गोळा झालेल्या मराठी सरदारांना निजामासोबत तह करण्यापेक्षा त्यांला पुर्ण पणे पराभूत करून त्याना एकदम आपल्या आधिकारा खाली आणण्याची इच्छा होती. नाना फडणीस यांनी सर्व मराठी सरदारांचे विचार बाजूला ठेवून त्यांनी आपला मार्ग बदलवला व निजामा बरोबर तह करण्यास तयार झाले. निजामावर पूर्ण शह बसवण्यची हि संधी होती पण पुण्याचे कारभारी नाना यांनी कोणताच विचार न करता ही संधी सोडून दिली. निजामने तहाचे बोलणे पुढे केले यांनतर नानाने त्याच्याकडे आपल्या प्रमुख मागल्या कळवल्या. त्यानुसार चौथाई, सरदेशमुखीच्या बाकी बद्दल व सदर माहिमेचा खर्च मिळून सुमारे 5 कोटी रुपये द्यावेत, त्याच पध्दतीने सध्दा औरंगाबाद येथे असलेला दौलताबादचा किल्ला द्यावा, भोसल्याचे जे महाल निजामाने आपल्या वर्चस्वाखाली आनले होते ते त्यांस परत देणे आणि त्यांच्या ऐवजाचा भरणा करणे. तसेच निजामाचा दिवान मुशीर यास आमच्या ताब्यात दयावे या सर्व तहाच्या अटी कळवल्या होत्या.[21]

निजामाने आपला निरोप 'गोविंद कृष्णा' यांना बोलावून सांगितले की, दोन महिण्यांनी आम्ही मुशीर यास पदावरून बाजूला करितो कारण, आपल्यातील हिंसेबाची सर्व माहिती त्यालाच आहे. त्यामुळे ते समजून घेऊ मग त्यास दूर करतो यावर गोविंदराव यांनी निजामाच्या छावणीतून आपला पाय काढता घेला व ते तेथून निघून आले. यावेळी मुशीर याने स्वःत निजामास पेशव्याच्या अटी मान्य करण्यास सांगितल्या. निजामाने हो, ना करत सर्व अटी मान्य केल्या. दिवाण मुशीर यास नाना यांनी आपल्या बरोबर पुण्यात आनले. नानानी सर्व मराठी सरदाराना आपला हिस्सा वाटून दिला. निजामाने यावेळी दौलताबादचा किल्ला व 30 लाखांच्या वसुलीचा मुलुख देण्याचे मान्य करण्यात आले आणि पाच कोट रक्कमे पैकी 30 लाखांचा भरणा ताबडतोब करण्यात येऊन उर्वरीत रक्कमेच्या बंदोबस्तासाठी 3 वर्षाची मुदत मागितली.[22]

महत्वाची गोष्ट म्हणजे तहाच्या सर्व हि वाटाघाटी नाना फडणीस यांनी आपल्या स्वबळावर केली होती. यात नानाचा काहीतरी स्वार्थ आहे म्हणून तह केला असे दिसून येत होते. तहात मराठी राज्याचे किंवा पेशवा यांचे कसलेही हित पाहण्यात आले नाही. स्वःत पेशवा यांनी या तहात कोणताच सहभाग घेतला नव्हता तहाचे सर्व हक्क नानाकडेच होते. पेशवा यावेळी फक्त शिक्याचा मालक राहिला होता. ऐकिकडे खडर्याच्या लढाईत निजामाने आपला बचाव करून आपले व आपल्या सैन्याचे एक प्रकारे रक्षणच केले होते. मराठयांनी जर निजामाच्या सैन्याचा मोड केला असता तर कदाचीत येथे निजाम मराठयांचा एक संस्थानिक बनून राहिला असता. मराठी सरदारांनाही निजामाचा हा काटा मुळापासून उखडून काढायचा होता पण नानाने तसे होऊ दिले नाही. खडर्याच्या युध्दात पुणे दरबारला फक्त 30 लाख रुपये आणि मशीरला एक वर्ष कैदी म्हणून पोषले एवढेच मिळाले.

2.6. खर्डाच्या लढाई नंतरची परिस्थिती -

मराठे व निजाम यांच्यात झालेल्या तहा प्रमाणे नाना फडणीस यांनी निजामाचा कारभारी मुशीर (दिवान) याला आपल्या ताब्यात घेतले. या खडर्याच्या तहापैकी एक गोष्टी ताबडतोब अमलांत आणि ती म्हणजे मुशीर याचे पुण्यात आगमन होय. पण मुशीर याचे आगमन म्हणजे मराठी साम्राज्य खिळखिळी करण्यास कारणीभूत झालेली गोष्ट होय. मुशीर ही व्यक्ति अशी नव्हती की ती स्वस्थ बसून राहील. पुण्यात त्याला शनिवार वाडयात खजिन्याच्या विहिरीवरील बंगल्यात आणून ठेवणे म्हणजे पुण्याच्या दरबारात व्याधी निर्माण करून घेणे होते. याचा अनुभव पुढील दोन वर्षात चांगल्या प्रकारे आला. मुशीर ही व्यक्ति म्हणजे मिळालेल्या संधीचा उपयोग करून घेण्यात एक नंबचा हुशार, चतुर व धुर्त होता. त्याने पुण्यांत अनेक सरदार, मुसूद्दी यांच्यात अंतस्थ लावालावी करण्याचे काम सुरु केले होते. मुशीर याला पुण्यात अणण्याचा नानाचा अट्टाहास साकार झाला नाही. यामुळे त्याला पुण्यात जास्त काळ ठेवणे धोक्याचे होते. यामुळे पुढे एक वर्षात 5 जुन 1796 ला मुशीरची मुक्तता करण्यात आली. पुण्यात पेशवे दरबारी राष्ट्राच्या ध्येयाची सुस्पष्टता व निश्चितता कधींच दिसून आली नव्हती. कधी-कधी खोकल्याची उबळ यावी त्याप्रमाणे

शिवकालांतील आपल्या व आपल्या वाडवडिलांच्या ध्येयांची कोठेतरी आठवण पेशव्याईती सरदार लोकाना येत असे. मराठयांच्या मनात मोगल संपवण्याचा, हा हेतु कधीच दिसून आला नाही किंवा कधी हा विचार पण केला नाही की, सर्व दक्षिण आपल्या मुठीत ठेवून आपला आधिकार त्या भागावर असावा. त्यांना आपल्या ध्येयाची आठवण मधुन-मधून कधी काळी होत हाती. मराठयांनी कोणतीच गोष्ट कायमची हातावेगळी केली नाही किंवा ती हातावेगळी करण्याचा साधा प्रयत्न सुधा केला नाही. महत्वाची गोष्ट म्हणजे या मराठा साम्राज्या (पेशवाई) मुळे दिल्लीचा बादशहा अमर झाला. त्यातच या दिल्लीच्या बादशहाचा दक्षिणेतील स्वतंत्र सुभेदार असलेला निजाम तोहि सर्व नाटके करुन मराठयांच्या हातून त्याचा बंदोबस्त ब्रिटिशांकडे गेला आणि हे दोघे अखरे ब्रिटिशांचे अश्रित होऊन त्याना मोडण्याचे वा ताब्यांत राखण्याचे श्रेय शेवटी परकिय सत्तेला (ब्रिटिश कंपनी) मिळाले. हे श्रेय शेवट पर्यंत मराठयांना मिळू शकले नाही.

पेशवे हे नादान नव्हते किंवा नाना फडणीस हे राजकारणात दुधखुळे राजकारणी नव्हते. त्यांच्यात शौर्य साहस, कारस्थानीपणा, उदयोग यांची कोणतीच कमतरता नव्हता. पण त्यांची ही सर्व धडपड अस्पष्ट ध्येयाची एक पोकळी ठरली. मराठेशाहीत अनेक व्यक्ती होत्या ज्यांच्याकडे ताकद, बुध्दी, होती दौलतराव शिंद, यशवंतराव होळकर, रघुजी भोसले इ. सरमजाम वर्ग होता जो अजुनही मराठी साम्राज्याशी एक निष्ठ होता पण हे सर्व राष्ट्रासाठी उपयोगी ठरले नाही. त्यांनी आपल्या बुध्दीचा वापर राष्ट्रप्रेम व राष्ट्रा अभिमान यासाठी खर्च केला नाही. छत्रपती शिवाजीच्या स्वतंत्र राज्याचा पाया सोडून साम्राज्यांतर्गत स्वराज्याचा पाठपुरावा पेशव्यांनी केला म्हणजे साम्राज्याच्या बळकटीवर मराठयांचे स्वातंत्र अवलंबून ठेवले. पुढे-पुढे पेशवेच चुकीच्या मार्गाला लागल्या मुळे, अनीतिमूलक साम्राज्य टिकविण्यांत कोणालाच यश आले नाही पण मराठी साम्राज्य टिकविण्याच्या प्रयत्नांत स्वराज्यहि डुबवले गेले एवढे मात्र खरे.[23]

2.6.1 पेशवा सवाई माधवराव व नाना फडणीस-

पेशवा सवाई माधवराव यांना वयाच्या चाळीसव्या दिवशी, 28 मे 1774 रोजी पेशवाईची वस्त्रे देण्यात आली. पेशवा स. माधवराव यांना पेशवा बनवण्यासाठी नाना

फडणीस यांचे योगदान महत्वाचे होते. पेशवा लहान असल्या मुळे सर्व कारभार नानाच्या देखरेखेखाली केला जात असे म्हणजेच पेशवाचे संगोपन, सरंक्षण, काळजी हे सर्व काम नानानी मराठी साम्राज्याच्या भल्यासाठीच केले ही सर्व जबाबदारी नानानी मराठी साम्राज्याच्या काळजी पोटी घेतली होती पण ही काळजी प्रमाणा पेक्षा जास्त होती.[24] पेशवा यांच्या शिक्षणाबाबत नाना यांचा दृष्टीकोण म्हणजे प्रगतीस विरोध असाच होता. नानाच्या या वर्तना मुळे पेशव्यास जे योग्य शिक्षण पाहिजे होते ते म्हणजे व्यावहारिक व परिस्थितीचे शिक्षण होय. आणि तेच नानाच्या चुकिच्या धोरणा मुळे मिळाले नाही उलट त्यांना धार्मिक गोष्टीत गुंतून ठेवले होते. खेळ, मैदानी कसरती, व्यायाम, घोडेस्वारी, युध्दनीती, शस्त्रविद्या, दांडपट्टा इ. या सर्व गोष्टी नाना यांनी बाल पेशव्याला दिल्या त्याच बरोबर नानाचे पेशव्याच्या सर्व गोष्टीनवर बारीक लक्ष होते. पेशवा यांना नानानी या गोष्टी चांगल्या अवगत करून दिल्या या गोष्टी जर सोडल्या तर बाकीच्या कोणत्याच गोष्टीची सावली सुध्दा पडुन दिली नाही. हिंदूस्थान मध्य परकिय लोक व्यापारासाठी आले होते यांच्या कडील अधिकारी हे पेशवा पेक्षाही वयाने लहान होते पण त्यांच्या योग्यते मुळे त्यांना हिंदूस्थानात योग्य कामावर हाजर होते. पुण्यात यावेळी ब्रिटिश व्यापारी कंपनीचे वकिल मॉलेट तसेच मुंबई येथे ब्रिटिश अधिकारी लोक होते तसेच अनेक युरोपरीयन देशांचे व्यापारी होते. या सुमारास अनेक मराठी सरमजाम यांनी युरोपांचे अनेक आधिकारी आपल्या कडे कामाला ठेवले होते. अनेकांनी युरोपीयन आधिकारी यांच्या अधुनिकीकरण पध्दतीने आपल्या फौजा निर्माण केल्या होत्या. युरोपीयन लोकांचे योग्य शिक्षण, व्यवहारीक ज्ञान त्यांची योग्यता चांगल्या प्रकारे होती हे सर्व हिंदूस्थानात उपलब्ध असताना सुध्दा नानानी पेशवा यांना थोडया फार प्रमाणात सुध्दा या सर्व गोष्टीचे वारे लागु दिले नाही. नानाची पाहण्याची दृष्टी ही फक्त पुराणप्रिय होती. नानाच्या मनात प्रगती व नवीन गोष्टी आत्मसाद करण्याची प्रवृत्ती येथे दिसून आली नाही. पेशवा यांना आपल्या मना प्रमाने वागण्याचे कोणतेच गोष्टीत स्वातंत्र्य दिले नव्हते. नविन काळा प्रमाणे चालण्यास नानानी जनू विरोध्दच केला होतो. यानंतर पेशवा यांनी पुढे वयाच्या सोळाव्या वर्षी राज्याचा कारभार आपल्या हाती घेतला तरीपण प्रत्यक्ष सर्व कारभार नानाच्याच हातात होता. मराठी

साम्राज्याचा चालक पेशवा हा प्रचलित राजकारणात क्वचित लक्ष घालत असला तरी त्याच्यावर जाहगिरदार, सरमजाम, सरदार इ. वर्ग यांची चांगल्या प्रमाणात निष्ठा होती. योवळी छत्रपती पेशव्याच्या नजर कैदेत असले तरी पेशव्याच्या विरोधात जाण्याची कोणाची ताकत होत नव्हती. या मुळे पेशवा व मराठा साम्राज्य यांचे चांगलेच वर्चस्व वाढलेले होते त्यातच नानाचे योगदान ऐन पेशवा यांच्या उमिद्दीच्या काळात थोडया फार प्रमाणात धोरण चुकीचे ठरले होते.[25]

पेशवा यांना स्वःतचे असे कोणतेच स्वातंत्र राहिले नव्हते. प्रत्येक निर्णय घेताना नानाची परावानगी घ्यावी लागत त्याच पध्दतीने बाहेरील जगाचे कधी ज्ञान होऊ दिले नाही. पेशव्याने कोणाला भेटावे व कोनाला नाही हे सर्व नाना ठरवत असे. राज्यकारभारावर देखरेख, दररोजचे प्रशासन हया गोष्टी पासुन पेशव्याला दूरच ठेवले फक्त गणपती उत्सव, श्रावण महिन्यात दानधर्म व पुण्यात पर्वतीजवळील मृगारण्यात जाणे हीच पेशव्याची कामे असत या व्यतिरीक्त नानानी राजकीय, प्रशासकिय कोणत्याच कामात हातभार लावू दिला नाही. नानानी पेशव्याला फक्त एक नामधारी म्हणुन वागवले, सर्व अधिकार आपल्या हातात ठेवले. मराठी साम्राज्याच्या सर्व विभागाचा कारभार कशा पध्दतीने चालतो हे पेशवा यांना समजून सांगण्यासाठी हरिपंत फडके, रामशास्त्री, रघूजी आंग्रे, पटवर्धन परशुरामभाऊ अशा तज्ञ कारभारी व्यक्तिची नेमणुक केली होती.

पेशवा यांचा स्वभाव मनमानी व जिवास लावून घोणारा होता. महादजी शिंदे आणि पेशवा स. माधवराव यांचे चांगलेच जमत होते पण पुढे महादजी शिंदे यांच्या मृत्यु नंतर पेशवा जवळ विश्वासपात्र असा कोणी पुरूष राहिला नव्हता. नवीन मानसे जवळ करणे पेशवा यांच्या बाबतीत नानानी कधीच घडून दिले नाही व त्यांचा स्वभाव कधीच ओळखता आला नाही. तसेही नानाना दुसयाचे मन ओळखता येत नव्हते कारण, महादजी शिंदे यांचा पेशवा यांच्या बाबतचा दृष्टीकोण नाना यांच्या आगदी विरोधी होता. महाजदी शिंदे व पेशवा हे आपले विचार ऐकमेकान जवळ बोलत असे दोघाच्याही मन मोकळया गप्पा होत असे. महादजी शिंदे यांचा पेशवा यांच्या बाबतीत असलेला दृष्टीकोण नानानी कधीच समजून घेतला नाही. पुढे पुढे तर पेशवा यांना नानाच्या वागनूकीचा

चांगलाच कंटाळा आला होता. पेशव्यानी यावेळी नानाचा अनेक बाबतीत सल्ला न घेताच च निर्णय घेण्यास सुरवात केले होती. खडर्याची लढाई जिंकून आल्या नंतर मात्र पेशवा यांच्या मनात नाना यांच्या बद्दल थोडया फार प्रमाणात का होईना राग निर्माण होण्यास सुरवात झाली होती. पेशवा यांना नानाची जी वागवण्याची पध्दत होती ही मुळीच आवडत नव्हती पेशवा भोवती असणारा जो कडेकोट बंदोबस्त होता या मुळे पेशवा नानाच्या पुर्ण पणे कैदेतच होते.[26]

2.6.2 पेशवा सवाई माधवराव यांचा आकस्मात मृत्यु

मराठा साम्राज्याला पेशवा सवाई माधवराव यांच्या कारकिर्दीत चांगल्या प्रकारे स्थैर्य आले होते. सन 1779 मध्ये पहिले इंग्रज मराठा युध्द व सन 1795 मध्ये खडर्याची लढाई या दोन्ही युध्दात मिळालेला विजय या गोष्टी पेशवा सवाई माधवर यांच्या कारकीर्दीतील महत्त्वाच्या मानल्या जातात. यातच मराठे व निजाम यांचे संबंध बिघडल्याने पुढे खडर्याची लढाई झाली. या लढाईचे नेतृत्व हे पेशवां यांनी स्वतः रणभूमिवर उपस्थीत राहुन केले. खडर्याची लढाई ही पेशवा सवाई माधवराव यांची पहिली आणि अखेरचीच स्वारी होती. यानंतर मराठा साम्राज्याला मोठा धका बसला तो म्हणजे खडर्याच्या युध्दानंतर सात महिण्यातच पेशवा सवाई माधवराव यांचा '27 ऑक्टोबर 1795' रोजी अपघाती मृत्यु झाला. पेशवा यांच्या निधनामुळे मराठी सत्तेचे फार मोठे नुकसान झाले मराठयांचे असणारे निष्ठास्थान नष्ट झाले. या नंतर बाराभाई नेत्यानी मराठा साम्राज्य संभाळण्याचे काम केले पण त्यांच्यात फक्त नाना फडणीस हे हायात होते पण पेशवा यांच्या मृत्यु मुळे पुढे काहीच चालले नाही. पेशवा सवाई माधवरावांचा मृत्यु झाल्यावर नानानी त्यांच्या बद्दल आपल्याकडून झालेल्या चुकांचा खेद व्यक्त करताना म्हणतात, ''घरचे दारचे फितूर यांचा सरवांचा बंदोबस्त करिता करिता नबाबाची मसलत जाहली, फारच ओढीत सरकार आले, पुढे निर्वेध दिवस चांगले दिसू लागले. बोलिल्या प्रमाणे सातारचे बंदोबस्ताचे करावे हे चित्तापासून, तो श्रीमंतच गेले! याउपर वाईट कोणतेहि नाही. पराकाष्ठ जाहली! पुढे हे सर्व मिळून मलाच भरीस घालतात. बरे, ईश्वर काय करील ते खरे.''[27]

खडर्याच्या लढाई वरून परत आल्यावर पेशवा सवई माधवराव यांनी रघुनाथराव यांचे चिरंजीव दूसरे बाजीराव यांच्याशी आपली जवळीक वाढवण्यास सुरवात केली होती. दूसरे बाजीराव वडीलांच्या चुकांची शिक्षा भोगत नानांच्या कैदेत जुन्नरला होते तेव्हा 'बळवंतराव नागनाथ' यांच्या मार्फत पेशवा सवाई माधवराव यांच्याशी गुप्तपत्रव्यवहार चालु केला होता. या निमीत्ताने दू. बाजीराव यांनी पेशवा यांच्या मनात आपल्या विषयी सहानुभूती निर्माण करण्यासाठी सुरवात केली. या गोष्टीची सर्व माहिती नाना फडणीस यांना समजताच त्यांनी पेशवा यांना दू. बाजीराव यांच्या स्वभावाची, तसेच दुपट्टी पणाची व त्यांच्या वडिलांच्या घरभेदिपणा या गोष्टी राज्याला घातक ठरतिल ह्या सर्व गोष्टी बोलून दाखवल्या व यानंतर पेशवा यांची चांगल्याच शब्दात हजेरी घेतली. नाना फडणीस व पेशवा स. माधवराव यांच्यात वारंवार शुलक कारणा वरून पुढे वाद होण्यास सुरवात झाली. पण या सर्व गोष्टीतून पेशव्याना नानाची मराठी राज्यासाठी असलेली तळमळ व दूरदृष्टी समजली नाही. पेशवा यांच्या कारकिर्दीचे स्वरूप, वैभव व वर्चस्व पेशवा थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दी प्रमाणे पुन्हा दिसू लागले होते. त्यातच पेशवा स. माधवराव यांची अवस्ता या काळात एका कैद्याप्रमाणे झाली होती. त्याचा विचार करण्याची शमता नानाच्या त्रासा मुळे संपली होती.

पेशवा सवाई माधवराव मराठयांच्या इतिहासत एक कर्तबगार पेशवा होय. लढाई जिंकून पुण्यात आल्यावर त्यांच्या पुढे आपल्या प्रकृतीच्या आजाराचे संकट समोर येऊन उभे राहिले होते. मन दुर्बल असले तर शरीर तरी काटक असावे लागले. पेशवा स. माधवराव यांचे शरीर काटक नव्हते. उन, तहान, श्रम वगैरे या कोणत्याच गोष्टी त्यांना सहन होत नसे तरी सुध्दा खडर्याच्या संग्रमाच्या वेळी लढाईच्या ठिकाणी उपस्थित होते. यानंतर त्यांचे आगमन पुण्यात झाल्यावर पुढे त्यांना गणेश चतुर्थी पासून ताप येऊ लागला होता. तो तसाच पुढे वाढत जाऊ लागला. नवरात्राच्या सनाच्या दिवसा पासुन पेशवा यांची प्रकृती चांगलीच खालावली त्यांचा ताप सारखा वाढत होता. या वेळी 23 ऑक्टोबर 1795 रोजी विजयादशमी होती त्या दिवशीही पेशवायाची प्रकृती अस्थिर झाली व प्रकृती क्षीण झाल्याने बयापैकी अशक्तपणा आलेला होता. येवढे असताना सुध्दा दसयाच्या सनाच्या

वेळी दरबारास त्यांनी हजेरी लावली. तसेच संध्याकाळी हत्तीवरुन शमीपूजनास पेशवा निघाले आसता तेव्हा त्यांना अंबारीत बसण्याची सुध्दा परिस्थिती नव्हती. त्यानंतर अप्पा बळवंतने त्यास शेल्याने अंबारीस बांधले व वाडयात परत आणले. पेशवा स. माधवराव यांच्या प्रकृतीची नाना फडणीस सोडले तर जास्त कल्पना इतर कोणालाही नव्हती. या परिस्थितीत स्वतःचा तोलही सावरता न येण्याइतपत अशक्त झालेल्या पेशव्यास दिवसभर दरबारी कामकाजात थांबवून घेणे आणि मग शमीपूजनाच्या कार्यक्रमात सहभागी करुन घेणे हि नानाची एक प्रकारची जबरदस्तीच होती. ''पेशव्याचा ताप वाढत गेला व दसयाच्या दूसया दिवसी 25 ऑक्टोबर 1795 रोजी सकाळी तापाच्या झटक्यात भूरळ पडून शनिवारवाडयातील गणेश महालाच्या वरच्या मजल्यावरू खाली पडून जखमी झाले. पेशवा माडीवरून खाली कारंजावर पडले तेव्हा त्यांना जास्त मार लागला होता या आजारात त्यांचा 27 ऑक्टोबर 1795 रोजी अंत झाला.''[28] पेशवा सवाई माधवराव यांच्या अपघाती मृत्युने जे संकट महाराष्ट्रावर कोसळले व जिज्यामुळे मराठी सत्ता इतकी दुर्बल झाली ती कदाचित ब्रिटिशांच्या युध्दामळे वाढत गेली नसती. पुढे नानासारख्या धोरणी मुसूद्याच्या हाती मुख्य सुत्रे राहिली असती परंतु दुदैवाने तसे झाले नाही. पेशवा स. माधवराव यांच्या मृत्युनंतर नानाचे सर्व धोरण जागच्याजागी थांबल्या सारखे झाले. पेशवा यांच्या मृत्यूने पेशवाईचा कारभार आता नानाकडे राहणे मोठे कठीण होऊन बसले हाते. मराठयाची विस्कळीत झालेली घडी सांभाळण्याची कुवत आता कोणातच राहिली नव्हती. पेशवा स. माधवराव यांच्या मृत्युने पुढे पंचवीस वर्षांत मराठी सत्ता संपुष्टात आली. या पंचवीस वर्षांत मराठयामध्ये अनेक अंतर्गत कटकटी निर्माण झाल्या. हेच कारण आहे मराठी सत्ता संकटात सापडण्याचे येथून पुढे मराठयांच्या घरात अनेक वाद निर्माण होण्यास सुरवात झाली.

2.6.2. मराठी साम्राज्यातील पेशवा स. माधवराव मृत्यु नंतरचा गृहकलह -

बलाढ अशा मुगल साम्राज्याचा शेवट हा गृहकलहातुन, भावा भावाच्या भांडणातुन शेवट झाला. तसेच छ. शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेले मराठा साम्राज्य हिंदुस्थानच्या अत्युच्च शिखराव जाऊन पोचले होते. पुढे त्याला पण उतरती कळा ही

गृहकलहा मुळेच लागली होती. 16 व्या शतकात महाराष्ट्र राज्यात छ. शिवाजी महाराज यांनी लावलेखा वट वृक्ष 18 व्या शतकात त्याच्या फानदया हिंदुस्थानच्या कानाकोपयात तसेच अटकपर्यंत जाऊन पोचल्या होत्या. दिल्लीच्या लालकिल्या पासुन मैसुर च्या नबाबा पर्यंत मराठयांच्या तलवारीचा धाक वाढतचालला होता. पेशवा सावई माधवराव यांच्या मृत्युनंतर पुणे दरबारात इतके गोंधळाचे आणि अविश्वासाचे वातारण निर्माण झाले. महत्वाचे म्हणजे दिल्लीचा मोगल दरबार आणि पुण्याचा पेशवे दरबार यांत काडीमात्र इतकाही फरक नसल्याचे दिसून येते. घटकेत एक कारस्थान रचावे आणि दुसया घटकेत दुसरे, एखाद्या योजनेस सर्वांनी मान्यता देऊन त्यासाठी शपथपत्र करायची आणि काही तासांनीच पहिल्या योजनेतील नाराज असलेल्या मंडळींनी नवीन योजना करून आधीची शपथपत्रे फाडून टाकावी. हे सर्व कट कारस्थाने आसीच चालत राहिली होती.

सन 1795 पर्यंत मराठयांच्या इतिहासात अनेक कर्तबगार पुरूषांचा मृत्यु झाला. यानंतर मराठी साम्राज्यात कोणताच असा कर्तबगार पुरूष जन्माला आला नाही. पेशवा स. माधवराव यांचा मृत्यु, त्याच सुमारास इंदौरचे मराठी सम्राज्याचे जाहगिरदार होळकर घराण्यात तुकाजी होळकराचे देहावसन झाले. त्यानंतर साध्वी अहल्याबाई होळकर याचा मृत्यु झाला. उत्तरेतील ग्वाल्हेर येथील कर्तबगार जाहगिरदार महादजी शिंदे यांचा मृत्यु झाला. महादजी शिंदे म्हणजे मराठी साम्राज्याचा मोठा हात खंडा होता. या सर्व घटनान मुळे मराठी साम्राज्याचे मोठे शहानपण हरपले होते. पुण्यात यावेळी करता धरता कोणी राहिले नव्हते. नाना फडणीस यांचा स्वभाव फारसा कोणाला अवड नसे, पण नाना राजकारणात मुसूद्दी होते. आता मात्र त्यांची पुण्याच्या कारभारत चांगलीच गोची होताणार होती.[29]

पेशवा यांच्या मृत्यु नंतर आता मराठी सत्तेत पेशवा पदाला लायक, मुसूद्दी येध्दा, कोणी शिल्लक राहिलेला नव्हता. पेशवा स. माधवराव यांना मुले नसल्यामुळे पेशवा पदासाठी वारसाचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. वारसा प्रश्ना मुळे स. माधवराव यांच्या मृत्युनंतर पेशवाच्या पदावर हक्क सांगणाने वारस रघुनाथराव (राघोबादादा) यांची तीन मुलेच अजून हायात होती. त्यापैकी पहिला मुलगा 'अमृतराव' यांना रघुनाथराव यांनी दत्तक घेतले होते तसेच रघुनाथराव त्यांची पत्नी आंदीबाईना झालेले मुले 'दूसरा

बाजीराव' व 'चिमणाजी' ही दोन होय. यात महत्वाचे म्हणजे नाना फडणीस यांनी या तिनही मुलाना राजकारणा पासून दूर ठेवले हाते. अमृतराव दत्तक असल्यामुळे त्यांचा पेशवे पदावर कोणताच अधिकार राहिला नव्हता. पेशवा स. माधवराव यांनी मृत्यूवेळेस दूसरा बाजीराव यांना पेशवेपद देण्यात यावे असे सांगितले हाते. या गोष्टीसाठी नाना फडणीस यांचा प्रखर विरोध होता. दू. बाजीराव यांचे वडील रघुनाथराव यांच्या विषयी जो द्वेष होता तो तसाच द्वेष नाना याचा दू. बाजीराव यांच्यावर कायम होता. बापासारखाच कारस्थानी मुलगा असनार आसे नानाच्या मनात घर करून बसले हाते. त्यांच्या मनात दू. बाजीराव बद्दल द्वेषभाव चांगला रूजला होता. सर्व कारभार आपल्या हातात राहिल यासाठी नानानी पेशव्याच्याच नात्यातील एखादा मुलगा मृत पेशवा सवाई माधवराव यांच्या पत्नी यशोधाबाई यांच्या मांडीवर देण्याचा विचार चालु केला तसेच यासाठी मराठी राज्यात मुलांचा शोध घेण्यास सुरवात केली. दू. बाजीराव या सुमारास नाना यांच्या नजरकैदेत होता तरी सुध्दा त्याची नानाच्या प्रत्येक गोष्टीवर बारीक नजर होती. त्यांच्या कानावर नानाची सर्व इतंभूत बातमी जात असे. नाना यांची पेशवा शोधण्याची बातमी दू. बाजीराव यांच्या कानावर गेली. तेव्हा बाजीरावाने मोठी खेळी खेळली त्यांनी उत्तर हिंदूस्थानातील मराठयांचे सरमजाम दौलतराव शिंदे यांचा पुण्यातील कारभारी 'बाळोबा तात्या' यांना आपल्या बाजूला करून घेण्यास यश मिळवले. यावेळी दू. बाजीराव याने बाहेरील कोणी दत्तक घेऊन पेशवे पदावर बसवू देऊ नये असे तात्याला सांगितले. ऐकीकडे नानाना दू. बाजीराव जर पेशवा झाला तर काय करेल याची कल्पनाच करवत नव्हती. रघुनाथराव यांनी घेतलेले ब्रिटिशांचे सहायता हेच मुलगा दू. बाजीराव घेनार नाही कशा वरून या भीतीने नानाने आपले विश्ववासू सर्व मराठी जाहगिरदार, सरमजाम, सरदार यांना बोलावून दूसरा बाजीरावाला गादीवर बसवणे म्हणजे ब्रिटिशांचा हात दरबारच्या राजकाररणांत पुन्हा शिरून घेणे होय. त्याच पध्दतीने वडिलांचा बदला घेतल्या शिवाय दू. बाजीराव गप्प बसणार नाही यामुळे बाराभाई मंडळीला धोका होणार हे नाना यांनी चांगलेच जाणून होते. 'असला कंगाल बुध्दीचा कलिपुरुष पेशवाईच्या गादीवर बसल्यास गादीचे केव्हांच वाटोळे होईल'.

या मुळे दौलतराव शिंदे व होळकर घराणे व इतर सरदार यांच्या मतानुसर बाहेरील दत्तक घेण्यास सर्व तयार झाले.[30]

बाहरेचा दत्तक घेण्याचे ठरल्या प्रमाणे मुलांचा शोध सुरु झाला. पण दू. बाजीराव याने मध्यीच गोंधळ निर्माण केला. पेशवा घराण्याचा वारस हयात असताना बाहेरील वार का? हा प्रश्न उपस्थित झाला. हा प्रश्न उपस्थिती केला खरा पण त्यांने याच बरोबर यात नानाची काही तरी चाल असल्याचेही त्याने भासवण्यास सुरवात केली. यामुळे दू. बाजीराव याने पेशवाई व पुण्यात मोठा गोंधळ निर्माण केला तसेच पुण्यात पेशवाई भोवती गृहकलहात वाढच करून ठेवण्याचे काम केले. त्याने दौलतराव शिंदे यांना सर्व माहिती कळवली असता नानाच्या दत्तक घेण्याच्या प्रकरणाला विरोध वाढू लागला होता. कायदेशीर वासर हयात असताना दूसया कोणत्याही मुलाला पेशव्याच्या गादीवर आणण्याची कल्पना आतुन कोणाच्याच मनात बसत नव्हती. यामुळे सरदार, जहागीरदार, सरमजाम ही सर्व मंडळी नानाच्या पुण्यातील कारभाराला वैतागलेली होती यामुळे नाना व त्यांच्यात मतभेद निर्माण झाले. यात नानाचा काही तरी हेतु असावा असे म्हणण्यात येऊ लागले. दूसरा बाजीरावाने शिंदेशी संधान सांधुन काही मार्ग निघतोका पाहण्यास सुरवात केली. आणि बाजीराव यांना योग्य होते तेच पुढे घडण्यास सुरवात झाली. बाजीराव व दौलतराव शिंदेचा वकिल ‘सदाशिव मल्हार’ यांच्यात गुप्त भेटी गाठी झाल्या दूसरा कोणी दत्तक घेऊ नये यासाठी शिंदेला तयार केले. यावेळी महत्वाची गोष्ट घडली आणि ती म्हणजे दौलतराव शिंदे दुसरा बाजीराव यांच्या अंतर्गत सर्व गोष्टीला अनुकूल झाले कारण, यामुळे शिंदेना आपले वजन पुन्हा पेशवे दरबारत वाढवता येणार होते. दू. बाजीराव यांनी शिंदेचे सरदार ‘बाळोबा तात्या, लखबा दादा, जिवबा दादा प्रभूती’ यांच्याशी एक गुप्त करार केला त्यानुसार दौलतराव शिंदे यांनी बाजीरावास पेशवा बनवण्यासाठी मदत करायची व त्या मोबदल्यात दू. बाजीराव यांनी शिंदेना सव्वा कोटी रुपये रोख व पंचवीस लाखंची वसुलीची जहागिरी देण्यार असे ठरले. तेव्हा या अनेक सरदार जहागिरदार वर्गाने नाना यांना विरोध करण्यास सुरवात केली. बाजीराव यांच्या मनात पेशवे पदाची इच्छा असल्या कारणाने

त्यांने सरदार, जहागिरदार यांना आपल्या गोटात वळण्यास सुरवात केली. या सर्व गोष्टीचा तपास शेवटी नाना फडणीस यांना निजामा याच्याकडून समजला आणि शेवटी यावर नानानी दुसरा कोणी दत्तक घेण्याचा विचार सोडून दिला. दू. बाजीराव यास दत्तक म्हणून पेशवे पदावर आपण स्वतःच बसवावे असे नानानी प्रथम धोरण चालु केले पण दू. बाजीराव दत्तक जाण्यास तयार होणार नाही याची पूर्ण खात्री होती. त्यामुळे नानानी चिमणाजी ह्या बाजीराव यांचा धाकल्या भावास दत्तक देण्याचे ठरवले. नाना फडणीस यांनी सांगितल्या प्रमाणे त्यांच्या मर्जितील परशुरामभाऊ पटवर्धन जुन्नरला दू. बाजीराव व चिमणाजी यांच्या कडे पाठवले. त्यांनी चिमणाजीला आपल्या हवाली करण्या बद्दल बाजीराव सांगितले.[31] दू. बाजीराव यास हे समजले असता त्यांनी या गोष्टीला पुर्ण पणे विरोध केला कारण बाजीराव यास स्वःता पेशवा व्हायचे ठरवले होते. बाजीराव यांनी स्वतः पेशवे पदावर आपला हक्क सांगण्यास सूरवात केली. वडिलाप्रमाणेच कारस्थानी, सत्तालोलुप व स्वार्थी होता. त्याने पुण्यात अनेक कटकारस्थान उभे केली. आता मराठी साम्राज्य पुन्हा अंतर्गत संकटात सापडणार हे नक्की झाले रघुनाथराव यांनी आपण पेशवा पदावर असावे म्हणून अनेक कारस्थाने केली तीच आता त्यांचा मुलगा करणा हे नाना यांना दिसू लागले होते. दूसरा बाजीराव यांचा जन्म 10 जानेवारी 1775 रोजी झाला. बारभाई कारभारामुळे ज्या पध्दतीने रघुनाथराव यांना कैद झाली होती त्यामुळे दू. बाजीराव यांना सुध्दा आपल्या वडिलां बरोबर कैदेत राहावे लागल होते त्यामुळे त्यांची वयाची 22 वर्षे वाया गेली.'

चिमणाजीला नानानी गादीवर बसवण्याचे ठरवले होते पण याला बाजीरावने विरोध केला कारण पेशवा पदावर कायेदशिर हक्क दूसरा बाजीराव यांचा होता. तो डावलला जात आहे यासाठी नाना फडणीस यांचा राग अनेक मराठा मंडळातील नेत्याना येऊ लागला होता. त्यात नानाचे विरोधक अनेक होते पुढे तर दूसरा बाजीराव यांना पेशवा करण्यासाठी नानानी विरोध चालू केला. चिमाणाजी हे पेशवा स. माधवरा यांच्या पत्नीचे यशोदाबाई यांचे नाथ्याने चुलत सासरे लागत होते. त्यामुळे त्यांना सुनेच्या मांडिवर दत्तक देऊ नये मुळातच दू. बाजीराव यांना दत्तक देने पसंत नव्हते आणि ते शक्यपन नव्हते.

नाना फडणीस यांनी दौलतराव शिंदे यांचा पुण्यातील असणारा हस्तक बाळोबा तात्या यांना प्रथम पासून आपल्या पासून बाजूला ठेवले, पण ऐन वेळी दू. बाजीराव यांनी तात्याला आपल्या बाजूस वळून घेतले व यामुळे तात्यानी दौलतराव शिंदे याचे पुणे दरबारात वजन वाढवण्यासाठी चांगलीच मदत केली. पण यामुळे पुढे चांगलाच तेढ निर्माण होणार होतात. दौलतराव शिंदे पुण्यात येणार ही गोष्ट नानाना सहन होणार नव्हती. नानानी यामुळे आपला विचार बदलण्याचे ठरवले. शिंदयाच्या बळावर जर दू. बाजीराव पेशवे बनले तर पुणे दरबाराची सूत्रे आपल्या हातून सुटणार, हे नानानां कळून चुकले होते. कारण म्हणजे महादजी शिंदे यांच्या काळापासून नाना व महादजी यांच्यात पुणे दरबारात आप-आपले वर्चस्व वाढवण्यासाठी सूरवात केली होती. नानाला ही भिती कायम होती की, शिंदे आपल्या सैन्याच्या जोरावर दू. बाजीराव यांना गादीवर बसणारच, म्हणुन नानानी तीच गोष्ट आपण स्वतः करण्याचे ठरवले जर असे केले तर शिंदे बाजूस पडतील, व दू. बाजीराव कदाचित आपल्या उपकाराने दाबला जाऊन आपल्या हाती येईल असे नानाचे ठाम मत झाले होते.

2.6.3. नाना फडणीस यांचे पुण्यातुन पलायन -

नाना फडणीस यांच्या सांगण्यावरून 15 फेब्रुवारी 1796 रोजी परशुराम भाऊ चिमणाजी यास आणण्यासाठी गेले. पण पुढे दू. बाजीराव याने स्पष्ट शब्दात सांगिले की, 'आपण जेष्ट असताना आपण लहान, अज्ञान चिमणांजीना गादीवर बसवणे हा अन्याय ठरेल'. दू. बाजीरावाने यावेळी आपला पेशवाईवर पुर्ण पणे हक्क सांगितला होता. तो जर मान्य नसेल तर आपण व बंधु चिमणाजी आह्या त्या स्थिती नानाच्या कैदेत राहण्यास तयार आहेत. नाना फडणीस यांचे दत्तक विधान हे धर्मशास्त्रला धरुन होणार नाही हे भाऊला पटवून सांगितले. आपल्या न्याय हक्काला मान्यता दिली जावी अशी मागणी पटवर्धन भाऊ कडे केली. यासुमारास दौलतराव शिंदे पुण्यास येण्यास निघाले होते त्यांनी प्रथम दूसरा बाजीराव यांच्या जुन्नर या ठिकाणी जाण्याचे ठरवले होते. ही बातमी नानाला कळाली तेव्हा आता बाजीरावर जर शिंदेच्या हाती लागला तर पुण्यात असणारी आपली सत्ता, ताकद या सर्व गोष्टीना सुरुंग लागणार असे नानाना वाडले होते. जर दूसरा बाजीरावाला हातासी

धरले तर आपली सत्ता टिकेल असे नानानी ठरवले. ऐकेकाळी काहीही झाले तरी दूसरा बाजीरावास गादीवर बसवायचे नाही असे म्हणणाया नानानी शेवटी दू. बाजीरावाला गादीवर बसवण्याचे मान्य केले. बाजीराव पण पेशवे पदासाठी उत्सुक झालेला होता. नानाचे हो ना करता-करता त्यांनी शेवटी दू. बाजीराव यांना काही अटी घातल्या होत्या त्या साधरण चार अटी होत्या त्या बाजीरावाने मान्य केल्या. त्यानुसर ''मागील सर्व हेवे दावे, सर्व गोष्टी दोघानीही विसरून जावे, यावेळी बाजीराव यांनी नानाना सांगितले की तुमचा व तुमच्या बरोबरील सर्व मंडळीशी वाईट होणार नाही. मी तुम्हांकडेच कारभार ठेवून सर्व काही तुमच्या मर्जिने करील.''[32] ह्या अटी म्हणजे नानाने आपल्या मार्ग मोकळा करुन आपली सत्ता कायम राखली. या गोष्टी मुळे दू. बाजीराव पुण्याच्या रोखाने निघाले ते 26 फेब्रुवारी 1796 मध्ये पुण्यात खडकी येथे येऊन थांबले. यावेळी बाजीरावाची पेशवा बनण्याची इच्छा असली तरी पण त्याचे मन यावेळी दोन धारेवर उभे होते. नाना फडणीस यांनी बाजीरावाने लगेच शनिवारवाटयात यावे असा आग्रह धरला होता. पण बाजीरावाने त्याना आपण मुहूर्त पाहुन येऊ असे सांगुन ते तेथेच थांबले. दूसरा बाजीराव यांनी सर्व सरदारांचा पाठीबा मिळवण्यासाठी व दौलतराव शिंदे यांची पुण्यात येण्याची वाट पाहत होते. शिंदे पुण्यात बाजीराव यास मदत करण्यासाठी येणार आहे हे नानाला समजताच नाना शिंदेच्या धाकाने अत्यंत अस्वस्थ झाले. नाना यांनी बाजीरावास आपल्या एकमेका विषयी परस्परांच्या निष्टा, संशय किंवा अविश्वास बाळगणार नाही, दोघानाही कोणत्याच प्रकारची इंजा होणार नाही असे कृत्य बाजीराव किंवा स्वतः नाना करणार नाही असा करार नानाने यावेळी बाजीराव यांच्या कडून करुन घेतला. नानाने घाईघाई बाजीरावाला पुण्यात आणले खरे पण त्याचा काही उपाय होताना दिसेना. नानाच्या या कारस्थानाचा 'बाळोबा तात्या व जिवबादादा लाड' शिंदेचे विश्वासू सरदार व सल्लागार यांना आला होता. यांना नानांच्या स्वभावाची व सर्व कारस्थानाची बातमी होत होती. नाना यांनी शिंदेना पुणे दरबारात कोणतेही हक्क देण्यास कायम मना करत असे त्यांनी शिंदेचे वर्चस्व वाढून दिले नाही. नानानी महादजी शिंदे यांच्या काळापासून अनेक वेळा त्यांचा घात करण्याचा प्रयत्न केला

होता. शिंदेच्या या दोन सरदारना नानाचा चांगलाच संशय येत होता. नानाच्या चालू असलेल्या सर्व कारस्थानाचा सुगावा त्याना लागलला होता. यामुळे शिंदेना आता बाजीरावाकडून कोणतीच आशा राहणार नव्हती आपल्याला ठरल्या प्रमाणे रोख रक्कम व जहागीर मिळणार नाही. यामुळे तात्या व लाड यांनी शिंदेचे नाना विरोधी कान भरण्यास सुरवात केली. शिंदे पुण्यात येणार यामुळे नानाची चांगलीच चलबिचल झाली. पटवर्धन भाऊ यांनी नानाचा पक्ष धरलेला असल्यामुळे त्यांनी नानाना कायम आधार देण्याचे काम केले. ऐवढेच काय वेळ प्रसंगी आपण शिंदेशी दोन हात पण करण्यास तयार आहोत तुम्ही धिर सोडू नये असे पदोपदी नानाना सांगत होते. पण नानाना शिंदेच्या सैन्याचा, व आपल्या हातातील सत्ता जाण्याची भिती वाटण्यास सुरवात झाली. नानाना शिंदेच्या ताकतीची चांगलीच कल्पना होती. त्यामुळे नानानी 21 मार्च 1796 रोजी पाच हजार सैन्यानिशी साताराच्या दिशने जाण्यास निघाले. ''वीस वर्षोपुर्वीचे आणि आताचे नाना फडणीस ह्या दोन वेगळया व्यक्ति यावेळी दिसल्या, राष्ट्रप्रेमाने प्ररित झालेले हे नाना फडणीस नसून स्वतःच्या स्वार्थाखातर राष्ट्रहितावर निखारा ठेवणारा नाना फडणीस आता जन्माला आलेले होते.''[33]

2.6.4. दौलतराव शिंदेचे कारस्थान व चिमणाजी यांना पेशवेपद -

नाना फडणीस पुणे सोडून गेल्यामुळे आता दूसरा बाजीराव यांला पुणे मोकळे झाले होते. दू. बाजीराव व दौलतराव शिंदे दोघेही पुण्यात आले. यावेळी दू. बाजीराव छत्रपतीकडे पेशवईची वस्त्रे आणण्यास निघाले पण शिंदे यांनी त्यास जाऊ दिले नाही. करारात ठरल्या प्रमाणे पंचवीस लाख रुपये ताबडतोप दयावे ही मागणी केली. यासुमारास शिंदेना दूसरा बाजीराव यांचा दुपट्टी स्वभाव दिसू लागला बाजीराव यांनी शिंदे यांच्याशी उघड विश्वासघात केला. प्रथम शिंदे यांच्याशी बोलणी सुरू केली आणि आयत्या वेळी नानाची मदत घेतली व ऐन वेळी शिंदेशी विश्वास घात केला. दू. बाजीराव यांनी शिंदे यांना चांगलेच तोडघसी पाडले या मुळे बाजीरावाला आता गादीवर बसवायचे नाही हे शिंदेनी ठाम केले होते. नाना फडणीस पुण्यातून निघुन गेले पण ते जाताना मोकळया हाताने गेले नाही त्यांनी सर्व सरकारी दिजोरी मोकळी करूल गेले होते. तिजोरी मोकळी

असल्या कारणाने दू. बाजीराव शिंदेच्या पैसा देऊ शकत नव्हते तसेच ते पुण्यात नानाच्या मदतीने आले होते यामुळे त्यांनी नानाचा पक्ष लावून धरला होता. तसेच नानाच्या ताब्यात यावेळी मराठी साम्राज्याचे संस्थापक साताराचे छत्रपती होते. त्यामुळे शिंदेनी नानास पकडूनये त्यांच्या विरुध्द कोणतेच पाऊल उचलु नये यासाठी बाजीराव वारंवार शिंदेना समजावत होता. शिंदे हे मराठी राज्याचे लष्करी सामर्थात परिपकव असलेले एक बलाढ योध्दा होता. त्यात शासनाचा कारभार कशा पध्दतीने चालवायचा यागोष्टीचा अनुभव व क्षमता नांना फडणीस यांच्यात होती. आणि अशा वेळी या दोघान शिवाय ऐवढया मोठया साम्राज्याची सत्ता चालणे आवघड आहे असे दू. बाजीरावाला कायम वाटत होते. त्यामुळे त्यांने या दोघान मध्ये कायम समजोत्यासाठी प्रयत्न करत असे. शिंदेना यात दू. बाजीरावाचा काही तरी डाव असल्याची शंका येऊ लागली होती. यामुळे बाजीराव कोणत्याच प्रकारे विश्ववास ठेवण्याच्या लायकीचा राहिला नव्हता. बाजीराव हा अतिशय बेभरवशी आहे हे शिंदेनी आता तर ओळखले होते.[34]

नाना पुण्यातुन पळून गेल्यामुळे त्यांचे समर्थक पटर्वधन भाऊ एकटे पडले, नानाच्या प्रतेक गोष्टीत त्यांचा चांगलाच हात खंडा असल्याकारणाने ते अता पुण्यात ऐकटे राहिले होते. यातच भाऊना पुण्याचे कारभारी पद आपल्या हाती येत आहे असे दिसल्या कारणाने त्यांची मती पालटली. नाना विरुध्द शिंदे यांच्या कारवाया त्याच प्रमाणे दू. बाजीराव बरोबरचे संबंध या सर्व गोष्टीला पटवर्धन यांनी तिलांजली देऊन टाकली. भाऊ यांनी शिंदेशी वैर करण्यापेक्षा शिंदेच्या या नवीन कटांत सामील होण्याचे ठरवले. तो नविन कट म्हणजे, शिंदे यांना कळून जुकले की दू. बाजीराव आपल्याला कोणत्याच प्रकारे मदत करणार नाही असे दिसून आले होते. पटवर्धन भाऊ शिंदेणा जाऊन मिळाले आणि भाऊ व बाळोबा तात्या यांच्यात गुप्त पणे वाटाघाटी झाल्या. भाऊनी व शिंदेनी यावेळी बाजीरावास पदावरुन काढून अज्ञान चिमणाजी यास पेशवा करायचे तसेच मृत पेशवा स. माधवराव यांच्या विधवा पत्नी च्या मांडीवर दत्तक देऊन मराठी साम्राज्याचा कारभारी परशुरामभाऊ यानां नेमायचे असे ठरले. शिंदेचा साहय्यक बाळोबा तात्या यांच्या मदतीने भाऊनी नाना यांचे सर्व मुलूख आपल्या ताब्यात घेणे, तसेच मराठी साम्राज्यात चालणारी

अनागोंदी गोंधळ, फंद फितूरी थांबवावी, या अटी जर पूर्ण झाल्या नाही तर भाऊ व बाळोबा यांनी मिळून हे सर्व करणे व नानाला मराठी साम्राज्या पासून दूर ठेवावे लागणार होते. नानाचे सातारा येथील सैन्य दूर करण्यासाठी भाऊ तयार झाले. शिंदेनी दू. बाजीरावाला कैद केले यामुळे त्यास पुन्हा कैद जाण्याची वेळ आली. या सर्व गोष्टी भाऊच्या हातात देऊन शिंदेनी भाऊ कडून 25 लाख रुपये रोख व निजामाकडून वसुल करायच्या खंडणीतून 75 लाख रुपये शिंदांना दयावे, पुणे दरबारात भाऊचे बस्तान स्थिर झाले की शिंदेनी उत्तरेत निघुन जावे असा करार पटवर्धन भाऊ व शिंदे यांच्या मध्ये झाला.[35]

पटवर्धन भाऊनी बाजीराव यास अटक करण्यासाठी तसेच चिमणाजीस बाजीरावाच्या तावडीतून सोडवण्यासाठी त्यांनी धुर्तपणे बाजीराव यास शिंदेशी बोलणी करण्यात अडकवून ठेवून जून्नर येथून चिमणाजी यास जबरदस्तीने भाऊ पुण्यात आले आणि यानंतर लगलेच बाजीरावाला शिंदेनी कैद करुण घेतले. भाऊनी यावेळी चिमणाजी यांचा शास्त्री पंडितंकडून 25 मे 1796 रोजी यशोदाबाई यांना दत्तक देऊन दत्तकविधान करुन घेतले. भाऊनी चिमणाजीला 2 जून 1796 रोजी पेशवे पदाची वस्त्रे दिली. पेशवा सावाई माधवराव यांच्या मृत्युनंतर साधारण सात महिन्यांनी मराठी सत्तेला पेशवा मिळाला.[36]

दौलतराव शिंदेनी नानाला कैद करुन त्यांची सर्व संपत्ती जप्त करून घेण्याचा विचार भाऊ पुढे मांडला होता, पण या विचाराला भाऊनी विरोध केला कारण नानाशी मित्रेचे संबंध चांगल्या प्रकारे होते.[37] म्हणुन भाऊनी त्याना शासनातून दूर ठेवावे, त्यांना राजकारणात ढवळाढवळ करुन देऊ नये. आणि त्यांना वाटेल त्या ठिकाणी निवृत्त जीवन जगण्यासाठी राहू दयावे. याप्रकारे त्यानी शिंदेची समजुत काढली आणि शिंदे यांनी ते मान्य केले. नानाची समजुत घालण्यासाठी भाऊ यांचे चिरंजीव महादजीपंत दाजी याना सातारा येथे पाठवले पण नानाच्या मनात वेगळाच समज निर्माण झाला त्यांना वाटले की हे सैन्य आपल्याला पकडण्यासाठी येत आहे म्हणुन त्यांनी तेथुन पळ काढला दाजी यांच्या हाती न लागता ते महाड येथे गेले व तेथे त्यांनी आपल्य पुढील कार्यची आखणी करण्यास

सुरवात केली.

2.6.5. नाना फडणवीसाचे कारस्थान व पेशवेपद दूसरा बाजीराव यांच्याकडे -

पेशवेपदी चिमणाजींची स्थापना झाल्याने सात महिण्याची राजकीय अस्थिरता, उलथापालथ, कटकारस्थाने संपून शेवटी पेशवाईला धनी मिळाला आणि वारस प्रकरणावर पडदा पडले असे काही अंशी वाटले होते. परंतु ती स्थिती जास्त वेळ तसी राहिली नाही नाना फडणीस गप्प बसून मान्य करतील काधीच नाही आणि मुकाटयाने शासनातून दूर होतील अशक्यच होते. पेशवाईला वारस शोधण्याच्या नाटयाचा शेवटचा अंक मराठा राजकारणाच्या रंगमंचावर आता खया अर्थाने उभा राहिला होता.

नाना फडणीस पुण्यातून जे निघुन गेले ते पुढे सातारा येथे छत्रपतीस भेटण्यासाठी आले. नानाच्या डोक्यात यावेळी आपले सर्व विरोधक परास्त करुन मराठी सत्ता आपल्या हाती असावित यासाठी त्यांनी एक कट रचण्याचा प्रयत्न केला होता. तो म्हणजे ''सातारा येथील छत्रपतीनी पेशवाईच बरखास्त करावी, व मराठा राज्याचे केंद्र सरकार, सातारा येथे छत्रपतींच्या नामधारी छत्रखाली, पण नानाच्या नियंत्रणाखाली स्थापन करावे अशी सूचना त्यांनी छत्रपती यांना केली होती. फौज उभारणीसाठी नानाने छत्रपती यांना एक कोटी रुपये देऊ केले होते. परंतु सन 1790 मध्ये नानानीच छत्रपती यांचे सर्व राजकीय आधिकार काढून पेशवायीस दिले होते. त्यामुळे छत्रपतीच्या मानात नाना यांच्या विषयी चांगलाच राग निर्माण झाला होता. काहीतरी स्वार्थ आहे असे साताराच्या छत्रपतीच्या मनात आले व त्यांनी या गोष्टीला साफ विरोध केला.''[38]

नानानी सातारा येथे न थांबता त्यांनी छत्रपती चा निरोप घेऊन पुढे ते महाड येथे निघुन गेले. पुढे त्यांनी पेशवा पदासाठी आपल्या मर्जितील व्यक्तिची निवडकरण्यासाठी हालचाली सुरु केल्या. याच सुमारास निजाम यास वेगळाच धाक उभाराहीला तो म्हणजे, पुण्यात दौलतराव शिंदे आपल्या विरुध्द खडर्याच्या तहाची कलमे पुर्ण करून घेतील अशी धास्ती निर्माण झाला. आणि निजामाने शिंदे विरुध्द नाना यांना मदत करण्याचे ठरवले त्याच पध्तीने नानानी नागपूरचे भोसले यांना अमिश दाखवून त्यांना आपल्या गोटात सामिल करून घेतले. त्यानंतर नानानी इंदूरचे तुकोजी होळकर, कोल्हापूरचे छत्रपती

यांच्याशी संपर्क केला व त्यांना आपल्या गटात सामिल करून घेतले. नाना फडणीस यांनी आनखिन एक चाल खेळली ती म्हणजे मुंबईत असणारे ब्रिटिश सैन्य यांची मदत घेण्याचे ठरवले. नानाच्या या सर्व हालचालीची बातमी दौलतराव शिंदे यांना समजताच त्यांनी हळूहळू आपले पावले मागे टाकण्यास सुर्वात केली. नाना यांचा आजपर्यंत ज्या गोष्टीला पुर्ण विरोध होता तीच गोष्ट त्यांना भविष्यात करावी लागली ती म्हणजे, ब्रिटिशांशी आपल्या संरक्षणासाठी मदत घेण्याची गरज नाना भासली ब्रिटिशांना ज्या गोष्टीची आवशकता होती तीच गोष्ट त्यांच्या पुढे येऊन उभी राहिली. यामुळे ब्रिटिशांना आपला पाय मराठी साम्राज्यात रोवण्यास महत्वाची व्यक्ति व संधी दोन्ही चालुन आल्या होत्या. ब्रिटिशांनी यावेळी शिंदे यांच्या विरुध्द नानाना पाठिंबा देण्यास एकदम तयार झाले. तसेच जमेल त्या मार्गाने मराठा राज्यात चंचूप्रवेश करण्यास ते उत्सकु झाले होते. त्यामुळे नानानी ब्रिटिशांशी बोलणी करताच त्यांनी लगेच पाठींबा दर्शवला नानाच्या राजकारणाचा चांगला अनुभव पुण्यातील ब्रिटिश आधिकारी वर्गाला आला होता. दूसरा बाजीराव यांना गादीवर बसवून शासन पुर्ण पणे नानांच्या हाती राहावे, त्याकरिता आवश्यकतेनुसार नानांना ब्रिटिशांनी लष्करी मदत करावी या बदल्यात दू. बाजीराव यांनी पेशवेपदावर आल्यावर ब्रिटिशांना 25 लाख रुपये उत्पन्नाचा प्रदेश तोडून द्यावा असा करार नानांनी ब्रिटिशांशी केला. हे सर्व ठरल्यानंतर ब्रिटिश कंपनीने नाना फडणीस यांना युध्दासाठी वापरण्यास साष्टीचा किल्ला खाली करुन दिला.[39] हे सर्व शिंदेना समजताच त्यांना चांगलाच घाम फुटला ह्या सर्व गोष्टीचा कर्ताधरता नाना आहे हे शिंदेना समजले होते. दौलतराव शिंदे यांना बाळोबा तात्या यांनी नाना फडणीस यांच्याशी वौर घेऊ नये असे सांगुन, आपल्यावर संकट ओढून घेऊ नये ही महत्वाची गोष्ट त्यांनी शिंदेना सांगितली होती. नाना फडणीस यांना शिंदेना दुखवायचे नव्हते म्हणून त्यांनी शिंदेशी बोलणी करण्यास सुरवात केली. नानाच्या बुध्दीची कमाल म्हणवी लागेल. दौलतराव शिंदे यांना बाळोबा तात्या यांचा कारभार मोठा वरचढ वाटत होता. शिंदे यांचा सर्व कारभार बाळोबा तात्या आपल्या मर्जी प्रमाणे पहात होता. याचाच फायदा नाना फडणीस यांनी घेण्याचे ठरवले व दौलतराव शिंदे यांचे मन नाना बाळोबा तात्या विरुध्द करून दिले. पेशवा प्रकरणात दौलतराव शिंदे यांचा

कारभारी ‘बाळोबा तात्या पागनीस’ यांचा मुख्य हात असल्याचे कळताच नानानी बाळोबा यांना दौलतराव शिंदे यांनी कारभारी पदावरून दूर करावे व त्यांना कैदेत टाकावे असे सांगितले तसेच दूसरा बाजीराव यांस पेशवेपद देण्याची मान्यता दयावी. आणि याचा परिणाम असा झाला की, नानानी दौलतरावास अश्वासन दिले आपल्याला कोणताही विरोध होणार नाही तसेच या मोबदल्यात आपल्याला अहमदनगरचा किल्ला व दहा लाखच्या जहागिरीचे तसेच दोन कोटी रुपये देण्याचे अमिश दाखविले बाजीराव गादीवर आल्यानंतर शिंदेना हे सर्व देण्याचे ठरले. शिंदे यांना चिमणाजी यांच्या कडून पैसा मिळणे मोठे कठीण काम होत. यामुळे शेवटी दौलतराव शिंदे यांनी नानाच्या या अटीना संमती दिली. तर आपल्याला यांचा चांगलाच लाभही मिळेल असे शिंदेना वाटले होते. यामुळे शिंदे नानाच्या या योजनेला अनुकूल झाला. बाजीरावाची वर्कदृष्टी आपल्यावर नको म्हणून दौलतराव शिंदे आपल्या फायद्यासाठी तयार झाला, व शेवटी दू. बाजीराव यांना पेशवा बनवण्याचे मान्य केले.[40]

अखेर चिमणाजीला पेशवे पदावरून बाजूल करून नानाच्या धोरणाला प्रत्यक्ष वेगळेच वळण मिळाले. परशुरामभाऊ व बाळोबा तात्या याना शिंदेनी अटक करुन घ्यावे असे ठरले होते. मात्र यानंतर परशुरामभाऊ चिमणाजीला घेऊन पळुन गेले. तेव्हा नानानी निजामाचे व होळकर यांचे सैनिक भाऊना पकडण्यासाठी त्यांच्या मागावर पाठवले त्यांना लवकरच पकडण्यात आले. यावेळी शिंदेनी दूसरा बाजीराव यांना पुण्यात आणले त्याच बरोबर नाना पण पुण्यात आले. आणि शेवटी दूसरा बाजीराव यांचे स्वप्न पुर्ण होणार होते. यानंतर सातारा छत्रपती यांच्या कडून पेशव्याची वस्त्रे आणुन 5 डिसेंबर 1796 रोजी दू. बाजीराव यांना पेशवा पदावार बसवण्यात आले. आणि नाना यांच्या हातात पुन्हा कारभारी पद आले. यालाच ‘महाडचे कारस्थान’ असे म्हणतात. यावर इतिहासकार वासुदेव खरे - म्हणतात ‘अशा या आपणाशी व परस्पाशी शत्रुस्थानी वागणाया सत्ताधीशांना ज्या सूत्राने एकसूत्रीत केले त्या नाना फडणवीसांच्या बुध्दिमत्तेची तारीफ काय करायची.’ यावर इतिहासाचे गाडे अभ्यासक, इतिहासकार सरदेसाई लिहतात - ‘इंग्रजांच्या वर्चस्वाची

आपत्ती टाळावी व मराठा राज्यांचे स्वातंत्र्य कायम राहावे म्हणून नानांनी महाडचे कारस्थान रचले. मात्र त्यातुन राज्यास किंवा नानास काहीच फायदा झाला नाही. उलट तेजोभंग, द्रव्यापहार, अखंड चिंता याचे चक्र त्यांनी आपल्या मागे लावून घेतले. त्यातून पुढे मृत्युनेच त्यांची सुटका केली.'[41]

2.7. मराठयांचा दूसरा बाजीराव यांच्याकडून झालेला भ्रमनिराश -

मराठी राज्याच्या इतिहासत दूसरा बाजीराव हे एका निर्णयावर न थांबनारा तसेच स्वतःच्या मर्जि प्रमाणे वागणारा पेशवा मराठी साम्राज्याला लाभला होता. तसे पाहता बाजीरावास पुढे अनेक संकटाना तोड द्यावे लागले होते. सत्तेवर येण्यासाठी अनेक कारस्थाने केली त्यासाठी त्यांना अनेक वचणे दयावी लागली होती. ती पुर्ण करण्यासाठी बाजीराव हा नाना व शिंदे या दोन शक्तिशाली नेत्यांच्या कात्रीत सापडला होता. बाजीराव स्वतःअगदीच असहाय्य होता कोणत्याही सरदाराचा राजकीय पाठिंबा, पैसा, लष्करी सामर्थ्य, यापैकी त्यांच्याजवळ काहीच नव्हते. बाजीरावाला कोणत्याच गोष्टीचा अनुभव नव्हता त्याला सर्वच बाजूनी नुसता विरोध व कटकारस्थाने याशिवाय काहीच दिसत नव्हते. त्यातच अनखीन एक संकट बाजीरावा पुढे ऐऊन उभे राहिले ते म्हणजे पेशवा यांचे थोरले बंधू म्हणून शासनाची सूत्रे आपल्या हाती असावीत अशी आशा बाळगणारे व रघुनाथराव यांचे दत्तकपुत्र अमृतरावा होय यांनी यावेळी अनेक उलटसुलट कारस्थाने सूरू केली. बाजीरावर यांच्यावर नानाची कायमचीच करडी नजर होती. त्यात महत्वाचे म्हणजे नाना व बाजीराव यांच्यात सलोख्याचे कोणतेच संबंध राहिलेले नव्हते. यानंतर मात्र बाजीराव यांने आपल्या डोक्याने वागण्यास सुरवात केली आणि ती म्हणजे दौलतराव शिंदे यांना आपल्याकडे सामिल करण्यासाठी प्रयत्न चालु केले आणि शेवटी त्या प्रयत्नाला यश आले. शिंदेचे वागणे बाजीराव यास आवडले होते कारण, शिंदे यांच्याकडून कधीच अपमानास्पद वागणून बाजीरावास मिळालेली नव्हती. उलट बाजीरावस शिंदेचे उत्तरहिंदूस्थानात असलेले वर्चस्व यामुळे या सर्वाचा आदर वाटत होता. आपले संरक्षण आता शिंदेच करती हीच आपेक्षा बाजीराव यास राहिली होती. मनात असे आसतानाही त्यांना ऐकिकडे नाना यांना कोणत्याच प्रकारे दुखःवायचे नव्हते.

खडर्याच्या लढईसाठी पुण्यात आलेल्या फौज हया दोन वर्षा पासुन पुण्यात होत्या, त्यांचा खर्च मोठया प्रमाणात वाढतच होता या परिस्थीती सैन्याचे मोठया प्रमाणात हाल होण्यास सुरवात झाले होती. महाडच्या कारस्थानात ठरल्या प्रमाणे बाजीराव याने पेशवे पदावर येण्यासाठी जी वचने दिली होती ती पाळली जात नव्हती हे पाहून निजाम, रघुजी भोसले यांनी संयुक्त चढाईचा धाक दाखवला यानंतर बाजीराव वठणीवर आला. बाजीरावने निजाम व भोसले यांना कबूल केलेल्या प्रदेशाचे वाटप करून टाकले. शिंदेना त्याच्या हिस्सा यावेळी देण्यात आला होता. पण त्यात शिंदे यांना निम्मी रक्कम नंतर देण्याचे ठरले होते. सर्वाना वाटत होते शिंदे उत्तरेत निघुन जावे पण ते जायचे नावच घेत नव्हते. यासाठी त्यांना लगेच एक कोटी रुपये लागत होते आणि त्याचा सारखा तगात लावला होता. पण ऐवढा पैसा कोढून उपलब्ध करायचा म्हणून शिंदे पुण्यातच थांबले. राजकारणा पासून खूप दूर बसलेला बाजीराव सत्तेवर आला खरा पण बाजीराव जन्मापासुनच कैदत होता त्याला बाहेरील राजकाणाचा, प्रशासनाचा, शत्रु मित्र, या कोणत्याचा गोष्टीचा अनुभव नव्हता. कैदेतून बाहेर पडले ते लगेच पेशवा पदावर रुढ झाले. यावेळी राज्याची पुर्ण दिजोरी रिकामी झाली होती बाजीराव सरकारला चांगलेच आर्थिक संकटानी घेरले होते. पुणे दरबारात येवढा गोंधळ सुरू होता त्यातच बाजीरावाने फिरून अंदाधुन्द कारभार चालु केला त्याने यावेळी कोणाचेच ऐकायचे नाही असे जनु ठरवलेच होते. यावेळी बाजीराव यांनी नाना व शिंदे या दोघानाही बाजुला करून आपला कारभार आपण स्वतः करायचे ठरवले होते.[42]

2.8. शिंदे व होळकर नवीन कलहास सुरवात -

पुण्यात पेशवेदरबारी चाललेले हाल फार दयनीय होते पण याच वेळी मराठी साम्राज्याचे बलाढ जहागिरदार घराणे म्हणजेच होळकर घराण्यात धुमसत असलेली अंतर्गत भांडणे चव्हाटयावर आली. तुकोजी होळकर यांनी आपला पुत्र काशीराव यांना आपल्या गादीचे वारस नेमले. आणि यातच पेशवा दू. बाजीराव यांनी दौलतराव शिंदे यांचा विचारविमय घेऊन होळकर घराण्याचा वारस म्हणून काशिराव यांची नेमणुक केली. पण होळकर घराण्यातील महत्वाचे असणारे मल्हारराव या तुकोजीच्या दुसया मुलाला हे मान्य

नव्हते. त्यामुळे मल्हारराव यांनी आपल्या वडिलांचे वारस नसलेली मुले विठोजी व यशवंतराव यांचाही पाठीबा आपल्या बाजूने मिळवला होता. याच वेळी होळकर घाराण्यात एक वाईट गोष्ट घडली ति म्हणजे 'तुकोजी होळकर 15 ऑगस्ट 1797 मध्ये मृत्यु पावले.'[43] यामुळे होळकर घराण्याच्या या मुलांचे वारसाचे वैर आनखीनच वाढले आणि पुढे त्यांच्यात गृहकलह चालु झाला होता. याचा फायदा नाना फडणीस यांनी पुण्यात दौलतराव शिंदे व पेशवा दू. बाजीराव यांच्या विरोधी करायचे ठरवले होते. नानानी यावेळी मल्हाराव यांचा पक्ष उचलुन धरला होता. नानानी मल्हारावला पैसा देऊन त्यांना वेगळे सैन्य उभेकरण्याचे प्रोत्साहन दिले त्या बळावर त्याने दहा हजाराची फौज उभे केली. मल्हारराव यावेळी शिंदेच्या उत्तरे कडिल प्रदेशावर लूटमार करू लागला होता. पण याचवेळी दौलतराव शिंदे यांनी काशिराम होळकर यांच्याशी मैत्री करून मल्हाराव यांना आवर घालण्याचे ठरवले. पण यावेळी काशिराम यांना सुध्दा मल्हारराव यांना वेसन घालण्यासाठी शिंदेची मदत मागीतली यामुळे दोघाच्याही मने जुळली गेली. नाना फडणीस यांच्या बळावर मल्हारराव उडया मारत होता. त्याला वटणीवर आणण्यासाठी शिंदे पुढे आले मल्हारराव यास पकडण्यासाठी 14 सप्टेंबर 1794 रोजी मल्हारराव यांच्या गोटावर हल्ला केला पण त्या हल्यात मल्हारराव यांचा मृत्युव झाला यांच्या बरोबर असणारे त्यांचे भाऊ विठोजी व यशवंतराव हे येथुन निसटले पुढे त्यांनी आपला स्वतंत्र कारभार स्थापला यावेळी त्यांना नाना फडणीस यांनी पुर्ण पणे मदत केली व मल्हारराव यांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी प्रोत्साहन दिले.

यावेळी मराठी साम्राज्य मध्ये उ. हिंदूस्थानात दौलतराव शिंदे घराण्यात काय कमी कलह नव्हता. या सर्व कलहाला नाना फडणीस यांनी चांगलेलेच खतपाणी घालण्यास सुरवात केली होती. नानानी आपल्या राजकारणी धोरणाने एक शन पण स्वस्त घातला नाही. महादजी शिंदे यांचा दौलतराव शिंदे हा दत्तक घेतलेला मुलगा यांच्या हातात यावेळी शिंदे घराण्याची सर्व सुत्रे होती. यावेळी महादजीच्या तिन बायका लक्ष्मीबाई, भागीरथीबाई, यमुनाबाई यांनी दौलतरावाच्या विरोधात जाऊन त्यांच्या विरोधी बंड पुकारले याचे कारण म्हणजे त्यांची आर्थिक आडचण मोठया प्रमाणत वाढच चालली होती. पुढे ही अडचण

वाढत जाऊन सन 1797 मध्ये त्या पुण्यात आल्या यावेळी दौलतराव शिंदे यांचे सहकारी 'सर्जेराव घाडगे' यांनी त्यांची समजुत काढूली पण त्यात फळासे यश आले नाही. पुण्यात आल्यावर त्यांना खतपाणी घालण्याचे काम केले ते बाळोबा तात्या यांच्या समर्थकानी, हे सर्व समर्थक या वेळी शिंदेच्या बायांच्या गटात जाऊन मिळाले यामुळे शिंदे घराण्यात मोठया बंडाळया निर्माण होऊ लागल्या. नाना यांना शिंदेला पुर्ण पणे नमवायचे होते यावेळी दूसरा बाजीराव यांना पेशवपदावर बसवण्यासाठी शिंदेना जी रक्कम हवी होती ती नाना फडणीस देत नव्हते यामुळे फौजेचे मोठे हाल होऊ लागले होते. त्यासाठी दौलतराव यांला साठ लाख रु. ताबडतोप उभारणी करणे गरजेचे होत. आर्थिक अडचणीच्या सर्व गोष्टी बाजीराव व शिंदे यांना डोईजड होऊ लागल्या होत्या सर्वत्र गोधळ माजलेला होता या गोष्टीचा पुढे वाईट परिणाम होणार हे नक्की होते.[44]

नाना फडणीस यांनी यावेळी अमृतरीवाना आपल्या बाजुला वळुन घेण्याचा प्रयत्न केला त्यांत त्यांना चांगले यश आले पुढे शिंदेच्या बाह्यांचा कळप हा अमृतराव यांच्या आश्रयाला गेला रागाने लाला झालेल्या शिंदेनी त्यांच्या गोटावर हल्ला केला. यामुळे अमृतराव यांचे शिंदे यांच्या विरुध्द चांगलेच नाराजीचे सुर उमटु लागले होते. दू. बाजीराव यांनी यावेळी अमृतराव यांना कोणतीच मदत केले नाही. शिंदे व दू. बाजीराव यांच्या बद्दलच्या समान शत्रुत्वाने नाना व अमृतराव हे दोघेही त्यांच्या विरुध्द एकत्र आले यांच्यात कट शिजू लागला तो म्हणजे, बाजीरावाला दूर करुन अमृतराव यांचा अज्ञान पुत्र विनायकराव याला गादीवर बसवायचे असे ठरवण्यात आले व राज्याची सर्व जबाबदारी नाना व अमृतराव यांनी संभाळायची असे ठरले. हया सर्व गोष्टीचा बाजीराव यास सुगावा लागताच तो पुर्ण पणे गोंधळात पडला आणि बाजीरावाच्या मनात नाना बद्दल शंका येण्यास सुरवात झाली.

2.9. नाना फडणीस यांना अटक व सुटका -

दूसरा बाजीराव यांना नाना फडणीस यांचे पुण्यात शिजत असलेले राजकारण याची माहिती झाली होती. मराठी सत्तेला पेशवा मिळाला पण नानाच्या इच्छे प्रमाणे घडत नसल्या कारणाने नाना चांगलेच नाराज झाले होते. दू. बाजीराव यांनी

आपल्या वडीलांचे (रघुनाथराव) यांचे सर्व समर्धक जे कैदेत होते त्यांना मुक्त केले ते नानाचे पक्के विरोधक होते. दू.बाजीरावाला पेशवाईची चांगलीच हावा लागली कोणतेही निर्णय आपल्या मना प्रमाणे घेत असे व वाटेल त्या पध्दतीने वागत. बाजीरावाने नानास राजकारनातुन दूर ठेवण्याच्यास सुरवात केली ती म्हणजे नानाने आपल्या बुध्दीबळावर महाडचे कारस्थान रचत असतांना इकडे पुण्यात दू. बाजीराव यांनी आपल्या अक्कल हुशारीने नानाला एक प्रकारे झटकाच दिला होता आणि तो म्हणजे, दौलतराव शिंदे यांच्याशी एक गुप्त करार केला त्यानुसार शिंदेना दोन कोटी रु. देऊण त्यांना आपल्या जवळ थांबून ठेवले कारण शिंदेची लष्करी ताकद जांगली होती यामुळे दौलतराव शिंदे यांचा तलवारीचा आधार बाजीरावारा सर्वात जास्त जवळचा वाटत होता. त्यांच पध्दतीने नानाची मुसूद्दी पणाची भिती दू. बाजीराव यांच्या मनात कायम घर करून हाती. पुण्यात यावेळी दौलतराव शिंदे मिळेल त्या मार्गने संपत्ती मिळवत होते. पण त्याला पैसाची जनचन चांगलीच भासू लागली होती.[45] नानानी पेशवा दू. बाजीराव व दौलतराव शिंदे यांची आर्थिक कोंडी करुन त्यांना जेरीस याणण्याचे काम चालवले होते. हैद्राबादचा निजाम, मुंबईतील ब्रिटिश, अमृतराव व यशवंतराव होळकर यांच्याशी नाना फडणीस यांनी आपल्याला लष्करी सामर्थ मिळवण्यास आरंभ केला. तो म्हणजे म्हैसूरच्या टिपू सुलतान यांच्या विरोधात ब्रिटिशाना मदत करून त्या बदल्यात निजाम व ब्रिटिश याचे सैन्य आपल्या मदतीला घेण्याचे नानानी ठरवेल होते. या सैन्याचा फायदा म्हणजे होळकर यांना शिंदे विरुध्द मदत होणार होती. तसेच शिंदे यांच्या घरच्या भांडणात आग लावण्याचे जे काम नानानी चालू केले होते. हया सर्व गोष्टी दौ. शिंदेना व पेशवा दू. बाजीरावाना चांगल्या प्रकारे खटकल्या होत्या. या सर्व कारस्थाना मागे नाना फडणीस यांचा हात आहे असे शिंदे व पेशवा यांना वाटले म्हणून त्यांनी नाना फडणवीस यांना कैद करण्याचे ठरवले. शिंदे यांनी नाटक करून अपण उत्तर हिंदूस्थानात परत जाणार असल्याने भासवून नानानी भेटून जावे यासाठी नानाला तयार करण्यात आले. पेशवा व शिंदे यांनी आपला लष्करी अधिकरी ‘मायकेल फिलोज’ यास नानाची सुरक्षा करण्याचे सांगितले पण मायकेल यास फक्त नानाच्या सुरक्षिततेची हमी घेतल्याचे नुसते दाखवायचे होते. ऐवढे असताना नाना

यांना कोणतीच शंका आली नाही म्हणून नाना शिंदेच्या गोटात भेटीसाठी गेले असता त्याना धोक्याने '31 डिसेंबर 1797 रोजी मायकेल याने कैद केले'.

पुण्यात गोंधळ निर्माण झालेला असताना नानाला अटक करुन पुण्यातील गोंधळ थांबेल असे पेशवा व शिंदे यांना वाटत होते पण तसे झाले नाही सर्वच फासे उलटे पडले. नानाला अटक झाल्याने शिंदे उद्दमापणा करण्यास पुर्ण पणे मोकळा झाला. यावेळी शिंदेचा गटात त्यांचे अति विश्ववासू सर्जेराव घाटगे यांचे प्राबल्य वाढले होते. यावेळी पेशव्याना ते आगदी कसपटा प्रमाणे समजु लागले शिंदेनी व पेशवा यांनी पुण्यात चांगल्याच प्रकारे धुळधांड चालवली होती. अनेकाना त्रास देत होते त्यांनी या त्रासत नानाची सर्व संपती जस्त केली तसेच त्याच्या ताब्यात असणारे किल्ले यांच्या सोडचिठ्ठया घेतल्या. शिंदे यांचे वर्चस्व पुणे दरबारात वाढले यामुळे बाजीराव पुर्ण पणे हैरान झाला यातच नानाचे समर्थक असणारे दक्षिणेतील सरदार वर्ग रास्ते, पटवर्धन यांच्या पदरी असलेल्या फौजाचा बंदोबस्त करण्याचे दौ. शिंदे यांनी पेशव्याला सुजवले यावेळी पेशव्याला शिंदेचा दोष ओढून घ्यायचा नव्हता त्यांना कोणत्याही मार्गाने पैसा मिळवायचा होता. शिंदे कडे वजनदार असा सर्जेराव घाडगे सोडले तर कोणी राहिला नव्हता. सर्जेरावने आपल्या मुलीचे लग्न दौलरावर शिंदे यांच्या बरोबर लावून दिले यामुळे सर्जेराव हा दौलतराव यांच्या गळयातील ताईत बनला शिंदे यांनी सर्जेराव यांच्या मार्फत वाटेल त्यामार्गने पुण्यात पैसा वसुल करण्यास सुरवात केली. तीन चार महिन्याच्या सर्जेरावाच्या जुलुमी व क्रूर दडपशाहीमुळे पुण्यात अनागोंदी व अत्याच या घटनाना मोठया प्रमाणात सुरवात झाली होती. या भयानक प्रसंगामुळे जनतेला अनेक हाल अपेस्ट सहन कराव्या लागल्या.[46]

नानाला कैद झाल्यावर बाजीरावाने अमृतराव यांना सरदारांच्या आग्रहामुळे कारभारी नेमले होते ऐकिकडे शिंदेच्या उत्तरेकडील घरण्याची यादवी मोठया प्रमाणात वाढत चालली होती. त्यातच 'अमृतरावाने दौलतराव शिंदे विरूध्द वरसा हक्कासाठी मैदानात उतरलेल्या बायांचा पक्ष घेतला, यात शिंदे यांच्या शत्रुनी बायांना पाठीबा दिला' तेव्हा दोलतराव शिंदे यांचा गैर समज निर्माण झाला की, या सर्व कारस्थाना मागे अमृतराव व

पेशवे यांचा सहभाग असल्याचे त्यांना वाटले होते. तसेच पुण्यात यावेळी सर्जेराव घाडगे यांच्या अन्याय, अत्याचारांना पेशव्यांनी कडाडून विरोध केल्या होता. या सर्व गोष्टीना दौलतराव शिंदे चांगलेच जेरीस आले होते. आणि वैतागलेल्या शिंदे यांनी या परिस्थितीत उत्तर हिंदूस्थानात जाण्याचे ठरवले पण फौज घेवून जायचे तर फौजेसाठी पैसा लागत होता तो शिंदे जवळ नव्हात. असाह्य पेशवा यांच्या जवळ त्यावेळी सत्ता होती पण पैसा नव्हता. शिंदेनी राज्यात केलेली लुट, बाजीरावाने केलेला ऐसआराम या सर्व घटना आणि त्यातच पुण्याचे झालेले नुकसान लूटमार या सर्व गोष्टीनी शिंदे व पेशवा यांच्या दोघाच्याही डोक्या वरून पाणी जाऊ लागले होते. त्यातच पेशवा दू. बाजीराव दौलतरावा यांच्या वरचडपणावर उपाय शोधत होता. म्हणुन त्याने पुण्यातील ब्रिटिश वकिल पामर यांच्यामार्फत शिंदेसी सलोख्याचे बोलणे लावले होते. पण ते शिंदेनी झिडकारून टाकले. याच दरम्यान एक महत्वाची घटना घडली ती म्हणजे, "एप्रिल 1798 मध्ये अत्यंत आक्रमक वृत्तीचा हिंदूस्थानातील ब्रिटिश व्यापारी कंपनीचा आधिकारी गर्व्हनर जनरल लॉर्ड वेलस्ली यांची निवड हिंदूस्थानात झाली होती."[47] त्याने कंपनीचा भारतातील सर्व कारभर आपल्या हाती घेतला होता. महत्वाचे म्हणजे त्यांचे धोरण विस्तारवादी, वेगवाण स्वरूपाचे होते त्याच्या धोरणा मुळे मराठी मंडळी पुर्ण पणे गोंधळून गेले होते. ब्रिटिश यावेळी म्हैसूरच्या टिपूचे परिपत्य करण्यासाठी मराठयांचा आपल्याला उपयोग होईल असे ठरवले होते. हैद्राबादचा निजाम यांच्या बरोबर ब्रिटिशांनी तैनाती फौजेचा करार करुन त्यांना आपल्या ताब्यात ठेवण्याचे प्रयत्न चालू केले व तसेच मराठयांनी करावे असे ब्रिटिश वकिल पामर वारंवर पेशवा बाजीराव यांना डिवचत होता.

या वाईट काळात पेशवा व शिंदे या दोघानाही नाना फडणीस यांची गरज भासू लागली होती. प्रथम दोघानाही नानाने राज्यकारभार करू नये असेवाटत होते. पण अनुभवा शिंवाय राजकारण नाही. पेशवा दू. बाजीराव व दौलतराव शिंदे हे दोघेही कमी अनुभव असल्या कारणाने त्याच्या हताबाहेर ही सर्व परिस्थिती गेल्यावर दोघानी आप-आपल्यापरिणे विचार करण्यास सुरवात केली. शिंदे यांच्या कडु अनुभवा मुळे, तसेच

ब्रिटिशाच्या पेशवा भोवती वाढता चाच यामुळे आता नानाची सुटका करणे हे दोघानाही गरजेचे वाटत होते. दौलतराव शिंदे यांना पैसाची मोठी चनचन होती व उत्तरेतील बायांचा प्रश्न गंभिर झाला होता. शिंदे यांचा या गोष्टी पुढे काही निभाव लागेना यामुळे त्या दोघानाही नानाची गरज भासु लागली. या सर्व आडचणीतुन नाना बाहेर काढतील असे दोघानाही वाटत होते आणि शेवटी दौलतराव शिंदे यांनी पेशवा यास नानाला कैदेतुन मुक्त करवे असे सांगुन सन 1798 मध्ये नानाची सुटका केली. व पुन्हा नानाची कारभारी पदावर नेमनुक झाली. नानानी कारभारी म्हणुन सर्व कारभार आपल्या हातात घेतला परंतु मनातुन पूर्ण पणे उदास होते.[48]

2.10 टिपू व ब्रिटिश यांच्या युध्दामुळे मराठयांची स्थिती -

मराठयाच्या राज्यात मोठा गोंधळ चालु असताना ब्रिटिशांनी हळूहळू मराठयाच्या राज्या भोवतालची सर्व परिस्थिती आपल्या बाजूने तयार करण्यास सुरवात केली. खडर्याच्या युध्दानंतर काही काळातच ब्रिटिशांनी निजाम यास आपल्या जाळयात ओढून त्यांनी त्याला आपले अंकीतच बनुन टाकले. निजाम यांच्यावर तौनाती फौजेचा तह लादून त्याचे राज्य आता ब्रिटिशांच्या तालवर चालण्यास तयार झाले होते. ब्रिटिशांना पुढे आता म्हैसूरचा टिपू हाच एक प्रबळ शक्तीशाली योध्दा राहिला होता. गर्व्हनर जनरल कॉर्नवॉलिस याने टिपूचे अर्धे राज्य घेऊन पुढील गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली यांचा मार्ग मोकळा केला होता. सन 1798 मध्ये ग. ज. वेलस्ली हिंदूस्थानात आले त्यावेळी त्याने इंग्लड मधुनच हिंदूस्थानात येऊन काय करायचे याचे पुर्ण नियोजन केले होते. त्याच्या दृष्टीने मराठे व टिपू हेच आता आपल्या आड येणारे आपले शत्रु आहेत असे त्याला वाटत होते. यावेळी टिपू यांना कळून चुकले होते की, ब्रिटिश आपल्यावर हाल्ला करणार यामुळे त्याने नेपोलियनची मदत घेण्याचे ठरविले होते तसेच फ्रेंच्याचे सैन्य आपल्या मदतीला घेले होते. याच वेळी युरोप मध्ये इंग्लंडचे फ्रेंच यांच्यात युध्दा चालू झालेले होते. त्याच युध्दाच्या नावाखाली हिंदूस्थानात ब्रिटिश ग. ज. वेलस्लीने टिपू व फ्रेंच सैन्यासी युध्द पुकारले होते.[49] ग.ज.वेलस्ली यांनी पुण्यातील वकिल पामर यांस टिपूशी युध्द करण्यासाठी मराठयांची मदत घ्यावी असे सांगिले कारण, या अगोदर टिपू विरुध्द दोन युध्दात मराठयानी

ब्रिटिशांना मदत केली त्यामुळे आता यावेळीही मदतीची आपेक्षा ठेवली होती. यामागे ब्रिटिशांना वेळगाच हेतू होता तो म्हणजे, आपण जर टिपू विरुध्द मराठयांकडे मदत मागितली तर ते आपणास मदत करणार नाही. कारण, जर शिंदे टिपूच्या मदतीला गेले तर शिंदेच्या सैन्यात मोठया प्रमाणात फ्रेंच सैन्य आहे त्यामुळे त्यांच्या उत्तरेकडील राज्याला धोका निर्माण होणार होता. यामुळे शिंदे येणार नाही हे नक्की झाले तसेच पेशवा यांचा या युध्दाला विरोध होता. नाना फडणीस यांचा विचार होता कि ब्रिटिशाना मदत करावी त्यासाठी नानानी ब्रिटिशांना युध्दात मदतीसाठी मराठी लष्कर पाठवण्याची योजना केली. पण ते पेशवा दू. बाजीराव व शिंदे यांच्या विरोधा मुळे घडले नाही. तसेच टिपूने पण पेशव्यची मदत मिळवण्यासाठी सुरवात केली होती. पेशवे व शिंदे यांनी ब्रिटिशांना सहाय्य करायचे नाही असा विचार केला होते. त्यातच पेशव्याने ब्रिटिशांना मदत करू नये म्हणून टिपूने पेशव्यास 13 लाख रूपये देण्याचे कबूल केले होते. त्यामुळे पेशवे व शिंदे हे कोणतीच भूमिका घेणार नव्हते ते गप्प बसले. पण योगायोग म्हणावा ब्रिटिश यांनी टिपू विरुध्द मोहिम लवकरच संपवली सन 1799 मध्ये टिपूचा पुर्ण पणे धुवा उडवला. टिपू या युध्दात मारला गेला त्यांचा पुर्ण पणे पराभव झाला व म्हैसूर राज्य ब्रिटिशांच्या ताब्यात आले. यामुळे मराठयांनी ब्रिटिशांचा रोष मात्र ओढून घेतला होता.[50]

2.11. नाना फडणीस यांचा मृत्यु व शिंदेचे उत्तरहिंदूस्थानाच प्रस्तान -

पेशवा दूसरा बाजीराव यांनी पेशवाईवर आल्या पासून आपल्या मनात येईल त्यापध्दतीने कारभार करण्यास सूरवात केली होती. पेशवा व दौलतराव शिंदे यांनी नाना फडणीस यांचे शेवट केलेले हाल यामुळे नानाना कोणावरच विश्वास ठेवण्याची सोय राहिली नव्हती. नाना फडणीस यांची कैदेतून सोडले ते आपल्याला आडचणी सोडण्यासाठी यावेळी मात्र नाना फडणीस यांनी पेशवा व शिंदे यांना मदत केली ती म्हणजे, शिंदेच्या बायकानी चालू केलेला उपद्रव नानानी निजाम व भोसले यांच्या मदतीने शांत केला. ब्रिटिशानी मराठयांच्या अंतर्गत कलहात भाग घेतला नव्हता तरी पण त्यांनी बाहेरून पेशवा दू. बाजीरावाचे सारखे डोक कोरण्याचे काम करत तेव्हा पेशवा यांनी कोणत्याच प्रकारचा थारा लागु दिला नाही. शिंदे व पेशवा याना हे प्रकरण डोईजड झाले होते. नानाला आता

आपल्याला कोणीच जवळचे आहे असे वाटेना त्यातच टिपू प्रकरणात ब्रिटिशांवर नाना यांनी विश्वास ठेवून त्यांना आपली मदत लागली तर दयावे असा विचार केला होता. ब्रिटिश आक्रमनाला तोंड देण्याच्या दृष्टीने धोरण आखण्या ऐवजी खुद्द नाना यांचा कल ब्रिटिशांकडे झुकत असल्याचे पेशवा व शिंदे या दोघाना स्पष्ट दिसू लागला होता. ब्रिटिशांनी म्हैसुरचा टिपु विरोधात युध्दात मराठयांनी सहभागी व्हावे असे पेशवा मागे नाना सारखे लागले होते. त्यात नानानी पटवर्धन भाऊला ब्रिटिशांच्या मदतीला फौज घेऊन जावे असे सांगितले पुण्यात यावेळी पेशवा व शिंदे यांच्या मनात वेगळयाच कारस्थानाने उभारी घेतली होती. ती म्हणजे नाना इंग्रजाचा वापर आपल्या विरोधात करु शकतात असे त्यांना सारखी भिती निर्माण होऊ लागली होती. त्यामुळे या दोघांनी पुन्हा नानाना कैदेत टाकण्याचा विचार करू लागले याच वेळी नानाची प्रकृतीही साथ देत नव्हती. पुढे 13 मार्च 1800 रोजी नानाचा मृत्यु झाला. यामुळे मराठी साम्राज्याचा मोठा आधार हरपला पण याचा फायदा अता मराठी राज्याच्या मुळावर उठलेल्या शत्रुनी उठवण्याचा ठरवला त्यांनी आता आपले हात पाय पसरवण्यास सुरवात केली. पुण्यातील वकिल पामर यांनी ग. ज. वेलल्सी यास पत्राने लिहुन कळवले की, ‘ नाना फडणीस यांच्या मृत्यू बरोबरच मराठी शाहितील शहाणपण व मुत्सद्दीपणा या दोन्ही घटनानी पुणे दरबाराचा सर्व परी निरोप घेतला.’[51]

मराठी साम्राज्याचा विचार करणारा मुसूद्दी आता कोणी राहिला नाही त्यातच पेशवे व शिंदे यांच्या विरुध्द असनारा असंतुष्ट गटात जे सामिल होते त्यात अमृतराव, बाळोबा तात्या, पटवर्धन भाऊ, होळकर घराणे यांना नाना फडणीस यांनी एकत्र करुन या सर्वाना ब्रिटिशांची मदत घ्यायची ठरवले होते. पण याच दरम्यान भाऊचा व नानाचा मृत्यु झाला. यांच्या मृत्यु मुळे पुण्यातील कारस्थानाचे नेतृत्व करण्याचे काम बाळोबा तात्या यांच्या कडे गेले तात्या तसेही शिंदेवर नाराज होते. आता तात्यानी पेशवा व शिंदे यांच्या विरुध्द चांगली जय्यत तयारी केली. तात्यानी शिंदेचे बरेच सैन्य आपल्याकडे करण्याचा प्रयत्न केला त्यात त्याना यश आले. आग्रा येथील लाड हे शिंदेचे सुभेदार त्याच्याकडे चांगल्या प्रकरे सैन्य होत ते दौ. शिंदे यांच्या विरुध्द तात्याच्या मदतीला येन्यास तयार झाले होते. त्याच पध्दतीने उत्तर हिंदूस्थानात शिंदेच्या मुलखात यशवंतराव होळकर

यांनी गोंधळ घालण्यास सरवात केले होते. मल्हारराव यांच्या मृत्युनंतर यशवंतराव यांने मोठी फौज निर्माण केली, यावेळी यशवंतराव होळकर तात्याला मदतीसाठी पुढे आले. शिंदे विरुध्द बाळोबा तात्या यांनी पहिले पाऊल उचले ते म्हणजे शिंदेच्या बायांनी दौलतराव शिंदे विरोध्दी केलेले बंड होय याचे नेतृत्व तात्यांनी केले. ह्या सर्व कारस्थानाची भूनभून पुण्यात दौ. शिंदेच्या कानावर येताच त्यानी बाळोबा तात्याला कैद करुन अहमदनगर या किल्यात ठेवले. यावेळी हे सर्व कारस्थाने थोडया प्रमाणात का होईना शांत झाले होते. याच सुमारास शिंदेच्या बायानी यशवंतराव होळकर यांच्याशी संधान साधून उत्तर हिंदूस्थान दौलतराव शिंदे यांच्या प्रांतात मोठया प्रमाणात जाळपोळ व लुटालूट करण्यास सुरवात केली. यामुळे दौलतराव शिंदे यांची उत्तरेतील सरमजाम धोक्यात आली आपल्या मुलखाचे संरक्षण करणे गरजेचे होते म्हणुन त्यांने पुण्यातुन उत्तरेत जाण्याचा निणर्य घेतला. आणि पुण्यात यावेळी दौ. शिंदेनी पेशव्याच्या मदतीला सर्जेराव घाडग्यांच्या हाताखाली काही फौज ठेवून उत्तर हिंदूस्थानात निघुन गेले.

2.12. मुसुद्दी नाना फडणीस यांची कामगीरी -

ब्रिटिश अधिकारी 'जेम्स लेन' महाराष्ट्रात त्यांनी मराठयांचा इतिहासाचा अभ्यास केला होता. त्याच्या लेखात तो म्हणतो नाना फडणीस असेपर्यंत मराठी राज्याला हात लावता येणार नाही. याची कल्पना जेम्स लेन यांना होती. 'जब तक नाना तक पुना ह्या त्याच्या दूरदृष्टी मुळे नानाच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त होते.[52] नानाचा दारादा इतका होता की, ब्रिटिशानी पण मराठी साम्राज्याकडे नाना असेपर्यंत वर मान करुन पण पाहिले नाही. सवाई माधवराव यांना पेशवा पदावर बसवण्याचा व सर्व कारभार सांभाळण्याचा मान नाना फडणीस यांना जातो. मराठयांच्या इतिहासात नाना एक कर्तबगार व पराक्रमी तसेच मुसूद्दी मराठयांचा शासक म्हणून त्यांची ओळख होती. नानानी आपल्या आयुष्याच्या शेवट पर्यंत अनेक धोके पतकारून का होईना पेशवाईचा कारभार संभाळला. मराठी साम्राज्याचा अस्तापर्यंत ज्यांनी आपल्या कर्तबगारी व पराक्रमाने डालारा आपल्या खंदयावर घेतला होता.

नाना फडणीस यांचे प्रकाश झोतात येण्याचे कारण म्हणजे, पेशवा नारायणराव यांच्या मृत्यु नंतर च्या घटना होय. नाना फडणवीस हे मराठी सत्तेत चाणाक्ष व मुत्सद्दी शासक म्हणून होते. त्यानी आयुष्याच्या शेवट पर्यंत पेशवाईची सेवा केली. पेशवा नानासाहेब यांचा मुलगा सदाशिवभाऊ यांच्या नेतृत्वाखाली त्यांना राज्यकारभाराचे शिक्षण मिळाले होते. पुढे पानिपतच्या युध्दात मराठयाचे झालेले नुकसान व बिगडलेली परिस्थिती यातुन सावरुन मराठयाची घडी बसवण्याचे व बिगडलेली परिस्थिती सुध्दारण्यासाठी महत्वाचे काम नाना फडणीस यांनी केले होते.

नानाच्या कार्याचे दोन कालखंड पडतात पहिला कालखंड म्हणजे पेशवा नारायणराव यांचा वध व सालबाईचा तह तसेच बाराभाई कारस्थान त्यानंतर पुढे ब्रिटिशाशी झालेले पहिले युध्द त्यात नांनाचा मुत्सद्देपणा, ब्रिटिशांचा केलेला पाडाव, तसेच येथील ऐतद्देशियांना ब्रिटिशा विरुध्द एक करण्याचा प्रयत्न, त्यातच घरच्या भांडणात रघुनाथराव यांचा केलेला बंदोबस्त होय. बाराभाई कारस्थाना नंतर मराठयाची सत्ता जवळ जवळ बारा मसुद्दयाकडे गेली होती. त्यात मुख्य कारभारी म्हणून नाना फडणीस हेच होते. त्यांनी यावेळी मराठी सत्ता घरच्याच भेदीन पासून वाचवण्याचे काम केले. नाना फडणीस यांचा दूसरा महत्वाचा कालखंड म्हणजे, पेशवा सावाई माधवराव यांच्या मृत्यु नंतर मराठयाच्या राजकारणात होतगेलेला बदल यात नानाचा त्याच्या मृत्युपर्यंत मोठा हात होता. सवाई माधवराव यास चाळीस दिवसांनी पेशवा पदावर बसुन मराठी सत्तेचा सर्व कारभारावर स्वःताच्या देखरेखी खाली ठेवला. त्यानी पेशव्याला तळ हता वानी जपले पण ते जपत आसताना त्यांचा त्रास पेशवा यांला चांगलाच भोगावा लागला हे नानाच्या कधीच लक्षात आले नाही. मराठी साम्राज्याला नानाचा मोठा आधार होता. पण त्या आधारचा उपयोग मराठयांच्या सरदाराना योग्य रित्या करता आला नाही आणि नानाना तो शेवट योग्य रित्या राबवला नाही.

सन 1790 ते 1800 ही दहा वर्षे नानाला अत्यंत आनिबाणीची गेली. महादजी शिंदे यांनी उत्तर हिंदूस्थानात राजपूत, मुगल यांचा आपल्या नियंत्रणाखाली आणुन उत्तरेत शांतता व सुव्यवस्था स्थापन केली व यानंतर महादजी शिंदे दक्षिणेत म्हणजेच

पुण्यात आले. नानाला आपल्या पुण्यातील पेशवे दरबारात महादजी आपले स्थान स्थापन कारतील असे वाटत होते. या गोष्टी मुळे नानाला पुण्यात आपले अधिकार कमी होतील असे वारंवार वाटत होते. म्हणून त्यानी महादजी शिंदे यांच्याकडे आपण काशिला जाण्याचा विचार बोलून दाखवीत होते. तो फक्त शिंदे यांना नमवण्यासाठी होता पण तसे झाले नाही. महादजी शिंदे यांनी उत्तरेतुन मोगल बादशहा यांच्याकडून पेशव्यांसाठी 'वकिल-इ-मुलकी' हे सर्वाधिकारी पद मिळविल्यमुळे त्याचे पारडे जड झाले होते. नाना राजकारणात तरबेज असल्या कारणाने तसेच महादजी शिंदे हे तलवारीत (युध्दनितीत) तरबेज होते. पुढे नाना व शिंदे यांनी मराठी सरदार व साम्राज्याला एकाच छात्राखाली ठेवले. दोघानमध्ये हेवेदावे होते पण दोन्ही पेशव्यासी एकनिष्ट होते. दोघांमध्ये काही काळ निर्माण झालेले गैरसमज पेशव्यांच्या व सरमजाम हरिपंत फडके यांच्या प्रयत्नाने मिटले. हरिपंत व महादजी यांच्या मृत्यु मुळे मराठी राज्यत मोठी पोकळी निर्माण झाली. पुढे सन 1795 मध्ये मराठयांचे निजाम याच्याशी युध्द झाले व खर्डा येथे निजामाचा पराभव झाला. नानाच्या प्रयत्नाने सर्व मराठे या लढाईत एकत्र आले त्यांच्या कर्तृत्वाची ही लढाई म्हणजे एक अत्युच्च शिखर होय. या लढाईतील विजय मराठयांच्या ऐकतेसाठी महत्वाचा होता. पण भविष्यात मराठी राज्याच्या फायद्याच्या दृष्टीने खडर्याची लढाई लाभदायक ठरली नाही. ज्यापध्दतीने 'ग. ज. लॉड वेलस्ली यांनी त्याच्या कामाची धडाडी शेवट पर्यंत सिध्दीस नेण्याचे केले त्यापध्दीने मराठी साम्राज्याच्यात नाना फडणीस यांनी बारभाईच्या कारस्थानांत योग्यता दाखवली तरी पण नाना पेक्षा ग. ज. लॉड वेलस्ली यांच्यात जास्त धाडाडी होती. कारण, त्याच्या मागे त्यांचा राज्याचा म्हणजेच इंग्लडच्या एक सुत्री कारभार व त्यांच्याकडे आसलेला सर्व आधिकार होते. आणि नानाच्या साम्राज्य संभाळण्यासाठी नाना मागे कोणाचाच हात नव्हता ही मराठी साम्राज्याच्यात शोकांतीका होती.'[53]


संकटकाळात मराठयांची एकी टिकविणे व ब्रिटिशांन पासून स्वातंत्र्यरक्षण करणे, ही नानाची महत्वाची कामगिरी होय. ज्यापध्दतीने फ्रेंच राज्यक्रांती, ब्रिटिश-फ्रेंच युध्द, अमेरिकन स्वातंत्र्ययुध्द इ. घटना घडत होत्या त्या नानाला माहित होत्या हे ब्रिटिशांना चांगले माहित होते. ब्रिटिशांशी करारनामा करणे तो फार विचार करुन करावा लागतो.

त्यांच्या बोलण्यात व लिहिण्या मध्ये एक-एक अक्षरात फार पेच असत'. टोपिकरांचा प्रवेश खुष्कीत होऊ देऊ नका, बादशाहीत ब्रिटिशांचा पाय शिरू नये, बादशाहीत ब्रिटिश शिरल्यास झाडून खुष्कीत पेच पडेल. असा इशारा नानाने दिला होता, तरी ते धोरण राखू शकले नाही. ब्रिटिश विरुध्द मराठयांनी यशस्वी व्हायचे तर युरोपीयन राजनीती व सैनिकीपध्दत यांचा वापर करणे आवश्यक होते. आपल्या घोडदळापुढे ब्रिटिश पायदळ किती दिवस टिकणार, असे म्हणणाया नानाना युरोपीयन यंत्रचलित सामग्रीचा व शिस्तबध्द सैनिक पध्दतीची खरी ओळख झाली नव्हती. स्वार्थी, तत्वशून्य आणि सत्ताभिलाषी मराठामंडळास निःस्वार्थी नेता हवा होता. तसे नाना होऊ शकले नाही.

पहिले ब्रिटिश मराठा युध्द झाले आणि पुढील आठराव वर्षे राज्यकारभारत म्हणावी तसी योग्यता दिसली नाही. मराठी साम्राज्य एक संगठित ठेवण्याचे कोणतेच प्रयत्न नानाच्या हातून झले नाही. मराठा मंडळाची सर्व सत्ता नानाला आपल्या हाती ठेवण्याची जी इच्छा होती ती पुढे पुर्ण होऊ शकली नाही. ज्या पध्दतीने मराठा मंडळाने खडर्याच्या युध्दात एकजूट दाखवली त्यानंतर मराठयानी कोणत्याच लढाईत एकजुट दाखवली नाही. ब्रिटिशांना ज्यापध्दतीने एक जुट करून हिंदूस्थान आपल्या वर्चस्वाखाली घेतला तसे मराठयामध्ये किंवा इतर हिंदूस्थानी सत्ताधिशांनमध्ये दिसून आली नाही. नाना फडणिस यांनी मोठया कौशल्याने राज्यचे कामकाज चालविले पण सारासार विचार करुन समतोल ठेवता आला नाही. नानाजवळ खूप मोठी संपत्ती होती राजकारणात त्यांचे हेर खाते उत्तम होते. पेशवाईचे उत्पन्न त्याच्या कारकीर्दीत दहा कोटींचे झाले पुण्याच्या वैभवात नानानी बरीच भर घातली. नानाच्या हाती पेशवे व छत्रपती या दोन्ही मराठयांच्या आधारभूत सत्ता होती. नाना मध्ये कमतरता होती आणि ती म्हणजे लष्करी कौशल्याची 'राजकारण चालवण्याचे शहानपण नानाना चांगले होते परंतु लष्करी कामांत तो सर्वतोपरी पांगळा हाता. जर त्याच्या अंगी लष्करी कौशल्य असते तर त्यांनी स्वतःचे वेगळे राज्य स्थापन केले असते.'[54] पुण्यात सार्वजनिक कामात नाना फडणीस यांनी चांगली कामगिरी केली आहे. स्वतःच्या वाडयासह दहा बारा वाडे आणि वेलबागेसारखी मंदिरे बांधून त्याने शनिवारवाडयातही बरीच बांधकामे केली. पुण्यात अनेक पेठा वसविल्या व सादाशिव पेठेचा हौद व त्याचे उछवास बांधून

पुण्यात पाणीपुरवठ्याचीही व्यवस्था केली. याशिवाय वेळसला मंदिर, कायगाव येथे गोदावरीस घाट, भीमाशंकर येथील ज्योतिर्लिगाचे मंदिर, काशीस दुर्गाघाट वाडाव कर्मनाशेवर पूल, सिंहासनासमोर नगारखाना, खोपोलिस तलाव व मंदिर आणि मेणवलीस वाडा, तसेच मंदिर व घाट नाना यांनी आपल्या देखरेखी खाली सर्व सावर्जनिक कामे केली होती.

नाना फडणीसाबद्दल ब्रिटिश व मराठी इतिहासकार यांनी प्रशंसा केली आहे. काहीनी त्यांच्या मुसूद्दीपणा व बुध्दिमत्ता यांची स्तुती केली आहे. नानाच्या बरोबर मराठी राज्याचा शहाणपणा व नेमस्तपणा लयास गेला असेही म्हटले आहे. नाना तसे महत्वाकांक्षीही होते. अठराव्या शतकाच्या अंतिम व एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीस ब्रिटिशांनी जी विलक्षण कर्तबगारी दाखविली तिचा विचार करता नानानी व महादजी शिंदे यांनी मराठी सत्तेवरील ब्रिटिश आक्रमणाची लाट पंचवीस वर्षे थोपवून धरली यात खरी कर्तबगारी स्पष्ट होते. नानाच्या मृत्युने पेशवाईतील शेवटचे कर्तबगार पुरुष नाहीसे झाले. पेशवा थोरल्या माधवराव यांच्या मृत्युनंतर ‘‘मनसुबीची तलवार गाजवून राज्य राखणारा मर्द’’ नाना फडणवीस तसेच अनेक स्वकीय व परकिय कारस्थाने करणायांशी टक्कर देणारा पुरुष होय. हिशेबाच्या कामात नाना यांचा हात धरणारा कोणी नव्हता यांच्या चोख कारभारामुळे फडणीस यांच्या जागेस फार महत्व आले होते. पेशवाईचे ज्यांत हित ते आपले हित अशी नानाची दृष्टि होती. एकेकाळी पेशवाईचे रक्षण करण्याकरिता आपले आधिकार सोडून देण्यास तयार झालेले नाना फडणीस हेच होय. पुढे तर आपला हाडवैरी असलेला रघुनाथराव यांचा मुलगा दूसरा बाजीराव यास शिंदे यांच्या वर्चस्वा मुळे त्यानी इच्छा नसतांना त्यास गादिवर बसवले पण शेवटी नानानी स्वार्थी हेतूच पुढे ठेवला. ‘नाना फडणीस पेशवाईतील थोर स्वामिभक्त मुसुद्दी असे नाव देणे योग्य होईल. मराठेशाहीचा शेवट हा नाना वाचले असते तर टळला असता हे सांगणे जरा कठीण होते, पण त्यांच्या मृत्यु मुळे तिचा अपमृत्यु झाला हे निश्चित खरे आहे.’[55]


India 1800 AD
Panipat
Delhi
Agra
Jats
Oudh
Sikh
Mughal
Bahawalpur
Rajput
Shinde
Holkar
Gaikwad
Peshwa
Bhosale
Maratha
Pune
Aurangabad
Goa
Nizam
Mysore
Plassey
British Rule
The Andaman & Nicobar Islands belonged to the Maratha Empire.
Map not to scale.

प्रकरण तिसरे

मराठे ब्रिटिश युध्द (दुसरे)

3.1. प्रस्तावना

मराठयाची सत्ता दक्षिण हिंदूस्थानात प्रभावी अशी प्रबळ व स्वातंत्र्यप्रिय अशी बलाढ सत्ता होती. या सत्तेचा विस्तार उत्तर हिंदूस्थानात मोठया प्रमाणात वाढत होता त्यांना आता दिल्लीवर राज्य करायचे होते, परंतु पानिपतच्या दारुन पराभवाने मराठयाची मोठया प्रमाण हाणी झाली. यामुळे मराठ्यांच्या राजकीय प्रतिष्ठेला मोठा धक्का बसला. या पराभवा मुळे 'ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला' बंगाल व दक्षिण भारतात आपली सत्ता दृढ करता आली. पानिपतच्या युध्दा मुळे पुढे भारतातवर राज्य कोणाचे मराठी सत्तेचे कि ब्रिटिशाचे किंवा कोणाचे नाही या प्रश्नाचे उत्तर दुसरे मराठा व ब्रिटिश युध्दात मिळनार होते. मराठयांमधील आपआपसातील भांडणाचा फायदा कोणाला होणार हे येणारा काळच सांगणार होता. शिंदे घराणे, नाना फडणीस, होळरक घराणे, नागपूरचे भोसले, दक्षिणेतील पटवर्धन इ. जाहागिरदार हे मराठी सत्तेचे मोठे खांब होते त्यांना परास्त करण्यासाठी ब्रिटिशांनी आपले पुर्ण लक्ष म्हैसूरच्या टिपू नंतर मराठयांवर केंद्रीत केले. या मुळे पुढे काही वर्षातच भारतात एक नविन सत्ता ब्रिटिशांच्या रूपाने उदयाला येणार हे दिसत होते.

दरम्यान ब्रिटिशानी बंगाल जिंकून ब्रिटिश सत्तेचा पाया हिंदूस्थानात रोवला होता. ब्रिटिशांनी उत्तरेकडील छोटी-छोटी गावे चांगल्या प्रकारे आपल्या वर्चस्वाखाली आनली होती. त्यांनी प्रथम आपले स्थान बंगाल, बिहार या प्रांतात स्थिर केले होते. यावेळी हिंदूस्थानात ब्रिटिशाना खरे अव्हाण होते ते दक्षिण सत्तेत असलेले मराठे यांचे होते. आठराव्या शतकाच्या पूर्वार्धात मराठयांची सत्ता उच्च शिखरावर जाऊन पोचली होती. हळूहळू ब्रिटिशांनी दक्षिणेत आपली सत्ता विस्तारण्यास सुरवात केली आणि त्यांनी म्हैसूर प्रांतात टिपू व हैद्राबाद प्रांतात निजाम यांचा बंदोबस्त करण्यास सुरवात केली. खडर्याच्या लढाई नंतर त्यांनी निजाम व टिपू यांचा धुर्त पणे आपल्या बुध्दीच्या जारावर पाडाव करुन त्यांना आपल्या आधिन आणले होते.[1] ब्रिटिशाना दक्षिणेत आपले स्थान बळकट

करण्यासाठी येथील लहान-लहान प्रदेशांना आपल्या आधिन करण्यास सुरवात केली. ब्रिटिशांना इ. स. 1800 पासून कडवे अहवाहन राहिले ते फक्त मराठयाचेच होय त्यांना आता सत्ता विस्तारत एकमेव अडधळा राहिला होता. यातच पुढे ब्रिटिशांनच्या दृष्टीने महत्वाचे ठरले ते म्हणजे मराठयाची पाऊले शेवट का होईना वाकडी पडली याआधि सुध्दा पहिल्या ब्रिटिश मराठा युध्द झाले तरी सुध्दा मराठयांनी आपली वाकडी पावले सुधारण्याचा प्रयत्न केला नाही. आणि तेव्हा पासुनच मराठयांनी आपल्या विचारांना दिलेली श्रध्दांजली होय. मराठ्यांच्या दुष्टीने एक घटना वाईट ठरली व तीच घटना भविष्यात ब्रिटिशांना उपयोगी ठरली ती म्हणजे पुण्यात ब्रिटिशांनी धुर्त पणे आपला वकिल नेमला यामुळे पुण्यातील सर्व इतंभूत बातमी बाहेर पडू लागली आणि मराठी शाहीला खया अर्थाने उतरती कळा लागण्यास सुरवात झाली.

सन 1795 ते 1800 पर्यंत सर्व मराठयाच्या इतंभूत बातम्या ब्रिटिशांना या वकिला मार्फत समजण्यास सुरवात झाली. ज्या पध्दतीने एखादया झाडाची पाने जशी गळून जावी, तसी मराठी सत्ता खालवत चालली होती. त्यातच मराठयांचे दुबळे धोरण, आपआपसातील भांडणे, तसेच ब्रिटिश नितीने या घटनांनी ब्रिटिशांनी फायदा करुन घेऊन दक्षिणेतील राजकारणात प्रवेश करण्यास सुरवात केली. पुण्यात दौलतराव शिंदे यांनी आपले वर्चस्व निर्माण करण्यास सुरवात केली तेव्हा पासून गोंधळ वाढला तो वाढत जाऊन पुढे शिंदे यांना पेशवा दूसरा बाजीराव हे जोडी आले. यावेळी नाना फडणीस यांचा मृत्यु झाला तसेच मराठयांची एकी, असणारी बुध्दी हे सर्व शुन्य झाले. कोणीही आता सरदार, जहागिरदार, सरमजाम ही मंडळी पुण्याच्या रोखाने वर मान करून बघू लागली होती. या मुळे ब्रिटिशांना चालून संधी सपडली पुढे या संधीचे सोने करण्याचे त्यांनी ठरवले व ते यावेळी येथील सत्ताधीस एतद्वेशियांनी स्वतः परकियांना आपली सत्ता देऊन त्याच्या जिवावर निवांत बसले. भिवष्याचा वेध कोणालाच नसतो पण अंगात ताकद असायला हावी, बुध्दीचा जोर चांगला लागतो तरच वादळे मोडता येतात यावेळी मराठी सम्राज्याचे तसेच झाले होते. या गोष्टीची असणारी कमतरता या मुळे पुढे ब्रिटिश व मराठे यांच्यात दुसरे युध्द झाले व मराठी सत्ता ब्रिटिशानी हळूहळू संपूण आपला झेंडा मराठी सत्तेवर व

हिंदूस्थानवर फडकवला. भारतीय इतिहासात तसेच महाराष्ट्राच्या इतिहासात ब्रिटिश व मराठे युध्दाला महत्वाचे स्थान आहे.

3.2. मराठे बंडाच्या विळख्यात -

विस्तारलेल्या मराठी साम्राज्यात आठराव्या शतकातच्या शेवटी राज्यहिताचा विचार करण्यासाठी कोणी महत्वाचे व योग्य व्यक्ति राहिली नव्हते. स्वतः मुसूद्दी नाना फडणीस यांनी शेवटीची वीस वर्षे स्वतःचाच कारभार व पद याकडे लक्ष दिले. आपले वर्चस्वा मराठी साम्राज्यावर कसे राहिले यावर भर दिला यामुळे राज्यहित पुर्ण पणे मागेच पडले होते. कोणाच्यात मनात यावेळी राज्याच्या हिताच्या गोष्टी आल्या नव्हत्या किंवा चाहुलपण आली नही.

सन 1800 मध्ये नाना फडणीस यांचा मृत्य झाला आणि मराठी साम्राज्याला मोठा हादरा बसला खरे कारण मराठया मध्ये कर्तबगार व मुसूद्दी, चांगल्या धोरणाने काम पहानारे कोणीच राहिले नव्हते. दूसरा बाजीराव, दौलतराव शिंदे, यशवंतराव होळकर, अमृतराव, दक्षिणेतील जहागिरदार, पटवर्धन भाऊ हे महाराष्ट्रातील राजकारणात मोठया स्वार्थी उम्मिदीने पेशवा पदासाठी झगडत राहिले, पेशवा पदाबद्दल आदर प्रामाणिक पणा या सर्व गोष्टी या नेत्यापासुन फार लांब गेलेल्या होत्या. आता त्या जवळ कारण्यासाठी कोणीही मध्यस्थी राहिला नव्हता. आदरकरावा असा कोणीच या मराठी सत्तेचा डोलारा संभाळण्यास योग्य राहिला नव्हता. सन 1801 मध्ये शेवटी पेशवे व इतर मराठी मंडळी, सरदार, जहागिरदार, सरमजाम इ. यांच्यातील अंतर्गत वाद, व एक मेकांची भांडणे विकोपाला गेली यामुळे मराठी साम्राज्य आता नवीन विळख्यात सापडणार हे दिसत होते.

3.2.1. मराठी साम्राज्याचे दोन स्तंभ एकमेका विरूध्द – (शिंदे व होळकर)

मराठी राज्याचे दोन आधार स्तंभ असणारे जहागिरदार इंदोर येथील तुकोजी होळकर आणि ग्वालेर येथील महादजी शिंदे यांच्या मृत्युने होळकर व शिंदे यांच्या घराण्यात भांडणाचा मोठा पुर आला होता. एकेकाळी मराठी साम्राज्याचे आधार असणारे हे दोन स्तंभ आठराव्या शतकात एकमेकांच्या विरोधी उभी राहिली. पुण्यात शिंदे यांनी केलेले

कारस्थान म्हणजे, यशवंतराव होळकर यांच्या भाऊ मल्हारराव यांची दौलतराव शिंदेकडून झालेली हत्या याचा प्रतिशोध घेण्यासाठी म्हणून यशवंतरावाने उत्ततरेत शिंदेच्या क्षेत्रात लुटालूट, चाळपोळ करुन त्यानी शिंदेना पुर्ण पणे नमवले होते. शिंदेना यावेळी मदत केली ती म्हणजे पेशवा दूसरा बाजीराव यांनी यामुळे होळकर यांनी आता आपला मोर्चा पेशव्या कडे वळवला होता. यावेळी या भांडणासाठी यशवंतराव होळकर यांना नाना यांनी मदत केली पण याच दरम्यान नानाच्या मृत्यु झाला आता पुण्यात यशवंतराव यांना अमृतराव यांनी आपल्या गटात सामिल करून त्यांचा उपयोग शिंदे व पेशवा यांच्या विरुध्द करायचा होता. त्याच बरोबर नाना यांच्या बरोबर असलेली दक्षिणेतील सर्व मराठी मंडळी अमृतराव आणि यशवंतराव यांना जाऊन मिळाली. यशवंतराव होळकर यांच्याकडे युरोपीयन, ब्रिटिश व फ्रेंच लोक जे मराठयांच्या सैन्यात नौकरीस होते त्यांच्या नेतृत्वाखाली आधुनिक फौज तयार होती. ज्या राज्याच्या रक्षणासाठी छत्रपती शाहुनी नेमुण दिलेल्या सरमजाम व जहागिरदार हेच आता राज्य बुडवणार आता निच्छित झाले होते. मराठी साम्राज्यात प्रतिशोधाच्या ज्वाला शिंदे व होळकर यांच्यात दिसत होत्या. दोघानीही आपले आर्थिक व लष्करी ताकद खर्ची करण्याचे काम चालु केले होते.[2]

महादजी शिंदे यांच्या वेळेपासून पुणे दरबारात व संपूर्ण मराठी राज्यात शिंदेचे महत्व मोठया प्रमाणत वाढलेले होते. पण महादजी शिंदेच्या मृत्यु नंतर त्याचा दत्तक पुत्र दौलतराव शिंदे घराण्याचा वारस गादीवर बसला पण महादजी व दौलतराव यांच्यात मोठा फारक होता. महादजी सारखी धमक दौलतराव यांच्यात नव्हती. त्यातच शिंदेचे शेजारी होळकर घराण्यात तुकोजी होळकर यांच्या मृत्युनंतर काशीराम गादीवर आला तेथे पण यशवंतराव होळकराने बंड करून नंतर होळकर सुभेदारी आपल्या पदरात पाडुन घेतली. अंतर्गत गृहकलहात दौलतराव शिंदेचा वरसा प्रश्न शिगेला जाऊन पाचला होता.[3] पुण्यात असलेला दौलतराव शिंदे यांनी पेशव्या दरबारी आपले बसस्तान बसवून नाना फडणीस यांची जागा आता दौलतराव शिंदे यानी घेतली होती. नाना फडणीसाचे होळकर घराण्याशी सबंध चांगल्या प्रकारे होते. पेशवा दू. बाजीराव व दौलतराव शिंदेच्या कारभारामुळे निर्माण झालेली परिस्थिती यामुळे नानानी होळकर यांना या दोघांचा बंदोबस्त

करण्यासाठी पुण्यात बोलावणे केले होते. यशवंतराव होळकर यांनी पुण्याची सर्व परिस्थिती स्वतःच्या डोळयानी पाहिलेली होती. त्याच वेळी मल्हारराव होळकर यांचा पुण्यात शिंदे यांच्या सैन्याकडून मृत्यु झाला व त्यांच्या बरोबर असणारे त्याचे भाऊ यशवंतर व विठ्ठोजी हे दोघेही पुण्यातुन पळुन कसे बसे सुटले. यावेळी मल्हारराव होळकर यांचा परिवाय दौलतराव शिंदे यांच्या कैदेत होता. त्यामुळे उत्तर हिंदूस्थानात शिंदे यांचा प्रतिशोध यशवंतराव यांनी घेण्याचे ठरवले. तसेच दक्षिणेत (पुण्यात) विठोजी होळकर यांनी पेशवे दरबारी असणारे शिंदे याचा सुट घेण्याचे ठरवले. यशवंतराव होळकर यांनी आपली मोठी फौज तयार करून व शिंदेच्या प्रदेशात मोठी लुटमार चालु केली होती. त्यातच महादजी यांच्या बायकानी दौलतराव शिंदे यांच्या भोवती मोठा कहर चालू केला आणि याचा फायदा यशवंतराव होळकर यांनी घेण्यास सुरवात केली. या सर्व प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी दौलतराव शिंदे सन 1800 मध्ये पुण्यातुन उत्तरहिंदूस्थानत निघुन गेले. दौलतराव यांची उत्तरेतील सुभेदारी धोक्यात आल्यामुळे त्यांना पुण्यातुन जावे लागले त्यांनी यावेळी पेशव्याच्या रक्षणा करता सर्जेराव घाडगे यांना ठेवून ते उत्तर हिंदूस्थान निघुन गले.[4]

3.2.2. पुण्यात पेशवाई भोवती गोंधळ -

पेशवा दूसरा बाजीराव यांनी नेमुन दिलेली जहागिरदारी व सरमजाम या वर्गाने पेशव्याच्या आर्थिक व लष्करी दौर्बलतेचा फायदा घेऊन दक्षिणेत मोठया भु-भाग बळकावून आपल्या जहागिरदारीचा विस्तार करण्यास सूरवात केली होती. जाहगीरदार वर्ग मोठया प्रमाणत पेशवा यांच्या सत्ते पेक्षा प्रबळ होण्यास त्यांनी सुरवात केली. ही मंडळी आपल्या धन्याच्या (पेशव्याच्या) विरोधात वागत व मनमानेल त्या पध्दतीने मनमानी कारभार करत. पेशव्याच्या विरोधात या सरमजाम वर्गाने तर बंडाचे हत्यार उपसले होते. त्यांनी मिळून पेशवा विरोधी प्रजेत असंतोष निर्माण करण्याचे कामे चालु केली. या मुळे निर्माण झालेल्या परिस्थित पेशव्याने आपल्या गोटातील निष्ठावान मंडळीना जहागिरी व सरमजांम दयावी आसा निर्णय घेतला. ज्यांना पुरवी ठरवून दिलेल्या जहागिरी पेक्षा जास्त बळकावलेली जहागिर कमी करण्याचे पेशवा यांनी ठरवले. केंद्र सत्ता धुडकावून लावणाया दक्षिणेच्या जहागिरदाना वठणीवर आणण्यांचे धोरण पेशवा दू. बाजीराव यांनी आखले होते.

ज्या जहागिरदाराकडे जास्त प्रदेश असेल त्यांचे प्रदेश कमी करुने व जे केंद्रसत्ता मानत नसतिल त्यांची जहागिरी जप्ता करणे असे कार्यक्रम पेशवा यांनी आपल्या हाती घेतले होते. पेशव्याने बंडखोर व जहागिरदारांना आवर घालणे व राज्यात शांतता सुव्यवस्था प्रस्तापित करण्यासाठी पेशव्याने प्रयत्न हाती घेतली होती.

पेशवा दूसरा बाजीराव यांनी सरकार विषयी कारवाया करणारे, बंडखोर, निष्ठ नसणारे, तसेच सरकारच्या आज्ञेचे पालणनकरणे या सर्व मंडळीना वठणीवर आणण्यासाठी पेशव्यानी पाऊले उजलली होती. तिची सुरवात दक्षिणेतील बंडखोर जाहगिरदार यांच्या पासुन केली यांची जहागीरी जप्त करण्यास सुरवात केली होती. पुर्वी नाना फडणीस यांच्या गटात सामिल असलेले रास्ते, पटवर्धन व अनेक मोठी सरमजाम यांची सरमजाम जप्त केल्या होत्या. पटवर्धनभाऊ यांच्या विरोधात तसेच नाना फडणीस यांचे मित्र व रघुनाथरावाचे शत्रु म्हणुन असणारे पेशवा यांनी त्यांच्या जहागिरी, सरमजाम जप्त करण्याचा घाट घातला होता. या सर्व जहागिरदार वर्गाचां संबंध ब्रिटिशांशी चांगल्या प्रकारे होता. पोर्तुगिजांचा पुण्यातील वकिल म्हणतो, ‘ पुण्यातील दरबारामध्ये पैशांची पुष्कळच टंचाई आहे. मराठयांचे सरदार एकमेकांशी विरोधाने वागतात. त्या सर्वानी हे प्रदेश लुटून फस्त केले आहेत. ते पेशव्यांची सत्ता मानीत असले तरी त्याची आज्ञा ते वाटल्यास पाळतात. पगार मिळत नसल्यामुळे ह्या सरकारचे व शिंदांचे अधिकारी तक्रार करीत आहेत. ह्या गोष्टीस फक्त शिंदेची तीन पथके अपवाद आहेत. येथील ब्रिटिशांचा वकील पुष्कळ खर्च करतो व पेशव्यास मोठ-मोठे नजराणे देतो.’[5] या वरून पेशव्याच्या दरबार यावेळी चांगचाल गोंधळ उभा राहिला होता. ब्रिटिशानी पेशव्याची चांगल्या प्रकारे खुशामत करण्याचे कारस्थान येथे चालु केले होते. त्याच पध्दतीने या जहागिरदार वर्गाला आपल्या बाजूला वळवण्याचे काम चालू केले होते.

सन 1798 पासून अमृतराव यांचे व पेशवा दूसरा बाजीराव या दोघाचे संबंध बिघडले होते आणि शेवट पर्यंत बिडलेलेच राहिले. पेशवा विरोधी असणारे जहागिरदार व नानाचे काही प्रेमाचे संबंध असणारी व्यक्ति यांना आपल्या गटात सामिल करून घेण्याचे अमृतराव यांनी प्रयत्न चालु केले हाते. अमृतरावाच्या गटात सहभागी

असेलेले सरंमजाम 'माधवराव रास्ते' यांना अटक करुन यांची सरमजाम जप्त केले. यावेळी पेशवा यांनी आपला चांगला वचक बसवून मराठी साम्राज्यात शांती प्रस्तापित करण्यासाठी प्रयत्न चालु केले. पेशव्याला नवीन जहागिरदार व सरमजाम यांचे ग्रहण लागले ते साधारण दोन वर्षे चालूच राहिले त्याने पुढे मोठे ऋद्र रुप धारण केले. या वेळी मराठयांच्या आप-आप सातील भांडणनेच मराठयांनी आपल्या मोठया प्रमाणात नुकसान करून घेतले यात परकिय शक्तीनी आपल्या बृध्दीच्या जोरावर हिंदूस्थानच्या असंख्य राजकीय सत्तेला अव्हान देऊन त्याना आपल्या वर्चस्वा खाली आनले होते. नाना फडणीस व बाळोबा तात्या त्याच पध्दतीने पेशवा व शिंदे यांचे विरोधक असलेले समर्थक संपुर्ण महाराष्ट्रात बंडाचा झेंडा घेऊन उभेच होते. यशवंतराव होळकर याचां राग दौलतराव शिंदे व पेशवे दू. बाजीराव यांच्यावर होता. त्यातच अमृतराची जागृत झालेली सत्ताची लालसा यामुळे अमृतराव यांच्या बद्दल महाराष्ट्रात सर्वसामान्य लोकांना आदर वाटत होता.[6] दूसरा बाजीराव यांच्या पेक्षा अमृतराव यांस राज्य कारभार करण्याची कला चांगल्या प्रकारे अवगत होती. पुण्यात व मराठी साम्राज्यात यावेळी मराठी सत्तेशी आपले नाते असणारी सर्व मंडळी आप-आपल्या विचाराणे व स्वार्थने प्रेरित झालेले होते. यांनी पेशव्या विरोधात बंड पुकारले या मंडळीच्या विरोधात पेशव्यानी आपल्या मर्जितील काही सरदार वर्गाना एकत्र केले त्यात गोखले, पानसे, पुरंदरे ही मंडळी घेऊन व त्यांच्या फौजेचा वापर पेशवा यांनी आपल्या विरोधकांवर करण्यास सुरवात केली.

3.2.3. विठोजी होळकर यास मृत्युदंड -

मराठी साम्राज्या बद्दल आदर प्रेम भावना तसेच पेशवा सरकार बद्दल आदर, विश्ववास, राष्ट्रप्रेम यांची भावना कोणाच्याच मनात राहिली नव्हती. दौलतराव शिंदे यांनी पुणे दरबारात केलेला अंदाधुंद कारभार तो थांबतो कोटे तोच यशवंतराव होळकर यांचा त्रास महाराष्ट्राला सन 1800 नंतर सहण करण्याची परिस्थिती निर्माण झाली. होळकर बंधूनी आपले गेलेले वैभव, प्रतिष्ठा व शिंदे मुळे झालेले नुकसान हे भरून काढण्यासाठी त्यांनी पुण्यात आपले वजन वाढवण्याचे प्रयत्न करण्यास सुरवात केली. त्यासाठी विठोजी होळकर यांनी दक्षिणेत पंढरपुरच्या बाजूने येऊन अमृतराव यांच्या पक्षात

सामिल झाला त्यानंतर त्यांना तेथे दक्षिणेतील काही जहागिरदार मंडळीची साथ होती. यशवंतराव होळकर यांनी उत्तर हिंदूस्थानात शिंदे यांच्या प्रदेशात लुटमार करत असताना विठोजी होळकर यांनी खानदेशातुन कृष्णा नदीपर्यंतच्या प्रदेशात लुटा लुट चालु केली. यावेळी उत्तरेत शिंदेना व दक्षिणेत पेशवा दूसरा बाजीराव यांना होळकर बंधुनी त्रास देण्याचा कार्यक्रम आरंभला होता. विठोजी यावेळी वीस हाजाराची फौज घेऊन अनेक प्रदेश लुट-मार करत चालला होता. त्याला नाना फडणीस यांचे समर्थक असणारे अनेक सरदार येऊन मिळाले यांनी व विठोजी मिळून महाराष्ट्रात मोठया प्रमाणात लुटमार, जाळपोळ सुरु केला. यासाठी बाजीरावाने आपला सेनापती 'बापु गोलखे' यांच्या हाताखालील फौज देऊन विठोजीच्या बंडाला आवर घालण्यास पाठवले व त्यात त्यांला यश आले त्याने विठोजीला पकडून पुणे दरबारात पेशव्याच्या ताब्यात दिले.[7] यानंतर पेशवा यांनी जो निर्णय घेतला तो मराठी साम्राज्यासाठी भयानक होता. बंडखोर जहागीरदार, सरदार, सरमजाम यांना पेशव्याचा धाक बसवण्यासाठी विठोजी होळकर यास '16 एप्रिल 1801' रोजी स्वतःच्या डोळयादेखत हात्तीच्या पायी देऊन ठार मारले. हिंदूस्थानाची परिस्थिती यावेळी पुर्ण पणे हाताबाहेर गेली होती. उत्तर हिंदूस्थानात शिंदे व होळकरांचे युध्द चालु आसतानाच पुण्यात विठोजी होळकर यांचा मृत्यु झाला. यामुळे पेशवा दूसरा बाजीराव यांनी स्वतः वर मोठे संकट ओढवून घेतले हाते. त्याने यावेळी विठोजीस मारून त्यांचा भाऊ खंडेराव होळकर यास शिंदे यांच्या ताब्यात दिले. विठोजी होळरक यांच्या मृत्यु नंतर महाराष्ट्रातील स्थिती आनखीनच भयानक झाली ही बातमी यशवंतराव यास समजता त्याने पेशवा दू. बाजीरावाचा सुट घेण्यासाठी आपला मोर्चा पुण्याच्या दिशेने वळवला.[8]

3.2.4. अमृतराव यांचे कारस्थान -

पेशवा दूसरा बाजीराव यास पेशवाई मिळाली त्यावेळी अमृतराव आणि दू. बाजीराव यांचे संबंध प्रेमाचे होते. अमृतराव यांच्या अंगी धडाडी, शैर्य, कर्तबगारी होती यामुळेच अमृतराव यांनी ब्रिटिशांच्या कवायती फौजेचा सुरत, मुंबई या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहिल्या आणि आपल्याकडे आशाच पध्दतीने पेशवाईची फौज असावी असे

अमृतरावास यांना सारखे वाटत होते. म्हणून त्यांनी 'एम. आर. विल्यमटोन' हा युरोपियन अधिकरी नेमुन मराठयाची स्वतंत्र कवायती फौज निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला होता. अमृतराव राज्यकारभारात हुषार व परिस्थितीचे जाण, आसणारा तसेच मराठी राज्याची तळमळ असणारा नेता होता. 'अमृतरावांच्या हाती मराठी राज्याची सुत्रे जातील तर हिंदुस्थानात आपला निभाव लागणार नाही, असे स्पष्ट अभिप्राय खुद्द गर्व्हनर जनरल 'लॉड वेलस्ली' यांनी दिला होता. अमृतरावाचा स्वभाव सरळ होता पण पेशवा व शिंदे यांच्या कारभारा मुळे त्याचे कधीच पटले नाही. पेशवा अमृतराव यांना थोरला भाऊ म्हणून योग्य वागणूक देत असे. हिंमत व चाणाक्षपणा अंगी असल्यामुळे तसेच दू. बाजीराव यांच्या पेक्षा आपण वयाने मोठे आसल्या कारणाने मराठी साम्राज्याचा पेशवा असावे अशी अमृतरावांची इंच्छा होती. अमृतरावाला शिंदे व पेशवा यांनी केलेल्या पुण्याच्या प्रजेवर अन्याय व अत्याच्यार या मुळे अमृतराव यांना फार राग होता. त्याच पध्दतीने स्वतःला या वाईट राजकारणाचा पण मोठा तिटकार वाटू लागला होता. पेशवा दरबारचे कारभारी पद सोडून देवून पेशवे यांच्या विरोधी नवीन मार्ग धरला होता. या मुळे पेशव्याच्या मनात अमृतराव यांच्या बद्दल समज निर्माण झाला, आणि तो म्हणजे अमृतराव आपल्या पेशवाईच्या हक्कात प्रतिस्पर्धी होणार. अमृतराव कारभारी म्हणून असताना त्यांनी पेशवा यांची बेबंद, अनागोंदी कारभाराला आडकाटी करण्यास सुरवात केली होती. याचाच परिणाम म्हणजे दोन्ही भावांन मध्ये भांडणास सुरवात झाली.[9]

पेशवा दू. बाजीराव यांनी अमृतराव यांना वर्षाला जाहगिरी नेमून दिली होती तेचे उत्पन्न चार लाख रु होते. तसेच पुरंदर, सावनूर तालुका, सुरत या भागातील तीन लाख उत्पन्नाचे प्रदेश पण देण्यात आले होते. त्याच बरोबर काही गोदावरी तटाचा भागाची वसुली यात सामिल होती. पेशवा यांनी आणखी चार लाखाची वसूली दिली 23 एप्रिल 1800 मध्ये बाजीरावाने अमृतरावस दिवाणगिरीची वस्त्रे दिली पण यावेळी पुण्यात पेशवे दरबारी पेशवा दू. बाजीराव, दौलतराव शिंदे, सर्जेराव घाडगे, यांनी पुण्यात घातलेल्या गोंधळ त्यातल्या त्यात सर्जेराव घाडगे यांनी पुण्याची लुटमार, अत्याचार, इत्यादी गोष्टी

मुळे कोणालाच कोणाचा धाक राहिला नव्हता. यासर्व स्वार्थी राजकारणाचा अमृतराव यांना राग आला व दिवानगिरी पद सोडून 20 जुलै 1800 ला अमृतरावे स्वतःसाठी आठ लाखाची सरंजाम घेऊन अमृतराव पुण्यातून सहपरिवार निघुन गेले व ते जुन्नरला जाऊन राहिले. अमृतराव शांत बसनारे नव्हते त्यांनी ब्रिटिशांशी जवळीक करण्यांचा प्रयत्न केला. अमृतराव यांनी ब्रिटिशांच्या मदतीने स्वतःचे सैन्य उभे केले. पेशव्याला खाली ओढण्यासाठी अमृतरावाने चालु केलेल्या कारवाया मुळे पेशवा पुर्ण पणे जेरिस आला होता. नाना फडणीस यांच्याशी चांगले संबंध आसणाया मंडळीशी अमृतराव यांनी चांगले संबंध ठेवले होते. त्यामुळे पेशवा यांच्या विरोधात त्याने या मंडिळाचा व ब्रिटिशांचा आपल्याला पाठिंबा मिळावा म्हणून हालचाली सूरू केल्या होत्या. आर्थिक हलाखी, सशस्त्र बंडे, त्यामुळे उद्ध्वस्त झालेले प्रदेश, सरदार वर्गाचा विरोध, कारस्थाने, लष्करी दौर्बल्य, राजकीय अस्थिरता या संकटानी पेशवे घेरले गेले होते. अमृतरावाने पेशव्याच्या विरोधात दक्षिणेतील जहागीरदार व नानाच्या गोटातील सर्व मंडळीना एकत्र करून पेशव्या विरोधात बंड चालु केले. यामुळे आपल्या पेशवाईला धोका निर्माण होणार असे पेशवा यांना वाटू लागले आणि याचवेळी ब्रिटिशानी अमृतराव यांच्याशी गोष्ट बोलून आपल्या सत्ता विस्तारासाठी एक साधन म्हणून वापर करण्यास सूरवात केली होती.[10]

अमृतराव यांनी ब्रिटिशांशी कोणत्याही प्रकारे संपर्क साधु नये म्हणून पेशव्यांनी त्यांची मनधरणी करण्यासाठी 2 सप्टेंबर 1801 ला स्वतः जुन्नर येथे गेले होते. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही त्यांना रिकाम्या हाताने परत यावे लागले. अमृतराव यांना पेशवानी कारभारी हे पद देऊन जबाबदारी सोपवण्याच्याची तयारी दर्शविली होती. पण अमृतराव यांना आपल्यावर कोणाचाही आधिकरा नको अशी र्निविकार सत्ता हवी होती पण हिच गोष्ट पेशवाना नको होती. अमृतरावाना ब्रिटिशांचा असलेला आधार पुढे पेशवासाठी मोठा धोक्याची चाहूल देत होती. अमृतराव यांनी पेशवा विरोधी सर्व कारस्थाने चालुच ठेवली होती.

3.3. होळकर यांचे पुण्यात आगमन व पेशवा यांची तारंबळ -

उत्तर हिंदूस्थानात यशवंतराव होळकर यांनी दौलतराव शिंदेना उत्तरेत चांगलीच मात दिली होती. दौलतराव शिंदे यांना चांगल्या प्रकारे नमवले पुढे दोघात वैर निर्माण झाले होते. ते आता शांत होईल असे वाटत नव्हते. यामुळे यशवंतराव यांचा आत्मविश्वास वाढत चालला होता. दक्षिणेत आपला भाऊ विठोजी मारला गेला या मुळे त्याने आपला मोर्चा पुणे दरबाराकडे वळवला यावेळी त्याना मदत करण्यासाठी अमृतराव पुढे सरकले यामुळे मराठयांच्या युध्दात नवीन कलहाला एक वेगळेच वळण सुरू झाले. अमृतराव यावेळी होळकर यांना मदतीसाठी पुर्ण पणे तयार झाले.

होळकर यांचे शिंदे यांच्या मुळे मोठे नुकसान झाले होते त्याची भरपाई पेशवा कडून घेण्याचे होळकरने ठरवले होते. यावेळी पेशव्यानी स्वतः शिंदे व होळकर यांच्यात मध्यस्थी करण्याचे ठरवले पण त्याला यश आले नाही. मराठी साम्राज्याच्या या दोन खंबिर आधार स्तंभाच्या शत्रुत्वामुळे मराठा राज्याच्या सुरक्षिततेला घातक ठरणा होते. त्यासाठी पेशवा यांनी मध्यस्थी करुन हे थांबवण्याचा प्रयत्न केला पण यशवंतराव होळकर हे ऐकण्यास दयार होईना. त्याच वेळी बाजीरावाला मोठया संकटाची चाहुल लागली ते म्हणजे यशवंतराव होळकर व अमृतराव हे एकविचाराने काही तरी कट करत आहे. याची जाणीव पेशव्याच्या डोक्यात घर करु लागली होळकर दक्षिणेत येऊन आपणास पदच्युत करण्याचा डाव आखला असणार असे पेशवा दूसरा बाजीराव यांना वाटले होते. होळकर दक्षिणेत हळूहळू पुण्याकडे सरकत होते. यावेळी पेशव्याने होळकरच्या आक्रमणाला तोंडदेण्यासाठी आपल्या मर्जितील सर्व सरदाराना पुण्यात बोलून घेतले. त्यांनी त्यावेळी नागपुरचे भोसले यांचे सहकार्य आपल्या बाजूने घेतले. हुशार पेशवा दू. बाजीराव यांनी यावेळी मृत पेशवा सवाई माधवर यांची पत्नी यशोदाबाईला जबरदस्तीने रायगड किल्यावर रवाना करून तिथे नजरकैदेत ठेवले होते. पेशवाईवरच्या येणाया संकटांचा दू. बाजीराव यास अंदाज येताच त्याने आपले पुढील प्रयत्न चालु केले होते. यशवंतराव आता आपणास जिवंत सोडत नाही त्यातच पेशवा यांच्या अंगात युध्दाचे कोणतेच कौशल्य नव्हते या मुळे पेशवा अमृतराव व होळकर यांच्या ताकदी पुढे नमत घेऊन त्यांने

पुण्यातून पळण्याच्या तयारीला लागलाच होता. यशवंतराव होळकर यांनी पेशवा दू. बाजीराव याला नम्रपणाने वर्तन करून त्याच्याशी पत्रव्यवहार केला होत. पण पेशवा दू. बाजीराव कोणतीच गोष्ट ऐकण्यास तयार नव्हता तो पुर्ण पणे घाबरा होता.[11]

3.4. होळकरानी पेशवा यास घातलेल्या अटी -

यशवंतराव दक्षिणेत येण्याच्या आधी त्यांने आपल्या मागण्या घेऊन पेशव्याकडे आपला वकिल पाराशर दादाजी यांना पाठवले होते. पुण्यातील सर्व राग रोष शांत करण्यासाठी यशवंतराव यांनी पेशवे यांना काही अटी घातल्या होत्या, त्यानुसार मल्हारराव होळकरांचा मुलगा व पत्नी अशीरगडावर शिंदेच्या कैदेत होते. मुळात शिंदेचे व पेशवा यांचे संबंध चांगले होते. त्यामुळे होळकर यांनी पेशव्याला शिंदेशी बोलून कैदेत असणाया मंडळीना आपल्या स्वाधीन करण्यात यावे तसेच होळकर घरण्याची सरमदारी मृत मल्हाररावाच्या मुलाच्या खंडेराव होळकर यांच्या नावे करुन त्यांची मालकी यशवंतराव म्हणजेच आपल्या स्वतः कडे दयावी अशी बोलणी लावली होती. शिंदे व होळकर हे दोघेही एकसारखे कर्तुत्वाने पराक्रमी समान सरमजामदार होते. पण पेशवा यांनी शिंदे यांना पुण्यात आपल्या रक्षणाकरता दहा लाखांची जाहगिर व एक किल्ला देण्यात आला होता. ज्या पध्दतीने शिंदेना हे सर्व दिले त्यांच प्रमाणे यशवंतराव होळकर यांनी देखील मागनी केली होती. जर हे शक्य नसल्यास शिंदेला दिलेली जहागीर व किल्ला पेशव्याने आपल्याकडे परत घ्यावा. उत्तर हिंदूस्थानची वाटणी शिंदे, होळकर, पेशवे आणि पवार या जाहगिरदार वर्गात समान विभागून करावी अशी मागणी होळकर यांच्या कडून जोरधरू लागली होती. पण पेशवा दू. बाजीराव व दौलतराव शिंदे यांनी इतरांचे विशेषतः होळकरांचे हक्क राजरोसपणे स्वतःच उपभोगत होते. सर्व जहागिरदार यांचे हक्क पूर्वीसारखे चालावेत असे मत होते. यशवंतराव होळकरानी पुणे दरबारावर काही ग्रहण येईल अशा मागण्या केल्या नव्हत्या. शिंदे व होळरक यांच्या दोघातील वैमनुष्यातून या मागण्या होळकरानी आपल्या उत्तरेतील राजकारणाच्या हक्कसाठी मागीतल्या होत्या. मराठी साम्राज्यातील पुणे दरबारात पेशवा यांचा होळकर आजुनही मान राखत असत. पेशवा यावेळी पुर्ण पणे गोंधळून गेला होता. त्याला आपल्या सामोर धोक्याची चाहुल निर्माण झली आहे असे दिसत

होते. याचे कारण म्हणजे, शिंदे यांच्या संदर्भात या सर्व मागण्या असल्यामुळे पेशव्यात ऐवढी ताकत नव्हती की त्याने त्या मागण्या शिंदेकडून मान्य करुन घेता येईल. शिंदे बद्दल यशवंतराव होळकर यांचा हेतु काही चांगला होता असे दिसत नव्हते आणि अता संकट येण्यार हे निश्चित झाले होते. यशवंतराव होळकर यांनी सरदार पराशर दादाजीला फौज घेऊन सन 1802 मध्ये पुण्याच्या रोखाने पाठविले तो शिंदेचा काही प्रदेश लुटालुट जाळपोळ करीत पुण्यात आला होता. पेशव्याने शिंदे व होळरांच्या भांडणामुळे त्याची सरमजाम जप्त करण्याचे आदेस दिले होते. पण पराशर दाजी यानी दे आदेश धुडकावून लावले होळकर यांचे हे सरळ-सरळ पेशवा विरोधात बंडच उभारले होते. या संदर्भात पेशवा यांनी 'धोंडोपंत गोखले' या सरदारास होळकराची सरमजाम ताब्यात घेण्यासाठी पाठवले असताना त्याचा होळकर फौजेने पराभत केला. पेशव्यानी होळकर यांच्याशी मध्यस्थी करण्यासाठी बोलणे लावले. पण पेशवा यांने होळकर यांच्या सर्व अटी शिंदेच्या कानावर घातल्या होत्या पण या मागण्या मान्य करण्यास शिंदेनी पुर्ण पणे नकार दिला. यामुळे होळरांनी आपले पावले पुण्याच्या दिशने टाकण्यास आगेकूच सुरु केली.[12]

यशवंतराव होळकराची दक्षिण मोहीम म्हणजे पेशवा यांच्या समोर फार मोठे संकट होते. पेशव्यानी आपल्या रक्षणाकरता सैन्य गोळा करण्यास सुरवात केली. पेशवा यांनी स्वतः दौलतराव शिंदेना आपल्या मदतीसाठी पुण्यात सैन्य घेऊन यावे असी आज्ञा केली होती. शिंदेनी आपले विश्ववासू सरदार 'सदाशिवराव बक्षी' यांच्या नेतृत्वाखाली फौज पाठवण्याची तयारी केली. पेशव्याने पुरंदरे, पानसे, रुपराम चौधरी, यशवंतराव पाटणकर इ. सरदारांच्या च्या नेतृत्वाखाली नवी लष्कर भरती सुरू केली. नवीन तयार सैन्य आणि महत्वाचे म्हणजे या सैन्याला युध्दाचा कोणताच अनुभव नव्हता. त्यातच होळकर यांच्या कार्यचा पेशव्याला चांगलाच अनुभव आला होता. पेशव्यानी पाठवलेल्या 'पांडोजी कुंजर' यांच्या हाताखाली फौज होळकर यांनी आपल्या गणिमी काव्याने संपून टाकली. पेशव्याच्या सैन्याचे मोठया प्रमाणात अतोनात हाल झाले होते. पेशव्याने पुन्हा मराठी साम्राज्याचे आप-आपसातील यादवी युध्द संपवण्यासाठी यातुन मार्ग

काढण्याचा प्रयत्न आरंभ केला. पेशव्याचा मेहुणा 'रघुनाथ भागवत', भोसल्याचा वकिल 'नारायणराव वैद्य', कुंजरचा दिवाण 'आबार्जी शंकर' यांना 24 ऑक्टोबर 1802 रोजी होळकर यांच्याकडे मध्यस्थीसाठी पाठवले. परंतु त्यांची भेट होळकराणे घेतली नाही. होळकर हा पराक्रमणी व दौलतराव शिंदे पेक्षा यशवरंतराव होळकर योध्दा व धडाडीचा नेता होता. त्यांने आपल्या कतृत्वावर होळकर घराण्याची सुभेदारी मिळवली होती. पेशवा दू. बाजीरावाने शिंदेशी मिळून जो पुण्यात कारभार केला त्यामुळे त्याने शिंदेचे केलेले हाल यांची पेशवा यास चांगलाच पच्छाताप आला होती.[13]

3.5. होळकराचे पुण्यात आगमन व पेशवाचे पलायन -

शिंदे, होळकर, पेशवे व तसेच इतर सरदार, जाहगिरदार, सरमजाम हे मराठा राज्याचे भरभक्कम असे खांब होते. या सर्वानी एकत्र येऊन परकीय शत्रुला धुळ जारुन आपल्या राष्ट्राचे रक्षण करायला पाहिजे होते. पण असे घटले नाही एकमेकांविरुध्द लढाण्यात, त्यांनी आपली शक्ती व बुध्दी हे दोन्ही खर्ची करण्यात वेळ घातला होता. मराठी राज्याच्या सिमेवर परकिय व ऐतद्वेशिय मराठी साम्राज्याचे शत्रु यांनी मराठयांचे चालु असलेले आप-आपसातील भांडणाचा फायदा उठवण्यासाठी पुढे झाले त्यामध्ये फायदयाच्या आघाडीवर होते ते म्हणजे ब्रिटिश युरोपियन लोक होय. ज्या पध्दतीने शिंदे व पेशवे यांनी एकत्र येऊन होळकरास परास्त करण्याचे ठरवले, पण होळकर यांनी आपला अवेश गमावून त्यांने हाडपस येथे आपल्याच साम्राज्याच्या मंडळीशी युध्द करून त्यांचा पराभव केला. या युध्दा मुळे भविष्याचा सर्व इतिहासच बदलून टाकला हे सर्व परकिय शत्रु पहात होते. तसेच ऐतद्वेशियान मध्ये जे मराठयांचे शत्रु होते त्यांना हेच हवे होते म्हणून त्यांनी आपले राज्य परकियांना मराठ्यांच्या आधिच दिले होते.

25 ऑक्टोबर 1802 रोजी मराठी राज्याचे दोन आधार स्तंभ एकमेका पुढे लढाईसाठी उभे राहिले हाते. होळकर यावेळी पुण्यात येत असताना त्याने वाटेतील शिंदे व पेशवा यांचे सर्व प्रदेश आपल्या ताब्यात घेत तो पुढे जात राहिला त्याने अहमदनगरचा किल्ला आपल्या ताब्यात घेतला यावेळी हा किल्ला शिंदच्या ताब्यात होता. तसेच अनेक

प्रदेशाची लुटमार करून यशवंतराव ता. 25 ऑक्टोबर मध्ये पुण्यात हडपसर येथे आला असता पेशवे व शिंदे यांच्या सैन्याचा पराभव केला. पेशव्याचा चांगल्या प्रकारे धुव्वा उडाला ही लढाई यशवंतराव यांच्या स्वतःच्या शौर्याने व पराक्रमाणे त्याने विजय मिळवला यावेळी शिंदे व पेशवे यांच्या सैन्याचा पूर्ण मोड झाला. दोन्ही बाजूनी युरोपियन सरदार वर्गाच्या कवाइती फौजा होत्या तरी सुध्दा यशवंतरावाने स्वतः युध्दात मोठा पराक्रम दाखविला. यशवंतराव पुण्याकडे येतांच पुण्यास पळापळ सुरु झाली. यशवंतराव पुण्यात आला हे ऐकताच दूसरा बाजीराव यांच्या अंगाचा थरकाप झाला. या घबराहाटीत पेशवा आपल्या बरोबर पाच हजार सैन्य घेऊन पुणे शहराबाहेर गेला. यावेळी त्याने पुणे व पुण्याच्या जनतेचा काहीच विचार केला नाही. म्हणून होळकराने पुण्यात लुटमार करण्यास सुरवात केली.[14] होळकर यांनी पुण्याचे मोठया प्रमाणात अतोनात नुकसान करण्यास सुरवात केली.

पेशव्याला आपण विजयी होऊ याची कोणतीच अशा नव्हती. त्याने पुण्यातून पळण्याची तयारी आधिच केली होती. लढाईत न जाता, लढाईचा परिणाम काय होतो, याची वाट पहात शहराच्या दक्षिणेस जाऊन थांबले होते. यशवंतरावाचा या युध्दात विजय झाला व शिंदयाचा पराभव झाला हे समजताच पेशवा पळून गेला. पुढे तो सिंहगड येथे येऊन राहिला यावेळी अमृतराव व होळकर यांनी तडजोड करून पेशव्यानी यात काहीतरी मार्ग काढावा या आधिच बोलणी लावली होती. दोघानी पेशव्याला पुण्यात येण्यासाठी निरोप धाडले होळकराने त्याच्या रक्षणाची हमी घेण्याचे पण ठरवले होते. पण या भयंकर परिस्थितीत बाजीरावाचा स्वःतावरच विश्वास राहिला नव्हता. पुण्यात परत गेले तर अमृतराव व होळकर आपल्याला पकडणार या मुळे आपल्याला जन्मभर कैद होणार या उद्देशाने पेशवा यांनी पुढचा मार्ग धरला. पेशवा यांनी पुण्यात परतावे म्हणून होळकरांनी विनंत्या केल्या त्याने आपला खास वकील 'भास्करराव महाडास' पाठवून पेशवा यांना निर्धास्तपणे पुण्यास यावे, असे कळवले या गोष्टीला पेशवा यांनी विरोध केला.[15] पुढे पेशवा रायगड येथे गेला व तेथून महाड येथे जाऊन राहिले. होळकर व पेशवे यांच्यात झालेल्या वाटाघाटीत कोणालाच यश आले नाही. शेवटी पेशवा यांच्या बरोबर अलेले

सहकारी ‘बाळाजीपंत पटवर्धन’ व ‘बापूजी विठ्ठल चापेकर’ यांनी त्यास ब्रिटिशांचा अश्रायाला जाण्याची जाहूल करून दिली. पेशवा दू. बाजीराव यांनी जे करायला नको होते तेच करण्याचा निर्णय घेतला. महाडवरून त्याने ब्रिटिशाचा आश्रय घेण्याचे ठरवले हाते. पुण्यातील वकिल कर्नल क्लोज यास पेशवा पुण्यातून निघुन गेले असे कळताच तो लगेच आपल्या वसई येथील वखारीवर जाऊन थांबला होता. पेशवा यांनी अंतिम निर्णय घेऊन वसईला येण्याचा निच्छीत केले. यावेळी येथे उपस्थित आसलेल्या ब्रिटिश वकिल क्लोज व पेशवा दू. बाजीराव या दोघाचा 8 डिसेंबर 1802 रोजी भेटीगाठी झाल्या. या वसईच्या मुक्कामात पेशवा ब्रिटिश आपल्याला काही मदत करतात का हे बघत होता तर ब्रिटिश यांना हे आपल्याकडे चालुन आलेली संधी सोडण्यासाठी तयार नव्हते. यावेळी ब्रिटिशांनी पेशवा यास आपल्या स्वार्थासाठी मदत करण्याचे ठरवले होते. पेशवा दू. बाजीराव यांनी ब्रिटिशांनच्या रंगात रंगण्याचा पुर्ण विचार केलेला होता. होळकर यांनी पेशवा यांनी पुण्यात परत यावे यासाठी आग्रह धरा होता पण पेशव्याला वाटणारी भिती मुळे तो परत पुण्यात आला नाही.

3.6. पेशवे पद अमृतराव यांच्याकडे -

पेशवा दुसरा बाजीराव पुण्यात येईल या आशेने यशवंतराव होळकर यांनी जी मवाळ भूमिका घेतली होती त्यानी पुढे सोडून दिली. पुण्यातील लोकांकडून जबरदस्तीने व क्रूरपणाने पैसे वसूल करण्याचा सपाटा चालविला. मोठया प्रमाणात पुण्यातील लुटीची रक्कम यशवंतराव यांनी जमा केली. पेशवा परत पुण्यात येईना म्हणन यशवंतराव यांनी अमृतराव यांना पेशव्याच्या गादीवर स्थापना करण्याचा विचार केला. पेशवा पळुन गेला यामुळे पेशवा घराण्यातील एकमेव मुख्य उमेदवार म्हणून पेशव्याच्या घराण्यात आता फक्त अमृतराव हेच योग्य होते. पेशवा पळाला त्याने पुणे सोडले व अशा वेळी होळकर यांनी पुण्यात राजकारण चालु केले. त्याने अमृतरावास पुण्यात येण्याचे आमंत्रण धाडण्यात आले. अमृतराव पुण्यात 7 नोव्हेंबर 1802 मध्ये आले त्यांच्या या दिरंगाई मुळे पेशवा दू. बाजीराव यांला विचार व पुढील रननीती ठरवण्यासाठी चांगलीच वेळ सापडली होती.[16]

होळकर यांनी पुण्यात अमृतराव यांना बोलावल्यावर होळकरांच्या मर्जिनुसार अमृतरावाना 12 नोव्हेंबर 1802 पासून पेशवा पदाचा कारभार हाती घेतला. अमृतराव स्वतः पेशवा होण्यास तयार नव्हता तो पुण्याचा काभार स्वतंत्र पणेच जुन्नर येथूनच नियंत्रण ठेवत होता. अमृतराव पुण्यात येऊन कारभार पाहत नाही म्हणून यशवंतराव यांनी अमृतराव यांच्या मुलास विनायकराव यांना पेशवाईची वस्त्रे देण्यास सांगितले यशोदाबाई यांच्या मांडीवर विनायकराव दत्तक देऊन तसेच विनायकराव यांचे 'बाळाजी माधवराव' हे नामकरण करून त्याना पेशवाईची वस्त्र दयावीत असे ठरले व यास अमृतराव यांनी पुर्ण समतीन दिली. यशोदाबाई हया रायगड किल्यावर दूसरा बाजीराव यांच्या कैदेत होत्या प्रथम यशोदाबाई यांना सोडून पुण्यात आणणे गरजेचे होते. यशवंतराव होळकर यांनी आटोकाट प्रयत्न करुनही यशोदाबाई मुक्त झाल्या नाही. यावेळी मराठी साम्राज्याचे आराध्य साताकर छत्रपतीनी यांनी ता. 22 डिसेंबर 1802 ला विनायकरावांचे नावे पेशवाईची वस्त्रे दिली त्यांच्या नावे कारभार सुरु केला. यशोदाबाईच्या कैदेमुळे दत्तक विधान होऊ शकले नाही. विनायकराव हे लहान असल्या कारणाने कारभार पाहण्याची सर्व जबाबदारी अमृतराव यांनी पाहण्याचे ठरवले होते. यामुळे दूसरा बाजीरावाने अमृतरावाना भेटण्यासाठी कोकणात बोलावले होते. पण यात दू. बाजीरावची काही तरी चाल असल्याकारणाने अमृतरावाना जानवले आणि त्यांनी जाण्याचे टाळले याच बरोबर अमृतराव यांना दू.बाजीरावाच्या कोकणातील सर्व कारभाराची माहिति मिळत होती.[17]

3.7. ब्रिटिशांनी मराठयांची केलेली चाचपणी व पसरवलेले जाळे -

निजाम व टिपू यांचा पाडाव करून ब्रिटिशांनी निजामावर तौनाती फौजेचा तह लादला तसाच तह मराठयांवर लादून आपले सैन्य पेशवाई मुलखात ठेवण्याचा ब्रिटिशांचा एकसारखा प्रयत्न चालू होता. ग. ज. लॉर्ड वेलस्ली चे हिंदूस्थानात झालेले आगमना पासून त्याने येथील संस्थानिकाशी तैनाती फौजेचा तह करण्याचा जनु सपाटा चालविला होता. त्याने प्रथम निजाम व म्हैसुरच्या टिपू यांच्याशी हा सर्वस्व गमावनारा तह केला. येथील संस्थानिकानी ब्रिटिशांचे सैन्य आपल्या मुलखात ठेऊन आपले स्वतंत्र गमावून बसले होते. याचा परिणाम ब्रिटिशांचे हिंदूस्थानातील सत्ता वाढीला मोठा आधार मिळाला.

ब्रिटिशांनी हिंदूस्थान मध्ये मराठयांच्या साम्राज्याला आपल्या जाळयात ओढण्यासाठी अनेक प्रयत्न चालु केले होते. ब्रिटिशांना टिपूचा पाडाव करण्यासाठी त्यांला मदत करणारे मराठे व निजाम यांनी आपल्याच ऐतद्देशीय राजां विरुध्द परकियांना मदत केली होती. शेवट ब्रिटिशांनी टिपूचे केलेले पानिपत यामुळे या लढाईत निजाम, पेशवे व ब्रिटिश या तिघान मधे झालेले हिस्से पण त्यात सर्वात कमी हिस्सा मराठयाना देण्याचे ठरले होते. त्यात मराठयांना यामध्ये खडतर अशा अटी घालुन पेशवा यांना निजाम व टिपू यांच्या सारखे पांगळे करण्याचे ठरवेल होते. पेशवे व शिंदे यांनी टिपूच्या युध्दात ब्रिटिशांना नकेलेली मदत ही गोष्ट चांगलीच खटकली होती. यामुळे पेशव्यानी आपल्या स्वातंत्र्यावर गदा येणार म्हणुन ब्रिटिशांनी म्हैसूरचा देऊ केलेला हिस्यावर पेशवा याना पाणी सोडावे लागले. पेशवा दुसरा बाजीराव राजकारणात कितीही अनभिज्ञ असला तरी त्याला ब्रिटिशांना या अटींमागील आसणाया स्वार्थाची चांगलीच जाणीव आली होती. ब्रिटिशांना आपल्या धोरणासाठी व पेशवे यांना अधिन करण्यासाठी एकोनाविसाव्या शतकाची फार लांबची प्रतिक्षा करावी लागली जवळ जवळ निम्या हिंदुस्थान मध्ये ब्रिटिशांनी आपले विस्तारवादी धोरण फैलावले होते. यशवंतराव होळकर पुण्यावर चालुन आले यामुळे मराठी राज्यात हात घालण्याची संधि स्वतः ब्रिटिशांकडे चालत गेली होती.

ग. ज. लॉर्ड वेलस्ली हे विस्तारवादी धोरणाचे प्रखर नेतृत्व करणारे आसल्या कारणाने त्याने पुण्याती वकिल पामर यांना पेशवा यास तैनाती फौज स्वतःच्या संरक्षणाकरीता ठेवावी म्हणून मन वळवावे असे वारंवर सांगत होता. पण पामर याने पेशव्याशी मैत्रीच्या तहाची गळ घातली पण त्यात त्याला अपयश आले. याचा परिणाम म्हणजेच पामर यांची पुण्यातून वकिल पदावरून सन 1801 मध्ये उचलबंगडी केली. अखेरीस पुण्याच्या वकिल पदावर नवीन नियुक्ती झाली ती म्हणजे 'कर्नल बॅरी क्लोझ' व त्याचा असिस्टंट म्हणुन 'एल्फिन्स्टन' यांची होय. होळकराने पुण्यावर स्वारी केली व पुण्याचा ताबा घेतलावर क्लोझ यांनी होळकराची भेटी घेतली होती. पण क्लोझ यांना होळकर यांच्या संगे संबंध ठेवण्या पेक्षा पेशवा दुसरा बाजीराव यांच्याशी मैत्रीचे संबंध

असावे असे वाटू लागले होते. क्लोझ यावेळी होळकर यांच्यावर बारीक लक्ष ठेवून होते. पेशवा सवाई माधवराच्या मृत्यु नंतर पुण्यात सारखी धुसफूस चालू राहिली होती. शेकडो अनर्थ घडले पण संगमावरील ब्रिटिशांच्या वाटेस किंवा त्याच्या आश्रयास राहणाया लोकाना कोणी वर मान करून सुध्दा बघितले नाही. शिंदे व होळकर याच्या पुण्यात चाललेया युध्द प्रसंगी क्लोज हा संगमावर उंच कांठीला ब्रिटिश निशाण लावून खुशाल बसला होता. कारण निशाणाला दोघांकडून सारखाच मान मिळणार अशी ब्रिटिशाना खात्री होती.[18] यशवंतराव होळकर यांनी क्लोजच्या मध्यस्थीने हे भांडण मिटवावे यासाठी ब्रिटिशांना मध्यस्थीची भूमिका घेण्यास सांगीतले. पण ब्रिटिशांना यात आपला फायदा काहीच दिसत नव्हता.

3.7.1. पेशवा दुसरा बाजीराव ब्रिटिशांनच्या जाळयात -

दुसरा बाजीराव पूणे सोडून कोकणाच्या दिशेने निघुन जाताना पेशव्याने आपल्या सही शिक्क निशी एक खलिता कर्नल क्लोज यांच्याकडे पाठवला क्लोजला स्पष्ट लिहून कळवले की, तुमच्या आश्रयाचा मी विचार करत आहे. तरी आपण मला होळकराच्या स्वाधीन करु नये, तसेच योग्य वेळी कंपनीचा प्रदेश सोडायचे मला स्वातंत्र असावे असे सांगितले. पण यामागे पेशव्याचा हेतु हा होळकर ब्रिटिशांच्या नावाने तरी शांत बसेल, व मैत्रीस तयार होईल ही बाजीरावाची युक्ती होती. ही जाणीव ब्रिटिशांना लगेच आली. त्यामुळे कर्नल क्लोज पुण्यातुन निघुन तोही वसई येथे येऊन थांबलेला होता. दुसरा बाजीराव संकटांत येण्याची ग. ज. लॉर्ड वेलस्ली खुप वाट पाहत होता आणि ती संधी एकदाजी आली, यावेळी या संधिचा फायदा करण्याचे ग. ज. ठरवले होते. ज्यापध्दतीने ब्रिटिश वकिल पामर यांना मराठी राज्य सुखाने राहवे असे वाटत होते तसी परिस्थिती आता ब्रिटिशांच्या कोणत्याच अधिकायास वाटत नव्हती च्यापध्दतीने पामर सारखा ब्रिटिशांनी मराठी राज्या साठी सुखाच्या गोष्टी केल्या होत्या पण आता कोणीच मराठी राज्य पुढे सुखाने नांदावे अशा प्रयत्न नव्हते.[19]

कर्नल क्लोज यांनी दूसरा बाजीराव यांच्याशी तह करण्याच्या अटी दिल्या. शिंदे व होळकर यांच्याशी मध्यस्थी करुन मार्ग काढावा या दिसेने पाऊले ब्रिटिशांनी

उचलावीत यासाठी पेशव्यानी सुरवात केली पण ब्रिटिशांनी यास साफ नकार तीला होता. मराठेशाहित शिंदे, होळकर, भोसले हे प्रबळ नेते पण हे ब्रिटिशांनी कोणताच तह करणे शक्य नव्हते यात शिंदे व होळकर यांनी बरेच युरोपीयन अमलदार नौकरीस ठेवून अपली स्वतः चीच कवायती फौज तयार केले. यात दू. बाजीराव या दोघांन पेक्षा ही फार भिन्ना असल्यामुळे त्यानी ना शिंदे ना होळकर यांच्या तालात चालणे सोडून ब्रिटिशांच्या तालाने चालण्यास तयार झाला. यामुळे यशवंतराव होळकर त्यांचा वैरी बनला, शिंदयाची त्यांची दोस्ती परंतु त्याचा वरचष्मा व सासुरवास दू. बाजीरावास असाह्य झाले होते. महादजी शिंदे याचे सामर्थ्य व अक्कल दौलतराव शिंदे याच्या जवळ राहिली नाही.

ब्रिटिशांच्या आसरा पेशव्यानी अखेरीस घेण्याचे कबूल केले. म्हणजेच तैनाती फौज मराठयांच्या पदरी ठेवण्यास ब्रिटिश मोकळे झाले होते. परंतु त्यातली महत्वाची गोष्ट म्हणजे पेशव्याच्या राज्याच्या हद्दीच्या आत ब्रिटिशांचे सैन्य कायमचे आणुन ठेवण्यास तो कबूल होईना. पेशवा यांनी ब्रिटिशांना उत्तर दिले ते म्हणजे, माला लागेल तेव्हा मी सैन्य मागवीन व तेव्हा ते तुम्ही मला दयावेत. ब्रिटिश या गोष्टीला तयार नव्हते पेशव्याच्या राज्यात ब्रिटिशांचे सैन्य राहिले तर पेशव्याची सर्व लष्करी सत्ता ब्रिटिशच्या हातात जानार होती. यामुळे पेशवे ब्रिटिशाचे मांडलीक बनणार व पर्ण पणे बाहूला बनून राज्य करणार या गोष्टीची संपुर्ण जाणीव पेशवा यास आली होती म्हणुन तो सैन्य ठेवण्यास वारंवार नकार देत होता.[20]

अमृतरावाने ब्रिटिशांकडे आपणास नवीन सरकार स्थापन करण्यासाठी मान्यता द्यावी, अशी त्याने बोलणी चालवली होती. पण याचा ब्रिटिशांनी आपल्या स्वार्धासाठी वापर करण्याचे ठरविले म्हणुन ते बाजीराव बरोबर एक चाल खेळली आणि ती म्हणजे अमृतरावाशी ब्रिटिशांचा करार होणार याची शक्यता अप्रत्यक्ष पणे बाजीराव यांच्या कानावर जाऊ दिली. ऐकीकडे बाजीरावाने आपल्या मततीला शिंदेचे सैन्य बोलावले होते. पेशवा यास शिंदे यांचे सैन्य मिळाले तर आपली संधी जाणार या मुळे ब्रिटिशांनी त्यांना पुढील संकटात टाकले ते म्हणजे ब्रिटिशांनी अमृतराव व होळकर यांच्याशी तह करुन त्यांना मदत करण्यास तयार आहे. अमृतराव ब्रिटिशांना चांगल्या प्रकारे अनुकूल

होता. त्यामुळे बाजीरावाच्या मनात चांगलाच गोधळ निर्माण झाला. अमृतराव यांच्या मुळे ब्रिटिशांचा पाय मराठी राज्यात रोवला गेला असता आणि तो नंतर काढून टाकणे बाजीरावास शक्य झाले नसते. ही गोष्ट घडून येऊ नये व आपणच ब्रिटिशांशी तह करुन नंतर ब्रिटिशांना पुढे धोक्याने परतुन लावू ही योजना बाजीराव यांनी आखली होती. भविष्यात आपण ब्रिटिशांना हुसकावून लावू शकतो या जोरावर त्याने तहास हमी भरली. ब्रिटिश यांच्या शिवाय आपल्याला मदतगार कोणी राहिला नाही ही गोष्ट बाजीरावाच्या लक्षात आली. इकडे ब्रिटिश पेशव्याशी तैनाती फौजेचा तह करुन पेशवाई गिळंकृत करण्यास टपून बसलेच होते.[21]

3.7.2. ब्रिटिशांशी करार व मराठयांची सार्वभौम सत्ता धोक्यात -

ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्य विस्तारवादी धोरणाने “31 डिसेंबर 1802 मध्ये दुसरा बाजीराव पेशवा यांच्याशी वसई येथे तह केला. हाच मराठेशाहीच्या इतिहासातील सर्वात नामुष्कीचा तैनाती फौजेचा तह होय.” या तहा नुसार बाजीराव पेशवा व ब्रिटिश (ईस्ट इंडिया कंपनी) यांनी एकमेकाच्या मुलखाच्या सरक्षणार्थ एकमेकास मदत करावी. बाजीराव पेशवा यांच्या संरक्षणाची जबाबदारी ब्रिटिशांनी घेतली होती. बाजीराव यास सहा हजार कवायती पायदळ व तोफखाना, युरोपियन गोलदाज द्यावे व त्यांना पेशव्याच्या मुलखात कायमचे राहू द्यावे. लढाई चालू असताना दोन हजाराच्या दोन पलटणी पेशव्याच्या सोबत ठेवाव्यात व बाकीच्या पलटणी, सहा हजार पायदळ व दहा हजार स्वार लढाईवर पाठवावे. फ्रेंच किंवा इतर ब्रिटिशांच्या कोणत्याही ऐतद्वेशिय अथवा युरोपियन शत्रुस पेशवा यांनी आश्रय देऊ नये. सैन्याच्या खर्चाकरिता सव्वीस लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख ब्रिटिशांना तोडून द्यावा. ब्रिटिश सैन्याच्या खर्चाकरिता जे अन्न व माल परदेशातून येईल त्यावर जकाम लावू नये. सुरत शहर पेशवा याने ब्रिटिशांसाठी त्यावे. पेशवे यांचा निजाम, व इंतर शत्रुशी तंटा निर्माण झाला तर तो ब्रिटिशांच्या मध्यस्थिने सोडवावा यानुसार ब्रिटिशांनी मराठी साम्राज्यांला मोठया संकटात टाकले हाते. तसेच बडोदयाचे गायकवाड घराणे पेशव्यासाठी अनुकूल होते, पण कालांतराने ब्रिटिश व गायकवाड यांच्यात

जो मैत्रीचा करार झाला त्याला पेशव्यानी संमती दयावी. ब्रिटिश संमती घेतल्याशिवाय पेशव्याने दूसया कोणत्याही ऐतद्वेशिय संस्थाशी युध्द करू नये तसेच त्यांच्याशी कोणतेही राजकीय बोलने करू नयेत. या तहाचे थोडक्यात वर्णन करायचे म्हणजे, मराठयांच्या स्वातंत्र्य सौभाग्याचा कुंकुमतिलक तिच्याच त्या नादान पोराने (दुसरा बाजीराव) वसईच्या तहावर सही करून तो पुसून टाकला. [22]

तहाच्या या अटी मुळे आपले स्वातंत्र्य नष्ट होणार हे स्पष्ट दिसत होते. यावर दु. बाजीराव यांना काहीच सुचेना ते चारही बाजूनी पुर्ण पणे संकटात सापडले होते. या तहाच्या अटी इतक्या स्पष्ट होत्या की, यावर मराठी साम्राज्याच्या कोणत्याही नेत्याला, घराण्याला यावर काही टिका करण्याचा अधिकारच राहिला नव्हता. ग. ज. वेलस्लीची तैनाती फौजेची पध्दत व मराठयांची चौथाई सरदेशमुखीची पध्दत या दोन्ही मध्ये कवडी मात्र फरक नव्हता. मराठे बादशाही मुलखाच्या संरक्षणासाठी चौथाई मागत असत तसेच ग. ज. वेलस्ली यांनी मुलूख तोडून मागितला. साम्राज्यसत्ता प्रस्थापित करू पाहणारी राष्ट्रें असे कोणते तरी तत्व पुढे करतात व आपली सत्ता वाढवितात. खुद्द देशी संस्थानिकांच्या दृष्टीनें या अटींना अर्थ हाच की त्यांनी अमोल स्वातंत्र्याची किंमत देऊन भाडोत्री सुरक्षितपणाचा उपभोग घ्यावा. या तहाचे पाल करण्याकरता दोन्ही पक्षाकडून हा तह शेवटास नेण्याकरता सहा फलटणे शिपाई, सहा हजार बंदुक व तोफा तसेच गालंदाज फिरंगी हे पेशव्याचा मुलखात राहतील असे ठरले. या तहाने कोणला नुकसान होणार नाही याची काळजी घेण्याचे ठरले होते.[23] ऐतद्वेशिय राजे यांच्यावर आपल्या संस्थानचे रक्षण करण्याची जबाबदारी नाहीशी झाली. आता त्यांना वाटेल त्या पध्दतीने व आपल्या मना प्रमाणे वागण्यास तयार झाले. आपल्या विरोधातील एखांदा बंदोबस्त मोडण्यासाठी ज्या प्रमाणात बंदोबस्त करावा लागतो. त्यासाठी तैनाती फौजेचा जाच जास्त घट बसेन व त्यामुळे तो ऐतद्वेशीय अधिकच बेफिकीर बनेल. तैनाती फौजेमुळे बेफिकिरी, बेफिकीरीमुळे अव्यवस्था व अव्यवस्थेमुळे वाढती तैनाती फौज या पध्दतीने ब्रिटिशांनी आपला साम्राज्या विस्ताराचा कार्यक्रम हिंदुस्थानाभर चालु केला होता.

पेशव्याची सार्वभौम सत्ता संपुष्टात येऊन दूसरा बाजीराव ब्रिटिशांचा मांडलीक बनला. ब्रिटिशांची फौज पुण्यात कायम राहणार व त्यानुसार दू. बाजीरावाला आपला कारभार पाहवा लागणार होता हा धोका कोणाच्याही लक्षात येण्यासारखा होता. बाजीरावास तो दिसला पण अंगी कुवत नाही, पदरी फौज नाही, जवळ पैसा नाही अशा दिनवाण्या अवस्थेत त्याने कागदावर सही केली. यावर 'ग्रॅड डफ' म्हणतो 'स्वातंत्र्याची किंमत देऊन आपल्या देहाचा बचाव बाजीरावाने विकत घेतला'. या तहाचे ऐवढे वाईट उदगार हे एका ब्रिटिश अधिकायाने केले होते. तह झाला खरा पण या तहाने पेशव्यानी आपली पेशवाई गहान ठेवली पण त्यानी आपल्या पेशव्याई बरोबरच शिंदे, होळकर, भोसले, मराठी साम्राज्याचे सर्व जहागीरदार, सरमजाम, सरदार इ. यांच्या सर्वाची सुत्रे ब्रिटिशांच्या हाती गेली. धन्याचे धनीपण गमावल्याचे धन्याला दुःख झाले नाही, इतके चाकराचे चाकरपण गमावल्याचे दुःख चाकराला झाले. यावेळी दु. बाजीरावाने स्वतःचे त्याच बरोबर दुसयाचेही स्वातंत्र्य गमावले होते. मराठा साम्राज्य एक प्रकारे पंगु झाले त्याला आधार कोणाचा राहीला नाही. आप-आपसातील भांडणाने मात्र लाभ दुसयांचा झाला आता ही परिस्थीती सुधरण्याच्या फार पलिकडे गेली होती.[24]

वसईच्या तह झाला पण हा तह म्हणजे तैनाती फौज आपल्या पतरी ठेवून एक प्रकारचे ब्रिटिशांच्या पध्दतीने वागणे या तहाने पेशव्याने आपले सर्व सार्वभौम स्वातंत्र संपुष्टात आनले. ब्रिटिशांची फौज पुण्यात पेशवा दु. बाजीराव याच्या आसपास राहणार होती हा धोका मोठा होता. बाजीराव काय करणार, शिंदे आपले सैन्य घेऊन वेळेवर आले नाही, स्वतःच्या अंगी कुवत नाही, पदरी चांगल्या प्रकारे फौज नाही. जवळ पैसा नाही या सर्व गोष्टीची पुर्ण पणे कमतरता होती. अशा मोठया दिनवान्या आवस्थेत बाजीराव होता की त्याला वसईच्या एका कागदावर सही करण्या शिवाय दुसरा पर्यायच दिसला नाही. ब्रिटिशानी येथील आपली हुशारी पणाला लावली साम्राज्य विस्तार करण्याच्या ग. ज. वेलस्लीच्या धोरणाला मोठया प्राणात हिंदूस्थानात वाव मिळाला होता. यावेळी जवळ-जवळ हिंदूस्थानाचा बराच भू-भाग ब्रिटिशांनच्या ताब्यात गेला. जेव्हा वसईच्या तहाची बातमी मराठी राज्यातील सर्व सरमजाम, जहागीरदार, सरदार यांना कळताच मोठा धकाच बसला

यांना सर्वांना या तहाच्या परिणामाची जानीव झाली होती. या तहा नंतर शिंदे, होळकर, अमृतराव, भोसले, पटवर्धन या मराठा राज्याच्या साम्राज्याचे आधार स्तंभ यांनी या तहाला व बाजीरावाला मोठया प्रमाणात विरोध केला. बाजीरावच्या या तहा मुळे सर्व मराठी मंडळाच्या सर्व घराण्याच्या स्वातंत्र्याला मोठी गदा येणार होती याची जाणीव सर्वांना झाली होती.

3.7.3. अमृतराव व होळकर यांनी पुण्याचे केलेले नुकसान -

दुसरा बाजीराव पुण्यात आले नाही यामुळे यशवंतराव होळकर यांनी पुण्यात लुटमार करण्यास सुरवात केली. पुण्यातील लोकांकडून जबरदस्तीने व क्रूरपणाने पैसे वसूल करण्याचा सपाटा चालविला आणि मोठया प्रमाणात पुण्यातील लुटीची रक्कम होळकर यांनी जमा केली. यावेळी होळकराच्या पठाण सैन्यानी पुण्यात एकच हैदोस घातला अत्याचार, मारहाण हे प्रकार दररोज होऊ लागले. पेशव्यांच्या हात्तीची सोन्याची अंबारी, तोफा तसेच भांडी, कपडे ही सर्व कोटयावधी रुपयाची संपत्ती लुटली होती. पैसे मिळविण्यासाठी अमृतराव व होळकर यांच्या सहकार्यानी पुणेकरांच्या घरांनी मोठी लुटमार चालू केली. त्याच पध्दतीने लोकास मारहाण केली. बायकांचे अंगावरील दागिने, घरातील भांडी असेल ते विकुन मार खावून लोकांनी होळकर व अमृतराव यांना पैसे दिले, अशा रीतीने चार महिन्यात पंन्नास लाख रूपये उभे झाले. पैशाकरिता लोकाचा छळ होळकरांनीच केला असे नाही तर अमृतराव पेशवा यांनीही त्याला चांगलाच हातभार लावला.[25]

दु. बाजीराव पुण्यात ब्रिटिशांच्या मदतीने येणार आहे तसेच वसईचा तहाची पुर्ण बातमी होळकर यांना समजल्यावर त्यांनी बाजीराव यांच्यावर जिडून ब्रिटिशांशी युध्दाचा निर्णय घेतला पण त्यावेळी आपल्याला कोणाची मदत होणार नाही याची पक्की खातरी वाटली त्यात त्यांनी पुण्यात केलेली लूटमार मोठी धोक्याची ठरली होती. अमृतराव साथ देतील पण तसे झाले नाही. अमृतराव पण पुण्याच्या लुटीत मागे राहिले नव्हते त्यांनी पण मोठया प्रमाणे लुट गोळा केली. होळकर व अमृतराव यांनी पुण्याची होती नव्हती ती सर्व संपत्ती लुटून टाकली. यावेळी अमृतराव यांनी पेशवा होण्यासाठी ठरल्याप्रमाणे होळकर यांना एक कोटी रुपये देऊ न शकल्याने त्याच्या दोघातील मैत्रीचे संबंध पुर्ण पणे संपुष्टात

आले. या दोघानी पुणे व सर्व परिसर लुटून आपल्या परिणे गोळा करता येईल तेवढी रक्कम गोळा करुन होळकर पुणे सोडून माळव्यात निघुन गेले. अमृतरावाने पुण्याचे होते नव्हते ते सर्व वैभव लुटले आणि थोडया दिवसासाठी पुण्यात पेशवा म्हणुन बसलेले अमृतराव शेवटी तेही पुणे सोडून निघुन जाताना त्यानी वाटेत नाशिक पर्यंत सर्व प्रदेश लुटून खाक केला.[26]

3.8. ब्रिटिशांनी फोडा आणि राज्य करा नितीचा योग्य वापर करून युध्दाचे रणफुकले -

3.8.1. ब्रिटिशांच्या मध्यस्थीने अमृतरावची शांती -

दुसरा बाजीरावाशी ब्रिटिशांनी वसईचा तह केला खरा पण पुण्यात अमृतरावाने घातलेला घाट शांततेने निस्थारण्यासाठी तसेच अमृतराव ब्रिटिशांच्या विरोधी पक्षात जाऊन म्हणजेच शिंदे यांच्या बरोबर आपली ताकद वाढवुशकतील ही गोष्ट ब्रिटिशांच्या दृष्टीने मोठी धोक्याची घंटा होती. म्हणून ब्रिटिशांनी अमृतराव यास खुश करण्याचे कार्यक्रम चालु केला. अमृतराव तसाही ब्रिटिशांच्या विश्वासातील होता पण होळकराशी आपले सुत जुळवून राहिला होता. पण यामुळे त्याला ऐकटे सोडले तर तो कोणतेही कृत्य करण्यास मागे पुढे पाहनार नाही असे ब्रिटिशंना वाटत होते. तसेच अमृतरावही धास्तावलेच होते की, होळकरा बरोबर राहुन आपण पेशव्याला दिलेली चिथावणी तसेच पुण्योचे केले नुकसान व यामुळे पेशवा परत गादीवर बसला तर आपले हाल होणार हे त्याच्या पुर्ण पणे लक्षात आले होते. त्यातच ब्रिटिशांनी यातुन मार्ग काढण्यासाठी व अमृतराव यांना आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी आपले अंकीत करण्याची एक चाल खेळली होती.

अमृतरावाने असंतुष्ट राहुनये, काही कारस्थान निर्माण करु नये व दोन्ही भावात सलोखा राहावा यासाठी ग. ज. वेलस्ली यानी प्रयत्न चालु केले. अमृतराव व गव्हर्नर आर्थर वेलस्ली यांच्यात स्वतंत्र वाटाघाटी झाली. पेशवा दुसरा बाजीराव यांनी अमृतरावाची जप्त केलेली सात लाखाची नेमनुक काढून घेतली होती. हे नुकसान भरून काढावे आपल्याला जी जहागिरी दिली होती तीच्या ऐवढी नेमनुक मिळावी ही आशा

अमृतरावाने वेलस्ली जवळ मांडली त्यानुसार ग. ज. वेलस्लीने सात लाख व नौकर खर्च एक लाख रुपये अशी आठ लाखची नेमणुक मंजुर केली. पेशवा यांना ब्रिटिशांनी अमृतरावाशी केलाला तह आवडला नाही तेव्हा त्यांनी हे ग. ज. वेलस्लीला विचारले असता त्याने उत्तर दिले ते असे ''या परिस्थितीमुळे समोर येणाया युध्दामध्ये अमृतरावाची मैत्री संपादन करणे आम्ही आवश्यक समाजो म्हणुन त्यांच्याशी मैत्रीचा करारा केला'' ब्रिटिशांनी आपल्या स्वार्थासाठी दू. बाजीराव यांना पेशवा पदावर बसवायचे होते, तसेच अमृतराव यांना पेशवा पदावरून दूर ठेवण्यासाठी त्यांनी जहागिरदारी दिली. तेव्हा त्यांनी अमृतराव यांच्याशी 14 ऑगस्ट 1803 रोजी स्वतंत्र तह करून ब्रिटिशांशी आपल्या मार्गतील एक अडथळा दुर करून अमृतराव यांना आठ लाखची स्वतंत्र जहागिरी देवुन शांत बसले होते.[27]

3.8.2. होळकर विरुध्द ब्रिटिशानी रचलेला सापळा -

ब्रिटिशांनी दुसरा बाजीरावाला पेशवाईच्या गादीवर बसवण्यासाठी हालचाली सुरू केल्या. सन 13 मे 1803 रोजी ब्रिटिश वकिल कर्नल क्लोज व दु. बाजीराव पुण्यात आल्यावर त्यांना पेशवाईच्या गादीवर बसवून पुण्याच्या व मराठी साम्राज्याच्या संरक्षणाचा जाहीरणामा ग. ज. वेलस्लीनी सर्वत्र मराठी मुलूखात फिरवला त्या जाहीरनाम्यामध्ये त्यांनी ''आपल्या इच्छा, आपले सदहेतु कोणते आहेत आणि पेशव्याचे मित्र म्हणून आपण त्यांना त्यांच्या गादीवर बसण्याकरिता पुण्यात येत आहोत, आम्हाला कोणाचेही शत्रुत्व नाको आहेत. कोणालाही इजा करणार नाही असे स्पष्ट करून दिले.'' यावेळी एकीकडे ब्रिटिशांनविरुध्द एक वेगळी जुट घडवून आणण्याचे प्रयत्नात अमृतराव यांनी जालु केले त्यासाठी त्यांनी निजामास आपल्या गटात घेण्यासाठी प्रयत्न सुरू होते. तसेच दक्षिणेतील सरदार, सरमजाम या वर्गना त्यात पटवर्धन, रास्ते, विंचुरकर यांना ब्रिटिशांच्या विरुध्द एकजुट करण्यास सुरवात केली पण यातुन काहीच निष्पन्न झाले नाही. अमृतराव व होळकर यांना साथ देण्यासाठी कोणीच पुढे आले नाही याचे कारण म्हणजे, दक्षिणेकडील ही मराठी मंडळी दु. बाजीराव हे ब्रिटिशांची मदत घेऊन आपले सरमजांम जप्त करील म्हणून त्यांनी ब्रिटिशांनच्या आश्रयाचा विचार करून त्यांची मदत केली. मराठी राज्याच्या

अस्थित्वालाच आता मोठा धोका निर्माण झाला होता. आता दौलतराव शिंदे आपल्या मराठी साम्राज्यासाठी काय करणार हे महत्वाचे होते. शिंदे यांनी आप-आपसातील हेवे दावे सोडून देऊन होळकर यांना बरोबर घेऊन एक संयुक्त आघाडी उभारण्याचे ठरवले होते. त्यासाठी त्यांनी होळकरांच्या आसणाया मागण्या मान्य केल्या त्या म्हणजे, खंडेराव होळकर याश यशवंतराव कडे पोच केले, होळकराचे सर्व स्वकीय यांना मुक्त केले, तसेच जप्त केलेले प्रदेश परत देऊन टाकले. यानुसार शिंदेनी यामध्ये कोणतीही अट न घालता यशवंतराव होळकराच्या सर्व अटी मान्य केल्या. पण यावेळी ब्रिटिशांनी खटपट करून तसेच फितूरी यांचा चांगलाच उपयोग ब्रिटिश कंपनीने आपल्या फायदयासाठी केला.[28]

ब्रिटिशांच्या ताब्यातुन मराठीशाही सोडवून घेण्याशाठी दौलतराव शिंदे व रघुजी भोसले यांनी एकत्र येण्याचे ठरवले व ते एकत्र आले तेव्हा भोसलेनी आपले सैन्य सरदार ‘बाळाजी यशवंत’ यांच्या नियंत्रणाखाली शिंदेयांच्या जोडीला पाठविले. यावेळी दौलतराव शिंदे यांनी महत्वाची गोष्ट केली ती म्हणजे आपला दिवान ‘यादव भास्कर’ याचा भाऊ ‘माधवराव भास्कर’ यास रघुजी भोसल्याकडे पाठवून यशवंतराव होळकरास आपल्या गटात वळविण्याचे काम सांगितले होते. शिंदे व भोसले दोघांनीही होळकर यांना आपल्या गटात सामिल करण्यासाठी पुरेपूर प्रयत्न केले. महत्वाचे म्हणजे यांवेळी शिंदे व होळकर एकत्र येण्यार तोच मोठे संकट पुढे येऊन उभे राहिले होते. दौलतराव शिंदे यांनी पेशवा दु. बाजीराव यांना काही पत्रे लिहली होती. पण यात ब्रिटिशांनी आपला हेतु सफल करण्यासाठी त्यांनी ती पत्रे यशवंतराव होळकर यांच्या हाता पडावी यासाठी प्रयत्न केले. एका पत्रात यशवंतरावाने ज्या ज्या मागण्या केल्या आहेत, त्या त्या मागण्या पूर्ण करण्याचा आपल्याला फक्त देखावा करावयचा आहे. युध्द संपल्यावर आपण त्याचा पुरेपुर सूड घेऊ’ असे त्या पत्रात नमुत केलेले होते. या मुळे दौलतराव शिंदे व यशवंतराव होळकर यांची मने दुखावली गेल्यामुळे ऐकीचे बळ संपुष्टात आले. आता होळकर यांनी आपला मार्ग वेगळा करून घेतला. हे सर्व प्रकरण अमृतरावने आपल्या स्वर्धासाठी ग. ज. वेलस्ली याच्या बरोबर संधान साधुन कारस्थान केले. महत्वाचे म्हणजे ती सर्व पत्रे ग. ज.

वेलस्लीच्या हाती अमृतराव यांनी दिली. यामुळे पुढे मोठे संकट उभे घालुन अमृतराव पुणे सोडून कायमचा निघुन गेला. अमृतराव याने मराठी साम्राज्याचा मोठा विश्वासघात केला. 'अमृतरावाच्या या कृत्यामुळे शिंदे होळकर युती झाली नाही पण राज्याचे रक्षण होण्याची जी आशा होती ती कोलमडून पडली होती.'[29]

मराठी साम्राज्याचे आधार स्तंभ म्हणुन ज्याच्याकडे कायम पेशव्याची नजर राहत असते ते म्हणजे सरमजाम, जाहगिरदार, सरदार ही मंडळी होय. पण आता त्यात महत्वाची मंडळी म्हणजे, दौलतराव शिंदे, यशवंतराव होळकर, रघुजी भोसले हे तीघेच मराठयाच्या सत्ता टिकवण्यासाठी त्यांचे अस्तिव आजु शिल्लक होते. शिंदे, भोसले, होळकर यांचे चाललेले राजकारण यांच्यावर ब्रिटिशांची बारीक नजर होती. हे तिघे जर ब्रिटिशांच्या विरुध्द एक होऊन लढले असते तर मराठी राज्य बरीच दिवस पुढे अस्तित्वात असते. ब्रिटिशांनी आपल्या फोडा आणि राज्य करा या नितीचा वापर मराठयाच्या साम्राज्यात चांगल्या प्रकारे रोवला व त्याचा पुर्ण फायदा करुन घेतला. होळकर यास ब्रिटिश लोक अनेक अमिश दाखवून त्यांना मराठी मंडळा पासून बाजूला ठेवत असत. फसून का होईना होळकर ब्रिटिशाचा हेतु शेवटास नेण्यासाठी प्रयत्न करत होते. 16 जुलै 1803 मध्ये सर आर्थर वेलस्ली यांनी यशवंतराव होळकर यांना पत्र लिहिले होते. त्यात तो म्हणतो - Much time has elapsedsince I have had the pleasure of hearing from you, although I am anxious to cultivate the good under - standing which has subsisted between the Honourable Company's Government and you. या पध्दतीने ब्रिटिशांनी होळकराच्या मनात खोटया अशा उत्पन्न करुन त्यास फसवत होते. ब्रिटिश लोक कशा पध्दतीने एकमेकाना फसवून फोडत होते हे कोणच्याच लक्षात आले नाही. ब्रिटिशांनी हर एक प्रकारे मराठी साम्राज्याच्यात फुट पाडण्याचा प्रयत्न चालु केला.[30]

3.8.3. ब्रिटिश विरुध्द दौलतराव शिंदे व रघुजी भोसले यांची एकजुट -

शिंदे यांचा होळकर बरोबर झालेला हडपसच्या लढाईत पराभव व पेशव्याचे पलायन या दोन गोष्टीचा मोठा धक्का दौलतराव शिंदेना बसला होता. यावेळी शिंदेना या

सर्व परिस्थीतीची कल्पना आली होती. त्यासाठी शिंदे यांनी पेशव्याच्या मदतीसाठी 'रामचंद्र बक्षी' व 'गोपाळराव चिटणीस' या सरदारांच्या नेतृत्वा खाली फौज पाठवून ते बहाणपूर येथे येऊन पोहचले. यावेळी पेशव्यायाचे दूत 'बाळाजी कुजंर' यानी कशा परिस्थिती पेशवा दु. बाजीराव यांना ब्रिटिशांशी तह करावा लागला तसेच पुण्यातील सर्व परिस्थितीची माहिती शिंदेना दिली व आपण ताबडतोप ब्रिटिशांचे पारिपत्य करण्यासाठी पुण्यात येण्याचे सांगितले. ग. ज. वेलस्ली यांनी रघुजी भोसले याला आपल्या तंत्राखाली आणण्यासाठी खटपट चालु केली. ब्रिटिशांनी हे काम आपल्या हुशारीने व धुर्तपणे चालु केले. वेलस्ली याने यावेळी भोसले यांना 'आपल्याशी तह करुन सुरक्षित व्हा' असा एकसारखा भुंगा रघुजी मागे लावला होता. ब्रिटिशांनी यावेळी भोसल्यानी आपली कडक भूमिका सोडून मवाळ होण्यात फायदा असल्याने सांगितले तरी सुध्दा भोसले आपली फौज घेऊन शिंदेना सामिल झाले. भोसल्यानी त्याना दाद दिली नाही आणि आपले सैन्य शिंदेना जोडी निजाम सरहद्दीवर नेऊन ठेवले. वेलस्ली याने भोसले यांच्याशी पुष्कळ वाटाघाटी केल्या पण त्यात त्याला यश आले नाही.

ब्रिटिशांना होळकर यांना शिंदे पासुन वेगळे करण्याच पुर्ण पणे यश आले होते. मराठयाच्या बलाढय अशा साम्राज्यात आता आपला पाय रोवण्यास ब्रिटिशांचा मार्ग मोकळा झाला होता. वसईचा तह झाल्यानंतर ब्रिटिशांनी दु. बाजीराव यांना पेशवा पदावर बसवण्यासाठी पुण्यात घेऊन आले व त्यांनी त्यास गादीवर बसवले पण आता मराठी साम्राज्याच्या जहागीरदार, सरमजान, इतर नेते मंडळी यांच्याकडून तहाला मान्यता घेण्यासाठी खटपच ब्रिटिशांनी चालु केली. त्यानुसार त्यानी शिंदेना हया कराराला मान्यता देण्यासाठी दडपण आणण्यास सुरवात केली. पण यावेळी शिंदे आपली फौज घेऊन ब्रिटिशांचा मित्र निजाम यांच्या राज्याच्या सरहदीला सैन्य उभे केले. हि बातमी ब्रिटिशांना लागताच ब्रिटिशांनी त्यांना तिथुन जाण्यास सांगितले. शिंदेनी पहिल्या ब्रिटिश मराठा कराराच्या वेळी सालभाईच्या तहाला शिंदेची संमती होती. या तहा मुळे पेशव्याशी ब्रिटिशांना काही बोलायचे असेल तर महादजी यांच्या समतीने बोलायचे असे ठरलेले होते.

त्यामुळे पेशव्याशी नवीन करार करण्याच्या आधि ब्रिटिशांनी शिंदे यांचा विचार घेण्याची आवश्य होती. पण अशी सम्मती न घेताच ब्रिटिशांनी पेशवा यांच्याशी तह केला तेव्हा या कराराला मान्यता देण्याला शिंदेनी संमती दर्शवली नाही. यावर ब्रिटिशानी तो वंशपरंपरेने मानलेला नव्हता असे उघड पणाने बोलने करून मराठयांची मने चांगलीच दुःखवली मराठेशाहीची जुनी घटना आता राहिली नाही, असे त्यानी शिंदेना कळवले. ग. ज. वेलस्लीने यावेळी शिंदना आपल्या मधुर शब्दाच्या जाळयात चांगलेच आडवण्याचा प्रयत्न केला पण तो सफल झाला नही. 'तुमच्याशी स्नेहभाव राखण्याची आमची पूर्ण इच्छा आहे, तुम्हाला नुकसान पोचविण्याची आमची इच्छा नाही.' यामुळे शिंदेनी होळकर, भोसले यांना बरोबर घेऊन एकजूट करण्याचा प्रयत्न चालु केला. शेवटी ब्रिटिशांनी आपली दोस्ती टिकवण्याचा जर विचार असेल तर दक्षिणेत येऊ नये असे सांगितले.[31] ब्रिटिशांच्या उत्तराने शिंदेनी ही गोष्ट अमान्य करुन, मराठी राज्याच्या सार्वभौमत्वासाठी युध्द अटळ आहे असे निच्छित केले. यामुळे ब्रिटिशांचा शिंदे दरबारी वकिल 'कॉलिन्स' हा शिंदयाच्या छावणीतुन दिनांक 3 ऑगस्ट 1803 रोजी रागाने निघुन गेला. याचा परिणाम म्हणजे आता शिंदे व ब्रिटिश यांचे युध्द होणार हे नक्की होते. ब्रिटिशांनी यावेळी होळकरांशी संबंध चांगले ठेवण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिशांनची ही खेळी म्हणजे एकाला गोंजारून दुसयाचा काटा काढण्याचा प्रयत्न चालु केला होता. होळकरांशी सलोखा चांगला ठेवून शिंदे व भोसले यांचा पराभव करण्याची योजना ब्रिटिशांनी आखली होती. होळकर यांना नमवण्याच्या प्रयत्नात आता तरी ब्रिटिशांना चांगलेच यश संपादन झाले होते.

3.8.3.1. दोन्हीचे लष्करी सामर्थ

मराठी साम्राज्याचे दोन आधार स्तंभ म्हणजेच दौलतराव शिंदे व यशवंतराव होळकर यांच्या सैन्यात युरोपियन पध्दतीने शिकलेल्या पलटणी व आधुनिक तोफखाना होता. फ्रेंच व पोर्तुगीज अधिकारीहि याच्या फलटणीवर नौकरीस होते. तसेच भोसल्याचे सैन्य बरेच मोठे होते परंतु नवीन पध्दतीने शिकलेल नव्हते. दौलतराव शिंदे व रघुजी भोसले यांना यशवंतराव होळकर मिळाले आसते तर मराठयांना या युध्दात यश मिळण्याची पुर्ण खात्री होती. यावेळी ब्रिटिश व निजाम तसेच वसईच्या तहाने पेशव्याचे

सैन्य या तिघांच्या राज्याचे वैयक्तिक लष्करी सत्ता एकटया ब्रिटिशांच्या हाती असल्याने, तसेच ब्रिटिशाचे सर्व ठिकाणचे सैन्य, ग. ज. वेलस्ली याने मुंबईचा ग. जोनाथन डंकन व मद्रासचे ग. क्लाईव्ह यांना सैन्यानिशी हजर राहण्याचा हुकूम केला. त्यानुसार हैद्राबाद वरून तैनाती फौज सन 1803 मध्ये पुर्वे कडे येऊन थांबली. कर्नाकट या भागातून ग. ज. वेलस्ली आपल्या सैन्यानुसार पुण्याच्या रोखाने येऊ लागला होता.[32] म्हैसूर या संस्थानिकाची तैनाती फौजा घेवून ब्रिटिशांची सर्वात मोठा फौज मराठा राज्यात दाखल होणार होती. ब्रिटिशांनी चारही बाजूनी मराठयांच्या राज्याला घेरण्याच्या तयारीस लागले होते. यावेळी बडोदयाचे गायकवाड हे ब्रिटिशांच्या ताब्यात गेले तसेच दक्षिणचे पटवर्धन सरदार हे ब्रिटिशांचे हस्तक बनुन होते.

3.8.3.2. ब्रिटिशांच्या फितूरीच्या जाळयात शिंदेचे फ्रेंच सैन्य -


यशवंतराव होळकर व दौलतराव शिंदे यांना ब्रिटिशांना आपल्या मार्गात आसणारा मोठा आडथळा वाटत होता. त्यांना हे दोघेही आपल्या मार्गतुन काढून टाकायचेच होते. पण ब्रिटिशांनी दौलतराव शिंदे याचा पहिल्यांदा काटा काढण्याचे ठरविले होते. शिंदे हे ब्रिटिशांच्या विस्तारवादी महत्वकांक्षेच्या आड जास्त येत होता. त्याच प्रमाणे शिंदेची लष्करी ताकद फार मोठया प्रमाणात होती.

त्यांच्या पदरी फ्रेंच लष्करी नौकर अधिकयांचा भरणा जास्त होता. महादजी शिंदेच्या वेळी 'डी बॉयन' या नांवाच्या एक फ्रेंच अधिकायाच्या हाताखाली शिंदयाच्या फौजा युरोपियन पध्दतीरचे शिक्षण देऊन तयार करण्यात आल्या होत्या. त्यावेळच्या राजकारणात महादजी शिंदे यांना महत्व प्राप्त झाले होते. महादजी नंतर दौलतराव शिंदेनी सैन्याची तीच पध्दत पुढे चालु ठेवली होती. 'डी बॉयन' मरणानंतर 'एम्. पेरन' या फ्रेंच लष्करी अधिकायाच्या हाताखाली दौलतराव शिंदेने आपले लष्कर तयार केले होते. या लष्कर खर्चासाठी शिंदे यांनी गंगा यमुना या ठिकाणचा मोठा प्रदेश फ्रेंचाना दिला होता. पेरन यांनी उत्कृष्ट असे लष्कर तयार केले तसेच शिंदेच्या लष्कारात युरोपी पध्दतीच्या नवीन-नवीन तोफा आल्या होत्या. युरोपीयन दारुगोळा तयार करण्याचे कारखाने शिंदेनी सुरु केले होते. युरोपियन कवायती पध्दती शिंदेच्या सैन्यात सुरू झाली होती. या सर्वाचा परिणाम म्हणजे पायदळ,

घोडेस्वार व तोफखाना मिळून शिंदेचे कवायती सैन्य सुमारे पन्नास हाजाराच्या वर जय्यत तयार होते. निजाम व टिपू या टिकाणच्या फ्रेंच सैन्याला ब्रिटिशांनी हुसकावून लावून तेथे आपला झेंडा रोवला होता. ब्रिटिशांनी आपल्या विषयी असलेल्या बंडाळया मोडीत-मोडीत आता संक्रात शिंदयाच्या सैन्यातील फ्रेंच सैन्यावर आणली. दिल्लीचा बादशहा शहाआलम हा शिंदेच्या ताब्यात होता पण त्यावर देखरेखर ठेवण्याचे काम फ्रेंच सेनापति 'एम. परेन' हा करत असे तेव्हा शहाआलम हा परेन याच्याच मुठित होता. आणि इतकी मोठी सत्ता दौलतराव शिंदेच्या मार्फत फ्रेंच्याच्याच हातात होती, ही गोष्ट ब्रिटिशांना पसंद पडत नव्हती. फ्रेंचाची सत्ता हिंदूस्थानातून कायमची घलवण्यासाठी वेलल्सीने शिंदेशी लढाई सुरु करुन मराठी सत्ता व फ्रेंचाची सत्ता या दोन्ही गोष्टीना मोठा धका लावला होता.[33]

'ग. ज. वेलस्ली यांनी शिंदयाचे लष्करांतील सर्व युरोपियन ब्रिटिश अधिकारी यांना उद्देशून एक जाहीरनामा काढला की, जे काणी शिंदेची नोकरी सोडून ब्रिटिशांकडे येतील त्यांना शिंदे यांच्याकडे जो पगार मिळत होता तोच दिला जाईल. या जाहीरनाम्यावरून सर्व ब्रिटिश नौकर वर्ग व बरेचसे दुसरे युरोपियन नौकर अंमलदार वर्ग शिंदेचे लष्कर सोडून ब्रिटिशांकडे धाव घेतली. महत्वाच्या वेळी हा विश्वासघात झाल्यामुळे शिंदे यांचे लष्करावर योग्य अमलदार राहिले नाहीत. आता मात्र दौलतराव शिंदे यांची लष्करी बाजू लंगडी पडली.' शिंदेच्या दरबारी सैन्याच्या अधिकार पदावर फ्रेंच प्रमाणेच ब्रिटिश, पोर्तुगीज यांच्यातील अधिकारी नौकर वर्ग म्हणुन नियुक्त केलेले होते. गव्हर्नर जनरल वेलस्ली ह्याच्या विस्ताराच्या धोरणामुळे तसेच या नौकर वर्गला फोडण्यासाठी हिंदूस्थानात आल्यापासून ग. ज. वेलस्ली यांनी सुरवात केली होती. यामुळे हे सैन्य शिंदे ना धोका देणार हे निश्चित झाले होते. शिंदेच्या साम्राज्य पोखरुन ठेवण्याचे चांगलेच काम ग. ज. वेलस्ली याने करुन ठेवले हाते. ग. आर्थव वेलस्लीला जी मोठी धास्ती होती ती शिंदे दरबारातील परकिय अधिकरी ते फोडण्यात त्याला चांगल्या प्रकारे यश अल्यामुळे तो ब-याच पैकी निच्छिंत झाला होता.[34]

INDIA IN 1805



3.9. मराठयाचे दोन अधार स्तंभ ब्रिटिशानी युध्दत नमवुन तहात अडकवले -

3.9.1. शिंदे व भोसले यांचा महाराष्ट्रात झालेला दारून पराभव -

वसईच्या तहाने मराठे व ब्रिटिश यांच्यात संघर्ष वाढतच गेला. या तहाने लढाईच्या ज्वाला मोठया प्रमाणात भडकल्या. तहाने आग पेडली खरी पण ती पुढे दोन तीन वर्ष पेटत होती. एक छोटयाच्या समुद्रकाटच्या वसई गावात झोलेला तह पण यामुळे मोठया प्रमाणत मराठी साम्राज्याला हादरे बसले आणि पुढे या मराठांच्या बलाढ अशा साम्राज्याला मोठा तढा गेला.

ब्रिटिशांनी फितुरीचे डाव टाकण्यास सुरवात केली व त्यानुसार त्यानी पहिले पाऊन उचले होते. युरोपियन अधिकराच्या हाताखाली तयार झोलेले दौलतार शिंदे यांचे सैन्य पण या सैन्याच्या भोवती ब्रिटिशानी फितुरीचे चांगलेच जाळे तयार केले होते. त्यामुळे शिंदेना पुढील काळ अत्यंत घातक ठरणार होता, कारण शिंदेचा पुर्ण आधार या सैन्यचाच वाटत होता. पण ऐन युध्दाच्या वेळी शिंदेना तो आधार मिळाला नाही. 8 ऑगस्ट 1803 रोजी ग. ज. वेलस्लीने अहमदनगर येथील किल्ल्यावर हल्ला करुन तेथील शिंदेच्या वर्चस्वाला आपल्या कपटाने व फितुरीने सुरंग लावला शिंदेचे अरब सैन्य जीवाचे राण करुन लढत होते. तेव्हाच भिंगार या गावातील व्यक्तिने 'रघुराव बाबा' यांनी वेलल्सीला त्या किल्यावर हल्ला कोठून करावा ती वाट दाखवून दीली या बदल्यात त्याला चार हाजार रुपये दिले होते. तसेच किल्ल्यावर काही युरोपीयन लोग होते त्याना पण आपल्या गोटात सामिल करुन घेतले.[35] अशा प्रकारे ब्रिटिशांनी फितुरी करुन अहमदनगरचा किल्ला हस्तगत केला. यानंतर या किल्ल्यावर पेशव्याचे निशान फडकावले कारण यावेळी पेशव्याकडून ब्रिटिश लढत होते हेच दाखवायचे होते.

ब्रिटिशांनी यध्दाला सुरूवात करताच शिंदे भोसले या दोघांचे सैन्य अजिंठयाचा घाट चढुन पुढे मोगलाईतील जालना शहर आपल्या ताब्यात घेतले यावेळी त्यांचा पाटलाग करत निजामाची तैनाती फौज आपल्या मार्गदर्शना खाली घेवून ब्रिटिश आधिकारी 'कॅप्टन स्टिव्हनसन' औरंगाबादच्या बाजूने आला. तसेच वेलस्ली हा

औरंगाबाद येथे येऊन पोचला होता. त्यावेळी शिंदे व भोसले हे जालना शहर सोडून पुढे अजिंठयाच्या घाटाकडे वळले. यावेळी जलाना शहर भाडोलीच्या मार्गने ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घेतला. शिंदे व भोसले यांचा गोदावरी उतरून दक्षिणेकडे जाण्याचा मार्ग बंद झाला. तेथे यावेळी शिंदेना 'पोलम' व 'डयुपॉंट' हे दोन फ्रेंच अधिकायाच्या 16 पलटणी येऊन मिळाळे. तसेच वेलस्लीला औरंगाबादमध्ये चांगल्या प्रकारे कुमत येऊन पोचली होती. मराठयांच्या लष्कराचा तळ खेळणा नदीच्या काठीं आसई येथे होता. तर आसईच्या गावाकडून ब्रिटिशांचे सैन्य उभे होते. ''हिंदूस्थानच्या युध्दात एक महत्त्वाची लढाई म्हणून या आसईच्या लढाईकडे पाहिले जाते. या लढाईने मराठयाच्या इतिहासात व ब्रिटिश भारतीय इतिहासात फार महत्त्वाचे स्थान आहे. प्लासीच्या लढाईने जसा बंगाल प्रांत ब्रिटिशांच्या ताब्यात गेला. त्याच पध्दतीने मराठयांचा मोठा प्रांत ब्रिटिशांनी आपल्या वर्चस्वाखाली आनला तो या आसईच्या लढाई ने होय.'' असावध परिस्थितीत आसई येथील शिंदेच्या छावणीवर एकाएकी छापा घातला या लढाईत शिंदे यांच्या सैन्याची हालचाल कोणत्याच प्रकारची नव्हती. 23 सप्टेंबर 1803 रोजीच्या आसईच्या या लढाईत ब्रिटिशांना विजय मिळाला. शिंदेचा दिवाण 'यादव भास्कर' हा या लढाईत मारला गेला.[36] आसईच्या विजयाबरेबर ब्रिटिशांना मोठया प्रमाणत लुट मिळाली. ब्रिटिशांनी या लढाईत मोठया प्रमाणात फंदफितुरी, लागलुचत देऊनच मराठयांना पराभव करत सुटले होते. शिंदेची अशीरगड व बहाणपूर ही ठिकाणे याच पध्दतीने ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घेतली.

या युध्दा मुळे शिंदे पुर्ण पणे गर्भगळीत झाले यानंतर मात्र शिंदेकडून आसईच्या लढाईनंतर पंधरा दिवसांनी वेलस्ली यांच्याकडे तहाचे बोलणे सुरु झाले. पेशवा दु. बाजीरावाचा हस्तक बाळोजी कुंजर हा शिंदेच्या लष्करात होता याने ग. ज. यांना कळवले की, एक ब्रिटिश अधिकारी व एक निजामाचा अधिकरी यांनी शिंदेच्या लष्करात यावे व तहाची वाटाघाट करावी असे सांगितले. परंतु ब्रिटिशांनी येथे मनात एक शंकाखाली आणि ती म्हणजे, आपले वकिल शिंदेकडे पाठवणे म्हणजे तह आम्ही करतो असे होईल म्हणुन वेलस्लीने ते नाकराले व तुमचे वकिल आमचेकडे बोलण्यास पाठवावे असे शिंदेना

कळवले. यावेळी शिंदेकडून यशवंतराव घोरपडे व नारोपंत हि मंडळी तर ब्रिटिशांकडून आप्पा देसाई निपाणकर यांची बोलणी ब्रिटिश छावणीत चालू झाली होती. शिंदेच्या वकिलाने वेलस्लीला जो पर्यत तह ची वाटाघाटी चालु आहे तो पर्यंत लढाई न करण्याचे सांगितले. यावेळी वेलस्लीने शिंदेना आपले सैन्य ऐलिचपूर पासून वीस कोसावर नेण्यास सांगीतले. भोसल्याकडून कोणी वकिल आला नव्हता तेव्हा ब्रिटिश त्यांच्यावर लढई करण्यास मोकळे राहतील असे सांगितले. शिंदे यांच्या कडून आलेले यशवंतराव घोरपडे यांनी शिंदे व भोसले या दोघांशीही ब्रिटिशांनी तह करावा असे सांगितले परंतु ब्रिटिशांचा विचार यावेळी वेगळाच होता. पुर्वेस असलेले रघुजी भोसले यांची सरमजाम फार मोठी होती. त्यांच्या ताब्यात उडिसा बंगालचा काही प्रांत, कलकत्ता येथील प्रांत होता त्यामुळे भोसले यांना मोकळे सोडने ब्रिटिशांना पसंत नव्हते म्हणून ब्रिटिशांनी भोसल्याच्या सैन्याचा नाश केल्याशिवाय तह करु नये असे ठरवले. परंतु भोसले व शिंदे यांच्यात भांडणे झाली आहेत असी आफवा ब्रिटिशांनी सर्वत्र फिरवली होती. भोसले व शिंदे वेगळे होणार नाही तोपर्यंत ब्रिटिश तह करणार नाही हे शिंदेनी चांगलेच ओळखले होते. म्हणुन त्यांनी वेगळे होण्याचे ठरवले आणि एलिचपूर मधुन दोघांचेही सैन्य विभक्त झाले पण शिंदेशी तह करण्याची ब्रिटिशांना खरोखर इच्छा नव्हती. शिंदेच्या हाताखाली यावेळी घोडेस्वार मोठया प्रमाणात होते तह जर झाला तर हे घोडेस्वार पुढे गनिमी काव्याने युध्द चालुच ठेवतील ही भिती ब्रिटिशांसाठी मोठी धोक्याची घंटा होती. ब्रिटिश व शिंदे यांच्यात तहाच्या बोलणीची मुदत ठरली होती ती दहा दिवसाची होती त्यामुळे दहा दिवस संपुर्ण युध्दबंदी घालण्यात आली होती. ब्रिटिशांनी ती मुदत संपण्यापूर्वीच दोन दिवस आधिच ता. 29 नोव्हेंबर 1803 रोजी वेलस्लीने भोसल्यांवर गाविलगडवर हला करण्याचे स्टीव्हन यास आदेस दिले. भोसल्याचा गाविलगडचा किल्ला हा फार मजबूत व तो मेळघाटाच्या अत्यंत डोगराळ व बिकट भागत असल्यामुळे हा किल्ला ब्रिटिशांना जिंकणे सोपे नव्हते. गावीलगडचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी ब्रिटिश अधिकारी ‘स्टीव्हन’ यांनी वेलस्ली यांच्या हातखाली काही सैन्य घेऊन गावीलगडच्या दिशेने निघाला आसता यावेळी शिंदे व भोसले यांचे सैन्य एलिचपुर येथे वीस मैलावर मागे चालले होते व मागुन ब्रिटिशांचे सैन्य येत होते. मराठयाचे

सैन्य यावेळी एका छोटयाशा अडगांव या खेडेगावात येऊन सैन्य थांबले तेव्हाच शिंदेच्या सैन्यावर स्टीव्हनने आचानक हल्ला केला. या अचानक झालेल्या हल्यामुळे शिंदे यांचा पुर्ण पणे या लढाईत पराभव झाला. पुढे ब्रिटिश गाविलगडचा किल्ला घेण्यासाठी गेले अनेक प्रयत्ना नंतर 14 डिसेंबर 1803 रोजी किल्ला हस्तगद केला. यानंतर शिंदे व भोसले या दोघांशीही दोन वेगवेगळे तह करुन ब्रिटिशांनी त्यांना आपल्या वर्चस्वा खाली आनले. त्यात “17 डिसेंबर 1803 रोजी रघोजी भासेल याच्याशी देवगांव येथे तह केला व 30 डिसेंबर 1803 रोजी सुर्जी अंजनगावं येथे दौलतराव शिंदे यांच्याशी तह केला.” यामुळे दूसरे ब्रिटिश मराठा युध्दची एक बाजू सन 1803 या वर्षी संपली होती.[37]

3.9.2. शिंदेचा उत्तरहिंदुस्थानातील प्रदेश ब्रिटिशांच्या ताब्यात -

उत्तर हिंदूस्थानात दौलतराव शिंदे यांच्या रुपाने मराठयांचे प्रस्त मोठे होते. दिल्लीचा बादशहा जरी दिल्लीच्या गादीवर एक मोगल म्हणुन बसलेला असला तरी त्याला त्या गादीवर बसवण्याचा सर्व मान हा मराठ्यांच्या रूपाने शिंदे यांनाच जातो. पण शिंदेच्या दरबारी ब्रिटिशांनी केलेली फंद फितूरी मुळे शिंदेच्या विरुध्द काही अल्प काळातच उत्तरेत भरभक्कम यश संपादन करता आले. उत्तरेतील अलीगडचा किल्ला हा शिंदेना उत्तरेत अभय देणारा सर्वात अभेद व मजबुत असा एक किल्ला होता. शिंदेनी ‘पेरॉल’ या युरोपीयन नौकरास येथील नेतृत्व व लढाईचे सर्व अधिकार देऊन टाकले होते. पेरॉल याच्या हाताखाली सुमारे चाळीस हजार सैन्य व चारशे तोफा होत्या. किंल्ला असा होता की जास्तीत जास्त सहा सात महिने लढाई चालेल अशी तेथेली परिस्थिती होती. वेलस्लीची फंदफितूरीचे कारस्थान चांगलेच रंगले होते आणि त्यांनी यावेळी येथे ही हेच केले. ऐन युध्दाच्या वेळी पेरॉल ब्रिटिशांच्या गोटात सामील झाला. शिंदेच्या सैन्यानी किल्ला लढवण्याचे ठरवले पण युरोपीय सैन्यानी त्याना पकडून ठेवले. ब्रिटिश आधिकारी ‘कर्नल लेक’ याने किल्ल्यावर हल्ला करताच ‘लुकॉन’ या शिंदेच्या युरोपीयन माजी अधिकायाने किल्ल्याची दारे मोकळी करुन सर्व मोक्याच्या जागा ब्रिटिशांना दाखवून दिल्या.[38] या पध्दतीने शिंदेचा अलीगडचा किल्ला जिंकून घेतला. यामुळे ब्रिटिशांचे एक चांगले उदाहरण

फोडाफोडीचे येथे पाहवयास मिळते यानुसार वेलस्ली यांनी आपल्या युक्तीचा व शक्तिचा चांगलाच वापर करून ‘पेरॉन’ या अधिकाराला आपल्या गोटात सामिल करून एक मोठी बाजीच मारली होती. पेरॉल याला स्वामिद्रोहाची भरपूर किंमत ब्रिटिशांनी त्याच्या झोळीत टाकली.

अलीगड ताब्यात घेतल्या नंतर ब्रिटिशांनी हिंदूस्थानच्या राजधानीवरच म्हणजेच दिल्लीवर हल्ला करण्याचे ठरवले यावेळी दिल्लीवर शहाआलम हा बादशहा शिंदेच्या मर्जीने गादीवर बसलेला होता. आज पर्यंत हिंदूस्थानच्या राजकारणात सुलतान, मोगल यांनी दिल्ली आपले राजकारणाचे व सत्तेचे महत्वाचे केंद्रस्थान मानलेले होते, यामुळे दिल्ली ब्रिटिशांना महत्वाची वाटत होती. ब्रिटिश अधिकारी ‘लॉर्ड लेक’ याने शहाआलम याच्या कडेच फितुरी साठी संधाने बांधने चालु केले. 11 सप्टेंबर 1803 रोजी झालेली दिल्लीची लढाई मराठयाच्या तोफानी चांगली गाजली पण ऐन वेळेस मराठयांच्या पायदळ सैन्या पुढे ब्रिटिशांचे बंदूक धारी सैन्य आले याचाच परिणाम म्हणजे, मराठयाचे सैन्य यमुना नदीच्या बाजुला पळून लावले या पध्दतीने ही लढाई ब्रिटिशांनी जिंकली. ब्रिटिशांची खरी कामगीरी म्हणजे बादशहा शहाआलम याला फितवून लॉर्ड लेक यांनी दिल्लीची महत्वाची लढाई जिंकून घेतली ही घटना ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्वाची ठरली. यानंतर लॉर्ड लेक यांनी आपला मोर्चा आग्राचा शिंदेचा किल्ला या ठिकाणी मोठया प्रमाणात दारुगोळा, युध्द साहित्य होते. आग्राचा किल्ला म्हणजे शिंदेचे युध्दाचे कोठारच होते. ब्रिटिशांनी तो किल्ला जिंकला व तेथील सर्व साहित्य लॉर्ड लेकने आपल्या ताब्यात घेतले.[39] उत्तर हिंदूस्थानच्या इतिहासात मराठे व ब्रिटिश यांच्या युध्दात जी गोष्ट घडली ती म्हणजे ब्रिटिशांनी मराठे विशेषतः शिंदेच्या गोटात लावलेली फितुरीचे शस्त्र चांगले चालवले होते. पण या सैन्याना व ब्रिटिश सैन्याना मराठयांच्या सैन्यानी चांगल्या प्रकारे युध्दात मात दिली होती. किल्यावरील युरोपीयन आधिकारी यांची लासवडच्या लढाईत फितूरीची भूनभून मराठी सैन्याला लागताच त्यांनी किल्ल्यातील सर्व युरोपीयन आधिकारी वर्गला आपल्या ताब्यात घेतले. याघटनेने बाहेरील युरोपीय अधिकारी संतप्त झाले. व आडीच हाजार सैन्य

घेऊन तसेच दारुगोळा तोफा घेऊन ब्रिटिश फौजेला जाऊन मिळाले. या पध्दतीने लासवडच्या युध्दात शिंदेच्या सैन्यातील युरोपीयन नौकर वर्ग ब्रिटिशांच्या सैन्यात उघट पणे जाऊन मिळाले यामुळे ही लढाई शिंदे पराभूत झाले. लासवडच्या युध्दाच्या पराभवाने शिंदेच्या लष्करी सामर्थ्यावर जणू विनाशचे काळे ढगच पसरले होते. उत्तरेतील शिंदेची सर्वच प्रांत जवळ जवळ ब्रिटिशांच्या ताब्यात गेली.

3.9.3. मराठी राज्यचे दोन स्तंभ ब्रिटिशांशी तहात अडकले (शिदे व भोसले) -

3.9.3.1. भोसले यांचा ब्रिटिशांशी तह – (देवगांवचा तह ता. 17 डिसेंबर 1803)

अडगांवच्या लढाईत रघुजी भोसले यांचा साफ पराभव होऊन 'कटक' व 'बलसोर' हे प्रांत व वर्धा नदीच्या पश्चिमेकडील 'वहाड' हे सर्व प्रांत भोसले यांनी ब्रिटिशांना तसेच त्याच्या सोबत असलेले पेशवे, निजाम, यांना काही हिस्सा देण्यात यावा. 'गाविलगड' व 'नरनाळा' हे किल्ले व त्याखालचा चार लक्षाचा मुलूख (आकोट, अडगांव, बछनेर, भातकुली व खटकाळी हे प्रदेश) मात्र भोसले यांच्याकडे राहणार होते. याच पध्दतीने निजाम, पेशवे व भोसले यामधील तंटे ब्रिटिशांच्या मध्यस्तिने सोडावे. कंपनी सरकार शिवाय इतर युरोपियन व परकिय व्यक्तिशी भोसलेनी कोणताच संबंध ठेवू नये तसेच ब्रिटिशांच्या शत्रुशी संबंध ठेवून नये. भोसलेनी मराठी राष्ट्र संघापैकी (म्हणजेच, शिंदे, होळकर, व मराठी राज्याचे जहागिरदार इ.) इतरांशी काही संबंध ठेवू नये. तसेच एकमेकाचे वकिल एकमेकांच्या दरबारी असावेत. ओरिसा व छत्तीसगड हे प्रदेश भोसले यांचे मांडलिक होते पण या तहाच्या अटित ब्रिटिशांनी या प्रदेशांच्या राजाशी केलेला तह भोसले यांनी मान्य करावे. या तहाने वेलस्लीने माऊँट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यास नागपुर दरबारातील वकिल म्हणुन नियुक्त केले.[40]

या युध्दाच्या वेळी भोसल्यांच्या कटक प्रांतावर बंगालच्या ब्रिटिश सैन्याने स्वारी केली व तो सुपीक असा प्रांत ब्रिटिशांनी जिंकून घेतला. यातच भोसल्याचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. यामुळे भोसलेना मोठा धक्का बसला आणि त्यांची आर्थिक अडचण वाढतच गेली त्यांचा सर्व खजिना रिकामा झाला. नागपुर प्रांतातील अनेक ठिकाणच्या खंडणी मिळणे बंद झाले कारण, सर्व संस्थानिक, राजे, रजवाडे ब्रिटिशांच्या

ताब्यात गेले त्यांचे वर्चस्व त्यांनी मान्य केले. यामुळे तेथील खंडणी पुर्ण पणे बंद झाली. कोटीचे उत्पन्न असणारे भोसले आठ लाखाच्या उत्पादनावर आले. ब्रिटिशांची फार दिवसाची कटक प्रांत घेण्याची इच्छा पुर्ण झाली यात महत्वाचे म्हणजे बंगाल प्रांता पासून ते मद्रास प्रांता पर्यंत सर्व किनारा ब्रिटिशांनी ताब्यात घेतला. मराठेशाहीतील एक मोठा घटक भोसले यांच्या रुपाने कायमचा जायबंदी झाला. ब्रिटिशांना आता पुर्व व दक्षिण हिंदुस्थानात कोणीच प्रतिस्पर्धी राहिला नाही उत्तर हिंदूस्थानात शिंदे व होळकर यांच्या मोडक्या सत्तेशिवाय त्यांना कोणीच बलाढ असा प्रतिस्पर्धी उरला नव्हता. तैनाती फोजेच्या तहाने हिंदूस्थानचा जवळजवळ संपुर्ण प्रदेश त्यांच्या एकछत्री अमलाखाली आनला होता. कोणताच शत्रु आता ब्रिटिशांना तोड देण्यास समर्थ राहिला नव्हता.

3.9.3.2. दौलतराव शिंदे तहात अडकले (सुर्जी अंजनगांवचा तह ता. 30 डिसेंबर 1803) -

नागपुरच्या भोसले यांच्या आपल्या प्रदेशाचे झालेले नुकसान व भोसल्यानी ब्रिटिशांन पुढे घेतलेली शरनागती, छळ व कपटाने दौलतराव शिंदेशी केले युध्द यामुळे शेवटी शिंदेनी ब्रिटिशांशी तह करण्याचा निश्चय केला. ब्रिटिशांनी उत्तर हिंदुस्थानात शिंदे विरुध्द युध्दाची मोहिम सुरु केली. उत्तरेकडील बराच प्रदेश ब्रिटिशांनी आपल्या मुठीत घेतला त्याच पध्दतीने अहमदनगर व जालन्यापासून बहाणपूरपर्यंत सर्व मुलुख ब्रिटिशांच्या ताब्यात गेले होते. शेवटी एलिचपुर पासुन दक्षिणेस असणाया ‘सुर्जी अजनगाव’ या गावी ब्रिटिश व शिंदे यांच्यात तह ठरला.

उत्तर हिंदूस्थानातील गंगा व यमुना यांच्यामधील शिंदे यांचा आसणारा प्रदेश ‘जयपुर, जोधपुर व गोहद’ या संस्थानाच्या उत्तरेकडील सर्व मुलूख व जयपुर, जोधपुर यांच्या मधील काही प्रदेश सोडून देऊन बाकिचा प्रदेश, तसेच अहमदनगर व भडोच हे किल्ले, आणि त्यांच्या असपास असणारे प्रांत व अजिंठयाचा घाट, गोदावरी नदी यांच्या मधील प्रदेश शिंदेनी ब्रिटिशांना देऊन टाकावा. अशी प्रमुख मागणी केल्या यामुळे शिंदेचा उत्पन्नावर मोठा फटका पडणार होता त्यातच दौलताराव शिंदेनी दिल्लीचा मोगल बादशहा,

निजाम, पेशवे व गायकवाड यांचे विरुध्द असलेले सर्व हक्क ठेऊ नये ते सोडून दयावे असे ठाम मत या तहात मांडले होते. ब्रिटिशांचा मराठयांचे आसणारे स्नेही राजे, जहागिरदार, सरमजाम इ. यांच्याशी कोणताही तह जर केला असेल तर त्यावर शिंदेनी आपला हक्क सांगु नये. दुसरे कोणी युरोपीय ब्रिटिश सोडून कोणाशीही संबंध ठेवू नये. त्याच पध्दतीने दोघांच्याही दरबारी एकमेकांचे वकिल राहती. अशीरगड व पानवगड, दोहर या प्रांतासह व बहाणपूर शहर शिंदेस परत दयावे. ब्रिटिशांनी शिंदेच्या जहागिरी, वतने, दिल्लीच्या बादशहा पासून मिळवलेली इनाम तसेच काही प्रांत शिंदेना परत करावेत या प्रांतात शिंदेनी आपले लष्कर ठेवू नये. वरील प्रांताच्या उत्पन्नातून शिंदे यांनी ब्रिटिशांची तैनाती फौज आपल्या दरबारी ठेवावी. शिंदेनी तैनाती फौजच्या तहा नुसार सहा हजार पयदळ व काही तोफखाना ब्रिटिशांनी आपल्या पदरी ठेवून घेतला. दोघांनीही एकेमेकांच्या बजावासाठी धावून जावे असा तह ठरला. यात महत्वाचे म्हणजे ब्रिटिश लष्कर हे शिंदेच्या मुलखात न राहता ब्रिटिशांच्याच हद्दीत रहावे असे ठरले. ब्रिटिश लष्करी आधिकारी 'मेजर माल्कम' या शिंदेच्या दरबारातील वकिल म्हणून नेमण्यात आले. भोसले व होळकर हे सोडले तर सर्व हिंदूस्थानातील संस्थानिकाच्या राज्यात ब्रिटिश लष्कर पदरी ठेवले गेल्यामुळे ब्रिटिशांच्या लष्कराचे जाळे संपुर्ण हिंदुस्थानभर पसरले होते. आता मात्र हिंदूस्थान मध्ये कोणीही ब्रिटिशांशी लष्करी स्पर्धा करु शकेल असा उरला नव्हता आता खाया अर्थाने ब्रिटिश साम्राज्य याच वेळी हिंदूस्थानात कायमचे स्थापले गेले असे म्हणण्यास हरकत नव्हती.[41]

3.10. ब्रिटिशांचा होळकर यांच्याशी असलेला देखावा संपला व होळकर तहात अडकले -

3.10.1. ब्रिटिशांची होळकर यांच्याशी निकराची लढाई -

ब्रिटिश विरुध्द शिंदे, होळकर, भासेले या तिघानी एकत्र येऊन ब्रिटिशांचा पुर्ण बंदोबस्त करता आला असता. पण तसे घटले नाही शिंदे व होळकर यांच्या आप-आपसातील भांडण तसेच ब्रिटिशांनी होळकराच्या मनात निर्माण केलेला राग यामुळे

होळकर हे मराठा संघात सामिल झाले नाही व ब्रिटिश विरुध्दी एकजुट दाखवू शकले नाही. वेलस्लीच्या मराठे विरोधी असलेल्या धोरणाचा फायदा ब्रिटिश कंपनी आपले साम्राज्य वाढवण्यासाठी करून घेतला. शिंदे व भोसले यास वेगवेगळे गाठून त्यांचा मोड करुन तह केले. शिंदेचा बिमोड होऊपर्यंत ब्रिटिशांनी होळकराला शब्दानेही दुखःवले नाही. शिंदे व भोसले याचा झालेला पराभवा यानंतर त्यांनी आपले शस्त्र उचले ते होळकर यांच्या विरुध्द त्यांना एकटे पाडून त्याच्याशी कुरापती सुरु केल्या. होळकराच्या घरगुती भांडणात ब्रिटिशांनी आपला सहभाग दाखवून त्यात लुडबूड चालु केली. होळकर घराण्याचा वारस हा कायदेशरी नसल्याचे सांगुन त्यानी यशवंतराव होळकर यांच्या विरुध्द कारस्थान रचण्यास सुरवात केली. ब्रिटिशांनी आपला टाव चांगल्या प्रकारे रचला होता, मराठयाच्या संघाला त्यांनी एक-एकटे पाडून तसेच एक-एकाला गाठून गारद केले हयाच गोष्टी भविष्यात ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्वाच्या ठरल्या. एकीकडे यशवंतराव होळकर यांना आपल्या ताकदीचा व स्वतः बदल असणारा दुर्दम्य आत्मविश्वास आणि उच्च दर्जाचे लष्करी नेतृत्व, या गुणाच्या बळावर होळकर यांचा पुर्ण विश्वास होता की, आपण ब्रिटिशांचा पराभव करू शकतो.

यशवंतराव होळकर यांनी जोधपूरकरांशी संधान जुळवण्यास सुरवात केली तेव्हा लॉर्ड लेकला होळकरांवर संशय आला. त्यांने सन 29 जानेवारी 1804 मध्ये पत्राद्वारे यशवंतरला कळवले की, तुम्हाला आमच्याशी सलोखा राखायचा असेल तर युध्दची तयारी नकरता आपण वाटाघाटी करण्यासाठी तयार व्हावे असे होळकर यांना सांगितले.[42] यशवंतराव होळकर यांचे एकमेव अहवान ब्रिटिशांच्या पुढे उभे राहीले होते. ब्रिटिशांनी त्यांचा बंदोबस्त करण्याचे पुर्ण पणे नियोजन करून ठेवले होते. जयपूर च्या प्रांतातील राज्याशी ब्रिटिशांनी स्वतंत्र करार केला होता पण करार करण्या आधि चौथाई वसुल करण्याचा पुर्ण अधिकार यशवंतराव होळकरास होता असे होळकर सांगत होते. ब्रिटिशांनी या गोष्टीला हरकत घेऊन त्यास विरोध केला. होळकर यांनी ब्रिटिशांशी प्रेमाचे संबंध म्हणून त्यांच्याशी आपले विश्वासू सरदार विठ्ठल महादेव यांस शांती पुर्ण बोलणी साठी पाठवले पण ब्रिटिशांनी दाखवलेल्या विरोधा मुळे ही बोलणी यशस्वी होऊ शकली नाही.

ब्रिटिशांचा या गोष्टीच्या विरोधा मुळे होळकर यांना कळून चुकले होते की ब्रिटिशांन बरोबर युध्द निच्छित होणार हे नक्की होते.

यशवंतराव होळकर यांना मराठी मंडळातून आपणास कोणीतरी मदत करेल आशी आशा लागली होती त्यासाठी आपल्याला आता रघुजी भोसलेची मदत होईल असे वाटत होते. यशवंतराव भोसले यांच्याशी संधान साधुन त्यांना युध्दासाठी तयार करण्याचा प्रयत्न चालु केला. तेव्हा होळकर भोसलेना ठरल्या प्रमाणे आपली योजना सांगतात की, 'तुम्ही पूर्वेकडून बंगालवर स्वारी करा, आम्ही त्यास माळव्यांतुन हुसकून देतो.' या गोष्टीची चाहुल वेलस्ली यांना लागली यामुळे पुढील धोक्याची चाहुल दिसु आली तेव्हा भोसले जर यशवंतरावास सामील झाले तर आपली काही खरे नाही असे कळताच त्यांनी पुण्यात असणारे 'कर्नल क्लोज' यांना नागरपूर येथे पाठवले. होळकरव व ब्रिटिशांचे युध्द दीड वर्षे चालले या दीड वर्षेच्या काळात होळकर यांनी सर्व लढाया ह्या गनिमी काव्याने लढवल्या होत्या. यामुळे यावेळी यांच्या पुढे ब्रिटिशांच्या तोफाचा मारा तरी कशा पध्दतीने चालणार कारण युध्दाच्या जागी तोफा नेण्यास वेळ लागत असे. होळकर एका जागी थांबत नसे. आज इथे तर उदया तेथे शंभर मैल दुर अशा धावपळीच्या संग्रामांत ब्रिटिशांना होळकरानी पार सळो की पळो करुन सोडले. शिंदेच्या व भोसले यांच्या बाबती ग. ज. वेलस्ली यांना झालेला गर्व यशवंतराव होळकर यांनी तात्काळ उतरविला.[43]

यशवंतराव होळकराकडे एक अद्वितीय असे साहसी व्यक्तिमत्व होते, तो शौर्य व पराक्रमाणे निपुण होता, त्याचे सैन्य नेतृत्व व बुध्दीचे कौशल्य निपून होते. यशवंतरावाच्या अंगी महत्वाकांक्षा जास्त होती. त्याचे मत ब्रिटिशांशी गमीनी काव्याने लढाई कारायचे असे होते. शिवाजी महाराजानंतर प्रथमच गमीनी काव्याने लढानारे यशवंतराव होळकर होय. होळकराने अमीरखान या आपल्या जवळील शुर व धाडसी पठाण सरदार तसेच पेंढारी व भरतपुरचा राजा यांना आपल्या मदतीला घेऊन ब्रिटिशांशी युध्द चालु केले. यशवंतराव होळकर यांनी ब्रिटिशांशी गनिमी काव्याने लढाई करून तीन युध्दा मध्ये त्यांना पराभव करून त्यांना मोठे हैरान करून सोडले होते. ब्रिटिश लष्करी आधिकारी 'कर्नल

मॉनसन' यास मध्य हिंदूस्थानच्या डोंगराळ प्रदेशात चुकवून होळकरांनी आपल्यामागे सारखे फिरवले होते. आणि एकदम त्यांच्या मागे येऊन त्यांच्यावर हल्ला केला त्यांचा पराभव करुन नंतर आग्रा पर्यंत ब्रिटिश सैन्याचा पाठलाग करून त्यांच्या सर्व च्या सर्व सैन्याचा नाश केला. यावेळी भरतपुर या किल्ल्यावर लॉर्ड लेक याने तीन हल्ले केले पण होळकराने ते हल्ले परतुन त्यांचा पराभव केला. नोव्हेंबर 1804 मध्ये 'कर्नल डीग' या ब्रिटिश लष्करी आधिकारी यांच्याशी निकराची लढाई देऊन होळकराने आपला मोठा पराक्रम दाखवला. रघुजी भोसलेचा ब्रिटिश विरोधात मनता राग होता. भोसले अडगांवच्या लढाईत पराभवुत झाले व त्यानंतर त्यांच्यावर लादलेला देवगांवच्या तह हे सर्व त्याला आवडले नाही. ब्रिटिशांच्या वर्चस्वा खाली राहणे त्याला पसंत नव्हते. म्हणून होळकराच्या बरोबर ब्रिटिशाचे चालू असलेल्या युध्दाच्या परिणामाकडे भोसल्याचे बारीक लक्ष होते. या गोष्टीचा अंदाज भोसल्याच्या दरबारातील ब्रिटिश वकिल 'एल्फिन्स्टन' यास आला होता. यावेळी यशवंतराव होळकर यांना साहय्यक रोहिले अफगाण 'अमिरखान' हा एक चतुर, योध्दा, बुध्दीवान असा धाडसी नेता होळकर यांना मिळालेला होता. यामुळे होळकर यांची ताकद चांगल्या प्रकारे वाढली होती. अमिरखान याने यावेळी होळकर यांच्या कडून भोसले यांना ब्रिटिश विरोधी मदती साठी पत्रे पाठवली ही गोष्ट एलफिन्स्ट यास समजताच त्याने भोसले यांना खडसावून होळकर यांच्याशी कोणताही संबंध ठेवू नये असे सांगितले. ब्रिटिश यांच्या पूढे भोसल्याचे काहीच चालेना शेवटी गप्प बसणेच शहानपण होते.[44]

यशवंतराव होळकर आत पूर्ण पणे बेफान झाले होते. ब्रिटिशांच्या वृत्तीचा त्याला मनस्वी राग आला. दौलतराव शिंदेचा पराभव कसा पध्दतीने झाले हे त्यानी चांगलेच ओळखले ते म्हणजे शिंदेचा पराभव हा पदरी असलेल्या युरोपीय अधिकराच्या फितुरीमुळे झाला आहे हे त्यांच्या चांगलेच लक्षात आले होते. यामुळे होळकर यांनी आपल्या सैन्यातील आधिकरी नौकर वर्गचा त्यांनी बंदोबस्त करण्याचे ठरवले त्यादुष्टीने त्यांनी महत्वाचे पाऊल उचले होते. यशवंतराव यांचा मुक्काम सन 1804 मध्ये मथुरेच्या वायव्येस फिरोजपुरास येथे होता. यावेळी विजयादशमी हा सन होता आणि मराठयांनी

येथेच विजयादशमी साजरी केली यात त्याने आपल्या सैन्यातील ब्रिटिश युरोपीयन अधिकारी यांना त्रास देण्यास सुरवात केली. होळकर यांनी ब्रिटिश सेनापती 'कर्नल मॉन्सन' यांचा राजपुतान्यात एकदम फडशा पाडला. त्याच पध्दतीने पुढे ब्रिटिश सेनापती 'कर्नल मरे' यास उज्जनीतुन बाहेर येऊ दिले नाही. व्हिकर्स, डॉड व रायन हे ब्रिटिश अमलदार होळकराच्या नोकरीत होते, ते कर्नल लेक यांच्याशी लढण्यासाठी तयार होईना यामुळे होळकर यांचा युरोपीयन नौकरांव राग फार आला तेव्हा त्याने आपल्या फौजेत असणारे 75 व्या पलटणीतील एक ब्रिटिश सोल्जर जो लेक यांचा हस्तगत झाला होता म्हणून त्याने त्याचे डोकेच भाल्याला टांगुन आपल्या लष्करात सर्वत्र फिरवले. या मुळे लेकचा मोठा तळतळाट झाला पण होळकरांच्या पुढे त्याचा काहीच इलाज चालेना. लेक यावेळी यशवंतरावाच्या मागावर होता. त्यावेळी यशवंतराव भरतपुर येथील जटाच्या आश्रयास होता तेव्हा दोघांन मध्ये तीन महिने युध्द चालले होते. प्रचंड अशा नरसंग्रामा नंतर यशवंतराव यांना भरतपुर सोडावे लागले. भरतपुरच्या किल्याला वेढा देऊन ब्रिटिशांनी बाहेरून लढवून काही दिवसात तो किल्ला आपल्या ताब्यात घेतला. यशवंतरावाने ब्रिटिशांना निकराचा लढा दिला यात दीग या ठिकाणी सन 24 डिसेंबर 1804 मध्ये होळकराच्या फौजेचा पुर्ण पराभव झाला. दक्षिणेतील त्याच्या ताब्यांतले बहुतेक किल्ले ब्रिटिशांनी हस्तगत करून घेतले. तसेच होळकर यांचे महत्वाचे असलेले माळव्यातील किल्ला व इंदूर शहर हे ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घेतले.

होळकर यांना कोणाचाच आश्रय राहिला नव्हता पण तेव्हाच शिंदेनी होळकराणा अनुकुलता दाखवली ती गोहदच्या राजाचे स्वातंत्र्य होळकर यांना कबूल करण्यास ब्रिटिश भाग पाडत पण शिंदे यांचा या गोष्टी ला विरोध असल्या कारणाने म्हणुन शिंदे होळकरांच्या मदतीला धावले.[45] 'बापूजी शिंदे' व 'सदाशिवराव भाऊ बक्षी' दौलतराव शिंदे यांचे लष्करी सेनापती पण शिंदे यांचा ब्रिटिशांशी झालेल्या तहा प्रमाणे ब्रिटिशांचा मित्र यामुळे होळकर यांच्या विरोधी शिंदेना ब्रिटिशांना मदत करणे गरजेचे होते. पण शिंदेच्या या सेनापतीनी ब्रिटिशांना कोणतीच मदत केली नाही. यावेळी होळकर जयपुर

येथे कोटयाच्या मुक्कामी असताना बापूजी शिंदे हा होळकराला येऊन मिळाला. शिंदेनी नुसती नावापूरतीच ब्रिटिशांना मदतीसाठी सैन्य पाढवण्याचे नाटक केले होते. पुढे होळकर यांना निसर्गने चांगलीच मदत केली ती म्हणजे 'ज्यापध्दतीने नेपोलीयन या यौध्दयाचे रक्षीय लोकानी हाल केले त्यांना ज्या पध्दतीने तेथील थंड हवामाने साथ दिली त्याच पध्दतीने यशवंतराव यास हिंदूस्थानच्या निसर्गाने साथ दिले. होळकर यांचा गनिमी कावाच्या लढाईने ऐन पावसाळयात रंगात आलेली लढाई या मुळे ब्रिटिश पुर्ण पणे जेरिस आले होते.'

3.10.2. सर्जेराव घाडगेच्या मध्यस्थीचे प्रयत्न -

यशवंतराव होळकर यांचा गनिमी काव्याने ब्रिटिशांच्या नाकी दम केला होता. त्याने उत्तर हिंदूस्थानात ऐवढा हैदोस घातला की जेथे-जेथे ब्रिटिशांनी हिंदी राज्य आपल्या आंमला खाली आणले होते तेथील ब्रिटिशाची तैनाती फौज ऐतद्वेशियांचे रक्षण करु शकली नाही. खुद शिंदेनी यावेळी ब्रिटिशांना तुम्ही काय करता आहे आसा प्रश्न केला होता. ज्या हिंदी राजानी आपल्या पदरी तैनाती फौज ठेवली होती ते ब्रिटिश व होळकर यांच्या युध्द मुळे जेरिस आले होते. ब्रिटिश आपल्याला मदत करणार नाहीत ही गोष्ट हिंदी सर्व ऐतद्वेशीय राजे, महाराजे यांना कळून जुकली होती. आता ब्रिटिशांचा आश्रय घेतल्याची आपण मोठी चूक केली. ही चुक लक्षात येताच त्यानी एकत्र येण्याचे ठरवून आपले रक्षण आपणच करायचे असे ठरवले. या वेळी दिल्लीचा बादशहा जो ब्रिटिशांच्या तालावर चालणारा होता पण त्याने सुध्दा यशवंतरावचा आधार शोधण्यास सुरवात केली. पंजाबचे शिंख पण ब्रिटिशांच्या विरुध्द झाले खरे पण ही सर्व नेते मंडळी एका नेतृत्वाखाली येऊ शकले नाही. सर्वाना ब्रिटिश राज्य नको होते. यावेळी महत्वाची गोष्ट होऊ घातली मराठयांच्या राज्यात मोठा बदल होणार होता तो म्हणजे शिंदे व होळकर यांच्या एकत्र येण्याचा विचार सुरु झाला होता.

दौलतराव शिंदे यांचा सासरा 'सजेंराव घाडगे' हिंदुस्थानच्या इतिहासात एक जहांबाज, उलठया काळजाची, केव्हा काय करील याचा नेम नाही. पण साहसांत उडी घेण्यास सदैव तयार असणारी मानवाचा स्वभाव ओळखण्यास पारंगत, युक्तिवादात

पारंगत, ब्रिटिशांचे डाव ओळखनारा असा मराठयाच्या साम्राज्यात महत्वाची मानली जाणारी व्यक्ति होती. शिंदे व भोसले यांचा झालेला पराभव घाडगे यांच्या कानावर येताच त्यांना फार दुखः झाले. यावेळी तो पुण्यातुन शिंदेस भेटण्यासाठी निघाला व बहाणपूरास जाऊन शिंदेना विनंती केली की तुम्ही होळकरास बरोबर सामिल व्हावे म्हणुन त्याने चांगलेच प्रयत्न केले आणि यशवंतराव होळकरानी आपला वकिल 'खंडो महादेव' यास दौलतराव शिंदे यांच्याकडे पाठवून दोघान मध्ये मैत्री घडवून आणली. होळकरांचा वकिल शिंदेच्या भेटीला आला आहे हे पाहुन शिंदेच्या दरबारातील ब्रिटिश वकिल जेकिन्स याचा मोठा जळफळाक झाला. सर्जेरावान घाडगे यांनी शिंदे व होळकर यांच्यात समेट घडून आण्याचे योग्य वेळी काम केले. 'जेकिन्स' हा शिंदेच्या दरबारी ब्रिटिश वकिल तो शिंदेना म्हणाला, 'यशवंतराव आमचा शत्रु त्यांची भेट तुम्ही घेतां कामा नेय, सर्जेराव ब्रिटिश विरुध्द वागतो, त्यास कारभारांतुन काढावे. नाहीतर मी छावणी सोडून निघुन जातो.' हे सांगुन झाल्यावर जेकिन्स यास शिंदेनी आपल्या कैदेत ठेवले. दोन महिने सबळगड येथील छावणीत मराठी साम्राज्याचे मुसूद्दी व सेनानायक एकत्र येऊन पुढील युध्दाची रननिती आखित बसले होते. यात अंबूजी इंगळे, खंडेराव हरि, बापूजी शिंदे, जॉन बॅस्टिट, सर्जेराव घाडगे, यशवंतराव होळकर व विठ्ठल महादेव वळे फडणीस, सातारकर छत्रपती यांचा बंधु चतुरसिंह भोसले, बाजीरावाचा कारभारी बाळोजी कुंजर हे सर्व लहान मोठी सरमजाम, राजे, जाहगिरदार इ. मंडळी व राजपुतांचे व जाठाचे वकिल या वाटाघाटीत हजर होते. सर्वाचा उद्देश एकच की ब्रिटिशांचा पाय राज्यातून दूर करावा असाच होता.[46]

3.10.3. माल्कमने शिंदे, होळकर यांच्यात पाडलेली फूट -

यशवंतराव होळकर यांना वाटू लागले की मराठयाना एकत्र आणून ब्रिटिशांचा पुर्ण पणे पराभव करावा. त्याच पध्दतीने ब्रिटिश आधिकारी माल्कम यास सुध्दा मराठयाची आसणारी ऐकी फोडून टाकावी आसा टाव होता. प्रतेक मराठी नेत्यास वाटत होते की, शिंदेचा तोफखाना, यशवंतरावची घोडदौड, अमीरखानाचे धाडस, सर्जेरावा घाडगे यांची अक्कल या सर्वाची जर एकी झाली तर ब्रिटिशांना हिंदूस्थानातून जाण्यासाठी वेळ

लागणार नाही. आणि म्हणून या सर्व गोष्टीची धास्ती माल्कम यांनी घेतली होती. म्हणून माल्कमने एक भेदनीतीचा डाव टाकला व त्यांने तो यशस्वी करुन घेतला. शिंदेच्या पदरी असलेला एक औत्तरीय कायस्थ फारसनवीस म्हणून 'मुनशी कवलनयन' होय. तो हुशार व लायक असा होता त्याला फारशी उर्दु या भाषा आवगत होता, म्हणून तो शिंदेच्या पदरी होता कारण शिंदेचा चांगलाच विश्वास मुनशीवर होता. माल्कमने मथुरा येथे आपल्या भेटीस बोलावले व त्याचे कान भरवून परत शिंदेकडे पाठवले. माल्कमने त्याला कशेही करुन शिंदे व होळकर यांची एकी फोडावी असे सांगितले यानंतर मुनशी याने दौलतराव शिंदेना असे सांगितले कि - 'यशवंतराव उद्यां तुमचा सर्वस्वी घात करील. त्याचा नाद तुम्ही सोडून द्या. ब्रिटिश यांच्या तंत्राने तुम्ही वागाल तर तुम्हास पाहिजे ते कबूल करतील.'[47] ब्रिटिशांना जे हवे होते ते त्यांनी साध्य करून घेतले यानंतर या सर्वाचा मोबदला म्हणून मुनशी कवलनयन याने ब्रिटिशांकडून इनाम व वंशपरंपरा वेतन मिळविले व मराठा साम्राज्याला मोठी खिडार पाडण्याचे काम मुनशी व माल्कम यांनी केले आणि येथीच ब्रिटिशांच्या मनातील हेतु साफ झाला होता.

ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानांत स्थिरावण्यास माल्कम याची हुशारी व दूरदृष्टि विशेष उपयोगात आली. निजाम, टिपू, इराणचा शहा, मराठे या सर्वाच्या प्रकरणांत माल्कम यांनी घेतलेला निर्णय या मुळे त्याला ब्रिटिशांनी गव्हर्नर या प्रमुख पदावर बसवले होते. होळकरांच्या युध्दा पासुन ब्रिटिशांची बाजु खालावू लागली ती सावरण्याचे काम शिंदे व होळकरांची एकी फोडून विसकटलेली घडी पुनः बसविण्याचे श्रेय माल्कमने मिळविले. माल्कन ने शिंदे व होळकर यांच्यात पुढे कायम भांडणे लावून दिली. माल्कन यांनी ब्रिटिश कंपनीची हिंदूस्तानातील बाजू पुन्हा मजबुत करुन दिली.

3.10.4. होळकरांशी ब्रिटिशांचा मैत्रीच्या नात्याने तह -

होळकर बरोबर चाललेल्या युध्दात ब्रिटिशांची मोठया प्रमाणात नाचक्की झाली होती. भरतपुरच्या लढाईत ब्रिटिशांचा चार वेळा झालेला पराभव तसेच हिंदूस्थान मध्ये ब्रिटिश विषयी वाढत चाललेला असंतोष मोठया प्रमाणात शिगेला पोचला होता. ब्रिटिशांचे मराठयांशी चालु असलेले युध्दाचे पडसात इंग्लड मध्ये दिसू लागले त्याचेच

परिनाम म्हणजे ग. ज. वेलस्लीची इंग्लड मध्ये मोठया प्रमाणत नाजक्की झाली या सर्व गोष्टी मुळे कंपनीचे अर्थिक संकट वाढतच होते. यासाठी सर्वस्वी हिंदूस्थानातील कंपनीचा प्रमुख ग. ज. वेलस्ली यास दोषी ठरवले जात होते. वेलस्ली याला स्वदेशी बोलवणे आले व तो निघुन गेला यावेळी कर्नल लेक व माल्कन यांनी हिंदूस्थानची पुढील परिस्थीती संभाळण्याचे काम केले तसेच कंपनीचे हित जोपासण्याचे पण काम केले. शिंदे व होळकर यांची एकजुट फोडण्यास दोघेही यशस्वी झाले. होळकर यांच्या कडून कर्नल लेक यांनी चांगलचा सपाटून मार खाला होता. याच वेळी इंग्लड सरकारकडून निरोप आला की शिंदे व होळकर यांच्याशी सलोख्याचे धारेण ठेवावे. असे कळताच होळकर यांच्याशी तैनाती तत्वावर तह न करता केवळ मित्रत्वाने बरोबरीच्या नात्याने तह केला. सन 24 डिसेंबर1805 मध्ये व्यास नदीच्या काठी राजपूरघाट येथे ब्रिटिशांना होळकर यांच्याशी तह करावा लागला. मात्र या तहात होळकराना फारसा आपला मुलूख गमवावा लागना नाही. यात महत्वाचे म्हणजे ब्रिटिशांच्या शत्रुशी कोणत्याही प्रकारे बोलणी करायची नाही. या तहात रामपुरा व टोक, बुदी, लाखेरी, सामधी मालोगांव, दतिया इ. प्रांतावर होळकरांना आपला हक्क सांगावे लागलनार नाही. रजपुत, माळवा, मारवाड, होडोती या राज्याना होळकरांनी त्रास देऊ तसेच बुदेलखंड प्रांत ब्रिटिशांना देण्यात यावा. सर्जेराव घाडगेला होळकरांनी आपल्या जाकरीवरून काढून टाकण्यात यावे.[48] या पध्दतीने होळकरांना धोडया सौम्य अटी वर त्यांची सुटका करण्यात आली ही खंत कोठेतरी ब्रिटिशच्या मनात बोचत होती.

3.10.5. शिंदे यांच्यावर ब्रिटिशांची जबर -

ग. ज. वेलस्ली इंग्लडला निघुन गेल्यानंतर कर्नल लेकने होळकर यांच्याशी बोलनी करण्यासाठी त्याच्या हाताखालील मुसूद्दी माल्कम याला होळकर यांच्याकडे पाढवून शक्य तितका फायदा ब्रिटिशांनी आपल्या पदरांत पाडण्याचा प्रयत्न केला. माल्कमने मुनशी कवलनयन यांच्या मार्फत शिंदेना ब्रिटिशांकडे वळवले व ब्रिटिशाशी स्नेह ठेवल्याने कसे फायदे आहेत हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. सर्जेराव व होळकर यांच्या नादास लागल्यावर कशा पध्दतीने नुकसान आहे हे त्याने शिंदेस सांगितले. शिंदेच्या मनात होत

आसलेली घालमेल याला ब्रिटिशांनी खतपाणी घातले. शिंदेनी एकदा ब्रिटिशांशी वैरभाव ठेवला होता, त्याचा परिणाम त्यांना चांगलाच भोगावा लागला होता. होळकर यांना साथ दिल्यामुळे शिंदेना ब्रिटिशांकडे कोणत्या तोंडाने जावे असा प्रश्न पडला शेवटी ब्रिटिश बोलनीसाठी पुढे आले. हे शिंदेच्या दुष्टीने जरी चांगले असले तरी याचा सर्वस्वी फायदा ब्रिटिशांना होणार होता. शिंदेनी आपल्या मागण्या मुनशी कवलनयन कडून कर्नल लेककडे कळविल्या यावर शिंदे यांच्या अटकेतील वकिल जेकिन्स यास सोडण्यासाठी सांगितले व त्यानंतर बोलणी करू आसे लेक यांनी सांगितले. पण त्याच पुर्वी जेकिन्स सुटून लॉर्ड लेक जवळ येऊन पाचला. शिंदेनची मुख्य मागणी ‘ग्वालेर’ व ‘गोहद’ ही दोन ठिकाणे आपली आपल्याला मिळावीत म्हणून त्यांनी प्रयत्न चालवले माल्कम ने शिंदेस गोहद, ग्वालेर देण्याचे ठरवले व त्यांच्याकडुन ‘चंबळची’ जास्त फायदेशीर हद्द घेतली. ता. 23 नोव्हेबर 1805 रोजी शिंदे व ब्रिटिश यांच्या मध्ये मुस्ताफापूर येथे पुन्हा तह झाला. या तहावर शिंदे यांच्याकडून मुनशी कवलनयन यांनी सही केली. शिंदेना ग्वालेर चा किल्ला मिळाला म्हणुन यशवंतराव होळरास यांच्याशी एकी करण्याचे सोडून देऊन दौलतराव शिंदे पुन्हा एकदा शांत बसला. आशा प्रकारे माल्कम ने शिंदेना होळकरांपासून दूर करून त्याने होळकरास एकाकी पाडले व आपला हेतु साध्य करुन घेतला.[49]

3.11. मराठयांशी दुसया युध्दा नंतर ब्रिटिशांची परिस्थिती -

यशवंतराव होळकराची पुण्यावर चाल करणे, यानंतर पेशवा दुसरा बाजीरावाचे पलायन, पेशवानी केलेला वसईचा तह या नंतर गमावलेले मराठयांचे स्वातंत्र्य आणि त्यानंतर आर्थर वेल्स्ली व कर्नल लेक यांनी शिंदेचा केलाला पराभव या गोष्टी मध्ये ग. ज. लॉर्ड वेलस्ली यांचा असलेला हात प्रमुख मानला जातो. ग. ज. वेलस्ली याने वसईच्या तहा नंतर सुरु केलेला मराठी सरदारांचा पाडाव त्याने दिल्ली राजधानी व मोगल बादशहा यांचा ताबा प्रथम शिंदे यांच्याकडून ब्रिटिशांनी घेतला, या नंतर मात्र ब्रिटिश सत्ता हिंदूस्थानात आपल्या एक छत्री आमला मुळे सार्वभौम बनली. मराठयांचे ऐवढे मोठे साम्राज्य महादजी शिंदे यांनी निर्माण केले खरे पण दौलतराव शिंदेच्या साम्राजा विस्तार

पाहता चाळिस हजार फौजेचे उत्कृष्ट तंबू, तोफा, हत्यारे तसेच स्वतः निर्माण केलेले कारखाने हे सर्व ब्रिटिशांनी अवघे तिन महिण्यात मिळवले. असे ग. ज. वेलस्ली गर्वाने म्हणत होता. वेलस्लीने संपुर्ण हिंदूस्थानात आपला जम बसूला पण हा सत्तेचा डोलारा भक्कम आहे की अधु आहे, हे पाहणे महत्वाचे होते. ब्रिटिशांचा मुख्य प्रधान 'कॅसलरीग' यांने त्याच्या मनातील पुढील शंका ग. ज. वेल्स्लीस लिहून कळविली - ''आजपर्यंत पार्लमंटने ठरवून दिलेल्या मर्यादा तुम्ही बरोबर पाळल्या नाहीत, असा एक ठपका तुमच्या या विजयांवर निर्माण झाला. आणि तुमच्या सरख्या सामर्थ्यवानाला हे विजय जरी झेपण्यासारखे असले तरी पुढे त्यांचा विस्तार करणारा गृहस्थ तुमच्यासारखाच जबरदस्त निपजेल याची हमी कोणी घ्यावी. सामन्य प्रवृत्तीचा मनुष्य जर अधिकारावर आल्यास हा डोलारा कोसळून पडणाची भीती आहे.''[50] पुढे हीच भिती निर्माण झाली कारण, शिंदे, होळकर, भोसले यांनी जे तह मान्य केले ते जबरदस्तीनेच मान्य केले होते. यामुळे या सरदारांवरचे स्वातंत्र्य नाहिसे झाले यामुळे त्यांनी वाटेल तसे वागण्यास सुरवात केली. भोसले व शिंदे याना वेलस्लीने नमवले खरे पण होळकरास नमवने वेल्स्लीस मोठया प्रमाणात जड गेले त्याचा गर्व पुर्ण पणे नाहिसा झाला होता. युरोपात याच वेळी नेपोलियनचा जोर वाढला या परिस्थितीत वेल्स्लीने हिंदूस्थानात निर्माण केलेले हे मोठे संकट कारण नसताना निर्माण केले. युरोपात इंग्लड सरकारला येथील हिंदूस्थानातील ब्रिटिश कंपनीने निर्माण केलेल्या परिस्थितीची सर्व माहिती मिळत होती त्यामुळे त्याची मोठया प्रमाणात नाचक्की झाली. यामुळे ही परिस्थिती विनाकारण निर्माण केली असा समज इंग्लड पार्लमेंटचा झाला व त्यांनी हिंदूस्थान मधील ग. ज. वेल्स्लीस यास परत बोलावेल.

या दूसया मराठा ब्रिटिश युध्दा नंतर दौलतराव शिंदे, यशवंतराव होळकर, रघुजी भोसले यांनी पुन्हा एकजूट करण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्यांना यश आले नाही. या युध्दात ब्रिटिशांचा विजय झाला पण मराठयाच्या शिंदे, होळकर, भोसले यांना आपले गेलेले स्वातंत्र्य पुन्हा मिळवता येईना. त्यांचा झालेला पराभव हा त्यांच्या चांगलाच जिव्हारी लागला त्यांच्या मनात ब्रिटिशांन विषयी मोठया प्रमाणात तिरस्कार निर्माण झाला याची

कल्पना ब्रिटिशांना चांगल्या प्रकारे आली होती. या सर्व वाढलेल्या साम्राज्यात लक्ष देण्यासाठी ब्रिटिशाकडे स्वतःचे सैन्य नव्हते. हिंदुस्थानातील ब्रिटिश कंपनीने इंग्लड मधे कंपनीच्या डायरेक्टर यांना नियमा प्रमाणे पैसे पाठविण्यासाठी नेहमी तगादा लावत असे. इंग्लडच्या डायरेक्टर वर्गाचे म्हणने होते की, राज्य वाढविण्यापेक्षा व्यापारात पैसा मिळवावा त्यांनी आर्थिक गोष्टीकडे भर देण्याचा जास्त कल होता. हिंदूस्थानातील ब्रिटिश ग. ज. व त्यांचे असणारे अधिकारी यांचा हेतू येथील सत्ता कशी टिकेल व कशी वाढेल याकडे त्याचे जास्त लक्ष होते. हिंदूस्थानातील स्थानिक सत्ता ब्रिटिशांनी पुर्ण पणे खिळखिळी करुन टाकली होती. ब्रिटिशांना ही सोन्यासारखी संधी वाटत होती ती त्यांच्याकडून सुटेना मिळेल ते राखावे हे ही त्यांना होईना. येथील ऐतद्वेशीय संस्थानाशी केलेले तह ते राखण्यासाठी का होईना त्यांना संरक्षण देण्यासाठी पुढे यावेच लागले असते. जर तसे केले नसते तर ऐवढे सैन्य एकदम आपल्या विरुध्द हल्ला केला तर आपले काय खरे नाही यासाठी त्याना नेहमी या गोष्टीचा विचार करावा लागत असे. या मुळे ब्रिटिशांना इंग्लडच्या सरकारच्या नेमाने चालण्या पेक्षा येथील परिस्थिती पाहुन त्यानुसार आपली पावले उचलण्याची गरज होती तेच त्यांनी केले.

INDIA in 1805. 21.



Justus Perthes, Gotha.

प्रकरण चौथे

तिसरे ब्रिटिश मराठा युध्द व मराठी साम्राज्याचा शेवट

4.1. प्रस्तावना -

छत्रपती शाहू महाराज यांनी बरोबर हेरून मराठयाचे साम्राज्य चालवण्यास व वाढवण्यास लायक असे 'पेशवे' पद निर्माण केले. छत्रपती शाहु यांनी आपल्या मृत्यु नंतर वंशपरंपरेने पेशवाई कायम ठेवण्याचे मृत्युपत्रात नमूद केले आणि पुढे 105 वर्षे महाराष्ट्राच्या या पेशव्याचा दरारा साया हिंदुस्थानभर दुमदुमत होता. पण कालचक्राच्या गतीला कोणीही अडवू शतक नव्हते एकेकाळी वैभवाच्या शिखरावर असणारी 'पेशवाई' पत्याच्या मनोरा प्रमाणे कोसळावी तशी कोसळली. आणि सन 1818 मध्ये मराठी साम्राज्य हे कागदोपत्री पूर्णपणे 'ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या' हातात गेले.[1] मराठी साम्राज्याच्या वट वृक्षाच्या सर्व फांद्या तुटून गेल्या होत्या.

गर्व्हनर जनरल 'मॉनिग्टन' याने तैनाती फौजेच्या जोरावर हिंदूस्थान मधील सर्व ऐतद्वेशियाचा प्रदेश बळकावला होता. पेशव्याने तर आपला पुष्कळ प्रांत आतापर्यंत ब्रिटिशांना दिला होता. यानंतर मात्र मराठेशाहीतील तसेच हिंदूस्थानातील सर्व परराष्ट्रीय संबंध ब्रिटिशांच्या हातात गेले होते. पेशव्याला आपल्या चुका दिसून आल्या होत्या पण आता फार उशीर झाला होता. पेशवा दुसरा बाजीराव यांच्या वसईच्या तहामुळे ब्रिटिशांना मराठी साम्राज्याचे रक्षण करण्याचे सर्व आधिकार मिळाले. यावेळी ब्रिटिशांनी मराठी साम्राज्याचे खंबीर असनारे शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, पटवर्धन इ. आधार स्तंभाना त्यांनी धोक्याने गार केले. यामुळे मराठी साम्राज्याचे एक-एक स्तंभ पत्ताच्या डोंगरा सारखा कोसळु लागला होता. असे करत-करत ब्रिटिशांनी मराठी साम्राज्याच्या सर्व आधार स्तंभाना खोडून काढले. यानंतर वेळ होती ती पेशवा यांची आणि शेवटी तेच झाले ब्रिटिशांनी आता पेशवा पदावरच हात घातला आणि तो महत्वाचा आधार स्तंभ सुध्दा ब्रिटिशांनी खोडून काढला.[2] ब्रिटिशांचे धोरण व निती साम्राज्य वादाला हिंदुस्थानात पुर्ण पणे अनुकूल ठरली.

पेशवा दु. बाजीराव मुत्सद्दी नव्हते तसेच त्यांच्या मागील पेशवा प्रमाणे

कर्तबगारी पण नव्हती. ज्याच्यावर पेशवा दुसरा बाजीराव यांचा पूर्ण विश्वास बसेल असा यावेळी एकहि माणून त्याच्याजवळ नव्हता. यावेळी त्याच्या जवळचे अनेक सरदार लोक काहीच कामाचे नव्हते सर्व स्वार्थी व आपमतलबी भरणा होता. सन 1811 मध्ये ब्रिटिश वकिल म्हणून 'कर्नल क्लोज' हे पेशवा दरबारी होते तेव्हा पासुन पेशवा यांच्याशी त्याचे संबंध प्रेमाचे व गोडी गुलाबीचे, मवाळ धोरण ठेवले. कर्नल क्लोज यांच्या हाताखालील हिंदुस्थानी नौकर वर्ग बांधवानी त्यांची मोठया प्रमाणात मदत केली. क्लोज यांच्या नंतर पुण्यात वकिल म्हणून 'माऊॅट स्टुअर्ट एलफिन्स्टन' यांची नियुक्ती झाली हा वकिल म्हणजे मोठा मुत्सद्दी, धुर्त आसा होता, त्याचे धोरण व हेरखाते जबरदस्त असल्याने त्याने पुण्याचा सर्व ब्रिटिश कारभार आपल्या हातात घेतला. एलफिन्स्टन यांच्या आगोदर चाललेला पुण्यातील ब्रिटिशांचे धोरण ऐतद्देशीय लोकांच्या तंत्रानेचालण्याचे होते ते त्यांने सोडून दिले. एलफिन्स्टन आल्यावर पेशवा दु. बाजीरावास ब्रिटिशांचा खरा हेतु कळून आला आणि त्यांना आपण केलेल्या चूकांची जाणीव होऊ लागली. एलफिन्स्टन ने आपले जाळे मराठी राज्यत एकदम घट बसवले पण यावेळी पेशवा पुर्ण पणे एकटा पडला होता. पेशवा यांच्या हातातून सर्व गोष्टी निघुन खूप दूर जाऊन पोचल्या आणि आता बंडा शिवाय दूसरा पर्याय उरला नव्हता.

आपल्या हातुन मोठी चुक झाली हे कळाले पण तोपर्यंत खूप उशिर झाला होता. दौलतराव शिंदे, यशवंतराव होळकर, नागपूरकर भोसले, बडोदयाचे गायकवाड यांच्या पराभवामुळे पेशवा दु. बाजीरावास आश्चर्याचा चांगलाच धका बसला. धका मोठा होता यातुन सावरणे अवघड होतो पण प्रयत्न करणे गरने गरजेचे होते. ब्रिटिशांना हद्दपार करण्यासाठी कोणी प्रबळ सहकारी आता राहिला नव्हता तरी पण पेशवा यांनी हळूहळू मराठयाचे सर्व सहकारी मंडळी ना एकत्र करण्याचा प्रयत्न सुरू केला पण त्यांचा म्हणावा तसा फायदा झाला नाही. दुसरा बाजीराव यांनी प्रथम पेशवा म्हणुन पदावर बसल्यावर केलेल्या चुका आणि नंतर वसईचा तह, यामुळे नाराज झालेल अनेक मराठी साम्राज्याचे नेते यांचा मोठा फटका मराठा साम्राज्याला भोगावा लागनार होता.

4.2. दुसरा बाजीराव पेशवे पदावर आल्यानंतर कारभार -

दुसरा बाजीरावांचे आयुष्य हे थोडे गुंतागुंतीचं होतं. त्यांचे वडिल रघुनाथराव यांच्या विरोधात झालेल्या बारभाईच्या कारस्थान याच काळात दुसरा बाजीरावांचा जन्म झाला. पण पुढे त्याच्या नशिबात हालअपेष्टा सहन करण्याची वेळ आली होती. पेशवा सवाई माधवराव यांच्या मृत्युनंतर पेशवेच्या वंशाचा दु. बाजीराव हा कारदेशीर वारस पण अनेक अडिअडचीना दोड देवून पेशवा पदावर बसला. इतकी वर्ष कैद अन एकदम अशी सत्ता हातात आल्यानंतर काय करायचं हे दु. बाजीरावांना न समजल्याने सुरुवातीला त्यांच्या हातून अनेक गंभीर चुका घडल्या. त्यांच्या आयुष्याच्या सुरवातीची जवळपास वीस वर्षे वडिलांबरोबर कैदेत गेली. नाना फडणीस यांनी रघुनाथरावांचा राग त्यांच्या कुटूंबार काढला हि चुकच झाली म्हणावी त्यातच पेशवा सवाई माधवराव यांचा अकाली मृत्यु झाला, तोपर्यंत दु. बाजीरावांकडे कोणाचेही लक्ष गले नव्हते.

दुसरा बाजीरावाला अनपेक्षितपणे पेशवाईची सूत्र मिळाली यानंतर काय करायचे हे बाजीराव यांना समजले नाही. पेशवा पदावर बाजीराव आले पण त्यांच्या अंगात म्हणावी तितकी कर्तबगारी नव्हती. यामुळे त्याच्या नावावर अनेक कृत्ये व असह्य जुलूम करून दौलतराव शिंदे यांनी पुणे शहराला वीट आणला होता. पेशवा यांचे बहुतेक हस्तक व सरदार शत्रुच्या जाळयात गुंतले होते. ब्रिटिशांनी त्यांचे घरे पोखरुन टाकले होते व सावकारांनी त्यांला गिळला होता. उठावे त्याने लचके तोडावे अशी पेशवाची आवस्था झाली होती. आजोबांची अक्कल नातवात नव्हती असे उघड दिसते. दुसया ब्रिटिश मराठा युध्दाच्या समाप्तीनंतर मराठी राज्याचे एकूण स्वरुप व चित्र बदलून गेले. वसईच्या तहानंतर पेशवा दु. बाजीराव आता ब्रिटिशांना विचारल्या शिवाय आपल्याच सरदारांशी कोणताही व्यवहार करण्यास मोकळा राहिला नव्हता. तसेच त्याचे बलवान मानले जाणारे सहकारी मंडळी या युध्दात फार गळून गेले होते. ब्रिटिशांनी पेशवा यास कोणताही सरदार, जहागिरदार, सरमजाम, सहकारी, मराठा मंडळातील इतर नेते मिळू नाही याची काळजी घेत होते. त्यातच ब्रिटिशांनी होळकर, शिंदे, भोसले यांच्यावर लादलेल्या तहाने पांगळे करून सोडले हाते. यामुळे त्यानी ठरवले तरी पेशवा यास ते कोणत्या प्रकारे सहकार्य करतील

याची कोणतीच कल्पना नव्हती.

मराठा मंडळातील महत्वाचे नेते बडोद्याचे गायकवाड हे मात्र स्वतःच्याच गृहकलहात पुर्ण पणे गुंतले होते. गायकवाड यांची पुणे दरबारशी फटकून वागण्याची वृत्ती व त्यानंतर ब्रिटिशांच्या जाळयात सापडून स्वतःची व्यवस्था पण इंग्रजाच्या मदतीने लावून घेतली. या काळात पेशवा यांच्या कारकिर्दीत काही फार प्रमाणात मोठया राजकीय घडामोडी घडून आल्या नाहीत. याचे कारण म्हणजे पेशवा यास त्यांच्या बदलत्या परिस्थितीचा व स्वतःच्या कर्तव्याचा अंदाज येण्यास आता कोठे तरी सुरवात झाली होती. त्याच प्रमाणे राज्याच्या व पेशवे पदाच्या रक्षणाची जबाबदारी परस्पर ब्रिटिशांनी उचलल्याने पेशवा पेशवाईवर फक्त बाहुले म्हणुन होता. ब्रिटिश लोक भोसले, शिंदे, होळकर, यांच्या कुरापती काढुन त्यांच्याशी युध्द करीत होते. हे सर्व पेशवा पुण्यात स्वस्थ बसून त्या बातम्या ऐकत होता. पेशवा आपल्या सरदार वर्गला धरुन पण राहत नव्हता ज्यांनी मराठा साम्राज्य वाढवले त्यासाठी जिवाचे रान केले, याचा पण अधार त्याला घेवासा वाटत नव्हता किंवा त्यांना मदत करावी असे सुध्दा वाटले नाही. पेशवा यास प्रजा व मराठा साम्राज्य यांचे भान राहिले नाही. त्याला या प्रजेचे कल्यान, मुलखाचा बंदोबस्त ह्या गोष्टी करण्याचे व आपली जबाबदारी काय आहे याची त्याला कधीच आठवण आली नाही. ऐकिकडे दुसरे ब्रिटिश मराठा युध्द चालू झाले आणि पेशवा दु. बाजीराव आपल्या वाडयात यज्ञमंडपाचे सात दिवस यज्ञ करत होता. यामुळे पेशवा यांचा मराठी साम्राज्याला पेशवाईवर आल्यावर लावलेला हातभार येथे दिसुन येतो. यामुळे पुढील काळात पेशवा दु. बाजीराव यांना मोठे कष्ट सहन करावे लागणार हे नक्की होते.[3]

4.2.1. जहागिरदार यांनी मराठी साम्राज्यात चालवले कारस्थाने -

मराठयाच्या राज्यात यशवंतराव होळकर, दौलतराव शिंदे, फत्तेसिंग माने, सर्जेराव घाडगे, धोंडी वाघ, त्र्यंबकजी डेंगळे यासारखी शेकडो पराक्रमी जहागिरदार व्यक्ति होत्या. पेशवा दु. बाजीराव यांना यांच्या कडून राष्ट्रकार्य करून घेण्याची सुबुध्दी कधीच झाली नाही. उलट या अधिपत्याखालील जहागिरदाराना, सरमजाम, सवकार, सरदार इ. पेशव्यांना अनेक प्रकारे त्रास देण्याचे काम केले. दहा वर्षात पेशवा यांनी आपले राज्य नीट

संभाळून व सरदारांची मने राखण्याचे सोडून त्यांच्या वाढलेल्या जहागिरी बळकावू आपल्या ताब्यात घेण्यास सुरवात केली. आपल्याच सरदारांच्या छळांत त्याची बुध्दि बरीच खर्ची पडत असे तसेच पेशवा यांची उरलेली बुध्दि त्यांच्या वाईट सल्लागारांनी आपल्या ताब्यात घेतली ते पेशवाच्या दरबारी कामकाचात कायम लुडबूड करून खेळखंडोबा करुन टाकला होता.[4]

वसईचा तहाने सर्व मराठा साम्राज्य ब्रिटिशांच्या हातातील बाहुले बनले होते. ब्रिटिशांचे अंकित झालेले मराठा जहागिरदार, सरमजाम, सरदार इ. यांचा वास्तिविक पाहता पेशव्यांशी असणारे संबंध पर्ण पणे संपूष्टात आले. सन 1803 पासून पेशवा दु. बाजीरावांचा पुण्यातील राज्यकारभार ब्रिटिशांच्या हातुन चालत असे यामुळे त्यांचा वाढता त्रास, वाढता दबाव यासर्व गोष्टी पेशवा यांना असाह्य होऊ लागल्या होत्या. त्यात पेशव्याच्या विरोधात अनेक बलाढ जहागिरदार वर्ग तयार झाला त्यांनी चालवलेला विरोध, बंड, केंद्र सत्तेला झुगारून देणे हया सर्व मोठया समस्या पेशवा पुढे येऊन उभ्या होत्या त्यातच पुणे शहरात सर्वत्र अराजकता माजले होते. ग्रामप्रमुख व अन्य अधिकारी वरिष्ठांचे हुकूम धाब्यावर बसवीले त्यातच त्यांच्यात अंतर्गत कलह सतत चालु असे. यावेळी स्वतः पेशवा यांच्या जवळ आर्थिक व लष्करी सामर्थ्य कोणत्याच मार्गाने नव्हते. अमृतराव यांचे सहाकरी व नाना फडणीस यांचे सहकारी यांनी आप-आपल्या क्षेत्रात लुटमार करून मराठी सत्तेतील स्वराज्य जवळ-जवळ संपुष्टात आनले होते. यातच यशवंतराव होळकराचा शुर सेनापती ‘फत्तेसिंहग’ याने कर्नाटक प्रांतावर मोठया प्रमातण खंडणी वसुल करून अनेक लोकानां त्रास देणे लुटालूट करणे चालु केले. त्यातच सातारा प्रांतातील जहागीरदार वर्गने लुटालूट करणे, गोंधळ घालणे इ. गोष्टी चालु केल्या होत्या. कर्नाटक प्रांतात लहान मोठे सर्व सरदार व सरमजाम यांनी मिळून बंडाचा पवित्रा उचलला त्यांनी अनेक मुलूख उद्धस्त केले होते. ‘कित्तूरकर’, ‘सरलष्कर’ आणि डंबलचा ‘भीमराव मुंढरगी’ आणि ‘तोतया वाघ’ यांचे दंगे सातारा प्रांता चालु होते. याच सुमारास कर्नाटक प्रांतात दंगेचे प्रमाण वाढतच चाले हाते. हया सर्व गोष्टी पेशव्याच्या राज्यात पेशव्याला नजुमानता चालू झाली

होती.[5] या जहागीरदारानी ब्रिटिशांची मर्जी संभाळून हा सर्व प्रकार चालु केला. पेशव्याच्या राज्यात शांतता व सुवव्यस्था ब्रिटिशांना नको होती. लष्कारी कारवाई ही ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घेतली आसल्या कारणाने त्यांनी पेशव्या विरुध्द गैर व बेकायदेशीर कृत्य करणायाना कडक शिक्षा करणे गरचे होते, पण ते करणे सोडाच उलट पेशव्या विरुध्द त्यांना ब्रिटिशांनी संरक्षण देणे तसेच मदत करण्यास सुरवात केली.

4.2.1.1. दक्षिण प्रांतातील पेशवा विरोधात बंड -

आठराव्या शतकात म्हणजे दु. बाजीराव जेव्हा पेशवे बणले तेव्हा पासून पेशव्या बदल असणारा आदर, कर्तव्य, प्रतिष्ठा, भावना या सर्व गोष्टी कमी होत गेल्या आणि या वेळी मराठी साम्राज्याच्या जहागीरदारांची नीती केवळ स्वार्थाने भरत चालली होती. दु. बाजीराव पेशवा पदावर अरुढ झाले खरे पण ब्रिटिशांबरोबर केलेला वसईच्या तह नंतर त्याला थोडी स्वस्थता लाभताच त्याने जाहगिरदार मंडळीना धारेवर धरण्यास आरंभ केला. जाहगीरदार, सरमजाम ही मंडळी आपल्याला वाटेल त्यापध्दतीने कारभार करु लागले त्यानुसार मुलूख बळकावणे तसेच कधी-कधी पेशव्याच्या विरोधात पण जात असे याचा परिणाम असा झाला की, पेशवा पदाचे महत्व दिवसेन दिवस कमी होत चालले होते. यावेळी सर्व हिंदूस्थान मध्ये परिवर्तनाची लाट येऊन पोचली याचे कारण म्हणजे युरोपीय सत्तांनी आपले साम्राज्य विस्तार करण्यासाठी केलेली सुरवात होती. जहागीरदारचे आपल्या प्रमुखा (पेशवा) बद्दल बंड, असंतोष या गोष्टींचा जोर वाढू लागला होता. पेशव्याला नजुमानता पेशव्याची प्रतिमा सुधारण्याच्या ऐवजी तीला डळमळीत करण्याचे काम ब्रिटिशांनी चालु केले होते. या बंडखोर प्रतिनिधी विरुध्दी आपल्याला वसईच्या करारा प्रमाणे तैनाती फौजेचा वापर करता यावा म्हणून ब्रिटिशांकडे पेशव्याने सैन्य देण्याचा तगादा लावला होता. पण मनात कपट भाव ठेवणाया ब्रिटिशांनी पेशव्याच्या मागण्याकडे पुर्ण पणे दुर्लक्ष केले.

आपले साम्राज्य वाढवण्याच्या नादाला लागलेल्या मिरज, सांगली, तासगाव, जमखंडकर येथेली मराठी साम्राज्याचा आदर आसणाया घराण्यात गृहकलहाने चांगलेच प्रसंग निर्माण केले होते. पेशव्यानी या सर्वाना मान्यता देऊन यांचे सरमजाम यांच्या सिमा

वाटून दिल्या. दक्षिणेत पटवर्धन घराण्यातील मंडळी फौज बाळगून पेशव्यानी सोपविलेल्या मोठमोठया कामगिया करत पण ही सर्व मंडळी पेशव्याचे चाकर होते. ज्यावेळी पेशव्यानी ब्रिटिशांशी तह केला त्यावेळी त्यांना कोणी धनी राहिला नव्हात यामुळे त्याना विचारणारे कोणी राहिले नाही त्यांच्या मना प्रमाणे कारभार करण्यासाठी ते मोकळे झाले हाते. या परिस्थितीत त्यांनी पुढे पुढे पेशव्याचे हुकूम माननेच बंद केले. आपल्या फायद्यासाठी त्यांनी मोठी फौज उभू करणे, तसेच बंड, गोंधळ, लुटमार, शेजारील प्रदेशात लुटमार, इ. कार्यक्रम त्यांनी चालु केले होते. शिंदे, होळकर यांचे ब्रिटिशांशी चाललेले युध्द यामुळे या परिस्थितीत कोणीच लक्ष घातले नाही. पण पुढे सन 1810 पासून पेशवा यांनी जास्त बळकावलेले प्रदेश, वाढत आसलेले बंड या गोष्टीत लक्ष देण्यास सुरवात केली आणि यात पेशव्याला चांगलेच यक्ष पण आले तेव्हा जहागिरदार आपल्यावर होत असलेली कारवाई मुळे ते बेफान झाले व यामुळे पेशव्यावर अनेक प्रकारचे संकट येऊ लागली होते.[6]

ज्या जहागिरदारानी, सरमजामदार वार्गनी आपल्या लष्करी बळावर परस्परांचे प्रांत बळकावले तेव्हा अशा सरदारांकडून नोंदी नसलेल्या, बळकावलेला मुलुख पेशव्यानी ताब्यात घेण्याचा सपाटा चालु केला तो पण ब्रिटिश फौजेच्या सहाय्याने होता. दक्षिणे कडील जहागिरदार पटवर्धन यांनी आपली सत्ता वाढवण्यासाठी शेजारील मुलूखात धुमाकूळ घालण्यास सूरवात केली यामुळे पटवर्धन व पेशवे यांच्यात वाढत चालेली कडू पणा शेवट शिगेला जाऊन पोचला होता. सावनूर प्रांतात अबदुल्लाखान पठाण यांच्या हातातील सर्व कारभार आपल्या ताब्यात घेऊन पटवर्धनानी पेशवे यांचे संकट ओढवले घेतले होते. कित्तूरकरांच्या मुलूखावर छापे घालत असे त्याच प्रमाणे मराठ्यांचे सरमजाम 'अप्पा देसाई' व 'बापू गोखले' यांच्या मुलूखात शिरून लुटालूट करत असे. कर्नाटकातील पेशवाच्या मुलखावर हल्ले त्या मुलखातील पाळेगारांकडून मोठया प्रमाणात रक्कम वसूल केल्या जात असे. पटवर्धन पेशव्याशी कोणत्याच मर्यादेत राहीला नव्हता त्याने पेशव्याचे आपल्यावरचे असलेले नियंत्रण झुगारून दिले आणि पेशव्याशी कायम शत्रु प्रमाणेच वागत राहिला या सुमारास पटवर्धनाकडे बराचसा मुलुख हा बेकायदेशिर होता.

त्याला जबर बसवण्यासाठी तसेच पेशव्या बदल आदर आसावा यासाठी पेशव्याने त्याच्यावर कारवाई करण्यासाठी प्रयत्न चालवले होते. पटवर्धन ज्या प्रमाणे पेशवाला त्रास देत असे त्याच पध्दतीने त्यांचा त्रास पुढे ब्रिटिशांना होणार कारण त्यांच्या कारवाया हया ब्रिटिश नितीला घात होत्या. त्यामुळे तैनाती फौज पेशवा याच्याबरोबर तेण्याचे ठरताच पटवर्धन यांच्या सर्व कारवाया शांत झाल्या यानंतर त्याने बळकावलेले प्रांत परत देण्याचे कबुल केले. पेशव्या विरुध्द होणारे जहागिरदारचे बंड थांबवण्यासाठी ब्रिटिश वकिल 'रसेल' यांच्या मनात स्वार्थ ठेवून पेशव्याला मदत केली यामागे रसेल यांचे कारस्थान म्हणजे जहागिराद, सरमजाम यांच्या मनात ब्रिटिशांची वेगळी व भविष्यात जहागिरदार वर्ग आपल्याला मदत करेल असा हेतु होता पण तसे झाले नाही यामुळे पेशवाची बाजू मजबूत झाली. यामुळे पुढे रसेल यांने पेशवा यांच्या विरूध्द निर्माण झालेले बंड चालूच ठेवण्या ऐवजी ते थांबवण्यासाठी पयत्न केले यामुळे त्यांच्या वरिष्ठानी त्यांची तडकाफडकी उचलबंगडी केली.[7]

4.2.2. माऊंट स्टूअर्ट एल्फिन्स्टन यांची पेशवा यास जबर व पंढरपुर तह -

ग. ज. लॉर्ड वेलस्ली हिंदूस्थानातुन गेले पण त्याचा प्रभाव, त्याचे विस्तारावादी धोरण त्यांच्या अंगी असणारा कर्तबगारी ही सर्व त्याच्यात कंपनीचा एक नौकर अधिकारी जो पुण्यात वकिल म्हणून नियुक्त झाला असा 'माऊंट स्टूअर्ट एल्फिन्स्टन' होय. बॅरी क्लोझचा सहाय्यक म्हणून त्याने यापूर्वी पुणे दरबाराच्या कामकाजा असलेला अनुभव तसेच वसईच्या तहात त्याचाही अप्रत्यक्ष सहभाग असल्या कारणाने पुण्यातील राजकारणाची त्यास चांगलीच ओळख झाली होती. हिंदुस्थानात असलेल्या समकालीन ब्रिटिशांन प्रमाणेच एल्फिन्स्टनही साम्राज्य विस्तारवादी होता. त्याच्या राजकारणाची पध्दत ग. ज. वेल्स्लीच्या पध्दती प्रमाणेच होती. त्यामुळे पेशव्याचा व एलफिन्स्टन यांचा अधुन-मधुन खटका उडत असे. एल्फिन्स्टनच्या स्वभावाची व कामकाजाच्या पध्दतीची माहिती असलेल्या ब्रिटिश आधिकारी 'खुरशेट मोदी' यांनी पेशव्याला गुप्त पणे सावधगिरीचा संदेश देऊन ठेवला. मोदी जरी कंपनीचा नोकर असला

तरी अंतस्थरित्या पैसे खाऊन तो पेशव्याचेही हित सांभाळत होता. तत्कालीन हिंदूस्थानी चाकरांपेक्षा त्याचे वर्तन निराळे होते. मोदीच्या सेवेची कदर म्हणून पेशवा दु. बाजीराव यांनी त्यास सन 1809 मध्ये कर्नाटक प्रांताची सुभेदारी दिली. मोदीने त्या प्रांतात आपला हस्तक नेमून ब्रिटिश कंपनी मध्ये तसेच मराठी राज्यात या दोन्ही ठिकाणी आपली नोकरी कायम राखली. अर्थात, हे त्यावेळच्या प्रथेस सुसंगत असले तरी एल्फिन्स्टनने या गोष्टीस आक्षेप घेऊन मोदीला पेशवे वा कंपनी सरकार यांच्या पैकी एकाची चाकरी सोडण्याची आज्ञा केली तेव्हा मोदीने कर्नाटकची सुभेदारी सोडली दिली. यानंतर पुढे पेशवा यांनी त्या सुभेदारीवर त्रिबकजी डेंगळेची नियुक्ती केली.[8]

एलफिन्सट पुण्यात नियुक्त झाला तेव्हा त्यांने आपले सर्व लक्ष मराठी साम्राज्य हळुहळू कंपनीच्या वर्चस्वाखाली आणण्याचा विचार करु लागला होता. आणि महत्वाचे म्हणजे त्याची नेमणुक त्यासाठीच मराठा दरबातर झाली होती. एलफिन्स्टन यांचे यावेळी पुण्यात येणाया सर्व मंडळीवर व पेशवा दु. बाजीराव यांच्यावर नाराज असलेले पुण्यातील जनता यांच्यावर एलफिन्स्टन यांचे बारीक लक्ष होते. एलफिन्स्टन याना येथील प्रजेची नाराची दुर करायची नव्हती तसेच त्यांना पेशवा यांना पेशवाई वरुन काढायचे नव्हते. ब्रिटिशानसाठी पेशवा पदावर दुसरा बाजीराव सरखी व्यक्ती आसणे महत्वाचे होते. त्यांची जिम्मेदारी ब्रिटिशांनी वसईच्या तहा नुसार घेतली पण त्यांच्या प्रजेची कोणत्याच प्रकारे जिम्मेदारी ब्रिटिशांनी घेतली नव्हती यामुळे ब्रिटिश वाट पाहुन होते की, पेशवा दु. बाजीराने आपल्याशी कुरापत काढावी या धोरणाना मुळे त्यांनी पेशवा याकडे पुर्ण पणे दुर्लक्ष केले. ब्रिटिशांनी जरी दुर्लक्ष केले असते तरी पेशवाने मात्र या गोष्टी कडे पुर्ण लक्ष दिले होते. म्हणून त्यांनी आपल्या प्रांतातील होत असलेले बंड मोडण्यासाठी पुढाकार घेतला होता.

दक्षिणेतील सरमजाम ‘परशुरामपंत’ यांने आपल्या प्रजेवर खुप जुलूम केला तसेच सातारा छत्रपतीशी बंड केले, अनेक जहागिरदारानी आपली वहिवाट ‘मातुश्री’ व ‘बळवंतराव फडनवीस’ यांच्या नावाने चालु केली होती. परशुरामपंत याना वाटत होते

की, ती वहिवाट आपल्याकडे आसावी असा त्यांनी अग्रह केला. बळवंतराव फडणविसानें त्याच्या विरोध ‘बापु गोखले’ यास पाठवून त्याचे बंड चिरडून टाकले.[9] त्याच पध्दतीने ‘माधवराव रास्ते’ हे पेशव्याचे सावकार व नाना फडणीस यांचे ते सहाय्यक होते तसेच त्याना नानानी 11 लाखाची जाहगीरी दिली होती. पेशवा दु. बाजीराव यांनी ती जाहगिरी जप्त करून त्यांचा रोष आपल्यावर ओढून घेतला. यामुळे तो ब्रिटिशांच्या पक्षात जाऊन सामिल झाला.

पेशवा दु. बाजीरावाने आपल्या विरोधात असनारे व आपल्या विरोधी कारवाया करणारे जहागिरदार, सावकार, सरंमजाम इ. यांना पिळून, नमवुन यांचा बंदोबस्त केला. एलफिन्स्टनला जहागिरदार व पेशवे यांचे संबंध हा महत्वाचा प्रश्न अत्यंत भेडसावणारा होता. पेशवा यांनी ‘सदाशिव माणकेश्व’ यांना एलफिन्स्टनकडे आपल्या तक्रारीची विशेषतः ‘आप्पा पटवर्धन’ यांच्या संबंधी असणाया लुटमार या तक्रारीचा खलिता घेऊन धाडले आणि यांचा बंदोबस्त करण्यासाठी तौनाती फौज आपल्या सोबत देण्याची विनंती केली. एलफिन्स्टनला पेशव्याचे म्हणणे पटले होते. पण गर्व्हनर जनरलने जहागीरदारांच्या विरुध्द लष्करी कारवाई करण्याच्या धोरणास स्पष्ट विरोध केला होता. पेशव्याच्या डोक्यावर जहागीरदारांची सतत टांगती रहाणारी तलवार ब्रिटिशांना दूर करावयाची नव्हती[10] पेशवा यांच्या पुण्यातील गोंधाळा मुळे व हस्तक्षेपामुळे पेशवा यांच्यावर असंतुष्ट झालेले लहान मोठे सर्व सरदारानी, संस्थानिकानी, स्थानिक जनतेने मदतीकरता ब्रिटिश वकिल एल्फिन्स्टनकडे धाव घेतली. एल्फिन्स्टन यांनी पेशवा यांच्यावर दडपण आणून, पटवर्धन, परशुराम, रास्ते इ. वगैरे सर्व सरमजाम वर्गाला वाचविले. हे सर्व लहान मोठे मंडळी पेशवा दु. बाजीरावाच्या छळापासून सुटले व ब्रिटिशांच्या जाळयात जाऊन अटकले. ब्रिटिशांनी आपला फायदा ज्या गोष्टीत आहे तीच गोष्ट घडवून आनली व त्याच गोष्टीला पाठीबा देण्याचे काम केले.

याच वेळी एल्फिन्स्टन यांनी पेशवाला कोणतीच मदत केली नाही किंवा त्यांची पाठराखन सुध्दा केली नाही. सरमजाम, जहागिरदार वर्ग यांच्या विरुध्दी पेशवा यांनी

असा कारवाय करणे त्याचा छळ करणे, खंडणी मागणे, हे सर्व गैर होते, त्यामुळे एल्फिन्स्टनने यांनी या वर्ग विरोधी तैनाती फौजेचा वापर होऊ दिला नाही. पेशवा व इतर मराठा असंतुष्ट वर्ग यांच्या या वादातुन मार्ग काढण्यासाठी एल्फिन्टनने पेशवा दु. बाजीराव यांच्या बरोबर एक तह केला. पेशवा यावेळी पंढरपुर येथे मुक्कामी होते. 7 जुलै, 1812 रोजी एलफिन्स्टन यांनी पेशवाला धाक दाखवून तेथे पेशवा यांच्याशी तह केला तोच 'पंढरपुरचा तह' मान्य करुन घेतला. एलफिन्स्टन यांना पेशवा यांच्याशी यावेळी शांती निर्माण व्हावी म्हणून तह करणे गरजेचे भासवले पण यामुळे एलफिन्स्टन यांनी पेशवा यांच्या राज्यकारभारात हस्तक्षेप करून पुण्यातील व मराठी साम्राज्यातील पेशव्याचे लष्करी बळ खर्चि करण्यास सुरवात केली. एलफिन्स्टनने आपली सर्व अक्कल हुशारी पणाला लावून पंढरपूर येथे पेशव्याकडून काही कलमांवर आधारित तहास मुंजुरी मिळवून घेतली. यात एल्फिन्स्टन यांनी पेशवावर अनेक प्रतिबंद लादले. त्यात त्यांनी ब्रिटिशांच्या परवानगिशिवाय पेशवा यांनी कोणत्याच मराठी मंडळाच्या नेत्याशी नवीन मागण्या करुन नेय. मराठी नेत्यानी पुर्वी प्रमाणेच पेशव्याची चाकरी करावी. ब्रिटिशांची परवानगी घेतल्या शिवाय कोणत्याही मराठ मंडळातील नेत्याची सरंमजांम, जहागिरी जप्त करु नये. सरदार व पेशवा यांच्यातील संघर्ष ब्रिटिश यांच्याच सांगण्यावरुन सोडवला जाईल. या नेत्याशी करार करण्याचा अधिकार ब्रिटिशांनी आपल्याकडे ठेवला होता.[11]

4.2.3. पंढरपूरच्या कराराचे परिणाम -

पंढरपूर कराराने पेशवा पुर्ण पणे पंगळा झाला होता. ब्रिटिशांनी मराठी मंडळातील नेते व पेशवा यांच्या भोवती तैनाती फौजेचा फास आवळण्यास सुरवात केली. या कराराने मराठी साम्राज्यात मोठा बद्दल घडुन आला. करारामागील ब्रिटिशांचा डाव म्हणजे मराठीशाही आपल्या वर्चस्वाखाली आणने व सर्व अधिकार आपल्या हातात घेणे हाच होता. या कराराने पेशव्याचे सर्व जाहागीरदार, सरंमजाम ही नेते मंडळी यांच्यावरील अधिकार संपुष्टात आले होते. ब्रिटिशांनी आपला टाव साधुन एका दगडात दोन पक्षी मारले असे म्हणतात येईल. जहागीरदार, नेते मंडळी, सरमजंम वर्ग आता पेशव्याच्या वर्चस्वातुन पुर्ण पणे मोकळे झाले होते. करारा प्रमाणे जहागीरदार यांच्या रक्षणाची

जबाबदारी आता ब्रिटिशांची होती. पेशव्याच्या बयाच गोष्टीना हया कराराने मोठी खीळ बसनार होती. पेशवाना जाहागीरदार, सरमजांम या वर्गाशी कोणत्याच प्रकारे संबंध ठेवता येणार नव्हते किंवा लष्कर वाढवण्यास सुध्दा सांगता येणार नव्हते. ब्रिटिशांनी राज्यात शांतता व सुव्यवस्था स्थापन करण्याच्या नावाखाली आपली पोळी भाजली व पेशवे आणि जहागीरदार यांना शांत बसवले. ब्रिटिशांना तोंड देण्यासाठी पाहिजे तेवढे लष्करी सामर्थ पेशवा जवळ नव्हते. पेशवा यांनी चालू केलेल्या बंडखोर जाहागीरदार, सरमजांन यांच्या बरोबर चालवलेलेली दडपशाही याचा भविष्यात ब्रिटिशांवर व त्यांच्या सत्तेवर वाईट परिणाम होणार होता. ब्रिटिश सत्तेने वाढलेले साम्राज्य याला मोठा धोका निर्माण होण्याची संभवणा होती. त्यामुळे पेशवा यास आळा घालणे व जाहगीरदार वर्गाला आपल्या वर्चस्वाखाली आनणे ब्रिटिशांच्या दुष्टीने उपयुक्त होते. हे एलल्फिन्स्टन याने बरोबर हेरले हाते. हा करारा म्हणजे पेशवा यांच्या आधिकारावर आणलेली गदाच होती. यामुळे पुढे पेशवा दु. बाजीराव यांना ब्रिटिश सत्ते विरुध्द युध्द, बंड करावेच लागलणार होते.

4.3. ब्रिटिश व पेशवा वादास सुरवात व मराठी साम्राज्यास खिंडार पडण्यास झालेली सूरवात-

4.3.1. दक्षिण भागात ब्रिटिशांचे बस्तान व कोल्हापूरकर यांच्याशी करार –

ब्रिटिशांनी मराठी राज्यसाठी अनुकूल असणारे सर्व सरदार व जहागिरदार यांना आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचे काम चालु केले. त्यासाठी त्यांनी पंढरपूर करारा नुसार मराठी राज्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पाऊल उचलण्यास सरवात केली. दक्षिणेतील राजकारणात 'कोल्हापुरचे छत्रपती करवीरकर' व जहागिरदार 'चिंतामणराव' यांनी 'अप्पा देसाई' व 'सावंतवाडीकर' या दोन सरमजांमदार यांच्यात सन 1811 मध्ये युध्द पुकारले. या युध्दत कोल्हापूरच्या करवीरकर यांचा निभाव लागणे कठीन झाले होते. याचाच फायदा ब्रिटिशांनी घेण्याचे ठरवले कारण, यामागे ब्रिटिशांचा हेतु साफ नव्हता त्यांचा डोळा हा 'मालवण बंदर व सिंधुदुर्गचा किल्ला' यावर होती. हे प्रदेश ब्रिटिशांच्या हातात आले असते तर पश्चिम किणायावर ब्रिटिशांचे स्वतंत्र वर्चस्व निर्माण

होणार होते. यावेळी निपाणकर व सावंतवाडीकर यांच्याशी चाललेल्या अंतर्गत बंडा मुळे करवीरकर मोठया आडचणीत सापडले. पेशव्याची सार्वभौम सत्ता ही करवीरकर यांच्यावर होती पण ब्रिटिशांनी यावेळी पेशवा व करवीरकर यांच्या संबंधाकडे लक्ष दिले नाही आणि ‘एलफिन्स्टन’ यांनी सन 1811 साली करवीरकर यांच्याशी स्वतंत्रपणे ताहची वाटाघाट सुरु केली.

करवीरकर हे मराठी साम्राज्याचे एक अविभाज्य घटक होते तो सार्वभौम सत्ताधीश नव्हते पण ब्रिटिशांनी करवीरकर यांच्याशी पुण्याच्या सत्तेच्या अपरोक्ष पंढरपूर करारा नुसार स्वतंत्र करार करुन घेऊन एलफिन्स्टन याने हुशारीने डाव सफल केरुन घेतला. 1 ऑक्टोबर 1812 रोजी कोल्हापूरकर यांच्याशी करार करुन घेण्यात ब्रिटिश यशस्वी झाले व त्यानुसार ‘चिकोडी’ व ‘मानोळी’ यावरील हक्क सोडून देऊन ते पेशवा यांच्या स्वाधीन करावेत, या करारात ब्रिटिशांनी आपला स्वःतचा डाव साधण्यात चांगलीच चपळाई केली. यामध्ये त्यांनी पद्मगड, सर्जेकोट व राजकोट हे किल्ले व मालवण बंदर ब्रिटिशांना स्वतः मागुन घेतले. राजाने युध्द नौका बांधु नये. ब्रिटिश जहाजाना सर्व संरक्षण दयावे. ब्रिटिशांच्या संमंतीशिवा कोणाशीही करार करु नये. कोणत्याही राजकीय तंटा ब्रिटिशांच्या मध्यस्तीने सोडवावा. ‘अशा ह्या करारावर दिनांक 8 ऑक्टोबर 1812 रोजी सह्या होऊन करवीकर आता ब्रिटिशांचे मांडलीक बनले.’[12] ब्रिटिश यांनी हा करारा करुन पेशव्याला चारही बाजूनी एकाकी पाडण्यात यश मिळवले. पेशव्याकडे आता कोल्हापूरकर यांच्यावर कोणताच अधिकार राहिला नव्हता. आपला हेतु व स्वार्थ ब्रिटिशांना ज्यागोष्टीत दिसतो त्यांनी त्यागोष्ट आपल्या वर्चस्वाखाली आणण्यास कोणत्याही थराला जाऊन त्यांनी आपला हेतु साफ करून घेतला.

4.3.2. मराठी साम्राज्याला ब्रिटिशांच्या धोरणाने सळो की पळो करून सोडले -

पंढरपूर करारामुळे दक्षिणेतील मराठी साम्राज्यात शांतात प्रस्थापित होईल व जहागिरदार, सरमजांमदार वर्ग पेशवा यांच्या प्रति निष्ठेने वागतील असे पेशवा व ब्रिटिश वकिल एलफिन्स्टन यांना वाटत पण प्रत्यक्ष तसे झाले नाही हा ब्रिटिशांच्या राजकारणाचा

एक भाग असुन त्यात मोठे यश संपादन केले. यावेळी पेशव्या पुढे अनेक समस्या येऊन उभ्या राहिल्या त्या म्हणजे मांडवी, अहमदनर, बुंदेलखंड, या प्रांताची व्यवस्था लावणे तसेच निजाम, गायकवाड हयाच्या पुढे अनेक गंभिर प्रश्न निर्माण झाले. यातच पेशव्याचे मांडलीकत्व असलेले गुजरात (बडोदा) नजीक 'मांडवी' या प्रांतातील काही भाग पेशवा यांनी ब्रिटिशांच्या तैनाती फौजेच्या खर्चासाठी दिल होता. तो 65000 रु. खर्चाचा प्रदेश मांडवीतून दोडुन दिला होता पण ब्रिटिशांनी पुर्ण मांडवी संस्थानच आपल्या ताब्यात घेण्याचा निच्छय केला यामुळे गुजरात मध्ये आपली पकड घट व्हावी म्हणून मांडवी संस्थानवर आपला जोर लावला होता. ब्रिटिश लोक मराठी राज्यात वाटेल तसे वागू लागले त्यांनी पेशवा दु. बाजीराव यांना आपल्या हाताखालील बाहुले बनवले व मनात येईल त्या पध्दतीने कारभार करू लागले होते. सन 1815 मध्ये दोन लाख वीस हजार उत्पन्नाचा प्रदेश 'मांडवी' ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घेतला आहे असे पेशवा यास सांगुन टाकले. याच प्रमाणे ब्रिटिशांनी आपल्या आधिकाराचा वापर करून मराठयांचे काही छोटे मोठे प्रांत आपल्या ताब्यात घेण्यास सुरवात केली. ब्रिटिशांनी कायम आपले धोरण साम्राज्य विस्तारावादी ठेवले होते. त्यांनी तैनाती फौजेच्या खर्चासाठी मराठी साम्राज्यातील काही प्रदेश आपल्या सोयीनुसार पेशवा याकडुन मागून घेतले पण या प्रदेशांची ब्रिटिशांकडे पेशव्यानी कायम मागणी करून सुध्दा हिशेबाची यादी दिली नव्हती असीच परिस्थीती बुंदेलखंडाची झालेली यावेळी तेथील यादी पेशवास देण्यात आली नव्हती.[13]

दुसरे ब्रिटिश मराठा युध्द संपल्यावर पेशव्याने आपले सार्वभौमत्वाचे हक्क कायम राखण्यासाठी अनेक प्रांत आपल्या पध्दतीने तसेच आपल्याला धारजीने असणारे काही प्रांतात आपल्या मर्जितील अधिकारी नेमण्यासाठी त्याने सुरवात केली. पण पुण्यात पेशवा दरबारी चालु असलेली ब्रिटिश व पेशवा यांच्यात अंदाधुदी व वारंवार वाढत चाललेला ब्रिटिशांचा हस्तक्षेपा मुळे पेशव्याचे मांडलीकत्व असलेले अनेक संस्थानानी स्वतंत्र पणे वागण्यास सुरवात केली होती. योवळी पेशव्याने बंडखोर यांच्या विरुध्द मोठी कारवाइ करून त्यातील काहीना आपल्या गटात सामिल करून घेतले व मांडलीक असणाया प्रांताना त्यानी सैन्य उभारण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे काम चालु केले होते.

पेशव्याने यावेळी पुणे दरबाराला मिळत असलेली राजस्थान प्रांतातुन खंडणी वसूल करण्यास सुरवात केली होती. त्यासाठी त्याने उत्तर प्रांतात 'विंचूरकर' या जहागिरदार तसेच 'नरसिंह खंडेराव' यांची सरसुभेदार म्हणून पेशव्याने नेमणुक केली पण ब्रिटिशांच्या वसईच्या तहा प्रमाणे कोणत्याही परसत्तेशि बोलणे किंवा करार करणे हे ब्रिटिश यांच्या शिवाय करुन नये असे नमुत असल्यामुळे एलफिन्स्टन याने यास विरोध केला. ब्रिटिशाचे मराठी साम्राज्या बद्दल असणारे धोरण अहमदनगरच्या किल्यावरून स्पष्ट दिसून लागले कारण दूसरे ब्रिटिश मराठा युध्दात सुरवातीला ब्रिटिशांनी हा किल्ला शिंदेकडून आपल्या ताब्यात घेतला त्याकिल्यावर ब्रिटिशानी युध्दाची साधन सामग्री ठेवण्यासाठी त्याचा वापर केला आणि युध्द संपल्यानंतर तो पेशव्याला परत दिला जावा असे त्यावेळी ठरले होते पण तो किल्ला ब्रिटिशानी परत दिला नाही. त्याच पध्दतीने त्यांनी मराठयाच्या प्रतेक गोष्टीत आडकाटी करण्याचे काम चालु केले होते.

निजाम व पेशवे यांच्यातील वाद हा वसईच्या तहा प्रमाणे ब्रिटिशाच्या मध्यस्थीने लावला जाणार होता. यातच निजामाच्या राज्यात चौथाई वसुलिचा अधिकार हा मराठयाचा होता. खर्डाच्या लढाई नंतर सन 1795 पासून व त्याअधिची काही वसुली थकली म्हणून सन 1805 मध्ये पेशव्याने ती रक्कम मिळण्यासाठी ब्रिटिशांनी प्रयत्न करावे असा सारखा आग्रह करत पण याकडे ब्रिटिशांनी दुर्लक्ष केले होते. पुढे सन 1811 मध्ये ती रक्कम परसपर घेण्याचे पेशव्याने ठरवल्यावर ब्रिटिशांनी पेशव्यावर कराराच्या भंगाचा अरोप करु लागले व त्यानुसार ब्रिटिशानी पेशव्याला समज पाठवून त्यांनी जर चौथाई वसुली साठी फौज पाठवली तर चौथाईचे हक्क संपुष्टात येईल असे ठाम पणे सांगण्यात आले होते. ब्रिटिशांनी केलेली मराठयाची प्रत्येक गोष्टीतील आडवणुक यामुळे मराठ्यांपुढे मोठी समस्या निर्माण झाली हाती. योवळी ब्रिटिशांची सत्ता चांगल्या प्रकारे आपले स्थैर्य मराठी राज्यात प्राप्त केली होती. सन 1811 मध्ये ब्रिटिशाची हिंदूस्थानातील अर्थिक व लष्करी परिस्थिती चांगल्या प्रकारे सुधारली होती.


India in 1812
The Grand Embassy
Capital
Major City
B.E.C lands in 1770 and 1812
Mahratta lands gained 1770-1812
Mahratta lands lost 1770-1812
DOMINION OF THE SHAH
SIKH STATES
NEPAL
BHUTAN
BAHAWALPUR
DOMINIONS OF THE SINDIAN
DELHI
RAJPUTANA
BIKANER
JAISALMER
KOTAH
SIND
KARACHI
OUDH
LUKNOW
BENGAL
CALCUTTA
DOMAINS OF PESHWA
BUNDELKHAND
MAHRATTA CONFEDERACY
ORISSA
BHONSALI BEHAR
DIRECT THE
PUNE
DOMINIONS OF THE NIZAM
HAIDRABAD
CIRCARS
GOA
MYSORE
MALABAR
CARNATIC
TRANVANCORE
DUTCH CEYLON
70°
80°
90°
30°
20°
10°

4.4. त्रिंबकजी डेंगळे पेशवा व मराठेशाहीचा हस्तक -

वसईचा तह, एलल्फिन्स्टन यांचे पुणे दरबारी वकिल म्हणुन झालेली नियुक्ती, त्याचे धोरण, पेशवा यांच्या राज्यात वाढलेले बंड, या सर्व गोष्टीतुन स्वतःची सुटका करुन घेण्याची पेशव्याची धडपड सुरु झाली. मराठयांच्या साम्राज्यात ब्रिटिशांनी केलेला प्रहार, मराठयांची आप-आपसातील भांडणे त्यात ब्रिटिशांनी पाडलेली फुट या सर्व गोष्टीना ब्रिटिश अधिकारी एलफिन्स्टन यांची भेद निती जबाबदार होती. असे ठाम मत पेशवाईत अनेक मंडळीचे झाले होते. त्रिंबकजी डेंगळे हा पेशव्याचा महत्वाचा जासूस हेता. तो पेशव्याला प्रत्येक गोष्टीत मनापासून साथ देत असे. पेशवाईच्या शेवटच्या काळात महत्वाचे काम केले ते त्रिंबकजी डेंगळे या शुर, श्रेष्ठ, धाडसी, हजरजबाबी, कल्पक व कर्ता पुरुष याने त्याला पेशवाईतुन ब्रिटिशाना बाहेर घालून दयावे असे त्याला वाटत होते. पेशवाईच्या गादीची इतकी हलाखी झाली यासाठी ब्रिटिश कारणीभूत आहेत हे त्याचे ठाम मत होते. त्याने पेशव्यास कायम ब्रिटिश विरुध्द टिवचत राहत असे. त्रिंबकजी हा ब्रिटिशांचा मोठया प्रमाणात द्वेष करत ज्या प्रमाणे शिंदे, होळकर, भोसले यांनी मराठेशाही ब्रिटिशांच्या पाशांतुन काढून स्वतंत्र करण्याची जी महत्वकांक्षा धरली होती तीच महत्वकांक्षा त्रिंबकजीच्या मनात होती. त्रिंबकजीच्या मनाचा व्याप शिंदे, होळकर यांच्या इतका मोठा होता. मराठी साम्राज्य टिकविण्यासाठी धडपणारा त्रिंबकजी हा बापू गोखले यांच्या प्रमाणे पेशवाईतील भले बुरे ओळखणारा शेवटचा पुरूष होय. ब्रिटिश विरुध्द फौज जमविण्यास प्रारंभ केला व तिच्या जोरावर पुन्हा ब्रिटिशांशी दोन हात करण्याचे प्रयत्न चालु केले. त्रिंबकजी यांच्याकडे स्वतःचे राज्य नसल्याने त्याचे नाव मराठयाच्या इतिहास मोठे होऊ शकले नाही.[14]

मराठा साम्राज्य ब्रिटिशांच्या जाचात इतके गुरफटून गेले होती की, ते आता पुन्हा आपल्या मुळ पदावर येणे अशक्य होते. त्यातुन पेशवे पदावर बसलेला पेशवा हा इतका भित्रा व नादान आहे. तसेच पेशवा याने आपल्या बरोबर असलेले सर्व मराठा मंडळाचा रोष आढून त्यांची मने दुःखवली होती. त्यातुन ब्रिटिशांना महाराष्ट्राच्या बाहेर हाकलु देणे ही गोष्टी म्हणावी तितकी सोपी राहिली नव्हती याचा कधीच पेशवाने विचार

केलाच नाही. त्रिंबकजीने पेशवा यांच्या मार्फत काही महत्वाची ठाणी आपल्या विश्वासू व्यक्तीच्या ताब्यात देण्याचा उप्रकम सुरु केला त्यासाठी त्याने पेशव्यास सल्ला देऊन सन 1814 मध्ये शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, पटवर्धन या सर्वाच्या दरबारी ब्रिटिश यांच्या विरुध्द मैत्रि करण्यासाठी तसेच सर्वाना एकत्र येण्यासाठी प्रत्यन चालु केले महत्वाचे म्हणजे त्रिंबकजी खरे मराठी साम्राज्याचे हिंतचिंतक होते. त्यांची मिजास जरी नोकराची होती तरी त्यांचे विचार प्रखर राजाच्या पध्दतीचे होते. त्रिंबकजी ज्यापध्दतीने कारवाया करत होता, वागत होता त्यापध्दतीने ब्रिटिशांची पेशव्यांशी धुसपुस बरेच दिवस चालू होती. त्रिंबकजी आपला पुर्ण पणे द्वेष करत आहे हे ब्रिटिशांना चांगल्याच प्रकारे माहित झाले यामुळे पेशवे दरबारातील ब्रिटिश वकिल त्यावर पुर्ण पणे जनर ठेवून होते. त्यांना उघडपणे त्रिंबकजीवर दोषारोप करण्याची त्याची हिम्मत होत नव्हती, पण नुसते दोष ते कसे देणार त्यासाठी पुरावा तरी पाहिजे होता. पुढे लवकर त्यांना ती संधी बडोदयाच्या गायकवाड रुपाणे पुढे आली होती.

उत्तर पेशवाईत कारभारीच सत्ता सांभळत असे. ज्यावेळी पेशवा दु. बाजीरावास कळले की आपण स्वतः फार कर्तबगार नाही आहोत हे स्वतःला समजल्यामूळेच पेशवा यांनी आपला सर्व कारभार त्रिंबकजी याकडे दिला. त्रिंबकजी ते जातीने स्वतः पाहत असे पेशवा यांची त्रिंबजीच्या सर्व गोष्टीना संमती दिली त्रिंबकजीला पेशवाई बदल आदर भाव वाटत असे त्यातुन त्यांचा स्वभाव तापट व कडक होता. पेशवा यांच्या मनात त्यांची छबी एक महत्वाचा जिव्हाळयाचा सल्लागार म्हणजे नर्मसचिव म्हणुनच पेशव्यांच्या मनावर बसलेली होती. पेशवाईतून ब्रिटिशांना हाकलून लावले पाहिजे हे त्याचे ठाम मत होते. पेशवा दु. बाजीराव यांना तो सतत ब्रिटिश विरुधी चेतावणी देत राहत असे. त्रिंबकजीने सर्व मराठा मंडळाला एकत्र करुन गुप्तपणे ब्रिटिशं विरुध्द कारवाई सुरु केली होती. त्यात बापू गोखले, गणपतराव पानसे, चिंतामणराव पटर्वधन, विठ्ठलराव विचुरकर, मोरदिक्षित मराठे, निळकंठराव उर्फ आबांजीपंत पुरंदरे अशा अनेक शूर सरदारांना बरोबर घेऊन मराठयाचे वैभव पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न सुरु केला. त्रिंबकजी यांनी पेशव्यांना दिलेली साध या मुळे पेशवा दु. बाजीराव यांचे डोळे उघडले पण त्यावेळी फार वेळ निघुन

गेली होती. ही सर्व कृत्ये ब्रिटिशांच्या उददेशांच्या आड येत होती म्हणूनच त्यांनी त्रिंबकजीचा काटा दूर करण्याचे ठरविले होते.

4.5 गुजरात प्रांतात ब्रिटिशांनी केलेला हस्तक्षेप व पेशवा भोवती जाळे -

4.5.1. ब्रिटिशाचे गायकवाड घराण्यावर वर्चस्व प्रस्तापित -

पेशवा दु. बाजीराव यांनी 'गोविंदराव गायकवाड' यांना 'बडोदा' (गुजरात) प्रांताचे सरमजांम म्हणुन नियुक्त केली व त्यासाठी त्यांनी पेशव्याला सव्वा कोटी रुपये देणे लागत होता. तसेच तापी नदीच्या दक्षिणेकडील मुलुख, सुरत बंदराच्या जकातीच्या उत्पन्नातील हिस्सा देण्याचे ही गोविंदरावाने कबुली केले पेशव्याच्या हया सर्व मागण्या गोविंदराव यांनी मान्य केल्या. अहमदाबाद या सुभ्याची व्यवस्था पाहण्यासाठी 'आबा शेलकूर' यास नियुक्त केले हा पेशव्याच्या महसुलीचा प्रांत होता.

सन 1797 पर्यंत गोविंदरावाने 78 लाख रुपयांचा भरणा करुन त्यात त्याने 60 लाख रुपयांची सुट मिळवली. यावेळी पेशवानी आजुनही 40 लाख रुपये बाकी असल्याचे सांगितले. म्हणून गोविंदराव यांनी कर्ज फेडण्यासाठी आपले महाल गहाण ठेवले होते. पण ज्यांच्याकडे हे महाल गहाण ठेवले त्यांनीच आपला आधिकार त्या महालांवर सांगुन तेच कुरघोडी करून मालक झाले. त्याच पध्दतीने गोविंदराव यांचे असलेले मांडलिक खंडणी देण्यास तयार होईना. गोविंदराव यांच्या सैन्यात अरबी सैन्याचे वर्चस्व वाढले चाले या सैन्याला पैसा व्यापारी लोक पुरवत असे. गोविंदराव यांच्यावर यावेळी व्यापारी वर्गाचे वर्चस्व चांगलेच वाढले आणि ते पण बंड करून ऊठले यामुळे बडोदयाचे सर्व सुत्रे सरदार, व्यापारी, लष्कर या व्यक्तीच्या हात गेली. 20 सप्टेंबर 1800 मध्ये गोविंदराव मरण पावले त्यांचा मुलगा 'आनंदरावा गायकवाड' गादीवर आले. याच सुमारास गोविंदरावाचा पराक्रमी पण वारस नसलेला पुत्राने 'कान्होजी' यांनी सैन्याला बंडासाठी प्रोसाहन दिले होते. कान्होजीने आनंदरावला नजरकैदेत ठेवुन बडोदयाचा सर्व कारभार आपल्या हाती घेतला. हा प्रकार गायकवाड कुटुंबीयांस पसंत पडला नाही म्हणुन यांनी बाडोदयाचे कारभारी रावजी आपाजी यांच्या मार्फत कान्होजीला पकडण्याचे कारस्थान

रचले व ते सिध्दीस गेले. कान्होजी यास आटक झाल्यावर गोविंदरावाचा आणखी एक मुलगा 'मुकुंदराव' तसेच दामाजी गायकवाड यांचा पुतण्या 'मल्हारराव' यांनी दिवान आनंदराव रावजी विरोधात दंड थोपटले, मल्हाररावास तोंड देणे शक्य नसल्याने रावजीने पेशव्याश कळवले तेव्हा पुण्याच्या दरबारात यावेळी चांगलाच गोंधळ चालू झाला होता. यामुळे गायकवाड घराण्याचा प्रश्न वाढतच गेला होता. गायकवाड यांनी पेशवा यांच्याकडे मदत मागताच त्याने रावजी यास कळवेल कि, ''इकडे भांडणे चालू आहे, तेव्हा गायकवाडास मदत कशी देता येईल? याचा विचार करून तुम्हास वाटेल त्या रीतीने तुमचा बंदोबस्त तुम्ही करून घ्या.'' रावजीने यावेळी दौलतराव शिंदेकडे मदत मागितली पण दौलतराव यावेळी यशवंतरावाशी लढण्यात गुंतल होता. पण या सुमारास गायकवाड यांना मदतीची गरज होती त्यासाठी त्यांना आता ब्रिटिशांन शिवाय कोणताच पर्याय दिसत नव्हता म्हणुन ब्रिटिशाची मदत घेण्याचे ठरवले. यावेळी सन 1802 मध्ये ब्रिटिश सेनापती 'मेजर वॉकर' बडोदयास आला होता.[15] काही कारण नसताना फक्त आपला हेतु डोळया समोर ठेवुन मुंबईच्या गव्हर्नर 'डंकन' याने मेजर वॉकर यास बडोद्याला पाठवले. वॉकर पोचण्याआधिच रावजी व मल्हारराव या दोघांमध्ये भांडणे चालु झाली होती. यावेळी ब्रिटिशांना आशा लागली होती. की, कोणीतरी या दोघातुन आपल्याकडे मदतीची याचना करेल असे वाटू लागले आणि ब्रिटिशाना हवी असलेली संधी सापडली गायकवाड यांच्या प्रांतातुन सुरत तसेच चौयांशी परगण्यांची महसुल वसुलीची आपल्याला संधी मिळेल यांची त्यांनी आशा मनात ठेवून आणि म्हणुन ब्रिटिशांनी गायकवाड आनंदराव रावजी यांना मदत करण्याचे ठरेवले.

ब्रिटिशाना पाहिजे होते तसे घटत चालले होते. आनंदराव यांनी ब्रिटिशाना आपल्या प्रांतात हस्तक्षेप करण्यास कोणत्याच प्रकारे विरोध केली नाही. अंतर्गत भांडणासाठी त्यानी ब्रिटिशाचे पाय धरले म्हणुन तारिख 23 फेब्रुवारी 1802 रोजी मेजर वॉकर गायकवाड यांची फौज सोबत घेऊन मल्हारराव यांच्या बरोबर युध्द चालू केले त्यांच्या बरोबर दोन महिने संघर्ष करुन शेवटी त्यास शरणागती पत्करली लागली. वॉकर ने

मल्हारराव यास नाराज नकरता समाधाना करुन त्याला ‘नडियाद’ या प्रांतात कायमचे स्थायिक केले. वॉकरने आनंदराव रावजी यांची बडोदयात व्यवस्था लावुन दिली. या बदल्यात रावजीने 6 जून 1802 मध्ये आपले सर्व अधिकार ब्रिटिशाच्या स्वाधीन कले व त्यांच्याशी तैनाती फौजेचा तह केला. ब्रिटिश यांच्याशी तह झाल्यावर एकच वर्षभरातच आनंदराव रावजी मरण पावले. याच यादरम्यान पेशवा याने वसईचा तह करुन ब्रिटिशांचा आश्रय घेतला होता. या नुसार पेशवा यास गायकवाड व ब्रिटिश याच्यात झालेला तह मान्य करावा लागला. हळूहळू ब्रिटिशांना आपल्या सोयी नुसार गायकवाड यांच्याशी तह करुन त्यांना पुर्ण पणे आपल्या तालावर नाचवण्यास भाग पाडले. पेशव्यांचा गायकवाड सोबत फारसा सांबंध उरला नव्हता. रावजीने आपल्या स्वार्थाकरता गायकवाड घराण्याची दिवानगी आपल्याकडे वंशपरंपरेने राहिल असा ब्रिटिशांशी करार केला होता त्यावेळी रावजी यांनी दिवानी आपल्या कडे ठेवुन बाकी सर्व आधिकार ब्रिटिशांना देऊन टाकले आणि या पध्दतीने ब्रिटिशांना अमंत्रित करुन घेतले. रावजीचा सन 1803 मध्ये मृत्यु झाल्यावर गायकवाड यांचा दिवान म्हणून रावजीचा पुत्र ‘सीतराम’ याची निवड झाली. पण यावेळी दिवान हे पद नामधारी राहिले सर्व अधिकार ब्रिटिशांच्या हातत गेले यामुळे भविष्यात हे दिवान ब्रिटिशांच्या विरोधात जाणार हे निश्चित होते.

आनंदराव रावजी याला पुत्र नव्हता म्हणुन त्याच्या मृत्युच्या आधी ता. 22 मे 1803 रोजी त्याने ब्रिटिशांच्या संमतीने आपल्या वडील बंधूचा धाकटा पुत्र ‘सीताराम’ यास दत्तक घेतले. रावजीच्या सांगण्यावरुन वॉकरने गायकवाड दरबाराशी ब्रिटिशांकडून बोलण्यासाठी कारभारी म्हणुन गंगाधरशास्त्री यास नियुक्त केले. वॉकर जरी रावजीच्या तंत्राने कारभार पाहत असला तरी सर्व कारभार ब्रिटिशच (वॉकर) करत होते. ‘गोविंदराव गायकवाड’ यांचा मुलगा ‘फत्तेसिंह गायकवाड’ यास जेजुरीच्या खंडोबाची सेवा करण्यासाठी सोडले त्यामुळे तो व त्याची आई जेजुरी येथे राहत होते. यशवंतराव होळकर यांनी गायकवाडयांची मदत ब्रिटिश विरुध्द आपल्याला व्हावी या हेतुन त्याने फत्तेसिंह गायकवाड यास जेजुरीवरुन गुजरातला पाठवले. ब्रिटिशानी फत्तेसिंहास आपल्या पक्षात

सामिल करून घेतले पण दिवान 'सिताराम' यास त्यांना आपल्या पक्षात घेता आले नाही. ब्रिटिशांनी आपल्या मता नुसार गुजरात प्रांतात चालु केलेल्या सुधारणा त्या म्हणजे हिशेब पध्दती, नविन नेमणुका, फौज कमी करणे, जहागिरी खालसा करणे इ. कामे करू लागले होते. दिवान सिताराम यास हया सर्व गोष्टी पसंत नव्हत्या त्याला ब्रिटिशांचा राग येऊ लागला होता. ब्रिटिशानी दिवान सिताराम यास दिवानी वरून काढून टाकले व 'बाबाजी अप्पाजी' या आपल्या मर्जितील व्यक्तीची नेमनुक केली. पण पुढे लवकरच सन 1810 मध्ये त्याचा मृत्यु झाला यामुळे पुढे त्याचा मुलगा 'विठ्ठलराव भाऊ 'यास नेमले गेले. पण त्याचीही कर्तबगारी काही चालेना व शेवटी त्याला दोन वर्षेतच काढून गंगाधर शास्त्री यांची साठ हजार रूपये तनखा देऊन नेमणुक केली गेली.[16]

4.5.2. अहमदाबाद प्रांताची धकीत बाकी व गंगाधरशास्त्री यांचे पुण्यात आगमन -

बडोदा प्रांतात योवेळी गायकवाड घराण्यात दोन पक्ष निर्माण झाले. सन 1812 मध्ये गायकवाड घराण्यात फाटाफुट होऊन दोन गटात विभागणी झाली यात एक पक्ष 'ब्रिटिशांना' अनुकूल व दुसरा 'आनंदराव गायकवाड' याचा यात आनंदराव व पेशवे दोघांच्याही मनात एकमेकांन विषयी स्नेहभाव होता. याच दरम्यान अहमदाबाद प्रांताच्या कराराची मुदत सन 1805 मध्ये संपली होती. ही मुदत वाढवून परत गायकवाड यांना देणे, की नाही देणे हे पेशव्यावर अवलंबून होते. यामुळे बडोदावर पुन्हा पेशव्याचा अधिकार स्थापन करता येणार असे पेशव्याच्या विचार होते. यावेळी गायकवाड यांच्याकडे मागील काही वर्षाची धकीत बाकी होती ती सर्व मिळून साधरण दोन कोटी 61 लाख रुपये पेशवा यांना येणे बाकी होती. मुदत संपण्याअधिच सन 1804 मध्ये वार्षिक साडेचार लाख पुणे दरबारी भरणा करण्याच्या बोलीवर तसेच दहा वर्षासाठी पेशवा यांनी अहमदाबाद चा अधिकार 'भगवंतराव' यांच्या नावाने करुन दिला. शेवटी या कराराची मुदत सन 1814 मध्ये संपली होती.[17] म्हणून पुढे अहमदाबाद प्रांत पेशव्याला आपल्याकडे घेण्याचा निश्चिय केला होता. दुसरा मुद्दा म्हणजे आनंदराव गायवकवाड यांनी पेशवा यांना बक्षिश, नजराने यांची रक्कम 56 लाख रूपये देणे होते. ही बाकी लवकर मिळण्यासाठी पेशवा तगादा

लावला होता.[18] ब्रिटिशानी अहमदाबाद प्रांत गायकवाड घराण्याकडे असावा असा जोर लावला कारण याचा फायदा ब्रिटिशांनाच होईल यादुष्टीने त्यांनी या प्रांताच्या भाडेपट्टीचे नवीनीकरण हे गायकवाड घराण्यालाच दयावे असे धोरण मनात बंधाले होते. ब्रिटिशांचा यावेळचा हेतु म्हणजे, या प्रांतामुळे गायकवाड यांच्याकडून मोठा अर्थिक लाभ खया आर्धाने होणार होता तसेच पेशवा यांचा गायकवाड याच्याशी संबंध येणार नव्हता. जर हा प्रांत पेशव्याकडे गेला असता तर गायकवाड यांच्याशी संबंध साधने पेशवा यांना सुलभ झाले असते. गायकवाड व पेशवे यांच्यात पहिल्या करारा प्रमाणे पुणे दरबारात तीन कोटी रुपये देणे गायकवाड यांचे बाकी होते. या देण्याघेणेच्या बोलणीसाठी व कराराची नुतनीकरण करण्यासाठी ब्रिटिशानच्या दृष्टीने गायकवाड यांच्याकडून 'गंगाधरशास्त्री पटवर्धन' या मुत्सद्दीस पेशवेच्या दरबारी जाण्याची परवाणगी दिली. गंगाधरशास्त्री यानी बडोदयातून दूर जावा असे वाटत असलेल्या बडोदा सरकारच्या ब्रिटिश विरोधी गटानेही या योजनेला पाठिंबा दिला.

शास्त्री हा ब्रिटिशाना अनुकूल असल्या कारणाने त्यांला पुणे दरबारात पाठवण्या मागे ब्रिटिश होते. तसेच ब्रिटिशानी गायकवाड तर्फे पेशवाकडून शास्त्रीच्या जिवीतास धोखा होणार नाही याची हमी घेतली होती. शास्त्री पुण्यात आले ते सन फेब्रुवारी 1814 मध्ये हा गृहस्त मुत्सद्दी, हुशार व बडोदयाचा दिवाण पण कारकूनी फंडात वाढलेला. अशा मनुष्य वकिल या नात्याने बरोबरीचा म्हणुन बोलणी करण्यास आलेला हे पेशवा यास फारच जड गेले. कारण स्वतः एलफिन्स्टन म्हणतो - ''गंगाधरशास्त्री हा मोठा धूर्त व बुध्दिवान आहे. त्याने बडोदें संस्थानची व्यवस्था उत्तम ठेविली आहे. पुण्यात तो मोठा खर्च करुन मोठा तोयात रहातो व आपली स्वारी अशा पध्दतीने काढतो की, सर्व शहर त्याच्याकडे पहात रहाते तो जुन्या पध्दतीचा विद्धान शास्त्री असला तरी थेट ब्रिटिश असल्याप्रमाणे राहण्याचा प्रयत्न करितो, तुरतुर चालतो, वाटेल त्याला उलट उत्तर देतो. पेशवा व त्याचे कारभारी यांना मूर्ख म्हणतो, बोलताना अधुन मधुन इंग्रजी शब्द वापरत असे.'' याकारणाने त्याची पुणे दरबारी प्रतिष्ठा फारच कमी झाली. या दरम्यान शास्त्री यांनी पुण्यात चौदा महिने मुक्काम केला. हिशेब देता घेता व बोलणे चालणे होता-होता एक

वर्ष निघुन गेली. या चौदा महिण्याच्या काळात शास्त्रीचे मन परिवर्तन होण्यास सुरवात झाली. याच सुमारास पेशवा दु. बाजीराव यांनी आपली मेहुनी शास्त्रीच्या मुलास देण्याचे ठरले म्हणुन यामुळे तो पेशव्याच्या चांगलाच जवळ आला. पेशवा यास शास्त्री यांच्याशी बोलण्यासाठी आपल्या जवळ आसपास असलेले ब्रिटिश सत्तेचे नोकर वर्ग नको होते यामुळे पेशवा यांनी आपले धोरण हळूहळू पुढे सरकवले होते.[19]

4.5.3. गंगाधरशास्त्री यांच्या खुनाचे राजकारण -

ब्रिटिश या सुमारास एका मोठया संकट पुढे येऊन उभे होते ते म्हणजे नेपाळ युध्द या युध्दात ब्रिटिश गुंतले असल्या मुळे त्यांनी नाईलाजाने अहमदाबाद सुभा मराठयांच्या स्वाधीन केला. पेशव्याने अहमदाबाद येथील कारभार गायकवाड यांच्याकडून काढून घेतला व अहमदाबाद येथील व्यवस्था पाहण्यासाठी आपल्या कडील ‘त्रिंबकजी डेंगळे’ यांची नेमणुक केली. पेशवा यांचे यावेळी आर्थिक हाल चांगलेच चालु होते. यामुळे या आर्थिक संकटातुन सुटण्यासाठी त्यांना अहमदाबादच्या थकित रक्कम पेशव्यांनसाठी महत्वाची होती. गंगाधरशास्त्री हा ब्रिटिशांच्या सल्यानेच वागत ही गोष्ट पेशवांच्या लक्षात आल्यावर त्यानी गायकवाड दरबारी असणारी व्यक्ती जी पेशवा यांना अनुकूल असी होती ती म्हणजे ‘भगवंतराव गायकवाड’ यांचे पेशवा दरबारत सन 1815 मध्ये मध्यस्थिसाठी आले असता त्यांचे स्वागत करण्यात आले यामुळे एलफिन्स्टन चांगलाच संतापला होता. ब्रिटिशानी गायकवाड प्रश्नी शास्त्री सोडून दुसरे कोणासीही बोलणी करता येणार नाही असे पेशवा यास खडसाउन सांगितले. शास्त्री यांना आपल्या गटात सामिल करण्याच्या प्रयत्नात पेशवा यांना यश आले होते. त्या बदल्यात पेशवांनी शास्त्रीस पेशव्याचे मंत्रिपद देऊ केले हाते. हे सर्व ब्रिटिश वकिल एलफिन्स्ट यास चांगलेच झोंबले यामुळे पुढे शास्त्री व ब्रिटिश यांचे संबंध चांगल्या पैकी बिगडले आणि त्याच वेळी पेशवे 20 जूलै 1815 मध्ये एकादशी करता पंढरपूरला विठ्ठल दर्शनाला गेले असता पेशवा यांच्या बरोबर यावेळी गंगाधरशास्त्री बरोबर होते आणि याच दिवसी देवळाभोवतीच्या एका बोळात शास्त्री यांचा खुन झाला.[20]

शास्त्रीचे समाधान गायकवाड यांचा पक्ष खरा ठरवून होणारे नव्हते. त्याची पुण्यात पेशवेच्या दरबारी कारभारी होण्याची इच्छा होती. शास्त्रीच्या इच्छे प्रमाणे पेशवांनी त्यांला आपल्या गटात घेतले खरे पण त्याचा खुन झाला यामुळे पुढे या प्रकरणाला वेगळेच वळण लागले या सर्वाचा फायदा उठवण्याचा प्रयत्न आता ब्रिटिशांनी घेण्याचे ठरवले होते. पेशवे व त्रिंबकजी डेंगळे यांनी ब्रिटिशांना आव्हान देण्यासाठी शास्त्री यांचा खुन घडवून आनला असे ब्रिटिशांचे म्हणने झाले. आपल्या मध्यस्थीने आलेल्या वकिलाचा खून झाला या गोष्टीचा ब्रिटिशांना चांगलाच राग आल्याचे त्यानी दाखवले खरे पण त्यांचा हेतु त्रिंबकजी यास आपल्या मार्गातुन दुर करण्याचा होता. शास्त्री यांच्या खुनाचा तपास करण्याची जबाबदारी त्रिंबकजी यांच्याकडे होती. शास्त्री यांचा पाठीराखा 'बापू मैराळ' ही व्यक्ती शास्त्रीची कारकुन याने खुन झाल्या नंतर त्रिंबकजी यांची भेट घेऊन म्हणाले, ''आपण शास्त्री यांचे स्नेही व पेशव्यांचे कारभारी, तेव्हा आपण खुनाचा शोध लावण्याची खटपट करावी.'' यावर त्रिंबकजी म्हणाले ''मी ते करतोच आहे. पण नेमके अरोपी कोणाला म्हणावे याचा तपास लागत नाही.'' यावर कारकून म्हणले - ''शास्त्री यांचे शत्रू कोण आहे हे आपणास माहितच ते कर्नाटकचे लोक होते असे वाटतें.'' त्रिंबकजी म्हणाले '' होणारे टळत नसते तो प्ररभू सीता-राम एक आहे. गायकवाड पैकी 'कान्होजी गायकवाड' तुम्ही कर्नाटकांत ठेवला आहे. पण अमक्याचा म्हणून नाव कसे घ्यावे. तथापि मी शक्य ती खटपट करितो.'' हे सर्व बापू मैराळ याची हकीकत खासगी रीतीने एलफिन्स्टन यास लिहून पाठवली. यात कोठेही त्रिंबकजीने हा खून करविला असे नमुत नव्हते. उलट शास्त्री यांच्या पक्षाच्या काहि लोकांचा बडोदयाच्या 'बंडोजी व भगवंतराव' याच्यावर संशय जात होता. एलफिन्स्टन यास वाटत होत की पंढरपुरात या खुनाची चौकशी होयला पाहिजे होती तशी झाली नाही म्हणून त्रिंबकजीचा हात या खुनात आहे असे एलफिन्स्टन साहेबाना वाटले होते. पेशवा यांच्या मर्जितील व्यक्तीनकडून शास्त्री यांचा खुन झाला असावा असे एलफिन्स्टन यांनी सांगितले होते व त्यांनी आपला संशय त्रिंबकजी यांच्यावर घेऊन पेशवा यांना त्यांला आमच्या स्वाधीन करावे नाही तर आपल्यावर मोठे

संकट कोसळेल या खुनाचा आरोप आपल्यावर येऊ शकतो या यामुळे पेशवाने या गोष्टीला घाबरून पेशवा यांनी त्रिंबकजी यास ब्रिटिशांच्या स्वाधीन केले. कारण, नुसते त्रिंबकजी ब्रिटिशांचा द्वेष करतो हया आरोपावर त्याला ब्रिटिशांच्या स्वाधीन केले नसते. पण खुनाच्या अरोपा हा राजकीय प्रतिपक्षावर त्याचा फायदा करून घेण्याचे हुशार मुत्सद्दी कधीहि सोडित नाहित. त्रिंबकजी यांवर खुनाचा ठपका व त्यांस खुनी ठरवण्याचे काम ब्रिटिशांनी येथे योग्य पध्दतीने केले.[21]

त्रिंबकजी विषय एलफिन्स्टन म्हणतात - ''गेले कित्येक महिने त्रिंबकजीचा जो राज्यकारभार चालला आहे तो अस्वस्थ करणारा आहे. माझी तर पक्की खात्री झाली आहे की, बारभाईच्या कल्पनेने त्रिंबकजी यांने पुनरुज्जिवन करण्यास सुरवात केली आहे. आम्ही तिकडे दुर्लक्ष केलं तर मोठया कष्टांने मिळवलेले हिंदुस्थानचे हे राज्य टिकणार नाही आणि म्हणूनच मराठयांशी युध्द पुकारण्यापूर्वी त्रिंबकजीला कारभारी पदावरून खाली ओढले पाहिजे, पण त्रिंबकजीचा कुठल्या तरी कटाशी संबंध जोडल्याखेरीज ही संधी कशी मिळणार याची मला चिंता वाटते.'' शास्त्री हा दरबारातील वकील असल्यामुळे त्याच्या खुनास राजकीय महत्व आले होते. यावेळी पेशवा हे शास्त्री बरोबर पंढरपुरातच होते तसेच पेशवा यांचा हस्तक त्रिंबकजी हा पण पंढरपुरातच होता. खुनाच्या वेळी शास्त्री विठोबाच्या मंदीरात पेशवा व त्रिंबकजी यांच्या आग्रहाच्या बोलावण्या मुळे गेले होते. खरे म्हणजे, त्रिंबकजी हा ब्रिटिशांचा द्वेष करी, व शास्त्री हा ब्रिटिशाचा हस्तक मुत्सद्दी होता. या खुनाचा आरोप प्रत्यक्ष पेशवा व त्रिंबकजी यांच्यावर जाणे स्वाभाविक होते. खरे तर पेशवा यांना ब्रिटिशानी या खुनातुन बाजुला सावरण्याचे काम केले. 'त्रिंबकजीला आमच्या स्वाधीन करण्याची बोलणी लावली त्यास हवाली नाही केले तर युध्दाची तयारी करावी असे एलफिन्स्टन यांनी सांगितले यावेळी ब्रिटिश कंपनीने आपले सैन्य पुण्याच्या भोवती जमा करण्यास सुरवात केली हाती.'[22]

4.5.4. त्रिंबकजीचे ब्रिटिशांच्या ताब्यातुन पलायन -

एलफिन्स्टन यांनी संयम राखून पेशवा दु. बाजीरावास म्हणतात की तुमच्या विषयी आपल्याला काडीमात्र शंका नसल्याचा निर्वाळा दिला व खून त्रिंबजीनेच करविला

असे स्पष्ट विधान केले. याच वेळी त्रिंबजी यास आपल्या स्वाधीन करा असे एलफिन्स्टन याने पेशवा जवळ एक सारखा तगादा लाविला पण पेशवाने त्यास ब्रिटिशांच्या ताब्यात देण्यास टाळाटाळ करू लागला. पण मोठया कष्टाने त्रिंबकजी याला ब्रिटिशांच्या स्वाधीन केले. त्रिंबकजी पेशवांचा सर्वात जास्त भरंवसा असलेला जवळजी व्यक्ती होय. यावेळेस एल्फिन्स्टनने त्रिंबकजीस ताबडतोब अटक करा, नाही तर चोवीस तासांच्या आत ब्रिटिश फौजा पुण्यावर चालून येतील असा कडक शब्दात निरोप पेशव्यांना पाठविला. पण त्रिंबकजी निर्दोष आहे ही खात्री पेशवा यांना होती पण ब्रिटिशांच्या लष्करी दडपणामुळे त्रिंबकजीस पकडून एल्फिन्स्टनच्या हावाली केले. 25 सप्टेंबर 1815 मध्ये ब्रिटिशांनी त्रिंबकजीस ठाणे येथील किल्ल्यात मोठया बंदोबस्तात ठेवण्यात आले होते.[23]

ब्रिटिशांच्या तुरंगात त्रिंबकजी वर्षभर अटकेत राहिला पण लगवकरच त्यांने 12 सष्टेंबर 1816 मध्ये मोठया युक्तीने किल्याच्या तबेल्याच्या भिंतीस मोठे छिद्रे पाडून तेथून तो निसटला. त्रिंबकराव व पेशवा यांच्यात गुप्त भेटी गाठी होत दोघांमध्ये आता ब्रिटिशांन विषयी राग रोष वाढत चाला आणि यावेळी गुप्त पणे पेशवा त्यास मदत करणे तसेच दोघानी मिळुन लष्कर भरती सूरू केली त्यासाठी पेशवा यानी त्यास पैसा पुरवण्यास सुरवात केली. असे असताना पेशवाने यावेळी ब्रिटिशांशी नम्रपणे वागण्याचे धोरण ठेवून एकीकडे पेशवा व त्रिंबकजी यांच्यात अंतःस्थपने ब्रिटिश विरुधी कारस्थाने करण्यास सुरवात झाली होती. त्याच दरम्यान या दोघांनमधील संवाद चालु असलेला पत्रव्यवहार यांची बादमी ब्रिटिशांच्या हाती लागली. त्रिंबकजीने मराठी राज्याची लष्करी ताकद वाढवण्यासाठी मोठी लष्कर भरती करण्याचे चालु केले होते. तसेच शस्त्रसाठे साठवण्यास सुरवात केली. यामुळे ब्रिटिशांचा असलेला त्रिंबकजी व पेशवा यांच्या विरुध्द संशयन अधिकच निर्माण होत गेला. त्रिंबकजीने पुण्याच्या काही भागात ब्रिटिशांशी लढण्यासाठी पेंढायाचे मोठे जाळे निर्माण केले होती. त्यांच्या जोरावर त्रिंबकजी ब्रिटिशाच्या विरुध्द अनेक कारस्थान करत असे. यात महत्वाचे म्हणजे पेशवा पेंढायान विषयी कोणत्याच प्रकारे कारवाई करत नाही हे एलफिन्स्ट यांच्या चांगले लक्षात आले होते. त्रिंबकजी विषयी पेशवा किंवा इतर कोणीही एक शब्दही बोलत नसे. पेशव्यावर शस्त्र उगारल्या शिवास तो

तोड उगारणार नाही असे मत एलफिन्स्ट यांचे झाले होते.[24]

4.6. पुणे कराराने हिंदूस्थानवर ब्रिटिशांचे वर्चस्व वाढले -

त्रिंबकजी डेंगळे व पेंढारी या दोघांनी मिळून आपल्याच मुलूखात धुमाकूळ घालण्यास सुरवात केली. ही सर्व बातमी एल्फिन्स्टन यांच्या लक्षात येताच त्यांनी पेशवा यास दरडावून सर्व प्रकार थांबवण्यास सांगितले होते. पेशव्याला आता कोठेतरी आळाघालण्यासाठी 7 एप्रिल 1817 मध्ये गव्हर्नर जनरलने एलफिन्स्टनला पेशवा व ब्रिटिश यांतील सलोखा संपल्याचे कळवले आणि तोच लगेच नविन तहाचा मसुदा पेशवा यांना देण्यात आला. पेशवा यांना ब्रिटिशांचा धाक बसवण्यासाठी 'सन 9 मे 1817 मध्ये एलफिन्स्टन व पेशवा यांची शनिवारवाडयात बैठक झाली. त्यावेही एलफिन्स्टनने पेशव्यास तुमच्या विरुध्द एकदम लढाई का पुकारु नये असे विचारले असता त्यावर पेशवायांनी तुमच्याखेरीज मला कोणाचाच आधार नाही. असे भासून ब्रिटिशांपुढे लोटांगण घेतले.' त्रिंबकजी बद्दल जामिन म्हणून रायगड, पुरंदर, सिंहगड हे किल्ले ब्रिटिशांनी पेशवा यांच्याकडून ताब्यात घेतले. 13 जून 1817 मध्ये पेशवा व एल्फिस्टन यांच्यात पुण्यात एक तह झाला. या तहा नुसार त्रिंबकजी डेंगळे हा गंगाधरशास्त्रीचा खुनी आहे असे जाहीर करुन त्यास एक महिण्याच्या आत ब्रिटिशांच्या हवाली करावे असे पेशव्यांना सांगितले.[25]

या करारा मुळे वाईट परिणाम झाला तो म्हणजे पेशवा दु. बाजीराव यांच्या अधिकाराव या करारा मुळे पेशवा यांना मराठा सरदारांवरील असलेले सर्व अधिकार सोडावे लागले. तसेच पेशवा यांचे महाराष्ट्रा बाहेर असलेल्या चौतीस लाख रुपयेचा वसुली मुलखावर पाणी सोडावे लागले. महाराष्ट्रा बाहेरील सर्व प्रदेशाचा अधिकर पेशव्ययाला सोड्डुन देवा लागला. पेशवा यांनी कोणत्याही मराठी जहागिरदार, सरमजांम, यांच्याकडे आपला वकिल ठेवण्यास साफ मनाई करण्यात आली. पेशाने तैनाती फोजेची वाढ करावी व त्याच्या खर्चासाठी प्रदेश तोडून दयावा. ब्रिटिशांनी पेशवा दुसरा बाजीराव यांच्या तहावर सह्या घेऊन त्यांचे अर्थात मराठी राज्याच्या एका पंतप्रधान पदावर असलेल्या व्यक्तीचे सर्व अधिकर मोडीस आणले या प्रमाणे पेशव्यास पुर्ण पणे ब्रिटिशानी जेरीस आनुन सोडले. या

तहाने पेशवा यांचे कंबरडे मोडून टाकण्यात आले यामुळे मराठा संघ पुर्ण पणे मोडीत निघाला. या तहाने वास्तविक पेशवा यांचे असलेले मराठेशाहीतील पुढारीपण जाऊन तो केवळ एक लहानसा संस्थानिक बनला. 'याच वेळी याच तहाने पेशवाचे पेशवेपण व मराठी साम्राज्या पुर्ण पणे लयास गेले.' असे मानण्यास हरकत नाही या वेळी पेशवा यास ब्रिटिश विरुध्द युध्द करण्याखेरीच कोणताच पर्याय उरला नव्हता. यानंतर मराठी सामाज्यात उलथा-पालथ होणार हे नक्की होते. आणि तसेच घडले पेशवा यावेळी पुण्यातुन निघाला तो प्रथम पंढरपुरास व नंतर अधिक श्रावणमासाचे निमित्ताने माहुलीस छत्रपती प्रतापसिंह याकडे जाऊन राहिला. पुण्याचा करार म्हणजे ब्रिटिशांनी मराठी साम्राज्य संपण्याच्या दुष्टीने रचलेला सापळाच होता. त्यात ते पुर्ण पणे यशस्वी झाले यानुसार त्यांनी पेशवायाश एक नामधारी म्हणून तसेच एक संस्थान निर्माण करुन त्याची सोय राहिल ऐवढेच ठेवले. यावेळी पेशवा यांच्या हातात कोणतीच गोष्ट राहिली नव्हती आणि आता या करारास विरोध करणे मोठे कठीण होत सर्व परिस्थिती हातातुन निघुन गेली कारण आता वर्षऋतू जवळ आला होता. या मुळे सैन्य व सरदारा यांच्यात सहकार्य व समन्वय साधने कठीण जाणार होते. त्यात ब्रिटिश लष्करी अधिकारी 'जर्नर स्मिथ' हा पुण्यानजीक आपले सैन्य घेऊन उभाज असल्या मुळे पेशवा दु. बाजीराव यांचे काहीच चालले नाही.

4.7. पेंढारी ब्रिटिश युध्द व शिंदे, होळकर, भोसले यांना बसलेला शह -

ज्या-ज्या वेळी मराठयांचे एखांदे युध्द होते त्या वेळी त्या युध्दात पेंढायांची एखादी तुकडी भारतीय सत्ताधीशांकडे असे, एखादा प्रदेश जिंकला की ही तुकडी लूट करण्याचे काम करत असे. ब्रिटिशांच्या तैनाती फौजे मुळे पेंढारी यांच्यावर मोठया प्रमाणात बेकारीची वेळ आली होती. यामुळे त्यांनी संपुर्ण देशभर लुटमार करण्यास सुरवात केली यामुळे नागरीक पुर्ण पणे त्रस्त झाले आणि त्याच वेळी ब्रिटिशांनी आपला डाव साधण्याचा विचार केला. पेशव्याचे राज्य जिंकण्याच्या हेतू मनात ठेवून त्यांनी पेंढायांच्या बंदोबस्ताच्या नावाखाली ब्रिटिशांनी पेंढारी विरोधी कारवाईसाठी हिंदुस्थानातील अनेक संस्थानाची मदत घेऊन पेंढायांचा बंदोबस्त करण्याचे ठेरविले होते. मराठयांच्या युध्दा काळात पेंढारी हे

मराठ्यांना मोठया प्रमाणात मदत करत असत याचा परिणाम म्हणजे मराठयांना लढण्यासाठी मोठी फौज मिळत असे. पुण्याच्या आसपास पेंढारी म्हणुन ज्या स्वारांच्या टोळया फिरतात त्या वास्तविक त्रिंबकजी डेंगळे यांच्या पदरच्या स्वारांच्या टोळया आहेत असे ब्रिटिश म्हणत असे. यावेळी ब्रिटिशांना एका दगडात दोन पक्षी मारायचे होते एक म्हणजे मराठी साम्राज्य ते त्यांना आपल्या ताब्यात घेयाचे होते आणि दुसरे म्हणजे पेंढायांचा कायमचा बंदोबस्त करायचा होता. सन 1817 मध्ये पेंढायांशी ब्रिटिशांचे युध्द सुरु झाले पण पेंढायांची युध्द करण्याची पध्दत एक सुसाट वाया प्रमाणे म्हणजेच ते कधीच एका ठिकाणी थांबून युध्द करत नव्हते. सहसा लढाईसाठी उभे राहात नसे, ते दंगेधोपे करुन त्रास देते. या गनिमी काव्याच्या पध्दतीस तोंड दयाचे झाले तर त्यांना चारही बाजुनी कोडून मन त्याच्याशी युध्द करणे हाच एक पर्याय महत्वाचा असे. शेवटी ब्रिटिश सेनापति 'माल्कम' यास हैदराबादवरुन पुण्यास बोलावले व पेंढायाचा बांदोबस्त करण्याची कामगिरी त्याच्याकडे दिली. तसेच ग. ज. लॉर्ड हेस्टिंग यांनी पेशवा यांच्या दरबारीतील गोंधळ, पेशवा यांचे चालू असलेले कारस्थान सर्वाची जबाबदारी माल्कमच्याच गळयात टाकली होती. पेशवाने आधिच पुण्यात तह करुन 'पंढरपूर' वरुन 'माहूली' येथे निघुन गेला ही पेशवा दु. बाजीरावा यांचे दरवर्षिचे देवदर्शन होते पण असे आसलेतरी तो लढाईच्या दृष्टीने बाहेर पडला होता. योवळी माल्कम पेशवा यास भेटण्यासाठी 'माहूली' येथे आला होता.[26]

माल्कम याच्या भेटीसाठी जाण्याचा उद्देश महत्वाचा हेता कारण, पेशवाच्या हालचालीवर नजर ठेवणे व त्याचे वागणे बोलणे यांची चाचपणी करण्याचा उद्‌देश दिसत होता. तसेच पेशव्याच्या मनात काय चाले याची तो खबरदारी घेत होता. या भेटीमगील आणखिन एक उद्‌देश म्हणजे पेंढायां बरोबर युध्दासाठी ब्रिटिशांना मदत करण्यार की नाही, पेशवा पेढायांशी युध्दाची तयारी करतोय की नाही, तसेच पेशवा ब्रिटिश विरुध्द काय कारवाई करणार हे पाहण्यासाठी खास करुन माल्कम पेशव्याला भेटण्याच्या बहाण्याने गेला होता. उत्तरेकडील मोठया प्रमाणात गोंधळाची स्थिती निर्माण झाली पेंढायांच्या मोहीमेत ग.

ज. लॉर्ड हेस्टिंग कलकता सोडून इटाव्यात आला त्यावेळी उत्तरेत भयंकर परिस्थिती निर्माण झाली. दुसया मराठ ब्रिटिश युध्दात पेशव्याने ब्रिटिशांना दिलेला प्रदेश बुंदेलखंड येथे ब्रिटिशांनी आपली मोठी फौज आणली होती. गव्हर्नर जनरलच्या बुंदेलखंडातील उपस्थिती मुळे मोठी राजकीय हालचालीना वेगल आला पुढे उलथापाथीचे खेळ सुरु झाल्याने ब्रिटिशाचे वर्चस्व निर्माण होण्यास सुरवात झाली.

गव्हर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंग यांने पेंढायांच्या बंदोबस्तसाठी दौलतराव शिंदेना ब्रिटिश सैन्याची मदत करण्याची ताकीद देण्यात आली. तसेच ब्रिटिशांनी पेंढारी यांच्या विरुध्द मोहीमेच्या नावाखाली शिंदे, हे पेशव्यांना मदत करण्याचा जास्त संभव होता असे जाणून ब्रिटिशांनी आपल्या फौजा शिंदे यांच्या मुलखाकडे रवाना केल्या तेव्हां ब्रिटिशांनी शिंदेशी 5 नोव्हेंबर 1817 मध्ये तह करून ब्रिटिशानी शिंदेचे बरेच सैन्य पेढा-यांसी युध्दासाठी मदतीला घेतले. तसेच असे कबूल करुन घेतले की, 'मी आपल्या फौजा तुम्ही सांगाल त्या पध्दतीने छावण्या करून ठेवील, व तुमच्या आदेशा शिवाय त्या तेथुन हलविणार नाही. तसेच पेंढारी किंवा कोणत्याही संस्थानिकांशी ब्रिटिशांचे युध्द सुरु असतां आपल्या मुलखांत ब्रिटिशांच्या सैन्यास काही प्रतिबंध करणार नाही. याकरीता शिंदे यांच्याकडुन जमानत म्हणुन ब्रिटिशांनी 'अशीरगड किल्ला' व 'रजपूत संस्थानिक' यांकडून येणारी खंडणी तीन वर्षेसाठी दिली होती.' या पध्दतीने त्यांनी पेशवा यांच्या चारही बाजूनी मोठे संकट उभे करून त्यांचा गळा आवळण्याचे काम केले.

सन 27 ऑक्टोबर 1811 साली 'यशवंतराव होळकर'यांचा मृत्यु झाला पण पुढील काळात होळकर घराण्यात मोठा गोंधळ सुरु झाला त्याच्या लष्करात फाटाफुट झाली यात महत्वाचे म्हणजे यशवंतराव यांची पत्नीने 'तुळसाबाई' यांनी आपल्या सवतीचा मुलगा मल्हारराव यांच्या नावे कारभार स्वतः पाहण्यास सुरवात केली. यशवंतराव यांच्या मृत्यु मुळे ब्रिटिशानी होळकर घराण्याकडे आपले पावली उचलण्यास सुरवात केली पण यावेळी होळकर यांनी आपले ब्रिटिशांच्या युध्दात गेलेले प्रदेश मिळवण्यासाठी तुळसाबाईनी प्रयत्न सुरु केले म्हणजेच होळरकरांनी ब्रिटिश विरोधी कारवाया सुरु केल्या होत्या. त्यामुळे

ब्रिटिशांनी आपल्या कडिल आधिकारी ‘माल्कम’ आणि ‘हिस्लॉप’ यांनी होळकर घराण्याचा बंदोबस्त करण्यासाठी मोठा अटापिटा केला. त्यांनी होळकर सरदारांना व रोहिले अफगण अमीरखान या महत्वाच्या होळकरांच्या सहकायांना फितवण्याचा उदयोग सुरु केले ब्रिटिशांचा उद्‌देश म्हणजे होळकराना शिंदे यांच्या प्रमाणे आपल्या पक्षात आण्याचा व तह करण्याचा त्यांचा उद्देश होता. यावेळी तुळसाबाईने एकीकडे ब्रिटिशांशी तहाची बोलणी चालवत महित्पुर याठिकाणी क्षिप्रा नदीकाठी सन 1817 मध्ये तळ ठोकला ब्रिटिशानी प्रतेक बाजूनी होळकरांची दक्षिणे कडील आगेकूच थांबवायची होती. त्यासाठी प्रथम माल्कमने तुळसाबईकडे शिंदेनी ज्या पध्दतीने तह केला त्या पध्दतीने तहाच्या अटी पाठवल्या त्यात ब्रिटिशांचे संरक्षण आपण स्वीकारावे असा तगादा होता. पण तुळसाबईने प्रखर विरोध दर्शवून पुढे ब्रिटिशानी पेंढारी सरदार ‘गफुरखान’ यांच्या मार्फत ता. 20 डिसेंबर 1817 रोजी रात्री तुळसाबाईचा खून केला गेला.

माल्कम व हिस्लॉप यानी होळकराच्या सैन्याना शरण येण्यासाठी किंवा युध्दासाठी तयार राहवे असा निरोप देण्यात आला. यावेळी होळकर सैन्याचे नेतृत्व बारा वर्षाचा ‘मल्हारराव’ व त्याचा चुलतभाऊ ‘हरीराव’ करत होते. या दोघानी व निष्ठावंत सरदारानी महित्पूर येथे ब्रिटिशांशी निकराचा लढा दिला पण या लढाईत ब्रिटिशांचा विजय झाला. यावेळी अमीरखान याने यशवंतरावाच्या पत्नी ‘केसरबाई’ यांना ब्रिटिशांशी तह करण्याचा दबाव आणला होता. होळकरांचा महत्वाचा युध्दाचा आधार अमिरखान हाच होता. पण तोच पुर्ण खचला होता यामुळे होळकर यांच्या काही सरदारांनी केसरबाईला तह करण्याचा सल्ला दिला. शेवटी ‘6 जानेवारी 1818 रोजी मंदसोर येथे केसरबाईने व माल्कम यांच्यात तैनाती फौजेचा तह झाला.’ या तहाने एक प्रकारे होळकरांनी पुर्ण पणे शरणागती पत्करली पण होळकरांचे संकट अजूनही पुर्ण पणे कमी झालेले नव्हते पेंढारी सरदार सीतू हा होळकरांशी संपर्कत होता. संधी मिळताच ब्रिटिशाच्या फौजेवर चढाई करण्याच्या बेतात होते. याच वेळी माल्कम याने चांगलाच डाव साधला होता तो म्हणजे अमीरखानला फोडण्यासाठी प्रयत्न चालु केले. अमीरखान हा सर्व पेंढारी सरदारांत बराच

सामर्थ्यवान व कुशल सेनानी होता. शेवट महत्वाची गोष्ट घडली आणि ती म्हणजे यावेळी अमीरखान माल्कमला अनुकूल झाला. मल्कन व अमिरखान यांच्यात 16 डिंसेंबर 1817 मध्ये गुप्त तह झाला यानुसार अमिरखान यास स्वंतत्र संस्थान देण्यात आले.[27] यामुळे पुढे भविष्यात पेंढारी यांचे ब्रिटिशांपुढे फार काळ निभाव लागू शकला नाही त्यातच दौलतराव शिंदे अगदीच स्वस्थ बसल्याने व तुळसाबाईचा खून करून ब्रिटिशांनी महित्पूरची लढाई जिंकल्यामुळे उत्तरेतील पेंढारी वर्गाला आसलेला आश्रय पुर्ण पणे संपला होता. सन 1818 च्या फेब्रुवारी पर्यंत पेंढारी यांचा गोंधळ पुर्ण पणे शांत झाला.

दूसया ब्रिटिश मराठा युध्दात नागपुर भोसले यांना ब्रिटिशांनी चांगलेच नमवले होते. तरी पण भोसलेनी पेशव्याच्या मदतीने ब्रिटिशांची खोड मोडण्याची त्यांच्या मनातील खुमखुमी गेली नव्हती. सन 1817 च्या फेब्रुवारीत सुरवातीला नागपूरकर परसोजी भोसले यांचा खून झाला. भोसले घराण्यात योग्य वारस नसल्याने आणि आपासाहेब भोसले यांना ब्रिटिशांचा पाठिंबा असल्याने त्यांने राज्याची सुत्रे आपल्या हाती घेतली पूर्वप्रघातानुसार पेशव्याकडून ‘सेनासाहेबसुभा’ पदाच्या वस्त्रांची मागणी केली. यावेळी पेशवा व ब्रिटिश यांच्या मधील संबंध सलोख्याचे असल्याने ‘एलफिन्स्टन व जेन्कीन्सन’ यांनी त्यांस विरोध केला नाही आणि पेशवा यांनी फार ताणून न धरता आपासाहेबास पदांची वस्त्रे पाठवून दिली. आपासाहेब व पेशवे यांच्या मधील गुप्त पत्रव्यहार बरेच दिवस चालू होता. पेशवा व ब्रिटिश यांच्यातील संबंध बिघाड होण्याच्या सुमारास आपासहेबांने आपली फौज वाढविण्यास सुरवात केली. आपासाहेबाचे राजकारण ब्रिटिशांच्या मदतीने चालत असल्या कारणाने त्यांच्या पासुन नागपूर दरबारची बरीच मंडणी दूरावली होती म्हणुन यावेळी आपासाहेबास मनापासून मदत केली नाही. सन 1817 च्या ऑक्टोबर मध्ये पेशवा व ब्रिटिश यांच्यात संबंध चांगलेच बिघाडले गेले. पेशवाने आपासाहेबास दिलेली वस्त्रे नागपूरात येऊन पोचली याच वेळी नागपूरचा ‘ब्रिटिश वकिल जेन्किन्स’ यांना ही गोष्ट कळताच त्याने ही वस्त्रे स्वीकारू नये असे सांगितले पण आपासाहेबानी त्यास जुमानले नाही. 24 नोव्हेंबर 1817 मध्ये आपासाहेबाने मोठया

समारंभाने पेशव्याने पाठवलेल्या वस्त्रांचा स्विकार केला.[28] भोसले यांनी यावेळी सेनासाहेबसुभा या पदाची वस्त्रे मिळाल्यावर भव्य असा सोहळा आमंत्रित केला याचे आमंत्रण ब्रिटिश वकिल जेन्किन्स यांना देऊन उपस्थित न राहिल्याने आपासाहेबास कळायचे ते कळून चुकले. आपासाहेबास ब्रिटिश संकटाची कल्पना येताच त्यानी सन 26 नोव्हेंबर 1817 रोजी ब्रिटिश छावणीवर हल्ला करण्यासाठी सैन्यास आज्ञा दिली. ब्रिटिशांनी सिताबर्डीच्या टेकडयांचा आश्रय घेऊन आपल्या संरक्षणाची शक्य ती तरतूद करत आपासाहेबाच्या सरदार मुत्सद्यांत फुट पाडण्याचा जोरदार प्रयत्न केले. यामुळे सिताबर्डीच्या टेकडया वर भोसल्यांचा पराभव झाला. आपासाहेब ठामपणे ब्रिटिशांच्या विरोधात उभे न राहता पराभवाचा रंग पाहून त्यानी मध्यस्थिची बोलणी करण्याचे सुचवले याचा फायदा घेऊन जेन्किन्सने आपासाहेबास 17 डिसेंबर 1817 मध्ये अटक करून आपल्या ताब्यात घेतले.[29]

ब्रिटिशांनी यावेळी संपुर्ण नागपूरचे राज्य खालसा करणे गरजेचे असल्याने भोसले यांचे राज्य व सैन्य कमीकरून आणि किल्यांचा संपूर्ण ताबा आपल्याकडे घेऊन राज्यपदाची सूत्रे परत एकदा आपासाहेब भोसले यास नाममात्र अधिकार दिले. जानेवरी 1818 मध्ये तह करून भोसले यांनी सैन्यास राजा दिली व किल्यांचा ताबा ब्रिटिशांना लिहून घेतला. यावेळी आपासाहेबानी कमी केलीली फौज पेशवा यांच्या मदतीला पाठवून दिले आणि शेवट पर्यंत किल्ले लढविण्यासाठी सर्व किल्लेदारांना गुप्त पणे हुकूम दिला होता. यावेळी आपासाहेबाने सीताबर्डीच्या लढाईच्या आधी चांदया येथील किल्यावर पाठविलेला खजिना, सोने-नाने आपासाहेबाने परत न मागविता अज्ञात स्थळी त्याची रवानगी केली व पेशव्याना ब्रिटिश विरोधी मदतीसाठी जाण्याचे ठरवले होते. आपासाहेबाची ही खटपट ब्रिटिश वकिल जेन्किन्सनची नजर होतीच, त्याने गव्हर्नर जनरल हेस्टिंग यांना पत्राने ही माहिती कळवली व पुढील कारवाही ची मागणी केली. पण जेन्किन्सने ग. ज. अदेशाची वाट न पाहता त्याने 15 मार्च 1818 रोजी आपासाहेबास कैद करून ता. 3 मे 1818 अलाहाबादेस रवाना केले. परंतु 13 मे 1818 रोजी रायचूर येथे मुक्कामी आसतांना आपासाहेब ब्रिटिशांच्या कैदेतून पळुन गेले. त्यानी पुढे गोंडांच्या युध्द टोळयांच्या

सहाय्याने ब्रिटिशांना बराच त्रास दिला. दरम्यान पेंढारी, पेशवा यांची धडपड बंद झाल्यामुळे आपासाहेब लाहोरकडे निघुन गेले आपासाहेब परत जोधपुरचा राजा मानसिंग यांच्या आश्रयाला आले. आपासाहेबास आपल्या ताब्यात देण्याविषयी ब्रिटिशानी जोधपूरकरांवर बरेच दडपण आणले पण मानसिंगाने त्यांचे कोणतेच आदेश मानले नाही. अखेर ब्रिटिशांनी त्याविषयीचा आग्रह सोडून दिला. जोधपुरास असताना ता. 15 जुलै 1840 रोजी आपासाहेब भोसले यांचे निधन झाले. आपासाहेब यांच्या पलायना नंतर नागपूरच्या गादीवर ब्रिटिशांनी 'दूसरा रघुजी' या दत्तकाची नियुक्ती करुन नाममात्र भोसले घराण्याचे अस्तित्व टिकवले होते.[30]

इंदोरच्या होळकर घराण्यात ब्रिटिशांनी आपली पावले होळकर संपवण्यासाठी टाकण्यास सुरवात केली. ब्रिटिशांनी आपल्या धोरणा नुसार होळकर यांच्या सैन्याला माळवा प्रांतातुन नागपूर प्रांतात खाली उतरू दिले नाही. जर पेंढारी, आपासाहेब भोसले, होळकर हे एक झाले असते तर पुढे ब्रिटिशांचा निभाव लागला नसता पण ब्रिटिशांनी त्यांची एकजूट सैन्याच्या व फोडा फोडीच्या राजकारणे संपवली होती. यावेळी ब्रिटिशांनी आपले सैन्य गोळा करण्यास सुरवात केली. मुंबई येथील सैन्य, अहमदनगरचे ब्रिटिश आधिकारी स्मिथ यांच्या हाताखाली सैन्य यासर्व फौजा पुण्यात आनल्या होत्या. पेशवा ज्या प्रमाणे पेंढायांच्या नावाखाली स्वतःच्या रक्षणा करता व वेळ प्रसंगी ब्रिटिशांशी दोन हात करण्यासाठी पुण्यात सैन्य गोळा करण्यास सुरवात केली त्या निमीत्ताने ब्रिटिशांनी आपल्या हाताखालील सैन्य पुण्यात गोळा करण्याचे काम चालू केले. ब्रिटिशांच्या या सर्व घटना पेशवा दुसरा बाजीराव यांच्या निदर्शनात आल्या आणि ज्या प्रमाणे पेशवा यांचे वर्तन दुप्पटी पणाचे होते. तर ब्रिटिशांचे वर्तनही तितकेच दुटप्पीपणाचे होते. काही तरी निमित्ताने पेशव्याचे राज्य लयाला न्यावे, असा ब्रिटिशांचा स्पष्ट हेतु होता. असे ब्रिटिश सैन्य आधिकारी 'लेफ्टेनंट कर्नल ब्लॅकर' याने म्हणटले आहे. It may be proper to mention, that these orders of The Supreme Government were dated on the 16^{th}, May 1817 at which period the affairs at Poona, previous to the treaty, were in that unsettled state which has been described.

Accordingly, Sir Thomas Hislop's instructions embraced, in the first instance, the object of reducing the Peshwah's power. [31].

4.8. पेशवा दुसरा बाजीराव व एलफिन्स्टन यांचा राजकीय शह प्रतिशह -

सन 1817 मध्ये ब्रिटिशांशी पुण्याचा तह करुन पेशवा पंढरपूरच्या यात्रेसाठी बाहेर पडला. पंढरपूर, माहुली करत कार्तिकस्वामीला जाण्याचे त्यांनी ठरवले मात्र, कार्तिकस्वामीला जाण्याऐवजी माहुलीलाच बराच काळ मुक्काम केला. याच सुमारास 'जॉन माल्कम' यांने त्यांची भेट घेतली. माल्कम यांच्या संभासणाने पेशवा भारवला त्याच्यातील महत्वाकांक्षी राजकारणी पुरूष जास्तच सावध झाला होता. त्याने पेशव्या विषयीचा आपला रिपोर्ट गव्हर्नर जनरल यांना पाठवून त्यांच्याशी सामोपचाराचे धोरण ठेवण्यात कंपनीचे हित असल्याचे कळवले. अर्थात, माल्कमचा हा शेरा एलफिन्स्टनच्या अति आक्रमक धोरणावरील ठपका असला तरी पेंढारी युध्दाच्या निमित्तोन पेशव्याने ब्रिटिश विरोधी केलेली लष्करी व राजकीय व्युहरचना त्याच्या लक्षात आली होती. माल्कम हा जरी आक्रमक साम्राज्यवादी राजकारणी असला तरी आपल्या सत्तेची पाळेमुळे या जमिनीत दृढ होण्यासाठी थोडयाफार राजकीय मवाळपणाचीही गरज असल्याचे त्यास चांगलेच ठाऊक होते. पेंढारी प्रकरण उरकल्यावर मग एकाकी पेशव्याचा बंदोबस्त करण्याचे काम हाती घेत कंपनी सरकारसाठी अतिशय सोईचे जाणार होते त्याचीही त्यास जाणीव होती.

'माल्कम' यांची भेट झाल्यावर पेशवा कार्तिकस्वामीच्या यात्रेस जाणार असल्याचे समजले होते. एलफिन्स्टने हा साम्राज्य वादी वृत्तीचा असल्या कारणाने त्याचा स्वभाव पेशवा दु. बाजीरावला कधीच आवडला नाही दोघात कायम स्वरूपी वाद होत असे. तेव्हा माल्कमयाला ग. ज. हेस्टींग यांनी पेशव्याच्या भेटीसाठी पाठवले पेशवा यावेळी माहुलीला गेले असताना माल्कम व पेशवे यांची भेट माहुलीला झाली या भेटीत दोघांचे चांगलेच सुत जुळले होते. एलफिन्स्टनच्या सर्व वागनुकीची हाकीगद दु. बाजीरावाने माल्कम यास सांगितली हाती. पेंढायांशी युध्दासाठी तुम्ही सैन्यची तयारी करावी असे दोघात बोलीणी झाली व माल्मक पुढे हैद्राबादेस निघुन गेला.[32] पे. दु. बाजीरावास आपल्या पुढील धोरणासाठी फौज जमवायचीच होती त्यात त्याला हे आयतेच कारणा सापडले.

याचाच फायदा त्याने करुन, फौज जमवून ती उघडपणे आपल्या पदतरी ठेवण्यास सुरवात केली. एलफिन्स्टनच्या मते पेशव्याची हि तयारी पेंढायांवरील स्वारीच्या गरजे पेक्षा जास्त होती. त्याने पेशव्याला आपली फौज कमी करण्याचा सल्ला देत नवीन फौज पुण्याच्या आसपास न ठेवता राज्याच्या सरह्दीवर पाठवण्याची सूचना केली त्यावेळी पेशव्याने त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. मात्र जनरल स्मिथ पेशव्याची तैनाती फौज आपल्या सोबत घेऊन पेंढारी मोहिमेकरता राज्याच्या सरहद्दीवर पे. दु. बाजीरावाने आपले दोन हजार सैन्य विंचुरकर सरदार बरोबर स्मिथच्या मदतीसाठी पाठवली. सैन्य ऐवढया लांब जाणार, तसेच ब्रिटिशांचे सैन्य पण दुर जारणार होते. यावेळी पेशवा 'बापू गोखले' यांच्या मार्फत त्याने ब्रिटिशांशी युध्द करण्याची तयारी सुरु केली. त्याने बापु गोखले याकडे एक कोटी रुपये देऊन लढाईस उपयुक्त साहित्य जुळवण्यास सुरवात केली, यावेळी किल्यावर गड्डयांची व शिबंदीची भरती होऊ लागली. दु.बाजीरावाने ब्रिटिशाना आपण तह मनापासुन पाळतोय हे दाखवण्याचे नाटक केले.

पेशवा दु. बाजीरावाने मराठया साम्राज्याचे सर्व सरदार आपल्या बरोबर घेण्याची तयारी चालु केली. अनेक सरदार मुत्सुदी यांना पेशवा अता काहिच कामाचा वाटत नव्हता. त्याचा ओढा जास्त ब्रिटिशांकडे होत चालला होता. ब्रिटिशांशी निर्वाणीचा सामना करून राज्य गमविण्याचा प्रसंग यावेळी आला होता. सन 1795 पासून मराठी साम्राज्याची ढसाळ निर्णया मुळे वाताहात झाली या वाताहातीतच ब्रिटिशांनी आपली बाजू भकम करून घेतली. पेशवाच्या अंगी अवश्य असणारे धाडस, उदयोग, आवेश, गांभीर्य या सर्व गोष्टीची कमतरता मोठया प्रमाणात जाणवत होती. त्याच्यात निर्णय शतमा ब्रिटिशांशी लढताना कोठेच दिसली नाही.

पेशवे व ब्रिटिश कितीही प्रेमभाव दाखवत असले तरी आतल्या अंगाने दोन्ही पक्ष निर्णायक लढण्याकरता परस्परांच्या विरोधात शक्य तितक्या सर्व खटपटी करत होते. पेशवा लढण्यासाठी पुर्ण ताकद गोळा करण्यास गुंतला होता. पण मनातुन त्याची चलबिचल चालुच होती. ज्या प्रमाणे एलफिन्स्टने पेशव्याच्या अवती भवती हेरांचे जाळ विणलं होत, त्याच प्रमाणे पेशव्यानेही एलफिन्स्टनला घेरलेले होते. पेशव्याचे घेरणे म्हणजे

आपला अवेश गमावल्यावर निर्माण होणारी परिस्थिती होती तसीच परिस्थिती पेशव्याची झाली. ब्रिटिशांनी निजाम, टिपू, शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड यांना आपल्या बुध्दीच्या जोरावर संपवले याचा पेशव्याला कधीच अंदाज घेता आला नाही. ब्रिटिशांच्या फौजेत पेशव्याने फितूरण्याचा प्रयत्न केला पण त्या फितुरीच्या नावाखाली अनेक व्यक्तीनी पैसा उकलण्याचे काम केलेले. यशवंतराव घोरपडे यांनी फितुरीकरता पंन्नास हजार रुपये घेतले होते पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही कारण यशवंतराव सर्व बातमी एल्फिन्स्टन यास देत असे. पेशव्याच्या वाडयांतली गुप्त बातमी खडानाखडा ब्रिटिशाना पोचत असे. त्यात 'बाळाजी नातु' यांसारखे लोक ब्रिटिशाना उघड पणे सामिल होते. हि गोष्ट 'ग्रॅट डफ' यांनीही कबूल केलेली आहे. पेशवा यांनी लोक आपल्यावर नाराज आहेत म्हणुन अनेक जहागिया सोडुन दिल्या होत्या. पेशवाने अनेक बेभरंवसा करण्याया सरदाराना बापु गोखले मार्फत अप्रत्यक्ष आश्वासन दिले पण यावेळी दक्षिणेतील जहागिरदार पटवर्धन यांचा राग शांत करता आला नाही. एल्फिन्स्टने दक्षिणेतील सर्व जहागिरदार, सरमजाम इ. बाजू घेतली होती. ब्रिटिशांना या सर्व सरदाराना नाहीसे करणे बरोबर वाटले नाही.[33] ब्रिटिश जवळ-जवळ हिंदुस्थानचा अनेक भाग फंद फितुरीने आपल्या हातात घेतला होता. यावर एका पोवाडा यावरून फितुरी किती प्रमाणात चालु होती हे आपणास येथे दिसून येते.

"ईश्वरसत्ता विचित्र सारे दैवानें घडविले।

हरिचंद्र आणि रामचंद्र नळ पांडवास रडविलें।

फितुर करुन सर्वानी अपले राज्य मात्र बुडविलें।"[34].

यावेळी फितुरी किती मोठया प्रमाणावर चोहोंकडे पसरलेली असली पाहिजे, याची आपणास कल्पना येते.

ब्रिटिशांच्या विरोधात पेशवा यांनी पुकारलेल्या लढाईची वेळ जसजशी जवळ येऊ लागली तसतशी पेशव्याने आपल्या कडुन युध्दाची कसून तयारी चालवली. गड किल्यांच्या बंदोबस्ताकरता विशेष हुकूम सोडण्यात आले, आरमाराची डागडुजी चालवली. ब्रिटिशांकडील सैन्य भरतीचा ओघ मंदावून, पेशवा आणि त्यांच्या जहागीरदारांच्या पथकांत

लोक मोठया उत्साहाने दाखल होऊ लागले. पेशव्याच्या या वेगाने वाढणाया सैन्यामुळे एलफिन्स्टन ब्रिटिशांच्या मनात प्रथम धडकी भरली होती तरी पण आज सैन्यात दाखल शिपाई यांना कोणत्याच प्रकारे अनुभव नसलेले सैनिक तसचे ब्रिटिशांकडे अनुभव असलेले सैनिक यांच्यात फरक असतो हे एलफिन्स्टन यांना चांगलीच जाणीव होती.

एल्फिन्स्टन व पेशवा यांच्यात ऑक्टोबर 1817 मध्ये शेवटची भेट पुण्याच्या विश्रामबाग वाड्यात झाली. या भेटीत दोघांनी परस्परांच्या मनातील गोष्टी काढुन घेण्याचा प्रयत्न केला पण दोघेही काही प्रमाणात त्यात यशस्वी झाले. पेशवाचा स्वभाव तसा दुटप्पी पणाचा असल्या आहे याची चांगलीच माहिती एलफिन्स्टन यांना झाली होती. दुसरा बाजीराव यांच्या अंगातील भितरे पणा त्याच्या चेहयावर स्पष्ट दिसत होता. एलफिन्स्टनला पेशव्यास आजुनही नमवता आले असते अशी त्याची येथे परिस्थिती होती. यावेळी जनरल स्मिथ तैनाती फौज व ब्रिटिश कंपनीच्या सैन्यासह जालना येथे होता. त्याला एलफिन्स्टनने पत्राद्वारे पुढे येणाया धोक्याचा इशार दिला. 'ज्या दिवशी माझ्याकडून येणारी डाक चुकेल त्याच दिवशी पुण्याकडे चाल करून यावे' अशा आशयाची अगावू सुचना देऊन ठेवली. त्याच पध्दतीने मुंबईच्या सैन्यालाही पुण्याकडे येण्याच्या तयारीत राहण्याचे आदेश दिले गेले. सन 1817 मध्ये दसरा झाल्यावर दोन्ही पक्षा मध्ये वर्दळीवर येण्याची चिन्हे दिसू लागली होती. आता निर्णय झाला पण आता प्रश्न होता तो युध्दाला सुरवात कोण प्रथम करतो यावर पेच येऊन उभा होता. पेशव्याची युध्दीची व स्वःताच्या मनाची काहीच तयारी होत नव्हती. प्रतेक दिवस युध्दाची भिती होती पण वेळ निभावण्याचे काम पेशवा व ब्रिटिश करत होते. पेशवा यांनी आता युध्द सुरु केरावे असे बापू गोखले वारंवार सांगत होते.[35]

4.9. तिसरे ब्रिटिश मराठा युध्दास प्रारंभ -

सन 1817 च्या शेवटी दसरा उलटून गेल्यावर पुण्यात घटना मोठया वेगाने घडू लागल्या. एलफिन्स्टन व पेशवा हे दोघे राजकारणात कितीही थंड वृत्ती धारण करुन बसले असले तरी पण त्यांच्या सरदारांना व सैनिकांना आवरुन धरणे उत्तरोत्तर अवघड बनू लागले. ब्रिटिशाचे सैन्य पुण्यात सर्व बाजूनी दिवसेन दिवस एकत्र येऊ लागली तेव्हा

आधिच आपण त्याचा बंदोबस्त केला पहिजे होता ही गोष्ट बापु गोखले पेशवा यास वारंवर सांगत होता. पुण्यात यावेळी मुळा मुठा या नदीच्या संगमावर ब्रिटिश वकिल एलफिन्स्टन असून तिथे काही थोडया फार प्रमाणात सैन्य होते तसेच काही पथके पुण्यात गारपीरावर होती. मराठ्यांकडे यावेळी 'फोर्ड' सेनापती याच्या हाता खाली पेशव्याने स्वतंत्र उभारलेली एक मोठी लष्करी तुकडी होती. आधुनिक व सुसज्ज असे लष्करी सैन्याची फोर्ड यांच्या हाताखालील तुकडी पेशवा यांच्या पैसाने तयार झालेली होती. पण ऐन वेळेस त्याने दगा दिला यामुळे फोर्डला आणि त्याच्या सैन्याला आपल्या पक्षात वळवण्याचेशक्य तितके उपाय पेशव्याचा कारभारी 'मोर दीक्षित मराठे' याने केले परंतु त्यास यश आले नाही. तेव्हा निदान फोर्डने तटस्थ राहावे असे मोर दीक्षितने त्यास सूचना केली होती. पण फोर्ड हा कर्नल बरच्या सैन्यास जाऊन मिळण्याची चिन्हे दिसु लागली [36] हे सर्व सैन्य यावेळे पासून शत्रूपाक्षात जाऊन बसले.

पुण्यात सर्व सरदार, जहागिरदार, सरमजाम इ. मंडळी जमा झाले होते त्यात निपाणकर, अक्कलकोट, भोसले, निबाळकर, घोरपडे, जाधव, विंचूरक, पटवर्धन, बापू गोखले, राजेबहादर, भोईटे, पुरंदरे, यांना ममतेत घेऊन पुण्यात आनले. यापध्दतीने रोहिले, पठाण, शिद्दी, आणि रजपूत, रांगडे, मुसलमान असे सर्व मिळून पन्नास हाजर सैन्य तयार झाले. पायदरळ आरब दहा हाजार सैन्य, तसेच तिस हजार नंगे गोसावी हे सर्व नवीन चाकरीस ठेवले. तोफखाना, बाण, दारुगोळा यांचा भरणा मराठी मुलखात होऊ लागला होता.[37] पेशवानी या सर्वाचा अधिकार आपला विश्वासु सेनापती 'बापू गोखले' यांकडे दिला व याच वेळी ब्रिटिशांशी युध्द करण्याचे निश्चिय केला. परंतु पेशव्याच्या मनाची तयारी होत नव्हती. त्याचे राजकारण अजून आकारास आले नव्हते. पेंढारी यांची युध्दाच्या निमित्ताने मिळणारी हवी तशी संधी अजून दृष्टीक्षेपात आली नव्हती. यावेळी काही संस्थानिकांकडून पत्राला मिळणारा अनुकूल प्रतिसाद अपवाद वगळल्यास पेशवा यांना कोणतीच अशा राहिली नव्हती.

पेशवा यांनी दरबारी बोलवलेल्या सर्व सरदार वर्गाचे मत जाणून घेण्यासाठी प्रयत्न केला त्यात दोन विविध मताचे गट निर्माण झाले त्यात एका गटाचे मत युध्द पुकारल्यावर राजधानी वगैरेचा विचार करणे चुकीचा आहे तर दुसया गटाच्या मते युध्दप्रसंग राजधानी पासून दूरवर करणे केव्हाही योग्यच ठरेल. रणभूमिचा कसलाच अनुभव नसलेला दुसरा बाजीराव यांमळे पुर्ण पणे गांगारुन गेला पण शेवटी त्याने युध्द करण्याचे ठाम केले. त्यातच पेशव्याने युध्दाचा निर्णय घ्यावा यासाठी बापू गोखले पेशव्यावर दडपण आणू लागला होता. 28 ऑक्टोबर 1817 च्या रात्री पुणे शहरात मोठी लष्कराची धामधुम सुरू झाली. यावेळी एल्फिन्स्टन बरोबर संगमावरच्या बंगल्यात सुप्रसिध्द इतिहासकार 'ग्रॅट डफ' हे हजर होते परंतु सुदैवाने रात्रभर विचार करुन पेशव्याने युध्दाचा निर्णय पुढे ढकलला व एलफिन्स्टनसह ब्रिटिशांनी सुटकेटचा निःश्वास टाकला. पुण्याच्या भोवती या प्रसंगाच्या वेळी ब्रिटिशाचे सैन्य थोडयाप्रमाणात हजर होते. पण पेशव्याच्या डोक्यात काय कल्पना शिजत होती हे कोणालाच कळेना शेवटी यो गोष्टीचा पुढे काहीच उपयोग झाला नाही.

पेशवा यांचा युध्दाला पुढे-पुढे नेन्याचा परिणाम मोठा भयानक दिसू लागला कारण म्हणजे '30 ऑक्टोबर 1817 रोजी अहमदनगर, मुंबई येथील ब्रिटिशांचे सैन्य पुण्यात खडकी येथे येऊन पोचले.' यावेळी एल्फिन्स्टन याने गारपिरी वरील कर्नल बर याच्या नेतृत्वाखाली सैन्य खडकी या ठिकाणी आनले. बापू गोखले व इतर सरदार मंडळी यांच्या दृष्टीने पेशव्याने व्यर्थ दिवस दवडून व एक 'सोन्यासारखी संधी' वाया घालवली कारण, मुंबईची फौज येण्यापूर्वीच पुण्यातील मुठभर ब्रिटिशांचा चुराडा करून मग मुंबईच्या सैन्याना लोळवण्याचा त्यांचा विचार होता. येथे दुसरा बाजीरावाची युध्दाची लायकी शुन्य दिसुन आली. पुण्याच्या रोखाने ठीकठिकाणच्या ब्रिटिश पलटणी येत आहे असल्या बातम्याही त्यांना मिळत होत्या. लवकरात लवकर निर्णय घेऊन ब्रिटिशांशी युध्द पुकारले नाही तर पुण्यातील ब्रिटिशाचे सैन्य वाढत जाऊन वसई सारखा प्रसंग निर्माण होण्याची मोठी शक्यता होती परंतु पेशवा यास सर्व काही कळूनही वळत नव्हते. एलफिन्स्टन काय

करतो हे पेशवा यास कळत नव्हते पण सत्ता विस्तारासाठी एलफिन्स्टन यांची बुध्द काम करत होती. त्याच पध्दतीने पेशवा यांची बुध्दी काम करेणासी झाली होती.

याच सुमार ब्रिटिश व पेशवे यांच्या सैन्यात भांडणाला ऐक कारण मिळाले ते म्हणजे '2 नोव्हेंबर 1817 मध्ये ब्रिटिश वकिलीच्या बंगल्या सामोर सैन्यातील लेफ्टनंट शॉ यांला पेशव्याच्या तीन घोडेस्वारानी घोडयावरून खाली पाडले, आणि आपल्या भाल्याने त्याना अनेक जखमा केल्या.' याच शिवाय पेशव्याचे सैन्य ब्रिटिश लष्कराच्या फारच जवळ येऊन उभे होते यानंतर एलफिन्स्ट यांना हे चांगले निमित्त झाले परंतु नेहमीच्या पध्दतीने घडलेल्या घटनेची पेशव्याकडे तक्रार केली. पेशव्यानेही पूर्व संप्रदाया नुसार चौकशी करून कारवाईचे आश्वासन दिले. दोन्ही पक्ष जणु काही चालुच नाही असे दाखवत होते. पुढे दोन दिवस झाले पेशव्याकडून चालढकल केली जात होती यामुळे ब्रिटिश काहीसे गोंधळात पडले होते. ब्रिटिशाचे सैन्य वाढत आहेत व ते सर्व पुण्यात आपला तळ देऊन बसले होते. हे सर्व बघितल्या नंतर पेशवाने अजानक घाबण्याचे नाटक करुन त्याने 5 नोव्हेबर 1817 मध्ये आपला कडून 'विठोजी नाईक' या सरदारास एलल्फिन्स्टन याकडे पाठवून सैन्य बाजुला लांब ठेवण्याचे सांगितले पण एल्फिन्स्टनने मान्य केले नाही यानंतर मात्र ब्रिटिशाच्या छावणीतून नाईक परत आल्यावर बापू गोखले याने युध्दाला तयारी केली. 5 नोव्हेंबर 1817 रोजी बापूने आपल्या छावण्यामध्ये जाऊन लष्कराला युध्दासाठी तयारीचे आदेश दिले. सैन्याची जबाबदारी बापू गोखले यांवर सोपवल्यावर पेशवा दुसरा बाजीराव यांनी आपल्या परिवारासह पुण्यात आसलेल्या पार्वती या ठिकाणी जाऊन थांबला.[38]

4.9.1. खडकी येथे युध्दास सुरवात -

पेशव्याच्या फौजा ब्रिटिशांशी युध्दासाठी तयार झाल्या मराठा सरदार बापू गोखले, मोरे दिक्षित मराठे, चिंतामणराव आप्पा पटवर्धन, तासगांवरक, मिरजकर, पटवर्धन, आप्पाजी पाटणकर, घोरपडे, पुरंदरे, राजेबहाद्दर, अक्कलकोटवाले हे सर्व आप-आपली तयार फौज घेऊन गणेशखिंडीवर ब्रिटिशान समोर जाऊन थांबल्या होत्या. ब्रिटिशांरचे यावेळी सर्व ठिकाणचे सैन्य पुण्यात खडकी येथे येऊन थांबले यामध्ये कर्नल

बर यांच्या सैन्य, मुंबई वरून आलेले सैन्य, दापोडी येथील कर्नल फोर्ड यांचे सैन्य हे सर्व सैन्य पेशव्याशी युध्दासाठी तयार होते. यावेळी दोन्ही सैन्य एक मेकाच्या समोर उभे होते. युध्दाचे रणफुकले व यावेळी दोघांन मध्ये झालेल्या युध्दात पेशवांचे 'मोरे दिक्षित' यांचा मृत्यु झाला[39] खडकी येथील झालेल्या संघर्षात दोघांचेही चांगलेच नुकसान झाले.

रात्र झाल्याने खडकीच्या युध्दाचा निकाल योग्य लागला नाही. एल्फिन्स्टन यावेळी संगमानवर होता मराठी सैन्याने संगमावर हल्ला चढवला त्यावेळी तो काही मोजक्या शिपायांसह तिथे होता मराठी सैन्य जवळ आल्याचे पाहताच गुप्त पत्रे जाळून एलफिन्स्टन यांनी अंगावरच्या वस्त्रांनिशी नदी पार करून खडकीच्या दिशेन पळू लागले. मराठी सैन्यानी संगमावरील ब्रिटिश बंगला पुर्ण पणे जाळून टाकला यावेळी एल्फिन्स्टन याची पळता भुई थोडी झाली ही लढाई नसुन ती नुसती चकमक होती. बापू गोखले याने दुसया दिवसी लढाईची तयारी चालु केली परंतु पेशवा यांनी त्यास मोडता घातला. याचा मोठा फडका पेशवा यांच्या निर्णयाने मराठी साम्राज्यात बसला येथे मोठी निराक्षा मराठा मंडळाची झाली होती.

5 नोव्हेंबर 1817 रोजी एलफिन्स्टन याची डाक चुकताच ठरल्या प्रमाणे 'जनरल स्मिथ' 8 नोव्हेंबर 1817 रोजी जालन्याहुन पुण्यास यायला निघाला पण खडकीच्या लढाईत ब्रिगेडिअर स्मिथ याच्या हाताखालील सैन्या खडकी येथे वेळेवर पोहचु शकले नाही. ही मदत ब्रिटिशांना मिळण्या आधिच पेशवा यांनी हल्ला केला होता. याच सुमारास एलफिन्स्टन यांच्या स्वार्थी धोरणाने मोठी कमालच केली स्मिथ याचे सैन्य पुण्यात पोचे पर्यंत कसे तरी दिवस काढावे असा एल्फिन्स्टन यास वाटत हाते म्हणुन पेशवा यांच्याकडे पर्वतीवर निरोप जात होते. हे सर्व निरोप व एलफिन्स्टन यांचे धोरण बापू गोखले यांच्या एक सेनापती या नाथ्याने चांगलेल लक्षात आले होते. पण पेशवा दुसरा बाजीरावाच्या मनांत बापू गोखल्या सारखा करारीपणा आणि दृढनिश्चियी पणा दुदैवांने नव्हता. ब्रिटिशांचे निरोप येऊ लागले त्याच बरोबर पेशवे यांचे मन डळमळू लागले. खडकीच्या मैदानावर बापू गोखले शत्रुला नमवण्यासाठी गुंतलेले असता पेशवा याने लढाई

थांबवून तुम्ही माघारी फिरावे असा निरोप येऊ लागले होते. निरोप अतिशय निकराचे वाटू लागले होते आणि शेवटी नाईलाजाने बापु गोखले हे माघारी आले. एल्फिन्स्टन यांच्या निरोपावरून ब्रिटिश मोडावयाचे नाही अशा इरादयाने पेशवा दु. बाजीराव यांनीच पुढील लढाईचे काम तहकुब केले.[40]

खडकी येथील युध्दाच्या दुसया दिवसी ब्रिटिशानी वाटाघाडीचे नाटक करू लागले. वास्तविक पाहता या वाटाघाटीना आता राजकीयदृष्टया काही महत्व राहिले नव्हते. कारण या युध्दात दोन्ही कडील सैन्यानी अजून सडकून मार खालेला नव्हता त्या मुळे अनुकूल अटी अशा कोणाच्याच मान्य होणे शक्य नव्हते. पेशव्याने जरी लढाई थांबली होती तरी ब्रिटिशानी लढाईची तयारी थांबवली नव्हती. जनरल स्मिथ याच्या हाताखालील सैन्य अहमदनगरहुन खडकीकडे मदतीला येत होते. पेशव्याने यावेळी नारो आपटे व अक्कलकोटकर भोसले या दोन सरदारांना त्यांना आडवण्यासाठी पाठवण्यात आले होते पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. स्मिथ येरवाडयाच्या जवळील नदीच्या काठी शादिलबुवाची म्हणुन जी टेकडी प्रसिध्द आहे तेथे तळ देऊन राहिले होते. कर्नल बर आणि स्मिथ यांच्या दोघाच्या सैन्य येरवाडयात 13 नोव्हेबर 1817 मध्ये एकत्र आले.

4.10. येरवाड्याची लढाई आणि पुण्यावर ब्रिटिशांचा अंमल -

5 नोव्हेंबर ते 17 नोव्हेंबर 1817 पर्यंत ब्रिटिश व पेशवे यांच्यात वादाळापूर्वीची शांतता ही युध्दाची तयारी होती. कर्नल बर व स्मिथ यांच्या सैन्याचा मिलाफ येरवाडयात झाला याघटनेवर पेशव्याच्या सैन्यची बारीक नजर होती. यावेळी स्मिथ आपण होऊन मराठी सैन्यावर चाल करण्याचे धाडस यावेळी केले नाही याचे कारण म्हणजे सैन्याची स्थिती, नदी किनारा तोंडावर धरुन तो मोर्चेबंदी करून उभा राहिल्याने नदीपार करुने आपल्या अंगावर चालून येण्याचे अवघड कोडे त्याने बापू गोखल्यास घातले ब्रिटिश सैन्य पुढे चालत येत होते. यावेळी स्मिथ गारपीटीवर गेला व येरवाडयाच्या नदीच्या पलीकडील सैन्या कर्नल मिल याच्या हाताखाली देण्यात आले. यावेळी पेशवा यांचे सैन्य आरब, गोसावी हे 16 नोव्हेंबर 1817 रोजी येरवाडा येथे गेले व त्यांनी ब्रिटिशांशी युध्द सुरु केले व ब्रिटिशाच्या तोफाचा मारा मोठया प्रमाणात होऊ लागला. यावेळी ऐन युध्दाच्या

रंगात मराठयाचा सर्व दारुगोळा संपला अनेक माणसे ठार झाली व आरब गोसावी पळून गले. ही टेकडी ब्रिटिशानी आपल्या तब्यात घेली. यावेळी पेशवाने आपल्या बरोबर सैन्या घेऊन दिव्याचे घाटाच्या मार्गने पळ काढला हे बापु गोखले यानी पाहुन त्यांनी सुध्दा आपल मार्ग त्याच दिशेने धरला होता. योवळी मात्र मराठयाच्या सर्व फौजचा गोंधळ झाला हया सर्ववर ब्रिटिशांचे बारीक लक्ष होते.

या येरवाडयाच्या लढाईचे वर्णन कवि प्रभाकर यांने आपल्या पोवाडयामध्ये अशा पध्दतीने केले आहे. -

फसले शके सत्राशे एकुणचाळीसांत रणभूमिस। ईश्वर संवत्सरांत कार्तिक शुल्क अष्टमीस।।

प्रहर दिवसां रविवारी सर्व आले आरब गुरमाईस। खुप मोर्चा बांधुन विनविता श्रीमंत स्वामीस।।

दारुगोळा पुरवावी आम्ही आज हटकून त्याशी लढुं। गर्दीस मिळवून देऊन पलटणे क्षणात डोंगर चढु। शिपाईगिरीची शर्थ करुन समशेरी सोन्याने मढुं।।

लाविले बापुसाहेबांनी तोंड जाऊनी। दीड प्रहर रात्र होतांच श्रीमंत दम खाऊनी। गेली स्वारी मशला हिलाल मग लावूनी।।

जलदी करुन साहेबांनी लाविले निशन पुणियाला। खेंचून वाडयाबाहेर काढिले कदीम शिपायाला।।[41]

खडकी व येरवाडा येथे झालेली लढाई यामुळे मराठयांच्या इतिहासात मोठया प्रमाणत परिवर्तन घडले. येरवाडयाच्या युध्दा नंतर पेशवा दुसरा बाजीराव पुण्यातुन पळून गेल्यामुळे आता पुण्यात ब्रिटिश सोडले तर कोणीच राहिले नव्हते यामुळे पुण्यात पेशवा यांच्या निवासस्थं ‘शनिवारवाडा’ ब्रिटिशांनी ताब्यात घेतला. पेशवाने राजधानीतुन शत्रूशी लढाण्याचे सोडून दिव्याच्या घाटातुन सासवडकडे जाण्याचा निच्छिय केला. वास्तविक पहाता खडकी प्रमाणेच येरवाडयाच्या लढाईचा निकाल लागलेला नव्हता. जनरल स्मिथ पेशव्याच्या संपूर्ण फौजेचा पराभव करू शकला नाही परंतु पेशव्याने पुणे सोडल्याने येरवाडयाचा लढा आपण जिंकल्याचा दावा ब्रिटिशांना करता आला. यात

महत्वाचे म्हणजे रणभूमीचा ताबा घेणारा पक्ष विजयी म्हणून मानण्याची परंपरा असल्याने याविषयी आक्षेप घेण्यासाठी पुण्यात आता कोणी राहिला नव्हता. येरवाडयाच्या लढाई नंतर पेशवा पुणे सोडून गेल्यावर ब्रिटिशांनी मराठयांच्या सत्तेचे केंद्रस्थान असलेल्या पुण्याचा ताबा घेतला. 17 नोव्हेंबर 1817 रोजी शनिवारवाडयावर एका शतका पासून डौलाने पडकणारा जरीपटका खाली घेवुन त्याऐवजी ‘युनियन जॅक’ फडकवला.[42]

4.11. पेशवा दुसरा बाजीराव यांची पळापळ -

“पेशव्यांचे वंशांत बाजीरावासारखा बेहिमती,
दुसयाचा विश्वास नाही, जवळ शहाणे मनुष्य ठेवायचे नाहीं,
अंगी शिपाईगिरी नाही, त्यांची वर्णना काय करावी!
ब्रिटिशांनी राज्याचा आटोप केला.”[43]

पेशवा दु. बाजीरावाने आपले राजधानीचे शहर सोडुन तो व सेनापती बापू गोखले हे दोघेही पुरंदरच्या बाजूला आपल्या बरोबर मोठे सैन्य घेऊन निघाले येरवाडया नंतर ब्रिटिश व पेशव्याचा पाठशिवणीचा खेळ सुरु झाला. पेशव्याच्या मुक्कामाच्या दौडी व हुलकावण्या पाहून 6 डिसेंबर 1817 रोजी एलफिन्स्टन यांनी जनरल स्मिथला पत्र पाठवून थेट पेशव्यालाच पकडण्याची सूचना केली.

पेशवा यांचा पाटलाग करत कॅप्टन टर्नर हा सिंहगडा पर्यंत गेला तेथे दोघांमध्ये किरकोळ युध्द झाली. ब्रिटिशानी यावेळी सिंहगडचा किल्ला जिकुण घेतला. यानंतर पेशवाने पुरंदरच्या बाजूने येऊन साताराजवळ माहुली येथे मुक्कामी येऊन पोहोचले त्यानंतर तेथुन पेशवा मिरजेस निघाला त्याने आपल्या पाटलाग करणाया ब्रिटिश सैन्याला रोखण्यासाठी बापू गोखले, विंचूरकर व घारेपडे यांचे असणारे लष्कर देण्यात आले आणि पेशवाने यावेळी पंढरपुर कडे आपला मोर्च वळविला येथे ब्रिटिश व बापू गोलखे यांच्या सैन्याचा किरकोळ लढाई झाली व पेशवा यांनी येथुन पळ काढण्यास सफल झाले ते अहमदनगर च्या दिशेने आले. आपण कोणत्या दिशेने कोणीकडे जात आहोत याचा शत्रुला मागमूस लागू न देता दुसरा बाजीराव यांनी शत्रुला चुकांडया देण्याची जी पध्दत सुरु केली होती, त्यामुळे त्यांचा पाठलाग करणे ब्रिटिशाना फार कठिण होऊ लागले यामुळे शेवटीं

स्मिथ यांने काही सैन्य शिरुर मध्ये ठेवले व काही सैन्य नाशिकच्या दिशेने घेऊन निघाले वाटेत संगमनेर येथे त्यांना बातमी लागली की, दु. बाजीराव हे नाशिकला न जाता त्रिंबकजी डेंगळे यांच्या बरोबर ते पुण्याकडे निघले त्यावेळी स्मिथ 30 डिसेंबर 1817 मध्ये चाकण येथे येऊन पोचले. '18 नोव्हेंबर ते 30 डिसेंबर 1818 पर्यतंच्या मधल्या दीड महिन्याच्या कालावधीत पुरंदर, सालप्याचा घाट, माहुली, पुसेसावळी, मिरज, पंढरपूर, पीरगांव, संगमनेर, ओझर, जुन्नर, खेड आणि चाकण हे सर्व ठिकाण फिरत फिरत ब्रिटिशाना पुर्ण पणे सळो की पळो केले या बाबातीत पेशवा दुसरा बाजीरावाचे गनिमी काव्याच्या कौशल्याचे कौतुक ब्रिटिशानीही केले.

ब्रिटिश व पेशवा यांच्या सुमारे दीड महिन्याच्या पाठशिवाणीच्या खेळात स्मिथ सुमारे चारशे मैलांचा प्रदेश फिरला पण जे यश त्याच्या पदरी पडायला हवे होते ते पडले नाही. किरकोळ चकमकी वगळता पेशव्याच्या सैन्याशी त्याची निर्णायक लढाई होत नव्हती. इकडे यावेळी ब्रिटिशानी पुण्याच्या रक्षणाची जबाबदारी 'कर्नल बर' व 'बाळाजी नातु' यांच्याकडे दिलेली. पेशवा दु. बाजीराव 31 डिसेंबर 1817 रोजी 'भीमा कारेगांव' येथे येऊन पोचले यावेळी पेशवा पुण्याला जाईल म्हणून शिरूरची एक ब्रिटिशांची तुकडी पुण्याच्या दिशेने येत होती ती त्याच सुमारास कोरेगाव जवळ आली. यावेळी पेशव्याच्या सैन्याच्या तुलनेने ब्रिटिशाची फौज कमी होती पेशव्या सामोर शिरुरजी फौज व दूसया बाजूने पुण्याची फौज यांनी जर आपल्याला येथेच थांबवले तर, त्यात पाठीमागून जनरल स्मिथ यांची धाड आपल्यावर बसेल यामुळे एक तुकडी कोरेगाव येथे ठेवली आणि तो स्वतः मराठयांचे श्रध्दास्थान छत्रपतीला घेऊन साताराच्या दिशेने गेला. कोरेगाव मध्ये 1 जानेवारी 1818 रोजी ब्रिटिशाच्या सैन्याला मोठया प्रमाणात जेरीस आने होते मराठयानी आपला विजयश्री मिळवला. मराठयांच्या सैन्यानी कोरेगावच्या युध्दात कॅप्टन स्टोटन याच्या सैन्याचा पुर्ण पणे पराभव केला. या लढाईत बापू गोखले व त्रिंबकजी डेंगळे यांनी आपले कौशल्य पणाला लावले. यांची मोठया पराक्रम गाजवुन ही लढाई जिंकली पण मराठी फौजेला यावेळी अधिक काही करता आले नाही. आधीच्या लढायांप्रमाणेच हि झुंज देखील

निकाली न निघता, अंधार पडताच मराठी फौज लढाईतून बाहेर पडली यामुळे ब्रिटिशानी आपला विजय निच्छित करून ते परत शिरूर येथील छावणीत निघून गेले. मराठे यावेळी दक्षिणेत दरमजल करत फिरू लागले होते.[44]

4.12. पेशवा विरोधी ब्रिटिशानी खेळलेली चाल - (दु.बाजीराव विरुध्द जाहीरणामा)

भीमा कोरेगाव नंरत ब्रिटिशांनी आपल्या धोरणात बदल केला. या वेळे पर्यंत उत्तरेत होळकरांचा पुर्ण पणे सुपडा साफ होऊन निकाल लागून गेला व दौलतराव शिंदे आपली नांगीटाकून बसला होता, भोसल्यांच्या तलावरीची धार पण बोथट झाली तसेच पेंढायांची वाताहत होऊन ते चारी दिशांना जीव घेऊन पळत सुटले होते. अशा स्थितीत, बाजीराव पेशवा सुसज्ज फौज घेऊन दक्षिणेत फिरत होता. पेशव्याला असाच भटकू देणे ब्रिटिशांना परवडण्यासारखे नव्हते. तेव्हा पेशव्याला कोंडीत पकडण्यासाठी एलफिन्स्टनने साताराचा किल्ला आपल्या ताब्यात घेत गव्हर्नर जनरलच्या आदेशानुसार 11 फेब्रुवारी 1818 रोजी दुसरा बाजीराव विषयी जनतेस उद्देशून एक जाहीरनामा काढला. या जाहीरनाम्यानुसार ब्रिटिशांनी प्रथमच सांगितले की, “काही कारण किंवा कोणाची तक्रार नसताना पेशव्यानी ब्रिटिशांशी वैर घेतले यामुळे ब्रिटिश लोक मराठी प्रजेचे नुकसान करणार नाही. सर्वनी आपआपल्या ठिकाणी स्वस्त राहवे व सर्वचे लढाई पुर्वी जसे चालु होते तसेच चालवले जाईल. एलफिन्स्टन यांनी जनतेचा आधार घेऊन पेशवा कशा पध्दतीने दोषी आहे तसेच आपण केवळ मैत्रीखातर त्यास माफ केल्याची उदार बुध्दी ब्रिटिशांनी दाखवून दिली.” त्याच प्रमाणे आणखीन एक टिमकी ब्रिटिशानी मिरवण्यास सुरवात केली ती म्हणजे “पेशव्याच्या कैदेतून छत्रपतीला मोकळे करून राज्यावर नेमले जाईल.” हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून दोन महिन्याच्या आत जो कोणी पेशव्याची नोकरी सोडून येईल त्याचे वतन, इनाम पूर्ववत चालवले जाण्याचे आश्वासन देण्यात आले. जर कोणी पेशव्याला धरुन राहिल त्याचे वतन जप्ती केली जाईल. प्रांतिक अधिकारयाना पेशव्याकडे महसूल जमा न करण्याची एक प्रकारे आज्ञा दिली.[45]

4.13. पेशव्याने गमावलेल्या मराठी साम्राज्याच्या स्वतंत्र्याची निर्णायक लढाई -

4.13.1. गोपाळअष्टीची लढाई व छत्रपती यांची सुटका -

पेशवा यांनी ब्रिटिश सैन्याला आपल्या मागे दवडून दवडून पुर्ण पणे हैराण करून सोडले पण पेशवा यावळी फिरुन फिरुन पुर्ण पणे कंटाळला होतो. आता लढाईचा शेवटचा निर्णय घेण्यासाठी मराठयांनी एक पाऊल पुढे काढले त्यानुसार मराठा सरदार समोरा-समोर युध्दासाठी तयार होऊ लागली. सोलापुरात लढाईचा निर्णय घेण्यात आला होता पण तसे झाले नाही म्हणुन शेवटी तारीख 19 फेब्रुवारी 1818 ला सोलापुरातुन येत असताना पंढरपुर जवळील गोपाळाची अष्टी येथे पेशवा मुक्कामी आले. कंपनी सरकारच्या जाहीरनामा प्रसिध्द होऊन पेशव्याच्या गोटातील कित्येकजण ब्रिटिशांना फितुर झाले. अष्टी मुक्कामी बाजीराव आला असात काही अंतरावर वेळापुरा या ठिकाणी जनरल स्मिथ येऊन थांबला होता. ब्रिटिश जवळ आले असता बापू गोखले यांनी आता आपण पळू नये असा निर्णय घेतला आणि यावेळी बापूनी ब्रिटिशाशी लढाई देण्याचे ठरवले. दूसया दिवसी 20 फेब्रुवारी 1818 रोजी स्मिथ यांनी मराठयांवर एकाऐकी हल्ला केला. ब्रिटिशांशी यावेळी मराठयांनी निकराची लढाई दिली पण लढाईत एक शोकनीय गोष्ट घडली ती म्हणजे मराठयांचा सरदार बापू गोखले यांचा लढाईच्या रणांगणावर मृत्यु झाला.[46] लढाईत दु. बाजीराव यांच्या बरोबर असलेले त्याचे सेनापती बापू गोखले, आपा देसाई, निपाणकरावर यांच्यावर युध्दाची जबाबदारी होती मात्र आपा देसाई ब्रिटिशांना फितुर झाल्यामुळे ब्रिटिशांना रोखण्याच्या कामगिरीवर पेशव्याने बाूप गोखले व निपाणकरांला पाठवेले यात बापू गोखले यानी धन्याच्या आज्ञेबरहुकूम कामगिरीवर केली तर देसाई मागे राहिले. बापू गोखले यानी आपल्या शौर्यची शर्थ केली व ब्रिटिशांशी लढता-लढता तो अष्टीच्या रणसंग्रामात त्याने आपला देह जमिनिवर ठेवला. या लढाईत मराठयाचे गोविंदराव घोरपडे व इंतर सरदार लढाईत मृत्यु पावले यात मराठयांचे चांगलेच नुकसान झाले.

अष्टीच्या लढाईने मराठयाच्या इतिहास मोठा बदल घडुन आला या लढाईत मराठयांचे श्रध्दास्थान असलेले 'साताकर छत्रपती प्रतापसिंह' यांनी सहपरिवार ब्रिटिशांच्या गोटात जाणे पसंत केले. मराठी राज्याचे दोन श्रध्दास्थान असलेले छत्रपती व पेशवे यांचा

संबंध येथेच संपला होता. दुसरा बाजीराव खया अर्थाने मोठया संकटात सापडले जवळ जे काही लष्करी सामर्थ्य होते ते जाहिरणाम्या पासून तसेच आष्टीच्या लाढाई पासून कमी झाले यामुळे पुढे दु. बाजीराव फार दिवस टिकाव धरु शकले नाहीत. बापू गोखले यांनी दु. बाजीरावाला आष्टी सोडुन जाण्याचे सांगीतले व दु. बाजीराव आष्टीच्या लढाईतुन पुढे निघुन गले. यावेळी दु. बाजीरावाची ऐवढी धांदड उडाली की त्याला पालखीमेण्यातुन बसून पळण्याची सुध सुध्दा राहिली नव्हती त्याने घोडयावर स्वार होऊन उत्तरेकडचा मार्ग धरला होता.

अष्टीच्या लढाईने ब्रिटिश व मराठे या दोघांचे हिंदुस्थानातील सर्व चित्र पालटले पेशव्याच्या डोक्यावरील छत्रपतीचे छत्र ब्रिटिशानी हिरावून घेतले होते तो साफ उघडा पडला. दु.बाजीरावाला रोखण्यासाठी ब्रिटिशांनी छत्रपती मार्फत पेशवेपदावरून दूर केल्याचा जाहीरनामा 4 एप्रिल 1818 रोजी प्रसिध्द केला या नुसार आता बाजीराव मराठी सत्ते विरुध्द एक बंडखोर ठरला तरी पण पेशवा आपला लढा जिवंत ठेवण्याकरता ब्रिटिशांना हुलकावण्या देत राहिला. ब्रिटिशानी छत्रपतीला सातारा येथे घेऊन पुन्हा छत्रपतीच्या गादिवर बसुन त्याच्या नावाने एक जाहीरनामा काढला ‘‘या मुळे दुसरा बाजीराव यांचे सर्व अधिकार पुर्ण पणे संपुष्टात आले. आणि यापुढे जे ब्रिटिशाचे मित्र ते छत्रपतीचे मित्र, ब्रिटिशाचे शत्रु ते छत्रपतीचे शत्रु असे मानले जाईल, असे त्यानी त्या जाहीरनाम्यात स्पष्ट केले. यामुळे दूसरा बाजीरावास कोणीच वाली राहिली नाही.’’[47]

4.13.2. पेशव्याचा योग्य सेनापती बापू गोखले धारातिरर्थी -

येरवाडयाच्या लढाईत बापु गोखले यांनी आपले शौर्य व युध्दकौशल्य पनाला लावले होते. त्यालाजी त्याच्या धन्याने साध दयाला पाहिजे होती ती दिली नाही. सेनापती या नात्याने बापु गोखले यांनी ब्रिटिश विरोधी मोठी कामगीरी केली त्याच्या युध्द कौशल्याची तारीफ युरोपियन इतिहासकाराकडून करण्यात आली आहे. ज्यावेळी पेशवा व ब्रिटिश यांचे संबंध प्रेमाचे होते त्यावेळी सर आर्थर वेलस्ली याच्या हाताखाली पेशवा यांचे सैन्य देण्यात आलेले होते, त्या सैन्यात बापू गोखले हे एक शुर सेनापती म्हणून होते. त्या वेळी ब्रिटिशाच्या सैन्यातील शिस्त कशी असते आणि युध्दामध्ये ते कशा प्रकारच्या योजना

आखतात हे सर्व बापूनी पाहिलेले होते ते स्वतः फार शुर आणि अनुभवी होते. परंतु दुदैवाने त्यांच्या हाताखाली खडकीच्या लढाईच्या वेळी जे सैन्य होते, त्यात शिस्त नसून अव्यवस्था फार होती तरी पण जनरल स्मिथ यांच्याशी लढाई देण्याच्या कामी त्यांचे शौर्य आणि कौशल्य दिसुन येते. त्यांना ब्रिटिशानी फितुर करण्याचे भरपुर प्रयत्न केले पण त्यात यश आले नाही कारण त्यांच्यात स्वमिनिष्टा मोठया प्रमाणात रक्ता रक्तात होती. अष्टीच्या लढाईत मृत्यु पर्यंत आपल्या धन्याशी एकनिष्ट राहिले बापूचा अंत झाला ही मराठेशहीच्या इतिहास शेवट का होईना मोठी दुर्दैवाची गोष्टी ठरली. बापु गोखलेनी अष्टीच्या लढाईत आपले सर्व युध्द कौशल्य पनाला लावले पण त्याचा काहीच फायदा त्याला झाला नाही. बाजीराव पेशव्यांच्या काळात एक पाठीराखा सरदार म्हणून बापू गोखले सदैव पेशव्यांच्या सोबत खंबीरपणे उभे राहिले त्यामुळे खुश होऊन बाजीराव पेशव्यांनी सन 1812 मध्ये सेनापतीपद बहाल केले. ब्रिटिशांशी अनेकवेळा लढत देऊन त्यांना पराभूत करणारा मराठयांचा अखेरचा हा सेनापती व पेशव्यांच्या काही खास विश्वासू माणसांमध्ये तसेच मराठा इतिहासात सेनापती गोखले यांचे स्थान महत्वाचे होते.[48]

4.14. दुसरा बाजीरावची शरणागती व पेशवाईचा अस्त -

सातारा छत्रपती प्रतापसिंह भोसले ब्रिटिशांच्या आश्रयाला गले असे समजतात दु. बाजीरावाने पुढे दौलतराव शिंदे कडे आपला मोर्चा वळवला यावेळी दौलतराव शिंदेची पेशवे यांना अशा होती. उत्तरेकडील मराठी मंडळाच्या मदतीची आशा धरली पण ब्रिटिश बरोबर या नेत्यांचे तोंड आधिच पोळले होते. त्यातच दु. बाजीरावाचा शोध घेण्याकरता ब्रिटिशानी मोठा फौज फाटा बरोबर घेतला होता त्यात जनरल स्मिथ, प्रिटझलर, डोव्हटन, स्कॉट, ॲडम्स हे सेनापती आपल्या हाताखालील सैन्य घेऊन एकटया बाजीरावस पकडण्यासाठी निघाले यावेळी दु. बाजीराव नागपुरच्या दिशेन येत आहे हे कळताच एप्रिल मध्ये सिवनी या ठिकाणी ब्रिटिश व दु. बाजीराव यांचे युध्द झाले यामध्ये बाजीरावचे उरलेल्या सर्व सैन्याची मोठी वाताहात झाली त्याच्या जवळ मोठे सैन्य व शस्त्रे नव्हती यामुळे सैन्य पुर्ण पणे शक्तीहीन झाले पळुन पळुन तो आता पुर्ण थाकला होता. सिवनी लढाईत मराठयाचे हाल झाले पण या लढाई नंतर दु. बाजीराव यांच्या आणि

त्याच्या बरोबर असणारे सैन्य व त्याचे हस्तक यांच्या हालअपेष्ट झाल्या. युध्द सुरु होऊन सहा महिने झाले होते या काळात सरखी पळापळ व धावपळ चालुच होती. मराठयाच्या ब-याच प्रदेशावर ब्रिटिशानी आपला अधिकार बसवला याचा परिणाम दु. बाजीराव यांच्या वर चांगलाच जानवला होता यात साधन सामग्रीची व अन्नधान्याची मोठी टंचाई निर्मान झाली होती. सारखा प्रवास यामुळे सैन्यात मोठया प्रमाणात प्रान राहिला नव्हता. तहान, उपासमार, निराशा, या सर्व गोष्टीनी मुळे बरेचसे सैन्य त्रस्त झालेले होते.

दु. बाजीराव आता चारही बाजुनी पुर्ण पणे घेरले गेल्यावर त्यानी अशीरगड किल्ल्याचा आसरा घेतला पण याच वेळी पावसाळा लागणार होता. अशा वेळेस ब्रिटिशानी अशीरगडला वेढा दिला आणि तो या वेळीस रेंगाळणार होता. यामुळे सेनापती माल्कम याने वाटाघाटीद्वारे हा लढा निकालात काढायचे सुचवले. बाजीरावाला पण आता ब्रिटिशान विषयी लढा चालु ठेवावा अशी अशा राहिली नव्हती म्हणुन काही तरी मार्ग काढण्यासाठी शेवटी दु. बाजीरावाने आपला वकिल 16 मे 1818 रोजी महू येथील ब्रिटिश छावणीत माल्कम याकडे पाठवला.[49] बाजीरावाचा सर्व प्रदेश, मित्र, अनुयायी हे सर्व त्याच्या पासुन खुप लांब गेले होते. त्याच्या बरोबर अता काणीच नव्हते ब्रिटिश सैन्याने त्याची चारहि बाजुनी चांगलीच कोंडी केली होती. यामुळे युध्द थांबवण्या शिवाय कोणताच पर्याय शिल्लक राहिला नव्हता अखेर माल्कम कडे शरणागतिसाठी पत्र पाठवले त्यात दु. बाजीराव म्हणतात, 'माझे अत्यंत जुने दोस्त तीन पैकी 'कर्नल क्लोझ' दिवगत झाले, दुसरे 'जनरल वेलस्ली' हे स्वदेशी गेले, तिसरे आपण, आपण आजपर्यंत अनेकांचा संभाळ करून त्यास जवळ केले आहे शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड वगैरे मंडळीनवर मेहेरनजर करून आपण त्यांची व्यवस्था लावली आहे. तर या संकट समयी मलाही आपण हात देऊन माझा निभाव करावा भंगलेल्या होडीतल्या खलाशाप्रमाणे मी आज असाह्य स्थितीत असताना मला आपला हा आधार सापडला तो मी कसा सोडून शकणार'?[50] या नुसार दुसरे बाजीराव यांनी आता शरणागती घेण्याचे ठरवले हाते.

3 जुन 1818 रोजी अशीरगड परिसरात खैरी येथे माल्कम व बाजीराव यांची भेट झाली. यावेळी दुसरा बाजीराव यांनी आपल्या राज्याची असणारी अशा सोडून दिली व तो माल्कमकडे शरण आला. ‘माल्कमच्या कृपा दुष्टीने ज्या पध्दतीने अमृतराव यास आठ लक्षची जहागीरी मिळाली होती तसीच आपणास मिळावी अशी अपेशा माल्कम यांच्या पुढे ठेवली.[51]. माल्कमने दबाव आणि गोडीगुलाबीचे धोरण ठेऊन पेशव्याला मराठा राज्याचा पेशवा म्हणुन जे अधिकार व हक्क होते या सर्वाना सोडुन देण्यास भाग पाडले धकलेल्या दु. बाजीरावानेही वस्तुस्थिती लक्षात घेत माल्कमच्या पध्दतीने वागण्याचे ठरवले व शक्य तितकी आपली व्यवस्था लावून घेण्याकडे लक्ष केंद्रीत केले. पराभूत झालेल्या पेशवा दुसरा बाजीरावा यांनी आपली सत्ता व साम्राज्य या सर्वाचा त्याच केला आणि त्याने परत दक्षिणेत (पुण्यात) नजाण्याचा निर्णय घेत ब्रिटिशानी त्याला उत्तर प्रदेशात कानपुर जवळ ब्रम्हावर्त येथे आठ लाखाची जहागिरी देवून नेमनुक केली व त्याला तेथील लहान-लहान प्रदेश महसुल म्हणुन देण्यात आला होता. हे सर्व मिळूवन त्याला सहा चौरस मैलांचे राज्य दिले, त्याच्या जवळ स्वतंत्र ब्रिटिश सैन्य ठेवले. दु. बाजीरावाच्या या राज्यात साधारण दहा पंदधरा हजार मनुष्य होते तीच बाजीरावाची प्रजा होती. ब्रम्हावर्त म्हणजेच बिठूर मध्ये बाजीराव व ब्रिटिश यांचे संबंध प्रेमाचे व स्नेह भावाचे होते या ठिकाणी बाजीराला मराठी मध्ये ‘महाराज किंवा श्रीमंत’ म्हणत असे, तर ब्रिटिश त्याला ‘हिज हायनेस’ या नावांने उल्लेख करत असे. यावेळी बाजीरावाला आपली धार्मिक कार्यची हौस पुरविण्यास वाटेल तितका वेळ मिळत असे. मराठयाची ऐवढी मोठी वैभवशाली सत्ता आपल्या हातुन एका-एकी गेली हे त्याच्या मनाला कधीच वाटले नाही. ऐवढी मोठी सत्ता आपण गमावली ती परत मिळवण्यासाठी भविष्यात कधीच प्रयत्न केला नाही.

ग. ज. लॉर्ड हेस्टिंग्जने अखरे दुसरा बाजीराव यास उत्तरेकडिल कानपुर जवळ असणारे ब्रम्हावर्त सध्याचे बिठूर या ठिकाणी राहण्याची मान्यता दिली. कर्नल स्किनर याच्या देखरेखीत दु. बाजीराव यांचा उत्तरेत जाण्याचा प्रवास चालु झाला. राजपुतांना, अजमेर, मथुरा, दिल्ली असा प्रवास करत तो फेब्रुवारी 1819 मध्ये बिठूर येथे

पोचला. दुसरा बाजीराव धुळकोट येथे ब्रिटिशांना शरण आला तेव्हा त्याच्याजवळ स्वार आणि पायदळ मिळून चार हजार फौज होती परंतु जसजसा बिठूरकडे जाऊ लागला तसतशी त्याच्या सैन्यात घट होऊन अखेर सहाशे स्वार आणि दोनशे पायदळ सोबत राहिले. आपल्या उर्वरित सैन्यासह आणि परिवार व आश्रित मंडळीसोबत दुसरा बाजीराव ब्रम्हावर्तला गेला व त्या स्थळीच त्याचा 28 जानेवारी 1851 मध्ये मृत्यू झाला. .

4.15. ब्रिटिशांनी सातारा छत्रपतीची केलेली स्थापना

4.15.1. प्रतापसिंह ब्रिटिशांच्या आश्रयाने छत्रतपीच्या गादीवर बसले -

पेशवा सवाई माधवर यांच्या पेशवेपदाच्या वेळी नाना फडणीस हे मुख्य कारभारी होते त्याचवेळी त्यांनी छत्रपती शाहू यांच्या कडून मराठी राज्यचे पुढारीपण पेशव्याकडे घेतले असे असतानाही छत्रपती पदाची प्रतिष्ठा सर्व पेशवे घराण्यानी राखली होती. पण दुसरा बाजीराव पेशवा पदावर आल्यावर छत्रपतीचा वारंवार अपमान होऊ लागला यामुळे छत्रपती पेशवे यांच्या विरोधात नाराज होते. त्यांची नाराजी ही पेशवा सावाई माधवराव यांच्या मृत्यु नंतर वाढतच चालली होती. सातारा येथे यावेळी छत्रपतीच्या गादीवर बसवलेले धाकटे शाहु होते, त्यांना छत्रपतीचे वारस म्हणून तीन मुले होती त्यात थोरला मुलगा ‘प्रतापसिंह ऊर्फ आबासाहेब’, दूसरा ‘रामचंद्र ऊर्फ भाऊसाहेब’, व धाकडा मुलगा ‘आप्पासाहेब ऊर्फ शहाजी’ ही छत्रपतीची मुले होती. छत्रपती शाहु यांचा सन 1808 मध्ये मृत्यु झाल्यावर पेशवा दु. बाजीरावाने ‘प्रतापसिंह’ यास 16 मे 1808 रोजी मराठी साम्राज्याचा अप्रत्यक्ष केंद्र बिंदू म्हणुन असलेल्या छत्रपती हया पदावर बसवण्यात आले. प्रतापसिंह लहान असल्याने सर्व कारभार त्याच्या मातुश्री माईसाहेब पाहत असे. दु. बाजीराव व माईसाहेब यांच्यातील संबंध काही काळ चांगले होते पुढे हे संबंध बिघडत चालले होते. पेशवा यांच्या कडुन छत्रपतीसाठी लागणारा खर्च अपुरा पडुलागला यामुळे त्याच्यात आर्थिक तिढा वाढत गेला. त्यातच छ. प्रतापसिंह यांना पेशवाने आपल्या नजरकैदेत ठेवले. छत्रपतीस कोणत्याच प्रकारे शिक्षण, युध्द कौशल्य, राजकारण इ. गोष्टीची ओळख होऊ दिली नाही यामुळे छत्रपतीचा वाईट काळ सुरु झाला तो म्हणजे

त्यांची अवस्था एका कैदयासारखी झाली होती. एकी कडे पेशवा यांने पुण्यातील स्वतःचे आसन पुर्ण पणे अस्तिर केले.[52]

पेशवा यास ब्रिटिशांवर स्वारी करण्याची आवश्यकता जाणवली त्यातच 13 जुन 1817 मध्ये पुण्याच्या तहानंतर पेशवा यांनी आपल्या नवीन राजकारणात म्हणजे ब्रिटिशांना हिंदुस्थानातून हद्दपार करण्यासाठी छत्रपती यांना आपल्या बरोबर घेण्याचे ठरवले. पेशवा आषाढी यात्रेच्या निमीत्ताने पंढरपुर व नंतर छत्रपती प्रतापसिंह यांचीकडे ब्रिटिशांवर स्वारी करण्यासाठी आपल्याला मदत करावी यासाठी माहुली येथे जाऊन भेट घेतली आणि ब्रिटिश विरोध आसणार संताप छत्रपती जवळ व्यक्त केला. या राजकारणात छत्रपतीने आपल्याला मदत करावी असे सांगितले. छत्रपती यांचे नाव जर आपल्या बरोबर असेल तर आपल्याला इतर मराठा जहागिरदार, सरमजांम, सावकार, सरदारांची मदत होईल म्हणुन पेशवा यांनी छत्रपतीस आपल्या बरोबर घेण्याचे ठरविले. पेशवा दु. बाजीराव हा फार कमजोर दिलाचा होता त्याच्या एकटयाच्या जोरावर युध्द करणे शक्य नव्हते.[53] छत्रपती यांच्या पदाची मराठयांच्या साम्राज्यात दूसरा बाजीराव पासून मोठया प्रमाणात हेळसांड होण्यास झाली. पेशव्यानी छत्रपतीवर दाबाव अनुक अनेक अधिकार छत्रपतीच्या हातातुन काढून ते अधिकार आपण स्वतः वापरण्यास सुरवात केली यामुळे एक प्रकारची छत्रपती यांची नाराजी पेशवा यांनी आपल्यावर ओढुन घेतली होती पण नाराजी दुर करण्यात मोठे आपयश आले आणि शेवटी ही ‘इतंभूत बातमी महाराष्ट्राच्या या राजाने (छत्रपती) महाराष्ट्राच्या शत्रूस ताबडतोब कळवली.’ प्रतापसिंहाची ही सर्व लक्षणे पेशवा यास पूर्वीपासूनच माहित असल्याने त्यांनी प्रतापसिंहाना नजरकैदेत ठेवले.

छत्रपती जर ब्रिटिशांच्या हातात सापडे तर आपल्या गादीला धोका निर्माण होणार हे दुसरा बाजीरावास चांगले ठावूक होते. एलफिन्स्टन याने या परिस्थितीचा फायदा घेऊन पेशव्या विरुध्द जाहीरनाम काढुन त्यास वेसन घातले, छत्रपती यांना मोकळे केले पण पुढे त्याचे हात पाय बांधले गेले. ‘छत्रपतीला पेशव्यांच्या जाचातून सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. पेशव्याचे राज्य बुडवायचे असून छत्रपतीची सत्ता राखवण्याचे आहे.’ आष्टी लढाईत ब्रिटिशांच्या दोस्तीच्या खात्रीवरून प्रतापसिंह यांच्या बरोबर त्याचे दोन बंधु,

माईसाहेब, चतुरसिंगाचा मुलगा बाळासाहेब भोसल, बळवंतराव चिटणीस, इत्यादी मंडळी ज. स्मिथयांच्या फौजेत सामिल झाले यानंतर ब्रिटिशानी सातारा शहर व किल्ला आपल्य ताब्यात घेतला. एल्फिन्स्टन याने 11 फेब्रुवारी 1818 रोजी हे राज्य पुन्हा छत्रपतीचे होईल असे जाहिर केले. प्रतापसिंहांशी तह करून त्यांच्या अनेक वाजवी हक्कांत काटछाट केली. सातारा येथे वकिल म्हणुन नेमलेल्या 'ग्रँड डफ' सारख्या हुशार, धाडसी, कर्तबगार व्यक्तीने साताराची राजकीय व्यवस्था लावून प्रतापसिंहास सुशिक्षित आणि सुसंस्कृत केले.

4.15.2. छत्रपती प्रतापसिंहाची उचल बांगडी -

ब्रिटिश यांनी मराठी साम्राज्याचे छत्रपती, पेशवा, जहागिरदार, सरमजांम, सरदार, सावकार या सर्वांना आपल्या ताब्यात घेतल्यावर लगेच मराठी भूमिवर राज्य करणे शक्य नव्हते त्यासाठी त्यांच्या समोर संकटे फार होते आणि या परिस्थितीत संकटाचा सामना करणे ब्रिटिशांसाठी अनुकूल राहिले नसते. तसेच त्याना माहित होते की मराठी लोकांना आपले राज्य एकदम झेपनार नाही आणि त्याचा परिणाम म्हणजे गोंधळ, बंड निर्माण होतील हे माहित होते. त्यासाठी त्यांनी छत्रपती यांना स्थानापंन्न केले.

पेशवा सावई माधवरा पेशवे पदावर असे पर्यंत पेशव्याची निष्ठा ही छत्रपती भोवतीच होती अशात ती काढून घेणे योग्य नव्हते. मराठी राज्यत कोणीही आपल्या विरोधी द्रौह करून नये यासाठी एलफिन्स्टन याने ''मराठयांची भक्ती छत्रपतीकडे लागावी म्हणून छत्रपती पद पुन्हा निर्माण केले. त्याप्रमाणे त्याने छत्रपतीच्या नावाने सर्व मराठी राज्यात घोषणा केली. कॅप्टन ग्रॅन्ट डफ हा छत्रपतीचा सल्लागार म्हणून निवडला या वेळी एलफिन्स्टन यानी डफला चांगलेले शिकवुन पाठवले होते ''राजाला स्वतःला सार्वभौम असे वाटत आहे, तेव्हा त्याच्याशी अशी भाषा ठेवायची की त्याला आपण मांडलिक आहोत की सार्वभौम याचा सुगावा लागता कामा नये. मात्र त्याच्याशी वागताना त्याला न दुःखवता व त्याचा मान राखुनच वागायचे.'' पुढे दोन वर्षात प्रतापसिंह यास आपली लायकी कळाली. हाळूहाळू ब्रिटिशांनी प्रतापसिंहाचे अधिकार कमी करण्यास सुरवात केली. 15 सप्टेंबर 1819 मध्ये कंपनी सरकारने प्रतापसिंहाशी तह करुन त्याला 14 लाखाचा प्रदेश देण्यात आला. त्यात नीरा व वारणा या नदयांमधील प्रदेश तसेच भीमा व कृष्णा यानदयांच्या

संगमापर्यतचा मुलुख त्यास देण्यात आला. प्रतापसिंहास कंपनीचा हेतु स्पष्ट दिसु लागला होता पण आता वेळ पुर्ण पणे निघुन गेली होती. ब्रिटिशांचे साम्राज्य वाढले आपण नाममात्र राहिलो आहे याची समज झाली. बलाढ अशा कंपनी सरकारशी भांडणने म्हणजे आपल्या पायावर आपणच धोडा पाडने होते. म्हणुन त्याने असेल त्यातच समाधान मानले व पुढे दहा वर्षे राज्यकारभार शहाणपणाने व हुशारीने चालवला.[54]

ब्रिटिशांची वागण्याची व बोलण्याच्या या सर्व गोष्टी प्रतापसिंहाला कळून चुकल्या होत्या. ते आपल्याला निरनिराळया अपमानकारकर अटीत अडकवाण्याचा प्रयत्न करतात हे प्रतापसिंहाच्या लक्षांत येऊन त्यांनी ब्रिटिश विरुध्दात आवाज उठवण्यास सुरु केली. ब्रिटिशांचा हस्तक 'बाळाजीपंत नातू' याने छत्रपती यांच्या घरांत भांडणे लावुन प्रतापसिंहाचा भाऊ शहाजी यास वेगळे करून प्रतापसिंहाचा दिवाण गोविंदराव यास ब्रिटिशांनी कैद केले. यावेळी प्रतापसिंह यांनी ब्रिटिशांच्या विरोधात राज्य कारभार चालु केला त्यांने आता ब्रिटिशांचे ऐकले सोडुन दिले. आगष्ट 1839 मध्ये ब्रिटिश सैन्य पुण्यावरून निघाले व ते सातारा येथे आले त्यावेळी सेनापती बळवंतराव यांनी ब्रिटिशांशी लढण्याती तयारी केली, परंतु प्रतापसिंहाने त्यास मानई केली. सन 1839 सप्टेंबर मध्ये अखेरीस प्रतापसिंहास छत्रपती या पदावरुन काढून त्यास बनारस येथे कायमचे नेऊन ठेविले. छत्रपती प्रतापसिंह व त्यांचे पेशवे असे दोघेही जण जे एकदा महाराष्ट्राबाहेर गेले ते कामचेचे गेले. ब्रिटिशाना सन 1857 च्या उठावात प्रतापसिंहाचा संशय आला म्हणुन त्याला हिंदुस्थान बाहेर कराचीस नेऊन ठेवले. प्रतापसिंहाने आपले राज्य मिळवण्यासाठी भरपूर प्रमाणात प्रयत्न केले. इंग्लंड येथे त्याने अनेक पत्रव्यवहार केले परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही शेवटी त्याच्या हातात निराशाच आली.

4.15.3. सातारा राज्य खालसा -

महाराष्ट्राच्या सिंहासनावर चढण्याची छत्रपती ही एक महत्वाची पायरी आहे असे समजल्यावर ब्रिटिशांनी ती पायरी आपल्या सोयीसाठी पुन्हा उभी केली व आपले कार्य पुर्ण करून महाराष्ट्राच्या सिंहासनावर चढल्यानंतर त्यांनी त्या पायरीची वाटेल तशी वाट लावली. सुमारे पंचवीस तीस पावसाळे लोटले नाही तोच त्यांनी ती पायरी उचलून दूर

भिरकावून दिली. सन 1829 मध्ये कंपनीच्या संचालकांकडून मुंबईच्या सरकारकडे आलेल्या पत्रात म्हणटले होते, ''सातारा राज्याच्या प्रशासनाबद्दल जे प्रशंसेचे उदगार काढले आहेत ते वाचून आपण प्रभावित झालो आहोत, हिंदूस्थानातील संस्थानिकांमध्ये तो एक सौम्य प्रकृतीचा, मितव्ययी, आपल्या कामाकडे लक्ष देणारा, ब्रिटिशांनी केलेल्या उपकारची जाणीव असणारा, व त्याच्याशी चांगले संबंध ठेवण्याची आवश्यकता आहे असे मानणा-यांपैकी सातारा छत्रपतीचे राज्य एक आहे असे शिफारस पत्र प्रातासिंहाला देण्यात आले पण यानंतर सन 1834 मध्ये कंपनीने तडका फाडकी कशा बद्दल प्रशस्तिपत्र त्यांला प्रदान करायचे ही मागणी मुंबईला कळवली तेव्हा त्यांला मुंबई गव्हर्नरने तलवार व प्रशस्तिपत्र देण्याचे सांगीतले यावेळी पण मुंबईचा ग. 'रॉबर्ट ग्रॅट' याने पत्र व तलवार दिली नाही तर ''तुम्हाला पदच्युत का करू नये अशी नोटीस दिली''[55] यात बाळाजी पंत नातू हा पण सामिल होता. नातू याला छत्रपतीची दिवानी पाहिजे होती पण प्रतापसिंहाने त्याला ती दिली नाही. ब्रिटिशांच्या पुढाकाराने त्याने ती मिळवली व सातारा राज्यात अनेक कारस्थाने रचली पुढे छत्रपतीनी कंपनी विरुध्द बंड वाल्याना सात देणे, बंड घडवून आनने, पोर्तुगीजांशी संगनमताने कंपनी विरुध्द कारवाया करणे, नागपूरचे माजी राजे आप्पासाहेब यांच्याबरोबर मैत्री करून कंपनी विरुध्द कारस्थाने करणे या सर्व प्रत्नात अडकून त्याना मोठया संकटात टकाण्याचा प्रयत्न चालु केला होता.

छत्रपती प्रतापसिंह हे कंपनी सरकार पुढे 'मोडेन पण वाकनार नाही' हा मराठी बाणा त्याच्या अंगात भिनला त्याचे राज्य हे सार्वभौम तर नव्हते पण ब्रिटिश सरकारकडून त्यांला अपमाण कारक वागणूक मिळत होती. सन 1819 च्या तहानुसार पुन्हा छत्रपती यांच्यावर पुर्वग्रहदोषित असा तह करण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केला पण त्यात यश आले नाही. यांनतर 5 सप्टेंबर 1839 छत्रपती यांना पदज्युत केले. 'कंपनीने जाहिरनामा काढून छत्रपती यांचा भाऊ आप्पासाहेब ऊर्फ शाहाजी हे प्रतापसिंहाचे धाकटे भाऊ यांना ब्रिटिशानी छत्रपती म्हणुन सन 1839 मध्ये नेमण्यात आले.' त्याच्याकडे असलेला सहा जहागीरदारी वरील ताबा ब्रिटिशांनी स्वतःकडे घेतला.

छत्रपती शाहाजी यांनी पुढे सामाजीक कार्यात मोलाचे कार्य केले आहे त्यात शाळा, दवाखाने, सार्वजनिक बांधकामे करुन जकातीची पुनर्रचना केली. सती व गुलामगिरीसारख्या अनिष्ट प्रथा बंद केल्या, सामाजिक कामात जास्त भर दिला, चांगले शासक म्हणुन ब्रिटिशांनी त्याची प्रशंसा केली. पुढे सन 1848 मध्ये शाहुनी आपल्याच सातारा घराण्याचा एक मुलगा दत्तक घेतला होता. त्यानंतर काही काळात छत्रपती मरण पावले परंतु सातारा संस्थान हे ब्रिटिशांच्या सृष्टित असल्यामुळे, तसेच ग. ज. डलहौसी यांचे दत्तक नामंजुर विधानाने चांगलाच पेच निर्माण केलेला होता. त्यानुसार दत्तक छत्रपतीस घेता येनार नाही. त्यामुळे सातारकरांनी तशी संमति घेतली नसल्या मुळे, तसेच प्रतापसिंह व शहाजी यांना दोघानाही पुत्र नव्हते त्यामुळे ब्रिटिश सरकारने तारीख 16 मे 1849 रोजी सातारा राज्य खालसा केले आणि छत्रपतीच्या राज्याचा शेवट झाला.[56] या गोष्टीला ग. ज. डलहौसी यांचे खालसा धोरण तसेच एलफिन्स्टन याच्या विस्तारवादी धोरणाने मराठी साम्राज्य संपले महत्वाचे म्हणजे सन 1795 पासून 1818 पर्यंत पेशवे व 1818 पसून 1849 पर्यंत छत्रपती ही दोन्ही पद व त्याच बरोबर मराठी राज्य ब्रिटिशांनी गिळंकूत केली.

राज्य खालसा केल्यावर ब्रिटिशांचा अंमल साक्षात चालू झाला. ब्रिटिशानी आपल्या सोयीसाठी हे राज्य उत्पन्न केले आणि आपले काम झाल्यानंतर ते खालसा केले. यावर ग. ज. डलहौसी आपल्या ता. 30 ऑगस्ट 1848 च्या खलित्यात म्हणतो, - ''सन 1818 साली पेशवाईचा नुकताच अंत झाल्यामुळे ब्रिटिश सत्तेला महाराष्ट्राचा पाठिंबा मिळावा म्हणुन त्यावेळी सातारचे राज्य अबाधित राखणे अत्यंत जरुर व शहाणपणाचे होते. त्याकरिता त्या वेळचे अधिकारी प्रशंसेस पात्र आहेत. पण पेशवाई ताब्यात घेऊन ब्रिटिशानी आपल्या कार्यपध्दतीने येथील राज्य चालवले व प्रजाही दंगाधोपा न करता शांतपणे नांदत होती. यामुळे ब्रिटिश राज्य आता मजबूत झाले असून शिंदे, होळकर हे निरुपद्रवी बनले आहेत. तेव्हा शिवाजीच्या वंशाचे हे बुजगावणे यापुढे ठेवण्यात काहीच मतलब नाही. अशा प्रकारे सातारा हे मराठी साम्राज्याचे आदिपीठ होते. ते राज्य संपले व मराठीशाही पुर्ण पणे संपली.''

4.16. मराठी साम्राज्य पराभवाची कारण मिमाक्षा -

आपण बघितले की, मराठी साम्राज्याचा शेवट झाला पुण्यातील पेशवाई सन 1818 मध्ये तीचा अंत झाला. तसेच कालंतारने छत्रपतीची गादी स्थापन करून ब्रिटिशांनी तिला खालसा करून घेतले. यानुसार मराठयांचे सर्व हक्क, अधिकार, कायदे, संपुष्टात आले. सातासमुद्रा पार अलेले परिकय यांनी हिंदूस्थानावर आपला अंमल घट बसवला. ब्रिटिशांची मुसूद्देगिरीही मराठयांपेक्षा वरचढ ठरली. सन 1600 मध्ये व्यापारासाठी भारतात आलेल्या 'ईस्ट इंडिया कंपनी' अर्थात ब्रिटिश लोक यांनी हळूहळू व्यापार व साम्राज्य विस्तार दोन्हीही केले. कोणाच्या मनात पण आले नसेल की, हे परकिय व्यापारी एक दिवस आपल्यावर सत्ता गाजवतील म्हणून तेव्हाच्या भविष्यात व आताच्या भूतकाळात तसे घडले आहे. ब्रिटिशांनी आधुनिकरणाचा पुर्ण फायदा उठवून त्यांनी सन 1818 मध्ये हिंदूस्थान आपल्या ताब्यात घेतला. हिंदूस्थानवर यावेळी मराठी सत्तातेने तिन शतके आपले पाळमुळे खोलवर चांगलेच रुजवले पण ती नुसती वरवर होती, ती खोलवर घट बसलेली नव्हती, तिची राजकीय यंत्रणा नीट नव्हती, एकत्र कारभार नव्हता. हळुहळु छत्रपती लांब जाऊन पेशवे हे मराठी राज्याचे प्रमुख बनले पण प्रमुख पदाला शोभेल असे सन 1795 पासुन वर्तन झाले नाही. जे वर्तन पहिले बाजीराव, थोरले माधवर यांनी केले ते दूसरे बाजीराव पेशवा याच्या अंगात ती कर्तबगारी, योग्यता नव्हती. मराठी सत्तेचे सत्तेसाठी आप-आपसातील भांडणात गुंतले याचाच परिणाम असा झाला की स्वराष्ट्र व स्वातंत्र्य हा गोष्टी सर्व मराठा मंडळातील नेते विसून गेले. शिस्तीचा अभाव, एकोपा यांचा अंत होत चालला होता. यावेळी शत्रु कोण आणि मित्र कोण हेच मराठी साम्राज्याच्या धण्याला कळाले नाही याचा परिणाम असा झाला की, ब्रिटिशानी प्रत्येक मराठा मंडळाच्या नेत्याला एकएकटे गाठून त्यांचा पराभव केला व आपले मांडलिकत्व त्यांना स्वीकारण्यास भाग पाडले.[57]

मराठयांनी ज्या पध्दतीने खर्डाच्या युध्दात आपली एकी दाखवली त्याच पध्दतीने त्यांना पुढे कायम राखता आली नाही. त्यानंतर पेशवा सवाई माधवराव यांचा झालेला मृत्यु, नाना फडणीन यांनी मराठी सत्तेला वेठीला धरले यामुळे मराठी सत्तेत गोंधळ

घालण्याचे काम केले. त्यात प्रबळ असा पेशवा, खंबीर नेतृत्व मराठी साम्राज्याला लाभले नाही. सरंमजाम व जहागिरी हे वाढवण्यासाठी आप-आपसातील हेवेदावे कमी झाले नाही. तसेच आपला देश किंवा देशअभिमान, पेशवा बदल वाटनारा आदर, शिस्तबद्ध, सैन्याची पध्दती, आधुनिक तोफा, बंदूका यांचा मराठी साम्राज्यात मोठा अभाव दिसून आला. आठराव्या शतकातल्या हिंदूस्थानातील ब्रिटिशांनच्या (ईस्ट इंडिया कंपनी) मागे इंग्लड राष्ट्राचे पुर्ण सामर्थ उभे होते. म्हणून इंग्लंड पासून हजारो मैल दूर असलेला हिंदूस्थानचा प्रदेश, त्या प्रदेशाचा अपरिचितपणा, तेथील प्रतिकूल हवामान व परकीय लोक आणि हिंदूस्थानातील ब्रिटिशांची अल्पसंख्या, या सर्व अडचणींवर मात करून बुध्दीच्या व संघटनाच्या बळाच्या जोरावर ब्रिटिशांनी हिंदुस्थान मध्ये राज्य स्थापन केले.[58] ब्रिटिश हिंदूस्थानात सर्व भागात आपला व्यापार करत त्यांच्या मध्ये हिंदूस्थानच्या प्रतेक भागात, प्रांतात एकवाक्यता दिसून येत होती. आधुनिक करणाची त्यांच्या विकासात भर पडली यामुळेच त्याना बलाढ सैन्य सत्तेला नमवून विजय हस्तगद करता आला. मराठयांना सत्तेचे व स्वातंत्र्याचे मोल शेवट पर्यंत कळाले नाही.


मराठयांच्या शेवटा बाबत सरदेसाई म्हणतात, ''मराठयांच्या शेवटाचे महत्वाचे कारण म्हणजे ब्रिटिशांची मुसूद्देगिरी होय. वेलस्ली बंधू, उत्तरेकडील शिंद्यांकडचे किंवा नागपूरचे ब्रिटिश वकिल हे सर्व एकापेक्षा एक ब्रिटिश अंमलदार मराठयांचा पाडाव करण्यास चंग बांधुन उभे राहिले. त्यांनी राजकारणाने व फुंद फितुरीने आमच्यात फूट पाडली. गुप्त बातम्या मिळविल्या, फितूर केले, जाहीरनामे काढून व नाना प्रकारची लालूच दाखवून लोकमत आपल्या बाजूस मिळविले. सरदारांत व सावकारांत आपल्या सत्यवचनाची व व्यापारी देवघेवीची ताकद हळुहळु वाढविली. आणि त्याच पध्दतीने मराठयांची ताकद कमी केली. तसेच सुक्तासूक्त मार्गानी संधी साधून त्यांनी एक एक मराठे सरदारांस अलग केले त्यांची जूट होऊ दिली नाही. युक्तीच्या काररांनी त्याना आडकवून ठेवले.''[59]

मराठयांचा राज्यव्यवस्थेतील दोष वाढच चाले यामुळे विशाल मराठी साम्राज्यात राज्यव्यवस्था, आपसी पणा वाढत होता. मराठी राज्याव्यवस्थेतील दोषांची

मोजणी करताना 'स्टेवार्ट गॉर्डन' इतिहासकार यांच्या मते मराठयांमधील गटबाजी व कारस्थाने ही महत्वाची ठरताता मराठयांच्या अस्तित्वास संपवण्यासाठी मराठयां मधील अंतर्गत वाद कारणीभूत ठरतात. ज्या पध्दतीने मराठयांमध्ये अंतर्गत वाद वाढला तो म्हणजे प्रथम शाहू व ताराबाई यांच्यातील वाद, दूसरा नारायणरावाच्या वधानंतर बाराभाई व राघोबा दादा यांच्यात वाद, तिसरा वाद म्हणजे पेशवा सवाई माधवराव यांच्या मृत्युनंतर म्हणजेच दुसरा बाजीराव व शिंदे व होळकर, भोसले इ. यांच्यातील वादा मुळे मराठीशाही लयास गेले. तसेच स्टेवार्ट गॉर्डन पुढे मराठयांच्या दोषांची यादी देतात ते म्हणतात, 'There was no graded civilian/military ranking with attendant symbols of authority. Those in the military were not, until late in the eighteenth century, full time professionals. The Maratha polity did not, and could not; impose a uniform legal or revenue system. It never minted a uniform high quality currency; neither did it build the straight roads.'[60]

INDIA in 1823.

22.



Justus Perthes, Gotha.

प्रकरण पाचवे

महाराष्ट्रात ईस्ट इंडिया कंपनीचे दृढिकरण (पायाभरणी)

5.1 प्रस्तावना -

आठराव्या शतक हे भारतीय इतिहासा मधील राजकीय व अर्थिकदृष्टया परिवर्तनाचा कालखंड होता. हा काळ सामाजिक असुरक्षितता, नितीमत्तेचा हास करणारा व सर्वसामान्य व्यक्तिच्या हितसंबंधाना बाधा आणणारा होता. - प्रो. काली किंकर दत्त म्हणतात, "आठराव्या शतकाच्या मध्यापासून समाजामध्ये बदल घडविणारे प्रवाह भारतामध्ये निर्माण होऊ लागले. यात महत्वाचे योगदान लाभले ते मॉउट स्टुअर्ट एलफिन्स्टन व सर जॉन माल्कम यांचे यांनी भारतीय समाजाचे कौतुक केले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये भारतीय समाजातील चांगल्या परंपरा कशा टिकून राहिल्या याबद्दल भारतीयांची स्तुती केली. हिंदूच्या जातिव्यवस्थेमुळे या चांगल्या परंपरा टिकून राहिल्या असा विचार सर जॉन माल्कम यांनी मांडला." सन 1829 साली 'आर. रिकार्डस' याने भारतीयांबद्दल चांगले उद्गार काढले आहे तो म्हणतो, 'मानवी मनाचे सर्वश्रेष्ठ गुण भारतीयांमध्ये मला आढळून आले.'[1]

सोळहव्या शतकाच्या शेवटी व सतराव्या शतकाच्या सुरवातीश महारष्ट्रात असलेली राजकीय परिस्थिती मराठयांच्या उदयासाठी अनुकूल ठरली. छत्रपती शिवाजी महाराजानी स्थापन केलेले स्वाराज्य हे हिंदूस्थानच्या नकाशात मोठा विस्ताराने व झपाटयाने दिल्लीच्या तखतापर्यंत जाऊन पोचले होते. आठराव्या शताकात मात्र या साम्राज्याला उतरती कळा लागुल ते साम्राज्य सन 1818 मध्ये ब्रिटिशांच्या हातातील बाहुले बनले या घटनेने परकिय सत्ता पुन्हा हिंदूस्थानाच्या कानाकोपयात स्थापली गेली. व्यापाराच्या निमित्ताने आलेली इंग्लंडची ईस्ट इंडिया कंपनी हिंदूस्थानला भारी भरली, सर्व हिंदूस्थानवर एक सुत्री सत्ता स्थापन केली. 'ईस्ट इंडिया कंपनी' सन 1600 पासून 1800 पर्यंत 200 वर्षात जेवढे राज्य मिळवले तेवढे राज्य मराठयांनी चाळीस वर्षात कमावले मात्र मराठयांचे

राज्य थोडयाच काळांत नष्ट झाले. दिवसेन दिवस परिवर्तन होत राहते, यासाठी आधुनिक करणाची गरज असते. ती गजर येथील ऐतद्देशीय राज्यानी विचारत आनली नाही. बदल करणे हा काळाचा नियम असतो, तो नाही केला तर तो होत असतो हे नक्की आहे. नदीला महापुर आला म्हणजे पाणी आसपास पाच-चार कोसपर्यंत पसरतें आणि मग ओसरते अखेरीस उन्हाळयांत पात्रात पाण्याचा थेंब सुध्दा राहत नाही त्या प्रमाणे मराठयाची स्थिती झाली.

सन 1813 पर्यंत भारत ब्रिटिश कंपनीने अनेक भागात आपला अधिकार बसवलेला होता. ज्या भागावर अधिकार प्राप्त करायचा राहिला होता. ते प्रदेश मोठया प्रमाणात कमकुवत झालेली होती. ब्रिटिशांनी हळूहळू येथील परिस्थितीचा अभ्यास करून भारतीयाच्या प्रथम मनावर व नंतर राज्यावर राज्य करण्यास सुरवात केली. येथील राजकीय परिस्थिती म्हणजे मुगल बादशहा तो पुर्ण पणे दुसया राज्याच्या आहरी जावून संपला होता. उत्तरेकडून येणारे संकट ग. ज. लॉर्ड मिंटो ने पंजाब, सिंध, इरान इ. प्रदेशांशी तह करुन संकट थांबवले होते. त्यानी नेपाळ संगेही प्रेमाचे संबंध करून घेतले होते. पण शेवट ब्रिटिशाच्या विजय यात्रेमध्ये त्याचा सर्वात मोठा शत्रु मराठा होय. मराठा शक्ती आतुन पुर्ण पणे संपली होती पण तीच्यात आजुन मोठया प्रमाणत जिव शिल्लक होता. तिजे तुकडे मोठया प्रमाणात झालेले त्याच्यात आजुनही ब्रिटिशाना शह देण्यासाठी प्रयत्न चालुच होते. त्याना तसेच सोडून पुढे जाने म्हणजे मोठी कसोटीचे काम होते. ब्रिटिश साम्राज्याला वाटत होते आता मराठयाचा सर्वनाश करून संपुर्ण भारतातवर आपला अधिकार प्रस्तापित केला पाहिजे त्याचे योग्य पणे पालन करून सन 1818 मध्ये मराठी सत्ता संपवली व सर्व अधिकार कंपनीने आपल्या हातात घेतले.

इंग्लड मधुन अनेक कंपनीचे अधिकरी हिंदूस्थानात कंपनीचा कारभार पाहण्यास आले त्यात काहीनी कंपनीचा कारभारच पाहिला तर काहीनी सत्ता विस्तार याकडे लक्ष दिले. त्यात ग. ज. लार्ड वेलस्ली, ग. ज. डलहौसी, ग. जॉन माल्कम व एलफिन्स्टन यांच्या कार्याचे मोल हिंदूस्थानात महत्वाचे आहे. कंपनीने मराठी राज्य जिंकले या सर्वाचे श्रेय एलफिन्स्टन याला देणे योग्य ठरेल. त्याने येथील लोकाची संस्कृती,

व्यवस्था, राहणीमान हया सर्वाचा अभ्यास केला व हे सर्व ठिकून ठेवण्याचे काम केले. 'मराठी राज्याच्या शेवटास जसा तो कारणी भूत होता, तसाच आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीस त्यांनी मोलाचा हात-भार लावला होता.'' पेशवा दु. बाजीरावाच्या शरणागतीनंतर मराठी मुलुखाची व्यवस्था लावण्याची जबाबदारी एलफिन्स्टनवर येऊन पडली हा फार उदारमतवादी होता.[2] सन 1818 मध्ये मराठयाचे राज्य ब्रिटिशांच्या ताब्यात गेले व मुंबई हा मोठा इलाखा ब्रिटिशाना लाभला या प्रदेशाची दैनंदिन प्रशासनाची जबाबदारी कंपनीने आपल्या हाती घेतली. जबाबदारी घेतल्यावर कंपनीला येथे प्रशासन नेमावे लागले त्यात कलेक्टर, डेप्युटी कलेक्टर, सर्व्हेयर, कमिशनर हे नवीन अधिकारपदे निर्माण करणे गरजेचे होते कारण, ऐवढया मोठया प्रांताची व्यवस्था लावणे गरजे होते. त्यानुसार त्यानी विशाल राज्याचे चार विभाग पाडून येथील चोख व्यवस्था लावली होती. ही चार विभाग सन 1819 मध्ये मुंबई प्रांतात विलीन झाले व सर्व कारभार गव्हर्नर एलफिन्स्टन याच्या हातात आला.

महाराष्ट्रात ब्रिटिशांनी स्थापन केल्याले राज्य हे एक प्रकारे समाजात परिवर्तन व विकास यांचे होते. महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा व शिक्षत, आधुनिकी करण करण्याचे काम ब्रिटिश राजवटीत जोमाने वाढीस लागले होते. याच सुमारास महाराष्ट्रात अनेक ठिकाणी छोटी-मोठी सशस्त्र बंड ब्रिटिश कंपनी राजवटी विरुध्द होऊ लागली. सन 1857 मध्ये बंडाच्या मोठया ज्वाला निर्माण झाल्या कोल्हापूर, सातारा, मुंबई, नागपूर, खानदेश, नाशिक, औरंगाबाद, जमखिंडी इ. ठिकाणी ऐतद्देशीय सैनिकांनी ब्रिटिशान विरोधी उठाव केले पण ब्रिटिशांनी महाराष्ट्रात या उठावाना पुर्ण पणे शांत केले त्यांनी महाराष्ट्रातील सामाजिक संस्था, वत्तपत्रे, सामाजिक सुधारणा करण्यास सुरवात केली. आपल्या समाजातील मूर्खपणा मोडण्यास इंग्रजी शिक्षण धावून आले. प्राचीन भारतातील समाज, धर्म हे सुसंस्कृत व सभ्य मानले जात होते परंतु काळाच्या ओघात हे सर्व मागे पडून ऐकोणाविसाव्या शतकापर्यंत त्यात विघातक बदल घडून ओल. हिंदुस्थानात परिणामी पारतंत्र्य आलेच परंतु स्त्री व पुरूष, शूद्रांचे साधारण मानवी अधिकारही तत्कालीन धार्मिक व्यवस्थेने नाकारल्याने समाजाची सर्वागीण प्रगती खुंटली. अशा परिस्थितीत व्यक्तिस्वातंत्र्य,

सामाजिक व धार्मिक बंधनाची मर्यादा, मानवतावाद, बुध्दिप्रामाण्यवाद या पाश्चात्य विचारांची इंग्रजी शिक्षणाद्वारे ओळख झाल्याने भारतीय व विशेषतः महाराष्ट्रातील सामज व धर्म सुधारकांनी जवळ-जवळ शतकभर यासाठी कार्य केले व त्यातूनच पुढे राष्ट्रवादाचा उद्य झाला.

5.2. महाराष्ट्रात कंपनीच्या विस्ताराचे यश -

सतराव्या शतकात मराठयानी आपल्या सत्तेने साम्राज्याचा कळस रचला होता. यात उत्कृष्ट कामगीरी केली ती पेशव्यानी मराठी सत्तेचा झेंडा सर्व हिंदुस्थानभर लावला होता. सत्ता वाढली तेवढीच जबादारी पण वाढली संघर्ष वाढतच गेला यातच पानिपत सारखी लढाई झाली यात मराठयांचा पराभव झाला यामुळे मराठयाच्या वर्चस्वाला धोका निर्माण झाला तरी पण यातुन सावरुन त्यांनी पुढील साठ ते सत्तर वर्षांत सत्ता जिंवत ठेवली व वर्चस्व वाढले. सतराव्या शतका ब्रिटिशानी आपला पाया बंगाल व मद्रास येथे चांगल्या प्रकारे बसवला होता. मराठया मधील गृहकलह, हेवे दावे, आप-आपसातील राजकारण याचाच फायदा ब्रिटिशांना घेता आला.

31 डिसेंबर 1600 रोजी इंग्लड देशात ‘ईस्ट इंडिया कंपनीला’ व्यापाराची कायदेशीर हक्क मिळाला त्यांनतर त्यांनी आपले जाळे पसरवण्यास सुरवात केली. सन 1609 मध्ये कंपनीचा एक आधिकारी ‘टिन हॉकिन्स’ भारतात आला त्याने सुरत येथे मोगल बादशहाकडून व्यापाराची परवानगी घेतली तेव्हा पासून कंपनीचा व्यापार खया अर्थाने भारतात सुरु झाला. पुढे भारतात ‘तराजू - तलवार - तख्तद’ असा प्रवास कंपनीने सुरु केला. भारतात कंपनीने मुघल साम्राज्यातील प्रदेशात स्वतःचे बस्तान बसविले होते. इंग्लडचा राजा ‘दुसरा चार्ल्स’ याचे लग्न पोर्तुगालची राजकन्या ‘कॅथेरिक ब्रॅगांझा’ हिच्याशी झाले, तेव्हा पोर्तुगीजांनी मुंबई बंदर ब्रिटिश सरकारला हुंडा म्हणून दिले त्यानंतर तेच बंदर राजाने कंपनीला भाडे तत्वाने दिले. हा सारा प्रकार म्हणजे हलवायाच्या घरावर तुळशीपत्र होते. याच काळत ब्रिटिशांकडे स्वतः मराठे मदतीसाठी चालुन गेले ते म्हणजे रघुनाथरावानी घेतलेली मदत तसेच नानानी पेशव्याच्या दरबारात कंपनीचा वकील याला

दिलेली परवानगी होय. येथून पुढे ब्रिटिशांनी आपले सत्ता विस्तारासाठी पावले उचलण्यास सुरवात केली.

ब्रिटिशांनी या सर्व गोष्टीतुन आपला फायदा करून घेतला. सन 1818 ते 1857 या कालखंडात कंपनीने आपली सत्ता झपाट्याने महाराष्ट्रात पसरविली. सातारच्या छत्रपती प्रतापसिंह यांना फसवून त्यांच्या अंमलाखाली असणारी संस्थाने कंपनीने ताब्यात घेतली. 'गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसीने दत्तक वारस नामंजूर धोरण रावबून संस्थाने ताब्यात घेतली.' त्यात मराठयांचे साताराच्या छत्रपतीचे म्हणजेच मराठयांचे श्रध्दास्थान असणारे 6 मे 1849 मध्ये मराठा राज्य खालसा केले.[3]

इ. स. 1817 ते 1818 इंग्रज मराठा युध्दानंतर दख्यन मधील मराठयांचा प्रदेश ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आला त्या प्रदेशाचा कारभार पाहण्यासाठी पुण्याचा वकिल आणि मुंबईचा गव्हर्नर यांच्या दरम्यान 'डेक्कन कमिशनर' हे पद नव्याने निर्माण करण्यात येऊन त्या पदावर 'सर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन' यांची नेमणूक झाली.[4] ब्रिटिश कंपनी सरकारच्या ताब्यात बलाढ असे मराठी साम्राज्य आले. मराठे व ब्रिटिश यांच्यात झालेले युध्द रक्त रंजित व प्रत्यक्ष रणभूमिवर झालेले होय. यामध्ये ब्रिटिशांनी पेशवा पद कायमचेच परखास्त करून टाकले पुण्यात कोणत्याच प्रकारचा दरबार किंवा सत्ता स्थान ठेवले नाही. यानंतर छत्रपती यांची आस्मिता पुन्हा जागृत करून त्यांना नाममात्र गादीवर बसवले पण पुर्ण कारभार ब्रिटिशांन मार्फत चालु झाला. कंपनी सरकारचा हस्तक, कंपनी सरकार व छत्रपती यांच्यातील दुवा होण्याचे काम केले ते म्हणजे 'बळवंत मल्हार चिटणीस' यांनी ब्रिटिशांन बरोबर छत्रपती कोणाला नेमावे यांच्यासाठी महत्वाची मध्यस्थी करून प्रतापसिंह यांना छत्रपती पद देण्यास भाग पाडले यामुळे हे राजकारण जिंकले तेव्हा चिटणीस यांना 'निशाणसूज्ञ' असा किंताब व अष्टप्रधान मंडळात 'सुमंतपद' देण्याचे मान्य केले.[5] ब्रिटिशांनी मराठी राज्याचा पंतप्रधान (पेशवा) याना शेवट का होईना जेरीस आणुन शरणागती घेण्यास भागच पाडले त्यानुसार ब्रिटिश सैन्याने दु. बाजीरावाचा पाठलाग करुन त्यांची कोंडी करताच 3 जुन 1818 ला असिरगडच्या परिसरात सकाळी 10 च्या

सुमारास 'ब्रिगेडिअर सर जॉन माल्कम' समोर शरणागती स्विकारल्याने मराठी सत्तेचे सर्व आधिकार गमवुन शेवट येथेच झाला.[6]

छत्रपती प्रतापसिंहाच्या संदर्भात 'गव्हर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंग्ज' यांनी विचार विनिमय करुनच प्रतापसिंह राजाला मर्यादित स्वातंत्र्य देण्याचे निश्चित केले. समाजाची चौकट न बदलता पूर्वी पासून चालत आलेल्या संस्था अधिक कार्यक्षम बनविल्या तर ते रयतेला जास्त हितकारकर होईल, असे एल्फिन्स्टन यांचे मत होते. तसेच कंपनी सरकारच्या अंतिम हेतू विषयी कोणताही संशय येऊ द्यायचा नसेलतर सातारकर छत्रपती कायम राखणे गरजेचे होते. या राजकीय व सामाजिक गरजेतून सातारा राज्य जन्माला आले. ब्रिटिश कंपनीला नव्या सातारा राज्यामुळे छत्रपती शिवाजीच्या वंशाला पुन्हा स्थानापन्न केल्याचे श्रेय मिळेल व प्रजेचा विरोध कमी होईल आणि प्रजेचे पुनर्रचनेसाठी सहकार्य मिळेल हा हेतु मनात ठेवुन त्यांनी हे सर्व केले. कंपनीचा लढा शिवशाहीशी नसून त्यांच्या पदरी आसणारे मंत्री, अधिकारी जे पेशवे, जहागिरदार, सरमजाम, सावकार, सरदार इ वर्ग यांच्या विषयी लढा होता. हाच प्रचार कंपनी सरकार तर्फे करण्यात येत होता यामुळे ब्रिटिशांना मराठी राज्यात आपल्या सत्तेचा विस्तार करता येणार होता हाच हया निर्णया मागचा विचार होता. त्याच प्रमाणे छत्रपती यांचा येथे फक्त कठपुतळी म्हणुन उपयोग करुन त्यांच्या मागचे सत्तेचे सर्व सुत्रे ब्रिटिशांना घ्यायचे होते त्यानुसार महाराष्ट्रातील ब्राम्हणी सत्ता नष्ट करुन लोकांना जुलमी राजवटीतुन मुक्त करायचे व लोकांचा राजा जो छत्रपती त्याला मर्यादित का होईना राज्य द्यायचे असे आपले नवीन धोरण कंपनी सरकारने जाहीर केले.[7] साताराचा राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी प्रजेच्या सहकार्याची चांगलीच आवश्यकता होती. तेंव्हा छत्रपती प्रतापसिंह यांच्या हातुन ब्रिटिश आपले दोस्त आहेत व पेशवा दु. बाजीराव हा आपला शत्रु आहे. ब्रिटिशांच्या मदतीने आपल्या राज्याची उन्नती होणार आहे, अशा पध्दतीने आश्वासन देणारा जाहीरनामा 14 एप्रिल 1818 रोजी प्रसिध्द करून मराठी राज्याचे प्रेम मिळवण्याचा प्रयत्न केला आणि त्यात त्याना यश आले.[8]

5.3 ब्रिटिश कंपनीच्या वकीलांचे पुण्यातील कार्य -

18 वे शकत हे हिंदूस्थानात परिवर्तन व सत्ता विस्ताराचे एक नविन पर्वच ठरले. हिंदूस्थान मध्ये व्यापारासाठी आलेली 'ईस्ट इंडिया कंपनी' व्यापाराच्या निमित्ताने हिंदूस्थानचा काही भाग आपल्या अधिकारा खाली घेतला. हळूहळू त्यानी येथील ऐतद्देशीय राजाचे मने जिंकली आणि एक दिवस येथील राज्य करते बनले. व्यापार करता-करता त्यानी येथील परिस्थितीचा फायदा व आपल्या बुध्दीचा वापर योग्य ठिकाणी व योग्य वेळीस केला. ब्रिटिश कंपनीने आपल्या बुध्दीच्या व आधुनिकी करणाणे त्यांनी हिंदूस्थानातील सत्तास्थाने हालुन-हालुन त्यांची सर्व पाणे गाळून टाकली. सताराव्या शतकात एक उच्चस्थानि जाऊन पोचलेली मराठी सत्ता तीला टक्कर देणे म्हणजे मोठया संकटात पडणे होय. हळूहळू तीचा पण कधी काळाणे तर कधी आप-आपसातील भांडणाने, व्यापारी कंपनीची मदत घेऊन आपले मरण त्यांनी आपल्याच डोळयानी पाहिले असी परिस्थिती निर्माण करुन घेतली. अशा या मराठी सत्तेला खिळ पाडण्याचे काम ब्रिटिशांनी केले. ब्रिटिशांकडे असलेले हुशार व मुत्सुद्दी मंडळी ज्यानी ब्रिटिश सत्ता महाराष्ट्रात रोवण्याचे व तिची पायाभरणी करण्याचे पुरेपुर काम ग. ज. वेलस्ली, ग. मैटकॅफ, कर्क पॅट्रीक, क्लोज, एलफिन्स्टन, माल्कम, जेनकीन्स, मन्रो यांनी आठराव्या शतकाच्या अखेरीस शौर्य व बुध्दी पणास लावून हिंदूस्थानात मराठी सत्ता घालून ब्रिटिश सत्ता स्थापन केली.[9]

5.3.1 वकिल मॅलेटचे पुण्यात आगमन -

कंपनीने आपली सत्ता मराठी साम्राज्यात रोवण्यासाठी सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात मोठया प्रमाणात प्रयत्न केली. त्यात खरी सुरवात झाली ती सन 1785 मध्ये पुण्यात ब्रिटिशांचा वकिली म्हणुन 'सर चार्लस् मॅलेटच्या' नावाजी घोषणा केली. खास करून मराठी साम्राज्यात मॅलेटच्या कार्याचा परामर्श फार मोठा होता त्याचा उल्लेख करताना 'रियातकार सरदेसाई' म्हणतात ''मॅलेटच्या कारभाराचे तर हेंच मोठे रहस्य दिसून येते कि, पेशव्यापासून तो अगदी शेवटच्या कारकुनापर्यंत त्याने आपल्या सौजन्याने पुण्यांतील लोकांचे प्रेम उत्कृष्ट पणे मिळवले होते. तो गणपती उत्सवासारख्या किंवा मुंजी,

लग्ना, सन, समारंभ इ. प्रसंगांत नियमाने पेशव्याकडे व पुण्यांतील दुसया अनेक सरदार, जहागीरदार वर्ग यांच्याकडे जात असे. मॅलेटने पुण्याच्या वकिलीचे अत्यंत कठिण काम यावेळी केले एकीकडे भिन्न प्रकृतीच्या समस्या चांगल्याच निर्माण झाल्या होत्या त्यात मराठामंडळाची मर्जी सांभाळून राहणे, दुसरीकडे आपल्या कंपनीचे हित पाहुन त्याने ते काम हुषारीने पार पाडले.'' या पध्दतीने हे ब्रिटिश वकिल प्रथम मराठयाशी प्रेमाणे वागत असे. पुण्यात ब्रिटिश कंपनीच्या वकिलाचा प्रवेश झाला त्यानंतर गोड गोड बोलून मराठयांच्या अंतर्गत कारभारात, राजकारणात बारकाईने लक्ष घालून मराठयांचे सर्व कारस्थाने कशी चालतात याकडे ब्रिटिशांची बारीक नजर होती त्याचा आपल्याला कशा फायदा होईल. एखादया बाजूची वकिली करण्यापेक्षा जासुसीचे काम अधिक प्रमाणे करण्यास सुरवात केली. हिंदुस्थानच्या ब्रिटिश साम्राज्यात योवळी बदल झाला ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदूस्थानातील गव्हर्नर जनरल पदावर यावेळी 'जॉन शेअर' यांच्या जागी आक्रमणकवादी 'लॉड वेलस्ली' यांनी हिंदुस्थानातील कंपनीच्या व्यापाराची धुरा संभाळली होती. ग.ज. जॉन शेअरच्या मते ब्रिटिश कंपनी ज्या कार्याला आली आहे ते म्हणजे व्यापार तोच करायचा दुसरे काही नाही त्याने आपल्या वरिष्ठांच्या आज्ञाचे चांगले पालन केले हाते. मराठे व निजाम यांच्यातील सन 1795 मध्ये झालेल्या खडर्याची लढाई यात ब्रिटिशांचा वकिल मॅलेट यांनी मराठयांच्या दरबारी राहुन मराठयांच्या कार्याचा, त्यांच्या धोरणांचा, नितीचा, युध्द कौशल्याचा केलेला अभ्यास हा मॅलेटच्या अनुभवी, मुसूद्दी, चानकश, राजनितीक कौशल या गोष्टीचा चांगला अनुभव पुढील काळात खडर्या सारख्या लढाईत ब्रिटिशांना झाला.[10] यामुळे ग. ज. जॉन शोअर यांनी या लढाईत भाग घेणे किंवा न घेणे याचा योग्य निर्णय घेऊन पुढे भविष्यात चित्र बदलेली दिसली. यावेळी पुण्यातील मॅलेटच्या कार्याचा गोरव ग. ज. जॉन शोअर यांनी केला आहे. मराठयांच्या प्रतेक गोष्टीवर बारिक लक्ष ठेवून त्यांची सर्व बातमी आपल्या वरिष्ठाना कळवण्याचे काम यावेळी मॅलेट यांनी वकिल म्हणून केले होते याचाच फायदा ब्रिटिशांना भविष्यात झाला.

5.3.2 पुणे दरबारात पामर यांची वकिली -

ब्रिटिश कंपनीच्या कार्यात आपले हित पाहुन दुसयाचे हित पाहणारे असेही काही अधिकारी असतात जे आपल्या वरिष्ठाची आज्ञा कायमन पाळण्यासाठी तत्पर असता. पुणे दरबारत मॅलेट नंतर 'कर्नल विल्यम पामर' पुण्यात वकिल नेमले त्याने आपले काम अत्यंत प्रामाणिक पणाने केले. महादजी शिंदे यांच्या दरबारात त्याने दिर्घकाळ नोकरी केली होती. पामर याचा स्वभाव व त्याची वागण्याची वृत्ती ही अत्यंत प्रामाणिक आणि आपल्या सदसद्विवेक बुध्दीने वागण्याची त्याची वृत्ती होता त्यांने मराठयां मध्ये कधीच कुटनितीचे राजकारण करण्याचा प्रयत्न केला नाही. आपल्या पदाची शान व वरिष्ठंचा मान या दोन्ही गोष्टीचा आदर धरला व कायम मराठा व ब्रिटिश यांचे संबंध प्रेमाचे असावेत असे प्रयत्न केले.

ग. ज. जॉन शोअर यांच्या जागी ग. न. म्हणुन लॉर्ड वेलस्ली यांची नियुक्त झाली वेलस्ली यांनी हिंदुस्थानमध्ये अनेक ऐतद्देशीय संस्थांन विरुध्द आक्रमक पाऊल उचलण्यास सुरवात केली. कंपनीचे त्याच बरोबर विस्ताराचे धोरण ब्रिटिश अधिकरी वर्गने आपले वर्चस्व वाढवण्यासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न करण्यास सुरवात केली पण हे सर्व पुण्यातील पामर यांना पसंत नव्हते पुढे प्रमाणीक नौकर म्हणुन कंपनीचे काम केले. याच दरम्यान मराठयाच्या साम्राज्याने आपला वेगळाच सुर धरला होता त्यांच्यात एकी पुर्ण पणे खालवतचाली होती. पेशवा दु. बाजीराव याने ब्रिटिशांचा विश्वास पुर्ण पणे गमावला होता. पेशवा बाजीराव, दौलतराव शिंदे हे मराठी मंडळाचे नेते अपरिपक्व आणि राजकारणात कमी अनुभव असलेले नेते होते त्यांच्या पुढे ब्रिटिशांचे जे आधिकारी होते ते बौध्दीक कौशल्याने मातबर होते यांनी आपल्या विचाराने सर्व मराठी सम्राज्य खिळखिळे करुन सोडले. ब्रिटिशांच्या पुढील धोरणांची जशी पामर यांना लागलेली चाहुल होती ती म्हणजे मराठ्यांचे अस्तिरता या पध्दतीने मराठयांचा अंत निश्चित होईल हे पामरचे म्हणने शेवट खरे ठरले. पेशवा दु. बाजीराव यांनी चुकीच्या पध्दतीने कारभार केला शेवटच्या घटकाला त्याने कोणाचेच काहीच ऐकले नाही. म्हणतात ना 'विनश काले विपरीत बुध्दी' त्याच

पध्दतीने पेशवा बाजीरावाची अवस्था झाली होती. नाना फडणीस यांच्या मृत्यु नंतर मात्र ब्रिटिशानी आपला डाव साधण्याचा प्रयत्न चालु केले. पामर याने वेळोवेळी बाजीरावला ब्रिटिशाच्या सहकार्य घ्यावे येण्यासाठी प्रयत्न चालवले होते पण त्यात यश आले नाही. पेशवा यास आपण काय करतो हे कळत नव्हते तसेच अंगी कोणाचे ऐकून घेण्याची शमता नव्हती, आपले हित त्याला कळत नव्हते. पामरणे त्याला वेळोवेळी ब्रिटिशांन पासुन दुर राहण्याचा इशारा दिला होता.[11]

ग. ज. वेलस्लीने चालवलेल्या आक्रमक धोरण पामरला काही अंशी पसंत नव्हते, पण वरिष्ठांची आज्ञा म्हणुन त्यानी पुणे दरबारी आपल्या चार वर्षाच्या कार्यकाल पुर्ण केला. या काळात तैनाती फौजेला उपयुक्त ठरणारे वातावरण निर्माण करण्याचे काम केले. पण पेशवा यांनी तैनाती फौज घेण्यासाठी व एकतारी दु. बाजीरावाचे मन वळवण्यासाठी तो अपयशी ठरला. पे. दु. बाजीरावाच्या या स्वभावा मुळे पामराला त्याच्याशी कसे वागावे हेच समजत नव्हते. पामरला काय मराठी मंडळातील नेत्यांना तरी कोठे जमले दु. बाजीरावासाठी कोणाचा सल्ला घेणे म्हणजे विष घेण्यासरखे वाटत होते. पामरला दु. बाजीरावासी व्यवहार करणे फार कठीन जात असे. याच दरम्यान मराठ्यांवर दुखाःचा डोंगळ कोळसला तो नाना फडणवीस यांचा मृत्यु मुळे यावर पागर यांनी जे विधान केले त्यात ते म्हणतात ''नाना फडणवीस यांचा मृत्यु झाल्याने त्याच बरोबर मराठा सम्राज्यातील सरकारचे सर्व शहाणपण आणि नियमन नाहीसे झाले'' हया उदगाराने पामरणे मराठी सत्तेची भविष्यातील भाकित केले होते.[12]

5.3.3 वकिल म्हणुन पुण्यात क्लोज याचे श्रेय -

पेशवा दुसरा बाजीराव आपल्या पध्दतीने मन मानिल तसा बलाढ अशा मराठी सत्तेचा कारभार चालवत होता. यामुळे 'ब्रिटिशांनी या पुढे थांबा आणि पहा अशा धोरणांचा अवलंब केला.' यातच पेशवा यांनी ब्रिटिशांशी वसईचा तह केला हे सर्व बाजीरावाकडून करून व घडून आणण्याचे श्रेय **'सर बॅरी क्लोज'** याला जाते. ग. ज. वेलस्लीने या तहाला मान्यता दिली त्यांच्या मते हे काम फार पुर्वी म्हणजेच पामर वकिल आसतानाच होण्यास हवे होते म्हणुन पामरच्या शांततेच्या धोरणा मुळे वेलस्लीने त्याला या

जबाबदारीतून मुक्त केले. त्याच्या जागेवर सर बॅरी क्लोज हा आला व त्याने हा मोठा ऐतिहाशीक तह घडवून आणण्याची कामगीरी बजावली.

पेशवा याचे सर्व गुण, अवगुन ब्रिटिशाच्या आता चांगलेच लक्षात आले त्याचा असणारा स्वभाव वागणे या सर्व गोष्टी ब्रिटिशांनी चांगल्याच हेरून ठेवल्या होत्या. ब्रिटिशानी त्याच्या गुणांना खतपाणी घालण्याचे काम चांगल्याच प्रकारे केले. त्याची सतत खुषामत करणे, त्याला ऐषआरामीत खाजगी जीवन, धर्माचरण यात गुंतवून ठेवणे तसेच बाहेरील राजकारणा पासून दूर ठेवण्यासाठी प्रयत्न करने या सर्व गोष्टीची दखल क्लोज घेत होता. वसई येथे चाललेल्या तहाच्या वाटाघाटीत क्लोजने दु. बाजीरावला सही करण्यास भाग पाडले. या तहाने ब्रिटिशानी आपले सर्व लक्ष मराठी साम्राज्यावर केंद्रीत केले. वसईच्या तहाच्या अटीने कंपनीने आपली सत्ता स्थापनेसाठी मोठया प्रमाणात यश संपादन केले. सन 1811 मध्ये दक्षिणेत ब्रिटिश सत्ता बळकट करुन क्लोज याने पुण्याचा निरोप घेतला. या त्याच्या कार्याविषयी त्याचा सहकारी एल्फिन्स्टन म्हणतो, ''क्लोजच्या एवढा गुणसमुच्चय सहसा एकत्र आढळत नाही. धिप्पाड व सदृढ शरीर, शांत डोके, चलाख बुध्दी, अढळ धैर्य, अचल नीतिमत्ता, अप्रतिम कर्तव्यनिष्ठ आणि डामडौलाचा तिरस्कार इत्यादी गुणांस साध्य व सच्छिल वर्तनाची भर पडलेली असी त्यांच्या सरखा व्यक्ती अलीकडच्या काळात क्वचितच आढळतो.'' या क्लोजच्या गुणा मुळे मराठी सत्तेने आपली सर्व बंधने ब्रिटिशांच्या हातत आपण होऊन दिली.[13]

5.3.4 वकिल म्हणून एलफिन्स्टनने कंपनीची सांभाळलेली धुरा -

ब्रिटिशाची सत्ता मराठी मुलखात स्थापन व विस्तार करण्याचे सर्वात मोलाचे काम कोणी केले असले तर 'माऊॅट स्टुअर्ट एलफिन्सटन' यांनी होय. हिंदूस्थानच्या इतिहास एक महत्वाची कामगीरी बजावण्याची संधी एलफिन्स्टन याना मिळाली होती आणि ती खरी करुन दाखवली. वकिल म्हणुन क्लोज पुण्यातुन गेल्यावर तारीख 28 फेब्रुवारी 1811 मध्ये एलफिन्स्ट हा मराठयाच्या पुणे दरबारात वकिल म्हणुन नेमण्यात आले. एलफिन्स्ट वसईच्या तहाच्या वेळी एक साक्षीदार म्हणुन तेथे उपस्थित होता. पेशवा यांनी तैनाती फौजेचा स्वीकार केल्याने ब्रिटिशाच्या पुण्यातील वकिलाच्या

कामाच्या स्वरुपात बदल होत गेला. योवळी मराठी राज्यात कायदा व सुव्यवस्था कशी राहिली याकडे एलफिन्स्टन यांना बारीक लक्ष यायचे होते त्याच पध्दतीने राजनैतिक दूत, दरबारचा मानकरी, सरकारचा हिंतचिंतक, सैन्याचा प्रमुख इ. कामाची जबाबदारी एलफिन्स्टन यांना पार पाडावी लागणार होती.

महाराष्ट्र हे ब्रिटिश अमलाखाली पुर्ण पणे आले होते यात महत्वाचे म्हणजे एलफिन्स्टन यानी ब्रिटिशांच्या धोरणांची शिस्त बसवून दिली. त्यानी येथील सर्व ऐतद्देशीय प्रजेला आपल्याकडे कामावर नेमण्याची सुरवात केली. ज्या पध्दतीने 'तार्तरलोकांचा चिनी लोकांशी जसा संबंध आहे, तसा ब्रिटिश लोकांचा ऐतद्देशियांशी असावा असे त्यास वाटत होते.' राज्यसुत्र व सेनाधिपती ही काय ती आपण हातांत घेऊन क्रमाक्रमाने स्थानिक व्यवहाराचा बहुतेक भाग त्यांच्या हातात सोपवावा आणि आपण फक्त त्यांना मार्गदर्शन करावे. पण ही व्यवस्था नुसती कागदापूरती नसावी ती असी असावी की त्यामुळे सरकाच्या व्यवस्थापक मंडळीची छाती दडपून जाऊ नये. यासाठी महत्वाची गोष्ट होती ती म्हणजे हे ऐतद्देशिय सिव्हिलियन बनविण्यासाठी त्यांना प्रथम शिक्षण दिले पाहिजे. त्याच पध्दतीने त्याना अनेक क्षेत्रात नोकरी देऊन त्याचे मानधन ठरवले गेले पाहिजे तसेच काही प्रमाणीक व योग्य व्यक्तिना त्याच्या योग्यतेनुसार योग्य क्षेत्रात मोठया जागा दिल्या पाहिजेत, येथील लोकाना राजकीय गोष्टी पासून दूर ठेवले पाहिजे एलफिन्स्टन यास माहित होते की येथे वसाहत करून राहणे धोक्याचे आहे कारण अजून येथील लेखक हे युरोपियन लोकांविषयीच लिहातात म्हणून, ऐतद्देशिय वर्तमानपत्रे इ. मार्फत अनेक गैरसमज निर्माण होतो त्यात येथे वसती करणे म्हणजे गैरसमज वाढवणे होय. त्यासाठी याना आधुनिक जगाची, सुधारणाची, परकिय व्यापाराची व तसेच आपण जर ब्रिटिश भांडवलवाल्यांचे लक्ष्य वेधण्याची योजना केल्यास या देशाचे विशेष हित होईल.[14]

सर एलफिन्स्टन मराठी साम्राज्यात प्रवेश केल्यापासुन त्यांनी येथील सर्व गोष्टीचा अभ्यास केरूनच पुढील पाऊले उचलली होती. पेशवा बाजीरावर खया आर्थाने जेव्हा सत्तेवर आला तेव्हा आपल्या पुढील प्रश्नांची यादी मोठी होती ती म्हणजे, अर्थिक

तसेच सरदार, जहागिरदार व मनसबदार, मानकरी स्वतंत्रपणे वागण्यास सुरवात केली यामुळे पेशव्याला महसुल फारच कमी देत असे. या सर्व घटनांमुळे पेशवा यांनी एल्फिन्स्टन यास मुखत्यार नेमले यावेळी सर्वत्र पेशवा बद्दल स्नेहाची व स्वामीत्वाची भावना राहिली नव्हती. एलफिन्स्टन याने सर्व मराठी मंडळातील नेते व येथील प्रजेचा चांगलाच अभ्यास केला. त्यांचा मराठी साम्राज्याबद्दल असणारा राग त्याने समजावून घेतला होता आणि या सर्वांचा एल्फिन्स्टन यावर पुर्ण विश्वास बसला की, हाच आपल्याला न्याय देईल हे वाटत याचाच फायदा तिसया म्हणजेच शेवटच्या मराठा युध्दात ब्रिटिशाना झाला. एल्फिन्स्टन याने अनेक मार्गाने ब्रिटिश कंपनीचे महाराष्ट्रात प्रेम वाढवण्याचे काम केले. पेशवे आणि जहागिरदार यांच्यातील संघर्षात त्याने जहागिरदारांची बाजू घेऊन मध्यस्थी केली व जहागिरदार वर्गाचे प्रेम आपल्याकडे वळवले. एलफिन्स्टन यांनी यावेळी गुप्तचर शाखा उघडली यामुळे मराठी मुलखातील सर्व गुप्त बातम्या हाती येत होत्या. बाजीरावाने चालवलेल्या कारवाया, कारभार, गुप्त गोष्टी इ. माहितीचा उपयोग योग्य वेळी करुन घेतला.

एलफिन्स्टन यांनी पुण्यातील राजकीय काम कशा पध्दतीने चालते यावर लक्ष केंद्रीत केले आणि त्याच पध्दतीने पुढे सन 1818 मध्ये कंपनीचा अमल चालु झाल्यावर विस्कटलेली महाराष्ट्राची स्थिती योग्य पध्दतीने सुधारणा करून पुन्हा बसवण्यासाठी प्रयत्न चालु केले. पण जेव्हा तो पेशवा दरबारी होता तेव्हा पासुन पेशवा आणि जहागीरदार यांच्यातील आसणारे वाद मोठया प्रमाणात चव्हाटयावर आले होते. दोन्ही पक्ष हट्टी, विशेषतः पेशवा अधिक हट्टी दोघांत समजूतदारपणाचा अभाव त्यामुळे यांच्यातील वाद दिवसें दिवस चिघळत चालले होते. हे वाद सोडविण्याच्या दृष्टीने एलफिन्स्टन यांनी काही योजना आखली ती असी होती, जहागीरदारांची सत्ता कमी करावी, पण नष्ट करू नये, त्यांनी पेशव्याचा बळकवलेला मुलूख त्यांच्याकडून परत मिळवावा. आणि त्याच बरोबर पेशव्याकडून केल्या जाणाया रास्त मागण्याची योग्य ती दखल घ्यावी. या संदर्भत एलफिन्स्टन यानी एक अहवाल तयार केला. त्यात त्याने परस्परांवर झालेल्या अघात, एकमेकांचे झालेले नुकसान एक मेकानी विसरून जावे, द्वेषभावना टाकून द्यावी. पेशवा

आणि जहागिरदार यांच्यातील नियमांचे पालन करून तसेच सैन्य बाळगून सरकारची सेवा इमाने इतबारे करावी असे या अहवालात म्हणटले होते. या अहवालत एलफिन्स्टन यांच्याकडे महत्वाची कामगीरी होती आणि ती म्हणजे उभयतांनमध्ये कोणत्याही कारणाने वाद निर्माण झाल्यास त्याचा निवाडा जो ब्रिटिश करतील तो त्यांना मान्य असेल. यावेळी ब्रिटिश जहागिरदार यांच्या बरोबर कोणताही करार करण्यासाठी मोकळे झाले त्याना पेशव्याच्या संमतीची गरज नसे यावेळी ब्रिटिशानी जहागीरदाराना आपल्या धार्जिणे केले. ‘पेशवे व जहागीरदार यांच्यात सतत तेढ राहील व फुट पडेल असे संबंध निर्माण केले गेले होते. यामुळे ब्रिटिशांनी आपले महत्व मराठी प्रजेच वाढीस लागले यादुष्टीने वागण्यास सुरवात केली.’[15]

एलफिन्स्टन यांनी अहवालत आपल्या धोरणा नुसार व स्वार्थी वृत्तीने त्यात एक महत्वाची गोष्ट नमुत केली, हा करार जर जहागिरदारानी मान्य केला नाही तर ब्रिटिश पेशव्याला त्याच्यावर लष्करी कारवाई साठी मदत करणार होते. पण ब्रिटिशानी जर पेशव्याला समजावून सांगून पण पेशव्याने ते जर ऐकले नाही तर ते या युध्दात पेशव्याला मतद करणार नव्हते. या कराराला जर जहागिरदारनी विरोध केला तर यावेळी ती जहागिरी जप्त करुन त्या ठीकाणी त्याच्याच घराण्यातील इतर पुरूषाची तेथे नेमणुक करण्यात पेशव्याला ब्रिटिश मदत करतील याप्रकारे ब्रिटिशानी मराठी साम्राज्यात अंतर्गत भांडणाला जागा करून दिली. जाहीरनाम्याला गव्हर्नर जनरलने मान्यता दिली व प्रसंगी युध्द करावे लागले तरी हरकत नाही या आपल्या धोरणाने त्यानी मराठी सत्तेला सर्व तो परी पराभव करण्याचे ठरवलेच होते. त्याच पध्दतीने आधुनिकराणाचे धोरणही पुढे चांगलेच राबवण्यास सुरवात केली होती. एलफिन्स्टन यांचे मराठी साम्राज्या बद्दल जे धोरण राबवले ते सत्ता विस्ताराचे होते यामुळे भविष्यात यांच्या वागणूकीचा फायदा आपल्याला घेता येणार होता हे सर्व प्रयत्न यासाठीच होते जेने करून मराठी मंडळाची साथ आपल्याला मिळणार होती. भविष्यात तरी आपल्याला चांगले दिवस येणार हे एलफिन्स्टन यांनी ओळखले आणि पुढे तेच झाले.

5.4 एलफिन्स्टन यांची कारभार पध्दती -

तिसरे ब्रिटिश मराठा युध्द चालु असतानाच हे धावाधावीचे युध्द कसे चालवावे आणि एखाद्या वातचक्राप्रमाणे सर्व देशभर गरागरा फिरणाया या मराठी सैन्यास पायबंद कसा घालावा हा प्रश्न एल्फिन्स्टन यांना पडला होता. तेव्हा त्याने मॅन्रोचा यांचा सल्ला घेतला आणि दूरवर विचार करुन 11 फेब्रुवारी 1818 रोजी एक लांबलचक जाहिरनामा काढून त्याच्या प्रती महाराष्ट्राभर प्रसिध्द केल्या. जाहीरनाम्याद्वारे बाजीरावाच्या नाकर्तेपणा व नालायकीचे माप त्याच्या पदरात घातले गेले असून ब्रिटिश सत्तेने आपले उद्देश स्पष्टपणे जाहीर केले आहेत. तसेच त्यात ब्रिटिशांच्या भावी राज्यात रयतेची व्यवस्था कोणत्या प्रकारने होईल, याची पूर्ण कल्पना दिली. या जाहीरनाम्याने लोकांच्या मनातील कंपनी सरकारबद्दल असलेले संशय दूर झाले. दुसरा बाजीरावास सोडून गेल्यास तो आपला सूड घेईल ही भीती फार नाहीशी झाली आणि जो-तो, सरदार, जहागिरदार, इनामदार व सरंजामदार आप-आपली व्यवस्था लावून घेण्याच्या नादी लागले यामुळे पे. दुसरा बाजीरावाचे बळ आपोआच कमी-कमी होऊ लागले होते. दोन महिन्यात दु. बाजीरावास सोडून जो घरी बसेल त्याचे वतन पूर्वी प्रमाणे चालू राहतील असे अभिवचन कंपनी सरकारने दिल्यामुळे दू. बाजीराव उघडा पडला. शिवनीचा पराजय व सोलापूरास पानशांचा पाडाव हे दोन पराभव होण्याचे कारण एल्फिन्स्टनचा हा जाहीरनामाच होय. शिंदे होळकरांच्या लूटमारीने / मुलुखगिरीने हैराण झालेल्या जनतेस हा जाहीरनामा खूपच फायद्याचा वाटल्याने जो तो या जाहीरनाम्याच्या प्रती घेऊन स्वतः व इतरांना वाचून दाखवू लागला. गोपाळ आष्टीच्या लढाई नंतर पेशव्याचे राज्य संपून ब्रिटिश साहेबाचा अंमल सुरु झाला, अशी लोकांची भावना झाली आणि जो तो आपली व्यवस्था कंपनी सरकारकडून लावून घेण्यासाठी प्रयत्न करू लागला.[16]

पेशवा दु. बाजीरावाच्या काळात धार्मिक प्रस्थही मोठे असल्याने ते लक्षात घेऊन एल्फिन्स्टने धार्मिक बाबी आहे तशाच आम्ही पुढे चालवू असेही जाहीरनाम्याद्वारे आश्वासन दिले आणि पुणे सोडून वाईस गेलेल्या ब्राम्हणांना आपल्या राज्यास अनुकूल करून घेण्यासाठी स्वतः वाईस गेला व तेथे शास्त्री पंडीताची सभा भरवून विद्वान शास्त्रांना

दूसरा बाजीराव प्रमाणेच देणग्या व बक्षीसे दिली. पुण्याच्या ब्राम्हणांचाही असाच परामर्श घेण्यात येऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. [17]

ब्राम्हण वर्गास खूष केल्यावर दुसरा मोठा वर्ग म्हणजे मराठयांचा त्यांचा मुख्य बाणा म्हणजे शिपाईगिरीचा तेंव्हा त्यांना राजा म्हणून कुनिर्सात करण्यात तख्त व राजा असावा म्हणून साताराची गादी निर्माण केली. तत्कालिन महाराष्ट्रात 33600 सैनिक होते. पण त्यांचे नेतृत्व करायला कोणीही नव्हते. सैनिकांचा राज्यकर्त्याशी संबंध तोडलेला होता. तेंव्हा त्यांना शेती करणे किंवा ब्रिटिशांच्या लष्करी सेवेत दाखल होणे ऐवढाच पर्याय होता. बहुतेक सैनिक शेती व्यवसायाकडे मार्गस्थ झाले. काही शस्त्रधारी मराठी प्रसंगी कंपनी सरकारच्या विरोधात बंड पुकारीत. अशा सैनिकांचा ‘बंड’ असाच उल्लेख ब्रिटिश करीत. मराठयांचा स्वाभिमान दुखवला जाऊ नये म्हणुन आपल्या पारंपारीक व्यवसायला आपण मुकलो अशी भावना त्यांच्यात निर्माण होऊ नये म्हणून एल्फिन्स्टन यांनी सर्वांना एकदम निशस्त्र केले नाही त्यांना शस्त्र धारण करण्याचे परवाने देऊन गावच्या रक्षणासाठी त्यांचा उपयोग करुन घेतला. लोकांमधील वीरवृत्ती घालवू नये, कारण या सशस्त्र लोकांचा पोलिसी कामे करण्यास तसेच दंगे-धोपे निपटण्यास आणि प्रसंगी लढाईसाठी सुध्दा चांगला उपयोग करुन घेता येईल अशी एल्फिन्स्टनची धारणा होती. [18]

नव्या परिस्थितीत मराठयांच्या प्रदेशात प्रशासकीय, राजकीय व सामाजिक दृष्टीने पोकळी निर्माण झाली होती. पेशवाईत कितीही बेबंदशाही असली तरी ते स्वकीयांचे राज्य होतं. ते नष्ट झाल्याचे तीव्र दुःख समाजाला अस्वस्थ करणारे होते. ‘ब्रिटिशांनी आमचे राज्य नष्ट केले’ ही बोच मराठयांमध्ये दीर्घ काळपर्यंत राहून लोकांना ब्रिटिशांच्या सर्वच बाबीविषयी तिरस्कार वाटण्याचा संभव होता. अशा या मानसिकतेमधून या संक्रमणकाळात निर्माण होऊ पाहणाया समस्या व अस्थिरता योग्य पध्दतीने निपटून काढणे हे डेक्कन कमिशनर या नात्याने एल्फिन्स्टनचे प्रमुख काम होते. जून 1818 पासून पुण्यात नवी राजवट सुरु झाली.

पेशव्याकडून जिंकून घेतलेला मुलूख सुमारे 50,000 चौरस मैलाचा आणि चार लाख लोकवस्तीचा होता. पुणे, अहमदनगर, नाशिक, सातारा आणि खानदेश या

जिल्हातील नव्याने जिंकलेला प्रदेश डेक्कन कमिशनरच्या कार्यकक्षेत मोडत होता. कमिशनर म्हणुन एल्फिन्स्टन यापुढे मोठया समस्या म्हणजे या जिंकलेल्या प्रदेशात पाश्मिमात्य तत्वावर आधारीत प्रशासन लागू करावयाचे का मराठयांची जुनी पध्दतीच चालू ठेवावयाची की त्यात थोडे फार बदल करुन ती राबवायची हा होता. मराठयांच्या प्रशासन पध्दतीबद्दल एल्फिन्स्टनचे मत चांगले होते. आजवर मराठयांनी ज्या पध्दतीने आपल्या लोकांना उत्तम प्रशासन दिले होते म्हणुन त्या पध्दतीतील जे चांगले असेल ते आपण टिकविले पाहिजे. त्यातील दोष क्रमशःदूर करुन ती निर्दोश बनविण्याचा प्रयत्न केल्यास लोकांना नवी राजवट असह्य वाटणार नाही. तेंव्हा 'नवे नको' असाच पवित्रा एल्फिन्स्टन घेऊन पुनर्रचनेच्या कार्यास सुरवात केली.[19]

सततच्या युध्दामुळे गांजलेल्या महाराष्ट्रात प्रथम शांतता प्रस्थापित करणे अत्यंत गरजेचे होते. तसेच संक्रमणाच्या काळात प्रशासकीय आणि लष्करी ही दोन्ही कामे यशस्वीरित्या पाहू शकेल आणि या प्रदेशाचा माहितगार असेल असा अधिकारी वर्ग एल्फिन्स्टनला हवा होता. तेंव्हा त्याने पुण्यासाठी लेफ्टनंट 'हेन्री रॉबर्टसन', खानदेशासाठी 'कॅप्टन ब्रिग्ज', अहमदनगरसाठी 'हेन्री पॉटिंजर' आणि नवनिर्मित सातारा राज्यासाठी पोलिटिकल एजंट म्हणून कॅप्टन 'ग्रॅंट डफ' यांची नियुक्ती एल्फिन्स्टनने केली. या चौघानाही एल्फिन्स्टनचा परिवार म्हणून ओळखले जाते [20] आपल्या अधिकायांना त्याने आदेश दिले की, जुन्या नोकरांना प्रथम संधी द्या नवे काही जलदीने करुन नका आणि जुने लगेच सोडू नका. सत्तांतराच्या काळात कमीत कमी सामाजिक बदल होतील याची दक्षता घ्या.

नव्याने संपादन केलेल्या मराठी मुलखाच्या प्रशासनाची उभारणी करताना सन 1818 मध्ये एल्फिन्स्टन व एल्फिन्स्टन परिवाराने जे जाहीरनामे, आदेश, हुकूम, देवस्थानांच्या सनदाचे नूतनीकरण, कमावीसदाराला दिलेले आदेश, पाटील कुलकर्णी ना दिलेले सक्त आदेश संबंधिताला दिले. यानुसार महाराष्ट्रात दूसरा बाजीरावा नंतर मराठी सत्ता परिवर्तन होत गेले व ब्रिटिशानी आपल्या परिणे पुर्ण पणे महाराष्ट्राच्या भूमिवर एक

जुट करुन टाकला.

5.5 सन 1818 नंतर कंपनीचे महाराष्ट्रातील धोरण -

ग. ज. 'लॉर्ड वेलस्ली' याने चढाईचे धोरण स्वीकारले आणि त्यामुळे कंपनीचे सैन्य सतत मोहिमेवर असे दिल्ली पासून पुण्यापर्यंत आणि दक्षिणेत हैद्राबाद, म्हैसूरपर्यंत ही मोहिम चालत होती. लाडॅ वेलस्ली याने आपला प्रभाव स्थापन करण्याच्या दिशेने हालचाली चालवल्या होत्या. दक्षिणेत चालेलल्या मोहिमेत काही अवधी घालवून एल्फिन्स्टन यास पुण्यास पाठवले. मराठी साम्राज्य आणि महाराष्ट्रातील मराठी सत्ता पुर्ण पणे संपुष्टात आली व ईस्ट इंडिया कंपनीकडे महाराष्ट्राचा सर्व कारभार आला होता. महाराष्ट्रात खाया अर्थाने एक नवीन पर्वला सुरवात झाली. आणि त्याचा एक भाग म्हणजे मॉऊंट स्टूअर्ट एल्फिन्स्टन याने मुंबईचा गव्हर्नर या नात्याने या भागाची नविन सुरवात झाली. त्यातुन पुढे वैचारिक परिवर्तन सुरु झाले अधुनिकीकरणाला चालना मिळत गेली.

'गव्हर्नर एलफिन्स्टन' व 'थॉमस मन्रो' या कंपनी सरकारच्या अधिका-यांनी भारतीय प्रशासन व्यवस्था चांगल्या पैकी जवळून अभ्यासली होती. भारतीय ब्रिटिशांकडे झालेल्या सत्तांतराच्या प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्याच्यात असलेला साम्राज्यवाद मोठया प्रमाणात होता तरी पण त्यांचा उदारमतवादी पणाना महाराष्ट्राच्या जनतेने चांगल्या प्रकारे अनुभवला होता. एलफिन्स्टन याचे विचार थोडे वेगळे होते. 'कोणत्याही राज्यावर वर्चस्व स्थापन केल्या नंतर किंवा अचानक नवीन सत्ता स्थापन झाल्यावर बदल लगेच करणे म्हणजे तेथील जनतेचा रोष ओढून घेणे होय.' त्यासाठी पुरवीची पध्दत त्यातल्या उनिवा त्यांचा अभ्यास करून हळूहळू नवीन पध्दती लागु करायची असते. नवप्रवर्तन नको हे एलफिन्स्टन याचे धोरण होते. मराठी राज्याचा शेवट झाल्यावर येथील प्रशासन व्यवस्थेची घडी बसवण्याचे काम सावधगिरीने केले. दुसया देशातुन आलेले आपल्या देशात येऊन राज्य करतात हे येथील स्थानिक लोकानी स्वखुषीने मान्य केले नसते. ही जाणीव ब्रिटिश लोकाना पुर्ण पणे होती. या दृष्टीने आपल्याला कमीत कमी विरोध होईल व आपली सत्ता येथे व्यवस्थीत स्थापन होईल या हेतुने त्यानी प्रयत्न

केला. ब्रिटिशानी येथील लोकांच्या सामाजिक आणि धार्मिक जीवनात हस्तक्षेप केला नाही. आणि येथील जुनी जे चांगले आहे ते त्यानी तसेच ठेवले व लवकरात लवकर नविन काही करण्याची त्यानी यावेळेस घाई केली नाही. या सर्व एलफिन्स्टन याचा मताला थॉमस मन्रो हे कर्नाटक प्रदेशाचे गव्हर्नर सहमत होते.[21]

सन 1818 साली ब्रिटिशाच्या ताब्यात मराठयाचा मोठा भू-प्रदेश होता. याठिकाणी काही देशी संस्थाने होती ती आजुनही स्वतंत्र पणे आपले राज्य करीत होती ही संस्थाने जर लगेच आपल्याकडे सामील करुन घेण्याची घाई त्यांनी केली नाही. यामुळे ब्रिटिशाच्या हिंदूस्थानातील राजवटीला मोठा धका बसेल असे मत एलफिन्सटन याने मांडले. 'मराठयांच्या राजवटीचा शेवटचा ब्रिटिश वकिल म्हणुन मॉऊट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ही शेवटीची एक विशेष उल्लेखनीय व्यक्ति होय.' तो ज्या पध्दतीने मराठयाच्या शेवटासाठी कारणीभूत असला तसाच तो आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी अत्यंत मोलाचा हातभार लावला होता.

सन 1818 साली मराठी सत्ता कंपनीकडे आली तेव्हां 'डेक्कन कमिशनर' हे एक नवे पद त्यांच्यासाठी निर्माण करण्यात आले आणि पेशव्याकडून जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावण्याचे काम त्याच्याकडे सोपविण्यात आले. आपली ही कामगिरी त्याने यशस्वीपणे पार पाडली, आणि हा नव्याने जिंकलेला मराठी मुलुख मुंबई इलाख्यात सामील करून सन 1819 साली तो मुंबईचा गव्हर्नर बनला. मराठी राज्याचा एक अनुभवी प्रशासक म्हणून साहजिकच ही कामगिरी एल्फिन्स्टनकडे आली. मराठयांकडून जिंकलेला प्रदेश ताबडतोब मुंबई इलाख्यात विलीन केला नाही हे चातुय एलफिन्स्टन याचे होते. त्याच्या धोरणाची व पध्दतीत बदल करण्याची रित वेगळीच होती. या प्रदेशाची योग्य प्रशासनाची व्यवस्था लावल्यानंतर ऑक्टोबर 1819 मध्ये मराठी मुखूल मुंबई इलाख्यात सामिल करून घेतला.[22] यावेळी मुंबईचा गव्हर्नर म्हणुन एल्फिन्स्टन यांची नेमणुक केली डेक्कन कमिशनर आणि मुंबई गव्हर्नर म्हणुन एल्फिन्स्टन याने पुढे काम पाहिले याची दृष्टी विशाल होती त्याने महाराष्ट्रात चांगले जन प्रेम गोळा केले.

एलफिन्स्टन याने मराठी साम्राज्याची ठेवन करताना बारीक विचार करून येथील सर्व घटकांचा अभ्यास करून परिस्थिती हातळली होती. त्यांची स्वःताच्या कामाविषयीची कळकळ पाहून त्यांच्या हाताखाली काम करणाया सहकार्याना पण कळकळीने काम करावे असे वाटत. मुंबई इलाख्यात त्याचे काम ज्या लोकानी पाहिले त्यांनी त्यांची स्तुती मोठे स्मारक उभारून केली आहे. अनेक संस्थानिक एलफिन्स्टन याने तसेच ठेवले त्याना ब्रिटिशांच्या अमलाची इभ्रत चागलीच कळून आली होती. "रूपये पंन्नास हजार पासून सत्तर हजार वसुलाचे सारखे पाच जिल्हे करून, पंन्नास हाजार चौरस मैल क्षेत्रफळाच्या महाराष्ट्रांतील चाळीस लाख प्रजेसाचे नियोजन दु. बाजीरावाच्या पूर्वी रयतवारी अधिक हलकी, अधिक सारखी, अधिक पक्की करून कलेक्टर युरोपियन, डेप्युटी कलेक्टरद्वारा एक मद्रासी व एक महाराष्ट्रीय, मामलेदार, पाटील, कुलकर्णी असे त्यांनी अधिकारिमंडळ नेमिले.[23]

एलफिन्स्टन यांनी आपल्या परिवारा मुळे महाराष्ट्रातील जनतेला योग्य प्रशासन, कायदे, सुव्यवस्था लावण्याचे काम यावेळी केले गेले होते. एलफिन्स्टन याचे धोरण त्याच्या सारखेच कडव होते. एलफिन्स्टन मुबईचा गव्हर्नर बणल्यानंतर मराठयांच्या चार प्रांताचा कारभार आपल्या विश्वासून चार अधिकायांवर नेमुण दिला. त्यांना या चार प्रांताचे पुर्ण अधिकार दिले गेले होते. त्यानुसार त्याने पुण्यात 'रॉबर्टनस' हा कलेक्टर नमुण त्याकडे पुण्यातील न्यायाधीश, दंडाधिकारी, पोलीस प्रमुख इ. कामे त्याच्या हातात दिली गेली. त्याची न्यायदानाच्या बाबतीत महत्वाची गोष्ट म्हणजे हिंदूलोकांसाठी शास्त्री पंडिताचे सल्याने तो न्यानयदान करत असे तसेच मुस्लीमानच्या न्यायदानासाठी काझीचा सल्ला घेऊन त्याने मराठयाच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप ठाळला एलफिन्स्टन याने हिंदूस्थान मधील कंपनीच्या सरकारचा आदर करूनच सर्व कामी केली. रॉबर्टसन याने पुण्यातील लोकांसाठी चांगल्या प्रशासकीय व जनतेच्या हिताचे कामे केली पुण्यातील लोकाना खुष ठेवण्यासाठी जुलमी कर रद्द केले त्याच पध्दतीने सारा आकारणी पिकांच्या उत्पादनावर केली.

रॉबर्टसनच्या धोरणांमुळे पुणेकर कंपनीच्या कारभारावर खुष होते. सन 1818 नंतर राजवट बदलली या नंतर लोकांच्या मनात ब्रिटिश राजवटीबद्दल कटुता असणार त्यांचा राग, सहजासहजी जाणार नाही, असे रॉबर्टसनला वाटत होते. त्याने 8 एप्रिल 1818 रोजी आपला रिपोर्ट वरिष्ठांना पाठवला त्यात तो म्हणतो येथील जनतेला पेशवा दु. बाजीरावाच्या रोषाची भिती वाटत होती. येथील जनतेला बाजीरावची वरवर सहानुभूती वाटत पण त्याचा कंपनी सरकारवर राग कोणत्याच प्रकारे नव्हता. पुणेकरांचा स्वभाव म्हणजे तर्क रचून ते प्रस्तुत करावे असा आहे.[24]

अहमदनगर प्रांताची सुविध्दा लावण्याचे काम 'पॉटिंजर' याकडे एलफिन्स्टने सोपावली होती. त्याने येथील कारभारात एलफिन्स्टनच्या मार्गदर्शक तत्वाची अंमलबजावणी पुरेपुर केली. या प्रतांचे युध्द काळात फार नुकसान झाले होते हे सर्व नुकसान भरून काढण्याचे पुरेपूर प्रयत्न पॉटिंजर याने केला. पॉटिंजर ने आपल्या नवीन कारभारत गांवकारभार पाटीलांचे होणारे आन्याय कमी केले. त्यांच्या हया कामामुळे ही मंडळी खूश होती. पॉटिंजरला आपण केलेल्या कामाचे समाधान वाटत. खानदेश या प्रांताची व्यवस्था एलफिन्स्टन याने 'ब्रिग्ज' याकडे दिली होती हा उत्तरेकडील बराचसा जंगलमय जिल्हा होता. येथील भिल्लाच्या समस्या सोडवण्यासाठी ब्रिग्ज याने आपले सर्वस्व पणाला लावले होते. त्याने भिल्ला बरोबर अधिक मवाळ भूमिका घेतली नवीन योजना राबवण्याचा त्यांचा प्रयत्ना होता पण एलफिन्स्टन याने विरोध दर्शवल्या मुळे त्यांनी कडकपवित्र घेतला आणि तेथील बंड थोडया प्रमाणात शांत झाले. नव्या राजवटीला अनूकूल वातावरण निर्मितीसाठी एलफिन्स्टन आणि त्याच्या परिवाराणे अविरत प्रयत्न केले त्यानी ब्राम्हाणांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचा पुर्ण प्रयत्न केला. सातारा राज्याची निर्मिती करून तेथे आपला विश्वासातील अधिकारी 'ग्रँट डफ' यांची नियुक्ती करून मराठी समाजाचे, जमीनदार, जहागीरदार, सरदार यांच्या मनात आपले चांगले घर तयार करण्याचे काम एलफिन्स्टन व त्याच्या परिवाराणे केले. जुने काढून नवे लादण्याचा प्रयत्न नवीन सरकारणे केला नाही हे एलिफन्स्ट याने लोकाच्या मनात रुजवण्याचे काम केले.[25]

5.6. एलफिन्स्टन यांचे प्रशासनिक पध्दतीचे धोरण -

पुण्याचा वकिल होण्याच्या आधी आठ नऊ वर्षे एलफिन्स्टन यांनी मराठयाचा स्वभाव, त्याचे कायदे, येथील प्रशासन, न्यायव्यवस्था यांचा चांगल्या प्रकरे अभ्यास केला होता. त्यामुळे पुढे मराठयांचे राज्य आपल्या ताब्यात घेण्यासाठी व येथील प्रशासन पध्दतीची व्यवस्था लावण्यासाठी सन 1818 नंतर चांगल्या प्रकारे फायदा झाला. एलफिन्स्टन यांची दुरदूष्टी व्यापक होती. त्याने महाराष्ट्रात अनेक बदल घडवून आनले याच काळात आधुनिक करणाला मोठया प्रमाणात वाव मिळत गेली. एलफिन्स्टन याने महाराष्ट्रातील विद्यमान पध्दतीचा अभ्यास करुन तिला फारशी बाधा येनार नाही आणि ती कशा पध्दतीने चालु राहील यावर एलफिन्स्टन यांचे चांगले नियंत्रण होते तसेच मराठयांच्या प्रशासन पध्दतीबद्दल चांगले मत होते. आजवर मराठयांनी ज्या पध्दतीने आपल्या लोकांना उत्तम प्रशासन दिल आहे त्या पध्दतीत जे जे म्हणुन चांगले असेल ते आपण टिकविले पाहिजे त्यांची पध्दती कित्येक वर्षे रुढ आहे, लोकांनी ती सामान्यतः मान्य केली आहे याचाच अर्थ असा, की त्यात काही टिकाऊ तत्त्वे आहेत, आणि त्यांत काही त्रुटी असतील तर त्या क्रमशः दूर करून ती निर्दोष बनविण्याचा प्रयत्न केला लोकांना नवी राजवट असह्य वाटणार नाही हे महत्वाचे होते.

सातारा गादीची पुर्नस्थापना केल्यावर सातारा छत्रपती नावापुरतेच राहिले होते. कंपनीने सर्व कारभारत हातात घेऊन छत्रपतीच्या सहीने मराठया साम्राज्यात प्रशासकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक इ. कार्यामध्ये एलफिन्स्टने येथील मराठी जनतेच्या हिताचा वापर करून आपल्याला व कंपनीला अनुकूल होणारे वातावरण निर्माण करण्याचे कार्य त्यानी अनेक जाहिरणाम्यातून प्रस्थित केले. यानुसार त्याला मराठी माणसांची मोठया प्रमाता साथ मिळत गेली. ब्रिटिशानी आपला अंमल पेशवा दुसरा बाजीराव पुण्यावरुन पळून गेला त्यानंतर चालु केला. यात त्यांनी येथील प्रजेला न दुखावता व पुढे योग्य पध्दतीने साशन चालु ठेवले. त्यांनी जाहीर केलेल्या जाहीरनाम्यात अनेक गोष्टी समोर येतात त्यानुसार –

1 एप्रिल 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[26] पुण्यातील सखाराम नरसी याने ब्राम्हण विधवा दुर्गा हिच्याशी बदकर्म केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले तेव्हा शिक्षा म्हणुन पुण्यातील कंपनी सरकारच्या अधिकायांनी दोघांचेही तोंड काळे करुन त्यांची शहरात धिंड काढून त्यांना फिरविण्यात आले.

पेशवा दुसरा बाजीरावाला पदभ्रष्ट करतांना[27] 10 एप्रिल 1818 रोजी कंपनी सरकारने सातारच्या प्रतापसिंह महाराजांकडून रयतेसाठी जाहीरनामा प्रसृत केला की, दुसरा बाजीराव पेशवे यांनी आम्हाला कुटूंबासहीत नजरबंदीत ठेवले व आमचा प्राण घेण्याचाही प्रयत्न केला, हे ब्रिटिश सरकारला समजताच त्यांनी आमच्या खानदानाची त्यांना झालेली मदत लक्षात घेऊन त्यांनी आम्हाला दुसरा बाजीराव पेशव्याच्या नजरकैदतून मुक्त करुन समारंभपूर्वक सिंहासनारुढ केले. तेव्हा छत्रपती सातारकर सरकारची व ब्रिटिश कंपनी सरकारची दोस्ती झाली. जे त्यांचे दोस्त ते सातारकरांचेही दोस्त, जे त्यांचे शत्रु ते सातारकरांचेही शत्रु समजले जातील, हे सर्वांनी लक्षात घ्यावे.

30 एप्रिल 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[28] दुसरा बाजीराव व कंपनी सरकार यांच्यातील युध्दामुळे ज्या शेतकयांचे नुकसान झाले आहे त्यांची पक्की चौकशी करुन त्यांना महसुलात तेथेच सूट द्यावी इकडे पाठवू नये तसेच लावणी संचणी जास्त होईल अशी व्यवस्था ठेवावी.

4 मे 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[29] हेन्री पॉटीजर कृष्णराव त्रिंबक देशपांडे तालुका/तर्फे मानूर याने ब्रिटिशाच्या 11 फेब्रुवारीच्या जाहिरनाम्यानुसार बाजीराव दुसयाच्या लष्करातुन आपल्या पथकासह त्याची साथ सोडून आपल्या गावी परतला तेव्हा हेन्री पॉटिंजरने त्यास अभय दिले.

बाजीरावाचा पराभव होताच कंपनी सरकारने 10 मे 1818 रोजी जाहीरनामा प्रस्तृत केला की,[30] बाजीरावाचे सरदार व सैनिक लढाईतून पळून आपल्या घरी येऊ लागले व काही येत आहेत. त्यातील कित्येकांनी कंपनी सरकारने अभय द्यावे म्हणजे आम्ही आमच्या घरी शांत राहु असे बालणे ब्रिटिश सरकारशी केले आहे. तेव्हा त्यांनी एका महिन्याच्या आत आपआपल्या घरी पोहचून शांत रहावे. सैनिक व सरदारांनी एकत्रित जमु

नये व मुलखात फिरु नये. जो कोणी मुलखात फिरेल पन्नास-शंभर एकत्रित करुन फिरेल किंवा सरकारच्या विरोधात बंड करेल त्याचे युध्द होऊन त्यास प्राणास मुकावे लागले.

1818 च्या जाहिरनाम्यानुसार[31] दुसरा बाजीरावाच्या लष्करातील लोकांनी गांवातील रयतेला त्रास दिल्यास त्यांची खबर त्वरीत गांवाच्या महाराबरोबर सरकारत कळवावी. बातमी पोहचविणायास बक्षीस दिले जाईल. दुसरा बाजीरावाच्या लष्कराची माहिती गांवात न दिल्यास अथवा बातमी अडविल्यास त्या गांवापासून गुन्हेबारी घेतली जाईल.

2 मे 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[32] बाजीरावाच्या लष्करातुन फुटून किंती घोडेस्वार व पायदळ तुमच्या महालातील गांवोगांवी आले यांची चौकशी त्यांना न कळता करुन त्यांची नांवनिशीवार यादी त्वरीत अहमदनगर येथे पाठविणे व महालातील नद्यावरील नांवावर पटेकरींवर टोकयांवर आपला अंमल कडक करुन बंदोबस्त चांगला राखणे.

22 मे 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[33] जुन्नर तालुक्यात कोणकोणत्या गांवात गढया आहेत, एकुण गढयांची गांवे किती आहेत, तालुक्याच्या बंदोबस्तासाठी कोणकोणत्या गांवात ठाणी बसविली आहेत व बसवावी लागतील. दुसरा बाजीरावाच्या कोणकोणत्या लोकांनी खेडी बळकावली आहेत. त्या गांवाचे नकाशे कोसबंदीसह पाठवून देणे तसेच नदीचे उतार कोठे कोठे आहेत व त्या उतारावर नांवावाले व टोकरेवाले किती आहेत त्यांची तपशिलवार यादी पाठवून देणे.

27 मे 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[34] आंबेगाव तफेतील वीसगांवचा महसूल सखाराम शंकर जमा करेल. तुम्ही दखलगिरी न करणे. तसेच मे 1818 च्या जाहिरनाम्यानुसार नारायणगांव येथील श्रीधर भट यांचे रोज दोन आणे सरकारातुन देण्याचे इनाम चालविणे.

15 मे 1818 च्या जाहीरनाम्यानुसार[35] पंचायतीच्या कामात व सरकार कामांत लाच स्विकारु नये, लाच दिल्याने शाबीत झाल्यास आपल्या विरोधी निकाल दिली जाईल. वतनाचा खटला असेल तर वतन जप्त होईल किंवा वतन प्रतिवादीकडे दिले जाईल. तेंव्हा वादी प्रतिवादीनी एकमेकांवर लक्ष द्यावे की, पंचायतीस कोणी लाच दिली

का?

5 जून 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[36] हिवरे, चिचोली, आरवी व पाडली या चार गांवची सरंजामी गणपतराव कान्हेरे, पटवर्धन, शेडवलकर यांच्याकडे दिलेली आहे, तेव्हा ती चालवणे.

पुण्याहुन रॉबीनसन्स साहेबाकडील[37] कारकून व सिबंदी जुन्नर प्रांतातील डिगोरे या गांवी सरकार कामाकरिता येणार आहे. तेंव्हा तुमच्या कारकुनांना व सिबंदीस त्यांना मदत करण्यास सांगणे व त्यांच्या कामात अडथळा अणू नये.

6 जुन 1818 चे आदेशान्वये एल्फिन्स्टन यांनी पाटील कुलकर्णी यांना आदेश दिले की[38] -

1. लावणी व पडीक जमिनीची चौकशी करुन जास्तीत जास्त प्रयत्न करुन जमिनीत लावणीची आबादी करावी.

2. गाव पाटलाने गांवावरील गैरवाजवी खर्च कमी करावा.

3. जमीन महसूल गोळा करतांना वरकड लाच काही घेऊ नये. एखाद्या पाटलाने सरकारी काम त्वरीत न केल्यास त्यांच्याकडून 5 रुपये दंड घ्यावे.

4 महालातील कारकूनांनी एखाद्याने काही गुन्हा केला असल्यास त्याकडून दंडाची रक्कम वसूल करावी. तसेच कुलकर्ण्याने खंडणी रक्कम गावच्या पोत्या बरोबर त्वरीत सरकारी तिजोरीत भरावी.

5. गांवागांवातील कुणबी वतनदार परागंदा झाले असतील त्यांची समजूत काढून त्यांना पुन्हा गांवात आणून त्यांची वतनदारी त्यांच्याकडे देऊन त्यांना सरकारी अभय देऊन लावणी संचणी करावी. सरकारकडून उपद्रव होणार नाही.

6. गांवोगांवच्या पटील कुलकर्ण्याने सरकारच्या गांव झाडयात गडबड करु नये. सापडल्यास त्याचे वतन सरकारातून जप्त होईल.

7. महाल कारकूनाने एक वही नेहमी जवळ बाळगावी. त्या वहीत गांवाचे नांव, त्यात राहणायांची नांवे, गांवातील तंटे, गांवची जमीन किती आहे? मिरासदार किती? उपरी

लोक किती? कुळकरी किती? इत्यादी तपाशीलाने लिहावे. तसेच पडीक जमिनीच्या लावणी करिता कुणबी मिळत नसेल तर पाटलाने गांवातील गुरव, मुलाणा, वाणी, महार, रामोसी ज्यांची इच्छा असेल त्यास पडीत जमीन लावणी करिता तीन वर्षाच्या कौलाने द्यावी. कुणब्या सारखे कष्ट या लोकांकडून होणार नाहीत म्हणून तीन वर्षाच्या मुदतीने देऊन जमिनीची लावणी संचनी करुन जास्तीत जास्त जमीन लागवडी खाली आणावी.

8. पाटील कुलकर्णी यांना हुकून केला जातो की, पाटील कुलकर्णी यांनी रयतेची चांगली माहिती ठेवावी. लावणीची पकी खबर देणे तसेच गांवात कुणबी मिरासदार किती होते त्यापैकी बाहेर कोण व कोठे गेले त्यांची चौकशी करावी. गांवात घरे किती आहेत? कुणब्याजवळ बैल व नांगर किती आहेत? गांवातील कोणकोणत्या कुणब्यास तगाई पाहिजे? ज्याला तगाई हवी त्याच्याजवळ शेती किती आहे? त्याचबरोबर तगाई मागणायांची नांवे लिहुन पाठवावीत.

9. लग्न पटीच्या संदर्भात मुलगी कोणाची व मुलगा कोणाचा हे वहीत लिहून ठेवावे.

10. गांवागांवातील सीवेच तंटे असतील ते वहीत लिहून सरकारात कळवावेत.

11. गांवातील तंटे, बखेडे आणि बंडाचा तुम्ही बंदोबस्त करावा. तुमच्या कडुन न झाल्यास सरकार बंदोबस्त करेल.

12. दर आठ दिवसांनी गांवातील सर्व माहिती माणूस पाठवून सरकारात कळवावी.

13. तुम्ही रयतेची जशी आबदी कराल, भ्रष्टाचार न करता सरकारचा जेवढा जास्तीत जास्त नफा करुन द्याल तेवढा तुम्हाला पगार दिला जाईल. सरकार कामात हयगय केल्यास शिक्षा दिली जाईल.

14. तुम्हाला हुकूम झाल्या बरोबर सांगितल्याप्रमाणे गांवोगांवची चौकशी करावी, या चौकशीकरिता लहान गांवात दोन दिवस तर मोठया गांवात तीन दिवस रहावे. ही सर्व चौकशी चार महिन्यात पूर्ण झालीच पाहिजे.

15. हकदार देशमुख, देशपांडे यांचे हक्क पूर्वी प्रमाणेच चालू द्यावे.

16. इनामदारांच्या सनदा पाहून त्यांचे इनाम चालू ठेवावे.

17. कागद व शाईकरिता 1/- रुपया आणि दिव्याच्या तेलासाठी 1/- रुपया असे दोन रुपये खर्च करावेत.

18. देवस्थानांच्या नंदादीप व नैवेद्य या करिता जो खर्च पूर्वीपासून चालत आलेला आहे त्यांची चौकशी करुन चालवावा. अशा या 21 कलमांच्या आधारे वहिवाट करावी.

14 जून 1818 च्या हेन्री पॉटिंजरच्या आदेशान्वये[39] सीवनेर तालुक्याचा कमावीसदार रामराव नरसीव्ह शिवनेरी किल्ला, हडसर किल्ला, चावंड किल्ला, हरिश्चंद्रगड किल्ला, कंजीरगड किल्ला व जीवधन किल्ला हे सहा किल्ले बोईट साहेबाच्या हवाली पाडण्याकरिता करतात. तसेच त्या किल्ल्यांवर ठेवलेली सर्व शिबंदी, कारकून व कामगार व इतर माघारी बोलावून घेतात.

17 जून 1818 च्या जाहिरनाम्याद्वारे[40] कंपनीने जाहिर केले की, दुसरा बाजीरावाने त्रिंबकजी डेंगळयास पकडून देणायास दोन लाखाचे व त्याची माहिती व ठाव ठिकाणा सांगणायास 10 हजार रुपये बक्षीस देण्याचे जाहीर केले होते, ते आता रद्द समजून त्रिंबकजी डेंगळयास पकडून देणायास अथवा ठिकाण सांगणायास कंपनीतर्फे योग्य ते बक्षीस दिले जाईल. हा जाहिरमाना एल्फिन्स्टन याने काढलेला आहे.

22 जून 1818 च्या आदेशान्वये[41] हेन्री पॉटीजर सीवनेर तालुक्याच्या कमावीसदार रामराव नरसीव्हास कळवितो की, बोईट साहेबाकडे सहा किल्ले सुपूर्द केल्याचे समजले. बोईट साहेबाबरोबर 200 लोक आहेत. त्यांची हजेरी व त्यांच्याकडून काम स्वतःसाहेबच करुन घेतील. तुम्ही ढवळाढवळ करु नये. ब्राम्हणवाडयाजवळ भील्ल व रामोशांनी कंपनी सरकारच्या विरोधात बंड सुरु केले आहे. तेंव्हा महालाचा बंदोबस्त हुशारीने राखावा. पुण्याहून जे जाहीरनामे पाठविले आहेत ते सर्व माहालात समजून सांगावेत प्रत्येक गांवास त्यांच्या नकला करुन द्याव्यात.

26 जून 1818 च्या सनदेनुसार[42] भीमा शंकर देवस्थानास 845।। नेमणूक देण्यात आली.

पेशवे दफ्तर, पुणे येथे सातारा महाराज फडफोशी दफ्तर रुमाल क्र. 99 मध्ये सातारा येथील सत्तावीस किल्ले खराब करावयाच्या आदेशान्वये,[43] 21 किल्ले खराब

केल्याची यादी आहे. खराब किल्यांयाची नावे पुढीलप्रमाणे -

पेटा सातारा येथील दोन - सातारा, परळी

पेटा खानापूर येथील एक - भूषणगड

पेटा जावळी येथील पाच - मकरंदगड, महिमंडण, वासोटा, जंगली जयगड, प्रतापगड

पेटा खटाव येथील चार - वर्धनगड, महीमानगड, वारुगड, ताथवडा

पेटा तारगांव येथील दोन - मोरगीरी, दातेगड

पेटा वाई येथील पाच - विराटगड, कमलगड, केजला, पांडवगड, चंदनगड

पेटा कराड येथील तीन - वसंतगड, सदासिवगड, मंच्छिद्रगड

पेटा कोरेगाव येथील दोन - वंदन, नांदगिरी

पेटा वाळवे येथील एक - प्रचितगड अशा ही खराब केलेल्या किल्ल्यांची नांवे आहेत.

24 जुलै 1818 च्या जाहिरनाम्याद्वारे[44] कंपनी सरकारकडून मागील 10 वर्षाचे हिशोब समजून घेण्यासाठी कारकून पाठविले आहेत. त्यांना प्रत्येक गावच्या पाटील कुलकर्णीने खरी कागदपत्रे दाखवून पाठविलेले आहेत. त्यांना प्रत्येक गावच्या पाटील कुलकर्णी यांनी खरी कागदपत्रे दाखवून मागील दहा वर्षाचा महसूल समजून सांगावा. कुलकर्णी यांनी खया कागदांच्या आधारेच मागील हिशेब जो खरा आहे तोच समजावून सांगावा, म्हणजे त्यांची कंपनी सरकारत प्रतिष्ठा वाढेल आणि जे कुलकर्णी खोटे हिशेब समजावून देतील त्यांची वतने कायमची जप्त होतील व त्यांच्याकडून गुन्हेगारी देखील घेतली जाईल.

29 जुलै 1818 रोजी[45] खानदेशात कंपनी सरकारच्या अधिकायांनी तापीतील बहाणपूर येथे सर्व जमीनदारांना व जाहागिरदारांना एकत्रीत बोलावून त्यांच्या अखत्यारीतील महालाचे मागील 10 वर्षाचे जमीन झाडे व झडत्या, साल गुदस्ताची वसुली व बाकी कमाल जमीनीचे कागद, बागाईत घेऊन त्यांना हजर राहण्यास सांगीतले व त्या कागदपत्रंची तपासणी केली. अंमळनेर येथील अलीअरब याचा कारभारी नायकोबा याने

सर्व कागदपत्रे आणली नाहीत. तेव्हा अली अरबची जहागीर जप्त करण्याचे आदेश देण्यात आले.

29 जुलै 1818 च्या जाहीरनाम्याद्वार[46] कॉलरा रोगाची साथ कशी पसरते, कॉलरा रोगाची लक्षणे सांगून हा रोग पूर्वेकडून भारतात आला असून त्यांची उत्पत्ती मानवापासून होत नाही तर नादान वायापासून होते. कॉलरा झालेल्या व्यक्तिस जुलाब व वांटया फार होतात. ओकारीच्या वेळेस पित्त पडत नाही. सर्व अंग ठणकते. पोटात प्रचंड जळजळ होते. डोळे खोल जातात व ओढल्याप्रमाणे दिसतात. झोप येत नाही. त्यामुळे अशा व्यक्तिची तळमळ फार वाढते. या रोगामुळे अनेक व्यक्ती मरण पावतात. तेंव्हा त्यांना खाली सांगितल्याप्रमाणे औषधे दिल्यास ते बरे होतील.

1 अडीच तोळे अफू, अडीच तोळे पाण्यात ओतून पाजावी. पहिल्या डोसाने आराम न वाटल्यास दुसरा द्यावा. दुसयाने न वाटल्यास तिसरा द्यावा. म्हणजे झोप चांगली येईल.

2. पोट दुखःत असेल तर त्याला शेकावे. ताप खूप असेल तर त्याचे अंग ओल्या फडक्याने पुसावे.

3. ओकारी बंद झाल्यावर दोन तीन तासांनी दिड तोळा येरेंडेल तेलात गुंजभर अफू घोटून त्यास पाजावे. असा हा डोस दर दोन तासांनी दिल्यास जुलाब बंद होतील.

येरेंडेल तेल नसेल तर सोनामुखी तीन तोळे व धणे तीन तोळे सव्वाशेर पाण्यात घोटून त्याचा काढा करावा. तसेच शेरभर पाणी उकळून गाळून घेऊन च्यार तोळे पाण्यात एक गुज अफू घोटून पाजल्यास जुलाब होणे बंद होईल. असा हा डोस दर चार तासाने दिल्यास जुलाब पूर्णपणे बंद होऊन व्यक्तीस आराम मिळेल.

4. दुसया दिवशी बाळंतनिंबाच्या काढया मुठभर अर्धा किलो पाण्यात घोटून त्यांचा काढा करून द्यावा किंवा दिवसातून दोन तीन वेळा बेलाचे फळ दिले तरी जुलाब थांबतील.

यापध्दतीने ज्यास कॉलरा होईल त्याने वर सांगितल्याप्रमाणे औषधे घेतल्यास त्याची प्रकृती उत्तम होईल.

5 सप्टेंबर 1818 च्या जाहीरनाम्यानुसर[47] सर्व रयतेला कळविण्यात येते

की, दुसरा बाजीरावाने मराठी राज्यावरील अधिकार सोडला असून कंपनीकडून पेन्शन स्विकारून एका जागी शांत राहण्याचा करार केलेला आहे तेंव्हा त्याच्या साथीदारांनी/मदतनीसांनी देखील शांत रहावे बंड बखेडा करू नये. तसेच दुसरा बाजीरावाचा खजिना, संपत्ती जडजवाहीर, दाग दागिने रुपये ज्याच्या जवळ असतील त्यांनी ते सरकारात आणून जमा करावे. न जमा केल्यास व सरकारास समजल्यास संपत्ती / खजिना बाळगण्यायास मोठी शिक्षा दिली जाईल. तसेच त्या बेनामी / गुप्त संपत्तीचे हस्तांतर इतरत्र करु नये. तसेच दुसरा बाजीरावाच्या बेनामी / गुप्त संपत्तीची जो कोणी माहिती देईल त्यास त्या संपत्तीच्या प्रमाणात बक्षीस दिले जाईल.

5 सप्टेंबर 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[48] अद्याप कोणीही बाजीराव दुसरा यांचा खजिना / संपत्तीचा ठाव ठिकाणा सांगण्यास पुढे आले नाही. तेव्हा कंपनी सरकारने संपत्तीतील शेकडा 10 टक्के वाटा बक्षीस म्हणून देण्याचे जाहीर केले. तसेच सरकाराला समजल्यास त्या व्यक्तीचे घर व वतन जप्त केले जाईल.

9 सप्टेंबर 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[49] लष्करातील बंडामुळे रयतेचे नुकसान झाले आहे. तेंव्हा रयतेचा बचाव होण्यासाठी 9 सप्टेंबर 1818 च्या पूर्वीची थकलेली सरकारी बाकी माफ करण्यात येत आहे. जो पाटील कुलकर्णी वसूल करेल तो कंपनी सरकारचा गुन्हेगार समजण्यात येईल.

नोव्हेंबर 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[50] छत्रपती शाहु यांच्यापासून चालत आलेले यज्ञेश्वर भट यांची कुसूर येथील 3 चावर 17 बिघे इनाम चालविणे.

15 डिसेंबर 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[51] सर्व जहागिरदार व सरंजामदारांना सूचीत केले जाते की, त्यांनी आपआपल्या जहागिरीची संरजामाची सनदा, पत्रे एका महिन्याच्या आत कंपनी सरकारात सादर करावीत म्हणजे त्यांच्या खर्चाची व्यवस्था लावून देण्यात येईल. एका महिन्यात सनदापत्रे न दाखविल्यास त्यांच्याकडे सनदापत्रे / कराराच्या याद्या नाहीत असे समजून त्यांची जहागीर अथवा सरंजाम जप्त करण्यात येईल.

17 डिसेंबर 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[52] सर्वांना कळविण्यात येते की, छापी रुपयावर कोणी बटा घेऊ नये किंवा त्यावर छाप मारु नये जो कोणी छापी रुपयावर बटा घेईल किंवा कोया रुपयावर छाप मील त्याच्याकडून गुन्हेगारी घेतली जाईल.

डिसेंबर 1818 च्या आदेशान्वये[53] हेन्री पॉटिंजरचे रामराव नरसीव्ह कमावीसदार तालुका सीवनेर यांस पत्र - तुमच्या प्रांतात किले पाडावयास कपतान इस्टनस साहेब बहादूर आलेले आहेत त्यास दूध आणि जे जिन्नस लागले ते खरेदी करून देणे.

पुण्याहून इंजिनिअर विष्णूजीसाहेब नारायण गडचा किल्ला पाडण्यासाठी आलेले आहेत.[54] नारायणगड किल्ला पाडल्यानंतर कोणत्या किल्ल्याकडे जाणार याची माहिती सत्वर कळविणे नारायणगडावर दफेदार, कारकून व जवान मिळून सत्तावीस आसामी आहे. त्यांना अहमदनगर येथे पाठवावे किंवा बडतर्फ करावे. नारायणगडावरील दारू व तोफा लहान जेंजाला व बंदूका इ. संरजामाच्या यादी सरकारत पाठवून तो सरंजाम शिवनेरीस ठेवावा. शिवनेरी देखील पाडण्याच्या वेळेस तो सरंजाम जुन्नरास ठेवावा.

खरीप बागाईत पीक व रबीचा महसूल[55] अजूनही वसूल केलेला नाही. तुम्हाला हफ्ते ठरवून दिलेले होते. त्यानुसार तुम्ही आमवस्या पर्यंत हफ्ते सरकारात जमा करणार होता. सरकार कामात सुस्ती केल्यास महसूल कसा जमा होईल हे काम तुम्हाकडून होत नसल्यास तुम्हाला बडतर्फ केले जाईल.

1. जुन्नर येथील आंबराईची चौकशी करून[56] यादया सरकारात पाठविणे. तसेच या वर्षीच्या आंब्याच्या बाराचा लिलाव करून तो ऐवज सरकारात जमा करावा.

2. जुन्नर शहरात कलाली व भांग तूप इ. जिनसाच्या विक्रीचे मख्ये आहेत फक्त कलाली भांग व अफू विक्रीचा मख्ता द्यावा. बाकी सर्व जिनसा ज्याची जशी खूशी असेल तसेच विकू द्यावे.

3. शहरातील देवस्थानाच्या वहीवाटी नंदादिप व नैवेध्य बाबत प्राचीन वहीवाटीप्रमाणे चालवावे.

4. शहरातील ब्राम्हण अग्रिहोत्री व पंडीत शास्त्री वैदीक जोशी यांची वर्षासनाची कागदपत्रे शिक्यासहीत तपासून त्यांच्या नकला व झाडा सरकारत पाठवावा आणि त्यांची

वर्षासने चालवावीत. त्यांच्या इनामातील आंब्याची झाडे किंती आहेत ते लिहून पाठवावे.

5. मुसलमान फकीर व पीरजादे यांच्या इनाम जमिनीच्या सनदा तपासूनच इनामे चालवावीत. आंब्याची झाडे त्यांच्या इनाम जमिनीतील त्यांच्याकडेल चालवावीत आंब्याच्या झाडांचा झाडा सरकारात पाठवावा.

6. अन्याबा रहातेकराची संपत्ती गाई गुरे म्हसी भांडी ज्यांच्या घरी आहेत त्यांची यादी पाठविणे. तसेच आणखी कोणाकडे त्याची सपंत्ती आहे याचा बारकाईने शोध घ्यावा.

7. शिवनेर व जुन्नर हवेली. गावकी नहरे व कुकड नहरे व मडखोरे येथील झाडा त्वरीत पाठविणे. लावणीचा बंदोबस्त तुम्हाला लिहिला त्याप्रमाणे करावा.

8. ओतून येथील रामजी पाटलाच्या बायकोशी राणेजीने बदकर्म केले, सबब त्यास जीवे मारीले. रामजीच्या घराची मोजदाद करून यादी व जबान्या अदालतीकडे रवाना कराव्यात.

9. ओतूर येथील गांवातील घरांची यादी प्राप्त झाली.

10. जुन्नर प्रांतात गांवोगांवी घरांची यादी करावयास कारकून रवाना झाले आहेत त्या याद्या सरकारात पाठवाव्यात.

सरकार हुकूमाप्रमाणे जुन्नर प्रांतात जमीन मोजणीस[57] साहेब लोक दाखल होताच ते विच्यारतील ती सर्व माहिती रयतेकडून त्यांना द्यावी. तसेच त्यांना लागणाया जिनसा त्यांना खरेदी करून द्याव्यात.

बहुट्याचा बास (बांबू) त्वरीत पाठवावेत. सरकार कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. पुन्हा असे केल्यास शिक्षा मिळेल. जीवधन येथील सिबंदीतील[58] 1. बहादूरसिंग, 2. बख्तसिंग, 3. कल्याण या तिघाना त्वरीत एल्फिन्स्टन साहेबाकडे पाठवावे.

20 डिसेंबर 1818 च्या सनदेनुसार[59] गोंविद भट उपासनी संगमनेर यांचे माधवराव पेशव्यापासून चालत आलेले चार आणेचे इनाम प्रांत जुन्नरच्या महसूलातून चालविणे.

23. डिसेंबर 1818 च्या जाहिरनान्यानुसार[60] बक्षुमिया जुन्नरकर याचे मोगलाई पासूनचे 35 बिघ्याचे वतन चालविणे.

26 डिसेंबर 1818 च्या जाहिरनान्यानुसार[61] जनार्दन गोपाठ याची स्त्री गंगाबाई हिचे जुन्नर येथील महसूलातून 50 रु. वर्षासन चालविणे.

18 फेंब्रुवारी 1818 च्या जाहिरनाम्यानुसार[62] शिलेदाराला कोणाकडे चाकरी करावयाची असल्यास त्याने पाटलाकडून तशी परवानगी घ्यावी. पाटील मामलेदाराकडून परवानगी आणून देईल. वाराणसीबाईनी पाटील किंवा मामलेदार यांच्या परवानगीशिवाय 7 शिलेदार चाकरीस ठेवले ही बातमी कंपनी सरकारास समजताच कंपनीने शिलेदारांची घोडी जप्त करून शिलेदारांच्या गांवच्या पाटलाकडून गुन्हेगारी वसूल केली व सज्जड दम दिला की, जर सरकारच्या किंवा पाटलाच्या परवानगीशिवाय शिलेदार कुठे चाकरीस गेल्यास पाटलांचीच वतने जप्त केली जातील.

28 जून 1821 च्या जाहिरनाम्यानुसार[63] दुसरा बाजीरावाशी कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवू नये. डाकेद्वारा देखील संबंध ठेवू नये. ठेवलेला सापडल्यास त्याचे वतन, जागीर, सरंजाम जप्त होईल व मोठी कडक शिक्षाही देण्यात येईल. तसेच ब्रम्हावर्ताकडे जाण्यासाठी परवानगी आवश्यक आहे. दस्तकाशिवाय तिकडे सापडल्यास त्याचे पारपत्य केले जाईल.

एलफिन्स्टन यांच्या विस्तारवादी धोरणामुळे हिंदुस्थानत मध्ये दृढीकरणास चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत गेला. एलफिन्स्टन यांनी छत्रपतीच्या अडुन सर्व कारभार स्वतः पाहण्यास सुरवात करुन महाराष्ट्रातील जनते मध्ये आपल्या नियम व कायदे रूजवण्यास सुरवात केली. यानुसार हळुहळु बदल केला पण तो बदल करत असतांना एक प्रकारे नवीन राजवट असुन सुध्दा तिचा उल्लेख होऊ दिला नाही या उलट मराठी राज्यात सर्व काही हळुहळु रूजवण्यास सुरवात केली होती.

5.7. महाराष्ट्रात मुंबई गव्हर्नरचे कार्य -

5.7.1. शैक्षणिक धोरण -

19 व्या शतकात शिक्षणाची परिस्थिती मोठी दयनीय होती. शिक्षण हे अत्यल्प होते तसेच ते उच्चवर्गा पर्यंतच मर्यादित होते. प्रथम ब्राम्हणानाच पुण्यात शिकण्याचा मान असे परंतु हळूहळू समाज कंठव व कंपनीच्या कायदयात मोठा बदल होत

गेला. या धोरणात बदल होऊन पुणे कॉलेज मध्ये ब्राम्हाणेतरांनाही प्रवेश देण्यास सुरवात झाला. पुढे हळूहळू एलफिन्स्टन यांनी शिक्षण क्षेत्रात मोठा अमुलाग्र बदल करण्यास सुरवात केली त्यांनी शिक्षण व्यवस्थेत मोठी कामगीरी केली. मराठेशाहीत भटभिक्षुकांना वाटल्या जाणाया दक्षिणेच्या प्रथेचा त्याने शिक्षणांसाठी उपयोग केला यासाठी सार्वजनीक निधी मधुन संस्कृत पाठशाळा सन 1821 मध्ये पुण्याच्या विश्रामबाग वाडयात सुरु केली. त्यासाठी एलफिन्स्टन याने 29 सप्टेंबर 1821 मध्ये जाहिरनामा काढून त्याने येथील संस्कृत पाठशाळेसंबंधी सर्व ब्रम्हाण लोकास जाहीर केले की, विद्या शिकून पुणे येथे विश्रामबागेच्या वाडात सरकारी संस्कृतीक शाळा वाढून तेथे शास्त्री वैदिक म्हणुन नेमले जाईल. शिकण्यासाठी येणाया लोकाना जि विद्या शिकायची आहे ती शिकावी, तुमची विद्या वाढवण्याकारता होणारा खर्च हा शंभर विद्यार्थ्यास सरकारातुन दरमहा 5 रूपये खर्चास मिळेल असे नमुत केले. शिक्षण विषयक कार्याला कंपनी सरकारच्या काही अधिकारी वर्गचा प्रखर विरोध होता. मुंबई प्रांतात मात्र एलफिन्स्टन यांनी कंपनीच्या शिक्षण विषयक धोरणाला विरोध केला होता.[64]

शिक्षणाच्या प्रसाराणे महाराष्ट्रात काय परिणाम होतील याची पुर्ण कल्पना असून सुध्दा एलफिन्स्टन याने शिक्षण धोरणात कंपनीवर मोठे संकट ओढवून घेतले होते. एलफिन्स्टन यांचा येथील शिक्षणा बद्दल ऐतद्देशिय शिक्षित करण्याचा मोठा खटाटोप चालवलेला होता. त्यांना माहित होते की कदाचीत या शिक्षण पध्दती मुळे आपल्या सत्तेवर गंठातर येऊ शकते शिक्षणामुळे येथील प्रजेत जागृती होईल रयतेच्या कल्याण साधण्यासाठी शिक्षणाचा उपयोग झाला पाहिजे असे एलफिन्स्टन यास वाटत होते. शिक्षणाचा उद्देश हा फक्त कारकुनांचा पुरवठा करण्यासाठी नसावा, तर ज्ञानाचा प्रसार समाजातील सर्व घटकात व्हावा तसेच त्याचे म्हणने होती कि रयतेला रयतवारी पध्दतीत त्यांना जमिनी संबंधी असणारा पट्टा ही वाचता आला पाहिजे कारण, आपण सरकारचे देणे किती लागतो हे त्यांना कळाले पाहिजे. एलफिन्स्टन यांची शिक्षणा विषयी म्हणने होते की, दरसाल एक लाख रुपये शिक्षणावर कंपनीने खर्च करावे. त्यांच्या मतानुसार स्थानिक शाळांतून ज्या पध्दतीने शिकविले जाते त्यात सुधारणा करावी तसेच शाळांची संख्या वाढवावी खालच्या

वर्गाला शिक्षणासाठी प्रोच्छाहन देणे, पाश्चात्य शिक्षणासाठी नविन शाळा सुरू करणे उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात सुधारणा करणे या व्यतिरिक्त विदयादानासाठी स्थानिक भाषेत ग्रंथ तयार करावेत. इंग्रजी भाषा व युरोपीय नवीन-नवीन संशोधनाचे ज्ञान आत्मसाद करण्यासाठी नवीन शाळा उघडणे तसेच भारतीय ज्ञान संपादन करण्यासाठी उत्तेजन देणे. एलफिन्स्टन यांनी मुंबईत 'नॉर्मल स्कुल' स्थापन केले त्याच पध्दतीने अनेक संस्था स्थापन केल्या. शाळांव देखरेख करण्याची जबाबदारी त्या-त्या जिल्हाधिकायाकडे सोपवली. शिक्षण हे येथील देशी भाषेत असावे असे वाटत असे त्याने मराठी, गुजराती भाषेत पुस्तके काढली. येवढे करत असताना ब्रिटिश कंपनीची भीती पण थोडयाफार प्रमाणात वाटत होती ती म्हणजे भारतीय लोक सुशिक्षीत व ज्ञानी झाले तर आपल्याला परत इंग्लडला येथील सर्व सत्ता सोडुन जावे लगणार होते.[65] एलफिन्स्टन यांचे कार्य म्हणजे उत्कृष्ट पध्दतीचा नमुना होता त्यांचे म्हणनने होते की, एखादे बंड होऊन ब्रिटिश राज्य बुडण्यापेक्षा त्याच्या हिताकरिता आपल्या हातात हे राज्य आले आहे आपली प्रतिष्ठ व हित हे त्यांच्या स्वाधीन त्यांचे आधीकार तेऊन होऊ शकते. यावरून एलफिन्स्टन यांचे महाराष्टातील शिक्षणविषयक धोरण उदारमतवादी होते.

हिंदुस्थानमधील शिक्षणव्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडच्या पार्लमेंटने कंपनीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष चार्लस वुडची नियुक्ती केली व त्यानुसार सन 19 जुलै, 1854 रोजी त्यांनी एक अहवाल सादर केला. त्यानुसार त्याने हिंदी व इंग्रजी शिक्षणपध्दतीचा समन्वय साधला पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार करणे व त्याद्वारे कला, विज्ञान, तत्वज्ञान या क्षेत्रातील युरोपीय ज्ञानाची ओळख करून देणे हे वुडच्या खलित्यातील म्हणले होते. शिक्षण क्षेत्रात वुडच्या खलिता मुळे मोठा परिवर्तन होण्यास सुरवात झाली. सर्व शाळा, कॉलेज तसेच संपुर्ण भारतात मोठया प्रमाणात बदल झाला यामुळे सुव्यवस्थित व सुसंगटीत असा बदल समोर उभा राहिला. राष्ट्रीय पातळीवर शिक्षणाची एकसुत्रीपणा निर्माण होण्यास सुरवात झाली यामुळे उच्चशिक्षाला चालणा देण्यासाठी विद्यापीठ निर्माण होण्यास मदत झाली. सन 1857 मध्ये मुंबई, मद्रास, कलकत्ता या गव्हर्नर प्रांतात विद्यापीठ स्थापन झाली.[66]

एलफिन्स्टन याच्या कार्याकाळात 'रॉयल एशियाटिक सोसायटी' ही संस्था स्थापन करून तीचा प्रेसिंडेट म्हणून एलफिन्स्टन यांनी त्या संस्थेचा कार्यभार संभाळला होता. ही संस्था प्राच्यविद्येचा अभ्यास आणि संशोधन याचे प्रमुख केंद्र बनले. संस्कृतच्या अध्ययनास त्यांनी प्रोत्साहन दिले. गुजराती, मराठी यांचे व्याकरणाचे लेखन आणि शब्दाकोश तयार करण्यास आवश्यक ते अनुदान देण्यात आले. एलफिन्स्टन यांने शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखित ही साधनसामुग्री गोळा केलेली होती. मराठी मुलखाची, समाजाची जाण असणारा तसेच एलफिन्स्टन यांच्या विचाराने प्रेरित असणारे त्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालणारी व्यक्ति म्हणजे माल्कम हे सन 1827 मध्ये मुंबई गव्हर्नर बनले त्याचे धोरण हे शांतपणे काम करून क्रमाक्रमाने सुधारणा करणे हे होते. शिक्षणा बाबत माल्कम हा एलफिन्स्टन यांच्या प्रमाणेच उत्तेजन देण्याचे काम करत होते. शिक्षणा बाबत आसणारे एलफिन्स्टन यांच्या मता प्रमाणेच पुढे कार्य चालवले अभियांत्रिक ज्ञानाचा प्रसार करणे या गोष्टीना माल्कम यांचा चांगलाच जोर होता. आभियांत्रीकी ज्ञानाला कंपनीचा असलेला विरोध माल्कम यांनी हानुन त्यांनी आपले कार्य करत राहिले होते. सन 1829 मधल्या परिपत्रकाद्वारे माल्कमने स्थानिक शाळां यांची ग्रामीण प्रशासनाशी सांगड घालून एक प्रतिष्ठा प्राप्त केली. प्रशिक्षित शिक्षकांच्या संस्थेत वाढ करण्यात आली तसेच एलफिन्स्टनचे स्थानिक भाषेचे धोरण पुढे तसेच चालु ठेवले. माल्कम यांच्या मता नुसार इंग्रजीत शिक्षण स्थानिक लोकाना देऊ नये त्यांच्याच भाषेत त्याना शिक्षण देण्यात यावे या धोरणाचा त्याने पुरस्कार केला. माल्कमच्या मते या देशावर सत्ता स्थापायची असेल तर या देशातील लोकांचा स्वाभिमान, सत्ताप्रेम यांना धुडकावून लावणे योग्य ठरणार नव्हते. माल्कमच्या या काळात रत्नागिरी येथे स्थापन झालेली 'द नेटिव्ह स्कूल ऑफ सोसायटी ऑफ द साउथ कोकण' ही शैक्षणिक स्थापन होय.[67] यामुळे माल्कम यांनी शिक्षणाचा दृष्टीकोनात महत्वाचे पाऊल उचले होते.

5.7.2. ब्रिटिश कायदेसंहिता व न्यायदानाचे धोरण -

मराठी राज्यात अलिखित रुढी व त्याच प्रमाणे अलिखित कायदे सुध्दा प्रचलित होते. न्यायदानाची शिक्षा देणारे 'शास्त्री' यांना न्यायदान पंडित म्हणत यांनी एकाच

गुन्हाला वेगवेगळया कोर्टात वेगवेगळी शिक्षा दिली जात असे. त्यासाठी ब्रिटिश सत्तेला ही पध्दत सुधारण्याची गरज होती. सामाजिक कायदे करून समाजाला बदलण्याचा प्रयोग करणे त्या प्रारंभीच्या काळात अगदी अवघड होते. सर्व कायदे एकत्र करून त्यांची एक सुव्यवस्था करणे एलफिन्स्टन यांना महत्वाचे वाटत होते. हि गोष्ट फक्त हिंदूसाठी नसावी तर ती सर्व मुंबई प्रांतातील जनतेला लगु करण्यातही त्यांचा प्रयत्न होता. सन 1820 मध्ये एलफिन्स्टन याने एक समिती नेमली त्या समितीच्या शिफारसी न्यायदान पंडीत या शास्त्री मंडळी, जाती प्रमुख, कायदा आणि रुढी यांचे ज्ञान असणारे विदवान पंडिताना दाखूवन त्यांची मते घ्यावयाची आणि त्याचबरोबर न्यायालयाची दप्तरे तपासून निवाडयाचा अभ्यास करून सुधारणा घडवणे नवीन योजना पुढे मांडायची होती. प्रदीर्घ चर्चेनंतर मुंबई सरकारने कायेद, रुढी, चालीरीती एकत्रित करून 27 कायदयाची एक संहिता तयार केली आणि 1 जानेवारी 1827 राजी ती अंमलात आणली. हे एलफिन्स्टन यांनी महाराष्ट्रातील जनतेला दिलेली एक भरीव भकम असी कायदे सहिता होती इलाच ‘एलफिन्स्टनची सहिंता’ म्हणत.[68]

ब्रिटिश न्याय पध्दतीच मंबई प्रांतात अमलात अणावी असे कंपनीने एलफिन्स्टन यास सांगितले होते. पण ही गोष्ट एलफिन्स्टन यास मान्य नव्हती . ‘‘चांगले कायदे, चांगली न्यायालये ऐवढे करून भागणार नाही. आम्ही लोकांना आपल्या बरोबर घेऊन गेले पाहिजे आमच्या भावनांशी ते समरस तेव्हाच होतील, जेव्हा आम्ही त्यांच्या भावनांशी समरस होऊ’’ यानुसार एलिफन्स्टन याने मुंबई प्रांताच कायदयाची एक चांगली घडी बसवण्याचे काम केले. चांगली कायदेसहिंता तयार करून विचार व पुनर्रचना या घटकाद्वारे केलेले हे कायदे एक योग्य दिशा होती. एलफिन्स्टन यांनी मुंबईच्या सर्वोच्च न्यायालयावर सर ‘एडवर्ड वेस्ट’ याची नेमणूक करून त्यांनी न्यावस्थेची रचना करण्यासाठी सुरवात केली. ब्रिटिश न्यायाच्या पध्दतीने गुन्हा शाबीत होईपर्यंत प्रतेक व्यक्ति निरदोष राहत असे, त्याच्या गुन्हाची चौकशी बारा व्यक्ती समोर होत असे. चौकशी कराता त्याला एक महिण्याच्या वर ठेवून नये. ही तत्वे ब्रिटिशाच्या न्यायदानात प्रचलीत होती. महाराष्ट्रातील परंपरा व चालीरीती हया चालु राहाव्यात असे एलफिन्स्टन यास वाटत असे.

दोन प्रकारे न्यायदान केले जात असे सनदी दावे या मध्ये चालीरीती, कायदेकानुन यांचा विचार होत असे तर फौजदारी गुन्हाबाबत एलफिन्स्टनच्या 27 कायदेसहितेचा विचार केला जात असे यानुसार ब्रिटिशांच्या मुंबई प्रांतात न्यायदान चालु झाले होते.[69]

एलफिन्स्टन यांनी आपल्या वर होणाया आधिकारी वर्गाचा विरोध सहन करूनही मराठयांच्या 'पंचायत पध्दतीला' त्यांनी न्यायसंस्थेचा एक घटक बनवले होते. याच पध्दतीने सरदार, जमीनदार, उमराव यांच्या प्रतिनिधीच्या सामाजिक, राजकीय प्रतिष्ठेला विसंगत असे कोणतेही धोरण त्यानी अंगीकारले नव्हते. यांसाठी स्वतंत्र योजना होती एखादा जमीनदार व सरदार यांवर कोर्टात केस चालु असेत तर त्या व्यक्तीला कोर्टात प्रत्यक्ष हजर न राहता वकिला मार्फत कोर्टात आपली बाजू मांडण्याची त्याने सोय केली होती. दयेचा अर्ज करणाया व्यक्तीला त्यांच्या सामाजिक प्रतिमेला धक्का बसणार नाही अशी व्यवस्था केली होती. या सामाजिक परिणामातुन एका नव्या वर्गाचा उदय झाला तो म्हणजे 'वकिली' हा व्यवसाय निर्माण झाला. मराठी समाजात वकिल, गुन्हा, शिक्षा या संकल्पनेची माहिती हळूहळू होण्यास सुरवात झाली. एलफिन्स्टन यांच्या कार्याची जानीव करुन देताना केसरीच्या एका अग्रलेखात असे म्हणटले आहे की, 'माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन' यांच्या अंगी असे अलौकिक चातुर्य होते हे त्यांनी एक वर्षांत महाराष्ट्रात जिकडे तिकडे जी स्थिरस्थावर केली, त्यावरुन व्यक्त होते. त्यांनी गोडीगुलाबीने प्रजेची मने आपल्याकडे वळवली, अनेक प्रश्नाचे आपल्या उदार अंतःकरणाने निकाल लावला लोकाना खुष ठेवले, अत्यंत सुधारलेल्या प्रजेचे संगोपन कसे करावे हे पूर्णपणे जाणून नवीन मुंबई इलाख्याचे राज्य चालविले हया गोष्टी लोकाना जोपर्यंत आठवेण तो पर्यंत एलफिन्स्टन याचे नाव गाजत राहिल. याच नुसार माल्कम यांनी आपल्या कामाचे आशाच पध्दतीने योगदान चालु ठेवले हाते. त्यांच्या या कामात जहागीरदार, संस्थानिक, सरदार, उमराव या वर्गानी माल्कम यांच्याशी चांगले संबंध जोडून माल्कमने सर्वांची मने आपल्याकडे वळवून ती जिंकली होते.

5.8. महाराष्ट्रातील बंड शांत करण्यासाठी कंपनीचे प्रयत्न -

ब्रिटिश अधिकारी जी. डब्ल्यू. स्टीव्हन्स म्हणतो, ''आपण हे सतत लक्षात ठेवले पाहिजे की आपण हिंदूस्थान जिंकला तो मराठे आणि शिखांपासून , हिंदूपासून, मुसलमानांपासून नाही. इतर सत्ता हया आपल्याला बिनविरोध शरण आल्या मराठयांना मात्र आपल्याला रणांगणावर जिंकावे लागले. इतरांना ब्रिटिश म्हणजे जुने धनी जाऊन नवीन धनी आले एवढाच फरक झाल्यासारखे वाटते, मराठयांना आपण धनी होतो, पण आता गुलाम बनलो आहोत याची सतत खंत वाटत होती.''[70]

5.8.1. भिल्लाचे बंड -

आपल्या डोळयादेखत आपले राज्य गेले यांची खंत मराठी माणसाला सतावीत होती. राजकारण गेले, युध्द थांबली, मुलुखगिरी संपुष्टात आली, लष्करी चाकरी सोडून जुन्या शेती व्यवसायाकडे धाव घ्यावी लागली. भिल्ल, रामोशी, कोळी ही मंडळी सरकारशी अधुन-मधून बंड करत असे. खांदेश या प्रांतातील समाजात भिल्लांची संख्या मोठी होती. तसेच त्यांच्या समस्याही गंभीर होत्या. त्यात काही भिल्ल मंडळी दरोडे घालण्याचे काम करत असे. खांदेश प्रांताचा कलेक्टर ब्रिग्ज यांची नेमणुक एलफिन्स्टने या प्रांतात केली होती. येथील भिल्लच्या बाबतीत सहानुभूति दाखवत त्याना गावचे रक्षण, पाटलाला मदत, तसेच त्याचे हक्क त्यानी अंमलात आणावेत व सरकारणे देऊ केलेले निवृत्ती वेतन स्विकारावे हे मोलाचे काम ब्रिग्जने केले होते. ब्रिग्जने या प्रांताच्या घाटमाध्यावरची जकात भिल्लाना देऊन व्यापायांच्या मालाचे रक्षण करण्याची जबाबदारी त्यांनी भिल्लाना दिली. ब्रिग्जने यावेळी भिल्लाना सरकारी नोकरी देण्याचा विचार केले होता. त्याच्यासाठी त्याने गावावर एक रूपया पट्टी बसवून भिल्लांचे वेतन वाढवावा असा निर्णय घेतला होते. पण हा निर्णय कंपनीच्या धोरणात नबसणारा असल्याने एलफिन्स्टने गावकयाकडून जास्त कर घेण्यापेक्षा सुगीच्या काळात जादा धान्य घेऊन ते गावरक्षक भिल्लाना द्यावे व गावकायांकडून जेवढे जास्त धान्य घेतले तेवढी सुट त्यांना दयावी असे शिफारस एलफिन्स्टने केली. नवीन कर बसवण्यास एलफिन्स्टनचा विरोध होता यामुळे ब्रिग्ज नाराज झाला. एकीकडे भिल्लांचा उपद्रव खांदेशात वाढतच गेला होता. त्यांना अनेक

आमिषे दाखवून शांत करण्याचे माल्कमचे प्रयत्नाना संपूर्ण पणे यश आले नाही. या सर्व भिल्लांची भरती लष्करांत करून त्यांची एक निराळी तुकडी बनविण्यात आली. यामुळे पूढे सन 1828 मध्ये भिल्लाच्या प्रदेशात शांतता नांदू लागली होती. ही शांतता म्हजणे ब्रिटिशांना त्यांच्या सत्ताविस्तारात आलेले यश होते. विस वर्षानंतर मुंबई प्रांतात भिल्लांचा उपद्रेव थांबुन येथे शांतता नांदण्यास सुरवात झाली. तरी पण काही भिल्ल बंडकरण्यासाठी आपले डोके वर काढतच होते.[71] पण त्याचा फारसा उपयोग ब्रिटिशांच्या धोरणासाठी पुढे होऊ शकला नाही.

5.8.2. रामोशाचे बंड -

ब्रिटिशानी आपली राजवट हिंदूस्थान मध्ये एक बलाढ अशा मराठा साम्राज्यांच्या प्रदेशावर स्थिर केली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात स्वातंत्र्याच्या ज्वाला रामोशी यांच्या अंतःकरणात जागृत होत्या. मराठी राज्यात रामोशी लोक गावचे रखवालदार म्हणून गावात सामिल होते गावकामासाठी त्याना वतनेही दिली होती. त्याना ब्रिटिश राजवट रुजनारी नव्हती. त्याना ब्रिटिश राज्य आल्या मुळे बेकारी, घरी बसण्याची पाळी आली त्यामुळे आत्याचार, लुटमार, हिंसाचार या प्रमाणे कामे महाराष्ट्राच्या अनेक प्रांतात रामोशी लोकांनी चालु केली होती. या वेळी रामोशाचे नेतृत्व ‘सासवडचा संत्तू नाईक’ व ‘पुरंदरचा उमाजी नाईक’ करत होते. सन 1824 च्या फेब्रुवारी मध्ये उमाचीने पुण्याजवळील भांबुर्डे येथे असलेली तिजोरी लुटली. त्याचा राग ब्रिटिश लोकांवर मोठया प्रमाणत होता. जुन्या राजवटीबद्दल त्यांला आदर असे कोल्हापुरचे छत्रपती, अनेक गावातील लोक त्यांला प्रतेक गोष्टीसाठी मदत करत असे. यात मोलाचे काम केले ते वाईच्या बाम्हण लोकांनी त्यांनी उमाजीला ब्रिटिश विरुध्द कारवाई करण्यासाठी उत्तेजन देत असे. रामोशी केवळ लुटारू नव्हते, तर ब्रिटिशांच्या ताब्यातुन मराठी मुलखाची सुटका करावी ही धडपड त्याच्या उरात होती. ब्रिटिशाना आळा घालणे कठीन होत चालले होते. त्यामुळे सन 1828 रोजी ब्रिटिशानी त्याच्याशी बोलणीचा प्रस्ताव ठेवला, पुरवी प्रमाणे वेतन व हक्क मिळावेत अशी मागणी उमाजी नाईक यांनी केली होती. यावेळी कंपनी

सरकारने त्याला 120 बिघे जमीन, रामोशांना जमिनी, सरकारी नोकरी देण्याच्या अटी ठरल्या पण पुढे एकच वर्षाने रामोशानी बंड केले त्यावेळी ब्रिटिशानी यांचा संपूर्ण उच्छेद करायचे ठरवले. रामोशानी यावेळी निजाम हद्दीपासून ते थेट कोकणापार्यंतच्या मुलखांत धुमाकूळ सुरु केला. ब्रिटिश सेनापती 'कॅप्टन मॅकिन्टॉश' याने लष्करी कारवाया करुन 16 डिसेंबर 1828 रोजी भोरजवळ विश्वासघाताने उमाजीला पकडले व त्याच्यावर रीतसर खटला भरून त्यास फाशी दिली. कॅ. मॅकिन्टोश उमाजी बद्दल म्हणतो, ''मोठ-मोठया लोकांनी मला स्वतः खात्रीपूर्वक सांगितले की हा उम्या रामोशी काही असला तसला भटक्या नव्हे. त्याच्या दृष्टीपुढे नेहमी छत्रपती शिवाजी महाराज यांचे उदाहरण होते. शिवाजी प्रमाणे आपण मोठे राज्य कमवावे अशी त्याची उमेद होती.''[72]

5.8.3. कित्तूरचे बंड व धारवाड प्रांत मुंबईत विलीन -

मराठा ब्रिटिश युध्दात कित्तूर च्या जहागिरदारांनी ब्रिटिशाना सह्याय केले होते म्हणून त्यानची असणारे वतने तसीच ठेवली गेली होती त्यांचा दर्जा स्वतंत्र संस्थानिक म्हणून होता. त्यांचा प्रदेश 'संपगाव व बेळगांव जिल्हयातील बिदीचा प्रदेश होता.' कित्तूरचा जहागीरदार देसाई 'शिवलिंग रुद' हा ब्रिटिशांशी एकनिष्ठ होता. धारवाडचा कलेक्टर 'थेकरे' याने कित्तूरचा देसाई यांच्या मृत्यु नंतर 'कोनूर मुल्लापा' व देसाईची सावत्र आई 'चन्नम्मा' यांनी या गादीवर आपला अधिकार सांगीतला होता यास ब्रिटिशांचा विरोध होता हे वादळ ब्रिटिशानी शांत केले पण पुढे हे दोघे एकत्र होऊन त्यांनी ब्रिटिश विरोधात बंड पुकारले होते. थेकरे व चन्नम्मा यांच्या युध्दात थेकरे हा मारला गेला. यावेळी मात्र कितुरचे वातावरण चांगलेच पेटले होते. कित्तूरने ब्रिटिश विरुधी बंड पुकारेल तेव्हा ब्रिटिशानी शरणागतांना माफी मिळेल असा जाहीरनामा काढला. कित्तूरकर यांनी कोल्हापूर दरबाराशी बोलणी करून आपली स्थिती बळकट करण्याचा प्रयत्न केला. कित्तूर कराणा आपले स्वातंत्र्य अबाधित राहवे असे वाटत होते पण तसे घडले नाही ब्रिटिश सर्व शक्ती पणाला लावून त्यांनी कित्तुरकर यांचा युध्दात पराभव करून सन 1824 मध्ये कित्तूर जहागीरी ब्रिटिश राज्यात विलीन करून घेतले. परंतु सन 1829 मध्ये पुन्हा मोठया

सुरूपाचे बंड झाले. या बंडाचे नेतृत्व ‘रायप्पा’ याने केले, त्याने आपल्याच प्रदेशत मोठया प्रमाणत लुटमार चालु केली होती. ब्रिटिशानी स्थानीकाची मदत घेऊन रायप्पाला पकडल्यानंतर ब्रिटिशानी त्यास फासी दिली. “सन 1830 मध्ये हा प्रदेश ब्रिटिशांनी मुंबईत धारवाड जिल्हा म्हणून विलीन केला.”[73]

5.8.4 विजापूरचे बंड -

ब्रिटिश अंमल सुरु झाला आता काही असंतुष्ट असणारे लोक बंडाचा पवित्रा घेवू लागले होते. यामध्ये दीक्षित ब्राम्हण ‘रावजी रास्ते’ व ‘बाळाप्पा ठाकल’ यानी काही सहकारी गोळा करून सन 1824 मध्ये विजापूरच्या पूर्वेस असणारी सिंदगी लुटली व लुटमार करणे व आपला अम्मल चालु केला ही बादमी ब्रिटिशांना लागताच त्यानी त्यांचे बंड मोडून काढले. सन 1840 मध्ये नायक ‘नरसिंह दत्तात्रय’ हा अंध ब्राम्हण याने निजामाच्या हद्दीतील 215 बंदूकधारी अरब बरोबर घेऊन याने बदामीवर हल्ला केला व येथील किल्ला त्याने ताब्यात घेतला यानंतर स्वःताला छत्रपती नरसिंह म्हणून द्वाही फिरविली व तेथे त्याने अमानूश लुट मार केली. यावेळी बेळगावच्या कलेक्टर म्हणुन ‘शॉने बेटिंग्टन’ यांच्या नेतृत्वाखाली एक तुकडी बदामीला पाठवली व यानंतर ब्रिटिश व नरसिंह दत्तात्रय यांच्यात युध्द झाली पण या चकमकीत नरसिंह पकडला गेले व त्याला शिक्षा झाली.

5.8.5 कोल्हापूर गडकरी (किल्लेरक्षक) यांचा बंड -

ब्रिटिश कंपनीचे मांडलीक बनलेले कोल्हापूरचे छत्रपती राजा शहाजी ऊर्फ बुवासाहेब सन 1821 मध्ये गादीवर आले होते. त्यानी ब्रिटिश विरुधी थोडयाफार प्रमाणात कारवाया चालु केल्या होत्या, सैन्य वाढवण्यास सुरवात केली, तसेच ब्रिटिश विरुध्द बंड करणायाना मदत चालु केली होती. कोल्हापूर करानी ‘कागल’ व ‘सातारा’ या प्रदेशाचा मुलूख बळकावण्यास सुरवात केली. यावेळी ब्रिटिशानी 30 डिसेंबर 1825 पुन्हा कोल्हापुरकर यांना तहात आडकवले या तहा नुसार ब्रिटिशांच्या शत्रुना कोल्हपूरकरानी आसरा देऊ नये, बंडवाल्याना चिरडून टाकावे, व सैन्य कमी करावे तसेच शांतीला धोका

निर्माण होईल असे वागू नये. पण हया अटी कोल्हापुरकर यांनी मान्य केल्या नाही त्यानंतर पुढे 1838 मध्ये ते मरण पावले यामुळे कोल्हापूर संस्थानात वारसा प्रश्न निर्माण झाला दोन बायका व त्याचे मुले यांचे पटेना आणि याच वेळी करवीरकर यांच्या कारभारात ब्रिटिशांनी हस्तक्षेप सुरु केला. ब्रिटिशानी 'दाजी कृष्ण पंडित' यांला दरबारी दिवाण नेमुले त्यांच्या हाताने कोल्हापुरचा कारभर चालविला पण हा कारभार दरबारी मंडळीना पसंत पडला नाही याचाच उदय गडकरी उठावात झाला. नवीन राज्य आल्यामुळे गडकरी यांच्यावर वाईट परिस्थिती उदभवली होती. मराठी राज्यात हे किल्ले रक्षणाचे काम करीत त्या बदल्यात त्यांना जमिनी दील्या जात असे. पुढे जमिनी देणे ब्रिटिशांनी बंद केले व आहे त्या जमिनी त्याच्याकडे ठेवण्यात आल्या. कोल्हापुरच्या दाजी कडून शेतसारा वसुलीकरता मामलेदार नेमणे गेले. यामुळे 'कारभारी' व 'गडकरी' यांच्यात पेज निर्माण झाला येथून खया अर्थाने बंडाला सूरवात झाली. त्यामुळे ब्रिटिश व गडकरी यांच्यात अनेक चकमकी झाल्या. या उठावात विशाळगड, सामानगड, पावनगड, पन्हाळा इ. किल्यांवरील गडकरीही व अधिकारी या उठावात सामिल झाले म्हणून या उठावाला गडकयांचे बंड म्हणत असे.[74]

गडकर यांनी दाजीबा पंडीत याला सन 1844 मध्ये पकडून कैद केले आणि सामानगडचा किल्ला व शहर ताब्यात घेतले. यावेळी गडकरी म्हणुन असलेले 'रावजी चाकनीस' व 'दिनकरराव गायकवाड' यानी बंडाचा झेंडा उभारला. बंडव्याल्यानी कोल्हापूर आपल्या ताब्यात घेऊन सामानगड ताब्यात घेतले त्यानंतर मात्र बंड मोडण्यासाठी ब्रिटिशाच्या मोठय फौज फाटा घेऊन त्यांनी पुढे युध्दास सुरवात केली. पुढे हे युध्द 17 दिवस चालले पण त्याना शेवटी सल्ला, मसलत करून फितूरीच्या राजकाणाने ब्रिटिशाना यश आले शेवटी बंड चिरडुन टाकण्यात त्यांना चांगलेच यश आले.

5.8.6 कोकणातील सावंतवाडी करांचे बंड -

सावंतवाडी कर कोकणातील नवीन संस्थान निर्माण झाले. महाराष्ट्रात मराठी मुलखात ब्रिटिशांच्या विरोधात थोडयाफार प्रमाणात बंड झाले त्यात कोकणात असणारे सावंतवाडीकर यांचे बंड चांगल्या प्रकारे उदभवले होते पण हे मोडण्यातही

ब्रिटिशांना यश आले. 17 फेब्रुवारी 1819 मध्ये सावंतवाडीकरानी ब्रिटिशांचे मांडलीकत्व कबूल केले यानंतर सन 1823 मध्ये सावंतवाडी प्रांतात नवीन खेमसावंत (बापूसाहेब) गादीवर आले यानंतर यामुलखात अनेक बंडाळया होऊ लागल्या होत्या त्यासाठी खेमसावंत यांना ब्रिटिशांची मदत घ्यावी लागली होती आणि याचाच फायदा ब्रिटिशानी घेतला. सन 1828 मध्ये महादेवगडचा पूर्वीचा किल्लेदार 'फोंडसावंत तांबुळवाडीकर' यानी सावंतवाडी सरकार विरुध्द बंड केले ब्रिटिशानी ते बंड मोडून काढले. यानंतर हे बंडवाले इचलकरंजी संस्थानात पळून गेले. सावंतवाडी करांशी ब्रिटिशानी करार करून आपल्या मर्जीतील दिवान 'विठ्ठल सबनीस' यास नेमले. यामुळे या प्रांतात बरीच अशांतता पसरली व शेवटी सावंतवाडीकर अपयशी ठरले. ब्रिटिशानी खेनसावंत पदज्युत केले व सर्व कारभार आपल्याकडे घेतला. यावेळी सावंतवाडी कराच्या बद्दल लोकामध्ये सुडाची भावना निर्माण झाली. येथील सरदारानी ब्रिटिश व सावंतवाडीकर यांच्या विरुध्द बंडाचा झेंडा उभारला या बंडाचे नेतृत्व 'आत्मा चौकिकर' याने केले होते पण ब्रिटिशानी ते यशस्वी होऊ दिले नाही.[75] त्याच पध्दतीने 'रामजी शिरसाट' हा सामान्य नागरिक याने कोल्हापूर, बेळगांव, धारवाड यांनी बंडात सामिल व्हावे म्हणून त्याने तयारी केली पण ही योजना सफल होण्यापूर्वीच गोव्याच्या सरकारच्या मदतीने ब्रिटिशांनी बंडाचा बीमोड केला. कंपनी सरकारणे सर्व परिस्थिती आटोक्यात आणली बंडाचा प्रसार होऊ नये म्हणून त्यांनी अनेक हुकूम काढले व लष्कराच्या मतीने ते बंड शांत केले.[76]

5.9. माल्कमने महाराष्ट्रासाठी दिलेले योगदान -

सन 1827 मध्ये एलफिन्स्टन यांच्या जागेवर मुंबई प्रांताचा गव्हर्नर पदावर 'सर जॉन माल्कम' यांची नियुक्ती झाली. एलफिन्स्टन व माल्कम यांची कार्य पध्दती एक सारखी होती. महाराष्ट्राच्या इतिहासात कंपनी सत्तेने आपला पाया रोवला व जी काही कार्य सुरवातीच्या काळात महाराष्ट्रत कंपनी सत्ता प्रस्थपित करण्यासाठी सुरू केली त्यात मोलाचे काम एलफिन्स्टन बरोबरचे होते. माल्कम हे वृत्तीने साम्राज्यवादी होते त्यांनी ब्रिटिशांच्या साम्राज्य विस्तारचे समर्थनच केले पण तो उग्र स्वरुपाचा साम्राज्यवादी नव्हता. माल्कम

यांना ब्रिटिश कंपनीची सत्ता हिंदुस्थानात टिकून राहवी असे वाटत होते पण तिचा वापर लोकहितासाठी व्हावा हे त्याचे मत होते. त्याने शिक्षण क्षेत्रात एलफिन्स्टनचे धोरण पुढे चालु ठेवून सुधारीत वृत्ती प्रबळ केली. 'माल्कम यांनी ठोस घोषणाच केली होती की, जर या देशाची प्रगती साधायची असेल तर या देशातील लोकांचा स्वाभिमान, सत्ताप्रेम, यांना धुडकावून लावणे योग्य ठरणार नाही. येथील प्रजेला त्यांचा हक्क, त्यांच्या जिवनातील योग्य त्या संधी निर्माण करून देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविला पाहिजे' यासाठी माल्कम यांनी कार्य केले.[77]

माल्कम यांचे पुर्ण लक्ष देशतील शेती, उद्यानविज्ञान, पुष्पोत्पादन या व्यवसायांचा मुंबईच्या प्रांतात विकास साधने, या साठी लागणारी माहिती मिळवणे, सुधारित पध्दती, नव्या प्रकारची बी बियाणे, आणि युरोप अथवा अन्य देशातून आयात केलेल्या वनस्पती, यांची माहिती व साहित्य हे सर्व माल्कमने स्थापन केलेली संस्था 'हॉर्टिकल्चर सोसायटी' या मार्फत सर्व जनतेला उपलब्ध करून देत असे. त्यात कोबी, भाजीपाले ही नवीन फळे महाराष्ट्रात आणली मुंबई च्या परिसरात ह्या पुष्पवाठिका निर्माण झाल्या. याला उत्तेजन देण्यासाठी बैलजोडी, सुधारित नांगर, लोकरी पांघरुणे संस्थेनी पुरवली होती. या कार्यसाठी माल्कमला काही हिंदूस्थानी लोकानी पण मतद केली होती. त्यात 'जगन्नाथ शंकरशेट', 'फ्रामजी कावसजी' या उदयोजकानी मोलाची साथ दिली होती. यात फ्रामजी कावसजी या फारशी उद्योगपतीने तर आपल्या संपत्तीचा काही भाग 'पावई' या खेडयाचे नंदवन करण्यात खर्च केला. चिनच्या आनेक वनस्पती या गावात लागवड केल्या आहे. या साठी माल्कम यांनी संपुर्ण गाव कामजी कावसणी यांना इनाम म्हणून दिले. 'माल्कम यांनी महाराष्ट्रात आपले चांगले नाव मिळवले होते. त्यांनी युरोपीयन व ऐतद्देशिय लोक या दोघानाही समान वागणूक दिली.'[78]


N
INDIA
During 1857 A.D.
AFGANISTAN
INDEPENDENT PATHAN TRIBES
Peshawar
Rawalpindi
KASHMIR
PUNJAB
Lahore
Ludhiana
PATIALA
Garhwal
ROHILKHAND
BAHAWALPUR
KHAIRAPUR
SIND
Delhi
Aligarh
Etah
Hathras
Agra
Mainpuri
Cawnpore
Gwalior
AJMER
NEPAL
SIKKIM
BHUTAN
Cooch Behar
Fatehpur
Benares
Allahabad
Dehri
BIHAR
RAJPUTANA
HOLKAR
BUNDELKHAND
REWA
CUTCH
BHOPAL
BAGHELKHAND
BENGAL
TRIPURA
MANIPUR
KATHIAWAR
GAIKWAR
Indore
NAGPUR
BHONSLE
Barrackpore
Calcutta
SHAN BURMA STATES
BERAR
Cuttack
ORISSA
BOMBAY
Bombay
BASTAR
NIZAM
HYDERABAD
Bijapur
GOA
ARBIAN SEA
MYSORE
MADRAS
BAY OF BENGAL
LAKSHADWEEP IS.
ANDAMAN & NICOBER IS.
Pudukkottai
COCHIN
CEYLON
British India
Hindu States
Muslim States
Main Road
Map not to Scale
Copyright (c) Compare Infobase Pvt.,Ltd. 2003-04

5.10. सन 1857 च्या बंडातील महाराष्ट्र -

सन 1818 मध्ये महाराष्ट्रात मराठी साम्राज्यात झालेली उलथापालथी मुळे पेशव्याला ब्रिटिशानी निवृत्ती म्हणून कानपूर जवळ बिठूर येथे निवृत्ती दिली पण या निवृत्तीच्या काळात त्यानी ब्रिटिश यांच्या बरोबर आपल्या कुरापती चालुच ठेवल्या होत्या. त्याचे परिणाम म्हणजे पुढे ब्रिटिश विरुध्द असंतोष वाढला व त्याचे पुढे सन 1857 च्या रुपाने हिंदुस्थान मध्ये बघण्यास मिळाले. 1857 च्या ब्रिटिश विरोधी उठावाचा महाराष्ट्राच्या मातीचा मोठा संबंध आला तो म्हणजे, ब्रम्हावर्त कानपुरात गंगेच्या कांठी हया स्वातंत्र्यासाठी अगदी आरंभापासून उग्र स्वरुप धारण करणाया प्रमुख त्रिमुर्ति म्हणजे 'नानासाहेब पेशवे', 'झांशीची राणी लक्ष्मीबाई' आणि 'तात्या टोपे' हे तीन होय. हया तीनही व्यक्ति महाराष्ट्रात जन्माला आले होते. पण 1857 च्या उठावाचे कार्यक्षेत्र हे ब्रम्हावर्त, कानपूर, झाशी, उत्तर हिंदुस्थान हेच परिसर होते. मुख्य म्हणजे येथील ताज्या तमाच्या ब्रिटिश मंडळीचा जुलूम, अत्याचार यांच्या ज्वाला तसेच येथील असणारे राजे यांच्या स्वातंत्र्यावर आलेली गदा यामुळे येथील ऐतद्वेशिय मंडळीच्या मनात असंतोष उफाळला व त्याचे रुपांतर पुढे सन 1857 च्या मोठया बंडात झाले.[79]

महाराष्ट्रात ब्रिटिशांच्या विरोधी बंडात ऐतद्वेशीय लोकानी साथ देण्याचे कार्य केले. ब्रिटिशांनी महाराष्ट्रात केलेला कारभार व कार्यपध्दती मुळे त्याना चांगल्या पध्दतीने प्रतिसाद मिळाला होता. एलफिन्स्टन मुंबईचा गव्हर्नर असताना प्रथम केलेले कार्य याला प्रभावित होऊन महाराष्ट्र प्रांतातील नेते ब्रिटिशाना सामिल झाले होते. ब्रिटिश विरुध्द बंडात सामिल होणार नाही या अशयाचे अनेक पत्रे मुंबई गव्हर्नर यांना जाऊन पोचली होती. ऐतद्वेशिय संस्थानिकान पैकी काही संस्थानीकानी ब्रिटिशाना मदत केली. सन 1857 मध्ये नागपूर, सातारा, कोल्हापुरात ज्याकाही घडामोडी 1857 मध्ये घडल्या, त्यांत राज्यकर्त्यांचाही हात होता. काही राज्यकर्ते काठावर होते, त्यांनी कुंपणनीतीचा अवलंब केला, कुंपणावर बसून त्यांनी काही काळ तमाशा पाहिला, व जे पारडे वजनदार दिसते, तिकडे त्यांनी उडी घेतली.[80]

5.10.1. सन 1857 मध्ये महाराष्ट्रात झालेले बंडास ब्रिटिशांचे चोख उत्तर -

महाराष्ट्रात 1857 मध्ये ब्रिटिश यांच्या विरोधात उठावाचे वातरवरण निर्माण होण्यास उत्तरेतील सैनिक, राजे, इ. निर्माण केलेल्या घटना ज्या पध्दतीने कारणीभूत आहे तसेच ज्या पध्दतीने ब्रिटिशानी आपली सत्ता स्थापन केली त्यानंतर काही छोटया मोठया चकमकी, बंड, मराठी साम्राज्या निर्माण झाल्या. त्याच प्रमाणे मराठी साम्राज्या विषयी असाणारी भावना या सर्व गोष्टीना उद्रेक 1857 मध्ये झाला पण त्याचे स्वरुप फार थोडया प्रमाणात दिसून आले हा बंड महाराष्ट्रात ब्रिटिशांच्या लोक उपयोगी कार्य मुळे जाणावला नाही. मराठी राज्यत पेशवा, जहागिरदार, सरमजाम, पेंढारी यांनी 1818 मध्ये केलेल्या महाराष्ट्राचे हाल या मुळे येथील जनता सर्व तो परी त्रस्त झाली होती पण त्यानंतर आलेले ब्रिटिशांचा कारभार सर्वाना शांतीने संभाळुन होता म्हणून मोठया प्रमाणात विरोध झाला नाही. 1818 ते 1857 या काळात महाराष्ट्रात ज्यानी बंड केले होते आणि ब्रिटिशांनी शांत केले पण पुन्हा त्यानीच फिरून 1857 मध्ये बंडचा झेंडा उभारला होता. त्यामुळे ब्रिटिशाना तो मोडण्यासाठी फार श्रम महाराष्ट्रात घ्यावे लागले नाही. कंपनीने सन 1850 पर्यंत महाराष्ट्रातील सर्व बंड शांत केली.

उत्तरेकडील सर्व प्रकार जर असाच प्रकार मुंबई इलाख्यात झाला तर आपल्य व्यापाराला बाधा होईल हे ब्रिटिशाना वाटू लागले होते. पण तसे काहीच झाले नाही उलट येथील परिस्थिती वेगळी होती. ब्रिटिशांचे मुंबईतील कार्य, व आपल्या चांगुलपणामुळे ब्रिटिशांच्या स्तुतीस पात्र ठरलेल्या मुंबईकरांनी अनेक ठिकाणी सभा घेऊन त्या सभेत उत्तरे कडिल बंड करणाया सैनिकांची निंदा केली. ब्रिटिशांचे गोडवे गायिले आणि आपण ब्रिटिश राज्यमध्ये अत्यंत सुखी आहोत अशा प्रकारचे विनंती अर्ज त्यानी गव्हर्नर एलिफन्स्टन यांजकडे पाठविले. आपण गप्प बसलो तर सरकार आपल्याला बंडखोर समजेल त्यामुळे ते सरकारचा रोष ओढून घ्यासाठी तयार नव्हते. पण यावेळी सामान्य जनांत मात्र ब्रिटिश विषयी रोष होता. त्यातच एक सैनिक गुलमार डुबे ह्याने मुंबईतील उठावाची योजना केली या उठावात ब्रिटिशांच्या हिंदी लष्कराच्या नेटिव्ह इन्फन्ट्रीच्या नं. 10 व 11 तुकडयांतील सैनिकानी भाग घेतला या वर ब्रिटिश अधिकायाचे बारीक लक्ष होते. या तुकडीतील

हवालदार वसईद हुसेन व प्रायव्हेट मंगल यांना ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घेऊन त्यांना शिक्षा केल्या आणि हे बंड मोडण्यात ब्रिटिश सरकारला चांगलेच यश आले.[81]

सन 1857 च्या उठावाच्या वेळी महाराष्ट्रात चांगली कामगीरी केली ती म्हणजे सातारा छत्रपती यांचे वकील 'रंगो बापूजी' यानी ब्रिटिशानी सातारा राज्य खालसा केल्यावर छ. प्रतापसिंह यांची बाजू ब्रिटिश सरकार सामेर मांडण्यासाठी सन 1839 मध्ये रंगो बापूजी लंडनला पाठवले पण त्यांना तेथे पैसाच्या अभावामुळे काहीच करता आले नाही त्यामुळे त्यांना रिकाम्या हाताने परत यावे लागले. 14 ऑक्टोबर 1847 मध्ये प्रतापसिंह मृत्यु पावले आणि याच सुमारास सातारा राज्य खालसा झाले इंग्लडला छत्रपतीचे वकील म्हणून बापू यांनी काम पाहिले त्यात यश आले नाही त्यामुळे चांगलाच संताप झाला होता. छत्रपतीच्या कोणताच गोष्टीला यश आले नाही म्हणून बापू अता मायभूमित परतण्याचा निर्णय घेतला आणि सन 1854 मध्ये रंगो बापूजी मुंबईला आले.[82] यांनतर त्यांनी सातारा येथुन उठावाची सुरवात केली. त्यांच्या मनात आपल्या धन्याबद्दल मोठा आदर होता. प्रत्येक संकटात आपल्या धन्याची बाचू लावून धरली होती शेवटी बांद फुटला बापूनी आता निस्सीम भक्तिने संघर्ष करण्याचे ठाम केले हाते व त्याने ते कार्य मनपुर्वक केले. त्यांनी आपले सहकारी, जहागिरदार यांना गोळा करण्याचे काम चालु केले आणि पुढे ब्रिटिश विरोधी रन फुंकले, सातारा व महाबळेश्वर येथे एकाच वेळी हल्ला करण्याचे ठरवले व त्यात रंगो बापूचा मुलगा सीताराम याकडे देखरेखीचे काम सोपविल होते. त्यात उठावासाठी अनेक नेते निर्माण करून त्यांच्यात प्रेरणा निर्माण करावयचे काम केले. 'सखाराम कबाडे', या सर्व कटाचा ताबेदार कराडचा 'दौलता हरी पवार' व सातारचे 'अप्पा फडणीस' यांनी कोल्हापूर राजबंधू चिमासाहेब यांच्याशी ब्रिटिश विरोधी उठावासाठी संधान बांधले होते. यावेळी बापू ब्रिटिश सैन्यत असलेले हिंदी सैन्य तटस्थ ठेवण्यासाठी प्रयत्न चालु केले व त्यात यश आले. यावेळी ब्रिटिशानी आमिषे व बक्षिसांची विलोभने देऊन बापुच्या सर्व धोरणांचा तपास लावला त्यानी सर्व करता धर्ता रंगो बापू हा आहे हे समजताच ब्रिटिशांनी मोठी मोहिम काढली बापुला ब्रिटिशांच्या गोष्टीचा सुगावा

लागताच सन 1857 मध्ये तो जो भूमिगत झाला तो कायमचाच.[83] याप्रकारे पुढे ब्रिटिशानी त्यांच्या सर्व सहकार्यना ताब्यात घेतले. रंगो बापु यांनी छत्रपतीच्या नावाखाली मोठा सहकारी वर्ग निर्माण केला होता. सन 1857 उठावाचे महाराष्ट्रा मध्ये पडसाद उमटले त्याचे सर्व श्रेय हे रंगो बापू यास जोते.

खानदेशात भिल्लाचे उठाव झाले होते पण ती थोडया प्रमाणात होते ब्रिटिशानी ते तेव्हाच चिरडले पण 1857 मध्यील उठावाला वेगळेच वळन होते याचे स्वरूप व राजकारणाचा रंग वेगळया दिशेचा होता. सन 1831 ते 1851 मध्ये खानदेश प्रांतात भिल्लांचा नायक व कंपनी सरकारचा नोकर ‘काजीसिंग’ यांना ब्रिटिशानी खुनी ठरवून शिक्षा दिली होती त्यानंतर त्याची सन 1855 मध्ये मुक्तता झाली त्यानंतर बंडाच्या ज्या बातम्या आल्या होत्या त्या सन 1857 मध्ये खानदेशात ‘काजीसिंग व भिमा नाईकाने’, यांनी ब्रिटिश विरोधी उठाव चालु केला. पण ब्रिटिशानी त्यांचे वेळेतच बंड मोडले. नाशिक भगातील कोळी लोकांनी ब्रिटिश विरुध्द बंड पुकारले होते. यात यांनी ब्रिटिशांच्या अनेक भागांवर हाल्ले, लुटमार करून त्याना त्रास देत असे. यात ब्रिटिशाना मोठा त्रास झाला. ‘भागोजी नाईक’ व ‘मक्राणी फुलदीखान’ हे या उठावाचे पुढारी होते. या उठावात राजे भगवंतराव व इतर पुढारी लोकाना पकडून फाशी दिली त्यात भागोजी नाईक सन 1858 मध्ये शरण आला भागोजी यास सन 1859 मध्ये चकमकीत ठार केले.

कोल्हापरूचा बंड ब्रिटिशानी सन 1844 मध्ये शांत करून राजकारणात चांगल्या प्रकारे शांतता निर्माण केली होती. पण सन 1857 मध्ये उत्तरेकडील बातम्या ऐकून कोल्हापुरचे राजे चिमासाहेबाना ब्रिटिश विरुध्द जाणे कठीण जात होते. यावेळी बिठूर येथील नानासाहेब यानी कोल्हपूरकर यांच्याशी संपर्क साधुन उठावात सामिल होण्यास प्रोत्साहन दिले व यावेळी कोल्हापूर शहर व राजवाडा राज्यानी ताब्यात घेतला. कोल्हापूर नागरिक व नोकर कारभरी फढणीस, सरदार, गडकर हे सर्व उठावासाठी सामिल होते. यात क्रांती सैनिकांनी ब्रिटिशावर हल्ला केला. कोल्हापूरचा उठाव ब्रिटिशाना मोडण्यात अपयश आले. त्यानी यावेळी धुर्त पणे शरणागीत घेतल्याचे सांगुन ‘कॅप्टन शेनिडर’ याने

बनाव करून कोल्हापूरच्या राजास आपल्या ताब्यात घेतले. यानंतर बंडवाल्याची धरपकड करून काहीना फासावर देण्यात आले. चिमासाहेब याना सिंध प्रांतातील कराची या ठिकाणी नजरकैदेत ठेवण्यात आले. पुढे त्यांचा मृत्यु 15 मे 1869 रोजी झाला.[84]

लहान मोठे असे महाराष्ट्रात ब्रिटिश विरोधी अनेक उठाव झाले त्यात औरंगाबाद, नरगुंद, जमखिंडी येथे पण उठाव झाले त्यांचा मोड करण्यासाठी ब्रिटिशानी निजामाची, हैद्राबाद येथील घोडदळाची साथ घेऊन त्यानी येथील बंड वाल्याना शरण येण्यास भाग पाडले. महाराष्ट्रातील विविध भागातील झालेले बंडांना ब्रिटिशानी चांगल्या प्रकारे आपल्या सैन्याच्या व फितुरीच्या जोरावर जिरडून काढले. 1857 च्या उठावा पासून व उठावा नंतर ब्रिटिशांनी आपली पकड हिंदुस्थानच्या जनतेवर घट करण्यासाठी निःशस्त्रीकरणाचा कायदा करून सरदार, दरकदार व आदिवासी जनतेकडून शस्त्रे गोळा केली.

5.11. उठावाचे परिणाम व कंपनी सरकारचा शेवट -

महाराष्ट्रात उठावाचे वातरवरण निर्माण होण्यास उत्तरेतील घटना ज्या पध्दतीने कारनीभूत आहे त्या पध्दतीने ब्रिटिशानी आपली सत्ता स्थापन केल्या नंतर काही छोटया मोठया चकमकी, बंड, मराठी साम्राज्या विषयी असाणारी भावना या सर्व गोष्टीना उद्रेक सन 1857 मध्ये झाला पण त्याचे स्वरुप महाराष्ट्रात फार थोडया प्रमाणात दिसून आले महाराष्ट्रात ब्रिटिशाच्या कार्य मुळे उद्रेक जाणावला नाही. एलफिन्स्टन व माल्कम यांसारखे कुशल अधिकारी महाराष्ट्राच्या भूमिला लागल्या मुळे महाराष्ट्रात 1857 च्या उठावाचे म्हणावे तसे पडसात उमटू शकले नाही. 1818 ते 1857 या काळात ज्यानी बंड केले होते त्यास ब्रिटिशानी आपल्या ताकतीच्या व युक्तीच्या जोरावर शांत केले. 1857 मध्ये उत्तर भारतात मोठया प्रमाणात कंपनीच्या असंतुष्ट कार्यामुळे अनेक सैनिक, शेतकरी, राजे रजवाडे यांनी बंडचा झेंडा घेतला पण त्याचे पडसात महाराष्ट्रात दिसले नाही. त्यामुळे ब्रिटिशाना तो मोडण्यासाठी फार श्रम महाराष्ट्रात घ्यावे लागले नाही.

शंभव वर्षे केलेल्या उदयोग फुकट जाऊन इतक्या मेहनतीने मिळविलेले राज्य हातचे जाते की काय अशी भिती काही काळासाठी त्यास उत्पन्न झाली. 1857 मध्ये

ऐवढया मोठया प्रमाणात हिंदीजनतेच्या मनात ज्वाला उफाळल्या पण याचे कारण शोधण्या पेक्षा पुढील व्यवस्था कशी करावयाची, परत अशा घटना घडुनये यासाठी काय योजना राबवायची हीच गोष्ट पुढे आली आणि शेवटी "ईस्ट इंडिया कंपनी चा 1 एप्रिल 1858 रोजी हिंदुस्थान मधुन शेवट झाला." यावेळी हिंदूस्थानचे राज्य इंग्लंडच्या संम्राज्ञी 'राणी व्हिक्टोरिया' यांच्या ताब्यात गेले. हे जाण्याचे एक कारण म्हणजे, हिंदूस्थानचे राज्य उत्तरोउत्तर काही अंशी 'इंग्लंडचे सरकार' व काही अंशी 'कंपनी' यांच्या मार्फत चालले म्हणून पुष्ळक वेळा गोंधळ निर्माण होत गेला. परंतु 1857 चा लोकक्षोभ सहारक, रक्तरंजीत युध्दाचे व रक्तापात यासारखे प्रकार घडले, तेव्हा ब्रिटिशानी म्हणजेच इंग्लडच्या राणीच्या सरकारणे एकहाती सत्ता ठेवण्याचे ठरविले आणि असा कायदा इंग्लड मध्ये 'बोर्ड ऑफ कंट्रोलचा अध्यक्ष 'सर चार्लस् वूड' याने इंग्लड संसदे पुढे मांडून शेवटी तो मंजुर होऊन हिंदूस्थान इंग्लडच्या सत्ताधीशाने आपल्या ताब्यात घेतले.' यावेळी हिंदुस्थान मधील कंपनी संपली सर्व अर्थिक व्यवहार पूर्ण करून देण्यासाठी कंपनीला पंधरा वर्षचा कार्यकाल दिला गेला. कंपनीचा मुख्य अधिकारी गव्हर्नर जनरल होता पण आता तोच 'व्हाईसरॉय' झाला म्हणजेच राजाचा प्रतिनिधी ही पदवी देऊन हिंदूस्थान मध्ये कारभार करण्यास हजर झाले. त्यानुसार हिंदूस्थानचा पहिला 'व्हाईसरॉय कॅनिंग' हा होय.[85]

5.12. भारतीयांसाठी ब्रिटिश सरकार लंडंन (राणीचा जाहिरणामा) -

आठराशे सत्तावनमध्ये झालेल्या उठावानंतर भारतातील ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार पुर्ण पणे संपवण्यात आला आणि भारतातील शासन पध्दतीची जबाबदारी ब्रिटिश पार्लमेंटने स्वीकारले. ब्रिटिश मंत्रिमंडळाचा सदस्य असलेला एक मंत्री 'भारतमंत्री' यांच्या भारतातील राज्यकारभारावर नियंत्रण ठेवले जाऊ लागले. भारतमंत्र्याला साहाय्य करण्यासाठी 'इंडिया कौन्स्लि' हे मंडळ निर्माण करण्यात आले त्या मंडळातील बहुसंख्य सभासद भारतात दहा वर्षे सनदी सेवेत काम केलेले आणि भारत सोडून दहा वर्षाचा कालावधी उलटलेले नसावेत, असा इंग्लड संसदेचा संकेत होता.

शिवाय भारतातील कारभारा विषयी अहवाल भारतमंत्र्याने पार्लमेंटला दरवर्षी सादर करावा अशी तरतूद सन 1858 च्या कायद्यात केली गेली.

भारतातील 'गव्हर्नर जनरल' हा इंग्लंडच्या राजाचा सन 1858 नंतर प्रत्यक्ष प्रतिनिधी 'व्हाइसरॉय' या नात्याने ओळखला जाऊ लागला. त्यामुळे ब्रिटिश राजवटीचा भारतावर प्रत्यक्ष राज्यकारभार सुरु झाला. त्या वेळी व्हिक्टोरिया राणीने एक जाहिरनामा काढला. तो 'राणीचा जाहिरनामा' म्हणून प्रसिध्द आहे. या जाहिरनाम्यान्वये संस्थानिकांबरोबर झालेले तह करार यांचे पानल होईल तसेच त्यांचे हक्क, दर्जा, अधिकार व मान अबाधित राखले जातील सर्व प्रजाजनांना वंश, जात, धर्म, पंथ यांमुळे भेद न करता शिक्षण व योग्यतेनुसार शासनात नोकया दिल्या जातील. धार्मिक अचरनाची संपूर्ण स्वातंत्र राहून त्यात ढवळाढवळ केली जाणार नाही. पारंपरिक रुढी, आचार, कल्पना यांना योग्य तो आदर मिळेल. सार्वजनिक हिताची कामे करण्यात येतील आणि सर्व प्रजाजनांच्या हितासाठी शासनाच्या अधिकारांचा योग्य वापर होईल, असे जाहिर आश्वासन देण्यात आले. ब्रिटिश सरकांरला भारता सारख्या दूरच्या खंडप्राय देशात राज्य करावयाचे असेल, तर तेथील लोकांच्या भावना समजून घेण्याची आवश्यकता 1857 च्या उठावानंतर वाटू लागली. सन 1861 च्या कौन्सिल विषयक कायद्याने कौन्सिलची निर्मिती झाली त्यानुसार आणखी दोन गोष्टी करण्यात आल्या. कायदे करण्याच्या कामी भारतीयांना सहभागी करणे आणि 'मुंबई व मद्रास' येथील गव्हर्नर कौन्सिला कायदे करण्याचा अधिकार पुन्हा बहाल करण्यात आला. "कलकत्ता येथील सुप्रीम कौन्सिल मध्ये कायदे करण्यासाठी कमीत कमी सहा आणि जास्तीत जास्त बारा एवढे सभासद नेमावेत त्यापैकी किमान सहा बिनसरकारी असावेत. ही भारतातील कायदेमंडळाची सुरूवात समजण्यास हरकत नाही. केवळ कायदे करणे एवढेच कौन्स्लिचे काम असे प्रश्न विचारणे, ठराव मांडणे, अंदाजपत्रकावर चर्चा करणे, ही कामे त्यांला करता येत नसत."

5.13. 1857 नंतर महाराष्ट्रत बदलाचे वारे -

एकोणाविसावे शतक म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासात 'प्रबोधनाचे' शतक मानले गेले. या काळात महाराष्ट्रांतील विचारवंतांनी धार्मिक, वैचारीक, अधुनिक क्रांतीला सुरवात केली होती. ब्रिटिशांची राजवटीला कंपनी सरकारने ज्या कालखंडांत रूजविण्यासाठी जागा करून दिली त्याच कालखंडात महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय इ. क्षेत्रात परिवर्तन घडण्यास सुरवात झाली होती. म्हणजेच एक प्रबोधन युग सुरु झाले हाते. याच काळलखंडाला परिवर्तनाचा कालखंड असे मानले जाते.[86]

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये संवैधानिक दृष्टया जी प्रगती झाली, ती अत्यंत शांत गतीने आणि बयाच अंशी बाह्य परिस्थितीची प्रतिक्रिया या रुपाने झाली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दळणवळणाच्या साधनात झालेली सुधारणा, भारतीय सनदी नोकरीतील प्रवेशासाठी स्पर्धात्मक परीक्षेची सुरूवात, इंग्रजी शिक्षणाचा प्रसार यामुळे नोकरशाहीचे जुने स्वरूप जाऊन, नवे ब्रिटिश वातावरणातील खुले स्वरूप आले व अंशतःनोकरशाही कार्यक्षम झाली. सन 1857 मध्ये इंग्लडच्या राणीने हिंदुस्थानची 'सम्राज्ञी' हा किताब घेतला. ती घटना नव्या स्थित्यंतराचे सूचक होती. 'लॉर्ड मेकॉले' यांच्या शिफारशीवरून ज्या इंग्रजी शिक्षणाची सुरूवात झाली त्याचा प्रसार आणि परिणाम म्हणून पाश्चात्य विद्या, संस्कृती आणि राजकीय विचार यांचा प्रसार भारतात झाला त्या मधूनच राष्ट्रवादी चळवळ निर्माण झाली. राष्ट्रवादाच्या चळवळीस कारणीभूत दोन घटक निर्माण झाले त्यात एक गट असे मानत असे की हिंदू समाजातील विचार, चालीरीती या बूरसटलेल्या असून आधुनिक विचारा प्रमाणे त्या सर्व सोडून लोकांनी शास्त्र आणि विवेक यांची कास धरावी. दुसया गटाला असे वाटत असे, की हिंदूस्थानातील प्राचीन संस्कृती हीच श्रेष्ठ असून आधुनिक संशोधनानेही त्यात संस्कृतीच्या काळाला सुवर्णयुग म्हटले आहे. परंतु या दोन्ही गटांचा भारतीय राष्ट्रवादाच्या चळवळीस मोठा हातभारत होता.[87]

बदलाच्या वाया मुळे हिंदूस्थानात हळूहळू पण का होईना बदल होत गेला. हा सर्व बदल हळूहळू दिसु लागला तो म्हणजे, येथील शैक्षणिक धोरणात सुरु झालेले परिवर्तन होय. यावेळी देशात युनिव्हर्सिटी स्थापून उच्च शिक्षण देण्यासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न चालु केले होते. देश विदेशातील राजकारणाचे ज्ञान देणारी, त्याचा साधकबाधक

खल करणारी देशी व इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रे तसेच वाढत्या सामाजिक संस्थेने लोकमताला जागृत करण्याचे काम करीत होती. इंग्रजी शिक्षणाने डॉक्टर, वकिल, बॅरिस्टर व कारकून मंडळी तयार झाली. हिंदुस्थानची राजकारणाची सूत्रे यावेळी या मंडळीच्या हाती आली. याच काळात '18 ऑगस्ट 1852 मध्ये नाना शंकरशेठ यानी मुंबईत बॉम्बे असोसिएशन ची स्थापना झाली.' बॉम्बे असोसिएशन ची स्थापना करण्याचा उदेश म्हणजे जनतेच्या मागण्या, विनंती अर्ज पाठवणे, जनतेची उद्दिष्ट साध करून घेणे हे होते. यामुळे या संस्थेचे पुढे पुढे सार्वजनीक कामात सक्रियता वाढत गेली. मिशनरी शिक्षणावर म्हणजेच ख्रिस्ती शिक्षण देण्यास सुर्वात झाली त्यावर 'डॉ भाऊ दाजी' यानी टीका केली. बॉम्बे असोसियएशन संस्थेमार्फत भाऊनी मुंबईत अनेक सुधारणा केल्यात.[88] याच सुमारास महात्मा फुले यांचे वादळी व्यक्तिमत्व पुढे आले. त्यांनी स्त्रियांच्या आणि कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाची, सामाजिक समतेच्या आणि समानतेच्या हक्काची व सामजक्रांतीची नविन दिशा निर्माण करणारी तुतारी फुंकली. 'न्यायमूर्ती गोविंद रानडे' हे राजकारणाला नीतीचे अधिष्ठान देऊ पाहणारे आणि देशाभिमानाच्या चळवळीला स्वदेशाचा पाया घालुन देणारे थोर विचारवंत होते. हिंदी राष्ट्रीयत्वाच्या भावनेला धर्माभिमानाचे पुंढ चढलेले तसेच रानडे यांनी पुण्यातील जागृत लोकांनी बरोबर घेऊन सन 1870 मध्ये 'सार्वजनिक सभा' नावाची संघटनेची स्थापना केली. समाज सुधारण्यासाठी महाराष्ट्रात अनेक संघटना उदयास आल्या त्यात 'आर्य समाज', 'थिऑसॉफी' यासारख्या संस्था होय. महाराष्ट्रात रानडे, भांडारकर यांनी 'प्रार्थना समाजाचा' पुरस्कार केला. इंग्रजी शिक्षणाने होऊ घातलेल्या धार्मिक हासाला अडवून लोकांना वैदिक तत्वज्ञानाची शिकवण देण्याचे कार्य 'स्वामी दयानंदां सरस्वती' यांनी स्थापिलेल्या 'आर्य समाज' या संघटने मार्फत मुंबईत समाजीक परिवर्तनास सुरवात केली यांच्या कार्यामुळे एकोनिसाव्या शतकात नवीन जागृती निर्माण करण्याचे काम झाले. यावेळी महाराष्ट्रात राजकीय जागृतीच्या ज्वाला निर्माण होऊ लागल्या होत्या. तर त्याच बरोबर ब्रिटिशानी या ज्वाला शांत करण्यासाठी प्रयत्न पण केले होते. त्यासाठी त्यांनी 'प्रेस

ॲक्ट' काढून वृत्तपत्र स्वातंत्र्याची मुस्कटदाबी केली. आपण गुलाम आहेत या गुलामीतून आपली सुटका करुन घेण्यासाठी सुशिक्षित वर्ग तयार झाला.

एकोणिसाव्या शतकात धार्मिक व सामाजिक सुधारणा मोठया प्रमाणात होण्यास सुरवात झाली. राष्ट्राच्या विकासासाठी नवीन युगाचा प्रारंभ होण्यास सुरवात झाली. यावेळी हिंदूस्थानात प्रचलीत असलेल्या वाईट चाली रिती म्हणजेच, 'सती प्रथा, जातिय प्रथा, बालविवाह, पर्दापध्दत, अस्पृश्यता इ.' प्रथा मुळे समाजात वेगळी दिशा निर्माण होऊ लागली होती.' ख्रिचन मिशनयानी या वेळी धर्म प्रसाराचे काम जोरात चालु केले होते. त्यामुळे हिंदू धर्म उदासीनता निर्माण झाली. याच सुमारास पुनर्जागरण होऊन अनेक भारतीय समाज सुधारकानी सामाजातील चालिरीती व धार्मिक स्थिती सुधारण्यासाठी मोलाचे कार्य केले. यातुन अनेक सामाजिक चळवळीना सुरवात होऊ लागली होती. यात मोलाचे कार्य केले ते 'गोपाळ हरी देशमुख' यानी पुण्यात सन 1848 साली 'प्रभाकर' नावाच्या पत्रात शंभरावर पत्रे लिहून महाराष्ट्रातील लोकाना सामाजिक चळवळीची माहिती देण्याचे काम केले. त्याच पध्दतीने त्यांनी 'सुधाकर' या वृत्तपत्रातुन महाराष्ट्रातील जनतेत नवीन सामाजिक, संस्कृतीक, राजकीय, आर्थिक संकटे टाळण्यासाठी मोठी सुधारणा करण्यास सुरवात केली. या पध्दतीने त्यांनी महाराष्ट्राच्या विचारात भर घातली महाराष्ट्राच्या राजकारणात परिवर्तनासाठी मोठा हातभार लावण्याचे कार्य गोपाळ हरी देशमुख यांनी केले.[89]


ब्रिटिश शासनाने हळुहळू भारतातील जनतेच्या हिताकडे व त्यांना प्रशासनाची माहिती व्हावी म्हणून त्यांनी अनेक कार्य केले त्यात सन 1850 मध्ये जनतेचा कारभारात समावेश असावा म्हणून 'नगरपालिका' निर्माण करण्यात आल्या. कंपनीने सन 1861 पासून प्रत्येक जिल्हयात स्वतंत्र 'पोलीस अधिकारी' नेमून महाराष्ट्रात शांतता व सुव्यवस्था स्वतःच्या सोयीसाठी निर्माण केल्या. सन 1833 मध्ये 'कायदा आयोग' आला व सन 1937 मध्ये 'पीनल कोड (दंडसंहिता)' लागू केले. यातून उतरंड असणारी खर्चिक न्यायालय व्यवस्था उदयाला आली. सन 1857 नंतर कंपनीच्या हातून हिंदूस्थानची सत्ता

गेली ती आता ब्रिटिश सरकारच्या हतात आली होती. ब्रिटिश शासनाने भारतीय जनतेत जाती भेद निर्माण करण्यास सुरवात केली. यावेळी ब्रिटिश सरकारची भारतीयांकडे पाहण्याची दृष्टी बदलून गेला होता. सन 1857 च्या बंडानंतर हिंदूस्थानात येणाया ब्रिटिश अधिकायानी भारतीयां विषयी वेळचे चित्र निर्माण करून घेतले होते. भारतीयावर कंपनीचा असणारा विश्वास ब्रिटिश राज्यात संपला होता. हिंदूस्थानात इंग्रजी शिक्षणाने वकिल, डॉक्टर, शिक्षक अशा नवीन वर्ग उदयाला आला होता. ब्रिटिश सरकारणे भारतीयाना वरच्या पदावर नौकरी पासून दूर ठेवण्याचे काम यावेळी केले. 'दिनांक 14 ऑगस्ट 1862 रोजी न्यायदानासाठी मुंबई हायकोर्टाची स्थापना करण्यात आली.' भारतीय लोकांना शस्त्रास्त्रे बाळगण्यावर बंदी घालण्यात आल्याने महाराष्ट्रातील सरदार लोकांच्या तलवारीच्या विळया झाल्या. सन 1857 च्या अगोदरच येथे पोस्ट व तारयंत्र सुरु झाले होती. सन 1865 पासून गॅझेटियर तयार करणचे कार्य आणि सन 1871 पासून जनगणना करण्यास सुरवात झाली. हे सर्व ब्रिटिश आपल्या सोईसाठी करत असले तरी याचा फायदा हिंदुस्थानच्या आधुनिकी करणासाठी होणार होता यातुनच भविष्यात प्रगतीला व स्वातंत्र्याला चालणा देण्याचे काम घडत गेले.

महाराष्ट्रात याच सुमारास अनेक सामाजिक, धार्मिक, राजकीय बदल घडवून अनणारे विचारवंत उदयाला आले त्यांनी सामाच सुधारण्यासाठी मोलाची कामगीरी पुढे केली. पुण्यात सन 1867 मध्ये सामज सुधारण्याच्या हेतूने तसेच जनतेच्या मनात राजकारण, देश प्रेम या गोष्टीना प्रोत्साहण देण्यासाठी, समाजातील धार्मिक, वाईट चाली रिती काढून टाकण्यासाठी प्रयत्न केले. जातीप्रथा, बालविवाह, पडदापध्दत. इ. वाईट कृत्यांना विरोध कारण्यासाठी मोलाचे काम केले ते 'आत्माराम पांडूरंग तर्खडकर' यांनी यांच्या सन 1871 मध्ये 'सार्वजनिक सभा' तसेच 'महादेव गोविंद रानडे' यांच्या सन 1867 मध्ये 'प्रार्थना समाज'[90] या संघटने मार्फत त्यांनी महाराष्ट्रातील जनतेच्या उत्कर्षासाठी पुढाकार घेतला होता. तसेच महत्वाचे म्हणजे 'आर्य समाज' संघटने मार्फत समाजात जागृती घडुन आणण्यासाठी मोलाचे कार्य केले. वैदिक धर्मावर आधारित

असलेला हिदू धर्माची झालेली वाईट परिस्थिती सुधारण्यासाठी मोठा प्रयत्न चालु झाले. सन 1857 ते 1883 पर्यंत भारतीय समाजत जनजागृति करण्यासाठी व राष्ट्रीय चेतना निर्माण करण्यासाठी तसेच धार्मिक सुधारणा, साहित्याची व शैक्षणिक इ. क्षेत्रात मोलाची कार्य घडुन आली होती.

सन 1874 - 78 या कालखंडात महाराष्ट्रात विविध ठिकाणी अन्याय करणाया सावकारा विरुध्द स्थानिक जनतेने जी बंडे केली ती ‘दखखन दंगे’ म्हणून प्रसिध्द आहेत. ब्रिटिशांची राजवट संपुष्टात आणण्याच्या विचाराने प्रवृत्त झालेल्या आद्यक्रांतिकारक ‘वासुदेव बळवंत फडके’ यांना ब्रिटिश सरकारने एडनच्या तुरूंगात मृत्युपर्यंत ठेवले. या सगळयातून महाराष्ट्रातील लोकांच्या लक्षात आले की आपण ब्रिटिश विरुधात प्रदीर्घ काळ केवळ संघर्ष करू शकत नाही. म्हणुन पुढे यातून राजकीय संस्थाचा उदय झाला. हिंदुस्थान मध्ये राजकारणाचा पया घालण्याचे काम करणारी ‘बॉम्बे असोसिएशन’ या संस्थेने मुंबईतुन राजकारणाचे धडे देण्यास सुरवात केली. त्यात जगन्नाथ शंकरशेट, दादाभाई नौरोजी हे संस्थापक होते या संस्थेचा प्रमुख उद्देश म्हणजे भारतीयांच्या अडचणी राज्यकर्त्यांच्या कानी घालणे व त्यांचे निराकरण करणे हा होय. यांचा पुढचा महत्वाचा पाया म्हणजे ‘सार्वजनिक सभा’ होय ‘गणेश वासुदेव जोशी’ ऊर्फ (सावर्जनीक काका) यांच्या पुढाकराने स्थापन झालेल्या या सभेने सामाजिक क्षेत्रातील जाचक प्रश्नावर आंदोलन केले. तसेच मॉरिशस मधील भारतीयांस मदत, दक्षिणेतील शेतकयाचा कायदा करणे, दुष्काळ समिती, मुद्रणस्वातंत्र्य, स्वदेशी, फेमिन कोडचे भाषांतर या क्षेत्रांत प्रभावी कार्य केले. यातुनच पुढे ‘अखिल भारतीय कॉग्रेस’ संघटनेच्या स्थापनेची पार्श्वभूमि तयार झाली. कॉग्रेस या शब्दाचा अर्थच मुळी एकत्र येणे होय. 28 डिसेंबर, 1885 रोजी कॉग्रेसची स्थापना हिंदुस्थानच्या धरतीवर झाली. पुढील स्वातंत्र्यासाठी वाटचाल करण्यास कॉग्रेस मार्फत मोठया जोमाने सुरवात झाली आणि यातुन महाराष्ट्रात परितर्वतनाची मोठी लाट उसंडून वाहण्यास सूरवात झाली. हक्क, स्वातंत्र, समता, बंधुता, देशप्रेम या गोष्टीचा मोठया प्रमाणात प्रसार होऊ लागला.



Indian States during
Revolt of 1857
States in rebellion
States loyal to British with army in rebellion
States aiding the British
British areas affected by rebellion
Neutral States
Extent of British Territories
A
KASHMIR
C
D
E
BIKANER
1
F
G
H
I
AWADH
K
L
M
N
O
P
Q
2
3
4
5
S
T
HYDERABAD
6
7

5.14. महाराष्ट्रातील एलफिन्स्टन यांच्या कार्याचा आढावा -

महाराष्ट्रात कंपनीची सत्ता टिकवणे व तिची वाटचाल करणे हे काम कंपनी साठी मोठे कठिण काम होते. ज्या पध्दतीने पाया पक्का असेल तरच इमारत भक्कम होऊ शकते त्याच पध्दतीचे कंपनीची वाटचाल होती. मराठयाशी युध्द कूरून सत्ता हासील केली पण तिला टिकवणे येवढे सोपे नव्हते ऐवढे असून सुध्दा ते काम हुशार व मुसद्दी 'मॉऊट स्टुअर्ट एलफिन्स्टन' याने सोपे केले. एलफिन्स्टच्या कार्या मुळे मराठी मणसात अधुनिकरणाचे खुळ निर्माण झाले नवीन पध्दत पुढे आली. संकूचीत पध्दती बंद झाली ज्या पध्दतीने नाना फडणीस यांची शेवट का होईना संकूचीत विचार निर्माण झाले तिनाच मराठी सत्तेचा शेवट होण्यास कारण झाले. महाराष्ट्र जनतेचे भाग्य म्हणजेच एलफिन्स्टन सारखा अधिकारी लाभला यांच्या धोरणा मुळे सन 1857 च्या उठावाला महाराष्ट्र कमी प्रतिसात मिळाला ही हिंदुस्थानच्या व महाराष्ट्राच्या दृष्टिने महत्वाची गोष्ट आहे.


एल्फिन्स्टन व एल्फिन्स्टन परिवाराने तिसया ब्रिटिश मराठे युध्द समाप्ती नंरत महाराष्ट्रात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करुन ब्रिटिशांच्या बद्दल जनमानसात आदर आणि विश्वास संपादन केला. पेशव्याने काय करावयाचे, छत्रपतीचे स्थान कसे निश्चित करावायचे, जहागीरदार, जमीनदार, वतनदार, हक्कदार सैनिक, वर्षासनधारक, परागंदा झालेले शेतकरी, कुणबी कुलकर्णी, पाटील व हिंदू मुस्लीम देवस्थानांची इनामे, देशमुख देशपांडे या सर्वाचे प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडविले आणि ब्रिटिश सत्ता महाराष्ट्रात दृढ करण्यासाठी लोकाश्रय देखील मिळविला कि पुढे लोक ब्रिटिश राज्य इे ईश्वरी वरदान आहे असे म्हणू लागले. एल्फिन्स्टन हा उदारमतवादी असला तरी साम्राज्यवादी प्रवृत्तीचा असल्याने मराठयांच्या इतिहासाची चांगली जाण असल्याने मराठयांकडून प्रथम किल्ले ब्रिटिशांच्या ताब्यात घेऊन किल्ल्यावरील राहण्याची व तेथे जाण्याची सर्व व्यवस्था नष्ट केली की जेणे करुन मराठे पुन्हा ब्रिटिशांच्या विरोधात उभे राहणार नाहीत. दु. बाजीरावाची साथ सोडल्यास व आपल्या सैनिकांसह आपल्या गावी पोहोचून शांत बसल्यास त्यांची वतने, सरंजाम, इनाम हक्क तसेच पुढे कंपनी सरकारच्या राज्यात चालु ठवेले जातील व

त्याला संरक्षणही दिले जाईल. एल्फिन्स्टन असे अभिवचन दिल्याने जो तो सरदार, जहागिरदार, वतनदार, हक्कदार आपआपली व्यवस्था लावून घेण्याच्या नादी लागला व ब्रिटिशांच्या जवळ जाऊ लागला. युध्दामुळे लावणी संचणी होत नाही, ती पुन्हा चालु होईल याची दक्षता ब्रिटिशांनी घेतली. दुसरा बाजीराव यांच्याशी कोणालाही संबंध ठेवू दिले नाही. सैनिकांना कृषि व्यवसाय करण्यास भाग पाडले. सामाजातल्या प्रतिष्ठितांचा प्रश्नही धूर्तपणे सोडविला. सरदार, सेनापती, लष्करी, सरंजामदार व जुन्या राजवटीत मानाची पदे भूषविणायांना सालाना भरपूर पेन्शन देऊन आपल्याला कोणी वाली नाही ही मनात भेडसावणारी शंका दूर केली. गांवातील व गांवातून बाहेर जाणाया मार्गावर वाहतूक व दळणवळणावर अतिशय बारीक लक्ष ठेवून नदीचे उतार, नावा व टोकडयांवर आपला अंमल प्रस्थापित केला. गांवातील घरे, वाडे, गढया, लागवडी खालील जमिन व पडीक जमिन यांची मोजदाद केली. कुलकर्णी अफरातफर करतात, खरे हिशेब हेतूपूर्वक दडवतात, सादर कलेले हिशेब बहुतेक खोटे असतात किंवा चुकीचे असतात. तसेच बहुतेक कुलकर्णी अडाणी आहेत, विश्वासास पात्र नाहीत हे लक्षात आल्यावर प्रत्येक गावात कंपनी सरकारचे कारकून पाठविले व त्यांना गेल्या दहा वर्षाचे हिशेब जे खरे आहेत ते कुलकर्णीनी यांनी समजावून द्यावे असा कडक आदेश दिला. खोटे हिशेब समजावून दिल्यास वतन जप्तीची व गुन्हेगारी घेतली जाईल हेही सूचित केले. तसेच त्यांची गेलेली पत प्रतिष्ठा पुन्हा मिळविण्याची ही संधी त्यांनी घ्यावी असेही जाहीरनाम्याद्वारे कुलकर्णीना सूचित करण्यात आले. जमिनीच्या सर्वेक्षणाबाबत एकच पध्दत आणि समान निकष लावल्याने शेतकरी, कुणबी, रयत, कुलकर्णी, पाटील यांचा विश्वास संपादन केला. कॉलरा किंवा पटकी या साथीच्या रोगात काय करावे, औषधे कोणती घ्यावीत या संबंधी देखील कंपनीने जाहीरनाम्याद्वारे रयतेला सावध केल्याचे दिसून येते.

शहरातील देवस्थानांच्या वहीवाटी, नंदादिप व नैवेध्याबाबत प्राचीन वहीवाटी प्रमाणोच लाचू ठेवल्या. शेतकरी व कुणबी आणि रयतेला तगाई उपलब्ध करून दिली. गांवातील गुरव, मुलाणा, वाणी, महार, रामोशी यांना देखील पडीक जमिन लागवडीसाठी देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून दिला. छापी आणि कोया रुपयावर बटा घेण्यास


किंवा छाप मारण्यास कायद्याने बंदी घातली.

गांवांचे संरक्षण, सुव्यवस्था व प्रशासकीय पुनर्रचना या सर्वच बाबतीत मराठयांच्या परंपरांचा पूर्ण अभ्यास करून एल्फिन्स्टनने आपले नवे धोरण आखले आणि जुन्या संस्थाना व जुन्या पध्दतीला नवे रुप दिले. जुन्या संस्थाच्या पारंपारिक अवास्तव अधिकारांवर नियंत्रण आणले. लोक समजुती दुखावणार नाहीत अशा बेताने प्रशासनात आवश्यक ते बदल धीमेपणाने पण निर्धारयुक्त करून महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेचे दृढिकरण केले व ते करीत असतानाच महारष्ट्रात परिवर्तन घडवून आणले. आदेश व हुकूम अंमलात आणताना जाणीव पूर्वक दाखविलेली सहिष्णुता हे त्याचे वेगळेपण म्हणता येईल. अंमलबजावणीची त्यांची पध्दत इतरांपेक्षा वेगळी होती. जाचक वाटणार नाहीत अशा प्रकारे धोरणे राबविल्यामुळे प्रारंभिक कारभार सुसह्य झाला व महाराष्ट्रात परिवर्तन / सत्तांतर घडून आले.



1680 - 1707 - मराठा प्रदेश
1707-1800 -
मराठा नियंत्रण व प्रभाव
1680 - 1707 - मराठा प्रदेश
1857 - मराठा राज्ये -बडोदा,
ग्वालेह, इंदोर, कोल्हापुर, सातारा.
Lahore
Multan
Panipat
Bikaner
Delhi
Lucknow
Ajmer
Jodhpur
Gwalior
Jhansi
SCINDIA
Benares
(Varanasi)
Patna
Allahabad
Mehidpur
Ujjain
Bhopal
GAEKWAD
HOLKAR
Baroda
(Vadodara)
Indore
Maheshwar
Calcutta
(Kolkata)
Nagpur
BHONSLE
Bombay
(Mumbai)
Pune
Bastar
BHONSLE
Satara
Kolhapur
Hyderabad
Madras
(Chennai)
Mysore
BHONSLE
Tanjore
(Thanjavur)

प्रकरण सहावे


मराठा व ब्रिटीश यांच्यातील पत्रव्यवहार




30 एप्रिल 1818 च्या जाहिरनाम्यानुसार दुसरा बाजीराव व कंपनी सरकार यांच्यातील युध्दामुळे ज्या शेतकयांचे नुकसान झाले आहे त्यांची पक्की चौकशी करुन त्यांना महसुलात तेथेच सूट द्यावी त्यांना इकडे पाठवू नये तसेच लावणी संचणी जास्त होईल अशी व्यवस्था ठेवावी.




दु. बाजीराव पराभव होताच 10 मे 1818 रोजी जाहीरनामा प्रस्तृत केला की, दु. बाजीरावाचे सरदार व सैनिक लढाईतून पळून आपल्या घरी येऊ लागले व काही येत आहेत. त्यातील कित्येकांनी कंपनी सरकारने अभय द्यावे म्हणजे आम्ही आमच्या घरी शांत राहु असे बालणे ब्रिटिश सरकारशी केले आहे. तेव्हा त्यांनी एका महिन्याच्या आत आपआपल्या घरी पोहचून शांत रहावे. सैनिक व सरदारांनी एकत्रित जमु नये व मुलखात फिरु नये. जो कोणी मुलखात फिरेल तसेच पन्नास शंभर एकत्रित करुन फिरेल किंवा सरकारच्या विरोधात बंड करेल त्याचे पारपत्य होऊन त्यास प्राणास मुकावे लागले.




1818 च्या जाहिरनाम्यानुसार दुसर्‍या बाजीरावाच्या लष्करातील लोकांनी गांवातील रयतेला त्रास दिल्यास त्यांची खबर त्वरीत गांवाच्या महाराबरोबर सरकारत कळवावी. बातमी पोहचविणायास बक्षीस दिले जाईल. दुसया बाजीरावाच्या लष्कराची माहिती गांवात न दिल्यास अथवा बातमी अडविल्यास त्या गांवापासून गुन्हेबारी म्हणजे महसूलाच्या रूपात घेतली जाईल.




2 मे 1818 च्या जाहिरनाम्यानुसार बाजीरावाच्या लष्करातुन फुटून किंती घोडेस्वार व पायदळ तुमच्या महालातील गांवोगांवी आले यांची चौकशी त्यांना न कळता करुन त्यांची नावा निशीवार यादी त्वरीत अहमदनगरास पाठविणे व महालातील नद्यावरील नांवावर पटेकरींवर टोकयांवर आपला अंमल कडक करुन बंदोबस्त चांगला राखणे.



22 मे 1818 च्या जाहिरनाम्यानुसार जुन्नर तालुक्यात कोणकोणत्या गांवात गढया आहेत, एकुण गढयांची गांवे किती आहेत, तालुक्याच्या बंदोबस्तासाठी कोणकोणत्या गांवात ठाणी बसविली आहेत व बसवावी लागतील. दु. बाजीरावाच्या कोणकोणत्या लोकांनी खेडी बळकावली आहेत. त्या गांवाचे नकाशे कोसबंदीसह पाठवून देणे तसेच नदीचे उतार कोठे कोठे आहेत व त्या उतारावर नांवावाले व टोकरेवाले किती आहेत त्यांची तपशिलवार यादी पाठवून देणे.





27 मे 1818 च्या जाहिरनाम्यानुसार आंबेगाव तफेतील वीसगांवचा महसूल सखाराम शंकर जमा करेल. तेथे दखलगिरी न करणे.



श्री

June 2nd 1818

27 मे 1818 च्या जाहिरनाम्यानुसार नारायणगांव येथील श्रीधर भट यांचे रोज दोन आणे सरकारातून देण्याचे इनाम चालविणे.









15 मे 1818 च्या जाहीरनाम्यानुसार पंचायतीच्या कामा करिता कोणी लाच देऊ नये व सरकारचे कामगारांनी लाच घेऊ नये. वतनाच्या कामात लाच दिली असे शाबीत झाल्यास ते वतन प्रतिवादीस देण्यात येईल.




5 जून 1818 च्या जाहिरनाम्यानुसार हिवरे, चिचोली, आरवी व पाडली या चार गांवची सरंजामी गणपतराव कान्हेरे, पटवर्धन, शेडवलकर यांच्याकडे दिलेली आहे, तेव्हा ती चालवणे.





पुण्याहुन रॉबीनसन्स साहेबाकडील कारकून व सिबंदी जुन्नर प्रांतातील डिगोरे या गांवी सरकार कामाकरिता येणार आहे. तेंव्हा तुमच्या कारकुनांना व सिबंदीस त्यांना मदत करण्यास सांगणे व त्यांच्या कामात अडथळा अणू नये.






14 जून 1818 च्या हेन्री पॉटिंजरच्या आदेशान्वये सीवनेर तालुक्याचा कमावीसदार रामराव नरसीव्ह शिवनेरी किल्ला, हडसर किल्ला, चावंड किल्ला, हरिश्चंद्रगड किल्ला, कंजीरगड किल्ला व जीवधन किल्ला हे सहा किल्ले बोईट साहेबाच्या हवाली पाडण्या करिता करतो. तसेच त्या किल्ल्यांवर ठेवलेली सर्व शिबंदी, कारकून व कामगार व इतर माघारी बोलावून घेतो.







17 जून 1818 च्या जाहिरनाम्याद्वारे कंपनीने जाहिर केले की, दुसया बाजीरावाने त्रिंबकजी डेंगळयास पकडून देणायास दोन लाखाचे व त्याची माहिती व ठाव ठिकाणा सांगणाऱ्यास 10 हजार रुपये बक्षीस देण्याचे जाहीर केले होते, ते आता रद्द समजून त्रिंबकजी डेंगळयास पकडून देणायास अथवा ठिकाणा सांगणायास कंपनीतर्फे योग्य ते बक्षीस दिले जाईल. हा जाहिरमाना एल्फिन्स्टन याने हा जाहिरनामा काढलेला आहे.




22 जून 1818 च्या आदेशान्वये हेन्री पॉटीजर सीवनेर तालुक्याच्या कमावीसदार रामराव नरसीव्हास कळवितो की, बोईट साहेबाकडे सहा किल्ले सुपूर्द केल्याचे समजले. बोईट साहेबाबरोबर 200 लोक आहेत. त्यांची हजेरी व त्यांच्याकडून काम स्वत:साहेबच करुन घेतील. तुम्ही ढवळाढवळ करु नये. ब्राम्हणवाडयाजवळ भील्ल व रामोशांनी कंपनी सरकारच्या विरोधात बंड सुरु केले आहे. तेंव्हा महालाचा बंदोबस्त हुशारीने राखावा. पुण्याहून जे जाहीरनामे पाठविले आहेत ते सर्व माहालात समजून सांगावेत प्रत्येक गांवास त्यांच्या नकला करुन द्याव्यात.




5 सप्टेंबर 1818 च्या जाहीरनाम्यानुसर सर्व रयतेला कळविण्यात येते की, दुसरा बाजीरावाने मराठी राज्यावरील अधिकार सोडला असून कंपनीकडून पेन्शन स्विकारून एका जागी शांत राहण्याचा करार केलेला तेंव्हा त्याच्या साथीदारांनी/मदतनीसांनी देखील शांत रहावे बंड बखेडा करू नये. तसेच दुसरा बाजीरावाचा खजिना, संपत्ती जडजवाहीर, दाग दागिने रुपये ज्याच्या जवळ असतील त्यांनी ते सरकारात आणून जमा करावे. न जमा केल्यास व सरकारास समजल्यास संपत्ती / खजिना बाळगण्यायास मोठी शिक्षा दिली जाईल. तसेच त्या बेनामी / गुप्त संपत्तीचे हस्तांतर इतरत्र करु नये. तसेच दुसरा बाजीरावाच्या बेनामी / गुप्त संपत्तीची जो कोणी माहिती देईल त्यास त्या संपत्तीच्या प्रमाणात बक्षीस दिले जाईल.






5 सप्टेंबर 1818 च्या जाहिरनाम्यानुसार अद्याप कोणीही बाजीराव दुसरा याचा खजिना / संपत्तीचा ठाव ठिकाणा सांगण्यास पुढे आले नाही. तेव्हा कंपनी सरकारने संपत्तीतील शेकडा 10 टक्के वाटा बक्षीस म्हणून देण्याचे जाहीर केले. तसेच सरकाराला समजल्यास त्या व्यक्तीचे घर व वतन जप्त केले जाईल.




5 नोव्हेंबर 1818 च्या जाहिरनाम्यानुसार छत्रपती शाहु यांच्यापासून चालत आलेले यज्ञेश्वर भट यांची कुसूर येथील 3 चावर, 17 बिघे इनाम चालविणे.







15 डिसेंबर 1818 च्या जाहिरनाम्यानुसार सर्व जहागिरदार व सरंजामदारांना सूचीत केले जाते की, त्यांनी आपआपल्या जहागिरीची, संरजामाची सनदा पत्रे एका महिन्याच्या आत कंपनी सरकारात सादर करावीत म्हणजे त्यांच्या खर्चाची व्यवस्था लावून देण्यात येईल. एका महिन्यात सनदापत्रे न दाखविल्यास त्यांच्याकडे सनदापत्रे / कराराच्या याद्या नाहीत असे समजून त्यांची जहागीर अथवा सरंजाम जप्त करण्यात येईल.



नारायणगड किल्ला पाडल्यानंतर कोणत्या किल्ल्याकडे जाणार याची माहिती लवकर कळविणे नारायणगडावर दफेदार, कारकून व जवान मिळून सत्तावीस आसामी आहे. त्यांना अहमदनगर येथे पाठवावे किंवा बडतर्फ करावे. नारायणगडावरील दारू व तोफा लहान जेंजाला व बंदूका संरजामाच्या यादी सरकारत पाठवून तो सरंजाम शिवनेरीस ठेवावा. शिवनेरी देखील पाडावयाच्या वेळेस सरंजाम जुन्नरास ठेवावा.






सरकार हुकूमाप्रमाणे जुन्नर प्रांतात जमीन मोजणीस साहेब लोक दाखल होताच ते विच्यारतील ती सर्व माहिती रयतेकडून त्यांना द्यावी. तसेच त्यांना लागणाऱ्या जिनसा त्यांना खरेदी करून द्याव्यात.




20 डिसेंबर 1818 च्या सनदेनुसार गोंविद भट उपासनी संगमनेर यांचे माधवराव पेशव्यापासून चालत आलेले चार आणेचे इनाम प्रांत जुन्नरच्या महसूलातून चालविणे.






23. डिसेंबर 1818 च्या जाहिरनान्यानुसार बक्षुमिया जुन्नरकर याचे मोगलाई पासूनचे 35 बिघ्याचे वतन चालविणे.





26 डिसेंबर 1818 च्या जाहिरनान्यानुसार जनार्दन गोपाठ याची स्त्री गंगाबाई हिचे जुन्नर येथील महसूलातून 50 रु. वर्षासन चालविणे.

18 फेंब्रुवारी 1818 च्या जाहिरनाम्यानुसार शिलेदाराला कोणाकडे चाकरी करावयाची असल्यास त्याने पाटलाकडून तशी परवानगी घ्यावी. पाटील मामलेदाराकडून परवानगी आणून देईल. वाराणसीबाईनी पाटील किंवा मामलेदार यांच्या परवानगीशिवाय 7 शिलेदार चाकरीस ठेवले ही बातमी कंपनी सरकारास समजताच कंपनीने शिलेदारांची घोडी जप्त करून शिलेदारांच्या गांवच्या पाटलाकडून गुन्हेगारी वसूल केली व सज्जड दम दिला की, जर सरकारच्या किंवा पाटलाच्या परवानगीशिवाय शिलेदार कुठे चाकरीस गेल्यास पाटलांचीच वतने जप्त केली जातील.

प्रकरण सातवे

निष्कर्ष

7.1 अभ्यास विषयाचा निष्कर्ष

काळ पुढे जात असतो.......जात राहील.........परिवर्तन हाच संस्कृतीचा नियम असतो.........

प्रस्तुत शोध कार्यात मराठी साम्राज्याचा शेवट आणि ब्रिटिशांची पायाभरणी यामध्ये कशा पध्दतीने सत्तांतर होत गेले. त्याच बरोबर एक ऐतद्देशिय राज्य नष्ट होऊन परकिय सत्ता अस्तित्वात आली आणि त्यामार्फत परिवर्तन घडत गेले. मराठयांच्या पराभवाला सन 1795 पासुन महत्वाच्या घटना जास्त जबाबदार ठरल्या आहेत. वीस वर्षात मराठयाची सर्व सत्ता ब्रिटिशांकडे हस्तांतरीत झाली. त्यांनी आपला हुकूम चालू केला आणि परिवर्तन घडवून आणले.

ब्रिटिश सत्तेने महाराष्ट्रातील संस्कृती बाम्हीनी का होईना पण त्यात आमुलाग्र बदल केला हे मान्य केलेच पाहिजे. त्यांच्यामुळे जशी स्थानिक अर्थव्यवस्था पुरती कोसळली तसेच आधुनिक ज्ञानविज्ञानाची दारेही उघडली. भारतीय प्रथमच नवीन दृष्टीकोणातून समाज जीवनाचा विचार करू लागले. धर्मसंस्थेने नागवल्या गेलेल्यांच्या विद्रोहाचे महान प्रतीक म्हणजे महात्मा फुले. त्यांनी जहाल भाषेत जी धर्मव्यवस्थेवर व समाजव्यवस्थेवर टिका केली तिला भारतीय समाज इतिहासात तोड नाही. ‘लोकहितवादी आगरकर’, ‘राजाराम मोहन रॉय’ इ. प्रभुतीनीही आपापल्या परीने समाजसुधारणेचे चंग बांधले.

हा भारतीय सांस्कृतीक उलथापालथीचा नवा काळ होता. तसाच राजकीय स्वातंत्र्य आणि राष्ट्रभावनेच्या उभारणीचाही काळ होता. तशी राष्ट्रभावना भारतीय जनतेच्या कल्पनेत पण नव्हती. राज्य, साम्राज्य, गणराज्य यांच्या उपर ती कधीही विकसीत झालेली नव्हती. येथील भिन्न भाषा, भिन्न स्थानिक संस्कृत्या, यामुळे या देशाला आधुनिक काळातील राष्ट्र या संकल्पनेत सामावून घेणे निव्वळ अशक्य होते.

ब्रिटिशांनी सामाजिक सुधारणा तसेच अनेक नागरी सोयी - सुविधा हिंदुस्थानमध्ये सत्ता स्थापन करून येथे रूजवल्या परंतु भेदभावी निर्णयांमुळे व पारतंत्र्याच्या जाणिवेमुळे भारतीयांमध्ये असंतोष निर्माण झाला. विसाव्या शतकाच्या सुरूवातीस तो असंतोष ब्रिटिशांना अनेक प्रकारे पाहण्यास मिळाला. यामुळे मुंबई हे भारतीय स्वातंत्र्यलढयाचे एक महत्वाचे क्रेंद बनले. ब्रिटिशांनी केलेल्या कार्यामुळे भारतीय समाजात एक नविन, हुशार, बुध्दीमान वर्ग जन्मास आला. आधुनिक पुध्दती, विकास कशा पध्दतीने करता येतो हे ब्रिटिशांच्या राज्य कारभारातुन शिकण्यास मिळत गेले. एलफिन्स्टन सारख्या हुशार व्यक्तीला महाराष्ट्रात महत्वाचे स्थान निर्माण झाले. यामुळे परिवर्तन झाले खरे पण नवीन, आधुनिक प्रगतीस प्रारंभ देखील इथूनच झाला.

प्रकरण दूसरे -

'मराठयांचा शेवट व ब्रिटिशाची पायाभरणी' या विषयात 1795 ते 1885 पर्यंत मराठी व महाराष्ट्रा झालेला बदल महत्वाचा आहे. यामुळे नवीन सत्ता महाराष्ट्रात व हिंदूस्थान मध्ये स्थापन झाली. महाराष्ट्रात झालेल्या खडर्याच्या युध्दात मराठयांनी मिळविलेला विजय हा हिंदूस्थानच्या इतिहासात महत्वाचा होता. या लढाईने मराठयांचे पानिपतावर झालेले नुकसान व अंतर्गत हेवे-दावे हे सर्व विसरुन सर्व मराठा सरदार आपल्या मराठी साम्राज्यासाठी एकत्रित आले. यात प्रत्येकाचा काही ना काही स्वार्थ होता. पण त्या निमित्ताने का होईन ते पेशव्यासाठी नाही तर मराठी साम्राज्यासाठी एकत्र आले. यामुळे मराठयाच्या उत्साहाचे माप लागत नाही. खडर्याच्या लढाईत मिळविलेला विजय हा निजाम व ब्रिटिश यांच्यासाठी मोठी धोक्याची घंटा होती. मराठयाच्या शत्रुना डोळे वर करून पाहण्याची हिंमत झाली नाही. पण याचे वेळी मराठयांवर जी विज कोळसळली ती म्हणजे पेशवा सवाई माधवराव या तरूण पेशव्याचा मृत्यु मुळे आता मराठी सत्ता दुसरा बाजीरावाने शिंदेच्या मदतीने आपल्या हाता घेतली. पण या घटनेमुळे पुणे दरबारात शिंदेचे वर्चस्व वाढण्यास सुरवात झाली. यावेळी उत्तरेतील शिंदेची परिस्थिती मोठी तनावाची झाली. दुसरा बाजीराव यांच्याकडून आपली पैशाची गरज भागणार नाही म्हणून अमृतराव यांच्या मदतीने चिमाजीला पेशवा केला. पण नाना फडणीस फिरून दुसरा बाजीराव याचा

पक्ष घेतला त्याला पेशवे केले. पुढे नानांच्या मृत्यु झाला, यावेळी मराठी साम्राज्याचे सर्व शहाणपण लयास गेले. आता मराठी साम्राज्यात समजुतदार कोणी राहिले नाही, सर्व कारभार दुसरा बाजीरावाच्या हातात गेला. ज्याला राज्य कारभार, युध्दनिती, गनिमी कावा, चाली रिती या कोणत्याच गोष्टीची माहिती नव्हती आणि म्हणुनच मराठयांना पुढे मोठया संकटांत नेऊन ठेवण्याचे काम या पेशव्याने केले.

प्रकरण तिसरे -

दौलतराव शिंदेचा वाढलेला गृहकलह या बिकट परिस्थिती मुळे पुण्यात त्यांनी दुसरा बाजीराव यांना पेशवा पदावर बसवुन उत्तरेकडे निघुन गेले. यावेळी बाजीरावाने दक्षिणेकडील पेशव्या विरुध्द झालेले बंड मोडण्यात गुंतला असता त्याच्या हातुन यशवंतराव होळकर यांचा बंधु विठोजी होळकर हा पेशवा विरोधी बंडाचे नेतृत्व करत होता. त्याला मृत्युदंड देऊन पेशवा यांनी मोठे संकट ओढावून घेतले. शिंदे व होळकर यांचे फारसे पटत नव्हते, शिंदे पुण्यातून गेले आणि होळकर पुण्यात आला. होळकरास घाबरून बाजीराव पळून गेले व ब्रिटिशांच्या ताब्यात सापडले शिकार चालून आपल्याकडे आली मग काय ब्रिटिशांना तेच हवे होते. त्यांनी शिकार सावध धरली व मराठी राज्य वसईच्या एका तहाने पुर्ण पणे खाक झाले. आपले अधिकार, प्रशासन सर्व ब्रिटिशांकडे देऊन पेशवा दुसरा बाजीरावा शांत बसला. ही बातमी मराठी साम्राज्यातील सरदारांना समजात त्यानी युध्दाचे पावित्रा घेतला मात्र ब्रिटिशांनी फोडा, झोडा व राज्य करा ही निती वापरून होळकर सोडून बलाढय असे शिंदे यांच्या शेवटासाठी प्रयत्न केले. ज्या शिंदेनी बाजीरावाला पेशवा पदावर बसवले त्याच्यात मागे ब्रिटिश लागले यासुमारास शिंदेची फौज नवीन धर्तीवर तयार झालेली होती. महादजी शिंदेच्या काळापासून दरारा मोठा होता दिल्ली दरबारात शिंदेचा हूकूम चालत होता. यामुळे ब्रिटिशानी फंद फितूरी करून शिंदेच्या फौजेतील सर्व युरोपीयन अधिकारी लाच, अमिश दाखवून फोडण्याचे काम केले. या कामात ब्रिटिशांचा गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली याचे विस्तरवादी धोरण कामाला आले तसेच माल्कम सारख्या ब्रिटिश अधिकायाने मराठा एक होऊ दिले नाही. शिंदे व होळकर यांच्यात तिढा निर्माण करून दिला आणि शेवटी शिंदे होळकर, गायकवाड, भोसले यांना

बाजूला करून त्यांच्यावर जबर तह लादून मराठयांच्या साम्राज्याचा एक खांब संपून टाकला होता.

प्रकरण चौथे -

शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड यांना ब्रिटिशांनी पुर्णपणे शांत केले आता वेळ आली पेशवा दुसरा बाजीरावाची आपल्या विरुध्द कारस्थाने करतो तसेच ब्रिटिशांनी येथे स्थानिक जनतेला आपल्या बाजुला करून पेशव्यास जनतेच्या नजरेतुन उतरवले. यामुळे ही स्थानिक जनता पेशव्यांवर नाराज झाली. यामुळे ब्रिटिशांनी पेशवा दुसरा बाजीरावावर प्रथम पंढरपूर करारात अडकून हैराण करण्याचे कारस्थान चालु केले. गायकवाड व ब्रिटिश यांचे संबंध चांगले असल्या मुळे पुढे चांगलाच गोंधळ झाला पुण्यात गायकवाड यांच्याकडे असलेली थकीत रक्कम यामुळे त्यांचा व ब्रिटिश या दोघांचाही हस्तक गंगाधरशास्त्री यांचा खुन झाला आणि ब्रिटिशांनी यास राजकीय वळण देऊन बाजीरावाने असे काही करावे यांची वाट पाहून होते. त्यातच जहागिरदार वर्गाचा दक्षिणेत वाढत असलेला त्रास यामुळे ब्रिटिशांची मध्यस्थी भोवली आणि पुढे अनेक संकटांना पेशव्यांना तोंड दयावे लागले. या सर्व कारणा मुळे ब्रिटिशांनी पेशव्यांवर पंढरपूर सारख्या जबर तहात अडकवले, यामुळे बाजीरावाच्या हातात आता नामधारी पणा राहिला. त्याची आवस्था फार बिकट झाली होती. शेवटचा पर्याय होता तो म्हणजे ब्रिटिशां विरूध्द युध्द पुकारणे पण त्याचा कधी युध्द व युध्दाची परिस्थिती यांच्याशी संबंध आला नाही तो कसा सामना करणार ज्या पहिल्या बाजीरावाने दिल्ली गाठली, रघुनाथरावांनी अटक गाठले पण या त्यांच्या वंशाला काहीच करता आले नाही. आपल्या वंशानी जो पराक्रम केला तो या दुसरा बाजीरावास आठवला नाही. आणि शेवटी पळून पळून थकला व छत्रपतीला ब्रिटिशांच्या ताब्यात सोडून स्वतः उत्तरेत बिठूर येथे जाऊन कायमचा बसला, तो मृत्यू पर्यंत पुण्यात आला नाही.

मराठी राज्य छत्रपतीच्या हाती देऊन आम्ही छत्रपतीची पेशव्यांच्या ताब्यातून सूटका केली. आता छत्रपतीच तुमचा राजा राहिल येथे पण ब्रिटिशांनी तेच केले, छत्रपती नाममात्र करून सत्ता आपल्या हाती घेतली. व पुढे डलहौसच्या प्रयत्नाने त्यानी मराठी

राज्य खालसा केले. अशा प्रकारे मराठी राज्य ब्रिटिशांनी आपल्या असंख्य प्रयत्नाने संपवले आता महाराष्ट्रावर नवीन राजवट निर्माण झाली आणि ती म्हणजे कंपनी सरकार जुने गेले नवीन आले. पेशवा संपला तसेच छत्रपती पण संपला सातासमुद्रा पलीकडील लोक आता राज्य करते झाले. हिंदुस्थानातील बलाढय अशी मराठी सत्ता संपवण्यासाठी एलफिन्स्टन याचे योगदान मोठे हुशारीचे व मोलाचे ठरले.

मराठयांचे साम्राज्य स्वतःच्या अंतर्गत वादातून दुसरा बाजीराव यांने आपली सर्व ताकद दुसयाला संभाळण्यासाठी दिली यामुळे संभाळणारा हुशार होता एलफिन्स्टन, माल्कम, ग. ज. वेलस्ली, डलहौसी यांनी योग्य वेळी योग्य तह करून शेवटी संपुर्ण हिंदुस्थान आपल्या वर्चस्वाखाली आणला.

प्रकरण पाचवे -

सन 1818 मध्ये मराठी साम्राज्यचा शेवट झाला या नंतर ब्रिटिशांनी मराठा प्रांताचा सर्व आधिकार आपल्या ताब्यात घेवुन येथील प्रशासकीय, आर्थिक, सामाजिक, राजकीय या सर्व घटकांवर ब्रिटिश कंपनीचा अधिकार प्रस्तापित झाला आणि मराठे हे फक्त नाममात्र राहिले यांच्या हातात आता कोणताच कारभार उरला नव्हता. खया अर्थाने ब्रिटिश नीतीचा व ब्रिटिशांचा कारभाराची जाणीव येथून होण्यास सुरवात होऊ लागली होती. या सर्व घटनांचा करता धरता एलफिन्स्टन हा कर्तबगार ब्रिटिश गव्हर्नर होय. एलफिन्स्टन यांनी मराठी साम्राज्याची प्रशासकीय कारभार आपल्या काही निवडक आधिकारी वर्गाना बरोबर घेऊन त्यांना एलफिन्स्टन परिवार म्हणून संबंधले.

एल्फिन्स्टन व एल्फिन्स्टन परिवाराने तिसया ब्रिटिश मराठे युध्द समाप्ती नंतर महाराष्ट्रात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करुन ब्रिटिशांच्या बद्दल जनमानसात आदर आणि विश्वास संपादन केला. पेशव्याने काय करावयाचे, छत्रपतीचे स्थान कसे निश्चित करावायचे, जहागीरदार, जमीनदार, वतनदार, हक्कदार सैनिक, वर्षासनधारक, परागंदा झालेले शेतकरी, कुणबी, कुलकर्णी, पाटील व हिंदू मुस्लीम देवस्थानांची इनामे, देशमुख, देशपांडे या सर्वाचे प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडविले आणि ब्रिटिश सत्ता महाराष्ट्रात दृढ करण्यासाठी लोकाश्रय देखील मिळविला, पुढे लोक ब्रिटिश राज्य हे ईश्वरी वरदान

आहे असे म्हणू लागले. एल्फिन्स्टन हा उदारमतवादी असला तरी साम्राज्यवादी प्रवृत्तीचा असल्याने मराठयांच्या इतिहासाची चांगली जाण असल्याने मराठयांकडून प्रथम किल्ले ब्रिटिशांच्या ताब्यात घेतले. सैनिकांसह शांत बसल्यास त्यांची वतने, सरंजाम, इनाम हक्क तसेच पुढे कंपनी सरकारच्या राज्यात चालु ठवेले जातील व त्याला संरक्षणही दिले जाईल. सैनिकांना कृषि व्यवसाय करण्यास भाग पाडले. गांवांचे संरक्षण, सुव्यवस्था व प्रशासकीय पुनर्रचना या सर्वच बाबतीत मराठयांच्या परंपरांचा पूर्ण अभ्यास करून एल्फिन्स्टनने आपले नवे धोरण आखले आणि जुन्या संस्थाना व जुन्या पध्दतीला नवे रुप दिले. जुन्या संस्थाच्या पारंपारिक अवास्तव अधिकारांवर नियंत्रण आणले. लोकांची मने दुखावणार नाहीत अशा बेताने प्रशासनात आवश्यक ते बदल धीमेपणाने पण निर्धारयुक्त करून महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेचे दृढिकरण केले व ते करीत असतानाच महारष्ट्रात परिवर्तन घडवून आणले. आदेश व हुकूम अंमलात आणताना जाणीव पूर्वक दाखविलेली सहिष्णुता हे त्याचे वेगळेपण म्हणता येईल. अंमलबजावणीची त्यांची पध्दत इतरांपेक्षा वेगळी होती. जाचक वाटणार नाहीत अशा प्रकारे धोरणे राबविल्यामुळे प्रारंभिक कारभार सुसह्य झाला व महाराष्ट्रात सत्तांतर घडून आले.

महाराष्ट्रात उठावाचे वातावरण निर्माण होण्यास उत्तरेतील घटना ज्यापध्दतीने कारणीभूत आहे त्या पध्दतीने ब्रिटिशानी आपली सत्ता स्थापन केल्या नंतर काही छोटया मोठया चकमकी, बंड, मराठी साम्राज्या विषयी असणारी भावना या सर्व गोष्टीचा उद्रेक सन 1857 मध्ये झाला, पण त्याचे स्वरुप फार थोडया प्रमाणात दिसून आले हा बंड महाराष्ट्रात ब्रिटिशाच्या कार्य मुळे जाणावला नाही. मराठी राज्यात पेशवा, जहागिरदार, सरंजामदार, सावकार, सरदार इ. तसेच सन 1818 मध्ये केलेल्या महाराष्ट्राचे हाल या मुळे येथील जनता सर्व तो परी त्रस्त झाली होती. म्हणून पुढे महाराष्ट्रात ब्रिटिशांना मोठया प्रमाणात विरोध झाला नाही. 1818 ते 1857 या काळात ज्यानी बंड केले होते आणि ब्रिटिशांनी ते शांत केले त्यानीच फिरून 1857 मध्ये बंडचा झेंडा घेतला होता. त्यामुळे ब्रिटिशाना तो मोडण्यासाठी फार श्रम महाराष्ट्रात घ्यावे लागले नाही.

7.2. सारांश -

मराठयानी प्रथम दाखवलेली एकता ही त्यांना तशीच कायम टिकवता आली नाही. पेशवे पदा पासून सुरू झालेला वाद हा पेशवे पदावरच संपला आप-आपसातील भांडणाचा फायदा तिसयानेच घेतला आणि मराठी सत्ता ब्रिटिश कंपनीच्या हातात गेली. सन 1795 पासून मराठयांच्या सत्तेचा शेवट झपाट्याने झला महाराष्ट्राच्या इतिहसात हे साल परिवर्तनाचे व महत्वाचे ठरले. पेशवा सवाई माधवराव यांचा मृत्यु झाला पेशवे पदावर आता दुसरा बाजीरावाने दावा सांगून पेशवे पद भांडून का होईना मिळवले. भांडणे इंतकी विकोपाला गेली की यात मराठी साम्राज्याची प्रमुख व्यक्ती नानाना कैदेत सुध्दा राहावे लागले मुसूद्दी नाना यांच्यावर असे दिवस येतील असे त्याना पण वाटले नव्हते. यशवतंराव व दौलतराव या मराठ्यांच्या शुर योध्दयां मधील अंतर्गत वाद सन 1800 मध्ये चांगलाच रंगला, शिंदे पुण्यात येऊन उतमात करून निघून गेले. यानंतर ज्याला आपल्या स्वतःच्या कर्तत्वावर मोठी शंका होती असा पेशवा दुसरा बाजीराव यांनी आपलेच सरंजामदार, जहागिरदार यांना पाण्यात पाहण्यास सुरवात केली आणि होळकर घराण्यातील विठोजी होळकर यांचा वध केला यामुळे पुण्यातील वातावरण चांगल्याच प्रमाणात पेटत गेले. यशवंतराव होळकर यांचे पुण्यात आगमन झाले होळकर पुण्यात आल्यानंतर त्यानेही तेच केले जे शिंदेंनी केले. या वेळी वाईट घडले ते म्हणजे दुसरा बाजीराव यशवंतराव होळकरांना पाहून पुण्यातुन पळाला व ब्रिटिशांना मिळाला आणि पेशवे पदासाठी वसईचा तह केला. या तहाने मराठी सत्ता गहान ठेवली गेली तीला सोडवण्यासाठी आता एकत्र येणे गरजेचे होते पण यात एकाही मराठी मंडळाच्या नेत्याला यश आले नाही ते येऊ पण दिले नाही आणि शेवटी ब्रिटिशांनी आपला डाव साध्य करून घेतला. शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले यांना बाजूला करून तहात अडकवले. पुढे यानां काहीच हालचाल करून दिली नाही यामुळे पुढे लवकरच मराठी सत्ता लयास गेली. पेशवा दुसरा बाजीराव हा पेशवे पदासाठी लायक नसलेला, धडाडी नसलेला असा पेशवा होता. ब्रिटिशांनी त्याचे सर्व हेतु ओळखून त्याला पुर्णपणे परास्थ केले मराठी राज्यातुन शेवटी पेशव्यास पळवून लावले आणि सन 1818 रोजी मराठी राज्य ब्रिटिशांनी आपल्या

हातात घेतली. पुण्यात युनियन जॅक फडकून ब्रिटिशांनी नवीन उच्चांक गाठला. पेशवाला त्याची लायकी दाखवून दिली ती त्याला निवृत्ती वेतन देऊन बिठूर येथे बसवून ठेवले. यानंतर ब्रिटिशांना पुढे मोठे आव्हान होते ते येथील प्रशासकीय, राजकीय, सामाजिक, आर्थिक व्यवस्थेचे, त्यांनी ते योग्य रित्या पार पाडले. एलफिन्स्टन च्या मते ''आपले सरकार जास्त दिवस जर हिंदूस्थानच्या धरतीवर स्थापित ठेवायचे असेल तर येथील जनतेला न दुःखावता येथील व्यवस्था आहे तिच ठेऊन त्यात कोणताच बदल करू नये'' महाराष्ट्रात एलफिन्स्टन यांच्या कार्याची चर्चा सर्वत्र होऊ लागली होती. मुंबईचा गव्हर्नर झाल्यावर आपण स्थापन केलेल्या परिवाराच्या जोरावर, प्रसंगी वरिष्ठाचा आदेश धुडकावून येथील कार्याला त्यानी प्रथम योगदान दिले. मराठी मानसाची नस एलफिन्स्टन यानी चांगलीच ओळखली होती. मराठयाशी आपण राज्य लढून घेतले याची त्याला पूर्ण जाणिव होती. मराठी साम्राज्य टिकवण्यासाठी येथील जनतेला न दुखावणेच योग्य होते. एलफिन्स्टन यानी महाराष्ट्रात प्रशासकीय कार्यपध्दतीसाठी नेमलेल्या 'डेक्कन कमिशन' अंतर्गत मराठी राज्याचा कारभार सुरळीत पार पाडला. महाराष्ट्रात या वेळी आपली पुर्वीची गेलेली सत्ता, आपला गेलेला रोजगार, झालेली बेकारी यामुळे अनेक ठिकाणी ब्रिटिश कंपनी विरुध्द बंड निर्माण झाले. महाराष्ट्रात या बंडाचे प्रमाण कमी होते. एलफिन्स्टन व माल्कम यांनी महाराष्ट्रात केलेल्या कार्यामुळे येथील जनतेने जे मराठी सत्तेला कंटाळले होते त्यांनी पुर्ण पणे ब्रिटिश सत्ता टिकवण्यासाठी सहकार्य केले. सन 1857 च्या उठात महाराष्ट्रातून ब्रिटिशाकडे सहकार्यासाठी अनेक पत्रे गेली. महाराष्ट्रात अनेक व्यक्तींना ब्रिटिश राज्य ईश्वरी अवतार वाटू लागले होते. मराठयांच्या कायदयात बदल न करता त्यातील वाईट चाली रिती काढून जनतेच्या कल्याणासाठी कशा पध्दतीने उपयुक्त होईल याकडे लक्ष दिले. नवीन शिक्षण, दळणवळण, वृत्तपत्रे, न्यायदान, जमिन महसूल पध्दत, समाज परिवर्तनाचे कार्य, सती प्रथा, पडदा पध्दत, बाल विवाह, बाहेरील जागाचे ज्ञान हे सर्व ब्रिटिशांच्या माध्यमातून मराठी राज्यात मोठया प्रमाणात प्रसारीत झाले होते. मराठी सत्ता नष्ट होऊन महारष्ट्रात सत्तांतर होत गेले या सत्तांतरा बरोबरच परिवर्तन घडले व हेच परिवर्तन आधूनिक युगात महत्वाचे ठरले.

संदर्भ ग्रंथ

प्रकरण पहिले

1) डॉ. वि. गो. खोबरेकर, 1988, महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड भाग - 2, 1707 - 1818, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

2) सदशिव आठवले - 1990 - 'सरदार बापू गोखले' श्री. विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे - 30

3) प्रमोद ओक, 1991, पेशवे घराण्याचा इतिहास, अनिरुध्द अनंत कुलकणी, प्रकाशन, पुणे

4) Stewart Gordon, 1993, 'The Marathas' 1600-1818 (The New Cambridge History of India) II. 4, Press syndicate of the Cambridge university press 1993, New York, First Published 1993

5) डॉ. समुन वैद्य, 1994, अखेरचा पेशवा, प्रगती पकाशन, 87 अ, धंतोली, नागपूर - 12

6) डॉ. वि. गो. खोबरेकर, 1994, 'महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे'- 1818 ते 1884, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

7) राठोड एन. जी. 1994, "The Great Maratha Mahadji Scindia'. Sarup and sons, 4740/23, Ansari Road, Darya Ganji, New Delhi-02

8) प्रमोद ओक, 1999, एलफिन्स्टन, राजहंस प्रकाशन 1025, सदाशिव पेठ, पुणे - 30

9) ह. म. घोडके, 2000, महाराष्ट्रगाथा, राजहंस प्रकाशान 1025, सदाशिव पेठ, पुणे - 30

10) डॉ. अ. रा. कुलकर्णी - 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे - 30

11) आर. एस. चौरसिया - 2004 - "History of the Marathas,' Atlantic Publishers & Distributors, B-2, Vishal Enclave, Opp. Rajouri Garden, Delhi - 110027

12) य. ना. केळकर, 2004, 'भूतावर भ्रमण' - एतिहासीक लेखसंग्रह, डायमंड पब्लिकेशन्स, 1255, सदाशिव पेठ, लेले संकुल, निंबळकर तालीम चौक, पुणे - 30,

13) डॉ. अ. रा. कुलकर्णी - 2007, 'मराठा आणि महाराष्ट्र' डायमंड पब्लिकेशन्स, सदाशिव पेठ, पुणे

14) य. ना. केळकर - 2008 - 'ऐतिहासिक पवाडा' मराठयांचा काव्यमय इतिहास, डायमंड पब्लिकेशन्स, 1691 सदाशिव पेठ, पुणे - 30

15) ग. ह. खरे, अ. रा. कुलकर्णी, 2010, मराठयांचा इतिहास खंड-3, महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती

मंडळासाठी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे- 30

16) गोविंद तळवळकर.2005, 'मंथन'. मौजे प्रकारशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई - 04

17) डॉ. माधुरी मंडलिक - 2002 , 19 व्या शतकातील महाराष्ट्रातील हिंदू धर्म सुधारणा चळवळ, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

18) डॉ. अनिल कठारे - 2001, आधुनिक भारताचा इतिहास 1857 ते 1950, प्रशांत पब्लिकेशन, पुणे.

19) कु. पाटील टी. ऊ.- 1992 - 'मराठयांच्या इतिहासात तुकोजी होळकरांची कामगिरी आणि त्यांचा काळ' - 1766-1797 पी-एच. डी. शोध प्रबंध, सदर, समाज विज्ञान शाखा, अमरावती विद्यापीठ,

20) Enid M. Fuhr, - 1994 - 'Strategy and Diplomcty in British India Under Marquis Wellesley: The Second Maratha War, 1802-1806', Thesis Submitted in Doctor of Philosophy in The Departmen of History, M.A.,King's College, University of London.

21) रवि रंजन प्रसाद - 2003 - 'Maratha Sate Formation with Reference to Shinde and Holkar', Doctor of Pholosophy, Thesis Submitted to Centre for Historical Studies School of Social Sciences Jawaharlal Nehru University, New Delhi.

22) मंजुशा मुसमाडे - 2009 - 'Development of Entrepreneurship in Western India (Maharashtra) in British Rule' (1850- 1947), Doctor of Pholosophy, Thesis Submitted to Department of Economics, Pune University, pune

23) हवालदार तानाजी - 2010 - 'महादजी शिंदे आणि मराठी सत्ताः एक नवीन दृष्टिक्षेप, पी-एच. डी. पदवीसाठी सादर प्रबंध, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

24) अविनाश सोवनी - 2011 - "Maratha Town and City Planning with reference to The Systems of Village Development During 17th and 18th Centuries", Doctor of Pholosophy, Thesis Submitted To Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.

25) कल्पना शाहु - 2012 - 'Maratha-Rajput Relations During The Eighteenth Century', Doctor of Pholosophy, Thesis Submitted to Department of History, University of Delhi.

26) अशोक ज्ञा. पाटील, - 2013 - 'पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाची साधने आणि सांस्कृतिक जीवन प्रवाह - 1720 - 1818, पी-एच. डी. पदवीसाठी सादर प्रबंध, इतिहास विभाग, टिकळ महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

27) एस. एम. दहिवासम - 1995 - 'Consolidation of Maratha Dominance in Maharashtra', Economlc and political wekly, Vol. 30, No. 6, pp. 336-342

28) मिचेल मनन - 2005 - Turbulent Delhi : Religious Strife, Social Tension and Political Conflicts, South Asia: Journal of South Asian Studies, n.s. Vol.XXVIII, no. 1, April, 2005

29) पटेर रोब - 2007 - 'On the Rebellion of 1857: A Brief History of an Idea', Economic and Political Weekly, Vol. 42, No. 19, pp. 1696 - 1702.

30) अरविंद गनाचारि - 2008 - 'Imperialist Appropriation and Disciplining the Indian Mind (1857- 1917): Whose History?' , Economic and Political Wekly, Vol.43, No. 5 , pp. 77-87.

31) मनिस डी. फारूकि - 2009 - 'At Empire's End: The Nizam, Hyderabad and Eighteenth-Century India', Modern Asian Studies, Vol. 43, No. 1, Expanding Frontiers in South Asian And World, pp. 5-43

32) तिर्थंकर रॉय - 2010 - 'Rethinking the Origins of British India: State Formation and Military - Fiscal Undertakings in Eighteenth Century world Region', Department Of Economic History London School of Economics Houghton Street London, UK, WC2A 2AE Working Paper No 140/10.

प्रकरण दुसरे

1. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, 1959. 'निजाम पेशवे संबंध 18 वे शतक'. पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे - 7 पृ. 108

2. नरसिंह चिंतामण केळकर, 1918. 'मराठा व इंग्रज', धी प्रिंटिग एजन्सी, पुणे शहर, पृ. 88.

3. प्रो. राजाराम विनायक औतुरकर, 1937. 'मराठयांचे साम्राज्य', अ. वि. गृहाचा महाराष्ट्र मुद्रणशाळा, पुणे. पृ. 126

4. गोविंद सरखाराम सरदेसाई, 1929. 'मराठा रियासत' उत्तरविभाग – 3. पृ. 460/461

5. प्रमोद ओक, 1985. 'पेशवे घराण्याचा इतिहास', अनिरुध्द अनंत कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - 30. पृ. 115

6. मु. ले. ग्रांट डफ, लेखक - डेविड केपन साहेब, 1916. 'मराठयांची बखर'. पृ. 313

7. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, 1959. 'निजाम पेशवे संबंध 18 वे शतक'. पुणे विद्यापीठ, पुणे - 7 पृ. 103/114

8. गोविंद सरखाराम सरदेसाई, 1929. 'मराठा रियासत' उत्तरविभाग 2,. पृ. 464

9. अ. रा. कुलकर्णी,1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल पुणे - 30, पृ. 112/113

10. वि. वि. पटवर्धन, मु. ले. - स्वातंत्र्यविर सावरकर, 'हिंदूपदपादशाही प्रथम खंड' सावरकर भवन, पुणे. पृ. 133

11. मु. ले. ग्रांट डफ, लेखक - डेविड केपन साहेब, 1916. 'मराठयांची बखर'. पृ. 310

12. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, 1959. 'निजाम पेशवे संबंध 18 वे शतक'. पुणे विद्यापीठ, पुणे - 7 पृ. 120

13. यादव माधव काळे, 1934. 'नागपुर प्रांताचा इतिहास', यादव माधव काळे बुलडाण (वहाड). पृ. 300

14. नागपूर दप्तर रुमाल. 1, नं. 304

15. पा. द. रु. 43 फा. 20 प. 10

16. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, 1959. 'निजाम पेशवे संबंध 18 वे शतक'. पुणे विद्यापीठ, पुणे - 7 पृ. 111/128

17. अ. रा. कुलकर्णी, 1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ पुणे- 30, पृ. 116

18. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, 1959. 'निजाम पेशवे संबंध 18 वे शतक'. पुणे विद्यापीठ, पुणे - 7 पृ. 106

19. साने काशिनाथ नाराण, 1807. 'खडर्याच्या स्वारीची बखर'. मुंबई पृ. 4

20. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, 1959. 'निजाम पेशवे संबंध 18 वे शतक'. पुणे विद्यापीठ, पुणे - 7 पृ. 140

21. मु. ले. ग्रांट डफ, लेखक - डेविड केपन साहेब, 1916. 'मराठयांची बखर'. पृ. 315

22. गोविंद सरखाराम सरदेसाई, 1929. 'मराठा रियासत उत्तर वि. 2'. पृ. 477

23. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, 1959. 'निजाम पेशवे संबंध 18 वे शतक'. पुणे विद्यापीठ, पुणे - 7 पृ. 162/168

24. प्रमोद ओक, 1985. 'पेशवे घराण्याचा इतिहास', अनिरुध्द अनंत कुलकणी, प्रकाशन, पुणे - 30. पृ. 114

25. गोविंद सरखाराम सरदेसाई, 2004. 'न्यु हिस्टरी ऑफ द मराठा भाग 3', बी. जी. धवले, मुंबई. पृ 282

26. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, 1959. 'निजाम पेशवे संबंध 18 वे शतक'. पुणे विद्यापीठ, पुणे - 7 पृ. 140

27. ऐ. पत्रव्यवहार नं.319

28. प्रमोद ओक, 1985. 'पेशवे घराण्याचा इतिहास', अनिरुध्द अनंत कुलकणी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - 30. पृ. 116/136

29. एन. जी. राठोड, 1994. 'द ग्रेट मराठा महादजी शिंदे' सरूप आणि सोंस, दर्या गंनज, नवी दिल्ली - 03. पृ. 170/175

30. नरसिंह चिंतामण केळकर, 1918. 'मराठा व इंग्रज', धी प्रिंटिग एजन्सी, पुणे शहर, पृ. 89

31. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 9

32. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 13

33. अ. रा. कुलकर्णी, 1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल पुणे- 30, पृ. 118

34. सुमन वैद्य, 1994. 'अखेरचा पेशवा', प्रगती प्रकाशन, नागपूर. पृ. 39

35. मराठा रियासत भाग - 3, पृ. 21/24

36. अ. रा. कुलकर्णी, 1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 176

37. मु. ले. ग्रांट डफ, लेखक - डेविड केपन साहेब, 1916. 'मराठयांची बखर'. पृ. 323

38. मराठा रियासत भाग - 3, पृ. 19.

39. नरसिंह चिंतामण केळकर, 1918. 'मराठा व इंग्रज', धी प्रिंटिग एजन्सी, पुणे शहर, पृ. 90.

40. मु. ले. ग्रांट डफ, लेखक - डेविड केपन साहेब, 1916. 'मराठयांची बखर'. पृ. 325.

41. एन. डी. पाटील, थोरात, पवार, 2006. 'मराठी सत्तेचा विस्तार व ऱ्हास', फडके प्रकाशन, कोल्हापूर. पृ. 187

42. नरसिंह चिंतामण केळकर, 1918. 'मराठा व इंग्रज', धी प्रिंटिग एजन्सी, पुणे शहर, पृ. 91.

43. 'मराठा बखर' - पृ. 327

44. 'मराठा रियासत' उत्तरविभाग - 3, पृ. 71

45. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ. 512

46. मराठा रियासत भाग - 3, पृ. 61.

47. गोविंद सखाराम सरदेसाई. 1993 'ब्रिटिश रियासत भाग 2'. पॉप्युलर प्रकाशन , मुंबई पृ. 171

48. अ. रा. कुलकर्णी, 1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 184

49. ब्रिटिश रियासत भाग 2 पृ. 186

50. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ. 514.

51. पु. रे. प. व्य., भा. 6 वा, 1797 - 1801, नं. 331 / साधन परिचय महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास पान. 290

52. डॉ. प्रमोद पाठक, 2010. 'महामानव' छ. शिवाजी महाराज, नचिकेत प्रकाशन, अनलि रामचंद्र सांबळे, नागपूर - 15. पृ. 18

53. ब्रिटिश रियासत भाग 2 पृ. 171

54. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 121.

55. प्रो. राजाराम विनायक औतुरकर, 1937. 'मराठयांचे साम्राज्य', अ. वि. गृहाचा महाराष्ट्र मुद्रणशाळा, पुणे शहर. पृ. 132

प्रकरण तिसरे

1) गोविंद सखाराम सरदेसाई, 1993. ब्रिटिश रियाशत भाग 2. पृ. 173,178

2. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ. 520.

3. यादव माधव काळे, 1934. 'नागपुर प्रांताचा इतिहास'. यादव माधव काळे बुलडाण (वहाड) पृ. 315.

4. अ. रा. कुलकर्णी, 1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3', महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 185

5. पांडुरंग पिसुर्लेकर, 1987 'पोर्तुगीज मराठा संबंध'. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई पृ. 309

6 प्रमोद ओक, 1985. 'पेशवे घराण्याचा इतिहास', अनिरुध्द अनंत कुलकणी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - 30. पृ. 140

7. वा. वा. खरे, ऐतिहासिक लेख संग्रह भाग 13 नं. 6027

8. मराठा रियासत भाग - 3, पृ. 187

9. मराठा रियासत भाग - 3, पृ. 215

10. अ. रा. कुलकर्णी,1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3',महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 188

11. नरसिंह चिंतामण केळकर, 1918. 'मराठा व इंग्रज', धी प्रिंटिग एजन्सी, पुणे शहर, पृ. 91.

12. सुमन वैद्य, 1994. 'अखेरचा पेशवा', प्रगती प्रकाशन, नागपूर. पृ. 75

13. मराठा रियासत भाग - 3, पृ. 204

14. आपटे, ओतुरकर 1941. 'साधन परिचयः महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास'. वि. गं. केतकर, लोकसंग्रह छापखाना, पुणे. पृ. 294

15. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ. 523.

16. मराठा बखर - पृ. 358

17. प्रमोद ओक, 1985. 'पेशवे घराण्याचा इतिहास', अनिरुध्द अनंत कुलकणी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - 30. पृ. 138

18. नरसिंह चिंतामण केळकर, 1918. 'मराठा व इंग्रज', धी प्रिंटिग एजन्सी, पुणे शहर, पृ. 94.

19. मराठा रियासत भाग - 3, पृ. 210

20. यादव माधव काळे, 1934. 'नागपुर प्रांताचा इतिहास'. यादव माधव काळे बुलडाण (वहाड) पृ. 319

21. अ. रा. कुलकर्णी,1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 197

22. पुना. रे. कॉ. भा. 10 ले. 41

23. आपटे, ओतुरकर 1941. 'साधन परिचयः महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास'. वि. गं. केतकर, लोकसंग्रह छापखाना, पुणे. पृ. 298

24. अ. रा. कुलकर्णी,1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 160

25. पेशवाईचा अखेर पृ 111-12

26. मराठा बखर - पृ. 360

27. प्रमोद ओक, 1985. 'पेशवे घराण्याचा इतिहास', अनिरुध्द अनंत कुलकणी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - 30. पृ. 140

28. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ. 527,532.

29. होळकर शाहीचा इतिहास भा. 2 पृ 102/103

30. शिवराम महादेव परांजपे, 1934. 'मराठयांच्या लढायांचा इतिहास 1802 -1818' शंकर जोशी, चित्रशाळा प्रेस, पुणे. पृ. 120

31. मराठा रियासत भाग - 3, पृ. 233

32. पुणे गॅझे, मरा. काल.531

33. शिवराम महादेव परांजपे, 1934. 'मराठयांच्या लढायांचा इतिहास 1802 -1818' शंकर जोशी, चित्रशाळा प्रेस, पुणे. पृ. 118,148

34. मराठा रियासत भाग - 3, पृ. 273

35. शिवराम महादेव परांजपे, 1934. 'मराठयांच्या लढायांचा इतिहास 1802 -1818' शंकर जोशी, चित्रशाळा प्रेस, पुणे. पृ. 155

36. मराठा रियासत भाग - 3, पृ. 267

37. यादव माधव काळे, 1934. 'नागपुर प्रांताचा इतिहास'. यादव माधव काळे बुलडाण (वहाड) पृ. 332/341

38. अ. रा. कुलकर्णी,1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3',महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 202

39. मराठा रियासत भाग - 3, पृ. 275

40. मराठा रियासत भाग - 3, पृ. 284

41. मराठा बखर - पृ. 366

42. मराठा रियासत भाग - 3, पृ. 297,298

43. ब्रिटिश रियासत भाग 2 पृ. 187

44. यादव माधव काळे, 1934. 'नागपुर प्रांताचा इतिहास'. यादव माधव काळे बुलडाण (वहाड) पृ. 360

45. नरसिंह चिंतामण केळकर, 1918. 'मराठा व इंग्रज', धी प्रिंटिग एजन्सी, पुणे शहर, पृ. 99

46. ब्रिटिश रियासत भाग 2 पृ. 188,198

47. ब्रिटिश रियासत भाग 2 पृ. 191

48. प्रा. फाटक, यशवंतराव होळकर, पृ. 112

49. ब्रिटिश रियासत भाग 2 पृ. 193

50. ब्रिटिश रियासत भाग 2 पृ. 186

प्रकरण चौथे

1. पेशवाईचा अखेर पृ 546

2. नरसिंह चिंतामण केळकर, 1918. 'मराठा व इंग्रज', धी प्रिंटिग एजन्सी, पुणे शहर, पृ. 204

3. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 224

4. नरसिंह चिंतामण केळकर, 1918. 'मराठा व इंग्रज', धी प्रिंटिग एजन्सी, पुणे शहर, पृ. 204

5. ऐ. ले. सं. भा. खंड 15 पृ 8046

6. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ.

7. अ. रा. कुलकर्णी,1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 208

8. पूना रे. कॉ. व्हॉ.12 पृ 308

9. मराठा बखर - पृ. 377

10. अ. रा. कुलकर्णी, 2007. 'मराठे आणि महाराष्ट्र', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पृ. 262

11. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 372

12. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ.571

13. सुमन वैद्य, 1994. 'अखेरचा पेशवा', प्रगती प्रकाशन, नागपूर. पृ. 190

14. मराठी विश्वकोश - म. राज्य. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

15. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ.578

16. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ.595

17. शास्त्री दप्तर ले. 59

18. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 450

19. शास्त्री दप्तर ले. 78

20. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 458

21. सुमन वैद्य, 1994. 'अखेरचा पेशवा', प्रगती प्रकाशन, नागपूर. पृ. 194

22. भावे म. दप्त. भाग 2 पृ. 142

23. मराठा बखर - पृ. 383

24. नरसिंह चिंतामण केळकर, 1918. 'मराठा व इंग्रज', धी प्रिंटिग एजन्सी, पुणे शहर, पृ. 107

25. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ.623

26. म. दफ्तर रू. 2 पृ 137

27. ब्रिटिश रियासत भाग 2 पृ. 250

28. यादव माधव काळे, 1934. 'नागपुर प्रांताचा इतिहास'. यादव माधव काळे बुलडाण (वहाड) पृ. 408

29. काशिराव राजेश्वर गुप्ते, 'नागपरूच्या भोसले बखर ', श्री. ल. पांडरीपांडे, एम.ए. चिटणीस, मध्यप्रांत सं. मंडळ, नागपुर पृ. 238

30. यादव माधव काळे, 1934. 'नागपुर प्रांताचा इतिहास'. यादव माधव काळे बुलडाण (वहाड) पृ. 447, 465

31. शिवराम महादेव परांजपे, 1934. 'मराठयांच्या लढायांचा इतिहास 1802 -1818' शंकर जोशी, चित्रशाळा प्रेस, पुणे. पृ. 4

32.मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 479

33. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ.569

34. शिवराम महादेव परांजपे, 1934. 'मराठयांच्या लढायांचा इतिहास 1802 -1818' शंकर जोशी, चित्रशाळा प्रेस, पुणे. पृ. 6

35. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 483

36. प्रतुल गुप्ता, बाजीराव 2 रा. प. 182-83

37. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 482

38. अ. रा. कुलकर्णी,1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 111

39. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 488

40. शिवराम महादेव परांजपे, 1934. 'मराठयांच्या लढायांचा इतिहास 1802 -1818' शंकर जोशी, चित्रशाळा प्रेस, पुणे. पृ. 256

41. ऐतिहासिक पवाडे खंड 2 पृ. 415

42. अ. रा. कुलकर्णी,1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 222

43. मरा. राज्य - कथा - गोविंद सखाराम प.199

44. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 496

45. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ.640

46. मराठा बखर - पृ. 391

47. अ. रा. कुलकर्णी,1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 224

48. बापू गोखले पृ 138

49. इंग्रज मराठा उत्तररंग पा. 117

50. ऐति. पत्र बोध. मरा. नि. पत्रे 123

51. मराठा बखर - पृ. 396

52. महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे पानं 27 डॉ वि. गो. खोबरेकर

53. नरसिंह चिंतामण केळकर, 1918. 'मराठा व इंग्रज', धी प्रिंटिग एजन्सी, पुणे शहर, पृ. 109

54. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ.648

55. कंपनी सरकार पान 121

56. अर्वाचीन महाराष्ट्र 25

57. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ.701

58. अ. रा. कुलकर्णी,1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 233

59. एन. डी. पाटील, थोरात, पवार, 2006. 'मराठी सत्तेचा विस्तार व ऱ्हास', फडके प्रकाशन, कोल्हापूर. पृ. 217

60. गॉर्डन स्टेवार्ट, 1993, 'द् न्यू केंब्रिज हिस्ट्री ऑफ इंडिया, द मराठा' 1600 - 1818, लंडन, पृ. 178

प्रकरण पाचवे

1. डॉ. बी. एन. सरदेसाई, नलावडे, 'आधुनिक भारताचा इतिहास' (1750-1950), फडके प्रकाशन, कोल्हापूर पृ. 115

2. अ. रा. कुलकर्णी,1984. 'मराठयांचा इतिहास खंड-3' महाराष्ट्रा विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ कॉन्टिनेन्टल, पुणे-30, पृ. 3.5

3. ब्रिटिश रियासत भाग 1, पृ. 219, 236, 301, भाग 2, पृ. 407

4. चांदोरकर गो. का. 1918. 'पेशवाईची अखेर', धुळे पृ. 207

5. लेले वि. गं. 1948. 'शिवशाहीचा असत, पुणे, पृ. 220

6. पित्रे का. ग. 2000 'मराठयांचा युध्देतिहास' कॉटिनेटल प्रकाशन, पुणे. पृ. 299

7. ओक प्रमोद, 1990, 'एलफिन्स्टन', राजहंस प्रकाशन 1025, पुणे. पृ. 116

8. अप्रकाशित जाहीरनामा, डेक्कन कॉलेज, मराठा इतिहास संग्रहालय, पारसनीस फाईल.

9. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ.517

10. ब्रिटिश रियासत भाग 2.पृ. 153

11. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन, पुणे. पृ. 54

12. डॉ. वि. गो. खोबरेकर. 1988, 'महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल' (1630 - 1773) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. पृ.516

13. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन, पुणे. पृ. 58,59

14. अर्वाचीन महाराष्ट्र पृ. 8, 9

15. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन, पुणे. पृ. 63

16. बॉलहेचेट केनेथ, सोशल पॉलीसी ॲन्ड चेंज इन वेस्टर्न इंडिया, 1817-1830, लंडन, 1961, पृ. 52, 53 लेले वि. गं., शिवशाहीचा अस्त, पृ. 242, 243, 244.

17. कर्वे चि. ग. 1957, 'महाराष्ट्रातील ब्रिटिश राजवटीची पहिली घडी', 1818 - 1857, पुणे, पृ. 9 कुलकर्णी अ. रा., कंपनी सरकार, पृ. 89 कॉटन जे. एस. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन, लंडन, 1896, पृ.134-135

18. ओक प्रमोद, 1990, 'एलफिन्स्टन', राजहंस प्रकाशन 1025, पुणे. पृ. 128

19. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस, पुणे. पृ. 76,77, रविंद्र कुमार, 1968, 'वेस्टर्न इंडिया इन द नाईन्टीथ सेंच्युरी, लंडन', पृ. 44, पाटणकर रा. भा., 1999, अपूर्ण क्रांती, मुंबई, पृ. 51

20. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस, पुणे. पृ. 79

21. मराठे व महाराष्ट्र पृ. 184

22. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन, पुणे. पृ. 75, 76

23. अर्वाचीन महाराष्ट्र पृ. 10

24. साधन परिचय महाराष्ट्राचा पत्ररूप इति. 316

25. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन, पुणे. पृ. 81-84

26. कर्वे चिं. ग. 1952, 'पुणे नगर संशोधन वृत्त खंड - 4' पुणे, पृ. 7, 8.

27. पोतदार द. वा., 1916, भारतीय इतिहास संशोधन मंडळ पुणे, इतिवृत्त शके 1838, पुणे, पृ. 71

28. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह पत्र क्र.

29. बेंद्रे वा. सि. 1967, महाराष्ट्रेतिहासाची साधने, भाग - 3, मुंबई, पत्र क्र. 954

30. अप्रकाशित सं. नि. का. रूमाल क्र. 28, फडके क्र. 4 पत्र क्र. 15372

31. अप्रकाशित भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, केळकर संग्रह

32. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह

33. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह

34. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
35. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
36. अप्रकाशित डेक्कन कॉलेज, मराठा इतिहास संग्रहालय, पारसनीस संग्रह, पत्र क्र. 419
37. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
38. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
39. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
40. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
41. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
42. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
43. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
44. अप्रकाशित, पेशवे दफ्तर, पुणे, सातारा महाराज फडफोशी दफ्तर, रूमाल क्र. 19
45. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
46. अप्रकाशित, पेशवे दफ्तर, पुणे सं. नि. का. रूमाल क्र. 28, फडके क्र. 8, पत्र क्र. 15675
47. अप्रकाशित, डेक्कन कॉलेज, पारसनीस संग्रह, पत्र क्र. 520
48. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
49. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
50. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
51. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
52. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
53. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
54. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
55. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
56. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
57. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
58. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
59. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
60. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
61. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
62. अप्रकाशित, भा. इ. स. मं. पुणे, केळकर संग्रह
63. अपकाशित डेक्कन कॉलेज, पारसनीस संग्रह, पत्र क्र. 519
64. मराठे व महाराष्ट्र पृ. 279
65. महाराष्ट्रगाथा पृ. 231

66. अनुवाद डॉ. एम. व्ही. काळे, मूळ लेख. बिपन चंद्र, के. सागर प्रकाशन

67. महाराष्ट्रगाथा पृ. 45

68. मराठे व महाराष्ट्र पृ. 284

69. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन, पुणे. पृ. 100

70. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन, पुणे. पृ. 139

71. Khandes district g. vol. 12 jemes macnabb campbell p- 111-114

72. डॉ. वि. गो. खोबरेकर, 1994. 'महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे', म. र. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.48-49

73. डॉ. वि. गो. खोबरेकर, 1994. 'महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे', म. र. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.35-38

74. महाराष्ट्रगाथा पृ. 197

75. डॉ. वि. गो. खोबरेकर, 1994. 'महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे', म. र. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. 84

76. विठ्ठल वामन हडप, 1955. '57 ची सत्यकथा' केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक हाऊस, चिराबाजार, मुंबई. पृ.

77. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन, पुणे. पृ. 138

78. अर्वाचीन महाराष्ट्र पृ. 19

79. विठ्ठल वामन हडप, 1955. '57 ची सत्यकथा' केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक हाऊस, चिराबाजार, मुंबई. पृ.

80. महाराष्ट्रगाथा पृ. 257

81. डॉ. वि. गो. खोबरेकर, 1994. 'महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे', म. र. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.51

82. महाराष्ट्रगाथा पृ. 142

83. मराठा रियासत उत्तरविभाग - 3, पृ. 621

84. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन, पुणे. पृ. 159

85. ब्रिटिश रियासत भाग 2. पृ. 439-441

86. डॉ. अ. रा. कुलकर्णी, 2000, 'कंपनी सरकार' राजहंस प्रकाशन, पुणे. पृ. 170-171

87. महा. राज्य. मरा. विश्व. निर्मिती मंडळ मुंबई. खंड - 14

88. महाराष्ट्रगाथा पृ. 149,168

89. लो सरदार गो. हरी.दे.पृ19,21

90. महादेव गोविंद रानडे 36, 42

प्रकरण साहवे

भावे दप्तर पुणे



खडर्या सुलतान दुर्ग, सुलतानगड किल्ला, हा भुईकोट किल्ला नगर जिल्हयातील खर्डा गावात आहे. खडर्याच्या किल्लयाचे उत्तरमुखी प्रवेशद्वार सहजासहजी दृष्टिक्षेपात येत नाही.




अहमदनगर जिल्हयातील खडर्या येथील किल्लाचे हे प्रवेश द्वार होय.



मराठी साम्राज्याचा केंद्रबिंदु मानले जाणारे, पुणे येथे असणारा किल्ला शनिवारवाडा,

पेशव्यांचे वास्तव्य येथेच होते..



पुण्यात असणारे या शनिवारवाडयाचे प्रदेशद्वार होय.



एलफिन्स्टन व पेशवा दुसरा बाजीराव यांची शेवटची भेट झाली ती पुण्यात सासवड येथील वाडयात होय.



इंदोर येथे असलेले यशवंतराव होळकर यांचे वास्तव्याचे ठिकाण, येथे असलेले